सन २०१७ मधील महाराष्ट्र विधानपरिषदेच्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील गुरुवार, दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या बैठकीत " श्री. मुकुंद त्र्यंबक कुलकर्णी, माजी वि.प.स. " यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव संमत करण्यात आला. मा. सभागृह नेते, मा. गटनेते, सन्माननीय सदस्य व मा. सभापती यांनी आपल्या भावना व्यक्त केल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्यांनी थोडा वेळ स्तब्ध उभे राहून दिवंगतांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

सन २०१७ मधील महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वितीय अधिवेशनातील शनिवार, दिनांक २० मे २०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या बैठकीत " श्री. गजेंद्र लगमाण्णा अैनापूरे, माजी वि.प.स. " यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव संमत करण्यात आला. मा. सभागृह नेते, मा. गटनेते, सन्माननीय सदस्य व मा. सभापती यांनी आपल्या भावना व्यक्त केल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्यांनी थोडा वेळ स्तब्ध उभे राहून दिवंगतांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

विविध अधिनियमान्वये सभागृहासमोर ठेवण्यात आलेले अहवाल

अ. क्र.	विषय	विधानपरिषदेत ठेवण्यात आलेल्या अहवालाचा दिनांक
(१)	(२)	(३)
१.	महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल.	२९ मार्च, २०१७
२.	" शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे."	२९ मार्च, २०१७
३.	" मॉयल लिमिटेड यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा चोपन्नावा वार्षिक अहवाल. "	२९ मार्च, २०१७
४.	" महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल. "	२९ मार्च, २०१७
५.	" डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे. "	२९ मार्च, २०१७
६.	" महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल. "	२९ मार्च, २०१७
७.	" महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल. "	२९ मार्च, २०१७
८.	" महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल. "	२९ मार्च, २०१७
९.	" महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल. "	२९ मार्च, २०१७
१०.	" पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल. "	३० मार्च, २०१७
११.	" महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल. "	३० मार्च, २०१७

(१)	(२)	(३)
१२.	" महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल. "	३१ मार्च, २०१७
१३.	" महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल. "	३१ मार्च, २०१७
१४.	" महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा. "	१ एप्रिल, २०१७
१५.	" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन २०१४-२०१५ या वर्षाचे सुधारित अंदाज पत्रक. "	१ एप्रिल, २०१७
१६.	" महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल. "	५ एप्रिल,२०१७
१७.	" महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०१३ या वर्षाचा एकेचाळीसावा व सन २०१४ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल तसेच दिनांक ९ डिसेंबर, २०११, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३, दिनांक १६ एप्रिल, २०१३, दिनांक २२ मे, २०१३, दिनांक ३० जुलै, २०१३, दिनांक १ ऑगस्ट, २०१३, दिनांक ६ ऑगस्ट, २०१३, दिनांक २१ ऑगस्ट, २०१३, दिनांक ७ सप्टेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक १० डिसेंबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४, दिनांक २९ एप्रिल, २०१४, दिनांक ९ मे, २०१४, दिनांक २९ मे, २०१४, दिनांक २३ जून, २०१४, दिनांक २४ जून, २०१४ आणि दिनांक ३० जून, २०१४ रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह. "	६ एप्रिल,२०१७
१८.	" मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल. "	६ एप्रिल,२०१७
१९.	" गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल. "	६ एप्रिल,२०१७

(१)	(२)	(३)
२०.	" शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल. "	६ एप्रिल,२०१७
२१.	" डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २००६-२००७ ते २००९-२०१० या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे. "	६ एप्रिल,२०१७
२२.	" मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल. "	७ एप्रिल,२०१७
२३.	" महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल आणि अलग लेखापरीक्षा अहवाल. "	७ एप्रिल,२०१७
२४.	" महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल. "	७ एप्रिल,२०१७
२५.	" महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल. "	७ एप्रिल,२०१७
२६.	" महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल. "	७ एप्रिल,२०१७

महाराष्ट्र विधानमंडळ समित्यांचे सभागृहास सादर करण्यात आलेले अहवाल

अ. क्र.	विषय	विधानपरिषदेत ठेवण्यात आलेला दिनांक
(१)	(२)	(३)
१.	लोकलेखा समिती -	
	(१) लोकलेखा समितीचा सोळावा (२०१०-२०११ महसूली जमा) अहवाल.	दिनांक १७ मार्च, २०१७
	(२) लोकलेखा समितीचा सतरावा (२०१०-२०११ नागरी) अहवाल.	दिनांक १ एप्रिल, २०१७
	(३) लोकलेखा समितीचा अठरावा (२००६-२००७ नागरी) अहवाल.	दिनांक १ एप्रिल, २०१७
	(४) लोकलेखा समितीचा एकोणिसावा (सन २०१३-२०१४ सामान्य आणि सामाजिक क्षेत्र) अहवाल.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
	(५) लोकलेखा समितीचा विसावा (सन २०१३-२०१४ स्थानिक संस्था) अहवाल.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
२.	सार्वजनिक उपक्रम समिती -	
	(१) महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरणे क्रमांक दोन मधील परिच्छेद क्रमांक २.२.२१, २.२.२८, २.२.२९, २.२.३९, २.२.४२ व २.२.५१ यावरील समितीचा बारावा अहवाल.	दिनांक ३० मार्च, २०१७
	(२) महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१५, ३.१६, ३.२१, ३.२२, ३.२४, ३.२५, ३.२६, ३.३१, ३.३४, ३.३५, ३.४०, ३.४१, ३.४२, ३.४३, ३.४९, ३.५०, ३.५२, ३.५३, ३.५४, ३.५५, ३.५६, ३.५७, ३.६०, ३.६१, ३.६२ व ३.६३ यावरील समितीचा तेरावा अहवाल.	दिनांक ३० मार्च, २०१७
३.	अंदाज समिती - दुसरा अहवाल (सन २०१७-१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरणामुळे विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत करावयाच्या बदलाबाबत तसेच जिल्हा वार्षिक योजनेचा निधी स्वतंत्र अर्थसंकल्पीय प्रकाशनाद्वारे अर्थसंकल्पीय करून दर्शविण्यासंदर्भात वित्त व नियोजन विभागाच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल).	दिनांक १६ एप्रिल, २०१७

(१)	(२)	(३)
४.	अनुसूचित जाती कल्याण समितीचा सातवा अहवाल	दिनांक ३० मार्च, २०१७
५.	विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अकरावा अहवाल	दिनांक ३१ मार्च, २०१७
६.	रोजगार हमी योजना समितीचा चौथा अहवाल (सन २०१५-२०१६) उस्मानाबाद जिल्ह्यासंबंधातील.	दिनांक ६ एप्रिल, २०१७
७.	अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल (सन २०१६-२०१७).	दिनांक ६ एप्रिल, २०१७
८.	उप विधान समितीचा चौथा अहवाल (२०१६-२०१७)	दिनांक ६ एप्रिल, २०१७
९.	महिलांचे हक्क व कल्याण समितीचा सहावा अहवाल (२०१६-२०१७)	दिनांक ६ एप्रिल, २०१७

महाराष्ट्र विधानपरिषद

सन २०१७ प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विवरण क्रमांक - १

बैठकींचे दिनांक व वेळ

अ.क्र.	बैठकीचा दिनांक	बैठकीची वेळ		एकूण वेळ	
		पासून	पर्यंत	तास	मिनिटे
(१)	(२)	(३)		(४)	
१	सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७	दुपारी १२-२० ते	दुपारी ०१-२०	१	०
२	मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-२३	०	२३
३	बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-०९	०	९
		दुपारी १२-२४ ते	दुपारी १२-२७	०	३
४	गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०१७	सकाळी १०-०० ते	सकाळी ११-४०	१	४०
		दुपारी १२-०० ते	दुपारी १२-०२	०	२
		दुपारी १२-३२ ते	दुपारी ०१-०३	०	३१
		दुपारी ०१-१८ ते	दुपारी ०१-२१	०	३
५	शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-१०	०	१०
		दुपारी ०१-१० ते	दुपारी ०१-१६	०	६
६	म्रुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७	सकाळी १०-०० ते	सकाळी १०-२२	०	२२
		सकाळी १०-५३ ते	सकाळी १०-५५	०	२
		दुपारी १२-०० ते	दुपारी १२-१३	०	१३
		दुपारी ०१-०० ते	दुपारी ०१-०७	०	७
७	गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-१५	०	१५
		दुपारी ०१-०० ते	दुपारी ०१-०४	०	४
८	शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-११	०	११
		दुपारी १२-४१ ते	दुपारी ०१-०२	०	२१
		दुपारी ०२-१५ ते	दुपारी ०२-२१	०	६
९	शनिवार, दिनांक १८ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-२६	०	२६
		दुपारी ०२-०० ते	दुपारी ०३-५२	१	५२
१०	बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-०९	०	९
११	गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-०१	०	१
१२	शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-०१	०	१
१३	शनिवार, दिनांक २५ मार्च, २०१७	दुपारी १२-०० ते	दुपारी १२-०१	०	१
		दुपारी ०१-०० ते	दुपारी ०१-१८	०	१८

(१)	(२)	(३)	(४)
१४	बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७	सकाळी १०-०० ते सकाळी १०-१६	० - १६
		सकाळी १०-३१ ते सकाळी ११-१२	० - ४१
		दुपारी १२-०० ते दुपारी १२-१७	० - १७
		दुपारी १२-४२ ते दुपारी ०१-५२	१ - १०
		दुपारी ०३-२२ ते सायं. ०५-१८	१ - ४६
		सायं. ०५-२८ ते सायं. ०६-००	० - ३२
१५	गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७	सकाळी १०-०० ते दुपारी १२-१५	२ - १५
		दुपारी १२-३० ते दुपारी ०३-०८	२ - ३८
		दुपारी ०४-०८ ते दुपारी ०४-२८	० - २०
१६	शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७	सकाळी १०-०० ते दुपारी ११-५२	१ - ५२
		दुपारी १२-०० ते दुपारी १२-३३	० - ३३
		दुपारी ०१-३३ ते दुपारी ०२-०८	० - ३५
		दुपारी ०२-४८ ते रात्रौ ०७-४७	४ - ५९
१७	शनिवार, दिनांक १ एप्रिल, २०१७	सकाळी १०-०० ते सकाळी ११-४५	१ - ४५
		दुपारी १२-०० ते दुपारी ०१-३२	१ - ३२
		दुपारी ०२-१५ ते दुपारी ०२-१६	० - १
		दुपारी ०२-२६ ते रात्रौ ०७-०८	४ - ४२
१८	बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७	दुपारी १२-०० ते दुपारी १२-४४	० - ४४
		दुपारी १२-५९ ते दुपारी ०१-०१	० - २
		दुपारी ०१-३१ ते दुपारी ०१-३८	० - ७
१९	गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७	सकाळी १०-०० ते दुपारी १२-१०	२ - १०
		दुपारी १२-३० ते दुपारी ०१-३९	१ - ९
		दुपारी ०१-४९ ते दुपारी ०१-५०	० - १
		दुपारी ०२-२० ते दुपारी ०३-१५	० - ५५
		दुपारी ०३-२५ ते दुपारी ०३-२७	० - २
		दुपारी ०३-३७ ते सायं. ०६-२९	२ - ५२
२०	शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७	सकाळी १०-०० ते सकाळी ११-४२	१ - ४२
		दुपारी १२-०० ते दुपारी ०३-४४	३ - ४४
		दुपारी ०४-१५ ते रात्रौ ०८-३६	४ - २१
	एकूण : बावन्न तास एकोणीस मिनिटे		**५२ - १९**

महाराष्ट्र विधानपरिषद

विवरण क्रमांक १

बैठकींचे दिनांक व वेळ

अनु-क्रमांक (१)	बैठकीचा दिनांक (२)	बैठकीची वेळ पासून पर्यंत (३)	एकूण वेळ तास मिनिटे (४)
१	शनिवार, दिनांक २० मे, २०१७	सकाळी १२-०० ते दुपारी ०२-१० दुपारी ०३-०० ते रात्रौ ०७-३०	०२-१० ०४-०३
२	रविवार, दिनांक २१ मे, २०१७	दुपारी १२-०० ते साय. ०५-५२	०५-५२
३	सोमवार, दिनांक २२ मे, २०१७	दुपारी १२-०० ते दुपारी ०२-२४ दुपारी ०३-०० ते रात्रौ ०७-३१	०२-२४ ०४-३१
		एकूण : एकोणीस तास	**१९-००**

विवरण क्रमांक २

(अ) नवनिर्वाचित सदस्यांची शपथ/प्रतिज्ञा ग्रहण करणारे सदस्य

अ.क्र.	सदस्यांचे नाव	शपथ घेतल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)
	निरंक	

(ब) सभागृह नेता संदर्भातील घोषणा - म.वि.प. २ (जे-१)

अ.क्र.	नेत्यांचे नाव	दिनांक
(१)	(२)	(३)
	निरंक	

(क) नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

अ.क्र.	सदस्यांचे नाव	परिचयाचा दिनांक
(१)	(२)	(३)
१	डॉ. रणजित विठ्ठलराव पाटील	दिनांक ६ मार्च, २०१७
२	श्री. विक्रम वसंतराव काळे	दिनांक १७ मार्च, २०१७
३	डॉ. सुधीर भास्कर तांबे	दिनांक १७ मार्च, २०१७
४	श्री. नागोराव पुंडलिक गाणार	दिनांक ६ मार्च, २०१७
५	श्री. बाळाराम दत्तात्रय पाटील	दिनांक ६ मार्च, २०१७

(ड) मंत्री/राज्यमंत्री यांचा परिचय

अ.क्र.	सदस्यांचे नाव	परिचयाचा दिनांक
(१)	(२)	(३)
	मंत्री	
	निरंक	
	राज्यमंत्री	
	निरंक	

विवरण क्रमांक ३

विधानपरिषद प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन २०१७
दिनांक ६ मार्च ते ७ एप्रिल २०१७

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांची उपस्थिती दर्शविणारे विवरणपत्र
(मा. सभापती, मा. उप सभापती, मंत्री, राज्यमंत्री व विरोधी पक्ष नेता यांच्या व्यतिरिक्त)

बैठकांची संख्या : २०
एकूण सदस्य : ६५

अ.क्र.	वार व दिनांक	एकूण सदस्य संख्या	उपस्थिती संख्या	अनुपस्थितीची संख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७	६५	४२	२३
२	मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७	६५	५४	११
३	बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७	६५	५२	१३
४	गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०१७	६५	५०	१५
५	शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७	*६४	४४	२०
६	बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७	६४	५१	१३
७	गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७	६४	५०	१४
८	शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७	६४	५७	७
९	शनिवार, दिनांक १८ मार्च, २०१७	६४	५६	८
१०	बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७	६४	४८	१६
११	गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७	६४	५२	१२
१२	शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७	६४	४९	१५
१३	शनिवार, दिनांक २५ मार्च, २०१७	६४	४४	२०
१४	बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७	६४	४९	१५
१५	गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७	६४	४९	१५
१६	शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७	६४	४९	१५
१७	शनिवार, दिनांक १ एप्रिल, २०१७	६४	४५	१९
१८	बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७	६४	५७	७
१९	गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७	६४	५३	११
२०	शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७	६४	५३	११

* दिनांक १० मार्च, २०१७ रोजीपासून श्री.प्रशांत परिचारक, वि.प.स. यांचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले.

विवरण क्रमांक ४
विधानपरिषद प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन २०१७
दिनांक ६ मार्च ते ७ एप्रिल २०१७

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकींच्या एकंदर दिवसाची टक्केवारी दर्शविणारे विवरणपत्र (मा. सभापती, मा. उप सभापती, मंत्री, राज्यमंत्री व विरोधी पक्ष नेता यांच्या व्यतिरिक्त)

बैठकांची संख्या : २०

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थितीची	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	कदम, श्री. मोहनराव श्रीपती	१७	३	८५%
२	कवाडे, श्री. (प्रा.)जोगेंद्र लक्ष्मणराव	१९	१	९५%
३	काळे, श्री. विक्रम वसंतराव	१७	३	८५%
४	खलिफे, श्रीमती हुस्नबानू निझामुद्दीन	२०	०	१००%
५	गजभिये, श्री. प्रकाश सुर्यभान	१७	३	८५%
६	गाडगीळ, श्री. अनंत विठ्ठल	२०	०	१००%
७	गायकवाड, ॲड. जयदेवराव मारुतीराव	१८	२	९०%
८	गाणार, श्री. नागो पुंडलिक	२०	०	१००%
९	गिरकर, श्री. विजय ऊर्फ भाई विठ्ठल	२०	०	१००%
१०	गोऱ्हे, श्रीमती (डॉ.) नीलम दिवाकर	१२	८	६०%
११	चव्हाण, श्रीमती विद्या अजित	२०	०	१००%
१२	चव्हाण, श्री. सतीश भानुदासराव	१७	३	८५%
१३	चांदूरकर, श्री. जनार्दन चंद्रप्पा	१६	४	८०%
१४	जगताप, श्री. अरुणकाका बलभिमराव	३	१७	१५%
१५	जगताप, श्री. अशोक ऊर्फ भाई अर्जुनराव	१९	१	९५%
१६	जाधव, श्री. जयवंतराव पुंडलिकराव	२०	०	१००%
१७	झांबड, श्री. सुभाष माणकचंद	८	१२	४०%
१८	टकले, श्री. हेमंत प्रभाकर	२०	०	१००%
१९	ठाकूर, श्री. आनंद राजेंद्र	२०	०	१००%
२०	ठाकूर, श्री. सुजितसिंह मानसिंह	१८	२	९०%

विवरण क्रमांक ४—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२१	डाखरे, श्री. निरंजन वसंत	२०	०	१००%
२२	तटकरे, श्री. अनिल दत्तात्रय	१९	१	९५%
२३	तटकरे, श्री. सुनिल दत्तात्रय	१८	२	९०%
२४	तांबे, श्री. (डॉ.) सुधीर भास्कर	१६	४	८०%
२५	दत्त, श्री. संजय सतिशचंद्र	१९	१	९५%
२६	देशमुख, श्री. दिलीपराव दगडोजी	४	१६	२०%
२७	देशमुख, श्री. शिवाजीराव बापूसाहेब	४	१६	२०%
२८	देशपांडे, श्री. (प्रा.) श्रीकांत गोविंद	४	१६	२०%
२९	दरेकर, श्री. प्रविण यशवंत	२०	०	१००%
३०	दुरानी, श्री. अब्दुल्ला खान ए. लतिफ खान	८	१२	४०%
३१	नार्वेकर, श्री. (ॲड.) राहुल एस.	२०	०	१००%
३२	पटेल, श्री. अमरीशभाई रसिकलाल	२	१८	१०%
३३	पटेल, श्री. चंदुलाल विश्रामभाई	१७	३	८५%
३४	परब, श्री. अनिल दत्तात्रय	१७	३	८५%
३५	* परिचारक, श्री. प्रशांत प्रभाकर	०	४	०%
३६	पाटील, श्री. आनंदराव राघोजी	१८	२	९०%
३७	पाटील, श्री. कपिल हरिश्चंद्र	१९	१	९५%
३८	पाटील, श्री. जयंत प्रभाकर	२०	०	१००%
३९	पाटील, श्री. नरेंद्र अण्णासाहेब	१८	२	९०%
४०	पाटील, श्री. बाळाराम दत्तात्रय	१७	३	८५%
४१	पाटील, श्री. सतेज *ऊर्फ* बंटी डी	५	१५	२५%
४२	पावसकर, श्री. किरण जगन्नाथ	१८	२	९०%
४३	पंडित, श्री. अमरसिंह शिवाजीराव	१५	५	७५%
४४	फाटक, श्री. रविंद्र सदानंद	१७	३	८५%
४५	फुके, डॉ.परिणय रमेश	१९	१	९५%
४६	बाजोरीया, श्री. गोपीकिसन राधाकिसन	६	१४	३०%

विवरण क्रमांक ४—समाप्त

(१)	(२)	(३)	(४)	(५)
४७	बेग, श्री. ख्वाजा बेग मस्तान	१६	४	८०%
४८	भोसले, श्री. अनिल शिवाजीराव	५	१५	२५%
४९	भांगडीया, श्री. मितेश गोटुलाल	१६	४	८०%
५०	मेटे, श्री. विनायक तुकाराम	१६	४	८०%
५१	रघुवंशी, श्री. चंद्रकांत बटेसिंग	१८	२	९०%
५२	रणपिसे, श्री. शरद नामदेव	२०	०	१००%
५३	राणे, श्री. नारायण तातू	१२	८	६०%
५४	राजूरकर, श्री. अमरनाथ अनंतराव	१६	४	८०%
५५	राठोड, श्री. हरिसिंग नासरू	१५	५	७५%
५६	रुपनवर, श्री. रामहरी गोविंदराव	२०	०	१००%
५७	वडकुते, श्री. रामराव सखाराम	१९	१	९५%
५८	वाघ, श्रीमती स्मिता उदय	२०	०	१००%
५९	व्यास, श्री. गिरीशचंद्र बच्छराज	१७	३	८५%
६०	शिंदे, श्री. जगन्नाथ सखाराम	१८	२	९०%
६१	सावंत, श्री. तानाजी जयवंत	६	१४	३०%
६२	सावंत, श्री. दत्तात्रय अच्युतराव	१९	१	९५%
६३	सोले, श्री. अनिल मधुकर	१३	७	६५%
६४	सिंग, श्री. रामनिवास सत्यनारायण	१७	३	८५%
६५	हिरे, श्री. (डॉ.) अपुर्व प्रशांत	२०	०	१००%

* दिनांक १० मार्च, २०१७ रोजीपासून श्री. प्रशांत परिचारक, वि.प.स. यांचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले. दिनांक ६ मार्च २०१७ ते १० मार्च, २०१७, ४ दिवस सभागृहात अनुपस्थित होते.

विवरण क्रमांक ३

विधानपरिषद· द्वितीय अधिवेशन २०१७

दिनांक २० ते २२ मे, २०१७

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांची उपस्थिती दर्शविणारे विवरणपत्र

(मा. सभापती, मा. उप सभापती, मंत्री, राज्यमंत्री व विरोधी पक्ष नेता यांच्या व्यतिरिक्त)

बैठकांची संख्या : ३

एकूण सदस्य : ६५

अ.क्र.	वार व दिनांक	एकूण सदस्य संख्या	उपस्थिती संख्या	अनुपस्थितीची संख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	शनिवार, दिनांक २० मे, २०१७	*६४	५७	७
२	रविवार, दिनांक २१ मे, २०१७	६४	५६	८
३	सोमवार, दिनांक २२ मे, २०१७	६४	५०	१४

(*दिनांक १० मार्च, २०२७ रोजीपासून श्री. प्रशांत परिचारक, वि.प.स. यांचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले आहे.)

विवरण क्रमांक ४
विधानपरिषद द्वितीय अधिवेशन २०१७
दिनांक २० ते २२ मे, २०१७

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकींच्या एकंदर दिवसाची टक्केवारी दर्शविणारे विवरणपत्र (मा. सभापती, मा. उप सभापती, मंत्री, राज्यमंत्री व विरोधी पक्ष नेता यांच्या व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या : ३

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थितीची	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	कदम, श्री. मोहनराव श्रीपती	२	१	६६.६६%
२	कवाडे, श्री. (प्रा.)जोगेंद्र लक्ष्मणराव	३	०	१००%
३	काळे, श्री. विक्रम वसंतराव	२	१	६६.६६%
४	खलिफे, श्रीमती हुस्नबानू निझामुद्दीन	३	०	१००%
५	गजभिये, श्री. प्रकाश सुर्यभान	३	०	१००%
६	गाडगीळ, श्री. अनंत विठ्ठल	३	०	१००%
७	गायकवाड, ॲड. जयदेवराव मारुतीराव	३	०	१००%
८	गाणार, श्री. नागो पुंडलिक	३	०	१००%
९	गिरकर, श्री. विजय ऊर्फ भाई विठ्ठल	३	०	१००%
१०	गोऱ्हे, श्रीमती (डॉ.) नीलम दिवाकर	३	०	१००%
११	चव्हाण, श्रीमती विद्या अजित	३	०	१००%
१२	चव्हाण, श्री. सतीश भानुदासराव	३	०	१००%
१३	चांदूरकर, श्री. जनार्दन चंद्रप्पा	३	०	१००%
१४	जगताप, श्री. अरुणकाका बलभिमराव	०	३	०%
१५	जगताप, श्री. अशोक ऊर्फ भाई अर्जुनराव	३	०	१००%
१६	जाधव, श्री. जयवंतराव पुंडलिकराव	३	०	१००%
१७	झांबड, श्री. सुभाष माणकचंद	०	३	०%
१८	टकले, श्री. हेमंत प्रभाकर	३	०	१००%
१९	ठाकूर, श्री. आनंद राजेंद्र	३	०	१००%
२०	ठाकूर, श्री. सुजितसिंह मानसिंह	३	०	१००%

विवरण क्रमांक ४–चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२१	डावखरे, श्री. निरंजन वसंत	३	०	१००%
२२	तटकरे, श्री. अनिल दत्तात्रय	३	०	१००%
२३	तटकरे, श्री. सुनिल दत्तात्रय	२	१	६६.६६%
२४	तांबे, श्री. (डॉ.) सुधीर भास्कर	३	०	१००%
२५	दत्त, श्री. संजय सतिशचंद्र	३	०	१००%
२६	देशमुख, श्री. दिलीपराव दगडोजी	१	२	३३.३३%
२७	देशमुख, श्री. शिवाजीराव बापूसाहेब	२	१	६६.६६%
२८	देशपांडे, श्री. (प्रा.) श्रीकांत गोविंद	३	०	१००%
२९	दरेकर, श्री. प्रविण यशवंत	३	०	१००%
३०	दुरानी, श्री. अब्दुल्ला खान ए. लतिफ खान	२	१	६६.६६%
३१	नार्वेकर, श्री. (ॲड.) राहुल एस.	३	०	१००%
३२	पटेल, श्री. अमरीशभाई रसिकलाल	१	२	३३.३३%
३३	पटेल, श्री. चंदुलाल विश्रामभाई	३	०	१००%
३४	परब, श्री. अनिल दत्तात्रय	३	०	१००%
३५*	परिचारक, श्री. प्रशांत प्रभाकर	०	०	०%
३६	पाटील, श्री. आनंदराव राघोजी	२	१	६६.६६%
३७	पाटील, श्री. कपिल हरिश्चंद्र	३	०	१००%
३८	पाटील, श्री. जयंत प्रभाकर	२	१	६६.६६%
३९	पाटील, श्री. नरेंद्र अण्णासाहेब	३	०	१००%
४०	पाटील, श्री. बाळाराम दत्तात्रय	०	३	०%
४१	पाटील, श्री. सतेज ऊर्फ बंटी डी	०	३	०%
४२	पावसकर, श्री. किरण जगन्नाथ	३	०	१००%
४३	पंडित, श्री. अमरसिंह शिवाजीराव	३	०	१००%
४४	फाटक, श्री. रविंद्र सदानंद	३	०	१००%
४५	फुके, डॉ.परिणय रमेश	२	१	६६.६६%
४६	बाजोरीया, श्री. गोपीकिसन राधाकिसन	२	१	६६.६६%

विवरण क्रमांक ४–समाप्त

(१)	(२)	(३)	(४)	(५)
४७	बेग, श्री. ख्वाजा बेग मस्तान	३	०	१००%
४८	भोसले, श्री. अनिल शिवाजीराव	२	१	६६.६६%
४९	भांगडीया, श्री. मितेश गोटुलाल	३	०	१००%
५०	मेटे, श्री. विनायक तुकाराम	३	०	१००%
५१	रघुवंशी, श्री. चंद्रकांत बटेसिंग	३	०	१००%
५२	रणपिसे, श्री. शरद नामदेव	३	०	१००%
५३	राणे, श्री. नारायण तातू	३	०	१००%
५४	राजूरकर, श्री. अमरनाथ अनंतराव	३	०	१००%
५५	राठोड, श्री. हरिसिंग नासरू	३	०	१००%
५६	रुपनवर, श्री. रामहरी गोविंदराव	३	०	१००%
५७	वडकुते, श्री. रामराव सखाराम	३	०	१००%
५८	वाघ, श्रीमती स्मिता उदय	३	०	१००%
५९	व्यास, श्री. गिरीशचंद्र बच्छराज	३	०	१००%
६०	शिंदे, श्री. जगन्नाथ सखाराम	२	१	६६.६६%
६१	सावंत, श्री. तानाजी जयवंत	१	२	३३.३३%
६२	सावंत, श्री. दत्तात्रय अच्युतराव	३	०	१००%
६३	सोले, श्री. अनिल मधुकर	३	०	१००%
६४	सिंग, श्री. रामनिवास सत्यनारायण	३	०	१००%
६५	हिरे, श्री. (डॉ.) अपुर्व प्रशांत	३	०	१००%

* दिनांक १० मार्च, २०१७ रोजीपासून श्री. प्रशांत परिचारक, वि.प.स. यांचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले.

विवरण क्रमांक ५

सन २०१७ च्या विधानपरिषदेच्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल

सन २०१७ चे पहिले अधिवेशन

सोमवार, दिनांक ६ मार्च २०१७

दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत सकाळी ११-०० वाजता झालेल्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणानंतर ३० मिनिटांच्या विश्रांतीनंतर विधानपरिषदेची बैठक मुंबई येथील विधान परिषदेच्या सभागृहात दुपारी १२ वाजून २० मिनिटांनी माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ *" वंदे मातरम् "* या गीताच्या समूह गायनाने झाला.

माननीय सभापतींनी, " महाराष्ट्र विधानमंडळाच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत आज सोमवार, दिनांक ६ मार्च २०१७ पासून सभागृहाच्या कामकाजाच्या वापरासाठी सदस्यांच्या आसनासमक्ष टच स्क्रीन नोटबुक उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या टच स्क्रीन नोटबूकमार्फत इंटरनेट ब्राऊझिंग, विधानपरिषदेचे नियम पुस्तक, विधिमंडळ समित्यांचे अहवाल, महामंडळांचे अहवाल, सभागृहाशी संबंधित कामकाजपत्रिका, तारांकित, अतारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या, स्वीकृत लक्षवेधी सूचनांची यादी, सन १९३७ ते २०१६ पर्यंत झालेल्या सर्व अधिवेशनांचे कार्यवृत्त, सदस्यांचे वेतन, भत्ते व इतर आजी तथा माजी सदस्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा इत्यादी माहिती उपलब्ध करून देण्यात येत असून इतरही आवश्यक माहिती टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदरहू टच स्क्रीन नोटबुक वापरासंबंधीची माहिती या सचिवालयाच्या अभियंत्यांद्वारे आज सोमवार, दिनांक ६ मार्च २०१७ रोजी सभागृहाची बैठक संपल्यावर देण्यात येईल. " असे घोषित केले.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत विधान परिषदेचे कामकाज कागद विरहित करण्याच्या दिशेने प्रारंभ झाल्याबद्दल श्री. जयंत पाटील, श्री. भाई जगताप, डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी माननीय सभापतींचे अभिनंदन केले.

१. महसूल मंत्र्यांनी, अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघातर्फे निर्वाचित डॉ. रणजित पाटील, नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे निर्वाचित श्री. नागो गाणार आणि कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे नवनिर्वाचित श्री. बाळाराम पाटील यांचा सभागृहास परिचय करून दिला.

२. सचिवांनी, दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, दिनांक ६ मार्च २०१६ रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली.

३. श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला -

" माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. "

डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपरोक्त प्रस्तावाला अनुमोदन दिले.

बुधवार, दिनांक ८ मार्च २०१७ व गुरुवार, दिनांक ९ मार्च २०१७ रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल व या प्रस्तावास ज्या सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांना त्या बुधवार, दिनांक ८ मार्च २०१७ रोजी दुपारी १२-०० वाजेपर्यंत कक्ष क्र. ०१७, तळ मजल्यावरील आवक कक्ष, विधानमंडळ सचिवालय येथे आणून द्याव्यात असे माननीय सभापतींनी सांगितले.

४. **(१) नगरविकास राज्यमंत्र्यांनी,** (क) " सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ ", (ख) " सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक ३ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ ", (ग) " सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक ६ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ " सभागृहासमोर ठेवले.

(२) महसूल मंत्र्यांनी, " सन २०१७चा अध्यादेश क्रमांक२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१७ " सभागृहासमोर ठेवला.

(३) महसूल मंत्र्यांनी, " सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७ " सभागृहासमोर ठेवला.

(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्र्यांनी, " सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०१७ " सभागृहासमोर ठेवला.

५. वित राज्यमंत्र्यांनी, सन २०१६ - २०१७ च्या खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर केले.

६. सचिवांनी, विधानसभेने संमत केलेले एक वि. प. विधेयक, माननीय राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले एक वि. स. विधेयक आणि माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेली २२ वि.स. विधेयके यांची नावे सभागृहास वाचून दाखवली.

परिवहन मंत्र्यांनी, " टचस्क्रिन नोटबुकमध्ये मराठी भाषेतून माहिती उपलब्ध करून देण्याबाबत " सभापतींचे अभिनंदन केले.

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी, " राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात राष्ट्रगीत उशिराने सुरू होणे. " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत सखोल चौकशी करण्याचे आदेश दिलेले असून त्यासंबंधी उद्या सभागृहास अवगत करण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी, " नुकत्याच झालेल्या निवडणुकीच्या दरम्यान सन्माननीय सदस्यांनी सैनिकांच्या पत्नीबद्दल अनादर व्यक्त करणारे वक्तव्य करणे. " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. भाई जगताप, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. हेमंत टकले, श्री. कपिल पाटील, श्री. शरद रणपिसे, ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात आपापले मत व्यक्त केले.

७. माननीय सभापतींनी खालील सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केले :—

(१) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(२) प्रा. जनार्दन चांदूरकर, वि.प.स.

(३) श्री. अपूर्व हिरे, वि.प.स.

(४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " सभागृहाच्या सन्माननीय महिला सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना भ्रमणध्वनीवर धमकीचे एसएमएस येणे. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

माननीय सभापतींनी, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने उद्यापर्यंत सभागृहास अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

मंगळवार, दिनांक ७ मार्च २०१७

श्री. धनंजय मुंडे, (विरोधी पक्षनेते) यांनी, "सभागृहाचे सदस्य श्री. प्रशांत परिचारक यांनी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या पत्नींबाबत केलेले अक्षेपार्ह वक्तव्य " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला व त्यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात खालील सन्माननीय सदस्यांनी देखील आपले म्हणणे मांडले.

(१) डॉ. नीलम गोऱ्हे (२) श्री. शरद रणपिसे

(३) श्री. नारायण राणे (४) श्री. भाई जगताप

माननीय सभापतींनी यासंदर्भात आपले मत व्यक्त केले व या विषयी सदनातील एकंदरीत भावना लक्षात घेता सभागृहाचे आजचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " एका सन्माननीय सदस्याने केलेले आक्षेपार्ह वक्तव्य आणि त्यावर शासनातर्फे निवेदन करण्याबाबत देण्यात आलेले आश्वासन, " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याच्या समर्थनात सर्वश्री भाई जगताप, शरद रणपिसे, वि.प.स. यांनी आपापली मते मांडली.

महसूल मंत्र्यांनी यासंदर्भात आपले मत मांडले.

गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०९ मिनिटांनी १५ मिनिटांसाठी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २४ मिनिटांनी माननीय सभापती, श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्याचे सांगून माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दिवसभरासांठी स्थगित केली.

गुरुवार, दिनांक ९ मार्च २०१७

(१) सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री आनंदराव पाटील, अमरनाथ राजूरकर, चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

" पुणे शहर व जिल्ह्याचा वेगाने होणारा विकास विचारात घेता पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची असलेली नितांत आवश्यकता, यासाठी गेल्या सुमारे दहा वर्षांपूर्वीपासून राज्य शासनाकडून सुरू असलेली कार्यवाही, पुणे जिल्ह्यात उद्योग व्यापार-व्यवसायाची मोठ्या प्रमाणात असलेली उलाढाल, नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या पुणे जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात करीत असलेली गुंतवणूक, मात्र विस्तार विकासात आंतरराष्ट्रीय गुंतवणूकीसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाअभावी निर्माण झालेली मोठी अडचण, विकासावर होत असलेला मोठ्या प्रमाणातील विपरीत परिणाम, पुणे

जिल्ह्यात जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय गुंतवणूक व्हावी, जिल्ह्यातील व जवळपासच्या भागातील विकास साधता यावा, यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ तातडीने उभारण्याची गरज, यासाठी राज्य शासनाने पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करण्याचा घेतलेला निर्णय, मात्र पुढील कार्यवाहीस होत असलेला विलंब, याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ''

सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री नरेंद्र पाटील, किरण पावसकर, हेमंत टकले, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना -

ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

'' ठाणे मनपा सेवेअंतर्गत महानगरपालिकेस जवळपास एक हजार बसेसची आवश्यकता असणे, तथापि सद्यस्थितीत फक्त ४७० बसेस असून त्यापैकी केवळ १३० बसेसच सुस्थितीत असणे, उर्वरित बसेस दुरुस्तीअभावी बंद असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी निदर्शनास येणे, बंद पडलेल्या बसेससाठी लागणाऱ्या साधन सामग्री खरेदी प्रक्रियेत होणारे आर्थिक घोटाळे, अवाजवी खर्च व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजना (JNNURM) अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेस जुन्या मॉडेलचे असल्याचे निदर्शनास येणे, तसेच सदर बसेसमध्ये वापरलेले टायर्स व बॅटऱ्या या एक ते दोन वर्षे जुन्या असून त्यावर सन २०१५ हे वर्ष नमूद करण्यात आल्याचे परिवहन समिती सदस्यांनी केलेल्या तपासअंती दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी निदर्शनास येणे, नवी मुंबई महानगरपालिकेसाठी परिवहन सेवेचा ठेका घेणाऱ्या ठेकेदाराने मिनी-बसेसकरिता रुपये ३७ प्रति किमी तर स्टँडर्ड बसेसचा दर रुपये ४७ प्रति किमी आकारणे, परंतु ठाणे मनपातील परिवहन सेवेच्या ठेकेदाराने मिनी-बसेसकरिता रुपये ५२ व स्टँडर्ड बसकरिता ६६ प्रति किमी असा दर दिल्याचे आढळून येणे, त्यामुळे ठाणे मनपाला प्रति दिन रुपये ५.४७ लाख सदर ठेकेदारास अधिक द्यावे लागून सदर कामाचा ठेका १० वर्षाचा असल्याने १० वर्षात रुपये २०० कोटी अधिक सदर ठेकेदारास द्यावे लागणार असणे, सकृतदर्शनी याप्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, याशिवाय परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकीत देणी देखील प्रलंबित असणे, त्यामुळे यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत महाराष्ट्र लेबर एकता युनियनकडून तसेच ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रवासी संघटनांकडून गेल्या अनेक वर्षापासून ते आजतागायत वारंवार मागणी

करण्यात येणे, तथापि त्याकडे शासनाकडून जाणीवपूर्वक करण्यात येणारे दुर्लक्ष, परिणामी ठाणेवासीय व सर्वसामान्य प्रवासी जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सबब, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ''

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. हेमंत टकले, सुनील तटकरे, विक्रम काळे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना -

डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

'' दिनांक ७ जानेवारी २०१७ रोजी जि. सांगली ता. पलूस माळवाडी येथील अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार करून खून केल्याची घडलेली घटना, तसेच दिनांक २९ जानेवारी २०१७ रोजी हिंजवडीच्या इन्फोसिस आयटी कंपनीत सॉफ्टवेअर अभियंता म्हणून काम करणाऱ्या रसिला राजू ओपी (वय २५, रा. हिंजवडी) या तरुणीचा कंपनीमध्येच गळा आवळून खून झाल्याची घटना, तर पुणे शहरात हडपसर येथील शिवपार्क येथे दिनांक १८ जानेवारी २०१७ रोजी रात्री घरगुती समस्या पत्नीने फेसबुकावर टाकल्यामुळे संतप्त पतीने पत्नीची हत्या केल्याची घटना, दिनांक २३ डिसेंबर २०१६ मध्ये अंतरा दास या संगणक अभियंता तरुणीचा हल्लेखोराने भोसकून खून झाल्याची घटना, राज्यभरात कोपर्डी (जि. अहमदनगर) प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले असतानाच, उपरोक्त घटना घडत गेल्यामुळे सर्वत्र संतापाचे पसरलेले वातावरण, राज्यात उपरोक्त घटनेचे उमटलेले तीव्र पडसाद लक्षात घेऊन स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा, यांनी दिनांक २७ डिसेंबर २०१६, दिनांक ८ जानेवारी २०१७ व दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार करून उपरोक्त खून, बलात्कार प्रकरणातील आरोपींवर पोस्को कायद्याअंतर्गत कडक कारवाई करण्याची तसेच सदर घटनेची चौकशी संवेदनशील पध्दतीने होण्यासाठी वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची केलेली मागणी, पुणे शहरात हिंजवडी, खराडी, हा परिसर तसेच तळवडे हा पुण्यातील ग्रामीण भागात माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची संख्या मोठी असल्याने नोकरीनिमित्त परप्रांतीय महिला, मुली मोठ्या संख्येने पुण्यातील वेगवेगळ्या भागामध्ये स्थायिक होणे, सदरहू कंपन्यामध्ये रात्री उशिरापर्यत काम करणाऱ्या महिलांवर होणारे अत्याचार, खून यांचे प्रमाणात झालेली वाढ, त्यामुळे आय. टी. क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर असणे, यासंदर्भात देखील स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा यांनी दिनांक ३० जानेवारी २०१७ रोजी पुणे पोलीस आयुक्त, पुणे, यांच्याकडे पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, उपरोक्त सर्वच घटनांची सखोल चौकशी

करून आरोपीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) प्रा.अनिल सोले व श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना -

प्रा. अनिल सोले, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

“ नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्माण झालेली दयनीय अवस्था, सदर हॉस्पिटल करिता सुरक्षा चौकी असून ती बंद स्थितीत असून त्याचे खिडक्या व दरवाजे तुटलेले असणे, त्यातच हॉस्पिटल आवारात व समोर मोठ्या प्रमाणात कचऱ्यांचे ढिगारे दिसून येणे, रूग्णांकरिता वापरलेली कालबाह्य सिरींज व औषधे ही त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावता निष्काळजीपणे हॉस्पिटलमध्ये व आसपासच्या परिसरात टाकण्यात येणे, सुरक्षेच्या दृष्टीने वापरण्यात येणारी अग्निशामक उपकरणे कालबाह्य स्थितीत असणे, रूग्णालयाच्या आजुबाजुचा परिसर झुडपी कचऱ्याने व्याप्त असणे, त्यामुळे रूग्णालयात अस्वच्छता निर्माण झाल्याने त्याचा परिणाम रूग्णांवर होणे, त्यामुळे सदर परिसर कचरामुक्त व स्वच्छ ठेवण्याची असलेली आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याबाबत त्वरीत करावयाची कारवाई व उपाययोजना ”

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

“ देशभरात निर्माण होणाऱ्या सुमारे ५ लाख टन ई-कचरा निर्मितीत राज्याचा क्रमांक पहिला असणे. कॉम्प्युटरचे मॉनिटर, की-बोर्ड, माऊस, मोबाईलचे सुटे भाग, बंद पडलेली इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, टेलिव्हिजन, इलेक्ट्रॉनिक्स खेळणी, बंद पडलेले सेल इ. वस्तू व ई-कचऱ्यात समाविष्ट असणे, यातील अनेक वस्तुंना सामान्य भंगाराचाच भाग समजून राज्यातील असंख्य भंगार जमा करणाऱ्या मुलांकडून जमा होत केल्या जाणे, परंतु त्यांना या वस्तूंची विल्हेवाट लावण्याचे ज्ञान नसणे. परिणामी अनेक वस्तू डम्पिंग ग्राउंड पर्यंत पोहोचून जमिनीखाली दाबल्या जाणे, या वस्तुंमधील पारा, शिसे, कॅडमीअम, क्रोमिअम, बेरीअम आणि ब्लॉक कार्बन अशा धोकादायक पदार्थांपासून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास व मानवी आरोग्यावर अत्यंत घातक व गंभीर परिणामांची जागरुकता सामान्य जनतेला

नसणे, या ई-कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी केवळ २४ अधिकृत केंद्रे असून त्यांची वार्षिक क्षमता ३२ हजार ६०० टन इतकीच असणे, मोठ्या शहरातील आयटी कंपन्यांबरोबरच राज्यातील अनेक शहरांमध्ये हा ई-कचरा असाच जमिनीखाली दाबला जाणे, या अत्यंत घातक व गंभीर विषयाबाबत शासनाने जनमानसात जागरूकता निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ''

पर्यावरण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे व अमरसिंह पंडित वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधले -

'' सन २०१४-१५ आयएमएसआर मेडिकल कॉलेज मायणी, जि. सातारा येथे ९५ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. या वैद्यकीय शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेणे, या मेडिकलमध्ये प्रवेश घेतेवेळेस राज्यातील वैद्यकीय शिक्षण संचालनालय (डी.एम.ई.आर.) व आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक एम.सी.आय., दिल्ली यांची सदर मेडिकल कॉलेजला मान्यता असणे, मेडिकल कॉलेजने प्रवेश देते वेळी या विद्यार्थ्यांची एम.एच.सी.ई.टी. परीक्षा न घेता, ए.एस.एस.ओ.-सी.ई.टी. मधून प्रवेश दिलेला असणे, त्यामुळे विद्यापीठ व एम.सी.आय यांनी या ९५ विद्यार्थ्यांचे प्रवेश अनियमित ठरवून तसे पत्र सदर महाविद्यालयास जानेवारी २०१५ मध्ये पाठविणे, पत्र मिळूनसुध्दा या महाविद्यालयाने या विद्यार्थ्यांना अंधारात ठेवून शैक्षणिक वर्ष सुरू ठेवणे, या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय व तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या विद्यार्थ्यांनी सप्टेंबर, २०१५ मध्ये विद्यापीठाची पुरवणी परीक्षा देणे, परंतु दिनांक १० मार्च २०१६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यामुळे या विद्यार्थ्यांचे भवितव्य पुन्हा अंधःकारमय होणे, या विद्यार्थ्यांनी प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांना भेटून त्यांचे भवितव्य वाचविण्याची विनंती केली असता प्राधिकरणाने त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश नियमित करण्याचा निर्णय घेऊन महाविद्यालयास प्रति विद्यार्थी २० लाख रुपये इतक्या रकमेचा दंड आकारली असता सदरहू रक्कम ३ महिन्यात भरण्याचे प्रतिज्ञापत्र महाविद्यालयाने प्राधिकरणास सादर करणे, परंतु महाविद्यालयाने उर्वरित दंड भरण्यास टाळाटाळ केल्यामुळे या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता शासनाने सदर विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यास व त्यांना इतर महाविद्यालयात सामावून घेण्यास संमती देणे, प्राधिकरणाने आकारलेला दंड शासनाने भरावा व नंतर तो महाविद्यालयाकडून वसूल करावा असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यामुळे शासनाने २० कोटी रुपये न्यायालयात भरणे, शासनाने मा. सर्वोच्च

न्यायालयात दिलेल्या आश्वासनानुसार या विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयात अद्यापही सामावून न घेतल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी दिनांक १ मार्च २०१७ पासून आझाद मैदान, मुंबई येथे सुरू केलेले आमरण उपोषण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेतील सातव्या क्रमांकावर दर्शवलेल्या, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांच्या लक्षवेधी सूचनेबाबत माननीय ऊर्जा मंत्री यांनी विनंती केल्यानुसार ही लक्षवेधी सूचना उद्याच्या कामकाजात दाखवण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी ११ वाजून ४० मिनिटांनी ते दुपारी १२-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. किरण पावसकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय तालिका सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी अर्ध्या तासाकरिता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३२ मिनिटांनी माननीय सभापतींच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

महसूलमंत्र्यांनी, “ श्री. प्रशांत परिचारक, वि.प.स. यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान सैनिक व त्यांच्या कुटुंबीयाबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबाबत चौकशी समिती स्थापन करणे ” या विषयाबाबत पुढील ठराव मांडला व भाषण केले :—

“ विधानपरिषद सदस्य, श्री. प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भारतीय सैन्य दलातील जवान तसेच त्यांच्या कुटुंबीयांबद्दल व महिला वर्गाच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचविणारे अत्यंत आक्षेपार्ह, निंदाजनक व संतापजनक वक्तव्य करून विधानमंडळाच्या प्रतिष्ठेस बाधा आणल्याने घडलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणी त्यांना—

(१) सभागृहाचे सदस्यत्व निलंबित करणे,

(२) समज देणे,

(३) कारावासाची शिक्षा देणे,

(४) सभागृहाचे सदस्यत्व रद्द करणे (Expulsion from the House).

यापैकी कोणत्या शिक्षेची सभागृहाला शिफारस करावी यासाठी या सभागृहाची उच्चाधिकार समिती घटित करण्यात येत आहे व सदरहू उच्चाधिकार समितीमध्ये खालील मान्यवर सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत :—

१. माननीय सभापती, महाराष्ट्र विधान परिषद समिती प्रमुख

२. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, माननीय सभागृह नेते व महसूल, मदत व पुनर्वसन

३. श्री. धनंजय मुंडे, माननीय विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद

४. श्री. नारायण राणे, वि.प.स.

५. श्री. सुनील तटकरे, वि.प.स.

६. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

७. डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.

८. श्री. भाई गिरकर, वि.प.स.

९. श्री. कपिल पाटील, वि.प.स.

१०. श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स.

११. डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव (सदस्य-सचिव).

सदरहू उच्चाधिकार समितीचा अहवाल सभागृहाला सादर होऊन त्यावर सभागृहाचा निर्णय होईपर्यंत विधानपरिषद सदस्य, श्री. प्रशांत परिचारक यांचे सदस्यत्व दीड वर्षासाठी निलंबित करण्यात यावे. सदरहू समितीने आपला अहवाल लवकरात लवकर सभागृहाला सादर करावा.

ठराव मतास टाकून एकमताने संमत झाला.

२. महसूल मंत्र्यांनी श्री. विक्रम काळे व डॉ. सुधीर तांबे या नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहास परिचय करून दिला.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री नारायण राणे, जयंत प्र.पाटील, माननीय शालेय शिक्षणमंत्री, ॲड. अनिल परब, श्री. भाई जगताप, ॲड. राहुल नार्वेकर, माननीय वित्त व नियोजन मंत्री यांनी उपरोक्त माहितीच्या मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ०३ मिनिटांनी १५ मिनिटांकरिता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

३. माननीय सभापतींनी शुक्रवार दि. १० मार्च २०१७ रोजी दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयके व ठराव यांना वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर केले व ते संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

शुक्रवार, दिनांक १० मार्च २०१७

महसूल मंत्र्यांनी, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७ ते शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७ पर्यंतचा विधानपरिषद सभागृहाच्या कामकाजाचे कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

श्री.सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " शेतकऱ्यांची कर्जमाफी " इ. बाबत म.वि.स. नियम, २८९ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे सांगून यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

महसूल मंत्र्यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(विरोधी पक्षाचे व सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपली जागा सोडून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक एक तासासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

१. (१) **संसदीय कार्यमंत्र्यांनी,** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये नियोजन विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(२) **संसदीय कार्य मंत्र्यांनी,** विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक ५ डिसेंबर, २०१६ ते १७ डिसेंबर, २०१६ या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण २३१ आश्वासनांची यादी, तसेच सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १८६ आश्वासनांच्या पूर्ततेच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवली.

२. **ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** यांनी, " मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी महामार्गालगतच्या सर्व्हे नंबरच्या हिश्श्यापुरताच खरेदी-विक्रीसाठी वाढीव दराने मुद्रांक शुल्क आकारणे " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर केला.

सदर विनंती अर्ज विधानपरिषद विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " शेतकऱ्यांची कर्जमाफी " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला व भाषण केले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर जाऊन घोषणा देतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

बुधवार, दिनांक १५ मार्च २०१७

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी, " शेतकऱ्यांना कर्जमाफी " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप सभापतींनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा पुढील प्रस्ताव मांडला.

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. "

श्री. नारायण राणे, वि.प.स. यांनी राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल भूमिका स्पष्ट करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता यांनी, राज्यपालांच्या अभिभाषणाविषयी तांत्रिकमुद्दा उपस्थित केला.

महसूल मंत्र्यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता, यांनी उपस्थित केलेल्या उक्त मुद्याच्या संदर्भात सर्वश्री शरद रणपिसे, हेमंत टकले व नारायण राणे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय उप सभापतींनी सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून २२ मिनिटांनी ३० मिनिटांसाठी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ५३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्यावरून सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय उप सभापतींनी सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी दुपारी १२-०० वाजेपर्यंत स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता यांनी, राज्यातील विरोधी पक्षाची व सत्ताधारी पक्षाची शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याबाबत एकच मागणी असल्याचे सांगून याविषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची भूमिका सर्वप्रथम स्पष्ट करावी, अशी मागणी केली.

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी याविषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स.यांनी, " राज्यातील कृषि क्षेत्राची परिस्थिती व शेतकऱ्यांची कर्जमाफी " याबाबत आपले म्हणणे मांडले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १३ मिनिटांनी दुपारी १-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेमार्फत महाराष्ट्र विधिमंडळ सदस्यांसाठी गुरुवार, दिनांक १६ मार्च २०१७ रोजी सकाळी १०-०० ते सायंकाळी ०५-०० या कालावधीत मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधान भवन, मुंबई येथे दक्षिण कोरियातील आंतरराष्ट्रीय कीर्तिचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ व विचारवंत प्रा.पार्क जे वू यांनी शोधलेल्या (सुजोक) उपचार पद्धतीसंबंधी वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " शेतक-यांना कर्जमाफी " इ.बाबत पुन्हा मुद्दा उपस्थित केला.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता यांनीही पुन्हा याबाबत आपले म्हणणे मांडले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

गुरुवार, दिनांक १६ मार्च २०१७

श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी, " नवी मुंबईतील भूमिपुत्रांनी त्यांच्या मागण्यांसाठी उपोषण सुरू करणे. " इ.बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे सांगून त्यासंदर्भात थोडक्यात म्हणणे मांडले.

श्री. जयंत प्र.पाटील, श्री. सुनील तटकरे, श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपापले मत व्यक्त केले.

यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी आज बैठक घेऊन उपोषणकर्त्यांना दिलासा देण्याचा निर्णय घ्यावा असे निर्देश माननीय सभापतींनी दिले.

आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांनी, " केंद्रीय कृषी मंत्र्यांनी उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांची कर्जमाफीला प्राधान्य देण्यात येईल असे विधान करणे तसेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत शासनाकडून कोणताही निर्णय न होणे. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " मराठवाड्यात लातूर, बीड, उस्मानाबाद, परभणी परिसरात फार मोठ्या प्रमाणावर गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या शेतीपिकाचे अतोनात नुकसान होणे तसेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत शासनाकडून कोणताही निर्णय न होणे. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

महसूल मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

१. शुक्रवार, दिनांक १७ मार्च २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहात सादर करण्यात आले असून ते संमत करावे असा प्रस्ताव माननीय सभापतींनी मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

२. माननीय सभापतींनी दिनांक ७ मार्च २०१७ ते दिनांक १६ मार्च २०१७ रोजीपर्यंत प्राप्त झालेल्या नियम ९३ अन्वये सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवले.

३. माननीय सभापतींनी खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील असे सांगितले.

१. महसूल, मदत व पुनर्वसन कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-सी-१, सी-५, एच-३, एच-५, एच-६, एच-८, एच-९.

२. वित्त व नियोजन, वने मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-सी-७, सी-१०, जी-३, जी-६, जी-७.

३. शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-झेडई- १.

४. ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - एल -१, एल-२, एल-३, एक्स-१, एक्स-३

५. वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभ क्षेत्र विकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-आय-१

६. परिवहन, खारभूमी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - बी -३

७. उद्योग, खनिकर्म मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - के-७

८. ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक-के -६, के-११

९. पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - वाय-२

१०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - एन-२

११. जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - एल-७

१२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - व्ही-२, व्ही-३, व्ही-५

१३. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभागाच्या मागण्या क्रमांक - डी-४, डी-९

१४. कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण विभागाच्या मागण्या क्रमांक-ए-४

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात)

सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर सभागृहाने विचार केला असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

४. वित्त मंत्र्यांनी, " सन २०१७ चे वि.स.वि क्रमांक ८—महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१७ " विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहास सादर करण्यात आले.

खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय सभापतींनी सांगितले.

५. अंदाज समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

६. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, " राज्यातील विविध विभागांच्या माननीय मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असणे. " याबाबत सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांनी सन २०१६ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधानपरिषद नियम, २६० अन्वये दिलेल्या प्रस्तावासंदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासन क्रमांक ९३ च्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीने सादर केलेला अंतिम चौकशी अहवाल सभागृहास सादर केला.

शुक्रवार, दिनांक १७ मार्च २०१७.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी " इ. बाबत नियम २८९ अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ३० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ११ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ४१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी " इ. बाबत नियम २८९ अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात सर्वश्री. शरद रणपिसे, भाई जगताप, नारायण राणे, प्रकाश गजभिये वि.प.स. यांनी म्हणणे मांडले.

नियम २८९ अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेतील बिषय कोणत्या आयुधाने आणावा, या संदर्भात सभापती महोदयांशी चर्चा करून तो प्रस्ताव आणावा. त्यानंतर माननीय सभापती निर्णय देतील असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

(१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील एक तारांकित प्रश्न वगळण्यात आला व सहासष्ट प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाची बैठक स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३२ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

२. (१) (अ) गृह राज्यमंत्री (ग्रामीण) यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये गृह विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील व (ब) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०१६-२०१७ अहवाल सभागृहासमोर ठेवला.

उर्जा मंत्र्यांनी, " राज्यातील पाणीपुरवठा व उपसा जलसिंचन योजनांकरिता थकीत वीज बिल हप्त्याने भरण्याची प्रोत्साहनपर योजना " इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

३. श्री. भाई जगताप (समिती सदस्य) यांनी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसूली जमा अहवालामधील " लवासा, पुणे येथे थंड हवेच्या ठिकाणाचा विकास " या विषयावरील लोकलेखा समितीचा १६ वा अहवाल सभागृहास सादर केला.

शनिवार, दिनांक १८ मार्च, २०१७

श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, इ.बाबत नियम २८९ अन्वये प्रस्तावाची सूचना मांडून आपले म्हणणे मांडले व राज्यातील आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी सभागृहाने दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करावी, " अशी विनंती केली.

माननीय सभापतींनी सदस्यांची मागणी मान्य केली.

सभागृहातील सर्व सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून दिवंगत शेतकऱ्यांना श्रद्धांजली वाहिली.

" ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स या राज्याबरोबर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा एमओयू होणार असून तिथे शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आणि विशेष करून आत्महत्या या संदर्भात ज्या पद्धतीने मुकाबला केला जात आहे त्याबाबत घेण्यात येणारी बैठक, " इ.बाबत घोषणा माननीय सभापतींनी केली.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची आवश्यकता, " इ.बाबत मुद्दा उपस्थित करून आपले म्हणणे मांडले.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मुख्यमंत्र्यांनी, " शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबतची मागणी, " इ.बाबत म.वि.प. नियम, ४६ अन्वये निवेदन केले.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २६ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २.०० वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०१७-२०१८ चा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये कापडी फलक फडकावून घोषणा देतच असतात.)

राज्याचा सन २०१७-२०१८ चा अर्थसंकल्प सादर झाला असून अर्थसंकल्पीय प्रकाशने सूटकेससह सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळ मजल्यावरील वितरण केंद्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरून सदर प्रकाशने घ्यावीत, असे माननीय सभापतींनी सांगितले.

बुधवार, दिनांक २२ मार्च २०१७

१. (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील त्रेपन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) यांनी, " शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याबाबत अर्थसंकल्पात उल्लेख नसणे " इ. बाबत नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंदर्भात म्हणणे मांडू देण्यात यावे अशी विनंती केली.

माननीय सभापतींनी खास बाब म्हणून यावर बोलण्यासाठी २ किंवा ३ सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची अनुमती देत असल्याचे सांगितले.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते), श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी उपरोक्त नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.

सभागृहात एकंदरीत गोंधळाची परिस्थिती पाहता सभागृहाची दिवसभरासाठी स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

गुरुवार, दिनांक २३ मार्च २०१७.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये तसेच काही सन्माननीय सदस्य डायसवर जाऊन घोषणा देत असतात.)

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

शुक्रवार, दिनांक २४ मार्च २०१७

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसल्याखेरीज सभागृहाचे कामकाज सुरू करता येणार नसल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शनिवार, दिनांक २५ मार्च, २०१७

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने माननीय तालिका सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी १२-०१ वाजता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १-०० वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण गेल्या वर्षभरात वाढलेले असणे तसेच राज्य सरकारने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आणि भविष्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळण्याच्यादृष्टीने शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची आवश्यकता तसेच मंत्रालयात शेतकऱ्याला झालेली मारहाण. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला व आपले मत व्यक्त केले.

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला व याबाबत सभागृहात सविस्तर निवेदन करण्यात येईल असे सांगितले.

या विषयासंदर्भात शासनाने समिती नेमलेली आहे. शासनाने या समितीचा अहवाल दिनांक २९ मार्च २०१७ रोजी सभागृहासमोर ठेवावा असे माननीय सभापतींनी सांगितले.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सन २०१७ -२०१८ च्या अर्थसंकल्पावरील चर्चा पूर्ण झाली असल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

वित्त राज्यमंत्र्यांनी, " सन २०१७ चे वि.स.वि क्रमांक ११ - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१७ " विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहास सादर करण्यात आले.

खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित केली.

बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन्माननीय सदस्यांचे निलंबन मागे घेण्याबाबत शासन सकारात्मक असून सभागृहाचे कामकाज सुरळीत व्हावे यासाठी दोन्ही सभागृहातील कामकाजात विरोधी पक्षाने सहभाग घ्यावा, अशी शासनाच्या वतीने विनंती करीत असल्याचे सांगितले.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात सर्वश्री. शरद रणपिसे, हेमंत टकले, संजय दत्त, जयंत प्र. पाटील यांनी आपले मत मांडले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून १६ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ३१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. शरद रणपिसे वि.प. स. यांनी, संसदीय कार्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्याच्या संदर्भात हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात तपासून उचित कारवाई करण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. संजय दत्त वि.प.स. यांनी, आजच्या कामकाज क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९ वरील शासनाचे लेखी उत्तर अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नसणे, इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर लक्षवेधी सूचना कधी घ्यायची यासंबंधीचा निर्णय मी घेईन असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१) डॉ. अपूर्व हिरे,वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले-

" नाशिक येथे मुंबई-आग्रा महामार्गावर दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास धुळ्याहून येणाऱ्या तीन मोटारीमधून तब्बल १ कोटी ३५ लाख रुपयांच्या जुन्या चलनातील बनावट नोटा तसेच लाखो रुपयांच्या जुन्या चलनातील खऱ्या नोटा पोलिसांनी जप्त करणे, या बनावट नोटांचे प्रकरणी संशयितांमध्ये एका मोठ्या राजकीय नेत्याचे समर्थक, श्री. छबु नागरे यांस अटक करण्यात येणे, बनावट नोटा प्रकरणामुळे नाशिक जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडणे, या बनावट नोटाप्रकरणी श्री.नागरे यांचेसह ११ जणांना शहर पोलिसांनी अटक करणे, बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केल्यानंतर याप्रकरणाचे धागेदोरे पुणे, सिन्नर, मुंबई, ठाणे, नवी मुंबईपर्यंत व्यापक स्वरुपात पसरलेले असल्याचे पोलीस कारवाईत समजून येणे, या टोळीविरुध्द आडगांव पोलीस ठाणे, नाशिक येथे देशद्रोहाचा गुन्हा दाखल होणे, पोलिसांनी तपासादरम्यान बनावट नोटा छापण्याचे साहित्य हस्तगत करणे, या गंभीर गुन्ह्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली असल्याने याप्रकरणी उच्चस्तरीय यंत्रणेमार्फत सखोल व कठोर चौकशी व्हावी, अशी जनतेकडून मागणी केली जाणे, बनावट नोटा छापल्याप्रकरणी अटकेत असलेल्या श्री.नागरे यांच्या पत्नीवर दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक येथील भद्रकाली पोलिस स्टेशन येथे खंडणीचा गुन्हा दाखल केला जाणे, बनावट नोटा व छपाईची सामग्री पोलिसांच्या हाती लागल्याने बनावटगिरीच्या टोळीचा हा धंदा जुनाच असल्याचा संशय व्यक्त केला जाणे, या टोळीच्या पर्दाफाशनंतर याचे लोण कुठपर्यंत पोहोचले आहे, याचा पोलिसांनी सखोल छडा लावावा, अशी मागणी जनतेकडून केली जाणे, बनावट नोटांचा पुरवठा केव्हा व कोणकोणास करण्यात आला, याचा शोध घेण्यात यावा, अशीही जनतेकडून आग्रही मागणी केली जाणे, शासनाने एकंदरीत प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती विचारात घेऊन सी.बी.आय.मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय तात्काळ घ्यावा, असाही सर्वसामान्य जनतेत आग्रह असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ".

गृह राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ पुढे ढकलण्याची विनंती माननीय मंत्री महोदयांनी केली असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(२) सर्वश्री. रामहरी रुपनवर, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

ॲड. रामहरी रूपनवर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले-

" ता. माळशिरस, जि.सोलापूर, येथील पुणे-पंढरपूर हा राज्यातील महत्त्वाचा मार्ग असून सध्या हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून केंद्र शासनाकडे वर्ग झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर महामार्गापर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना ये-जा करण्यासाठी रस्त्याची सुविधा आवश्यक असणे, परंतु तालुका माळशिरस, जि.सोलापूर येथील मुख्य हायवेला जोडणारे एम.डी.आर. अंतर्गत तयार करण्यात आलेले रस्ते सद्यस्थितीत अतिशय खराब झाले असून हे रस्ते मागील अनेक वर्षांपासून दुरुस्त करण्यात आले नसल्याने नागरीकांना प्रवास करणे अत्यंत गैरसोयीचे होत असणे, तसेच रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होऊन अनेकदा या रस्त्यांवर लहान मोठा अपघात होऊन त्यात जीवित व वित्त हानी होत असल्याचे आढळून येणे, यामुळे ग्रामस्थ व प्रवासी यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची व चिडीची भावना लक्षात घेता त्वरीत या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ".

सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले-

" शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मौजे चिकणघर येथील आरक्षण क्र. १९२, १९३, १९४, १९५, १९६, १९७ या भूखडांवर बेकायदेशीरपणे केलेले अतिक्रमण निष्कासित न करताच टीडीआर मंजूर करुन दोषी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त, श्री रामनाथ सोनवणे व इतर यांनी शासनाची फसवणूक करुन क.डों.म.पा. मध्ये टीडीआर घोटाळा केल्यामुळे या संपूर्ण प्रकरणामध्ये अनियमितता सिध्द झालेली असल्याने आजमितीपर्यंत मंजूर केलेला ६ लाख ७० हजार फुटांचा टीडीआर विनाविलंब रद्द करुन दोषींवर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, सदर प्रकरणी महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री.रामनाथ सोनवणे, तत्कालिन सहायक संचालक नगररचना श्री.चं.प्र.सिंह, तत्कालिन नगररचनाकार श्री. रघुवीर शेळके, कनिष्ठ अभियंता, श्री.शशीम केदार यांची सद्यःस्थितीत सुरू असलेली विभागीय चौकशी, सदर चौकशीतील मुख्य साक्षीदार श्री. नो.र.शेंडे तत्कालीन उप संचालक नगररचना, कोकण विभाग व विद्यमान संचालक नगररचना, पुणे यांनी संपूर्ण कागदपत्रांची पुर्तता महानगरपालिकेकडून करण्यात न आल्याबाबत दिलेली साक्ष, यावरुन महानगरपालिकेकडूनच जाणीवपूर्वक चौकशीस विलंब करण्यात येत असणे, सदर विलंबामुळे दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत सर्वसामान्यामध्ये निर्माण झालेली संभ्रमाची भावना, श्री.शेंडे तत्कालीन उप संचालक, नगररचना

कोकण विभाग या पदावर असताना त्यांनी शासनाला जो अहवाल दिला तो अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे दिलेला असणे, त्यामुळे श्री. जितेंद्र भोपळे, तत्कालीन सहा.संचालक, नगररचना, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे व श्री.नो.र.शेंडे तत्कालिन संचालक, नगररचना, कोकण विभाग यांनी महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या अहवालावरच निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, सदर प्रकरणी संपूर्ण चौकशी निवृत्त न्यायाधीश यांच्यामार्फत पुनःश्च करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ".

नगरविकास राज्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ व ५ माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या विनंतीनुसार पुढे ढकलण्यात येत आहे. तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक ६ ही सन्माननीय सदस्य श्री. नारायण राणे व सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे यांची आहे. परंतु त्यांच्यापैकी कोणीही सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक ८ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

(८) श्री. मितेश भांगडिया, प्रा. अनिल सोले, श्री. नागोराव पुंडलिक गाणार वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. नागोराव पुंडलिक गाणार वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधले :-

" राज्यातील ११ अकृषक विद्यापीठांमध्ये सर्व स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमाकरिता सत्र पद्धत (semister pattern) सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येते, सत्र परीक्षा पद्धती अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांवर त्याच सोबत महाविद्यालय व विद्यापीठांवर देखील परीक्षेचा बोजा वाढणे, सत्र परीक्षा पद्धतीमुळे महाविद्यालयांचा संपूर्ण अभ्यासक्रम एका विशिष्ट वेळेत पूर्ण होण्याचे बंधन असणे, मात्र अनेक महाविद्यालयांमध्ये मंजूर प्राध्यापकांची बहुतांश पदे रिक्त असणे तसेच या पदावर अंशकालीन शिक्षक / प्राध्यापक विद्यार्थ्यांना शिकवत असणे, अंशकालीन शिक्षक / प्राध्यापक असल्यामुळे त्यांना अभ्यासक्रम निश्चित वेळेत पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन नसणे, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, त्यांना सेल्फ स्टडी करावी लागणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठातून पुरातन असलेली अमूल्य नाणी गहाळ झाल्या प्रकरणाची अजूनही चौकशी सुरूच असणे, अत्यंत पुरातन व मौल्यवान नाणी विद्यापीठातून गायब झाल्यामुळे विद्यार्थी विद्यापीठातील अंतर्गत सुरक्षेबाबत साशंक असणे, विद्यार्थ्यांच्या मनात स्वतःच्या शैक्षणिक कागदपत्रांबद्दल असुरक्षितता निर्माण होणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जपण्याची नितांत आवश्यकता, सत्र परीक्षा पद्धती त्वरीत बंद करून एक परीक्षा घेण्याकरिता प्रभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ".

नगरविकास राज्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ९ चे उत्तर आलेले असून सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त व इतर वि.प.स. यांनी सदरहू लक्षवेधी सूचना पुन्हा घ्यावी अशी विनंती केली असून लक्षवेधी सूचनेतील विषयाचे गांभीर्य पाहून सदर लक्षवेधी सूचना पुन्हा एकदा पुकारण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता सुरू होईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून १२ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगीतीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

माननीय सभापतींनी, सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी पत्र दिले असून त्या पत्रात लोकभारती विधिमंडळ पक्षाचे विसर्जन आणि विलीनीकरण जनता दल युनायटेड या पक्षात झाले असल्याने तशी नोंद विधिमंडळाच्या दप्तरी तसेच अन्य सर्व पत्रव्यवहारात व कामकाजात करण्यात यावी व यापुढे श्री. कपिल पाटील वि.प.स. हे जनता दल युनायटेड या पक्षाचे सदस्य म्हणून सभागृहात बसतील, असे घोषित केले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणे, याबाबत मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

श्री. सुनील तटकरे वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(गोंधळ)

सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगीत करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १७ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगीतीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ४२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

आहे की, या विधिमंडळामध्ये दोन्ही सभागृहातील सर्वच पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी कर्जमाफीची मागणी केली आहे.

(१) चार तारांकित प्रश्नाची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(३) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील दोन प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.

(१) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " राज्यात दिनांक २१ फेब्रुवारी २०१७ रोजी १० महापालिका, ११ जिल्हा परिषद आणि ११८ समित्यांच्या झालेल्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मशीनमध्ये झालेला घोळ " ह्या विषयावर नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून हा विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाही. तथापि, एकंदरीत या संवेदनशील विषयावर सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटांत आपले विचार मांडावेत असे माननीय सभापतींनी सागितले.

श्री. संजय दत्त वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. मात्र शासनाने या विषयी निवेदन करावे, असे निदेश देऊन माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(२) श्री. किरण पावसकर वि.प.स. यांनी, " कंबाटा एव्हीएशन कंपनी बंद पडल्यामुळे २५ ते ३० वर्षे सेवा केलेल्या कामगारांना कामावरून काढून टाकणे, " या विषयावर नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून या विषयावर सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटांत आपले म्हणणे मांडावे असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. किरण पावसकर वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम २८९ हा आहे, कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(३) श्री. नारायण राणे वि.प.स. यांनी, " ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महानगरपालिकेचे सभागृह नेते श्री. मनोज म्हात्रे यांची झालेली हत्या ", इ. बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून या विषयावर सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटांत आपले म्हणणे मांडावे असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. नारायण राणे, वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

या विषयावर शासनाने निवेदन करावे, असे निदेश देऊन माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

२. (१) नगरविकास राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये विधि व न्याय विभागाचा सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील योजनेतर व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर व सामान्य प्रशासन, नगरविकास आणि गृह विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(२) गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) महसूल मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये महसूल व वन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(४) वित्त राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये वित्त विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(५) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी, (अ) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा आणि मराठी भाषा या विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील, (ब) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सन २०१०-२०११, सन २०११-२०१२ व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवले.

(६) अल्पसंख्याक विकास व वक्फ राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये गृहनिर्माण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(७) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे सगृहासमोर ठेवला.

(८) गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये गृहनिर्माण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(९) ग्रामविकास राज्यमंत्र्यांनी, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये ग्रामविकास व जलसंधारण आणि महिला व बालविकास विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(१०) अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्र्यांनी, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर आणि संसदीय कार्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(११) वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाचा सन२०१०-२०११ व सन या वित्तीय वर्षांतील योजनांतर्गत आणि २०१५-२०१६ योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(१२) जलसंपदा मंत्र्यांनी, विदर्भ, (अ) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये जलसंपदा विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील, (ब) राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन २०१७-२०१८ च्या वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(१३) उद्योग राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, (अ) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये उद्योग, ऊर्जा व कामकाज विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील (ब) मॉयल लिमिटेड यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा चोपन्नावा वार्षिक अहवाल, (क) इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(१४) कृषि राज्यमंत्र्यांनी (अ)विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये कृषि, फलोत्पादन विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील, (ब) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल व वार्षिक लेखे, (क) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(१५) पर्यावरण राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पर्यावरण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

(१६) ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवल्या.

(अ) (महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग नूतनशील ऊर्जेच्या दर) विनियम (पहिली सुधारणा) (निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती), २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ जानेवारी ४ दिनांकित ०१२८९/२०१७/लिगल/२०१७ व (बागिगाप्. मे) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (लेक्स इस्टेट प्राच्या ऐरोली, लि. नॉलेज पार्क, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावरआधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आय लागू असलेल्या वीज वितरण (झेड.ई.एस.इ.टी.आय/टी. परवान्याच्या विशिष्ट अटीविनियम (सुधारणा पहिली) (२०१७ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक म. एल.पी.ई.जी/परवाना अची/तांत्रिक/आ.नि.वि./२०१७१४२५/दिनांकित ३ फेब्रुवारी, २०१७ सभागृहासमोर ठेवल्या.

(१७) ऊर्जा राज्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(१८) पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्र्यांनी, विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वित्तीय वर्षातील योजनेतर आणि सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(१९) सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी, विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(२०) सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी, विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड८अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सन २०१५-२०१६या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(२१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग राज्यमंत्र्यांनी, विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(२२) पशुसंवर्धन मंत्र्यांनी, (अ) विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत व योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील, (ब) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल, (क) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी, विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे यांनी विधानपरिषद सभागृहाबाबत विधानसभेमध्ये, केलेल्या वक्तव्याबाबत, माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात श्री. नारायण राणे वि.प.स. यांनी आपले मत मांडले.

यासंदर्भात माननीय अध्यक्ष महोदयांसमवेत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

५. हुस्नबानू खलीफे, वि.स.स. यांनी, राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील " देवस्थान इनामाच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत" या विषयावरील श्री. सुनील शंकर रेवाळे व इतर यांच्या स्वाक्षरीचा तसेच ग्रामपंचायत भोयर पंचायत समिती यवतमाळ येथे पाण्याची टाकी आणि विहीर मंजूर करून मिळणेबाबत, या विषयावरील सरपंच सौ.यशोदाबाई अ.लुगांसे व इतर यांच्या स्वाक्षरीचा असे एकूण दोन विनंती अर्ज सभागृहास सादर केले.

६. (१) दिनांक १७, १८, २२, २३, २४, २५ व आज दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनांवर शासनाने निवेदन करावे असे आदेश मी दिले आहेत. तसेच उपरोक्त दिलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या असल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

७. आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेली नियम ९३ अन्वये अनुक्रमे सूचना क्रमांक १९, २०, ०२, ०५ वरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो तसेच सूचना क्रमांक १२ वरील निवेदन पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

८. (१) डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती जाहीर करावी ", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नारायण राणे वि.प.स. यांनी सूचना केल्याप्रमाणे सभागृहाची बैठक दीड तासांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५२ मिनिटांनी स्थगितल झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. अनिल गोटे वि.प.स. यांनी केलेल्या वक्तव्याबाबत-

दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय मागण्यांवर विभागवार चर्चा सुरू असताना विधानसभेचे माननीय सदस्य श्री. अनिल गोटे यांनी विधानपरिषद सदनाबाबत आक्षेपार्ह विधान करून सदनाचा अवमान केल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात औचित्याच्या मुद्यापासून आतापर्यंत झालेली चर्चा मी सभागृहाच्या कार्यवाहीतून काढत असून ती रेकॉर्डवर येणार नाही तसेच विधानपरिषदेच्या कार्यवाहीतून काढून टाकण्यात

आलेल्या चर्चेचा कोणताही भाग प्रसार माध्यमे तथा वृत्तपत्रांनी प्रसिद्ध करू नये असे निदेश मी देत आहे, असे माननीय सभापतींनी सांगितले.

औचित्याचे मुद्दे (पुढे सुरू)

(२) श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी, " मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील वनराई पोलीस ठाण्यामध्ये पंचनामा करून ठेवलेला मुद्देमाल गायब होणे ", इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची दखल घ्यावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

(३) श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी, " मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ", इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात दोन्ही सभागृहामध्ये ठराव घ्यावा असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१) श्री. जगन्नथ शिंदे, वि.प.स. यांनी, " कल्याण रेल्वे स्थानक परिसरातील स्कायवॉक बांधण्यासाठी एमएमआरडीए व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने १०० कोटी रूपयांपेक्षा अधिक खर्च केलेला असताना सदरहू स्कायवॉकवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले असून याबाबत पालिका व राज्य शासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसणे, सबब शासन निधीची अपव्यय करून फेरीवाल्यांना अभय देणाऱ्या कल्याण-डोंबिवली मनपा आयुक्तांसह सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी ", इ. बाबत विशेष उल्लेखची सूचना मांडली.

शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय सभापतींनी सांगितनले.

(२) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " ज्ञानयोग शिक्षण संस्था, कळवा, जि. ठाणे, संचालित कळवा नाईट हायस्कूल येथे मागील २० वर्षांपासून कार्यरत असलेले श्री. लक्ष्मण तुळशीराम चौधरी, श्रीमती आनंदा सोनावणे, श्री. प्रमोद पाटील हे अर्धवेळ शिक्षक यांना शैक्षणिक वर्ष सन २०१६-२०१७ च्या संच मान्येनुसार त्यांना अतिरिक्त ठरविण्यात आले असून त्यांची सेवा खंडित करण्यात आलेली असणे ", इ. बाबत माहितीविषय मुद्दा मांडला.

शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

(३) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " रायगड जिल्ह्यात समुद्राच्या उधाणाचे पाणी भातशेतीत शिरून रायगड जिल्ह्यातील ३ हजार १६ हेक्टर शेती कायमची नापीक झालेली असणे ", इ. बाबत माहितीविषय मुद्दा मांडला.

शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय सभापतींनी सांगितनले.

आजच्या दिवसाच्या कामकाज क्रमात दर्शविण्यात आलेला सभागृह नेत्यासंबंधीचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

(१) सर्वश्री. जयवंतराव जाधव, हेमंत टकले, अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स. यांची अल्पकालीन चर्चा.

सर्वश्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी पुढील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

" दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी नगरसूल (ता.येवला, जि.नाशिक) येथे कांद्याला भाव मिळत नसल्यामुळे एका शेतकऱ्याने पाच एकर उभ्या कांदा पिकाला आग लावून शेत पेटवून देणे, कांद्याला सरासरी दोन ते तीन रुपये भाव मिळत असल्यामुळे उत्पादन खर्चही मिळणे दुरापास्त होणे, माहे जुलै व ऑगस्ट, २०१६ मध्ये विकलेल्या कांद्याला प्रति क्विंटल एक रुपयाचे जाहीर केलेले अनुदान अद्यापही शेतकऱ्यांच्या हाती न पडल्यामुळे शासनाने बाजार हस्तक्षेप योजनेद्वारे भाव स्थिरीकरण निधीतून कांद्याची खरेदी करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, दिनांक ५ जुलै २०१६ रोजीपासून कांदा या पिकाचा जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समावेश नसल्याने कांद्याच्या एकूण उत्पन्नापैकी देशांतर्गत गरज लक्षात घेऊन निर्यातीबाबत शीघ्र गतीने उपाययोजना करण्याची तसेच निर्यातीला प्रोत्साहन आणि कांदा वाहतुकीसाठी पुरेशा रेल्वे वॅगन्स उपलब्ध करण्याची आवश्यकता, शासनाच्या अनास्थेमुळे शेतकऱ्यांना उत्पादनखर्चापेक्षा कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांकडून हमीभावाने कांदा व इतर शेतमाल खरेदी करण्याची गरज, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला कमालीचा संताप, यावर्षी पावसाने साथ दिल्यामुळे कांदा, तूर, टॉमेटो इत्यादी शेतमालाचे विक्रमी उत्पादन होणे, अनेक शासकीय खरेदी केंद्रांवर १५ दिवसांपासून रांगा लागल्याने शेतकऱ्यांचे होणारे प्रचंड हाल, शेतकऱ्यांना वेठीस धरल्यामुळे तसेच उत्पादन खर्च आणि शेतमालाला मिळणारा भाव यातील तफावतीमुळे शेतकरी हैराण होणे, राज्यातील शेतकरी कर्जबाजारी होऊनही केंद्र शासनाकडून पीक कर्जावरील २ महिन्यांचेच व्याज माफ केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे निर्माण झालेले वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ".

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. जयंत प्र. पाटील (२) श्री. हेमंत टकले

(३) ॲड. रामहरी रूपनवर (४) श्री. नरेंद्र पाटील

(५) श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेते)

कृषी राज्य मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

(क) श्री. सुजितसिंह ठाकूर, डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ. अपूर्व हिरे, श्री. तानाजी सावंत, प्रा.अनिल सोले, सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, ॲड. अनिल परब, श्री. रविंद्र फाटक, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -

श्री. सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांनी पुढील नियम २६० अन्वये प्रस्ताव मांडला.

" राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने ' जलयुक्त शिवार योजना ' यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतीक्षा यादी १ ते २ वर्षांवर येणे, प्रतीक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पीक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य ' सुजलाम्-सुफलाम् ' होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

सभागृहामध्ये प्रस्तावाशी संबंधित माननीय राज्यमंत्री आणि माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून १८ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक ५ वाजून २८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

नियम २६० अन्वये प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरू)

श्री. सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांनी मांडलेल्या उपरोक्त नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर आपले म्हणणे मांडले. (भाषण अपूर्ण)

गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७

(१) सर्वश्री संजय दत्त, नरेंद्र पाटील, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, हेमंत टकले, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, ॲड. निरंजन डावखरे, श्री. प्रकाश गजभिये, प्रा. अनिल सोले, श्री. नारायण राणे, डॉ. अपूर्व हिरे, श्री. चंदूभाई पटेल, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री आनंद ठाकूर, जगन्नाथ शिंदे, सतिश चव्हाण, विजय ऊर्फ भाई गिरकर, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री अनिल भोसले, नागोराव गाणार, रविंद्र फाटक, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री संजय दत्त, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व नागरीपुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणाऱ्या स्टेंट, कॅथेटर, बलून्ससारख्या वैद्यकीय सामुग्रीसाठी रुग्णांकडून उत्पादन किमतीपेक्षा दहापट अधिक किंमत आकारली जात असणे, वैधमापन शास्त्र विभागाने मुंबईतील लिलावती हॉस्पिटल, बांद्रे, एशियन हार्ट इन्स्टिट्यूट, मुलुंडमधील फोर्टिस हॉस्पिटल, अंधेरीतील कोकीळाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, परळ येथील ग्लोबल हॉस्पिटल, पवई येथील हिरानंदानी हॉस्पिटल, व सर एच.एन.हॉस्पिटल (रिलायन्स फॉऊंडेशन) या ८ रुग्णालयांवर टाकलेल्या छाप्यातून धक्कादायक वास्तव माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, दुप्पट एमआरपी किमती आकारलेले स्टेंट, कॅथेटर, बलून डिव्हाइस या हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीचा रुग्णालयांकडून तसेच उत्पादक साखळीकडून ही लूट सुरू असणे, वैधमापन शास्त्र विभागाच्या २०११ च्या नियमानुसार या उत्पादनांची विक्री, वितरण करण्यापूर्वी तसेच त्यांना कस्टम विभागाकडून आयातीसाठी परवानगी मिळवतानाही मूळ बिलावर व उत्पादनावर सारख्या किमतीची नोंद असायला हवी, प्रत्यक्षात मात्र आयात करण्यात आलेल्या व रुग्णालयांना विकण्यात आलेल्या किंमतीमध्ये तफावत दिसून येणे, ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेंटची किंमत सुमारे १ ते १.५ लाख रुपये असणे, राज्यात मुंबईसह हजारोंनी ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात येणे, गरीब रुग्णांना १ ते १.५ लाख रुपये खर्च करणे शक्य नसल्यामुळे केंद्र शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास स्टेंट ची किंमत ३० हजार रुपये करून याच दराने स्टेंट विकण्याच्या सूचना वितरकांना देण्यात येणे, परंतु राज्यातील स्टेंट वितरकांनी यास दिलेला नकार, शासनाने आदेश देऊनसूद्धा स्टेंट विक्रेत्यांनी ३० हजार रुपयांत स्टेंट देण्यास नकार दिल्यामुळे राज्यातील हृदयविकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांत पसरलेला तीव्र असंतोष व भीतीचे वातावरण, सदरील प्रकार राज्यातील इतर रुग्णालयांकडून सुरू असणे, असहाय्य रुग्णांची बेसुमार लूट थांबविण्याबाबत

शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, हृदयशस्त्रक्रियेच्या सामुग्रीच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची लूट करणाऱ्या संबंधित रुग्णालयांवर तातडीने कारवाई करून हृदयशस्त्रक्रियेची साधनसामग्री रुग्णांना रास्त भावात उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री जयंत पाटील, धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनील तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधले—

" राज्यातील साखर कारखान्यांना मूलभूत सुविधा संमती (इन्फ्रास्ट्रक्चर क्लीअरन्स) प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी (एम.एस.सी.डी.सी.एल.) बरोबर वीज खरेदी करार (पॉवर परचेस्‌ॲग्रिमेंट) करण्यास अडचण येणे, पॉवर परचेस्‌ॲग्रीमेंट किमान २ हजार मेगावॅटसाठी संमती मिळणे आवश्यक असणे, ज्या कारखान्याकडे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत त्या कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, परंतु ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत अशा कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे ते साखर कारखाने आर्थिक संकटात सापडणे, ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत त्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पात समाविष्ट करून घेतल्यास त्यांच्यावर येणारे आर्थिक संकट दूर होऊन त्या साखर कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देणे सोयीस्कर होणे, यासाठी अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही. "

ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. नारायण राणे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले—

" राज्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग, सावंतवाडी भागात माकडतापाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये या तापाने दोघांचा झालेला मृत्यू व आतापर्यंत जिल्ह्यात ५० पेक्षा जास्त रुग्ण माकडतापाने ग्रस्त असल्याचे आढळून येणे, या तापाच्या नियंत्रणासाठी प्रशासनाकडून होत

असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये व पर्यटकांमध्ये पसरलेले तीव्र भीतीचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले–

" बोरिवली पूर्व मधील काजूपाडा टेकडी या क्षेत्रात पाण्याची समस्या निर्माण झाल्याने उदंचन केंद्र व स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत येथील रहिवाशांची मागणी असणे, येथील वस्ती उंचावर असल्याने पाणीपुरवठा सुरळीत होत नसून परिसरात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणे, उदंचन केंद्र व स्वतंत्र पाणीपुरवठा योजना या परिसरात राबविणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत नागरिकांकडून स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार मागणी होणे, या परिसरातील पाण्याच्या समस्यांकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असणे, यामुळे सामान्य जनतेत शासनाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" केंद्र शासनाने कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर राज्यात नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये सातव्या वेतन आयोगासंदर्भात कोणतीही तरतूद नसल्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वर्षभर वेतन आयोग लागू न होण्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, राज्यातील जवळपास २० लाख शासकीय व निमशासकीय कर्मचारी व शिक्षक केंद्र शासनाच्या घोषणेनंतर गेल्या वर्षभरापासून वेतन आयोगाच्या प्रतीक्षेत असणे, त्याचप्रमाणे वेतन आयोग लागू करण्याकरिता नेमलेल्या राज्य वेतन आयोग सुधारणा समितीस अद्यापपर्यंत कार्यालय देखील न मिळणे, त्यामुळे सदर समिती नेमून बराच काळ उलटूनही प्रत्यक्ष कामास सुरूवात न होणे, विविध शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना यांनी मा. मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांना निवेदन देऊन वाढती महागाई व तुटपुंजे वेतन या विरोधात वेतन आयोग तात्काळ लागू करण्यासंदर्भात व पाच दिवसांचा आठवडा तसेच निवृत्त होण्याची मर्यादा ५८ वरून ६० वर्षे आणि ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सद्यःस्थितीत ६० वर्षे निवृत्त होण्याची

मर्यादा लागू आहे अशांना ६२ वर्षे पर्यंत वाढविण्याकरिता आंदोलन करून राज्यव्यापी संप पुकारण्याचा दिलेला इशारा, अद्यापपर्यंत सदर निवेदनाबाबत शासनाकडून कोणतीही ठोस पाऊले न उचलल्यामुळे राज्यातील शासकीय नोकरवर्गात पसरलेला असंतोष, वेतन आयोगाबाबत शासनाची दिसून आलेली उदासीनता, परिणामी शासकीय अधिकारी व कर्मचारी महासंघाने दिलेल्या संपाच्या इशाऱ्यामुळे राज्यातील जनमानसांत पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यामुळे शासनाने या गंभीर विषयावर तात्काळ निर्णय घेऊन वेतन आयोग लागू करण्याबाबतची करावयाची घोषणा, तसेच सरकारी, निमसरकारी कार्यालय व शाळा आणि महाविद्यालये यांना पाच दिवसांचा आठवडा व निवृत्तीच्या मर्यादेबाबत घ्यावयाचा निर्णयावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

वित्त मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री किरण पावसकर, धनंजय मुंडे, ॲड. निरंजन डावखरे, श्री. नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री आनंद ठाकूर, हेमंत टकले, सुनील तटकरे, विक्रम काळे, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री अनिल भोसले, जगन्नाथ शिंदे, रविंद्र फाटक, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबी कडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले—

" पुणे जिल्ह्यातील फुलवडे आणि मावळमधील वडेश्वर येथील मुलींच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थिनींशी असभ्य वर्तवणूक तर जुन्नर मधील कोळेवाडीतील आश्रमशाळेत मुली धोकादायक इमारतीत राहत असल्याचे जिल्हा प्रशासनाने नेमलेल्या तपासणी पथकाच्या माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास केलेल्या तपासणी अहवालात आढळून येणे, सदरचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर करण्यात येणे, राज्यभरातील अनेक आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शोषण होत असल्याच्या घटना वारंवार घडत असणे, तसेच आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठीचे ११ कोटींचे टुथपेस्ट कंत्राट खरेदी समितीने नियम धाब्यावर बसवत परस्पर अपात्र ठरवलेल्या कंपनीला दिल्या प्रकरणी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजीच्या सुमारास लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन देण्यात येणे, याबाबत शासनाने अद्यापही चौकशी न केल्यामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, व शासनाची प्रतिक्रिया. "

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" सातारा जिल्ह्यातील ढेबेवाडी (ता. पाटण) येथील दक्षिणवांग नदीवरील वांग मराठवाडी धरणाचे काम १९९७ साली सुरू झाले असून अद्यापपर्यंत ते काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मार्च, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस येणे, सदर धरणाची पाणी साठवण क्षमता २.७३ टी.एम.सी. असून धरणाचे काम अर्धवट असल्याने व धरणात गाळ साचल्याने सध्या फक्त ०.६० टी.एम.सी. पाणीसाठा होत असणे, या धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये ढेबेवाडी विभागातील उत्तरवांग नदीकाठच्या जानुगडेवाडी, शितपवाडी, मंद्रुळकोळे या गावांचा समावेश केला असून अनुक्रमे २-१६ हेक्टर, २-६२ हेक्टर, ४-६३ हेक्टर जमिनी शासनाने संपादित केल्या असणे, मात्र भौगोलिकदृष्ट्या सदर गावांना या धरणाचे पाणी मिळत नसल्याने तेथील शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, तसेच मेंढ व केकतवाडी, ता. पाटण या गावातील प्रकल्पग्रस्तांचे सांगली जिल्ह्यात पुनर्वसन करण्याचे शासनाचे नियोजन असणे, मात्र सातारा जिल्ह्यातच पुनर्वसन करावे अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी असणे, तसेच तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व संपूर्ण पायाभूत सुविधा देण्यापूर्वीच शासनाने धरणाच्या घळभरणीचे काम हाती घेणे व घळभरणीच्या कामासाठी जिल्हाधिकारी व दंडाधिकारी यांची पूर्व परवानगी देखील घेतली नसणे, अशाप्रकारे जबाबदारी पूर्ण करण्यात शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे तेथील प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना आणि आत्मदहन करण्याची वृत्ती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

जलसंपदा राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" डॉ. कस्तुरीरंगन समितीने दिलेल्या अहवालानुसार केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये पश्चिम घाटातील बहुतांश भाग संवेदनशील क्षेत्र (Eco Sensative Zone) म्हणून अधिसूचित झाल्यामुळे त्यामध्ये महाराष्ट्रातील विशेषत: रोहा, नागोठाणे तसेच इतर १३ औद्योगिक वसाहतीमधील शेकडो उद्योगधंदे धोक्यात आल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस येणे, या औद्योगिक वसाहतीची एकूण गुंतवणुक सुमारे २०००० कोटी रुपयांपेक्षा जास्त असून वार्षिक उत्पन्न

देखील हजारो कोटींमध्ये असणे, सदर भाग अधिसूचित झाल्यामुळे जवळपास सर्वच उद्योगधंदे बंद होण्याची शक्यता, त्यामुळे हजारो कोटींपेक्षा जास्त रुपयांचे उत्पादन शुल्क बुडीत जाऊन शासनाच्या महसुलीत होणारी प्रचंड घट, लाखांपेक्षा जास्त कामगारांना रोजगार मिळत असलेल्या कंपन्यांचेच भविष्य धोक्यात आल्याने कामगारांच्या भविष्यातील रोजगारांवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, परिणामी हे सर्व उद्योगधंदे राज्याबाहेर जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती, सदर अहवाल अंतिम होत असताना केरळ राज्याने औद्योगिक वसाहतीचे संरक्षण करण्याकरिता हरकती घेऊन स्पष्टपणे सदर अधिसूचनेस विरोध करणे, याधर्तीवर राज्य शासनाने केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने विभागास याबाबत स्पष्टपणे विरोधदर्शक हरकती व सूचना देण्याची आवश्यकता, तसेच त्याचा पाठपुरावा करून योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित असणे, रोहा व नागोठाणे इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी राज्य शासनास निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही ठोस पाऊले न उचलल्याने तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, त्यामुळे या गंभीर प्रश्नांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.३० वाजता माननीय सभापती, श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) नऊ तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तीन तारांकित प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अनुक्रमांक चाळीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित करण्यात आले.

(४) मंगळवार, दिनांक ७ मार्च ; बुधवार, दिनांक ८ मार्च ; गुरुवार, दिनांक ९ मार्च ; शुक्रवार, दिनांक १० मार्च ; मंगळवार, दिनांक १४ मार्च ; सोमवार, दिनांक २० मार्च ; मंगळवार, दिनांक २१ मार्च ; गुरुवार, दिनांक २३ मार्च व शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या.

(५) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " राज्यातील जिल्हापरिषद शाळेतील प्राथमिक डिमट्रेंड शिक्षकांना चौथ्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी देणे, " इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

सदस्यांच्या विनंतीनुसार या संदर्भात बैठक घेण्यात येईल, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " नागपूर येथील केंद्र शासनाच्या अखत्यारितील मिहान प्रकल्पांतर्गत १००० एकर जागा कवडीमोल भावाने रामदेव बाबा यांच्या पतंजली संस्थेला देण्यात आली असून अद्याप कोणताही प्रकल्प सुरू न झाल्यामुळे बेरोजगारांची होणारी फसवणूक, त्यामुळे विदर्भवासीयांमध्ये पसरलेली नाराजी, " या विषयावर लक्षवेधी सूचना स्वीकारली असल्यामुळे या सूचनेस अनुमती नाकारित असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले व सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडण्याची परवानगी दिली.

श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय सभापतींनी दिले.

(२) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, " अनुदानामुळे नोकरीची शाश्वती न राहिल्यामुळे होणारी उपासमार आणि अवहेलना याला कंटाळून वाशीमच्या शिक्षकाने केलेला आत्महत्येचा प्रयत्न, १ व २ जुलैच्या घोषित शाळांना अनुदान मिळण्याची गरज, शिक्षकांच्या आत्महत्या, हजारो शिक्षकांच्या कुटुंबीयांची होणारी ससेहोलपट थांबविण्यासाठी १०० टक्के अनुदान सुरू करण्याची आवश्यकता " या विषयावर दिलेल्या नियम २८९ अन्वये सूचनेबाबत सदर सूचना आधीच अमान्य केली असल्याने या सूचनेस अनुमती नाकारित असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले व सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडण्याची परवानगी दिली.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय सभापतींनी दिले.

(३) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी यासाठी विरोधी पक्षाच्या वतीने राज्यव्यापी संघर्ष यात्रा काढण्यात येणे, अवकाळी पाऊस, गारपिटीचे संकट, सततचा दुष्काळ व नापिकी, शेतमालाला मिळत नसलेला बाजारभाव, ९००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या मागील तीन वर्षांत झालेल्या आत्महत्या, नोटाबंदीच्या निर्णयामुळे उत्पादित मालाचे भाव कोसळणे, तूर डाळीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, " या विषयांवर दिलेल्या नियम २८९ अन्वये सूचनेबाबत सदर सूचना आधीच अमान्य केली असल्याने या सूचनेस अनुमती नाकारित असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले व सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडण्याची परवानगी दिली.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय सभापतींनी दिले.

(४) श्री. हरिभाऊ राठोड, वि.प.स. यांची " ठाणे जिल्हा रुग्णालयाच्या अपघात विभागातील डॉक्टरांना दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी झालेली मारहाण व तसेच वारंवार होणाऱ्या हल्ल्यामुळे डॉक्टरांमध्ये निर्माण झालेले भीती व असुरक्षिततेचे वातावरण, " तसेच ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांच्या " मौजे मोठेगाव (ता. रिसोड, जि. वाशीम) येथील दलित महिलेवर सात जणांनी बलात्कार करून तिला जाळून मारण्याचा प्रयत्न करणे, " या विषयावर नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेबाबत सदर सूचनेतील विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समावेश नसल्यामुळे अनुमती नाकारित आहे, परंतु विषय गंभीर असल्यामुळे शासनाने यावर निवेदन करावे, असे निर्देश माननीय सभापतींनी दिले.

(१) वित्त व नियोजन मंत्र्यांनी, " मोहफुले हे वनोपज वन विभागाच्या वाहतुकीच्या परवान्यातून मुक्त करणे, " इ. बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(२) ऊर्जा मंत्र्यांनी, " विद्युत सहाय्यक पदाची प्रतीक्षा यादी कार्यान्वित करणे, " इ.बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(३) खनिकर्म राज्यमंत्र्यांनी, " सीआरझेड अधिसूचनेस अनुसरून प्रारूप किनारा क्षेत्र व व्यवस्थापन आराखडा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे, " इ. बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

२. (१) संसदीय कार्यमंत्र्यांनी, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) वस्त्रोद्योग राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. आर्कि. अनंत गाडगीळ, समिती सदस्यांनी, सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा व तेरावा अहवाल सादर केला.

४. प्रा. जोगेंद्र कवाडे, समिती सदस्यांनी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सादर केला.

५. श्री. आनंदराव पाटील, समिती सदस्य यांनी, शुक्रवार, दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठराव व विधेयकांना वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

६. समिती प्रमुखांनी, " सार्वजनिक उपक्रम/महामंडळांनी त्यांच्याकडील रक्कम बँक डिपॉझिट करावयाची किंवा शासनाच्या कोषागारामध्ये जमा करावयाची याबाबत परिनिरीक्षण करून सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी घटित करण्यात आलेल्या विधानपरिषद सभागृहाच्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत आगामी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत वाढवून देण्यात यावी. " असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

७. श्री. संजय दत्त, यांनी " कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगर परिषद होणे " इ. बाबतचा विनंती अर्ज सभागृहाला सादर केला.

८. माननीय सभापतींनी दिलेल्या सूचनेनुसार सचिवांनी आज दिनांक २४ मार्च, रोजी प्राप्त झालेल्या नियम ९३ अन्वये सूचना व त्यावरील माननीय सभापतींचे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी, " बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्याची आवश्यकता, " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने शनिवारपर्यंत निवेदन करावे, असे निदेश माननीय सभापतींनी दिले.

श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशीनबाबत निवेदन करण्याचे निदेश देऊनही सरकारने अद्याप निवेदन न करणे, " इ. बाबत मुद्दा मांडला.

अधिवेशन संपण्याच्या आत निवेदन करण्यात येईल, असे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

(२) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी, " कर्जत येथून बेपत्ता झालेल्या मुलीची सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करणे. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने कार्यवाही करावी, असे निदेश माननीय सभापतींनी दिले.

(३) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी जमीन संपादन करणे. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

यासंदर्भात बैठक घेण्यात येईल, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(४) प्रा. अनिल सोले, वि.प.स. यांनी, " गडचिरोली जिल्ह्यातल्या डॉ. साळवे नर्सिंग कॉलेज येथे विद्यार्थिनींची होत असलेली छेडछाड व होत असलेले गैरवर्तणुकीचे प्रकार " इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने उचित कार्यवाही करावी, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " राज्यामध्ये पत्रकारांसाठी पेन्शन व कल्याणकारी योजना सुरू करणे, " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने उचित कार्यवाही करावी, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(६) श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी, " एसएससी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेसोबत शाळा सोडल्याचा दाखल देणे, " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने उचित कार्यवाही करावी, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(७) श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी, " राज्यात विविध ठिकाणी होत असलेली तापमानातील वाढ, " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

माननीय सभापतींनी याबाबत आपले म्हणणे मांडले व या संदर्भात सर्वपक्षीय समिती स्थापन करावी, असे सांगितले.

(८) श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी, " १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला जीव्हीके कंपनीने हार न घालणे, " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

या प्रकरणी चौकशी करून शासनाने उचित कार्यवाही करावी, असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी, " श्री. अनिल गोटे, वि.स.स. यांनी विधान परिषद सभागृह बरखास्त करण्यासंबंधी विधानसभेत केलेले वक्तव्य, " इ. बाबतचा मुद्दा मांडला.

उपरोक्त मुद्यावर श्री. शरद रणपिसे, श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी आपले मत मांडले.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी खुलासा केला.

प्रा. जनार्दन चांदूरकर, वि.प.स. यांनीही आपले मत मांडले.

माननीय सभापतींनी यासंदर्भात आपले मत व्यक्त केले व माननीय अध्यक्ष यांच्याशी चर्चा करून कार्यवृत्त तपासून निर्णय घेतला जाईल, असे सांगितले व सभागृहाची बैठक एक तासासाठी स्थगित केली.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ८ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी, " श्री. अनिल गोटे, वि.स.स. यांनी विधानपरिषद सभागृह बरखास्त करण्यासंबंधी विधानसभेत केलेले वक्तव्य, " इ. बाबतचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यावर डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर, श्री. कपिल पाटील, श्री. भाई गिरकर, वि.प.स. यांनीही मत मांडले.

हा विषय सदनाच्या प्रतिष्ठेचा असल्यामुळे त्यावर शासनाने निवेदन केले किंवा स्पष्टीकरण केले तरी त्याचे गांभीर्य कमी होत नाही. त्यामुळे सदनाची प्रतिष्ठा लक्षात घेऊन आजचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

शुक्रवार, दिनांक ३१ मार्च २०१७

(१) (बुधवार दि. २९ मार्च २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना)

श्री. अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" राज्यभरात अनेक ठिकाणी महापुरुष आणि गड किल्यांच्या नावांचा वापर बिअरबार परमीट रुम, मांसाहारी खानावळ, लोकनाट्य कला केंद्र तसेच देशी दारु विक्री केंद्रांना करण्यात येणे, अनेक ठिकाणी देव-देवतांच्या नावाचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, अनेक महापुरुषांच्या नावाचाही वापर अशा ठिकाणी होत असणे, शासनाने यापूर्वी देव-देवतांच्या नावाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध करणे, तरीही अनेक ठिकाणी सर्रास महापुरुषांसह देव-देवतांच्या नावांचे फलक लावून त्यांचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, दारु विक्री केंद्र व बिअरबार सारख्या हॉटेलांना महापुरुष व देव-देवतांची नावे दिल्यामुळे त्यांच्या नावाची विटंबना होत असणे, समाजासाठी जे महापुरुष आदर्श आहेत अशा महापुरुषांच्या कार्याचा वारसा पुढच्या पिढीला देतांना गैरठिकाणी नावाचा वापर होत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या भावना मोठ्या प्रमाणावर दुखावणे, व्यसनाधीनतेकडे आणि गैरमार्गाकडे घेऊन जाणाऱ्या व्यवसायाला आदर्श व्यक्ती आणि देव-देवतांची नावे देण्यास कायमस्वरुपी प्रतिबंध करून अशा नावांचे

फलक तातडीने काढून टाकण्यासाठी शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले–

" चार्म्स हेरिटेज गृहसंकुल टावरी पाडा, कल्याण (पश्चिम) येथे स्थित असणे, या गृहसंकुलाने आवश्यक क्षमतेची सेप्टीक टँक बांधली नसल्याने मागील सुमारे ५ ते ६ वर्षापासून त्यांच्या इमारतीचे सांडपाणी शंखेश्वर प्रेसिडेन्सी गृहसंकुलाच्या मागील बाजूस मोकळ्या जागेत सोडण्यात येत असणे, त्यामुळे शंखेश्वर प्रेसिडेन्सी गृहसंकुलाच्या मागे मोठ्या प्रमाणात सांडपाण्याची दलदल निर्माण झालेली असणे, सदरहू सांडपाण्याच्या दलदलीमुळे तेथील परिसरातील लहान मुलांच्या आरोग्याला धोका निमार्ण होणे, परिसरातील इमारतीच्या पायाला (स्ट्रक्चरला) यामुळे धोका निर्माण होणे, परिसरात डासांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणे, त्यामुळे मलेरिया व डेंग्यूच्या साथीची लागण होण्याचा धोका निर्माण होणे, नागरिकांनी वारंवार महानगरपालिकेत तक्रारी व निवेदन दिलेली असणे, महानगरपालिकेने चार्म्स हेरिटेज गृहसंकुलास नोटीस बजावणे, आरोग्य केंद्राच्या पथकामार्फत सर्वेक्षण करणे, या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही न करणे, याबाबत तातडीने चार्म्स हेरिटेज गृहसंकुलावर त्यांच्या इमारतीतून मोकळ्या जागेत सोडण्यात येणारे सांडपाणी बंद करून योग्य ती कारवाई करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. "

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" राज्यातील प्राथमिक शिक्षकांना MS-CIT परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शासनाने २००८ च्या कालमर्यादा घालून दिलेली असणे, या बद्दलच्या शासन निर्णयातील संदिग्धतेमुळे अनेक शिक्षकांनी MS-CIT परीक्षा २००४ नंतर पूर्ण करणे, शासनाने कठोर निर्णय घेऊन शिक्षकांच्या वेतनवाढ रद्द करून त्यांच्याकडून वसुली सुरू केलेली असल्याने शिक्षकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागणे, या संदर्भात शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. सतीश चव्हाण व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत उच्च शिक्षण व व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती जाहीर केलेली असणे, पारंपरिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लक्ष तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लक्ष ठरवलेली असणे, परंतु या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्यांस १२ वी च्या परीक्षेत ६० टक्के गुण असण्याबाबतची अट असणे, व्यवस्थापन कोट्यातून व अभिमत विद्यापीठातून व स्वयंअर्थसहाय्य विद्यापीठात वैद्यकिय अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू नसल्याने काही विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत शहरात शिक्षण घेणाऱ्या अल्पभुधारक अथवा मजुरांच्या मुलांस प्रतिमाह रुपये ३,००० तर पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंयोजने अंतर्गत अनुसूचित जमातीच्या मुलास प्रतिमाह रुपये ६,००० निर्वाह भत्ता जाहीर केल्याने यामध्ये आर्थिक भेदभाव केलेला असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला असणे. ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना १२ वी च्या परीक्षेत ६० टक्के गुणाची अट रद्द करणे व व्यवस्थापन कोटा/अभिमत विद्यापीठात व स्वयंअर्थसहाय्य विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या ई.बी.सी.धारक विद्यार्थ्यांना ही ई.बी.सी.ची सवलत मिळण्यासाठी व दोन्ही संवर्गातील विद्यार्थ्यांना समान निर्वाह भत्ता मिळण्यासाठी दिनांक १६ डिसेंबर २०१६ रोजी लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊन यावर त्वरित सकारात्मक निर्णय घेण्याबाबत मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले असणे, परंतु यावर अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष निर्माण झालेले असणे, तरी यावर सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) ॲड. हुस्नबानू खलिफे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना–

ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय महिला व बाल कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" राज्य शासनाच्या मनोधैर्य योजनेतून बलात्कारपीडित महिला व मुलींना पुनर्वसनासाठी देण्यात येणारी ३ लाखाची आर्थिक मदत तुटपूंजी असून त्यातून समाधान होत नसल्याने शासनाने या योजनेचा पुनर्विचार करावा, असे मुंबई उच्च न्यायालयाने सुचविले असल्याचे दिनांक ९ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, एका १४ वर्षीय अल्पवयीन बलात्कारपीडित मुलीला शासनाकडून या योजनेतून २ लाखाची मदत दिलेली असणे, परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने या मुलीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, या याचिकेवरील सुनावणीच्यावेळी नुकसानभरपाई असमाधान व्यक्त करीत मुंबईसारख्या शहरात पीडितांना कसे जगता येईल, शिक्षणाचा खर्चही पूर्ण होणे शक्य नाही तसेच त्यांना देण्यात येणारी ३ लाखाची रक्कम तुटपुंजी आहे व शासनाकडे इतर योजनांसाठी पैसा आहे मात्र पीडित महिलांना मदत देण्यात मात्र पैसा नसणे, हे योग्य नसून ज्याप्रमाणे गोवा राज्यात बलात्कारपीडित महिलेला १० लाखाची नुकसानभरपाई देण्यात येते, त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही गोव्याचा आदर्श ठेवावा, अशी सूचना केलेली असतानाही शासनाने या सूचनेची दखल न घेणे, त्यामुळे राज्यातील महिलांत शासनाप्रति निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन बलात्कारपीडित महिला व मुलींना गोवा सरकारच्या धर्तीवर मनोधैर्य योजनेतून १० लाखाची मदत देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

महिला व बाल कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" जिल्हा ठाणे खालापूर येथील, झेनिथ (बिर्ला) कारखाना मालक व व्यवस्थापनाने, बेकायदेशीर टाळे बंदी लागू केल्याचे निषेधार्थ कामगारांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दिनांक ६ फेब्रुवारी २०१७ रोजीपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणे, सदरहू कारखाना मालक व व्यवस्थापनाने, तीन वर्षांपासून सुरू केलेल्या टाळे बंदीमुळे, कायमस्वरूपी कामगारांसह कंत्राटी कामगारांवर कोसळलेले बेकारीचे व उपासमारीचे संकट, कामगारांनी विविध मागण्यासाठी आंदोलने करूनही, त्यांच्या मागण्या मान्य करण्याकडे कंपनी मालक व व्यवस्थापनाने दुर्लक्ष करून, कंपनीस बेकायदेशीरित्या टाळेबंदी लागू करणे, कंपनी मालकाकडून सदरहू सेवा निवृत्त कामगार व कायमस्वरुपी कामगारांसह कंत्राटी कामगारांची कायद्याने देय असलेली देणी मिळावी याकरिता, कामगारांनी कुटुंबासह बेमुदत उपोषण सुरू करणे, यासंदर्भात उद्योग मंत्री व कामगार मंत्री, यांना कामगारांतर्फे मागण्यांचे निवेदन देण्यात येऊनही, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगारांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर होऊन, त्यांच्यात निर्माण झालेले नैराश्याचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

कामगार राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतींची झालेली दयनीय अवस्था, माहे २०१६ मध्ये दोन वेळा छताचे प्लास्टर कोसळण्याच्या घडलेल्या घटना, तसेच इमारत क्रमांक एक मधील धोकादायक घराची दुरुस्ती सुरू असतांना स्वयंपाक घरातील छत कोसळणे, शासकीय वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून त्यांचे सरासरी आयुर्मान ४५ ते ५० वर्षाचे असणे, या शासकीय वसाहतीमधील ३७० पैकी ३६ इमारतीचे पुनर्बांधणीचे काम सन २०१४-१५ या अर्थसंकल्पात समाविष्ट असून त्याची अंदाजित किंमत रुपये १००.८४ कोटी इतकी असून तसेच उर्वरित ३३४ इमारतींची अंतर्गत व बाह्य संरचनात्मक व नूतनीकरणाच्या दृष्टीने कामे हाती घेण्यात येणार असून त्याकरिता सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रुपये ३४.०४ कोटीची कामे करण्यात आल्याचे माहे जून, २०१४ मध्ये विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मा. सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोदयानी दिलेल्या लेखी उत्तरावरून स्पष्ट होणे, परंतु प्रत्यक्षात २५ इमारतींची कामे सुरू असून अत्यंत धीम्याने होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येणे, तर काही इमारतीची कामे अर्धवट अवस्थेत असणे, मा. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी प्रत्यक्षात सदर वसाहतीची पाहणी करूनही अद्यापी कोणतीच ठोस कार्यवाही झालेली दिसत नसणे, ठेकेदारांना वेळेत देयके मिळत नसल्याने इमारतीच्या उर्वरित कामांकरिता साहित्य आणण्यास होत असलेला विलंब, वसाहतींची दयनीय अवस्था असतानाही इमारतीच्या दुरुस्तीकडे सबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होणे, वसाहतीतील इमारतीचे टप्प्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत असणे, दरवर्षी हीच प्रक्रिया शासनाकडून करण्यात येत असणे, त्यामुळे या इमारती अतिशय जीर्ण अवस्थेत झालेल्या असल्यामुळे त्या पाडून पुनर्बांधणीचे काम हाती घेण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

उपरोक्त लक्षवेधी सूचनेवरील चर्चा वेळेअभावी राखून ठेवण्यात येत असल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी ११-५२ वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " श्री. अनिल गोटे, वि.स.स. यांनी विधानसभा सभागृहात विधानपरिषद बरखास्त करण्यासंबंधी केलेले वक्तव्य " इ. बाबत आपले म्हणणे मांडले.

श्री. भाई जगताप, श्री. नारायण राणे व श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त विषयासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

संसदीय कामकाज मंत्र्यांनी सदर बाबतीत खुलासा केला.

सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी अर्ध्या तासाकरिता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात गोंधळाची परिस्थिती कायम राहिल्यामुळे माननीय तालिका सभापतींनी सभागृहाची बैठक ३० मिनिटांकरिता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

माननीय मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त विषयासंदर्भात विस्ताराने खुलासा केला.

२. (क) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे–

सन २०१७ चे वि.स.वि. क्र. २१ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७

अर्थमंत्र्यांनी सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७ खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे असे सांगितले तसेच सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. व श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) यांनी अर्थमंत्र्यांनी केलेल्या विनंतीवरून उपरोक्त विधेयकास करावयाच्या सुधारणा मांडल्या नाहीत.

वित्तराज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

३. (१) औचित्याच्या मुद्याबाबत दिलेल्या आश्वासनाची माहिती सभागृहासमोर ठेवणे–

नगरविकास राज्यमंत्र्यांनी, ' लोणार, जि. बुलढाणा नगरपरिषदेतील मुख्याधिकारी व करसंग्राहक श्री. जे. के. आंबोरे यांनी खोटी पावती पुस्तके छापून जनतेकडून लाखो रुपयांचा कर जमा केल्याप्रकरणी ' या विषयावरील तत्कालीन विधानपरिषद सदस्य, श्री. पांडुरंग फुंडकर यांनी दिनांक ८ डिसेंबर २०१०रोजी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दिलेल्या आश्वासनानुसार माहिती सभागृहासमोर ठेवली.

(२) वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) मत्स्यविकास राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वर्षाचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

४. समिती सदस्यांनी, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अकरावा अहवाल सभागृहास सादर केला.

सहकार मंत्र्यांनी, " पीक विम्याच्या नुकसानीपोटी मिळालेली रक्कम शेतकऱ्यांकडून कर्जासाठी वसूल न करण्याची आवश्यकता " इ. बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

५. सर्वश्री धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेते), जगन्नाथ शिंदे व हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी, शुक्रवार दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी नियम ९३ अन्वये दिलेल्या नियम ९३ च्या सूचना मान्य केलेल्या असून त्या पटलावर ठेवण्यात येत आहेत असे माननीय सभापतींनी सांगितले.

शुक्रवार दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी प्राप्त झालेल्या नियम २८९ च्या सर्व सूचना मी दालनात नाकारण्यात आलेल्या असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ८ मिनिटांनी ते २ वाजून ३८ वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात मंत्रीमहोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३८ मिनिटांनी ते २ वाजून ४८ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

६. (१) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी, ' विश्वविजेत्या अंध क्रिकेट संघात सहभाग नोंदवलेल्या श्री. अनिस बेग या अंध खेळाडूस महाराष्ट्र शासनामार्फत गौरविण्याची व त्यास आर्थिक मदत देण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी, ' राज्यातील अपंग माध्यमिक " शाळांचा " कायम शब्द काढून अनुदान देण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी, ' राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांना या ऑप्टीकल फायबरद्वारे जोडून या शाळेत इंटरनेट पुरविणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी, ' पनवेल तालुक्यातील खानाचा बंगला (निताळ-वावंजे) येथील आदिवासी वाडी शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजिटल विद्युत पुरवठ्याच्या अभावी शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याने त्या ठिकाणी विद्युत पुरवठा सुरू करण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी, ' राज्यात झालेल्या विद्युत दरवाढीबाबत राज्यातील जनतेमध्ये पसरलेला असंतोष आणि शासनाने करावयाची कार्यवाही ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी, ' परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथील शेतकऱ्यांनी पाझर तलावासाठी सरकारकडे अनेक निवेदने दिली असूनही सदर बाबतीत कोणतीही दखल घेण्यात आलेली नसणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, ' घरेलू कामगारांसाठी पेन्शन योजना लागू करण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, ' राज्यात पॅथॉलॉजी सेंटरवर नियंत्रण करण्याकरिता कोणतीही ठोस यंत्रणा नसणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. भाई गिरकर, वि.प.स. यांनी, ' सांगली जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत सन २०१५-२०१६ मध्ये जिल्हा परिषद स्वीय निधीतून ५० टक्के अनुदानावर पॉवर ऑपरेटर, चाफकटर खरेदी करताना झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी जलद गतीने होण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी, ' अंगणवाडी सेविकांच्या मानधनात व्हावयाची वाढ तसेच त्यांना नियमितपणे न मिळणारे मानधन व अन्य राज्याप्रमाणे मानधन, सेवाज्येष्ठता आणि शैक्षणिक स्तर स्वीकारण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(११) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी, ' लोणार सरोवर महोत्सवाच्या निमित्ताने शहरात केलेली निकृष्ट दर्जाची बांधकामे व परिणामी सरोवरात जाणारे सांडपाणी ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१२) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, ' शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश मिळालेल्या आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी सदर शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील शेवटच्या टप्प्याचे अनुदान दिनांक ३१ मार्च पर्यंत वितरित करणे क्रमप्राप्त असूनदेखील सदर अनुदान न देण्यात येणे ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी, ' मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याकरिता योग्य मार्गाद्वारे शिफारस करून ती केंद्र शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स. यांनी, ' ठाणे महानगरपालिका हद्दीतील श्री नगर येथील ऐयप्पा डोंगर येथील कचरा हटवून तेथे सुशोभिकरण करण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. गिरीशचंद्र व्यास, वि.प.स. यांनी, ' राज्यातील क्रीडा प्रबोधिनीमधील कर्मचाऱ्यांना नियमित करण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

७. (१) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांनी, ' महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केल्यानुसार नवीन बांधलेल्या इमारतींच्या १० वर्षांपर्यंतच्या सुरक्षिततेची जबाबदारी आर्किटेक्टवर निश्चित करण्यात येणे ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

आर्कि. अनंत गाडगीळ यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(२) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांनी, ' राज्यात सर्व ग्रंथपालांना बी.एड. ची वेतनश्रेणी लागू करण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. सुधीर तांबे यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(३) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी, ' शासनाने राज्यातील भटक्या विमुक्त जमातींना क्रिमी लेअरमधून वगळण्यासंबंधी लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. हरिसिंग राठोड यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स. यांनी, ' प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा संनियंत्रण व दक्षता समितीमध्ये त्या-त्या जिल्ह्यातील विधानपरिषद सदस्यांचा समावेश करण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(५) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी, ' माळशिरस येथील तालुका व जिल्हा कोर्टासाठी नवीन इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देऊन बांधकाम करण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(६) प्रा. अनिल सोले, वि.प.स. यांनी, ' शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथील रक्तपेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञांची रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

प्रा. अनिल सोले, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(७) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी, ' यवतमाळ शहरात प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेले पाणीपुरवठा प्रकल्प कुचकामी ठरणे व शहरात पुरविण्यात येणाऱ्या मिनरल वॉटरच्या बाटल्यांची अन्न व औषधिद्रव्ये प्रशासनामार्फत तपासणी करण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(८) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी, ' महावितरण कंपनीने एका नवीन ॲपच्या माध्यमातून ग्राहकांना मोबाईलवरून वीज बिले पाठविण्याची उपलब्ध करून दिलेली सुविधा ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(९) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी, ' मुंबईच्या मेट्रो स्थानकात महाराष्ट्र सुरक्षा दलात काम करणाऱ्या महिलांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरूद्ध लैंगिक छळाची दिलेली तक्रार मागे घेण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जाणे ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(१०) श्री. रामनिवास सिंह, वि.प.स. यांनी, ' मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात डॉ. राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन उभारण्यासाठी स्थाननिश्चिती करण्यात येऊन व निधी प्रदान करण्यात येऊनदेखील त्याच्या बांधकामास सुरूवात न होणे ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. रामनिवास सिंह, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(११) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, ' रायगड जिल्ह्यातील मौजे नाते (ता.महाड) या माजी अर्थ मंत्री कै. सी. डी. देशमुख यांच्या जन्मगावातील त्यांच्या घराचे यथोचित स्मारक करण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(१२) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी, ' आमदार निवासांतील तयार केलेला १३० नियमित कर्मचाऱ्यांचा दिनांक १९ मार्च २०११ चा आकृतिबंध रद्द करून तेथे मानकांच्या आधारे कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात येण्याची आवश्यकता ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(१३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी, ' परांडा, जिल्हा उस्मानाबाद येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाला कायमस्वरूपी प्रकल्प अधिकारी नसून महत्त्वाची पदे रिक्त असणे ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

(१४) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी, ' वृत्तमानस ' या दैनिकाचे वरिष्ठ पत्रकार श्री. संजय गिरी यांच्या साकीनाका, मॉर्ली व्हिलेज येथील वडिलोपार्जित घरासमोरील मोकळ्या जागेत गुंडप्रवृत्तींच्या लोकांनी शेड बांधणे, त्यांना धमकी देऊन बेदम मारहाण करण्यात येणे व पोलिसांनी याबाबतीत त्यांची तक्रार नोंदवून न घेणे ' इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असून त्यांनी मांडावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेष उल्लेखाची सूचना मांडली व भाषण केले.

आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांनी, ' डीएनए या इंग्रजी वर्तमानपत्राचे ज्येष्ठ पत्रकार श्री. सुधीर सुर्यवंशी यांच्यावर नवी मुंबई येथे झालेला भयानक हल्ला, त्यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्याची निर्माण झालेली गरज ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी, या प्रकरणाची माहिती घेण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

८. (१) ॲड. रामहरी रुपनवर यांनी, सन २०१७ चे वि.प.वि. क्र. १ - महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा विधेयक, २०१७ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) श्री. नरेंद्र पाटील यांनी, सन २०१७ चे वि.प.वि. क्र. २ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) ॲड. रामहरी रुपनवर यांनी, सन २०१७ चे वि.प.वि. क्र. ३ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमीहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१७ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) ॲड. रामहरी रुपनवर यांनी, सन २०१७ चे वि.प.वि. क्र. ४ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१७ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(१) सन २०१६ चे वि.प.वि. क्र. ५ मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी उपरोक्त विधेयक मांडले व ते विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. नीलम गोऱ्हे
(२) श्री. गिरीशचंद्र व्यास
(३) ॲड. अनिल परब
(४) ॲड. रामहरी रुपनवर
(५) श्री. प्रकाश गजभिये
(६) श्री. सुनील तटकरे
(७) श्री. भाई जगताप
(८) श्री. हरिसिंग राठोड

संसदीय कार्य मंत्र्यांनी उपरोक्त विधेयकाबाबत आपले विचार मांडले.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले व सदर विधेयक मागे घेण्यात यावे अशी विनंती केली.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी सभागृहाच्या अनुमतीने उपरोक्त विधेयक मागे घेतले.

मुख्यमंत्र्यांनी, 'श्री. रामेश्वर भुसारे या शेतकऱ्याच्या संबंधात मंत्रालयात घडलेली घटना' इ. बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

शनिवार, दिनांक १ एप्रिल, २०१७

श्री. सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांनी, " शेतकरी हा केंद्रबिंदू मानून स्वबळावर उभे करण्यासाठी शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता " इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील भाषण पूर्ण केले.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) डॉ. नीलम गोऱ्हे (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते

(३) श्री. रामहरी रुपनवर (भाषण अपूर्ण).

(चर्चा अपूर्ण.)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय सभापती श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) महसूल मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा सभागृहासमोर ठेवला.

(२) गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (तक्रार निवारण समित्या) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक झोपसु. १००८/प्र.क्र.१४३(१)/झोपसु-१, दिनांकित २३ फेब्रुवारी २०१७ सभागृहासमोर ठेवली.

(३) आदिवासी विकास मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८अन्वये आदिवासी विकास विभागाचा सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील योजनेतर आणि सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

(४) उद्योग राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन २०१४-२०१५ या वर्षाचे सुधारित अंदाज पत्रक सभागृहासमोर ठेवले.

२. श्री. भाई जगताप, समिती सदस्य यांनी लोकलेखा समितीचा सतरावा व अठरावा अहवाल सभागृहास सादर केला.

श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी, " विधानपरिषद सभागृह बरखास्त करण्याबाबत करण्यात आलेले वक्तव्य " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी आपले मत मांडले.

उपरोक्त माहितीच्या मुद्यासंदर्भात संसदीय कार्य मंत्र्यांनी खुलासा केला.

विधानसभा व विधानपरिषद ही दोन्ही सभागृहे लोकशाहीला महत्त्वाची असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

(१) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " अर्थसंकल्पातील वित्तीय निधी वाटप " इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " पत्रकार संरक्षण कायदा त्वरित आणण्याची आवश्यकता तसेच दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी म्हात्रे यांची हत्या होऊन देखील मारेकऱ्यांना अद्याप अटक न होणे ", इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. शरद रणपिसे, विरोधी पक्ष नेते यांनी, " गुरुवार, दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी झी-२४ तास वाहिनीवर झालेल्या ' रोखठोक ' कार्यक्रमासंबंधी डॉक्टरांच्या संस्थांचे सचिव श्री. पार्थिव संघवी यांनी केलेले आक्षेपार्ह वक्तव्य " इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी सांगितले.

(४) श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी, " डॉ. उदय निरगुडकर आणि डी.एन.ए. इंग्रजी दैनिकाच्या पत्रकारांवरील गंभीर हल्ला " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

उपरोक्त औचित्याच्या मुद्यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी आपले मत मांडले.

ट्रोलिंग व स्टॉकिंग हे आयटीच्या कोणत्या सेक्शनमध्ये बसते हे माननीय सभागृहनेत्यांनी चौकशी करून सभागृहाला अवगत करावे असे माननीय सभापतींनी सांगितले.

(५) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, " मुंबई उपनगरातील ठाकूर व्हीलेज, कांदिवली (पूर्व) या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेतर्फे आरक्षित भूखंडावर स्मशानभूमी आणि फायर ब्रिगेड विकसित करणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री.जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " रायगड जिल्ह्यातील पनवेल शहरात कल्पतरु सोसायटीचे अध्यक्ष व इंग्रजी वर्तमानपत्राचे पत्रकार श्री. सुधीर सूर्यवंशी व संतोष फराडे यांच्यावर झालेला हल्ला " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी, " सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुल सचिव श्री. एस. टी. काळे व सहायक कुल सचिव श्री. अ. भा. जाधव यांनी महिलांशी अत्यंत अश्लील भाषेत टीकाटिपण्णी करणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

या संदर्भात बैठक घेण्यात यावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

(८) श्री.रामनिवास सिंह, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र शासनाने रिक्षा व टॅक्सी परवान्यासाठी मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक करणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी, " सामान्य प्रशासन विभागाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विनाविलंब शासकीय निवासस्थान वितरित करण्याची आवश्यकता " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

या संदर्भात शासनाने कार्यवाही करावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१०) श्री. रामराव वडकुते, वि.प.स. यांनी, " राज्यातील पदवीधर व अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतसामावून घेण्याची आवश्यकता " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(११) श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी, " कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये भ्रष्टाचार होत असणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

यासंदर्भात शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१२) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी, " राज्यात रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी, " कामठी नगरपरिषद, नागपूर येथे शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती गौरवोत्थान योजनेतून पिण्याच्या पाण्याची टाकी व पाईपलाईन करिता मंजूर झालेला निधी अद्याप न मिळणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी, " डोणगाव जि.बुलढाणा येथील ग्रामपंचायत हद्दीमध्ये सरकारी जमिनीवर स्थानिक आठवडे बाजारात झालेले बेकायदेशीर अतिक्रमण " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स. यांनी, " भोगवटदार २ सरकारी पट्टेदार या स्वरुपाच्या शासकीय जमिनी रुपांतरअधिमूल्य आकारुन भोगवटा १ मध्ये रुपांतरित करणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. यांनी, " पनवेल महानगरपालिकेत दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून समाविष्ट करण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांविषयी अनिश्चितता असणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१७) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, " कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी यंदा बदलत्या हवामानामुळे मोठ्या संकटात सापडला असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

तातडीने सर्व्हे करण्यात यावा असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१८) श्री. रवींद्र फाटक, वि.प.स. यांनी, " ठाणे शहरातील प्रभाग क्रमांक १९ मधील आरटीओ कार्यालयाच्या आजूबाजूस कारवाई करून जप्त केलेल्या गाड्या ठेवल्यामुळे होत असलेली गैरसोय " इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१९) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " मनोरा आमदार निवासातील कक्षबंधांना नळाने पाणीपुरवठा होत नसणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, रामराव वडकुते, शरद रणपिसे, नारायण राणे, भाई जगताप, संजय दत्त, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी, " मराठा धनगर समाजाला आरक्षण देणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचना नाकारीत असून सन्माननीय सदस्यांना यासंबंधी २-२ मिनिटे बोलण्याची अनुमती देत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.रामराव वडकुते, ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. व श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते यांनी आपापले म्हणणे मांडले.

विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३२ मिनिटांनी स्थगित केली.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे तालिका सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १६ मिनिटांनी, १० मिनिटांकरिता स्थगित केली.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २६ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

माननीय उपसभापतींनी, शनिवार, दिनांक १ एप्रिल २०१७ रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री रामराव वडकुते, बाळाराम पाटील, जयंत प्र. पाटील, सर्वश्री धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, जगन्नाथ शिंदे, कपिल पाटील व जयवंतराव जाधव यांच्या नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचना व त्यावरील माननीय सभापतींचे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवले.

श्री. रामराव वडकुते, वि.प.स. यांनी, " धनगर समाजाला आरक्षण देणे " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

याप्रकरणी शासनाने निवेदन केले असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

३. (१) (बुधवार, दिनांक २९ मार्च २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना)—

श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

" नागपूरात १५ वर्षांपूर्वी मिहान प्रकल्प सुरू करण्यात आला याचे मार्केटिंग देश विदेशात करण्यात येणे, या प्रकल्पामुळे राज्यातील बेरोजगारीचा मोठा प्रश्न सुटणार असल्याने सर्वांचे लक्ष याकडे लागलेले असणे, मिहानमध्ये इन्फोसिस, टी.सी.एस., सत्यम, बोईंग, हाल, शापुरजी-पालोनजी, विप्रो, डी.एल.एफ., अंबुजा, रियल्टी, ताजसेट इंडस्ट्रीज, मॅक्सस्पेस अशा कंपन्यांनी आपल्या गरजेनुसार जमिनी घेतल्या पण १० वर्षांपर्यंत त्यांनी जमिनीचा कोणताही उपयोग न करणे, फक्त १५ कंपन्यांनी काम सुरू करणे, इंटरनॅशनल कालबरेटीव्ह एअरोस्पेस डेव्हलपमेंटच्या माध्यमातून नॅनोसॅटेलाईट निर्मिती मिहानमध्ये सुरू करण्यास उत्सूक असणे, त्यासाठी कंपनीने एम.आय.डी.सी. सोबत सामंजस्य करार करणे, ५० एकर जागेवर ३०० कोटी रूपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प बारगळला जाणे, करारानंतर कंपनी व अधिकाऱ्यांशी कुठलाही ताळमेळ न झाल्याने जवळपास ५०० चा रोजगार पूर्णपणे बारगळणे, सनटेक रिॲलिटी कंपनीने मिहानमध्ये १०८ एकरसाठी एम.आय.डी.सी. सोबत करार करणे, १५०० कोटी रूपयांच्या गुंतवणुकीची कंपनीची योजना असणे. परंतु १०८ एकर जागा घेण्यासाठी हप्त्याची सोय, एम.आय.डी.सी. नियमामध्ये टप्याटप्याने जागा देण्याची कुठलीही तरतुद नसल्यानेही गुंतवणूक जवळपास बारगळली असणे, यामुळे देखील २००० लोकांना रोजगार न मिळणे, मिहानमध्ये अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, चीन, इंडोनेशिया, बेलारुस, डेन्मार्कच्या प्रतिनिधींनी व शिष्टमंडळांनी भेटी देणे, परंतु मिहानमध्ये गुंतवणुकीसंदर्भात कोणीही सकारात्मक भूमिका स्पष्ट केली नसल्यामुळे स्थानिक बेरोजगारांमध्ये शासनाच्या प्रती निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(शुक्रवार, दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना)—(अनुक्रमांक २ व ३)

(२) सर्वश्री आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना—

ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

" तांबवे (ता.कराड, जि.सातारा) येथे दिनांक २० फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी २-३० च्या सुमारास गावाच्या बाहेर साधारण १ कि.मी. च्या अंतरावर पवारमळा स्मशानभूमीच्या जवळ कराडकडे परत येत असताना स्थानिक विधानपरिषद सदस्य यांना तांबवे जिल्हा परिषद गटातील उमेदवार श्री. प्रदिप जालिंदर पाटील व त्यांच्या सोबत असणाऱ्या २५ ते ३० लोकांच्या जमावाने पूर्वनियोजित कटाने दुचाकीवरुन पाठलाग करून रस्त्यामध्ये गाडी अडवून सोबत असणाऱ्या अंगरक्षकाला धक्काबुक्की करणे, अर्वाच भाषेत शिवीगाळ करणे, सदरचा प्रकार पूर्वनियोजित कटानूसार व्हॉटस्ॲपद्वारे व हाताशी धरलेल्या न्युज चॅनेलद्वारे तत्काळ संपूर्ण महाराष्ट्रात प्रसारित करण्यात येणे, त्यामुळे स्थानिक विधानपरिषद सदस्यांची बदनामी करण्यात येणे, पूर्वनियोजित कट असल्याने विरोधी उमेदवारांने सहानभुतीचे वातावरण निर्माण करून निवडणुकीमध्ये यश मिळविणे, अशा प्रकारचा गंभीर गुन्हा त्या दिवशी कराड तालुका पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर ७८/२०१७ नुसार दाखल झालेला असणे, या गंभीर प्रकरणाची स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीच तत्काळ कार्यवाही न होणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून संबंधीत प्रकरणी दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

महसूल मंत्र्यांनी, " सन २०१७-२०१८ चे वार्षिक मूल्य दर तक्ते निर्गमित करणे " इ.बाबत नियम ४६ अन्वये सभागृहाच्या अनुमतीने निवेदन केले.

(३) ॲड. अनिल परब, वि.प.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले—

" वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीची झालेली दयनीय अवस्था, माहे २०१६ मध्ये दोन वेळा छताचे प्लास्टर कोसळण्याच्या घडलेल्या घटना, तसेच इमारत क्रमांक एक मधील धोकादायक घराची दुरुस्ती सुरू असतांना स्वयंपाक घरातील छत कोसळले, शासकीय वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून त्यांचे सरासरी आर्युमान ४५ ते ५० वर्षाचे असणे, या शासकीय वसाहतीमधील ३७० पैकी ३६ इमारतीचे पुनर्बांधणीचे काम सन २०१४-२०१५ या अर्थसंकल्पात समाविष्ट असून त्याची अंदाजित

किंमत रु १००.८४ कोटी इतकी असून तसेच उर्वरित ३३४ इमारतींची अंतर्गत व बाहय संरचनात्मक व नूतनीकरणाच्या दृष्टीने कामे हाती घेण्यात येणार असून त्याकरिता सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रु. ३४.०४ कोटीची कामे करण्यात आल्याचे माहे जून,२०१४ मध्ये विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना मा. सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोदयानी दिलेल्या लेखी उत्तरावरुन स्पष्ट होणे, परंतु प्रत्यक्षात २५ इमारतींची कामे सुरू असून अत्यंत धिम्म्यागतीने होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येणे, तर काही इमारतीची कामे अर्धवट अवस्थेत असणे, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी प्रत्यक्षात सदर वसाहतीची पाहणी करूनही अद्यापि कोणतीच ठोस कार्यवाही झालेली दिसत नसणे, ठेकेदारांना वेळेत देयके मिळत नसल्याने इमारतीच्या उर्वरित कामांकरिता साहित्य आणण्यास होत असलेला विलंब, वसाहतीची दयनीय अवस्था असतानाही इमारतीच्या दुरुस्तीकडे सबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होणे, वसाहतीतील इमारतीचे टप्प्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत असणे, दरवर्षी हीच प्रक्रिया शासनाकडून करण्यात येत असणे, त्यामुळे या इमारती अतिशय जीर्ण अवस्थेत झालेल्या असल्यामुळे त्या पाडून पुर्नबांधणीचे काम हाती घेण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

" झपाट्याने विकसित होणाऱ्या आणि वीस लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये मेट्रो सुरू करण्याचे केंद्र शासनाच्या विचाराधीन असून नाशिकसाठी मेट्रो सुरू करण्याची मागणी प्रलंबित असणे, देशातील महत्वाच्या स्मार्ट सिटीमध्ये नाशिकचा समावेश झालेला असल्यामुळे नाशिकमध्ये मेट्रोचे सर्वेक्षण होणे आवश्यक असणे, नाशिक शहर आणि प्रस्तावित नाशिक महानगर प्राधिकरणाची २६ लाख ८३ हजार लोकसंख्या आणि २५९ चौ.कि.मी. विस्तार असणे, नाशिकमध्ये आता सर्वेक्षण सुरू केले तर ८ ते १० वर्षांनी मेट्रो साकारली जाऊ शकणार असणे, शहराचा झपाट्याने होणारा विकास तसेच आगामी काही वर्षातील वाढणारी लोकसंख्या याचा विचार केला तर दळणवळणाची साधने अपुरी पडणार असणे, त्यामुळे नाशिक मेट्रोसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री विक्रम काळे, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, वि.प.स.यांची लक्षवेधी सूचना–

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या व दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर कायम वेतनश्रेणीत आलेल्या शिक्षक सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, परंतु दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु त्या शाळांना अनुदान नसणे, टप्पा अनुदान असणे व १ नोव्हेंबर, २००५ नंतर त्या शाळा १०० टक्के अनुदानावर येणे, म्हणून त्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना जुन्याऐवजी नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा अन्यायकारक निर्णय घेणे, या विरोधात शिक्षक कर्मचाऱ्यांनी न्यायालयात दाद मागणे, मा.उच्च न्यायालयाने अनेक शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत निर्णय देणे, परंतु तरीही शासनाने अद्यापपर्यंत जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अद्याप कोणताच निर्णय न घेणे, त्यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

वित्त व नियोजन राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

" केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकताच व्यावसायिक सरोगसीवर बंदी आणणारा कायद्याचा मसुदा मंजूर करण्यात येणे, सदरहू कायद्यामुळे सरोगसीचा बाजार काही अंशी कमी होईल, परंतु या सरोगसीमध्ये व्यवहारिक बाबींसोबत काही नैतिकतेचे बंधन असणेही आवश्यक असणे, राज्यातही सरोगसीसाठी गर्भाशय भाड्याने देणाऱ्या महिला या विशेषतः मुंबईतील मानखुर्द, मालवणी, धारावी, नवी मुंबई, पनवेल येथील कानाकोपऱ्यात असणे, नऊ महिन्यासाठी हा भाडोत्री गर्भ वाढवला की त्यातून दोन ते तीन लाख रुपयांचा मोबदला मिळतो परंतु या प्रक्रियेमध्ये बीजाचे फलनीकरण करताना जुळं किंवा तिळं झालं तरी पैसे एका बाळाचेच मिळणे, मात्र गर्भ रुजवण्यापूर्वी तीन ते चार महिने वैद्यकीय उपचार सुरू होऊन त्या उपचारादरम्यान या महिलेला पौष्टिक आहाराची गरज असणे, परंतु आधीच आर्थिक चणचण असलेल्या स्वतःची तीन चार बाळंतपण झालेल्या या महिलांना पौष्टीक आहार मिळत नसणे,

अशा महिलांचा दलालही टक्केवारी वाढवून तिला मिळालेल्या पैशातही हिस्सा घेणे, मग त्या तुटपुंज्या मोबदल्यातून या प्रक्रियेतून जाणाऱ्या महिलांना होणारे साईड इफेक्ट तसेच विविध शारिरिक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागणे, याकरिता शासनाने अशा सरोगसी महिलांची पुढील शारीरिक व मानसिक काळजी घेण्याकरिता टास्क फोर्स नेमण्याची आवश्यकता, शासनाने योग्य ते बदल करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४. (१) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी, " राज्यातील भटक्या विमुक्त व बारा बलुतेदारांना क्रिमिलेअरमधून वगळणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी, " शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त इतर कामे न देणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(३) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, " मार्वे रोड, मालाड, मुंबई उपनगर येथील मुंबई मिशिया मल्याळम ल्युथेरन चर्च (मल्याळम) यांच्या मालकीच्या भूखंडावर जबरदस्तीने स्थानिक गुंडांनी अतिक्रमण करणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(४) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी, " राज्य सरकारने राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना केली असणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(५) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " ग्रामपंचायतीमधील इमारत व फ्लॅट बांधकामाची जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे जमा झालेली व पुढे होणारी विकसित फी (डेव्हलपमेंट चार्जेस) संबंधित ग्रामपंचायतींना वर्ग करणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(६) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी, " देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाने १ एप्रिल पासून खात्यात किमान रक्कम नसल्यास २० ते १०० रुपये या दरम्यान दंड लावण्याचा निर्णय घेणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

उपरोक्त सूचनेतील विषय हा केंद्र शासनाशी संबंधित असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(७) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, " राजापूर तालुक्यातील नाटे आंबोळगडच्या सीमेवर प्रस्तावित असलेल्या आयलॉग या खाजगी कंपनीच्या कॅण्टीन जेटीच्या प्रकल्पाला स्थानिक मच्छीमारांचा व ग्रामस्थांचा कडवा विरोध असणे " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

५. (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५३.– डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते (२) श्री. प्रकाश गजभिये

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(१२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५ – सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :—

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी खालील प्रस्ताव मांडला—

सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५— उच्च शिक्षण, कौशल्य विकास, व्यावसायिक शिक्षण यांचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यामध्ये सिम्बॉयोसिस, कौशल्याचे व मुक्त विद्यापीठ याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक, खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री (२) श्री. धनंजय मुंडे, मा. विरोधी पक्षनेते

(३) श्री. नारायण राणे, वि.प.स. (४) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. (६) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री. कपिल पाटील, वि.प.स. (१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा होईल असे तालिका सभापतींनी सांगितले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी चर्चेत भाग घेतला–

विधेयकावरील चर्चेस उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) नगरविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २३— महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) ॲड. राहुल नार्वेकर (२) डॉ. नीलम गोऱ्हे

(३) श्री. शरद रणपिसे (४) श्री. प्रकाश गजभिये

विधेयकावरील चर्चेस संसदीय कार्य व नगरविकास राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) ग्रामविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) श्री. शरद रणपिसे (२) डॉ. नीलम गोऱ्हे

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, निलंबित केलेल्या १९ विधानसभा सदस्यांपैकी सर्वश्री संग्राम थोपटे, नरहरी झिरवळ, दीपक चव्हाण, दतात्रय भरणे, अब्दूल सत्तार, अवधूत तटकरे, अमित झनक, वैभव पिचड आणि डी. पी. सावंत या ९ सदस्यांचे निलंबन मागे घेण्यात येत असल्याचे सांगितले.

बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७

" महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या व त्यांना द्यावयाची कर्जमाफी " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे श्री. सुनील तटकरे, श्री. शरद रणपिसे व श्री. नारायण राणे, वि.प.स. यांनी सांगितले व त्यासंदर्भात त्यांनी आपापले म्हणणे मांडले.

उपरोक्त प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने खालील सन्माननीय सदस्यांनी आपापले म्हणणे मांडले—

(१) श्री. भाई जगताप (२) श्री. आनंदराव पाटील

(३) प्रा. जोगेंद्र कवाडे (४) डॉ. नीलम गोऱ्हे

(५) श्री. कपिल पाटील (६) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते

महसूल मंत्र्यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

आजच्या कामकाजपत्रिकेवर म.वि.प. नियम २६० अन्वये उक्त विषयावर प्रस्ताव दाखविण्यात आला असून त्यावर सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे असे सांगून माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ४४ मिनिटांनी १५ मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

१. विधानसभेने संमत केल्याप्रमाणे-विधेयक विचारात घेणे—

वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १८-महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

२. (१) संसदीय कार्य मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षातील योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवला.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय उपसभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ०१ मिनिटांनी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे-(पुढे सुरू)-

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणे " इ.बाबत मुद्दा पुन्हा उपस्थित केला व याबाबत आपले म्हणणे मांडले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

गोंधळाच्या परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे माननीय उपसभापतींनी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित केली.

गुरुवार, दिनांक ६ एप्रिल २०१७

(१) सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना :—

श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या घरांबाबत धोरण ठरवून सुमारे २८ हजार कामगारांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत आदेश निर्गमित केले असणे, मात्र वरळी येथील सर्व्हे क्र.१७/४७ वरील १२,१३०.०७ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील सफाई कामगारांच्या ५ बैठ्या चाळी नियमित करण्याच्या दृष्टीने तेथील कामगारांची नियोजित गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याकरिता महानगरपालिकेच्या सुधार समितीने माहे नोव्हेंबर २००९ मध्ये मान्यता दिल्यानंतरही तेथून मेट्रो ट्रेन प्रकल्प होणार असल्याने तेथील ६१ भाडेकरुंच्या पुनर्वसनाची योजना तयार करण्यात आली असणे, परंतु त्याच ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या ११८ सफाई कामगारांना दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत घरे रिकामी करण्याकरिता महापालिकेकडून नोटीस देण्यात आली असणे, सदर सफाई कामगार महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडून बांधण्यात आलेल्या चाळींमध्ये राहत असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात न येणे, त्याचप्रमाणे त्यांना पुनर्वसनाच्या योजनेमध्येही समाविष्ट न करणे, परिणामी या चाळींमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या महापालिकेच्या सफाई कामगारांना रस्त्यावर येण्याची आलेली पाळी, यामुळे तेथील कामगारांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तेथील अन्य इमारती प्रमाणे १३ चाळीतील सफाई कामगार भाडेकरुंना न्याय देण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्याची व मेट्रो ट्रेनच्या प्रकल्पामुळे त्यांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करण्याची योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील १. मौजे विरार सर्व्हे क्र. ६२ हिस्सा क्र. १० मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, २. मौजे विरार सर्व्हे क्र. ६१, हिस्सा क्र. १०,११, सर्व्हे क्र. ६२ हिस्सा क्र.३, सर्व्हे क्र. ६३, हिस्सा क्र. १३, १४ मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, ३. मौजे निळेमोरे सर्व्हे क्र. ३४,

हिस्सा क्र. ३ भाग व ४ भाग, भागीदार प्रदिप रामचंद्र गुप्ता या तिनही ठिकाणी नगरविकास विभागाने मान्य केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, तसेच उपरोक्त तिनही प्रकरणात विकासकांनी शासकीय बनावट कागदपत्र तयार करून सामान्य जनतेची फसवणूक केलेली असणे, याबाबत पोलीस खात्यामध्ये वारंवार तक्रार करून देखील विकासकावर भा.दं.वि.स. कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, उपरोक्त प्रकरणी गृह विभागाने प्रकरणांची शहानिशा करून याबाबत नियमांची व कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. प्रवीण दरेकर,वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले :-

" मुंबई उपनगरातील मागाठाणे गाव बोरीवली पूर्व येथे दिनांक २० जून २००४ रोजी देवीपाड्यात सि.टी. सर्व्हे क्र. २०९ ते २१३ येथील जमिनीवर एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी देवीपाडा वेल्फेअर असोसिएशनच्या पहिल्या सभेत मे. निओ मॉर्डन आर्किटेक्ट व विकासक एमआर कन्स्ट्रक्शन यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर जमीन ही पश्चिम द्रुतगती महामार्ग याला लागून असल्याकारणाने व या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी नियमानुसार मार्च, २००१ नंतरच्या कायद्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांचे नाहरकत प्रमाणपत्र न घेता सन २००१ पूर्वीचा नियम सादर करून सदर एसआरए प्रकल्पाला कोणत्याही कागदपत्रांची पूर्ततेअभावी केवळ तीन दिवसात परवानगी देण्यात येणे, खोटेसर्वेक्षण करून स्वत:च्या (विकासकाच्या) फायद्यासाठी परिशिष्ट-२ मध्ये बनावट आणि नकली झोपडपट्टी धारकांची नावे सामील करणे, सदर घोटाळा माहितीच्या अधिकारात उघड होणे, सदर एसआरए प्रकल्पाची स्थापना २००४ मध्ये झाली असताना आपल्या बाजूने असलेल्या कमिटीला सोबत घेऊन दिनांक ९ जानेवारी २००१ रोजी खोट्या कागदपत्राच्या आधारे पश्चिम द्रुतगती महामार्गाकडून पुनर्विकास प्रकल्पात प्रवेश करण्यासाठी परवानगी मिळविणे, सदर विकासकाने आपल्या कुटुंबातील व्यक्ती, नातलग व कामगार यांची नावे समाविष्ट करून बोगस झोपडपट्टीधारकांना एसआरए योजनेचा लाभ देण्यात येणे, म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांच्या संगमनमताने बेकायदेशीररित्या जागेवर कब्जा करून त्यावर बांधकाम करण्यात येणे, सदर प्रकल्पात असलेली मंदिरे ५०० चौ.फुट ऐवजी २०० फुटांची मंदिरे बनवून देण्यात येणे, सदर विकासकाने एसआरए प्रकल्पाच्या नजिकची जवळजवळ २० हजार चौ. फुट जागा अनधिकृतपणे ताब्यात घेऊन त्यावर खाजगी बांधकाम करण्यात येणे, सन २००८ साली संपूर्ण

सोयी-सुविधेअभावी इमारतीचा ताबा देण्यात येणे, याबाबत स्थानिक पात्र झोपडपट्टीधारकांनी तक्रारी करूनही शासनाकडून अद्याप विकासकावर कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यामुळे शासनाविरुद्ध असंतोषाचे वातावरण पसरणे, सदर एसआरए धारकांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. "

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री हेमंत टकले, किरण पावसकर, धनंजय मुंडे, ॲड. जयदेव गायकवाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री नरेंद्र पाटील, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, जयवंतराव जाधव, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. राहुल नार्वेकर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना :–

श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :-

" अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या साडेतीन वर्षापूर्वी तर कॉम्रेड गोविंद पानसरे यांची हत्या दोन वर्षापूर्वी करणारी सनातन संघटना आणि या दोघांच्या खुनाचे आरोपी असणारे एकच असणे, परंतु आजपर्यंत खुनाच्या कटासाठी वापरण्यात आलेली मोटर सायकल आणि पिस्तुल तपास यंत्रणेला न सापडणे, सी.बी.आय. ने आरोपींनी पिस्तुलातून झाडलेल्या गोळ्या/पुंगळया स्कॉटलँड यार्डच्या न्यायवैद्यक शाळेत पाठवून दहा महिन्यानंतरही त्यांनी अहवाल न देणे, कर्नाटकातील विचारवंत डॉ. एम. एम. कुलबुर्गी यांच्यासह दाभोलकर, पानसरे यांच्या हत्येचा कट एकाच उद्देशाने करण्यात येणे, तरी सुद्धा तीनही हत्यांचा तपास तीन वेगवेगळ्या तपास यंत्रणांनी करणे, एक आरोपी समीर गायकवाड याच्यावर आरोप निश्चिती होणे, तर डॉ. विरेंद्रसिंह तावडे या आरोपीवर अद्याप आरोप निश्चित न होणे, फरार आरोपी आकोलकर आणि पवार यांचा तपास यंत्रणांना सुगावा न लागणे, यामुळे जनतेमध्ये वाढत असलेला असंतोष आणि चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया "

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(चर्चा अपूर्ण)

(५) सर्वश्री धनंजय मुंडे, प्रविण दरेकर, सुनील तटकरे, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना :–

श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

" रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील विळे भागाड एमआयडीसीत मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील लि. कंपनी कार्यान्वित असणे, या एमआयडीसीसाठी माणगांव तालुक्यातील तासगांव, भागाड, येलावडे, विळे, सणसवाडी आदी भागातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यल्प मोबदल्यात संपादित केलेल्या असणे, जमिनी संपादित करतांना स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्यामध्ये तसेच रोजगारामध्ये प्राधान्य देण्याचे बंधन असणे, त्याचबरोबर या कंपन्यांमार्फत शाळा, कॉलेज, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अंतर्गत रस्ते व ग्रामपंचायतीच्या सक्षमीकरणाच्या सोई पुरविणे बंधनकारक असणे, मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील कंपनी कार्यान्वित झाल्यानंतर सदर कंपनीने स्थानिक नागरिकांना रोजगारापासून हेतुपुरस्सर डावलेले असणे, वेगवेगळया प्रकारचे कंत्राट जाणीवपूर्वक जिल्हाबाहेरील कंत्राटदारांना देण्यात येणे, कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील कामगारांची मोठ्या प्रमाणात भरती केलेली असणे, माणगांव तालुक्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ असतांना या विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची रोजगाराची संधी उपलब्ध केलेली नसणे, कंपनी ॲक्टनुसार सामाजिक दायित्वाची २ टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करणे बंधनकारक असतांना या फंडाचा गैरवापर करणे, आरोग्याच्या दृष्टीने सोईसुविधा देणे बंधनकारक असताना या कंपनीने काळ नदीमध्ये सीड मिश्रित पाणी सोडल्याने प्रदूषण होत असणे, त्यामुळे या भागातील सुमारे १५ हजार लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, या कंपनीच्या सीड मिश्रित बाहेर सोडलेल्या पाण्यामुळे या भागातील अनेक बोअरवेल व नद्यांचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिलेला असणे, या सर्व गोष्टीमुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे कंपनीने केलेले हेतुपुरस्सर दुर्लक्ष, जिल्ह्याबाहेरील कामगारांची केलेली नोकर भरती, या सर्व पार्श्वभूमीवर कंपनीविरुद्ध कडक कारवाई करण्याची स्थानिकांमधून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

उद्योग राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना

श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" शासनाने कंपनी करीता कंपनी कायद्यांतर्गत संपादित केलेला मौजे कोलशेत जि. ठाणे येथील स. न ९९(२) हा भूखंड औद्यौगिक प्रयोजनार्थ मे. ओरीएंटल इंडस्ट्रीज ने विकत घेणे, सदर भूखंडाचा औद्यौगिक प्रयोजनार्थ वापर न करता तो विकासकास विक्रीचा प्रयत्न करणे, सदर प्रयत्नास यश न आल्याने त्याचे हक्क विकासकास देणे, सदर अधिकाराच्या आधारे मे. मॅन इन्फ्रा यांनी मौजे कोलशेत येथील ११४(४) व ११५(२) या क्षेत्रा समवेत स.न ९९(२) सह एकत्रित विकास परवानगी संदर्भात अर्ज करणे, स.न ११४(४) व ११५(२) मध्ये आदिवासी कुळ असतांना व स. न. ९९(२) ही जमिनीच्या ७/१२ वर भोगवटदार वर्ग २ चा उल्लेख असतांना महानगरपालिका, ठाणे यांनी तिन्ही सर्व्हे नं. च्या एकत्रित आराखड्यात विकास परवानगी देणे, यातील आरक्षित क्षेत्रात विकास हक्क देणे, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा,१९६६ चे कलम ४२ अ व भूसंपादन अधिनियम व भूसंपादन (कंपन्या बाबतचे) नियम,१९६३ मधील तरतुदीचे उल्लंघन करणे, सदर विकास परवानगीचे आधारे विकासकाने सदर प्रकल्पाचे काम सुरू करणे, सदर प्रकल्पाची जाहिरात सुरू करणे, प्रदर्शनास स्टॉल लावून सदनिका विक्री करून या मालमत्तेत त्रयस्थ हितसंबंध? निर्माण करणे, पर्यायाने सर्वसामान्य गुंतवणुकदाराची गुंतवणूक व शासनाच्या हितसंबंधांना बाधा आणणे, या सर्व बाबी प्रधान सचिव (महसूल) तसेच प्रधान सचिव (वने, भूसंपादन), मंत्री, महसूल यांना दिनांक २५ जानेवारी २०१७ चे पत्रान्वये निदर्शनास आणणे, त्याची दखल न घेतल्याने दिनांक १७ फेब्रुवारी,२०१७, दिनांक २२ फेब्रुवारी २०१७ रोजी यासंदर्भात पुन्हा पत्र देऊन देखील त्याची दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. "

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री जगन्नाथ शिंदे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना :—

श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" थॅलेसेमिया रोगाचा सामना करणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये बालरुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असणे, ठराविक कालावधीत ब्लड ट्रान्समिशन, चाचण्या अशी उपचार पद्धती असणाऱ्या या रुग्णांच्या औषधांच्या कोर्समध्ये खंड पडल्यास या रुग्णांच्या यकृताला सूज

येण्याची भीती असल्याने त्यांना डेफ्रिजेट आणि डेसिरॉक्स ही औषधे नियमित देणे गरजेचे असणे, मात्र ही औषधे सर्वसामान्य दुकानात न मिळता फक्त सरकारी रुग्णालयातच मिळत असणे, दोन महिन्यांपूर्वी ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील औषधांचा साठा संपल्याने रुग्णांच्या पालकांना अन्य सेंटर्सचा आधार घ्यावा लागत असताना आरोग्य भवनातून त्यावेळी हा साठा स्थानिक रुग्णालयांना अल्प प्रमाणात पोहोचविण्यात आलेला असल्याने तो लगेच संपून गेल्याने आता पुन्हा मागील एक महिन्यापासून या औषधांचा साठा संपुष्टात आलेला असणे,आरोग्य विभागाकडे वारंवार चौकशी केली असता टेंडर न निघाल्याने साठा पोहोचविण्यात आला नसल्याचे कारणे देण्यात आलेले असणे, यामुळे याप्रकरणातील आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कारभाराचा भोंगळपणा यातून स्पष्ट होत असून, साधारणपणे ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्याची पूर्व तजवीज करून ठेवणे गरजेचे असणे किंवा त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत अत्यावश्यक औषधे मिळण्यात खंड पडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असताना याबाबीकडे संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ६०० रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मागील दोन ते तीन महिन्यांपासून अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागणे, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना रोजचा औषधाचा डोस न मिळाल्यास त्यांना होणारा त्रास व त्याचा त्यांच्या शरीरावर होणारा परिणाम याची जाणीव असतानाही त्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात अपयशी ठरलेल्या ठाणे सिव्हील रुग्णालय व आरोग्य विभागातील संबंधित दोषींची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबरोबरच थॅलेसेमिया रुग्णांना लागणारा औषधसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देऊन रुग्णांना आवश्यक त्यावेळी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

" जेट एअरवेज एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट सोसायटीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरकारभार सुरू असून संचालक मंडळाच्या संगनमताने संशयास्पद निर्णय घेतले जात असल्याची मार्च, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात गंभीर माहिती उघडकीस आलेली असणे, सदर को-ऑप. सोसायटी राज्य शासनाच्या उप निबंधक कार्यालय, के पूर्व विभाग यांच्या अधिपत्याखाली येत असणे, सोसायटीचे कार्यकारी मंडळ हे उप विधीतील तरतुदी व कायद्यातील तरतुदीनुसार कामकाज करीत असणे, सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ३२ मधील तरतुदीनुसार मागितलेली माहिती उपलब्ध

करून दिली जात नसणे, मागील चार वर्षांच्या लेखापरिक्षण अहवाल देण्यास टाळाटाळ केली जात असणे, कार्यकारी मंडळातील सदस्यांनी कायद्यातील तरतुदीचे तसेच उप विधीचे उल्लंघन करून कर्जे घेतलेली असणे, संस्थेच्या कायद्यामध्ये नियम, करार याबाबत पारदर्शकता नसल्याने संस्थेच्या प्रशासकीय खर्चात वाढ झालेली असणे, लेखापरिक्षकाच्या संगनमताने आर्थिक फुगवटा दाखविला जात असणे, संस्थेने वाटप केलेल्या ग्राहक कर्ज वाटपामध्ये आर्थिक गैरव्यवहार केलेला असून प्रत्यक्ष वस्तुंच्या बाजारभाव तसेच घाऊक बाजारभाव यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असणे, खरेदी-विक्री व्यवहारामध्ये संगनमताने भ्रष्टाचार झालेला असणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले संरक्षण, सदर संशयास्पद प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सभासदांनी, मा. मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री, मा. सहकार राज्यमंत्री तसेच जिल्हा उप निबंधक, बांद्रा, मुंबई यांचेकडे दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सोसायटीच्या सभासदांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदर संशयास्पद प्रकरणी सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

" मौजे दहिसर, ता. बोरीवली येथील सर्व्हे नं. २०९ हा सुमारे १४ एकर भुखंड महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने खाजगी व्यक्तीमार्फत हडपण्याची धक्कादायक बाब माहे मार्च, २०१७ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर भूखंडावर हाजी अली महंमद यांचे नाव खोत म्हणून सातबारा पदरी असणे, तसेच त्यापैकी १२ एकर शेतजमीन श्री. जगदेव बचई अहिर यांच्या कब्जे वहिवाटीस असून त्यावर चाळ व इतर बांधकाम असताना देखील हायकोर्ट सुट क्र. ३४१५/१९४७ अन्वये नेमलेल्या कोर्ट रिसिव्हर मार्फत सन २००७ मध्ये लिलावाद्वारे श्रीमती सुनिता खिमल यांनी परस्पर स्वतःच्या मालकी हक्काच्या कंपनीस विक्री करणे, शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय सदर विक्रीस मान्यता नसतानाही बेकायदेशीररित्या झालेल्या विक्रीमुळे कब्जेदारांच्या वारसांचा डावलण्यात आलेला हक्क, विकत घेणारा पक्षकार शेतकरी नसतांनाही सदर विक्रीची नोंद गैरमार्गाने महसूल दफ्तरी करण्यात येणे, विक्री दस्तऐवज नोंदणीकृत करत असताना कब्जेदारांच्या वारसांचे कोणतेही संमतीपत्र न घेता परस्पर झालेले बेकायदेशीर खरेदी खत, त्यातच विकत घेणाऱ्या पक्षकारांनी सदर भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी

प्राधिकरणास सादर केलेला अर्ज, त्यावर कब्जेदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, प्रा.पु.पा व तहसीलदार, बोरीवली यांनी नोंदविलेले अस्पष्ट अभिप्राय, त्यानुषंगाने विधी सल्लागाराचे मत मागविण्यास झालेला विलंब, ८० वर्षांपासून कसणाऱ्या कब्जेदारास भूमिहीन करण्याचा होत असलेला प्रयत्न, परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टी धारकांची होत असलेली फसवणूक, या सर्व प्रक्रियेकडे महसूल विभागाने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्रीमती विद्या चव्हाण आणि इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या, " डॉ. नरेंद्र दाभोळकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासात होत असलेली दिरंगाई. " या विषयावर उपस्थित केलेल्या लक्षवेधी क्रमांक (४) वरील चर्चा पुन्हा सुरू झाली.

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-३० वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. **(क) (१)** दोन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

अमेरिका देशाच्या दोन स्टेट सेनेटर्स यांच्या विधानभवन, मुंबई येथील भेटीच्या संदर्भातील माननीय सभापतींची घोषणा–

अमेरिका देशाचे दोन स्टेट सेनेटर्स, श्रीमती पामेला अल्थॉफ, सेनेटर, इलीनॉस विधिमंडळ आणि श्री.राज मुखर्जी, सेनेटर, न्यू जर्सी तसेच अमेरिकेच्या मुंबईतील वाणिज्य दूतावासातील उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित असून सभागृहाच्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात येत असल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

तारांकित प्रश्न. (पुढे सुरू)

(१) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) दोन तारांकित प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.

(३) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ख) सचिवांनी, शनिवार, दिनांक १ एप्रिल २०१७ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(ग) सचिवांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

२. महसूल मंत्र्यांनी, श्री. मुकुंद त्र्यंबक कुलकर्णी, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

खालील सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

(१) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते (२) श्री. शरद रणपिसे

संसदीय कार्य मंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

माननीय सभापतींनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३९ मिनिटांनी १० मिनिटांसाठी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी ३० मिनिटांसाठी स्थगीत झाली.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी, " मागील आठवड्यात तूर खरेदी संदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी निवेदन करण्यात येईल असे सांगितले असूनसुद्धा अद्यापपर्यंत निवेदन करण्यात न येणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

३. (१) सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांनी, (क) माहितीचा अधिनियम, २००५ च्या कलम २४ च्या पोट-कलम (४) द्वारे महाराष्ट्र शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीआरटीआय-२००५/ प्र.क्र. २६५/०५/५, दिनांक ११ ऑक्टोबर २००५ मध्ये केलेली सुधारणा प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक आरटीआय. २०१६ / प्र.क्र. ६८/सहा, दिनांकित ७ सप्टेंबर, २०१६ आणि (ख) " लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०१३ या वर्षाचा एकेचाळीसावा व सन २०१४ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल तसेच दिनांक ९ डिसेंबर, २०११, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३, दिनांक १६ एप्रिल, २०१३, दिनांक २२ मे, २०१३, दिनांक ३० जुलै, २०१३, दिनांक १ ऑगस्ट, २०१३, दिनांक ६ ऑगस्ट, २०१३, दिनांक २१ ऑगस्ट, २०१३, दिनांक ७ सप्टेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक १० डिसेंबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४, दिनांक २९ एप्रिल, २०१४, दिनांक ९ मे, २०१४, दिनांक २९ मे, २०१४, दिनांक २३ जून, २०१४, दिनांक २४ जून, २०१४ आणि दिनांक ३० जून, २०१४ रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह " सभागृहासमोर ठेवले.

(२) अल्पसंख्याक विकास आणि वक्फ राज्यमंत्र्यांनी " मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(३) उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी, " गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल " आणि " शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवले.

(४) कृषी आणि फलोत्पादन राज्यमंत्र्यांनी, " डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन २००६-२००७ ते २००९-२०१० या वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक लेखे " सभागृहासमोर ठेवले.

४. श्री.आनंदराव पाटील, समिती सदस्य यांनी रोजगार हमी योजना समितीचा चौथा अहवाल सभागृहास सादर केला.

५. श्री.गोपीकिसन बाजोरिया, समिती सदस्य यांनी अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल सभागृहास सादर केला.

६. ॲड. हुस्नबानू खलिफे, समिती सदस्या यांनी उप विधान समितीचा चौथा अहवाल सभागृहास सादर केला.

७. श्रीमती विद्या ठाकूर, महिला व बालविकास राज्यमंत्री तथा समिती प्रमुख यांनी, " पांढुर्णा (जि.वर्धा) येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतिगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे " या विषयावरील महिला संयुक्त तद्र्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर केला.

८. श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी, " अकोला शिवणी विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासंदर्भात " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवला.

श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत समावेश केलेली २७ गावे. " इ.बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे सांगून त्यासंदर्भात थोडक्यात म्हणणे मांडले.

. सदर विषय आजच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नाही तसेच उक्त विषयाबाबत ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना दिलेली आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

सर्वश्री नारायण राणे, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, शरद रणपिसे, चंद्रकांत रघुवंशी, जयंत प्र. पाटील, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष झांबड, अमरनाथ राजूरकर, आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी, " कर्जबाजारीपणामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या " इ.बाबत म.वि.प. २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंदर्भात सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाही. तथापि; विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या सूचनेसंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

९. (क) (१) नगरविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. शरद रणपिसे (२) ॲड. राहुल नार्वेकर

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांनी खंड २ मधील ओळ क्रमांक ११ व १२ याला सुचविण्यात आलेली सुधारणा मांडली.

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड २, " सुधारणा केल्याप्रमाणे " विधेयकाचा भाग झाला.

खंड ३, विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

विधेयक सुधारणा केल्याप्रमाणे संमत झाले.

श्री. दिवाकर रावते, परिवहन मंत्री आणि श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, हिंदुहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या संदर्भात शासनाच्या वतीने जे विधेयक मांडण्यात आले त्याबद्दल दोन शब्द व्यक्त करून शासनाचे आभार मानले.

म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय सभापतींनी घोषित केले.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, " सभागृहात महसूल मंत्री व कृषी मंत्री उपस्थित नसणे. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू होणार असून सभागृहात मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे " अशी सूचना केली.

माननीय सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी १० मिनिटांसाठी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३-२५ वाजता पुन्हा सुरू झाली.

श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " ज्या प्रस्तावावर चर्चा सुरू होणार आहे त्या विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करावी " अशी सूचना केली.

संसदीय कार्य मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

माननीय तालिका सभापतींनी सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २७ मिनिटांनी १० मिनिटांसाठी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ३७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी, " सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात भटक्या विमुक्तांच्या मुलामुलींसाठी गेल्या अनेक वर्षांपासून माध्यमिक शिक्षणाची सोय नसणे " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी, " राज्यातील अनेक शहरांमधील एटीएम सेंटर बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

१०. सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, संजय दत्त, जयंत पाटील, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, सतिश चव्हाण, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्रानी, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, राहुल नार्वेकर, हरिसिंग राठोड, रामराव वडकुते, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री जगन्नाथ शिंदे, जयदेव गायकवाड, अनिल तटकरे, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव–

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी खालील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

" कर्जबाजारीपणा, नापिकी, शेतमालाला मिळत नसलेले भाव, अस्मानी संकटे, शेतीविषयक बदलणारी नेहमीची धोरणे, व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक यामुळे राज्यातील शेतकरी त्रस्त असणे, नोटाबंदीच्या निर्णयामुळे कृषी मालाचे भाव कोसळून शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान, या सातत्याने येणाऱ्या संकटांमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असणे, मागील ३ वर्षांत ९ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, आत्महत्यांचे हे सत्र अद्यापही सुरूच असणे, जिल्हा बँकांवर लादलेल्या निर्बंधामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला सुरुंग लागणे, डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याकडे दुर्लक्ष होणे, घसरलेल्या दरामुळे ऊस, कापूस, तूर, धान, कांदा, टोमॅटो, सोयाबिन, भाजीपाला तसेच संत्रा, केळी उत्पादक शेतकरी कोलमडणे, कडधान्याच्या उत्पादनात विक्रमी वाढ होऊनही गेल्या पाच वर्षांतील निच्चांकी भाव शेतकऱ्यांना मिळणे, शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांकडून सुरू असलेली खरेदी, निर्यात बंदीसारखे हत्यार उपसून कांदा उत्पादकांची केलेली कोंडी, हवामान आधारीत फळ पीक विम्याचा हप्ता शासनाने न भरल्याने हजारो

शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, कोरडवाहू शेती अभियानांच्या आर्थिक तरतूदीत ८० टक्क्यांवरून अधिक करण्यात आलेली कपात, अपघात योजनेची ५० टक्के रक्कमही शेतकऱ्यांना न मिळणे, कृषी विभागात हजारो रिक्त पदांचा असलेला बॅकलॉग परिणामी योजनांची अंमलबजावणी होण्यात येणाऱ्या अडचणी, खरेदी केंद्रावरील आवक वाढल्याने नाफेड करून उडीद, तूर खरेदी बंद करण्यात आल्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांनी दर पाडणे, मार्च महिन्यांतील अवकाळी पावसामुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे व नुकसानभरपाई अद्याप मिळालेली नसणे, चारही बाजूने कोंडी होत असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग अंवलबिलेला असणे, शेतकऱ्यांना या कठीण प्रसंगात आधार देण्यासाठी कर्जमाफीचा उपाय असतांना सरकारकडून सातत्याने कर्जमाफीस नकार देण्यात येत असणे, महाराष्ट्र शेजारील आंध्रप्रदेश या राज्याने ७ हजार ९०० कोटी रुपयांचे, तेलंगणा राज्याने १७ हजार कोटींचे, तामिळनाडू राज्याने ५ हजार ७८० कोटी रुपयांचे तर उत्तर प्रदेश राज्याने ३६ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांकडील कर्ज माफ करणे, याच पार्श्वभूमीवर राज्यातही कर्जमाफीची सातत्याने होणारी मागणी, याच मागणीकरीता सर्व विरोधी पक्षांच्यावतीने दिनांक २९ मार्च ते ४ एप्रिल, २०१७ या कालावधीत चांदा ते बांदा दरम्यान काढण्यात आलेली संघर्ष यात्रा सदरच्या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी सहभागी होऊन संपूर्ण कर्जमाफीची केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, आर्थिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ”

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) ॲड. रामहरी रुपनवर (२) श्री. प्रवीण दरेकर

(३) श्री. जयंत प्र. पाटील (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

(१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २५ – विश्वकर्मा विद्यापीठ विधेयक, २०१७ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २६ – डीएसके वर्ल्ड विद्यापीठ विधेयक, २०१७ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे.

पशुसंवर्धन मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २९ – प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) ॲड. राहुल नार्वेकर (२) ॲड. जयदेव गायकवाड

(३) श्री. रामराव वडकुते (४) श्री. किरण पावसकर

(५) श्री. जयंत प्र. पाटील

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल २०१७.

श्री. सुजितसिंह ठाकूर व इतर. वि.प.स. यांचा, " शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्यासाठी शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता, " इ. बाबतचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत ॲड. रामहरी रुपनवर, व ॲड. जयदेव गायकवाड वि.प.स. यांनी भाग घेतला.

जलसंधारण मंत्री, जलसंपदा राज्यमंत्री, कृषी मंत्री, ऊर्जा मंत्री यांनी प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४२ मिनिटांनी दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगीत झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (क) (१) नऊ तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) एक तारांकित प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाला.

(३) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पंधरा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) यांनी, विधानसभेचे माननीय सदस्य श्री. अनिल गोटे यांनी विधानपरिषद सदनाबाबत आक्षेपार्ह विधान करून सदनाचा केलेला अवमान, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात श्री. भाई जगताप, ॲड॰ अनिल परब, श्री. नारायण राणे वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत अधिक खुलासा केला.

(ख) **नगर विकास राज्य मंत्र्यांनी,** " ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांचे स्वीय सहायक व बीट मुकादम यांना लाच घेताना केलेली अटक " या विषयावरील सर्वश्री नागोराव गाणार, हेमंत टकले, सतिश चव्हाण, वि.प.स व सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, संदिप बाजोरिया व प्रकाश बिनसाळे, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४१६७३ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(१) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी राज्याला उचलावा लागणारा भार " इ. बाबत नियम २८९ अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली असून या विषयी सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटांत आपले म्हणणे मांडावे असे माननीय सभापतींनी सांगितले.

श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली.

(२) श्री. नारायण राणे, वि.प.स. यांनी सूचना क्रमांक ५– सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, वि.प.स. यांनी सूचना क्रमांक ६– सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, जयंत प्र. पाटील, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष झांबड, हरिसिंग राठोड, ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी सूचना क्रमांक ७– सर्वश्री शरद रणपिसे, नारायण राणे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड. रामहरी रूपनवर, सुभाष झांबड, आनंदराव पाटील, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांनी, " राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी यासाठी विरोधी पक्षाच्या वतीने राज्यव्यापी संघर्ष यात्रा काढण्यात येणे, अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे संकट, सततचा दुष्काळ, नापिकी, शेतमालाला मिळत नसलेला बाजारभाव, नऊ हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी मागील तीन वर्षांत केलेल्या आत्महत्या, नोटाबंदीच्या निर्णयामुळे उत्पादित मालाचे भाव कोसळणे, कराड (जि.सातारा) येथे दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी दोन शेतकरी असलेल्या सख्या भावांनी दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी मूळ (जि. चंद्रपूर) येथील शेतकऱ्याने गळफास लावून आत्महत्या करणे " या विषयावर म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे.

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत म.वि.प. नियम २६० अन्वये उक्त विषयावर प्रस्ताव दर्शविण्यात आलेला आहे. त्याद्वारे सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडता येईल. असे सांगून माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, " नाणार-कुंभवडे, ता.राजापूर, जि. रत्नागिरी परिसरात ग्रीन रिफायनरी पेट्रोकेमिकल्स हा रासायनिक प्रकल्प उभारण्यात येणार असल्यामुळे तेथे निर्माण होणाऱ्या प्रदुषणामुळे मच्छीमारी व बागायती क्षेत्र धोक्यात येणे या विषयावर म.वि.प. नियम २८९अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे व विषय महत्त्वाचा असल्याने या विषयावर शासनाला आपले मत मांडण्याचे निर्देश देत आहे असे सांगून माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(३) सर्वश्री धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, सुनील तटकरे, हेमंत टकले, सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी, " गेवराई (जि.बीड) तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा व वाहतूक होत असल्यामुळे

गंभीर स्वरूपाचे अपघात होऊन अनेकांचा मृत्यू होणे " या विषयावर म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे व विषय महत्त्वाचा असल्याने या विषयावर शासनाने यावर निवेदन करावे असे निर्देश देऊन माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(४) सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, हरिसिंग राठोड, ॲड. रामहरी रूपनवर, सुभाष झांबड, प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी, " आदिवासी विकास विभागामध्ये झालेल्या करोडो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी गायकवाड समितीच्या अहवालामध्ये दोषारोप ठेवलेल्या संबंधितांवर अद्याप कोणतीही कारवाई न होणे " या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

श्री. शरद रघुवंशी वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

२. (१) वित्त राज्यमंत्र्यांनी, (अ) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे (१) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल व (२) आर्थिक क्षेत्रावरील अहवाल (ब) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, (अ) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (दुसरी सुधारणा) नियमावली, २०१७ अधिसूचना क्रमांक एमईपी. २०१५ / प्र.क्र.३२५ / टीएनटी-१. दिनांकित १५ मार्च २०१७, (ब) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल, (क) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखाअहवाल आणि अलग लेखापरीक्षा अहवाल, (ड) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, (अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल, (ब) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

३. श्री. संजय दत्त (समिती सदस्य) यांनी लोकलेखा समितीचा एकोणिसावा व विसावा अहवाल सभागृहास सादर केला.

४. (१) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचे दायित्व महाराष्ट्र शासनाने स्वीकारणेबाबत " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाच्या पटलावर ठेवला.

(२) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी, (अ) ' परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत ' या विषयावरील विनंती अर्ज, (ब) मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कोर्टातील दिवाणी वाटपाची नोंदणी करणेबाबत काढलेले चुकीचे आदेश रद्द करणे या विषयावरील विनंतिअर्ज, (क) राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता' या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(३) श्री. हरिसिंग राठोड वि.प.स. यांनी, " राज्यातील जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतन ग्रेड-पे दुरुस्ती व इतर प्रलंबित मागण्या मंजूर करणे " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाच्या पटलावर ठेवला.

(४) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी, " (अ) भारतात आयात केली जाणारी औषधे, प्रसाधने किंवा त्यांच्या मालाच्या नमुन्यांची चाचणी करण्यासाठी अधिकृत मानल्या गेलेल्या प्रयोगशाळेत पात्र शास्त्रज्ञांच्या अनुपस्थितीत तोतया शास्त्रज्ञाव्दारे चाचण्या केल्या जात असणे " या विषयावरील विनंती अर्ज, (ब) मुंबईतील वांद्रे येथील लीलावती, मुलुंड येथील फोर्टीस, अंधेरीचे कोकिलाबेन अंबानी, परळचे ग्लोबल, पवईमधील हिरानंदानी आणि गिरगावातील सर एच. एन रुग्णालय वैद्यकीय उपकरणांवरील छापील किंमतीपेक्षा अधिक किंमत रुग्णांकडून उकळून रुग्णांची पिळवणूक करीत असणे या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(५) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी, " लातूर जिल्ह्यातील मांजरा व रेणा नदीवरील बॅरेजेसच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणेबाबत " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(६) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, " मौजे माजीवडा, तालुका-जिल्हा ठाणे येथील सर्वे नं.२४/१ या मिळकतीबाबत विकासकाने जमीन मालकांची घोर फसवणूक करून जमीन गिळंकृत करणे " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर केला.

(७) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र राज्यातील कायमस्वरूपी विनाअनुदानित ८४३ अपंग शाळांना अनुदान मिळत नसल्याबाबत " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर केला.

(८) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१० चा (सन २०१४ ला मंजूर झालेला) कायद्यातील कलम १६ व १७ प्रमाणे सहायक निबंधक यांनी चौकशी

करून अवैध सावकार ठरवल्यावरून कलम १८ प्रमाणे अवैध सावकारी व्यवहारातून हडप केलेल्या जमिनी परत ताब्यात मिळणे व राज्यातील सावकारीच्या व्यवहाराचे नियमन विधेयकातील पूर्वलक्षी प्रभावाचा कालावधी संपुष्टात आणावा या कायद्याला कालमर्यादा नसावी. (उदा. आदिवासी जमिनीच्या कायद्याप्रमाणे कालमर्यादा नसावी.) या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर केला.

(९) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी, " अकोट, जि.अकोट मतदारसंघातील वाण धरण प्रकल्पापासून वीज निर्मितीचा प्रकल्प प्रस्थापित करणे " या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर केला.

५. आज प्राप्त झालेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनांची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

६. (१) सर्वश्री संजय दत्त, शरद रणपिसे, हेमंत टकले, सुनील तटकरे, नारायण राणे, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना-

श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

नवी मुंबई मधील खारघर येथे दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी डीएनए वृत्तपत्राचे पत्रकार सुधीर सूर्यवंशी यांच्यावर अज्ञात व्यक्तींकडून हॉकी व लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडणे, गेल्या काही दिवसात पत्रकार आणि व्हिडीओ जर्नलिस्ट यांच्यावर हल्ले आणि धमक्या देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या असणे, झी चोवीस तासचे संपादक डॉ.उदय निरगुडकर, साप्ताहिक राजसत्ताचे संपादक वसंत माने, पत्रकार संजय गिरी, विनोद यादव, संदिप भारती, स्वाती नाईक, सुधीर सूर्यवंशी यांच्या बाबतीत या घटना घडल्या असणे, सुर्यवंशी, नाईक, भारती आणि गिरी यांच्यावर तर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, टी.व्ही. जर्नलिस्ट असोसिएशन या सर्व घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीही सरकारकडे करण्यात येणे, माध्यमांचा प्रभाव वाढत असताना पत्रकारांना त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार काम करू न देणे हे लोकशाहीला घातक ठरणार असणे, लोकशाही अधिक सक्षमपणे राबवली जावी याची जबाबदारी सरकारची असणे, म्हणूनच पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा लवकरात लवकर आणून लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करावा अशी अपेक्षा सरकारकडून करण्यात यावी अशी पत्रकारांची मागणी असणे, पत्रकारांवर वारंवार हल्ले होत आहेत ही गंभीर बाब असणे, पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांना विशेष संरक्षण मिळावे आणि त्याकरिता कायदा करण्याची खूप वर्षांपासूनची मागणी असणे, सन २०१६ या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्रकारांना संरक्षण देणे, पेन्शन देणे, घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा. मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकारांवरील होणारे हल्ले रोखण्याबाबत कायद्यात तरतूद करण्यात येईल,

पेन्शन आणि घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्यात येईल असे आश्वासन देणे, परंतु दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न येणे, पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, पेन्शन सुरू करावी अशा अनेक मागण्या प्रलंबित असणे, पत्रकारांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत असताना त्यांच्या सुरक्षितेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, राज्यातील पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासन अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्यामुळे सरकारने वेळोवेळी पत्रकारांसाठी कायदा आणू असे दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया.

गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) आर्कि. अनंत गाडगीळ वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

मुंबई शहरामध्ये नव्या इमारती उभ्या राहाणे, त्याचप्रमाणे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी केली जाणे, इमारत पूर्ण होण्यापूर्वी भोगवाटा पत्र विकासकाकडून प्राप्त करणे आवश्यक असणे, तथापी बहुसंख्य इमारतींमध्ये सदर नियमांचे पालन न होणे, यावर गेल्या वर्षी मुंबई न्यायालयाने काही महापालिका अभियंत्यावर एफ.आय.आर. दाखल करण्याचे निर्देश देणे, यामुळे इतर वार्डमधील संबंधित मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अशा रहिवाशांना जागा खाली करण्याचे आदेश बजावणे, संबंधित विकासकांनी रहिवाशांची भाडी मध्येच बंद करणे, अशा रहिवाशांना बेघर होण्याची पाळी येणे, यामध्ये ना विकासक ना पालिका अधिकारी यांच्यावर कारवाई होणे, उलट रहिवाशांना अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागणे, मुंबईतील असंख्य नव्या इमारतींमधून सदर प्रश्न उपस्थित झाल्याने त्यास गंभीर स्वरुप येणे, यामुळे शासनाबदल जनतेत पसरलेला रोष व नाराजी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया.

मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ब्रिटीशकालीन सायबाच्या धरणाची सध्या मोठ्या प्रमाणात जीर्णावस्था झालेली असून या धरणातून वारंवार पाणी गळती सुरू होत असल्याचे

माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, नगरपरिषदेकडून वारंवार दुरुस्ती होत असून पाणी गळती थांबलेली नसणे, नगरपरिषदेने या धरणाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले असता दुरुस्ती शक्य नसल्याचा अहवाल येणे, धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असणे, त्यामुळे अतिवृष्टीने पाण्याच्या प्रवाहामुळे धरण फुटल्यास राजापूर शहराच्या बाजार पेठेत पुराचे पाणी जाऊन मोठे आर्थिक नुकसान व जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण होणे, दुर्घटनेमुळे शहराला होणारा धोका टाळण्यासाठी तसेच राजापूर शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी या ब्रिटीशकालीन सायबाच्या धरणाला पर्यायी नवीन धरण बांधण्याची होत असलेली मागणी, या मागणीनुसार धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असूनही कार्यवाहीसाठी होत असलेला विलंब, शासनाने तातडीने नवीन धरण बांधण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. गिरीशचंद्र व्यास, प्रा. अनिल सोले, सर्वश्री नागोराव गाणार, परिणय फुके, श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री. गिरीशचंद्र व्यास वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

राज्यातील " अ " वर्ग महानगरपालिका अस्तित्वात असून त्यांचे सेवाशर्तीकरिता विशिष्ट अधिनियम असणे, मुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिका एकाच अधिनियमाच्या कक्षेत येत असल्याने त्यात काम करणारे कर्मचारी/अधिकारी सेवेत दाखल झाल्यापासून त्या त्या महानगरपालिकेत निवृत्त होत असणे, दोषी कर्मचारी/अधिकाऱ्यांविरुध्द प्रशासकीय कारवाई म्हणून बदली करता येत नसल्याकारणास्तव सेवेतून काढण्याखेरीज आयुक्तांना पर्याय देखील उपलब्ध नसणे व राजकीय दबावापोटी असे प्रस्ताव देखील महासभेतच नामंजूर होत असणे, वर्षानुवर्षे एकाच महानगरपालिकेत काम केल्यामुळे ठराविक अधिकारी/कर्मचारी यांचा प्रशासनावर पूर्णपणे ताबा होऊन गैरकामांना गती मिळत असणे, त्यातच मोठमोठ्या उद्योजकांशी हितसंबंध वाढल्याने गैरमार्गाने बेहिशोबी मालमत्ता वाढण्यास देखील मदत होत असून अधिकाऱ्यांची मुजोरीदेखील वाढत असल्याची निदर्शनास आलेली बाब, त्यामुळे या भ्रष्टाचारास प्रतिबंध करताना शासनास येत असलेले अपयश, त्यामुळे " अ " वर्ग महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांची अन्य महानगरपालिकांमध्ये समकक्ष पदावर बदली करण्याबाबतची तरतूद करून ती तत्काळ अंमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. रामनिवास सिंह वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

मुंबईतील पवई येथील हिरानंदानी, स्वामीनारायण मंदिर ते कैलाश कॉम्पलेक्स येथील सुरू असलेल्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरप्रकार, व निकृष्ट दर्जाचे काम सुरू असल्याचे नुकतेच माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू रस्त्याचे काँक्रिटीकरण महापालिकेच्या सेंट्रल एजन्सीद्वारे करण्यात येणार असून त्याकरिता सुमारे ९ कोटी ६२ लाख १३ हजार इतका खर्च होणार असून सदर कामाकरिता दिनांक २८ डिसेंबर २०१६ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर मे.प्राईम सिव्हील इन्फ्रास्ट्रचर प्रा. लि. यांना सदर रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे कंत्राट देण्यात येणे, त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम देखील सुरू होते परंतु रस्त्याच्या पूर्व दिशेला रस्त्यामध्ये अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण होत असल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक नागरिकांना काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याचे भासवून कंत्राटदार महापालिका, शासन तसेच नागरिकांची करीत असलेली फसवणूक, अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण केल्यामुळे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन येत्या पावसाळयात रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याची निर्माण झालेली भिती, परिणामी या रस्त्यांवर अपघातामध्ये वाढ होण्याची शक्यता, सदर प्रकरणी वेळीच होत असलेल्या निकृष्ट कामाला आळा बसावा याकरिता सदर कामाची तातडीने सखोल चौकशी करावी व दोषी कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) प्रा. जोगेंद्र कवाडे वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" सिंधु एज्युकेशन सोसायटी, नागपूर या संस्थेद्वारा संचलित महात्मा गांधी शाळा जरीपटका, नागपूरचे अध्यक्ष श्रीमती विणी बजाज आणि सचिव दिपक बजाज यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग नागपूरने दिनांक २४ सप्टेंबर २०१५ रोजी धाड टाकून प्रचंड प्रमाणात बेहिशोबी रक्कम जप्त करणे, श्री. दिपक बजाज यांना नोव्हेंबर, २०१५ मध्ये अटक करून कारागृहात ठेवले असणे, विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळखंडोबा केल्याचा गंभीर गुन्हा असल्याने मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात वारंवार जामीन प्राप्तीसाठी केलेले अर्ज फेटाळण्यात येणे, राज्य शासनाने या आरोपींची संपत्ती जप्त करण्याची परवानगी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, नागपूर यांस दिली असूनही भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने जप्तीची कारवाई न करणे, शिक्षण विभागाच्या संगनमताने केलेला भ्रष्टाचार, विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाबाबत श्री. दिपक बजाज यांची मुलगी श्रीमती दिप्ती बजाज यांचेवर ए.सी.बी. ने पुरवणी आरोपपत्र दाखल करून

देखील त्यांचेवर कारवाई न करणे, एवढे भ्रष्टाचार करणाऱ्या सिंधु एज्युकेशन सोसायटीविरुध्द धर्मादाय आयुक्त नागपूरने कोणतीही दखलपात्र कारवाई न करणे, सिंधु एज्युकेशन सोसायटीद्वारा केलेला व करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने प्रशासकांची नियुक्ती न करणे, या सर्व कारवाईस होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री सुनील तटकरे, धनंजय मुंडे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री बाळाराम पाटील, नरेंद्र पाटील, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनील तटकरे वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" रोहा हे रायगड जिल्ह्यातील एक प्रमुख शहर असणे, गतवर्षीच रोहा-अष्टमी नगरपरिषदेने आपला शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा केलेला असणे, रोहा-अष्टमी शहराला सांस्कृतीक व ऐतिहासिक वारसा असणे, पर्यटन व औद्योगिकदृष्टया हे शहर विकसित होत असणे, वाढत्या लोकसंख्येला रोहा-अष्टमी नगरपरिषद योग्य सोई सुविधा देत असणे, याच बरोबर शहरात सांस्कृतिक व पर्यटन वाढण्यासाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न करण्यात येत असणे, याचधर्तीवर रोहा शहरात प्राचीन असलेल्या अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचे सुशोभिकरण करून त्यावर पर्यटन व्यवसाय वाढीसाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न सुरू असणे, यासाठी शासनाकडून वैशिष्टयपूर्ण बाबींसाठी मंजूर असलेले अनुदान गेल्या दोन वर्षापासून उपलब्ध असणे, मात्र जिल्हा प्रशासन या प्रकल्पाच्या मंजुरी विषयी उदासिन असणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदे मार्फत तलावाचे सुशोभिकरण, संरक्षक भिंत , बाग-बगीचा करणे, मिनी ट्रेन, बोटींग क्लब, विक्रेते स्टॉल आदी प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेले असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार या प्रस्तावास मंजुरी मिळणे विषयी विनंती केलेली असणे, जिल्हा प्रशासाने मात्र वेळोवेळी त्यामध्ये त्रुटी काढून प्रस्ताव मंजुरीमध्ये उदासिनता दाखविणे, रोहा-अष्टमी नगरपरिषद शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना त्याच वर्षी या प्रकल्पाची सुरूवात व्हावी अशी स्थानिक नागरीकांची इच्छा असणे, तद्नंतर प्रशासनाने प्रस्तावात बदल करून नव्याने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याविषयी नगरपरिषदेस सूचित करणे, यामध्ये वेळेचा अपव्यय झालेला असणे, शासनामार्फत निधी उपलब्ध झालेला असताना सुध्दा केवळ तांत्रिक बाबींमुळे हा प्रकल्प मंजुरी साठी रखडलेला असणे, म्हसळा नगरपंचायतीस नगरोत्थान कार्यक्रमा अंतर्गत या वर्षी एक कोटी पंच्याहत्तर लाख इतका निधी उपलब्ध झालेला असणे, सदर निधीचा जिल्हा प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे अद्याप विनियोग झालेला नसणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेने नव्याने अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचा रुपये एक कोटी बत्तीस लाख रकमेचा सविस्तर प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेला असणे, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने या प्रकल्पास त्वरित मंजुरी देऊन

प्रकल्प सुरू करण्याची स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधी कडून होत असलेली मागणी, गेल्या वर्षभरापासून प्रकल्प मंजूर न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, प्रकल्पास त्वरित मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले .

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषीमंत्र्यांचे लक्ष वेधले :–

" शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादन क्षमतेवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यावरण नियम व कायद्यानुसार प्रत्येक बीटी कॉटन बियाणांच्या ४५० ग्रॅम पिशवी सोबत १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणे विक्री करणे बंधनकारक असणे, कायदा आणि नियम धाब्यावर बसवून राज्यात बीटी बियाणांसोबत नॉन बीटी ऐवजी १२० ग्रॅम बीटी बियाणांची विक्री करण्यात येणे, यामुळे राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, बीटी बियाणांसोबत दिल्या जाणाऱ्या १२० ग्रॅम नॉन बीटी बियाण्यांची तपासणी नुकतीच नंदूरबार येथे शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर करण्यात येणे, तपासणीमध्ये हे बियाणे बीटी बियाणे असल्याचे सिद्ध होणे, या संदर्भात दाखल तक्रारीवरून राज्यात कृषि अधिकाऱ्यांनी बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कोणतीही कारवाई न करणे, या बाबतच्या तक्रारी आणि त्यावरील अपीले मोठ्या प्रमाणावर प्रलंबित ठेवून अधिकारी आणि कंपनी यांच्या आर्थिक संगनमताने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे, अनेक ठिकाणी बियाणांप्रमाणे बोगस रासायनिक खते विक्रीचेही प्रकार उघडकीस येणे, नुकतीच हिंगोली येथे शेतकऱ्यांच्या दबावापोटी खताचा नमुना प्रयोगशाळेत तपासला असता त्यामध्ये माती असल्याचे सिद्ध होणे, अधिकाऱ्यांकडून या बाबत कारवाई होत नसल्यामुळे बोगस आणि बनावट खत विक्रीला चालना मिळणे, बायो पेस्टीसाईड्सच्या नावाखाली शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करून चायनामेड बोगस औषधांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असणे, जैविक औषधांच्या नावाखाली रासायनिक किटकनाशकांची विक्री मोठ्या प्रमाणावर राज्यभर होत असणे, बुटीवार, जि.नागपूर येथे याबाबत नुकताच गुन्हा दाखल होणे, प्रकरणातील दोषींविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी करणे, बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या विक्रीवर निर्बंध आणून यासंदर्भात कडक कायदा करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया ".

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. भाई जगताप वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधले.

मुंबईसह रायगड किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना उपचारासाठी अनेकदा मुंबईत यावे लागते हे लक्षात घेऊन त्यांचा वेळ वाचावा या हेतूने प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरू करण्याचा महाराष्ट्र सागरी मंडळाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये तसेच तज्ञ डॉक्टरही असतील अशी तरतूद असणे,काही वर्षापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडीकिनाऱ्यावरील नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरू केली असणे, डॉक्टर बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरू करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने तयार केलेला असणे, परंतु या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने जनहित लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) सर्वश्री दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे, विक्रम काळे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ. सुधीर तांबे, श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. दत्तात्रय सावंत वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" राज्यात गेल्या १५ वर्षापासून विना अनुदानित तत्वावर सुरू असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांवर सुमारे ३०,००० शिक्षक कार्यरत असणे, या शाळा व वर्ग तुकड्या दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात येणे, राज्यात दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ च्या शासन आदेशाने सुमारे १९,२४७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लागणे, त्यामुळे या शिक्षकांच्या मनात शासनाविषयी आनंदाचे वातावरण निर्माण होणे, असे असताना सदर शिक्षकांना वेतन देत असताना दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र झालेल्या शाळांचा समावेश न करणे, त्यामुळे सदर शिक्षकांना आजही विना वेतन काम करावे लागत असणे, तसेच मंत्रालय स्तरावर विविध क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून आलेल्या शाळा व वर्ग तुकड्या अनुदानास पात्र होण्याच्या

प्रतीक्षेत असणे, सदर शाळा व वर्ग तुकड्या घोषित करण्यासाठी अर्थ विभागाच्या परवानगीची प्रतीक्षा करावी लागणे, सदर फाईल अर्थ विभाग, नियोजन विभाग, शिक्षण विभाग अशी मंत्रालयात वारंवार फिरत असणे, त्यामुळे या शिक्षकांच्या मनामध्ये शासनाविषयी असंतोषाचे वातावरण पसरणे, दिनांक १ जुलै २०१६ व दिनांक २ जुलै २०१६ रोजी पात्र झालेल्या शाळा सहित निधी मंजूर करण्याबाबत शिक्षक संघटनाकडून वारंवार मागणी करण्यात येणे, गेली १५ वर्षे विना वेतन कार्य करीत असणाऱ्या शिक्षकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

" मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार नव्या बाल न्याय अधिनियमानुसार राज्य शासनाने काराची नियमावली ग्राह्य मानून राज्याने दत्तक विधानासंदर्भात राज्याला सुकर होतील अशी प्रक्रिया करणे अपेक्षित असणे, तथापि दत्तक घेतली जाणारी मुले ही वस्तू नसून व्यक्ती आहेत, त्यांचे ऑनलाईन प्रक्रियेद्वारा वस्तुकरण होता कामा नये, ही दत्तक विधान क्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांची मागणीकाराने जाहीर केलेल्या नव्या नियमावलीमध्ये धुडकावून लावली असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, मुलाला देशात वा देशाबाहेर दत्तक जाण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रितसर दत्तक नोंदणी करणे अपेक्षित असणे, तथापि नव्या नियमावलीमध्ये उपरोक्त अवधित सुकर सुविधा देण्यात न येणे, सदर महिन्यांच्या निरिक्षणानंतर बालकांच्या दत्तक विधानाचा स्थायी आदेश होणे, तसेच परदेशात मूल पाठविल्यानंतर जर ते त्या वातावरणात रमले नाही किंवा पालकांकडून योग्य वागणूक मिळत नसेल तर त्याला भारतात पुन्हा येण्याची सुकर सुविधा नव्या नियमावलीमध्ये नसणे, त्यामुळे स्वत: च्या भावना व्यक्त करण्यास असमर्थ असलेल्या लहान मुलांचे काय ? हा प्रश्न अनुत्तरीत राहणे, मूल दत्तक दिल्यानंतर यासंदर्भात सामाजिक संस्थांचा सहभाग नव्या नियमावलीतून काढून टाकण्यात येणे, तसेच नव्या घरात मूल रमले नाही, आजारी पडले तर मुलाला कशाप्रकारे समजून घ्यावे याबाबतची माहिती नव्या नियमावलीत नसणे, त्यामुळे दिनांक १७ जानेवारी २०१७ पासून लागू झालेल्या या नियमावलीमध्ये राज्यातील मुलांच्या गरजांचा विचार करून महत्वाचे बदल करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाच्या उपाययोजना, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. "

महिला व बालविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक १२ बाबत–

आजच्या कामकाजपत्रिकेत लक्षवेधी सूचना क्रमांक १२ च्या बाबतीत माननीय मंत्र्यांनी विनंती केल्यानुसार सदरहू लक्षवेधी सूचना आज घेण्यात येणार नाही असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

(१३) श्री. चंदूभाई पटेल, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" मे. पटेल नारायणदास फर्टीलायझर प्रा.लि., जळगाव या कंपनीने रासायनिक खतांची (सिंगल सुपर फॉस्पेट) खोटे दस्तऐवज व बिल तयार करून अनेक वर्षांपासून शासनाकडून करोडो रुपयांच्या अनुदानाची रक्कम घेऊन शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास येणे, या संदर्भात महाराष्ट्रातील लातूर-उस्मानाबाद-माजलगांव, बीड, केज, पाटोदा, मंगळूरपीर, धामणगांव-रेल्वे, अमरावती, संगमनेर, जळगाव, मालेगांव या निरनिराळया गावात व शहरात कृषी निरीक्षक व संबधित अधिकारी यांनी गुन्हे दाखल केलेले असणे, सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरणे, शासनाने या प्रकरणी चौकशी करून या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व संबंधित कंपनीकडून शासनाच्या झालेल्या फसवणुकीप्रकरणी घेण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. "

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले .

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१४) श्री.नारायण राणे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

" मुंबई - पुणे एक्सप्रेस-वेच्या लगत असलेल्या महाराष्ट्र विकास रस्ते महामंडळाच्या मालकीच्या सुमारे आठ सुविधा भूखंडांच्या वाटपामध्ये व निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे शासनाचे २,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे झालेले नुकसान, सहा विविध कंपन्यांनी सुविधा भूखंडांसाठी दिलेल्या २,००० कोटी रुपयांच्या मंडळासाठी फायदेशीर निविदा २०१५ सालामध्ये साधारण कारणाविना रद्द करण्याचा झालेला प्रकार, दुसरीकडे केवळ १० कोटी ४१ लाख रुपयांमध्ये ९.५० हेक्टरचे दोन भूखंड ट्रक टर्मिनसकरिता ३० वर्षांच्या मुदतीने निवेदेच्या अटी पायदळी तुडवून ठेकेदाराच्या नावे वर्ग करण्याचा झालेला गैरप्रकार, ट्रक टर्मिनससाठी वाटप केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राचा वाटप ठेकेदाराकडून होत असल्याचा व अनामत रकमा मुदत संपल्यानंतरही जमा केल्या नसल्याने महामंडळाकडून झालेला कानाडोळा, शासनाच्या विविध स्तरांवर तक्रारी केल्यानंतरही आणि महालेखापालांनी आक्षेप घेऊनही याप्रकरणी ठोस कठोर कारवाई करण्याकडे शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१५) सर्वश्री धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, सुनील तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" महाराष्ट्राच्या २२ सिमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण व संगणकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतलेला असणे, यात सिमा तपासणी नाक्यांवर विहीत कायदे तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे विहीत मर्यादेपेक्षा अधिक वजनाच्या माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करणे, अतिरिक्त भाराप्रमाणे ठरवून दिलेले दंड व शुल्क आकारणे, अतिरिक्त वजनाच्या मालाचे अनलोडींग/लोडींग करणे यासारख्या बाबी अंतर्गत असणे, या संदर्भात लोडींग, अनलोडींग, साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणेसाठी एम.बी.सी.पी.एन.एल सोबत सवलत करारनामा करण्यात आलेला असणे, त्याकरिता आकारावयाचे विहित शुल्क निर्धारीत केलेले असणे, तथापि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त भाराच्या वाहनांवर कारवाई न केल्यामुळे या प्रकरणी कंपनीचे शुल्कापोटी गत दोन ते तीन वर्षात ६४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत तसेच असे शुल्क शासनास प्राप्त व्हावयाच्या दंड आकरणीच्या मानाने अत्यल्प असल्याने शासनाच्या महसुलाची सुमारे २००० ते ३००० कोटी रुपयांची हानी झालेली असल्याबाबतचा अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी परिवहन विभागात सादर केलेला असणे, या प्रकरणी हजारो कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत येण्याऐवजी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या खिशात जाऊन हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असल्याची शक्यता, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

परिवहन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१६) सर्वश्री, प्रकाश गजभिये, संजय दत्त, नारायण राणे, शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड. रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, आनंद पाटील, अमरनाथ राजूरकर, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन दोन वर्ष उलटून गेली तरी अजून मिलची जमीन राज्य सरकारच्या ताब्यात आली नसणे, इंदू मिल

जमिनीच्या हस्तांतरणचा प्रश्न प्रलंबित असणे, सदरील जमीन राज्य शासनाच्या ताब्यात नसल्याने या जमिनीवर कोणतेच बांधकाम व इतर कामे होणार नसणे, राज्य शासनाने सदरील जागा ताब्यात न घेता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिल येथे भूमिपूजन केल्याच्या घटनेमुळे आंबेडकर प्रेमी जनता व सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करणारी असल्याने राज्य शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्य शासनाने इंदू मिलची जागा-डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकासाठी ताब्यात घेऊन प्रस्तावित आंतरराष्ट्रीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.

सामाजिक न्याय मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

परिवहन मंत्र्यांनी, " राज्य परिवहन महामंडळाच्या शटल बस सेवा व विनावाहक बस सेवा सुरू करणे, " इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, अंदाजपत्रकीय अधिवेशन काळात विधानसभेत अर्थसंकल्प सादर होत असताना गोंधळ झाला, घोषणा दिल्या गेल्या त्याबद्दल सरकारने विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांना निलंबित केले होते त्या १० सन्माननीय सदस्यांचे निलंबन मागे घेण्यात येत आहे असे घोषित केले.

ऊर्जा मंत्र्यांनी, " कृषी पंप ग्राहक व रस्त्यावरील दिवाबत्ती ग्राहकांना वीज बिलात सवलत ", इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

लक्षवेधी सूचना (पुढे सुरू ..)

(१७) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" यवतमाळ जिल्ह्यातील काळ्या जमिनीत लांब पल्ल्याचा कापूस तयार करण्याची क्षमता असणे, त्यामुळे अनेक देशात जिल्ह्याचा कापूस जात असणे, परिणामी कापसाचे माहेरघर पांढऱ्या हिऱ्याचा जिल्हा, कॉटनसिटी बिरुदाबली जिल्ह्याला प्राप्त होणे, तसेच जिल्ह्यात सहकारी तत्वावर २४ जिनिंग आणि प्रेसिंग सहकारी संस्था आहेत मात्र यातील काही व ठिकाणी जिनिंग तर काही ठिकाणी प्रेसिंगची व्यवस्था असणे त्याच सोबत जिल्ह्यात कापसाचे उत्पादन सर्वाधिक होत असल्याने शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळावा जिनिंग व प्रेसिंगची कामे एकत्र व्हावीत म्हणून जिल्ह्यात टेक्स्टाईल झोन उभारण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

पणन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(ब) सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी, नागपूर येथील मिहान सेझ प्रकल्पातील २३० एकर जमिनीबाबत या विषयासंबंधी श्री.शरद रणपिसे व इतर वि.प.स.यांनी दिनांक ९ डिसेंबर २०१६ रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

श्री. शरदे रणपिसे, वि.प.स. यांनी, यामध्ये सरकारचे १७१ कोटी रूपयांचे आर्थिक नुकसान झालेले आहे, त्यामुळे सदरहू अधिकची माहितीपुढच्या अधिवेशनापर्यंत राखून ठेवण्यात यावी, अशी विनंती केली.

सदरहु अधिकची माहिती पुढील अधिवेशनापर्यंत राखून ठेवण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

(क) सचिवांनी, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक सहा (ग) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ४४ मिनिटांनी मध्यंतरासाठी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

परिवहन मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा वेतन करार या संबंधी नियम ४६ अन्वये निवेदन केले.

८. (१) महाराष्ट्र कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (सुधारणा) विधेयक, २०१७ (चर्चा पुढे सुरू)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन्हा प्रस्तुत झाला.

खंड २ ते २०, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य हे एकापाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे —विचार, खंडशः विचार व संमत करणे —

(२) महसूल मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि.क्र. १७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) महसूल मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेंतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचा प्रस्ताव अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(४) महसूल मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि.क्र. १९ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(५) महसूल मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि.क्र. ३१– महाराष्ट्र शेतजमीन पट्टयाने देण्याबाबत विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबधीच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.जयंत प्र.पाटील (२) श्री. नारायण राणे

(३) श्री. शरद रणपिसे

महसूल मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि.क्रमांक २४– महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयकासंदर्भात सभागृहास माहिती दिली व सदर विधेयक मांडण्यास अनुमती द्यावी अशी विनंती केली.

उपरोक्त विधेयकासंदर्भात सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, प्रा. जनार्दन चांदूरकर वि.प.स. यांनी मत मांडले.

शासकीय विधेयके (पुढे सुरू)

(६) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २७– संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(७) परिवहन मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २८– महाराष्ट्र परिवहन व रस्ते सुरक्षा विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकाच्या संदर्भात ॲड. राहुल नार्वेकर वि.प.स. यांनी मत मांडले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(८) वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९– महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकाच्या संदर्भात ॲड. राहुल नार्वेकर वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(९) नगरविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३२– महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतिबंध) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांचा, " राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या तसेच शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी अवलंबिलेल्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता " इ. बाबतचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला.

(१) प्रा. जोगेंद्र कवाडे (२) डॉ.नीलम गोऱ्हे

(३) श्री. प्रकाश गजभिये (४) श्री. हरिसिंग राठोड

(५) श्री. नारायण राणे

मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

शासकीय विधेयके (पुढे सुरू)

(१०) सामाजिक न्याय मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि.क्रमांक ७–महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडश: विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(११) सहकार मंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्र.१३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे यांचा प्रस्ताव.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) यांनी, " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

(१) सहकार मंत्री

(२) श्री. धनंजय मुंडे, मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद

(३) श्री. नारायण राणे, वि.प.स.

(४) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(६) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(८) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

(१०) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रस्तावावरील चर्चेत श्री.किरण पावसकर वि.प.स. यांनी भाग घेतला.

मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत जो प्रस्ताव दिलेला आहे तो मागे घेण्यास मला सभागृहाने अनुमती द्यावी अशी विनंती केली.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सत्र कालावधीतील कामकाजाचा संक्षिप्त आढावा—

माननीय सभापतींनी, सन २०१७ या वर्षातील अर्थसंकल्पीय अधिवेशनात झालेल्या कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवला.

पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा—

माननीय **सभापतींनी,** महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७ पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे, असे जाहीर केले.

सत्र समाप्तीसंबंधी घोषणा —

माननीय **सभापतींनी** सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा पुढील संदेश सभागृहास वाचून दाखविला.

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उप खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी श्री. चे. विद्यासागर राव, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे. "

यानंतर राष्ट्रगीत म्हणण्यात आले.

विधान परिषदेचे अधिवेशन रात्रौ ८ वाजून ३६ मिनिटांनी संस्थगित झाले.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक ७ एप्रिल २०१७.

उत्तमसिंग चव्हाण,
सचिव,
महाराष्ट्र विधान परिषद.

विवरण क्रमांक ५

सन २०१७ च्या विधानपरिषदेच्या द्वितीय अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल

शनिवार, दिनांक २० मे, २०१७

विधानपरिषदेची बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात दुपारी १२-०० वाजता माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ ' वंदे मातरम् ' या गीताच्या समूह गायनाने झाला.

१. महसूल मंत्र्यांनी, श्री. गजेंद्र लगमाण्णा अैनापुरे, माजी वि. प. स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

माननीय सभापतींनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला असून शोक प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १० मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

(१) श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी, शेतक-याला कर्जमाफी देण्याच्या संदर्भात नियम २८९ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले व आपले म्हणणे मांडले.

श्री. सुनील तटकरे, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

माननीय राज्यपालांनी केवळ जीएसटी विधेयकाच्या संदर्भात हे विशेष अधिवेशन बोलविले असल्यामुळे विधानपरिषद नियमातील कामकाजपत्रिकेत या विषयाचा समावेश आलेला नाही. त्यामुळे हा नियम सुद्धा येथे लागू होत नाही. असे सांगून माननीय सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(२) श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी " समाजातील दुर्बल वर्गातील कष्टकरी विद्यार्थ्यांचे शिक्षण पद्धतशीर पद्धतीने बंद करण्यासाठी १७६ शाळांमध्ये १००० हून अधिक शिक्षक सेवा समाप्त करण्याचा शासन निर्णय शिक्षण विभागाने दिनांक १७ मे २०१७ रोजी जारी करणे, अर्धवेळ शिक्षक सेवकांना संरक्षण देण्याच्या नावाखाली त्यांना नाममात्र पगार देऊन शोषण करणे. " इ. बाबत नियम २८९ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली व नियम या विषयावर सूचना दिली असून हा विषय आजच्या कामकाजपत्रिकेत

समाविष्ट नसल्यामुळे सदरहू सुचनेस अनुमती नाकारली व याबाबत सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयामध्ये लक्ष घालून उचित कार्यवाही करावी असे निदेश दिले.

(१) वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३४ महाराष्ट्र वस्तू व सेवा (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) विधेयक, २०१७ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुनील तटकरे

(२) ॲड अनिल परब (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण) ..

गत अधिवेशनात नामनिर्देशित केलेली सभापती तालिका म.वि.प.नियम ८(२) अन्वये पुढे सुरु राहील असे माननीय सभापतींनी घोषित केले.

सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३४ – महाराष्ट्र वस्तू व सेवा (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) विधेयक, २०१७ (चर्चा पुढे सुरू ..)

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) ॲड अनिल परब (भाषण पूर्ण)

(३) श्री.शरद रणपिसे

(४) ॲड निरंजन डावखरे

(५) श्री. भाई जगताप

(६) डॉ. नीलम गो-हे

(७) श्री. किरण पावसकर

(८) श्री. अनिल सोले

(९) प्रा. जोगेंद्र कवाडे

(१०) श्री. अनिल भोसले

(११) श्री.गिरीश व्यास

(१२) ॲड रामहरी रुपनवर

वित्त राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून समंत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

या विधेयकाला सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी शिफारशी सुचविलेल्या आहेत, परंतु त्यांनी सुचवलेल्या शिफारशी उक्त विधेकाच्या खंडाशी सुसंगत नसल्यामुळे त्या शिफारशी मांडण्यास अनुमती नाकारीत आहे, असे माननीय सभापतींनी सांगितले.

विधेयक खंडशः सभागृहाला सादर करण्यता आले.

खंड २ ते ११ (दोन्ही सम्मिलित) अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

रविवार, दिनांक २१ मे, २०१७

श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते यांनी, " १ जुलै हा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस गेली अनेक वर्षे राज्य शासनातर्फे ' कृषी दिन ' म्हणून साजरा करण्यात येणे. तथापि, शासनाने १ जुलै याच दिवशी ' मतदार दिन ' साजरा करण्याबाबत नवीन शासन निर्णय निर्गमित करणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला व आपले मत व्यक्त केले.

श्री. हरिसिंग राठोड, श्री. जयंत प्र. पाटील, श्री. भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री. भाई गिरकर, श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी याबाबत आपापले मत व्यक्त केले.

महसूल मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

विधानसभेने संमत केल्याप्रमाणे विधेयक विचारात घेणे—

वित्त मंत्र्यांनी, " सन २०१७ चे वि.स.वि क्रमांक ३५ - महाराष्ट्र वस्तू व सेवा करविषयक कायदे (सुधारणा, विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती) विधेयक, २०१७ " विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते
(२) श्री. जयंत प्र. पाटील
(३) श्री. शरद रणपिसे
(४) प्रा. अनिल सोले
(५) ॲड राहुल नार्वेकर
(६) डॉ. नीलम गोऱ्हे
(७) प्रा. जोगेंद्र कवाडे
(८) ॲड. रामहरी रुपनवर

(९) श्री. हेमंत टकले
(१०) श्री. हरिसिंग राठोड
(११) श्रीमती विद्या चव्हाण
(१२) डॉ. सुधीर तांबे
(१३) ॲड. जयदेव गायकवाड
(१४) श्री. ख्वाजा बेग
(१५) श्री. जगन्नाथ शिंदे
(१६) श्री. प्रकाश गजभिये

वित्त राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
विधेयक खंडशः सभागृहास सादर करण्यात आले.

खंड २ ते ७८ (दोन्ही सम्मिलित, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सोमवार, दिनांक २२ मे २०१७

(१) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी, " लातूर येथे शीतल वायाळ या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या मुलीने हुंड्याच्या प्रश्नामुळे आत्महत्या करणे तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा अस्थी कलश घेऊन आलेल्या श्री.विजय जाधव यांना अटक करणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात सभागृहाची बैठक संपेपर्यंत निवेदनाची व्यवस्था करण्यात येईल असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

(२) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी, " उल्हासनगर येथे दुकानातील बरणीमधील चकली काढून खाल्ल्याबद्दल दोन अल्पवयीन मुलांना नग्न करून त्यांचे मुंडन करण्यात येणे व त्यांची गळ्यात चपलांचा हार घालून धिंड काढणे तसेच मारहाण करून त्याचे चित्रीकरण करून ते प्रसारित करणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात शासनाने गंभीर दखल घेतली असून दुपारपर्यंत या विषयाबाबत कोणती कारवाई करण्यात आली त्याबाबत निवेदन केले जाईल असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी, " रॅन्समवेअर वॉनाक्राय वायरसच्या माध्यमातून झालेला सायबर हल्ला " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासकीय विधेयक -

विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे –

वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक, २०१७ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेते (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २४ मिनिटांनी स्थगित झाली.
मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३.०० वाजता सुरू झाली.

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक, २०१७ वरील चर्चा–चर्चा पुढे सुरू

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(२) श्री. नारायण राणे
(३) श्री. सुनील तटकरे
(४) ॲड. अनिल परब
(५) प्रा. अनिल सोले
(६) श्री. शरद रणपिसे
(७) डॉ. नीलम गोऱ्हे
(८) श्रीमती विद्या चव्हाण
(९) श्री. भाई जगताप
(१०) श्री. जनार्दन चांदूरकर
(११) प्रा. जोगेंद्र कवाडे
(१२) ॲड. रामहरी रुपनवर
(१३) श्री. हरिसिंग राठोड
(१४) श्री. हेमंत टकले
(१५) श्री. दत्तात्रय सावंत

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस वित्त राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.
प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
विधेयक खंडशः सभागृहास सादर करण्यात आले.

खंड २ ते १७४ (दोन्ही सम्मिलित), अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय सभापतींनी सांगितले.

(१) संसदीय कार्यमंत्र्यांनी, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून म.वि.प. नियम ४६ अन्वये सभागृहाच्या अनुमतीने निवेदन केले.

(२) संसदीय कार्यमंत्र्यांनी, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून म.वि.प. नियम ४६ अन्वये सभागृहाच्या अनुमतीने निवेदन केले.

(३) संसदीय कार्यमंत्र्यांनी, सन्माननीय सदस्या श्री. प्रकाश गजभिये यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून म.वि.प. नियम ४६ अन्वये सभागृहाच्या अनुमतीने निवेदन केले.

मुख्यमंत्र्यांनी, वस्तू व सेवा कर विधेयक संमत केल्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी आभार प्रदर्शनपर भाषण केले.

माननीय सभापतींनी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला—

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४ खंड (२) उप खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून मी सोमवार, दिनांक २२ मे, २०१७ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरचे महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

यानंतर ' राष्ट्रगीत ' म्हणण्यात आले.

विधान परिषदेचे अधिवेशन रात्री ७ वाजून ३१ मिनिटांनी संस्थगित झाले.

विवरण क्रमांक–६

महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८(१) अन्वये, माननीय सभापतींनी नामनिर्देशत केलेली सभापती तालिका–

अ. क्र.	सदस्यांचे नाव
१.	डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.
२.	श्री. जनार्दन चांदुरकर, वि.प.स.
३.	डॉ. अपुर्व हिरे, वि.प.स.
४.	श्री. किरण पावसकर, वि.प.स.

विवरण क्रमांक ७

सन २०१७ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन
विविध विद्यापीठांवर सदस्यांची नामनियुक्ती

अ.क्र.	विद्यापीठाचे नांव	सदस्यांचे नांव	अधिनियमाचे कलम	नियुक्तीचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.	डॉ. अपुर्व हिरे, वि.प.स.	महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २८ (२) (भ)	७ एप्रिल, २०१७

विवरण क्रमांक–८

विधेयकावरील संयुक्त समितीवर सदस्यांची नामनियुक्ती/समिती नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव

निरंक

विवरण क्रमांक–९

विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव

निरंक

विवरण क्रमांक १०

विविध समित्यांच्या बैठका

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
१.	विधानपरिषद कामकाज सल्लागार समिती	दिनांक २७ फेब्रुवारी २०१७.	(१) समितीने सन २०१७ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात विचार-विनिमय करून सोमवार दिनांक ०६ मार्च, २०१७ ते शुक्रवार, दिनांक ०७ एप्रिल, २०१७ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज निश्चित केले.
		दिनांक १० मार्च, २०१७.	(२) समितीने सन २०१७ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात विचार-विनिमय करून सोमवार दिनांक १४ मार्च, २०१७ ते शुक्रवार, दिनांक ०७ एप्रिल, २०१७ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज निश्चित केले.
२.	लोकलेखा समिती	दिनांक ०१ मार्च, २०१७.	(१) समितीने आपल्या सोळाव्या अहवालाच्या (२०१०-११ महसूली जमा) प्रारुपावर विचार करून ते संमत केले.
		दिनांक १६ मार्च, २०१७.	(२) समितीने आपल्या सतरावा अहवालाच्या (२०१०-२०११ नागरी) प्रारुपावर विचार करून ते संमत केले.
		दिनांक २४ मार्च, २०१७.	(३) समितीने आपल्या अकरावा अहवालाच्या (२००६-२००७ नागरी) प्रारुपावर विचार करून ते संमत केले.
		दिनांक १५ मार्च, २०१७.	(४) समितीने आपल्या एकोणिसावा अहवालाच्या (सन २०१३-२०१४ सामान्य आणि सामाजिक क्षेत्र) प्रारुपावर विचार करून ते संमत केले.
		दिनांक ३१ मार्च, २०१७.	(५) समितीने आपल्या विसावा अहवालाच्या (सन २०१३-२०१४ स्थानिक संस्था) प्रारुपावर विचार करून ते संमत केले.
३.	सार्वजनिक उपक्रम समिती.	दिनांक १७ मार्च, २०१७.	समितीने बारावा व तेरावा अहवालाच्या प्रारुपावर विचारविनिमय करून संमत केला.
४.	अंदाज समिती.	दिनांक ८ मार्च, २०१७.	समितीच्या दुसऱ्या अहवालाचे प्रारुप संमत करण्यात आले.

(१)	(२)	(३)	(४)
५.	अनुसूचित जाती कल्याण समिती.	दिनांक १८ मार्च, २०१७.	समितीने सातवा अहवालाच्या प्रारुपावर चर्चा करून अहवाल संमत करण्यात आला.
६.	विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.	. .	समितीने अकरावा अहवालाच्या प्रारुपावर चर्चा करून अहवाल संमत करण्यात आला.
७.	रोजगार हमी योजना समिती	दिनांक ३० मार्च, २०१७.	समितीने उस्मानाबाद जिल्ह्यासंबंधातील चौथ्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून अहवाल संमत केला.
८.	अनुसूचित जमाती कल्याण समिती.	दिनांक २९ मार्च, २०१७.	समितीने पाचव्या अहवालाच्या प्रारुपावर चर्चा करून अहवाल संमत करण्यात आला.
९.	उप विधान समिती.	. .	समितीने चौथा अहवालाच्या प्रारुपावर चर्चा करून अहवाल संमत करण्यात आला.
७.	महिला व बाल विकास कल्याण समिती.	. .	समितीने सहावा अहवालाच्या प्रारुपावर चर्चा करून अहवाल संमत करण्यात आला.

विवरण क्रमांक–११

मत विभाजन

(म.वि.प. नियम ४१)

दिनांक व प्रभारी सदस्य	प्रस्ताव/ सुधारणा	प्रस्तावाला/ सुधारणेला अनुकूल मत	प्रस्तावाला/ सुधारणेला प्रतिकूल मत	तटस्थ	प्रस्ताव/ सुधारणा संमत की असंमत
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		निरंक			

विवरण क्रमांक–१२

चर्चा समाप्तीचा प्रस्ताव

(म.वि.प. नियम ३८)

निरंक

विवरण क्रमांक–१३

महाराष्ट्र विधान परिषद विशेषाधिकार भंगासंबंधी सूचना

(म.वि.प. नियम २४० अन्वये)

दिनांक ०१/११/२०१४ ते ०१/०६/२०१७ रोजीपर्यंत प्राप्त झालेल्या सूचनाचे विवरण.

सूचनांची संख्या.	अनुमती नाकारलेल्या सूचना.	अनुमती नाकारून मा. मुख्य सचिव यांच्यकडे पुढील कार्यवाही करिता पाठविण्यात आलेल्या सूचना	विशेषाधिकार समितीकडे सुपूर्द केलेल्या एकूण सुचनांची संख्या.	व्यपगत झालेल्या/ प्रकरण संपवण्यात आलेल्या सूचना.	विशेषाधिकार समितीकडे सुपूर्द केलेल्या एकूण सुचना/प्रकरणापैकी सभागृहास अहवाल सादर करण्यात आलेल्या सूचना/प्रकरण.	प्रलंबित सूचनांची संख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
५२	३०	११	१	२	. .	९

मा. मुख्यमंत्री यांचा अहवाल स्वीकारण्याबाबतचा प्रस्ताव अप्राप्त असल्याने प्रंलबित असलेली प्रकरणे

अ.	विषय	सूचना/प्रकरण समितीकडे सुपूर्द केल्याचा दिनांक	अहवाल सभागृहास सादर करण्यात आल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित " महाराज, माफ करा..!! " या पुस्तकातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.	दिनांक ४/४/२०१२.	दिनांक १८/१२/२०१२.	मा. मुख्यमंत्री यांचा अहवाल स्विकारण्या-बाबतचा प्रस्ताव अप्राप्त.
२	श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित " शिवरायांच्या बदनामीची केंद्रे " या पुस्तकातील मजकुरांवर आधारित " लोकप्रभा " अंकामधील प्रा. हरी नरके यांच्या " फॅसिस्ट शक्तींमुळे बहूजनांचे विभाजन " या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.	दिनांक १२/८/२०११.	दिनांक १७/१२/२०१५.	मा. मुख्यमंत्री यांचा अहवाल स्वीकारण्या-बाबतचा प्रस्ताव अप्राप्त.
३	सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी दिनांक २१ मार्च २०१३ रोजी श्री. निखिल वागळे, तत्कालीन संपादक, आय. बी. एन. लोकमत व श्री. राजीव खांडेकर, संपादक, ए. बी. पी. माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.	दिनांक २१/३/२०१३.	दिनांक २२/०६/२०१६.	मा. मुख्यमंत्री यांचा अहवाल स्वीकारण्या-बाबतचा प्रस्ताव अप्राप्त.

महाराष्ट्र विधानपरिषद विशेषाधिकारभंग सूचना

(म.वि.प. नियम २४० अन्वये)

प्रलंबित असलेल्या विशेषाधिकारभंग सूचनांचे विवरणपत्र

(दिनांक १ जून २०१७ पर्यंत अद्ययावत)

महाराष्ट्र विधानपरिषद विशेषाधिकारभंग सूचना

(म.वि.प. नियम २४० अन्वये)

प्रलंबित असलेल्या विशेषाधिकारभंग सूचनांचे विवरणपत्र

(दिनांक १ जून २०१७ पर्यंत अद्ययावत)

अ. क्र. (१)	सूचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यःस्थिती/ निर्णय (५)
१	११५	श्री. अनंत गाडगीळ	वि.प.स.दिनांक २६ नोव्हेंबर २०१४ **रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, रोड्स डीव्हीजन, यांच्याविरुद्ध** या सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " दिनांक २० सप्टेंबर २०१४ रोजी काही कामनिमित्त सन्माननीय सदस्य प्रवास करीत असताना पुणे ते कोल्हापूर या मार्गावरील आनेवाडी येथील टोल नाक्यावर सन्माननीय सदस्यांची गाडी थांबताच व गाडीत स्वतः सन्माननीय सदस्य प्रवास करीत असल्याचे त्यांचे ड्रायव्हरने सांगूनसुद्धा बुथवरील ऑपरेटरने गाडी पुढे सोडण्यास मनाई केली व एका सुपरवायझरला बोलावले, त्याला सन्माननीय सदस्यांचे ओळखपत्र दाखवले. तथापि हा टोल नाका रिलायन्स कंपनीचा असून त्याने आमदार वगैरे आम्ही काही मानत नाही असे उत्तर दिले तसेच आचारसंहिता आहे का? विचारताच तेही कारण नसल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. आमदारांना टोलमधून सूट असतानाही सन्माननीय सदस्यांची गाडी अडवून व त्यांच्याकडून टोल वसुली करून टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा केलेला अवमान व विशेषाधिकार भंग, हा होय.	मा. सभापती यांच्या निदेशानुसार सूचना प्रलंबित ठेवण्यात आली आहे.

जुलै, २०१५ व त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना

२	१२८	ॲड. निरंजन वसंत डावखरे, वि.प.स. दिनांक ६ नोव्हेंबर २०१५	**श्री. दिलीप नेरकर, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, ता. डहाणू जि. पालघर तसेच श्री. सुधींद्र कारजोळ, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, ता. तलासरी, जि. पालघर यांचेविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " तलासरी तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा गिरगाव, जि. पालघर येथे भूमिपूजन संकुलनाचा सोहळा दिनांक ३० ऑक्टोबर २०१५ रोजी आयोजित करण्यात आला होता. मात्र सदर कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधींना ऐनवेळी दूध्वनीवरुन कळविण्यात आल्याने तसेच निमंत्रण पत्रिकेवर छापण्यात आलेल्या मान्यवरांच्या नावामध्ये श्री. वसंत डावखरे, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे नाव योग्य राजशिष्टाचारानुसार छापण्यात न आल्याने झालेला सार्वभौम सभागृहाचा अवमान व विशेषाधिकार भंग हा होय.	श्री. सुधींद्र कारजोळ, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांचा खुलासा अप्राप्त.
३	१३४	श्री. शरद नामदेव रणपिसे, वि.प.स. दिनांक ९/३/२०१६	**श्री. संजय कुमार, तत्कालीन प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजेमंगळवार, दिनांक १४ जुलै २०१५ रोजी विधानपरिषद सभागृहात प्रश्नोत्तरांचा तास झाला नाही. त्यामुळे सदर दिवसाची तारांकित प्रश्नोत्तराची यादी दिनांक १६ जुलै २०१५ रोजी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. त्यातील सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या व प्राथम्य क्रमांक ३ वर असलेल्या ' राज्यातील अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या सहित्याची नियमबाह्य खरेदी ' या विषयावरील तारांकित प्रश्न क्र. ६६५८ च्या प्रश्न भाग दोनला दिलेल्या उत्तरात ' खरेदी करण्यासाठी देण्यात आलेली मान्यता नियमानुसार देण्यात आली आहे ' असे उत्तर शासनामार्फत देण्यात आले मात्र नियमानुसार खरेदी झालेली नसतानासुद्धा " नियमानुसार सदर मान्यता देण्यात	मा. सभापती यांना अहवाल सादर करण्यासाठी समितीकडे सुपूर्द

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती/ निर्णय (५)
			आली आहे " असे असत्य व दिशाभूल करणारे उत्तर या प्रश्नास शासनामार्फत विधानपरिषद सभागृहात देण्यात आल्याने झालेला सार्वभौम सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."	
			जुलै, २०१६ चे अधिवेशन व त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना	
४	१४२	सर्वश्री प्रवीण दरेकर, सुजितसिंह ठाकूर भाई गिरकर, वि.प.स. दिनांक २०/७/२०१६	**श्री. नारायण राणे, वि.प.स. यांचेविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " मंगळवार दिनांक १९ जुलै २०१६ रोजी विधानपरिषद सभागृहामध्ये नियम, ९७ अन्वये चर्चा सुरू असताना सभागृहाची बैठक सायंकाळी ६-०० वा स्थगित करावी असा मुद्दा उपस्थित झाला असताना मा. तालिका सभापतींनी सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी ७-०० वाजेपर्यंत असल्याचे मा. सभापतींचे तसे निर्देश असल्याचे सांगितले असतांना सन्माननीय सदस्य श्री. नारायण राणे यांनी माननीय सभापती महोदयांच्या निर्देशांबाबत आक्षेपार्ह व आव्हानात्मक वक्त निदेशांवर गंभीर मा. सभापतींचे टिका टीपणी केल्याने झालेलामा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व सार्वभौम सभागृहाचा अवमान व विशेषाधिकार भंग हा होय."	खुलासा अप्राप्त.
५	१४३	सर्वश्री प्रवीण दरेकर, सुजितसिंह ठाकूर, भाई गिरकर, वि.प.स.	**श्री. नारायण राणे, वि.प.स. यांचेविरूद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " दिनांक १९/७/२०१६ रोजीच्या नियम ९७ वरील चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्य श्री. नारायण राणे यांनी सदनातील मंत्रिमंडळात असणारे सदस्य, भारतीय जनता पक्षाचे सदनातील सदस्य यांच्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह व बदनामीकारक	खुलासा अप्राप्त.

		दिनांक २०/७/२०१६	विधाने केली, मंत्रिमहोदयांवर घृणास्पद आरोप केले व याप्रमाणे एकूणच अतिशय अवमानकारक वक्त करून मंत्रिमंडळातील सन्माननीय सदस्यांचा व सदनातील भारतीय जनता पक्षाचे सदस्य यांची प्रतिमा जनमानसात मलीन केल्याने झालेला सन्माननीय सदस्य व सार्वभौम सभागृहाचा अवमान व विशेषाधिकारभंग हा होय.	

सन २०१६ पाचवे (हिवाळी) अधिवेशन व त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना

६	१५४	श्री. धनंजय मुंडे, मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद दिनांक १६/१२/२०१६	**प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन २०१६ च्या वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयकावर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०८ मधील तरतुदींच्या अधीनतेने विधानपरिषदेने तयार केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम, ११९ (२) नुसार प्रवर समिती नेमण्याबाबत मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी मांडलेल्या व विधानपरिषदेने बहुमताने संमत केलेल्या घटनात्मक प्रस्तावाच्या विपरीत सदर प्रवर समिती न नेमण्याची कृती करण्यात आली व बहुमताची अवहेलना करून, व विधानपरिषदेच्या घटनात्मक निर्णयाचा अनादर करून सार्वभौम सभागृहाचा घटनात्मक निर्णय झुगारून देण्यात आला. या निर्णयाबाबत श्री. इ. सि. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी पत्राद्वारे सभागृहाच्या विधेयकावर प्रवर समिती नेमण्याबाबतच्या घटनात्मक कार्यवाहीबाबत अप्रस्तुत (uncalled) टिकाटिप्पणी करून सभागृहाची प्रवर समिती नेमण्याबाबतची कार्यवाही प्रश्नास्पद करून व सभागृहाच्या कार्यवाहीची अवहेलना करीत पत्रातील आक्षपार्ह वक्तव्यांद्वारे विधानपरिषद सभागृहाच्या घटनात्मक सार्वभौमत्वाला व सभागृहाच्या अस्मितेलाच आव्हान करून सभागृहाच्या कार्यवाहीला असांविधानिक, बेकायदेशीर, संसदीय कार्यप्रणालीला धरून नसलेली व ज्यावर कार्यवाही करण्याची	अनुमती नाकारण्यासाठी प्रस्तावित.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
			आवश्यकता नाही अशी ठरवून एकूणच सभागृहाची कार्यवाही उद्दामपणे प्रश्नास्पद करून सभागृहाच्या घट-ात्मक अधिकारीतेचा अधिक्षेप केल्याने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. विरोधी पक्षनेते, सार्वभौम सभागृह तसेच सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.	
७	१५५	श्री. हेमंत टकले, वि.प.स. दिनांक १६/१२/२०१६	**प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन २०१६ च्या वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयकावर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०८ मधील तरतुदींच्या अधिनतेने विधानपरिषदेने तयार केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम, ११९ (२) नुसार प्रवर समिती नेमण्याबाबत मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी मांडलेल्या व विधान परिषदेने बहुमताने समंत केलेल्या घटनात्मक प्रस्तावाच्या विपरित सदर प्रवर समिती न नेमण्याची कृती करण्यात आली व बहुमताची अवहेलना करून व विधान परिषदेच्या घटनात्मक निर्णयाचा अनादर करून सार्वभौम सभागृहाचा घटनात्मक निर्णय झुगारुन देण्यात आला. या निर्णयाबाबत श्री. इ. सि. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी पत्राद्वारे सभागृहाच्या विधेयकावर प्रवर समिती नेमण्याबाबतच्या घटनात्मक कार्यवाहीबाबत अप्रस्तुत (uncalled) टिकाटिपणी करून सभागृहाची प्रवर समिती नेमण्याबाबतची कार्यवाही	अनुमती नाकारण्यासाठी प्रस्तावीत.

			प्रश्नास्पद करून व सभागृहाच्या कार्यवाहीची अवहेलना करीत पत्रातील अक्षपार्ह वक्तव्यांद्वारे विधान परिषद सभागृहाच्या घटनात्मक सार्वभौमत्वाला व सभागृहाच्या अस्मितेलाच आव्हान करून सभागृहाच्या कार्यवाहीला असंविधानिक, बेकायदेशीर, संसदीय कार्यप्रणालीला धरून नसलेली व ज्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही अशी ठरवून एकूणच सभागृहाची कार्यवाही उद्दामपणे प्रश्नास्पद करून सभागृहाच्या घटनात्मक अधिकारीतेचा अधिक्षेप केल्याने मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.विरोधी पक्षनेते, सार्वभौम सभागृह तसेच सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.	
८	१५६	श्री. अमरसिंह शिवाजीराव पंडित, वि.प.स. दिनांक ३/१/२०१७	**श्री. शिवाजी चव्हाण, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड यांचेविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " सन २०१५-२०१६ मध्ये बीड जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाई असताना या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेल्या कोटयवधीच्या गैरव्यवहाराबाबत दिनांक १६ डिसेंबर २०१६ रोजी विधानपरिषद सभागृहात तारांकित प्रश्न क्र. २३८३२ संदर्भात झालेल्या प्रश्नोत्तरात मा.मंत्री महोदयांनी या प्रकरणातील मुख्य सुत्रधार श्री. शिवाजी चव्हाण, कार्यकारी अभियंता यांना निलंबित करण्यात येत असल्याचे आश्वासित करुनही त्यांचेविरुद्ध कारवाई न झाल्याने, तसेच यासंदर्भात श्री. शिवाजी चव्हाण, कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १७ डिसेंबर २०१६ रोजीच्या "दिव्य मराठी" या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातमीमध्ये या प्रकरणी अनावश्यक खुलासा करून सभागृहातील चर्चेबाबत टिकाटिप्पणी करीत सन्माननीय सदस्यांची प्रतिमा जनमानसात मलीन केल्याने झालेला अवमान व विशेषाधिकार भंग, हा होय."	खुलासा प्राप्त प्रोसेस.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
			मार्च, २०१७	
९	१६१	श्री. शरद नामदेव रणपिसे, वि.प.स. दिनांक २९/३/२०१७.	**श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१, मुंबई तसेच श्री. विलास गंगावणे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन, मुंबई यांचेविरुद्ध** सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "औरंगाबाद येथील शेतकरी श्री. रामेश्वर हरिभाऊ भुसारे यांच्या शेडनेट व पॉलीहाऊसचे गारपिटीमुळे नुकसान झाल्याने नुकसान भरपाईच्या मागणीसाठी ते दिनांक २३ मार्च २०१७ रोजी मंत्रालयात मा. मुख्यमंत्र्याना निवेदन देण्यासाठी गेले असता मंत्रालयातील पोलिसांनी त्यांना बेदम मारहाण केल्याबाबतची बातमी विविध वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली होती. विधानभवन, मुंबई येथे अर्थसंकल्पिय अधिवेशन चालू असल्यामुळे सदरहू शेतकऱ्याला झालेल्या मारहानीबाबत सन्माननीय सदस्यांसह मा. श्री. अजित पवार, माजी मुख्यमंत्री, श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा, श्री. धनंजय मुंडे, मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद, श्री.जयंत पाटील, वि.स.स, श्री. नसीम खान, वि.स.स, श्री. कपिल पाटील, वि.प.स, श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांच्यासह इतर सन्माननीय सदस्य हे सदर घटनेची माहिती जाणून घेण्यासाठी मरीन ड्राईव्ह, पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. श्री.रामेश्वर भुसारे हे त्याच पोलीस स्टेशनमध्ये	खुलासा प्राप्त प्रोसेस.

पोलीस कस्टडीत असूनही संबंधित अधिकाऱ्यांनी श्री.भुसारे यांना न्यायालयात घेऊन गेले असल्याचे बेजबाबदार उत्तर देऊन असत्य व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.

जानेवारी, २०१७ नंतर अनुमती नाकारण्यात आलेल्या सूचना.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
१	११७	डॉ. दिपक सावंत, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, दि.२५/३/२०१५	दैनिक "लोकसत्ता" वृत्तपत्राचे संपादक व वार्ताहर श्री. मधु कांबळे यांचेविरुद्ध डॉ. दिपक सावंत, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सदरहू बाब विधानपरिषद सभागृहात नियम ४७ अन्वये दिनांक २५/३/२०१५ रोजी सभागृहात उपस्थित केली. सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "बुधवार, दिनांक २५/३/२०१५ रोजीच्या दैनिक "लोकसत्ता" या वृत्तपत्रात पहिल्याच पानावर ठळकपणे प्रसिद्ध झालेल्या "गृहराज्यमंत्र्याच्या मालमत्तेची गुप्त चौकशी" या शीर्षकाखाली आलेल्या बाबतीत मा.ना.डॉ. रणजित पाटील, गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे ऐवजी डॉ. दिपक सावंत, मा. सार्वजनिक आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचा फोटो छापल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकारभंग हा होय.	अनुमती नाकारली दिनांक ३१/३/२०१७.
२	१२२	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दि. ५/६/२०१५	सन्माननीय विधानपरिषद सदस्य, श्री. नागो गाणार यांनी श्री. आर. एस. खैरे, पोलीस उप महानिरीक्षक (प्रशासन), अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील (C.I.D.) छायाचित्रण विभागासंबंधीच्या विविध समस्याबाबत सन्माननीय सदस्य, श्री. नागो गाणार व सन्माननीय सदस्य, श्री.अनिल सोले यांनी विधान परिषद सभागृहात उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २७७१ व अतारांकित प्रश्न क्र. ५११८ यांना उत्तर देताना तसेच नोव्हेंबर, २०१४ ते आजपर्यंत सन्माननीय सदस्यांनी केलेल्या विविध पत्र व्यवहाराला श्री. खैरे यांनी चुकीची व दिशाभूल करणारी उत्तरे देऊन तसेच फक्त हस्ताक्षर विभागारपुतीच उत्तरे देऊन छायाचित्रण विभागावर	अनुमती नाकारली दिनांक ७/४/२०१७.

झालेल्या अन्यायाची माहिती दडवून ठेवल्याने सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय.

३.	१३७	श्री. अमरसिंह शिवाजीराव पंडित, वि.प.स. दिनांक २१/०५/२०१६	श्री. डी. टी. छत्रीकर, विभागीय सहनिबंधक (लेखा परिक्षण), औरंगाबद, श्री. ए. एल. घोलकर, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या., बीड या बँकेला खरीप २०१४ च्या हंगामासाठी भारतीय विमा कंपनीने रु.२५१ कोटी विम्याची रक्कम मंजुर करून पात्र शेतकऱ्यांना वाटपासाठी बँकेछया खात्यावर जमा केली परंतु ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांना वाटप न करता उक्त बँकेने बेकायदेशिररित्या सदर रक्कमची गुंतवणूक इतर व्यापारी बँकेत केली. याबाबतीत विमा कंपनीने पंधरा दिवसांत उक्त रकमेचे वाटप करण्याचे निर्देश बँकेला दिलेले असतानाही त्याचे पालन बँकेने केले नाही. तसेच पिक नुकसान भरपाई पोटी शासनाने मंजूर केलेली ३३६ कोटी रुपयांची रकमही पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्यास बँकेने दिरंगाई केल्यामुळे याच्यासंदर्भत मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात दि. २२/१२/२०१५ रोजी विधानभवन, नागपूर येथे झालेल्या बैठकीमध्ये बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पिक विमा निधी नियमबाह्यरित्या खाजगी बँकेत गुंतवणुक केली असल्याचे आढळून आल्याने चाचणी लेखा परिक्षण करणे बाबतचा निर्णय घेण्यात आला व उक्त बाबतीत चौकशी करून समितीचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा असे निर्देश मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिले. तसेच उक्त विषयाच्या बाबतीत तारांकित प्रश्न क्र. १६०९७ स्वीकृत झाला असून दिनांक १७/३/२०१६ च्या प्रश्नोत्तराच्या यादीत प्रश्न क्रमांक ६८ वर याचे लेखी उत्तर देण्यात आले व त्या प्रश्नातील मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने हिवाळी अधिवेशन, २०१५ च्या कालावधीत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत बैठक होवून पिक विमा व खरीप हंगाम अनुदान २०१४ च्या वाटपाबाबत बँकेचे चाचणी लेखापरिक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले, हेही खरे आहे काय?	अनुमती नाकारली दिनांक ७/४/२०१७.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
			असा प्रश्न विचारण्यात आला. त्याला सदर प्रकरणी मा. सभापती, विधानपरिषद यांनी सहकार विभागाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात यावी अथवा औरंगाबाद विभागाच्या बाहेर कार्यरत असलेल्या तीन अधिकाऱ्याच्या समितमार्फत चौकशी करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत' असे लेखी उत्तर दिले गेले. वास्तविक चाचणी लेखा परिक्षण आणि चौकशी यामध्ये तफावत असून या दोन्ही बाबी भिन्न आहेत याची जाण सहकार विभागातील श्री. डी. टी. छत्रीकर, विभागीय सह निबंधक (लेखापरिक्षण), औरंगाबाद. श्री. ए. एल. घोलकर, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था बीड यांना असतानाही आणि ते स्वत: मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली नमुद केलेल्या बैठकीला उपस्थित असतानासुद्धा त्यांनी प्रश्नाचे लेखी उत्तर तयार करून असे उत्तर देणे हे सभागृहाचा अवमान करण्यासारखे तसेच संबंधित बँकेत झालेला भ्रष्टाचार दडविणे, यापूर्वी झालेल्या चौकशीवर पांघरून घालणे आणि आर्थिक गैरव्यवहार करणारांशी संगमत करून त्यांना पाठिशी घालण्यासाठी जाणीवपूर्वक खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती सभागृहाला माहिती दिल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग, हा होय."	
४.	१४०	श्री. नागोराव गाणार, वि.प.स.	प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, शासकीय परिचर्या विद्यालयातील प्राध्यापकांच्या पद भरती संबंधात मा. वैद्यकीय	अनुमती नाकारली दिनांक

		दिनांक २४/६/२०१६	शिक्षण मंत्री यांच्यासमवेत सन्माननीय सदस्यांसह इतर सन्माननीय सदस्यांच्या उपस्थित दिनांक १५/१२/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यासंदर्भात दिनांक २१/१२/२०१५ रोजी सभागृहात सादर केलेल्या तारांकित प्रश्नाला मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराप्रकरणी दिनांक २१/१२/२०१५ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाबाबत कोणतीही अंमलबजावणी झाली नसल्याने तसेच सन्माननीय सदस्यांनी मा.मंत्री महोदयांना दोन वेळा पत्र देऊन कोणतीही कारवाई न केल्याने सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय.	२५/५/२०१७.
५.	१४१	श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. दिनांक २/७/२०१६	मा. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री श्री. प्रविण पोटे-पाटील यांच्याविरूद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे," दिनांक ६/४/२०१६ रोजी सन्माननीय सदस्यांनी श्रीवर्धन (जि. रायगड) येथील समुद्र किनारा सुशोभिकरणाच्या कामामध्ये विकास कामे दुर्लक्षित करून निकृष्ट दर्जाचे काम करणे या विषयावर उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भात मा. मंत्री महोदयांनी १५ दिवसांच्या आत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासित केल्यावर सुद्धा त्यावर कोणतीही कार्यवाही न केल्याने तसेच लोकप्रतिनिधी म्हणून सन्माननीय सदस्यांनी समुद्र किनारा सुशोभिकरणाचे काम त्वरित पूर्ण करून ते स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरित करण्याबाबत शासनाकडे विनंती केली असतानाही मा. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांनी जाणूनबूजून उक्त बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा अवमान व विशेषाधिकार भंग हा होय.	अनुमती नाकारली दिनांक २४/३/२०१७
६.	१४६	श्री. प्रवीण दरेकर,	मा.ना.श्री.सुभाष देसाई, उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, मंगळवार, दिनांक १९/७/२०१६ रोजी विधानपरिषद	अनुमती नाकारली

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
		वि.प.स. दिनांक २०/७/२०१६	सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासामध्ये तारांकित प्रश्न क्र. २०६०१ "भोसरी (ता. जि. पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीतील गट/सर्व्हे नं. ५२ अथवा तत्सम भूमापन क्रमांकाचे भूखंड बेकायदेशीर खरेदी केल्याबाबत" या श्री.संजय दत्त, वि.प.स. व इतर वि.प.स. यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये म.औ.वि.म. भोसरी येथील औद्योगिक वसाहती गट/ सर्व्हे नं. ५२ अथवा तत्सम भूमापन क्रमांकाचे भूखंड अनधिकृतरित्या खरेदी केल्याबाबत माहे एप्रिल व मे, २०१६ मा. उद्योगमंत्री मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय?, याबाबत ना.श्री.सुभाष देसाई यांनी होय, निदर्शनास आले आहे हे खरे आहे असे उत्तर दिले होते. वास्तविक पहाता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भोसरी, ता., जि. पुणे येथील जमीन खरेदी व्यवहाराची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी शासनाने मा.उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायमूर्ती डी.एस. झोटींग यांची दिनांक २३.६.२०१६ च्या आदेशान्वये नियुक्ती केली असून याबाबत समितीला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत दिली असतानाही मा.मंत्री महोदयांनी प्रश्नास असत्य व दिशाभूल करणारे उत्तर दिल्याने सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय."	दिनांक २४/०४/२०१७.
७.	१५१	श्री. नागोराव गाणार, वि.प.स.	श्री. रामचंद्र गणपत गुंजाळ, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याविरुद्ध श्री. नागो पुंडलिक गाणार हे विधानपरिषद सदस्य असताना "अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकड्यामधील	विधानपरिषद सभागृहाचे सदस्यत्व दिनांक

		दिनांक ४/११/२०१६	शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरसकट २० टक्के वेतन अनुदान गणपती पूर्वी देण्यात येईल अशी घोषणा तारांकित प्रश्नाच्या उत्तरात मा.मंत्री शिक्षण व क्रीडा विभाग यांनी सभागृहात केली होती व या घोषणेची पूर्तता करण्याबाबत आवश्यक असलेला शासन निर्णय दिनांक ५ सप्टेंबर, २०१६ पूर्वी निर्गमित न करता दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी निर्गमित केल्याने मा. मंत्री महोदयांनी सभागृहात केलेली घोषणा अमलात न आल्याने" सभागृहाचा तसेच सन्माननीय सदस्यांचा अवमान व विशेषाधिकार भंग.	५ डिसेंबर, २०१६ रोजी समाप्त झाले असल्यान सूचना व्यपगत करण्यात आली. दिनांक २७/१/२०१७.
८.	१५२	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक २३/११/२०१६	संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांच्याविरुद्ध विशेषाधिकार-भंगाची सूचना दिली होती. श्री. नागो पुंडलिक गाणार हे विधानपरिषद सदस्य असताना "परिचर्या महाविद्यालयातील बी.एस्सी नर्सींग ४ वर्षे व एम्.एस्सी नर्सींग २ वर्ष (नागपूर) अभ्यासक्रम सुरू करण्यास एकूण ४४ पदांना शासन मंजुरी देण्याबाबत व सदर पदातील प्राध्यापकांची एकूण ३३ पदे भरती करण्याकरिता विभागीय निवड समिती गठित करून ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यक्षेत्रातून काढून सध्या कार्यरत असलेल्या पाठ्य निर्देशीका मधून भरण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाचे मान्यतेकरिता सादर करण्यात आल्याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी सभागृहात देऊनही संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी सदर आदेशाचे पालन न केल्याने" सभागृहाचा तसेच सन्माननीय सदस्यांचा अवमान व विशेषाधिकार भंग.	विधानपरिषद सभागृहाचे सदस्यत्व दिनांक ५ डिसेंबर २०१६ रोजी समाप्त झाले असल्याने सूचना व्यपगत करण्यात आली. दिनांक २७/१/२०१७.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यःस्थिती/ निर्णय (५)
९.	१५३	श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. दिनांक ९/१२/२०१६	महाराष्ट्र शासन यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित करण्यात आलेला मुख्य मुद्दा म्हणजे, गिरणा (जि.नाशिक) प्रकल्पातील सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याबाबत तारांकित प्रश्नातील मुद्दा क्र. १ बाबत सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावांमधील नागरी सुविधा कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मुल्यमापन समितीकडे पाठविण्यात येत नसल्याबाबत तसेच सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सद्यःस्थितीत पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही व या संदर्भात नियोजन विभागाच्या सूचनांनुसार सदर मूल्यमापन समितीमार्फत आढावा घेण्यात येत असून मूल्यमापन समितीच्या मान्यतेनंतर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल असे उत्तर देऊन सभागृहाची दिशाभूल केल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय.	सूचना दप्तरदाखल करण्यात आली. दिनांक १०/३/२०१७.
१०.	१५९	श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. दिनांक ९/३/२०१७	चित्रपट दिग्दर्शक श्री. रामगोपाल वर्मा यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दिनांक ०८ मार्च,२०१७ हा जगात जागतिक पातळीवर महिला दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जात असताना या महिला दिनी चित्रपट दिग्दर्शक श्री. रामगोपाल वर्मा यांनी समस्त महिलांविषयी आक्षेपार्ह, निंदनिय व अत्यंत घृणास्पद वक्तव्य करून तमाम महिला वर्गाचा तसेच सन्माननीय सदस्या यांचा झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."	अनुमती नाकारली. दिनांक २४/३/२०१७.

११.	१६०	सर्वश्री शरद रणपिसे व संजय दत्त वि.प.स. दिनांक १७/३/२०१७	श्रीमती अरूंधती भट्टाचार्य, भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका यांचेविरूद्ध सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्रीमती अरुंधती भट्टाचार्य, भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यास देशातील कर्जवाटप व वसुलीच्या शिस्तीला धक्का बसेल आणि भविष्यात हा पायंडाच पडून जाईल तसेच सरकारने एकदा कर्जमाफीचा निर्णय घेतला की हा विषय इथंच संपणार नाही. यावेळी सरकार कर्जाची परतफेड करेल, मात्र भविष्यात शेतकरी पुन्हा कर्ज घेतील आणि त्याच्या वसुलीसाठी आम्हाला पुढच्या निवडणुकीची वाट पहावी लागेल, यातून अत्यंत चुकीचा पायंडा पडेल. घेतलेलं कर्ज फेडायचं असतं हेच लोक विसरुन जातील आणि दिलेल कर्ज कायम थकीत राहील" असे देशातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल वक्तव्य केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.	अनुमती नाकारली दिनांक ३१/०३/२०१७.
१२.	१६३	श्री. भाई जगताप, वि.प.स. दिनांक १/४/२०१७.	इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ. पार्थिव संघवी तसेच डॉ. आर. एस. लोंढे यांचेविरूद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, राज्यातील निवासी डॉक्टरांवर हल्ले होत असल्यासंदर्भात झी २४ तास वृत्तवाहिनीवर डॉक्टर व रुग्णांच्या सेवा या विषयावर दि. २३ मार्च, २०१७ रोजी "रोखठोक" हा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमात इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ. पार्थिव संघवी तसेच डॉ. आर. एस. लोंढे यांनी चर्चेत भाग घेताना झी २४ तासच्या टीमने शासनाकडून भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन हा कार्यक्रम आयोजित केला आहे. तसेच झी २४ तासचे कार्यकारी संपादक डॉ. उदय निरगुडकर व त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही वैद्यकीय सेवा देऊ नये याबाबतचा एस.एम.एस. संदेश ४० हजार डॉक्टरांना पाठवून कोणतीही शहानिशा न करता अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने पत्रकारितेचा तसेच सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय."	अनुमती नाकारली. दिनांक २५/५/२०१७.

अ. क्र. (१)	सूचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
१३.	१६४	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक ३/४/२०१७	प्रधान सचिव, वित्त विभाग तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, राज्यातील खाजगी अनुदान प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचे विधेयक तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडले होते व दोन्ही सभागृहांनी या विधेयकाला मंजुरी दिली होती. त्यानुसार राज्यातील अनुदान प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०४/१९६६ पासून महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन देय 'ठविण्यात आले होते. परंतु वित्त विभागाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ ला तसेच शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २९/११/२०१० ला नवीन शासन निर्णय निर्गमित करून खाजगी प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा हक्क दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून काढून घेऊन दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून नवीन परिभाषित अंशदायी पेंशन योजना लागू केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग हा होय."	अनुमती नाकारली. दिनांक २५/५/२०१७

जानेवारी, २०१७ नंतर अनुमती नाकारण्यात आलेल्या व मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठवण्यात आलेल्या सूचना.

१.	१३८	श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. दिनांक १५/६/२०१६.	श्री. शांताराम घोगळे, पोलीस उपनिरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, कांदिवली (पश्चिम), मुंबई यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, दिनांक ५ जून, २०१६ रोजी दुपारी १.३० वाजताच्या दरम्यान मा.सदस्यांच्या कार्यालयात येऊन काही महिलांनी त्यांच्या सोसायटीतील रहिवाशी श्री.महेश म्हात्रे त्यांना नाहक त्रास देत असल्याची तक्रार मा.सदस्यांकडे केली असता मा. सदस्यांनी त्यांना कांदिवली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महावीरनगर बीट चौकीत जाऊन उक्त प्रकरणाची तक्रार नोंदविण्यास सांगितले व मा.सदस्यांनी स्वतः त्या चौकीत कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक श्री. शांताराम घोगळे यांना दूरध्वनीवरून संबंधित महिलांना मदत देण्यास सांगितले. परंतु पोलीस उपनिरीक्षक श्री. शांताराम घोगळे यांनी त्या महिलांना मदत देण्याऐवजी उलटा दम भरला व त्यांची तक्रार नोंद करून न घेतल्याने त्या महिला पुन्हा मा.सदस्यांकडे गेले व उक्त प्रकरणाबाबत त्यांना सांगितले व पुन्हा मा.सदस्यांनी श्री.शांताराम घोगळे, पोलीस उपनिरीक्षक यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्याबाबत विचारणा केली. तेव्हा पोलीस उपनिरिक्षक यांनी "तुम्ही आमदार असला तर तुमच्या घरचे, मला शिकवू नका" असे त्यांच्याशी उद्धटपणे संभाषण केले व तक्रारदार महिलांना न्याय देण्याच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही केली नाही. श्री. शांताराम घोगळे, पोलीस उपनिरीक्षक यांनी मा. सदस्यांना अशा प्रकारे उद्धट व अवमानास्पद वागणूक दिल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग, हा होय."	अनुमती नाकारली दिनांक २३/२/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २३/२/२०१७

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
२.	१३९	श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. दिनांक ४/६/२०१६	श्री. इंगोले मुख्याधिकारी, वाशिम नगरपरिषद, यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "वाशिम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. इंगोले यांचेवर नगरपरिषदेची प्रोसिंडिंग बुक गहाळ केल्याबाबतची तक्रार सन २०१० मध्ये प्राप्त झाली होती. व याबाबत सदर विषयावर विधिमंडळात लक्षवेधी सूचना दिली होती. त्यावर तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री यांनी श्री. इंगोले यांना प्रोसिडिंग बुक गहाळ केल्याबाबत तात्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही न करता त्यांना पुन्हा २०१५ मध्ये वाशिम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी म्हणून नेमणूक केल्याने व शासनाच्या प्रत्येक निधीमध्ये व वाशिम शहराच्या महत्वाकांक्षी भूमिगत गटार योजनेत सुद्धा त्यांनी विशिष्ठ व्यक्तींचे हित जोपासल्याचे निदर्शनास आल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी उपरोक्त कामांची माहिती मागवूनही ती उपलब्ध करून न दिल्याने सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग, हा होय."	अनुमती नाकारली दिनांक २३/२/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २३/२/२०१७
३.	१४४	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक २१/६/२०१६	१ श्री. महेश करजगांवकर, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर २ श्री. निर्गुशा ठमके, शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.,नागपूर ३ श्री. सोमेश्वर नैताम, शिक्षणाधिकारी (प्रा..) जि.प.,नागपूर ४ श्री. गुढे, शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.,नागपूर ५ शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र शासन, पुणे यांच्याविरुद्ध	अनुमती नाकारली दिनांक २५/०५/२०१७ मा. मुख्य सचिव

			सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात लक्षवेधी सूचना, ९३ ची सूचना विशेष उल्लेख व तारांकित प्रश्न मांडून उपरोक्त चारही अधिकाऱ्यांविरूद्ध भ्रष्टाचाराची माहिती दिली होती. त्यामुळे मार्च-एप्रिल, २०१६ च्या अंदाज पत्रकीय अधिवेशनात श्री. महेश करजगांवकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभाग यांना निलंबित करण्यात आले, परंतु त्यांच्याविरुद्ध सुरू असलेली चौकशी संथ गतीने सुरू असून ते चौकशीच्या कामकाजात प्रभाग टाकून आरोपातून मुक्त होतील अशी व्यवस्था करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच श्री. सोमेश्वर नैताम, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प., नागपूर व श्री. गुढे, शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प., नागपूर यांना निलंबित केले असून त्यांच्याविरुद्ध सुरू असलेली चौकशीसुद्धा जाणीवपूर्वक संथगतीने करण्यात येत असून त्याबाबत आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचेही निदर्शनास येते.	यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २५/०५/२०१७
४.	१४५	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक २६/६/२०१६	श्रीमती माधवी खोडे, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, अनुदानित आदिवासी आश्रम शाळा कर्मचारी संघटना जिल्हा गोंदिया/भंडारा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ या संघटनांच्या वतीने दिनांक २४/०६/२०१६ रोजी "काम नाही वेतन नाही" या शासन निर्णयाच्या विरोधात धडकमोर्चा काढण्यात येऊन त्यानंतर धरणे आंदोलन करण्यात आले होते. तसेच धडकमोर्चा व आंदोलनाचे निवेदन देण्यासाठी पोलीस विभागामार्फत सन्माननीय सदस्य तसेच माजी आमदार श्री.विश्वनाथ डायगव्हाणे व इतर अधिकारी यांना अपर आयुक्त आदिवासी विकास, नागपूर विभाग येथील कार्यालयात घेऊन गेले असता अपर आयुक्त, कार्यालयात उपस्थित नव्हत्या व निवेदन घेण्यास सक्षम अधिकारीही उपस्थित नव्हते.	अनुमती नाकारली दिनांक २४/०४/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले.दिनांक २४/०४/२०१७.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
			पोलीस विभागामार्फत निवेदन देण्यासाठी शिष्टमंडळ येणार असल्याचे व शिष्ट-मंडळासमवेत स्वतः सन्माननीय सदस्य येत असल्याचे माहित असूनही अप्पर विकास, नागपूर आयुक्त आदिवासीया त्यांच्या कार्यालयात उपस्थित न राहील्याने तसेच निवेदन स्विकारण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था न केल्याने सन्माननीय सदस्यांचा व सार्वभौम सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय."	
५.	१४७	श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. दिनांक २०/७/२०१६	श्री.एस.के.घोनमोडे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ औरंगाबाद यांचेविरूद्ध) सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " दिनांक ५/७/२०१६ रोजी सन्माननीय सदस्यांनी कार्यालयीन कामकाजासाठी ओळख देवून भेटण्यासाठी मोबाईलवरून श्री.एस.के.घोनमोडे यांच्याशी संपर्क साधून सायंकाळी ५.०० वा. भाटीची वेळ निश्चित केली होती. त्यानुषंगाने सन्माननीय सदस्यांनी ४.४५ वा. श्री. एस.के. घोनमोडे यांना फोनवर भेटीस येत असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी मा. सदस्यांना ते कोर्टात असल्याचे सांगितले परंतु प्रत्यक्षात श्री. एस.के.घोनमोडे हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित असल्याचे सन्माननीय सदस्यांना समजले. तसेच दिनांक ९/७/२०१६ रोजी भेटीस येथून सन्माननीय सदस्यांनी दुपारी ४.२० वा. मोबाईलवरून कार्यालयीन कामकाजाबाबत श्री.एस.के.घोनमोडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सन्माननीय सदस्यांना मी सध्या कामात आहे मला आपणाबरोबर बोलण्यास वेळ नाही असे उद्धटपणे उत्तर दिले. कार्यालयीन कामकाज महत्त्वाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुन्हा श्री. एस.के.घोनमोडे	अनुमती नाकारली दिनांक २९/३/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २९/३/२०१७.

			यांना ४.२० वा. फोन लावला त्यावेळी फोनवर असलेल्या अधिकाऱ्यांनी श्री. एस.के.घोनमोडे प्रत्यक्षात केबिनमध्ये बसलेले असतानाही अध्यक्ष साहेब त्यांच्या केबीनमध्ये नाही असे सांगितले असून श्री. एस.के.घोनमोडे यांनी सन्माननीय सदस्यांशी गैरवर्तन केल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय."	
६.	१४८	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक १/८/२०१६	श्री. प्रकाश मुंकुद, शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद अकोला यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, शिक्षण विभागाचा जनप्रतिनिधी या नात्याने सन्माननीय सदस्यांनी सिद्धार्थ विद्यालय, हनुमान नगर, उमरी, अकोला या शासन मान्य व अनुदानप्राप्त शाळेतील मुख्याध्यापक पदाचे अर्थिक व प्रशासकिय अधिकार, सेवाज्येष्ठ शिक्षकांना देण्याबाबत दिनांक २३/०३/२०१५, दिनांक ०५/११/२०१५ व दि.०९/०६/२०१६ रोजी पत्र देऊनही त्यांच्या पत्रांची दखल न घेतल्याने तसेच पत्रांना साधी पोचही न दिल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग हा होय."	अनुमती नाकारली दिनांक २५/०५/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २५/०५/२०१७
७.	१५७	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक ७/३/२०१७	वरिष्ठ पोलीस निरिक्षक, धंतोली पोलीस स्टेशन, धंतोली, नागपूर, जि. नागपूर यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्री.वृशाल केवळराम किरणापुरे, राहणार आरमोरी, जि. गडचिरोली या सुशिक्षित बेरोजगारास नोकरी देण्याचे अमिष दाखवून श्री. रुमील शर्मा यांनी १ लाख ५७ हजार ५०० रुपये इतकी रक्कम घेऊन नागपूर येथील प्रा.लि कंपनीत त्यांना नोकरी न दिल्याने तसेच	अनुमती नाकारली दिनांक २४/३/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
			नोकरीसाठी घेतलेले पैसे परत न केल्याबाबत पोलीस स्टेशन धंतोली तसेच पोलीस उप आयुक्त कार्यालय, नागपूर शहर यांचेकडे तक्रार केली होती. याबाबत सन्माननीय सदस्यांनी जनप्रतिनिधी म्हणून वरिष्ठ पोलीस निरिक्षक, धंतोली पोलीस स्टेशन यांना तक्रार पत्र देऊनही त्यांच्या तक्रार पत्रावर कोणतीही कार्यवाही न केल्याने तसेच संबंधीतांवर गुन्हा दाखल न करता प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग हा होय."	कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली दिनांक २४/३/२०१७
८.	१५८	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक २८/२/२०१७	प्रधान सचिव तसेच सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्री. भिमराव माणिकराव देवतारे सेवा निवृत्त शिक्षक, मॉडेल हायस्कुल, धनोडी, मु.पो. आंजी (मोठी) ता. जि. वर्धा यांच्या न्यायप्रविष्ट कालावधीतील वेतन न्यायालायीन निर्णय व आदेशानुसार देय असूनही, निवृत्ती वेतन लाभाकरिता कर्तव्यदान म्हणून नियमित करण्यासाठी शासन स्तरावरुन आदेश न मिळाल्याने तसेच या प्रकरणी सन्माननीय सदस्यांनी वारंवार पत्र व्यवहार करुनही त्यांच्या पत्रावर कोणतीही कार्यवाही न केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग हा होय."	अनुमती नाकारली दिनांक २४/३/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २४/३/२०१७
९.	१६२	श्री. नागोराव गाणार,	शिक्षण संचालक (प्राथ.) तसेच श्री. ह. ब. गवळी, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्रीमती	अनुमती नाकारली

		वि.प.स. दिनांक २७/३/२०१७	सुशिला विश्वास दांडगे या प्राथमिक शाळा इतवारी, नागपूर या शाळेत सहायक शिक्षिका पदावर कार्यरत असताना सदरहू शाळेची मान्यता दिनांक ३०/०४/२००१ रोजी काढण्यात आली होती. श्रीमती सुशिला दांडगे यांच्या शासकिय सेवेचा कार्यकाल विचारात घेऊन त्यांना सेवानिवृत्ती वेतन लाभ मिळण्यास पात्र असल्याने सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्यासाठी शिक्षण उप संचालक, नागपूर यांनी त्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी दिनांक १०/०५/२०१३ रोजी श्री.ह.ब.गवळी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचेकडे पाठविला होता. मात्र यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी संबंधितांना वारंवार विनंती पत्र देऊनही त्यांच्या पत्रावर कोणतीही कार्यवाही न केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग हा होय."	दिनांक २४/०४/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २४/०४/२०१७.
१०.	१६५	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक ११/४/२०१७	प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, राज्यातील शासनमान्य खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अ श्रेणीतील १२३ विना अनुदान तत्वावरील अपंगांच्या विशेष निवासी/अनिवासी शाळांना व कर्मशाळांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ८ एप्रिल,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार १०० टक्के अनुदान मंजुरी देण्यात आली होती व या शासन निर्णयानुसार १२३ शाळा व कर्मशाळांना अनुदान व पदमान्यतेबाबत राज्याचे सामाजिक व विशेष सहाय्य विभागाचे मा. मंत्री. श्री. राजकुमार बडोले यांच्या उपस्थितीत ३ वेळा बठका घेण्यात आल्या होत्या. या बैठकांस संबंधित विभागाचे प्रधान सचिव व त्यांचे प्रतिनिधी तसेच आयुक्त, अपंग कल्याण, पुणे व त्यांचे प्रतिनिधी उपस्थितीत होते. वरील तीनही बैठकांमध्ये शाळांच्या अनुदान व पदमान्यतेबाबत चर्चा करून मा. मंत्री महोदयांनी १५ दिवसांत मंजुरी आदेश दिले होते.याबाबत सन्माननीय	अनुमती नाकारली दिनांक २५/५/२०१७. मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २५/५/२०१७.

अ. क्र. (१)	सुचना क्रमांक (२)	सदस्यांचे नाव (३)	विषय (४)	सद्यस्थिती /निर्णय (५)
			सदस्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना अनुदान मंजुर करणेबाबत अनेक वेळा पत्र देऊनही त्याची अमलबजावणी न केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग हा होय."	
११.	१६६	श्री. नागोराव गाणार, वि.प.स. दिनांक २०/०४/२०१७	श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच श्री. धिरजकुमार, शिक्षण आयुक्त, पुणे यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, राज्यातील अनुदानित व विना अनुदानित शाळा शासन मान्यताप्राप्त असून रात्रकालीन शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यरत नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर खाजगी संस्थांच्या अनुदानानुसार शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन भत्ते व इतर लाभ देण्यात येत नसल्यामुळे त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत संघटनेच्यावतीने अनेकवेळा शासनाकडे निवेदने देण्यात आली. तसेच सन्माननीय सदस्यांनी नागपूर विभागाचा जनप्रतिनिधी या नात्याने शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. नंदकुमार व श्री. धिरजकुमार, शिक्षण आयुक्त यांना दि. १६ फेब्रुवारी, २०१७ व २९ मार्च, २०१७ रोजी पत्र पाठवूनही रात्रकालीन शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तसेच खाजगी संस्थांच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन भत्ते व इतर लाभ लागू करण्याबाबत योग्य ती कारवाई न केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग हा होय."	अनुमती नाकारली दिनांक २५/५/२०१७ मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. दिनांक २५/५/२०१७

सन २०१७ प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विवरण क्रमांक - १४

उपस्थित केलेले औचित्याचे मुद्दे - ६६

अ.क्र.	सदस्यांचे नाव व थोडक्यात विषय	मुद्दा सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)
१.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.**	दिनांक
	शेतकरी कर्जमाफी - रामेश्वर भुसारी या शेतकऱ्याला मारहाण.	२९ मार्च २०१७
२.	**श्री. किरण पावसकर, वि.प.स.**	दिनांक
	मुंबईतील गोरेगांव पूर्व वनराई पोलीस स्टेशनमध्ये (सी.आर.नं.१२/१२) सोने चोरीच्या घटनेतील चोरट्यांकडून मुद्देमाल हस्तगत केल्यानंतर त्याचा पंचनामा करून तो पोलीस स्टेशनमध्ये सीलबंद ठेवण्यात आलेला असताना त्याची पोलीस स्टेशनमधून चोरी झाल्याचे उघडकीस येणे.	२९ मार्च २०१७
३.	**श्री. हेमंत टकले, वि.प.स.**	दिनांक
	मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणेबाबत.	२९ मार्च २०१७
४.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.**	दिनांक
	बीड जिल्ह्यात तुर उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तुर खरेदी केंद्रांची संख्या वाढवून आवश्यक प्रमाणात बारदाना उपलब्ध करावा व शेतकऱ्यांची तुर तात्काळ खरेदी करून त्याचे पैसे शेतकऱ्यांना मुदतीत वाटप करण्याबात.	३० मार्च २०१७
५.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.**	दिनांक
	गुंडगे, रोहिदासनगर, कर्जत, जि.रायगड येथील कु.काजल उर्फ महावीरसिंह कुशवाह या मुलीचे राज्यात कोणीही नातेवाईक नसल्यामुळे सदर मुलीचे आई-वडील कर्जत येथे तिला घेऊन जाईपर्यंत तिचा शासकीय वसतिगृहात सांभाळ करावा अशी मागणी.	३० मार्च २०१७
६.	**श्री. संजय दत्त, वि.प.स.**	दिनांक
	मुंबई-नागपूर या समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बळजबरीने संपादित करण्यात येत असून या महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय दूर करण्याबाबत करावयाची कार्यवाही.	३० मार्च २०१७

(१)	(२)	(३)
७.	**प्रा. अनिल सोले, वि.प.स.** चातगांव, जि. गडचिरोली येथील डॉ. साळवे नर्सिंग कॉलेज येथे शिकत असलेल्या बी.एस.सी. नर्सिंग द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थिनींना सदर नर्सिंग कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष यांच्याकडून छेडखानी व गैरवर्तवणुकीचे प्रकार होत असल्याचे उघडकीस येणे.	दिनांक ३० मार्च २०१७
८.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** देशातील १६ राज्यांमध्ये पत्रकारांना पेन्शन देण्यात येत असून इतर राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील पत्रकारांना पेन्शन लागू करावी अशी मागणी.	दिनांक ३० मार्च २०१७
९.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालय अथवा तांत्रिक शाखेसह अन्य ठिकाणी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेताना अधिवास दाखला, जातीचा दाखला व प्रमाणपत्र मिळविताना विद्यार्थ्यांसह पालकांना कसरत करावी लागत असून याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ३० मार्च २०१७
१०.	**श्री. हेमंत टकले, वि.प.स.** दिनांक २८ मार्च, २०१७ रोजी भिरा, जि. रायगड येथील खेड्यात देशातल्या सर्वोच्च तापमानाची नोंद झाली असून ग्लोबल वॉर्मिंग व क्लायमेंट चेंज बाबतीत होऊ घातलेल्या बदलाबाबत शासनाने वैज्ञानिक स्तरावर दखल घेऊन उपाययोजना करण्याची आवश्यकता.	दिनांक ३० मार्च २०१७
११.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** मा.मुंबई हायकोर्टाच्या मा.मुख्य न्यायमुर्तींनी काल पत्रकारांच्या जीन्स पॅन्ट आणि टी शर्ट या पेहरावावर हरकत घेतल्याबाबत.	दिनांक ३० मार्च २०१७
१२.	**श्री. किरण पावसकर, वि.प.स** थोर पुरूषांच्या जयंती उत्सव साजरा करण्यासाठी शासनाने शासन व शासन अंगीकृत कंपन्यांना निर्देश दिलेले असतांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमातळावरील संपूर्ण देखभाल करणाऱ्या जी.व्ही.के. कंपनीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिवशी पुतळ्याला हार घातलेला नसणे.	दिनांक ३० मार्च २०१७

(१)	(२)	(३)
१३.	**श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.** देवळा घाट (जि.बुलढाणा) येथील श्री.अनिल बेग या अंध विश्वविजेत्या संघात सामील झालेल्या खेळाडूस शासनामार्फत गौरविण्यात येऊन इतर राज्यांप्रमाणे आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च २०१७
१४.	**श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.** राज्यातील अपंग माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढून या शाळांना अनुदान देणेबाबत.	दिनांक ३१ मार्च २०१७
१५.	**श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.** राज्यातील प्राथमिक माध्यमिक शाळांना ऑप्टीकल फायबरद्वारे इंटरनेट सुविधा पुरविणेबाबत.	दिनांक ३१ मार्च २०१७
१६.	**श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.** ता. पनवेल तळोजा औद्योगिक वसाहतीत असणाऱ्या खानाचा बंगला (निताळे-वावंजे) या गावामध्ये विद्युत योजनेचे नियोजन केले नसल्यामुळे सदर आदिवासीवाडीतील शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणापासून वंचित रहावे लागत असून या आदिवासी वाडीमध्ये विद्युत पुरवठा सुरू करण्यात यावा अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च २०१७
१७.	**श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** महाराष्ट्र शासनाच्या वतीने एम.ई.आर.सी. ला विजेचे दर निश्चित करण्याकरिता दिलेले असून त्यानुसार २२ ते २५ टक्क्यांच्या वर विजेचे दर वाढविलेले असल्यामुळे विज ग्राहकांवर मोठे संकट आलेले असणे.	दिनांक ३१ मार्च २०१७
१८.	**श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाण्याची टंचाई निर्माण झाली असून परजना येथे पाझर तलावाची निर्मिती केल्यास शेतीसाठी पाण्याची पातळी वाढेल व जनावरांकरिता पाण्याची व्यवस्था होईल असे त्यांनी निवेदनात व्यक्त केले असणे, सदरील शेतकऱ्यांनी याबाबतीत सरकारकडे अनेक निवेदने दिली असतानाही सदरील बाबतीत कोणतीही दखल घेतली गेली नसणे.	दिनांक ३१ मार्च २०१७

(१)	(२)	(३)
१९.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर वयाच्या ६० व्या वर्षानंतर राज्यातील घरेलू महिला कामगारांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत.	दिनांक ३१ मार्च २०१७
२०.	**श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** मुलूंड येथे एक्स-रे सेंटरमध्ये कपडे बदलण्याच्या खोलीत मोबाईल कॅमेऱ्यातून कपडे बदलणाऱ्या महिलांचे छायाचित्र काढले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला असून पॅथॉलॉजी सेंटरवर नियंत्रण करण्याकरिता कोणतीही ठोस यंत्रणा उपलब्ध नसल्याने जनतेमध्ये वाढलेला असंतोष.	दिनांक ३१ मार्च २०१७
२१.	**सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, वि.प.स.** सांगली जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत सन २०१५-२०१६ मध्ये जिल्हा परिषद स्वीय निधीमधून ५० टक्के अनुदानावर खरेदी करण्यात आलेल्या पॉवर ऑपरेटर व चाफकटर खरेदी प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार.	दिनांक ३१ मार्च २०१७
२२.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसदर्भात दिनांक १ एप्रिल २०१७ रोजीपासून संप करण्याचा केलेला निर्धार.	दिनांक ३१ मार्च २०१७
२३.	**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.** लोणार येथील खाऱ्या पाण्याचे सरोवर हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर असून जगभरातून पर्यटक त्या ठिकाणी येत असतात, शहरातील घाण पाणी या सरोवरात सोडले जात असल्याबाबत.	दिनांक ३१ मार्च २०१७
२४.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** शहरांमधील नामांकीत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतलेल्या आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मधील अनुदानाची रक्कम वितरित करण्याबाबत.	दिनांक ३१ मार्च २०१७
२५.	**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** मराठी भाषेला अभिजात दर्जा देणेबाबत - मराठी भाषिकांसाठी नवीन विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात.	दिनांक ३१ मार्च २०१७
२६.	**श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** ठाणे महानगरपालिका हद्दीतील श्रीनगर येथील अयप्पा डोंगर येथील परिसराचे सुशोभिकरण करणे गरजेचे असून त्याकरिता पर्यटन अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत.	दिनांक ३१ मार्च २०१७

(१)	(२)	(३)
२७.	**श्री. गिरीष व्यास, वि.प.स.** नागपूर, चंद्रपूर, कोल्हापूर, नाशिक तसेच अन्य ठिकाणी असणाऱ्या क्रीडा प्रबोधिनीमधील काही कर्मचारी व प्रशिक्षक यांना आजतागायत मानधन दिलेले नसून त्यांना नियमित करण्यात आलेले नसणे, तसेच गेली ४ ते ५ वर्षे सदर कर्मचारी व प्रशिक्षक विना मानधनावर असणे.	दिनांक ३१ मार्च २०१७
२८.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** राज्यातील विधानसभा व विधानपरिषद यांच्या संदर्भात अर्थसंकल्पामधील वित्तीय वाटपासंदर्भात.	दिनांक १ एप्रिल २०१७
२९.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पत्रकारांवर दिवसेंदिवस प्राणघातक हल्ले तसेच मारहाण होत असल्याने पत्रकार संरक्षण कायदा करण्यात यावा अशी मागणी.	दिनांक १ एप्रिल २०१७
३०.	**श्री. शरद रणपिसे, वि.प.स.** झी २४ तास या वाहिनीवर गुरुवार, दिनांक २३ मार्च २०१७ रोजी "रोकठोक" या सदराखाली घेण्यात आलेल्या वैद्यकीय सेवेबाबतच्या कार्यक्रमात डॉक्टरांच्या संस्थेचे सचिव डॉ. पार्थिव संघवी यांनी केलेला आक्षेपार्ह आरोप.	दिनांक १ एप्रिल २०१७
३१.	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** डॉ. पार्थिव संघवी यांच्यावर हक्कभंगाची कारवाई करणेबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७
३२.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पनवेल कल्पतरू सोसायटीचे चेअरमन तसेच पत्रकार श्री. सुधीर सुर्यवंशी यांचेवर झालेला हल्ला.	दिनांक १ एप्रिल २०१७
३३.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** डॉ. उदय निगुडकर यांना झालेल्या त्रासाबाबत हक्कभंग - ट्रोलिंग व स्टॉलिंग.	दिनांक १ एप्रिल २०१७
३४.	**श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.** मुंबई उपनगरातील ठाकूर व्हिलेज, कांदिवली पूर्व परिसरात स्मशानभूमी अभावी नागरिकांची गैरसोय होत असणे तसेच या ठिकाणी फायर ब्रिगेडच्या सोयी-सुविधेअभावी जिवितहानी व वित्तहानी होण्याची दाट शक्यता असून स्मशानभूमी तसेच फायर ब्रिगेड याकरिता आरक्षित असलेला भूखंड विकसित करण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७

(१)	(२)	(३)
३५.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** पनवेल (जि.रायगड) शहरातील कल्पतरू सोसायटीमधील दोन गटांच्या वादामध्ये सोसायटीचे अध्यक्ष व इंग्रजी वृत्तपत्राचे पत्रकार श्री. सुधीर सुर्यवंशी व त्यांचे मित्र श्री. संतोष फटाटे यांच्यावर दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी दुपारच्या सुमारास खारमधील सेक्टर १२ येथील रस्त्यांवर व्यक्तींकडून करण्यात आलेला हल्ला - आरोपींना अटक करणेबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७
३६.	**श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** सोलापूर विद्यापीठातील सहायक कुलसचिव श्री. एस. टी. काळे व श्री. अ. बा. जाधव हे विद्यापीठातील महिलांशी गैरवर्तन करत असून सदर महिला कर्मचाऱ्यांनी तक्रारी करूनसुद्धा संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई झालेली नसणे.	दिनांक १ एप्रिल २०१७
३७.	**श्री. रामनिवास सिंग, वि.प.स.** रिक्षा व टॅक्सी परवान्यांसाठी मराठी वाचन चाचणी सक्तीचे करण्याच्या परिवहन विभागाने घेतलेल्या निर्णयामुळे रिक्षा-टॅक्सी चालक-मालकांमध्ये नाराजी पसरलेली असणे.	दिनांक १ एप्रिल २०१७
३८.	**श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.** राज्य शासकीय अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान वितरित करण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७
३९.	**श्री. रामराव वडकुते, वि.प.स.** राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७
४०.	**श्री. हरीसिंग राठोड, वि.प.स.** यवतमाळ जिल्हा शेतकऱ्यांचा आत्महत्त्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला, जात असून कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या योजनांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार.	दिनांक १ एप्रिल २०१७
४१.	**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** राज्यातील रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले असून खड्ड्यांमुळे दरवर्षी हजारो नागरिकांना जीव गमवावा लागत असणे.	दिनांक १ एप्रिल २०१७

(१)	(२)	(३)
४२.	**श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.** नगर परिषद कामठी, नागपूर येथे शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत ३ पिण्याच्या टाकी व पाईप लाईन यासाठी मंजूर झालेला १०.४१ कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी.	दिनांक १ एप्रिल २०१७
४३.	**श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** डोणगांव, जि. बुलढाणा येथील ग्रामपंचायत हद्दीमध्ये सरकारी जागेवर स्थानिक आठवडे बाजारात सर्व्हे नं.१२३ मध्ये कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर केलेले अतिक्रमण.	दिनांक १ एप्रिल २०१७
४४.	**श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** मुंबईतील ३००० गृहनिर्माण संस्था व उर्वरित महाराष्ट्रातील २२००० संस्थांचा पुनर्विकास करण्यासाठी अभ्यास समितीने त्वरित निर्णय घेऊन अंतिम शासन निर्णय गठीत करून सर्व भोगवटाधारकांना दिलासा देण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७
४५.	**श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.** पनवेल तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींमधील ३८९ कर्मचाऱ्यांचे वेतन आजतागायत अदा करण्यात आलेले नसून सदर कर्मचाऱ्यांचे वेतन कोणत्या यंत्रेमार्फत याबद्दल स्पष्ट झाले नसल्यामुळे भविष्यात कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत व सेवेसंबंधी निश्चित निर्णय घेण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७
४६.	**श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** कोकणात यंदा बदलत्या हवामानामुळे आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून आंबा पिकाचा मोहर गळून पडणे, फळे गळून पडणे यामुळे आंबा उत्पादनात मोठी घट असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असणे त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सर्व्हे करण्यात येवून हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी.	दिनांक १ एप्रिल २०१७
४७.	**श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** ठाणे शहरातील प्रभाग क्र.१९ मध्ये आरटीओ कार्यालयातील भंगार गाड्या हटविण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल २०१७

(१)	(२)	(३)
४८.	**श्री. विक्रम काळे, वि.प.स.** मनोरा आमदार निवासातील पाणी व्यवस्था.	दिनांक १ एप्रिल २०१७
४९.	**श्री. नारायण राणे, वि.प.स.** आदर्श विद्यालय, कासारवडवली, जि. ठाणे या शाळेत रिक्त असलेल्या ९ जागांपैकी ६ अतिरिक्त शिक्षकांचे सामायोजन करण्यात आले होते त्यापैकी एका शिक्षकाला मुख्याध्यापकांनी हजर करून घेतले आहे परंतु अद्यापही पाच अतिरिक्त शिक्षकांना हजर करून घेतलेले नसणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५०.	**श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.** सोलापूर जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन बंद न करणेबाबत.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५१.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** नवीन शाळेसाठी शासनाचा निकष ४० गुंठे जागा असावी असा असून इतर सर्व निकष पूर्ण करूनही केवळ जागा थोडीशी कमी असल्यामुळे श्री गणेश कृपा शिक्षण संस्थेचा इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव नाकारण्यात आलेला आहे त्यामुळे ४० गुंठे जागेचा निकष शिथील करून सदर संस्थेच्या प्रस्तावास परवानगी देण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५२.	**प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.** मिरज तालुक्यातील मौजे मानमोडी हद्दीतील श्री गणपती देवस्थान मिरज यांची जमीन स्वातंत्र्यपूर्व काळापासून कांचनपूर, ता. मिरज येथील रहिवाशी कुळ कायद्याने कसत असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५३.	**ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.** पुणे महानगरपालिकेतील एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याने पदाचा गैरवापर केल्याचे प्रकरण समोर येणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५४.	**श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.** लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे निकाल वेळेत लागावेत व स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांमध्ये चुका न करण्याची दक्षता घेण्याच्या सूचना शासनामार्फत लोकसेवा आयोगास देण्यात याव्यात अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५५.	**श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** राज्यात अतिरिक्त शिक्षकांच्या समस्या गंभीर होत चालल्या असून मागील चार महिन्यांपासून समायोजन झालेल्या परंतु हजर करून न घेतलेल्या	दिनांक ७ एप्रिल २०१७

(१)	(२)	(३)
	अतिरिक्त शिक्षकांचे वेतन थकल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर आलेली उपासमारीची वेळ.	
५६.	**श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** नेर, जि. यवतमाळ येथील व्यापाऱ्यांची तूर शेतकऱ्यांच्या नावावर नाफेडला विक्री करणे तसेच मार्च महिन्यात कृषी उत्पन्न समितीकडे बारदान उपलब्ध नसल्याचे कारण देत तूर खरेदी बंद केल्याचा प्रकार उघडकीस येणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५७.	**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** सांगली जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये स्वनिधीतून ५० टक्के अनुदानावर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी चाफकटर व बॅटरी पंप खरेदी योजनेच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५८.	**श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.** कन्नड (जि.औरंगाबाद) येथे आदिवासी व इतर जंगल निवासी वन हक्क कायदा २००६ व नियम २००८ लागू होऊन १० वर्षे झाली तरीही या कायद्यानुसार व इतर जंगल निवासी यांना न्याय न मिळता त्यांना त्यांच्या जमिनीतून बेदखल करण्याचे प्रयत्न वन खाते करीत असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
५९.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** साक्री (जि.धुळे) तालुक्यातील बंधारपाडा येथे दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी सुमारे १५० वन कर्मचारी आणि १०० हून अधिक पोलीसांनी तेथे राहत असलेल्या १० आदिवासींची घरे बेकायदेशिररित्या पाडल्याबाबत.	दिनांक ७ एप्रिल २०१७
६०.	**श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** कांदिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी हॉस्पीटलमधील कंत्राटी कामगारांना त्यांच्या मूळ वेतनापासून दूर ठेवून त्यांच्याकडून अत्यल्प वेतनामध्ये काम करून घेतले जात असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
६१.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** शिरुर तालुक्यातील (जि. पुणे) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीसाठी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ डिसेंबर २०१६ नुसार प्रशासकाची नेमणूक करून निवडणूक घेण्याबाबत आदेश दिले असून काही व्यक्तींनी नवीन नियोजित संस्था स्थापन करून मतदारांची नावे समाविष्ट करण्याबाबतचे प्रस्ताव मा. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेमार्फत शासनाकडे पाठविलेले असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७

(१)	(२)	(३)
६२.	**श्री. संजय दत्त, वि.प.स.** बांधकाम व्यवसाय मंदीच्या छायेत असतांना रेडीरेकनरच्या दरात वाढ करण्यात आल्याने बांधकाम व्यवसायावरील संकटात भर पडली असून रेडीरेकनरच्या दरामध्ये केलेल्या वाढीमुळे घरांच्या खरेदी विक्रीवर परिणाम होणार असून सर्वसामान्यांचे घर खरेदीचे स्वप्नभंग होणार आहे तसेच गृहनिर्माण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांचा व्यवसाय धोक्यात येणार असल्याने रेडीरेकनरमध्ये करण्यात आलेली वाढ कमी करावी अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल २०१७
६३.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** राज्यातील लक्षावधी मुख्याध्यापक आणि शिक्षकांना इन्कम टॅक्स भरूनही आयकर विभागाच्या नोटीसा आल्या असून दरमहा वेळेत टॅक्स भरणाऱ्या शिक्षकांना संबंधित शिक्षण विभागाने विवरण न पाठविल्यामुळे दंड भरावा लागणार असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
६४.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** कल्याण तालुक्यातून वालधुनी नदी विकासाबाबत मागील सात वर्षांपासून मागणी होत असतांना शासनाकडून याबाबत फक्त टाळाटाळ आणि दुर्लक्ष करण्यात येत असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
६५.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** दिनांक ३ एप्रिल २०१७ रोजी पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड-वाकड परिसरातील आश्विनी नावाच्या तरुणीवर तसेच ॲबी-व्हॅली रस्त्यावर सिंहगड महाविद्यालयातील सचिन वाघचौरे आणि श्रुती डुंबरे या युवक युवतिवर खुनी हल्ला झाल्याची घटना उघडकीस येणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
६६.	**श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.** नवी मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराचा प्रकार उघडकीस येऊन देखील अद्यापपर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली नसणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७

सन २०१७ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विवरण क्रमांक - १५

निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींची चर्चा करण्यासाठी प्रस्ताव

(म.वि.प. नियम ९३ अन्वये प्रस्ताव)

(१) प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या	:	२५१
(२) निवेदन करण्याबाबत निदेश दिलेल्या सूचनांची संख्या	:	६८
(३) अनुमती नाकारलेल्या सूचनांची संख्या	:	१८३
(४) निवेदनावर चर्चा झालेल्या सूचनांची संख्या	:	-
(५) निवेदन पटलावर ठेवलेल्या सूचनांची संख्या	:	४०

सूचना क्रमांक	सदस्यांचे नाव व विषय	शेरा
(१)	(२)	(३)
१.	**सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, धनंजय मुंडे, किरण पावसकर, सुनिल तटकरे, हेमंत टकले, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री. नारायण राणे, श्री.जयंत पाटील, बाळाराम पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** सांगली जिल्ह्यातील मिरजजवळील म्हैसाळ येथे होमिओपॅथी डॉक्टरकडून होणाऱ्या अवैध गर्भपाताचे अमानुष प्रकार उघडकीस येऊन अपूर्ण वाढ झालेल्या १९ अर्भकांचे मृतदेह सापडणे.	दिनांक ८ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
२.	**ॲड. जयदेव गायकवाड, प्रा.जोगेंद्र कवाडे, प्रा.जनार्दन चांदूरकर, वि.प.स.** कोल्हापूर येथील आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, चळवळीतील नेते डॉ.कृष्णा किरवले यांची दिनांक ४ मार्च, २०१७ रोजी हत्या करण्यात येणे, हत्या करणाऱ्यांचा तात्काळ शोध घेऊन त्यांना शिक्षा देण्याची आवश्यकता.	दिनांक २९ मार्च २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
३.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** राज्यातील अनेक तरूण लष्करी सेवेत जाण्यापूर्वी पूर्व तयारी म्हणून लाशाक्री प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेत असतात. या संस्थाचा आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवाराला गोठवून त्यांच्याकडून लष्करात भरती करण्यासाठी प्रत्येकी १ लाख रुपये उकळत असलेली बाब उघडकीस येणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१)	(२)	(३)
४.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** मुंबई व राज्यातील कनिष्ठे महाविद्यालयात सन २०१२ पासून शेकडो शिक्षक पायाभूत पदावर कार्यरत असून शिक्षक नेमणुकीच्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करूनही त्यांना मान्यता न मिळणे, त्याला नोकरीतून बेदखल केल्यामुळे त्यांच्या कुटूंबावर आलेली उपासमारीची वेळ.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
५.	**सर्वश्री बाळाराम पाटील, संजय दत्त, ॲड. निरंजन डावखरे, श्री. हेमंत टकले, वि.प.स.** १२ वी च्या मराठी व एस.पी. या विषयांची प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वी व्हॉटस्ॲपवर व्हायरल होणे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळास याप्रकरणी आळा घालण्यास आलेले अपयश.	दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
६.	**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** दिनांक १ मार्च २०१७ रोजीपासून एम.एस.ई.बी. च्या बिलात ३५ ते ४० टक्क्यांनी झालेली वाढ.	दिनांक ८ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
७.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** दुष्काळी भागातील सिंचन प्रकल्पांना प्राधान्य देण्याच्या शासन भूमिकेनुसार केकतपांगरी, ता. गेवराई, जि. बीड साठवण तलाव योजनेला तातडीने निधी उपलब्ध करून योजनेचे काम प्रत्यक्ष सुरू करण्याबाबत.	किता
८.	**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** दिनांक १ एप्रिल २०१७ पासून स्कूल बसची २० टक्के भाडे वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे राज्यातील पालकवर्गात पसरलेला असंतोष.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
९.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुदत ठेवी नियमबाह्यरित्या मुदत पूर्व मोडून कमी व्याज दराच्या बँकेत गुंतविल्याने मार्केट कमिटीचे २ कोटी ५७ लाखांचे नुकसान झालेले असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१०.	**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** नाशिकच्या विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात राजीव गांधी आरोग्यदायी वीमा योजनेअंतर्गत उपचारासाठी रुगणांना तीन-तीन महिन्यांची प्रतिक्षा करावी लागत असून या रुग्णालयातील अतिविशेषोपचार तज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका इ.पदे रिक्त असल्याबाबत.	

(१)	(२)	(३)
११.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** बीड जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांची ५० टक्के हंगामी फवारणी (मलेरिया) कर्मचाऱ्यांमधून भरावयाची ३५ पदे रिक्त असतानांही खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना डावलण्यात येत असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१२.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील भूखंड विभाजनात झालेला गैरव्यवहार व अनियमितता.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१३.	**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** पीक कर्ज मर्यादा कमी करण्याच्या निर्णयाचा फेर विचार करून सरकारी बँकेप्रमाणे सहकारी संस्थांचे कर्ज वाटप करण्याबाबत.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१४.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** मुंबई व उपनगरातील प्राथमिक शाळांना भोगवटा प्रमाणपत्र नसल्याच्या तांत्रिक कारणामुळे मुंबईतील अनेक शाळांना मान्यता मिळण्यास अडचणी निर्माण होत असणे.	दिनांक ८ जून २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
१५.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** मत्स्योद्योग विकास महामंडळाने पेंच व अप्पर पैनगंगा या जलाशयामध्ये ७ कोटी कर्ज घेऊन केज प्रकल्प राबविण्यात आला असणे या प्रकल्पावर चार वर्षांत १६ कोटी रुपये खर्च करण्यात येऊन उत्पन्न मात्र ३.३६ कोटी एवढे मिळणे यावरून या प्रकल्पात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असल्याचे दिसून येणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१६.	**श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.** विलेपार्ले (पूर्व) मुंबई येथील "जय पॅलेस प्रिमायसेस को.ऑप.हाऊ.सोसा." या इमारतीच्या पुनर्विकासामध्ये घोटाळा प्रकरणी झालेली फसवणूक.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१७.	**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** राज्यातील इ.एस.आय.एस. रुग्णालयांचे केंद्रीय विमा योजनेकडे ७५० कोटी रुपये थकल्यामुळे कामगार रुग्णालयांचे अस्तित्व धोक्यात आलेले	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन

(१)	(२)	(३)
	असणे तसेच दवाखान्यांची दुरावस्था झाल्याने कामगारांना वैद्यकीय सुविधांपासून वंचित रहावे लागत असणे.	सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१८.	**श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.** शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरेशा आरोग्याच्या, आहाराच्या, शिक्षणाच्या सुविधा मिळत नसल्याने गेल्या ३ वर्षांत आश्रमशाळांमध्ये प्रत्येक वर्षी सुमारे १५० विद्यार्थ्यांचा मृत्यू होणे.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
१९.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या धान्यसाठा करण्याचे केंद्र वेळेआधीच पूर्ण भरल्याने करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांच्या मालावर साठवणुकीचे संकट येणे.	दिनांक २९ मार्च २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
२०.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** बीड जिल्हा पोलीस दलाची पुनर्रचना करून मंजूर असलेली पोलीस ठाणे तातडीने कार्यान्वित करणे तसेच गेवराई तालुक्यातील, सिरसदेवी, उमापूर, मादळमोही येथे नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करून पाचेगांव, राक्षसभुवन येथे दूरक्षेत्र निर्माण करण्याबाबत.	दिनांक २९ मार्च २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
२१.	**आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.** पुणे येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि राज्य शासनाचे नियम डावलून पीएमपी प्रशासनाच्या वतीने बाद झालेल्या सुमारे १५ वर्षांपेक्षा जुन्या ४५० बसेस मार्गावर पाठविण्यात आल्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडून जीवित हानी होण्याची निर्माण झालेली शक्यता.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
२२.	**सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, हेमंत टकले वि.प.स.** राज्यात मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून आर्थिक मदत देण्याबाबत करावयाची कार्यवाही.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
२३.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** ऐनघर, ता. रोहा, जि. रायगड या ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक यांचा सुरू असलेला मनमानी कारभार तसेच सरपंच यांची त्यांना असलेली मूकसंमती यामुळे विकासकामांकडे दुर्लक्ष होऊन ग्रामपंचायतीमध्ये दिवसेंदिवस अनागोंदी कारभार वाढलेला असणे.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.

(१)	(२)	(३)
२४.	**श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** विक्रमगड, जि. पालघर तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजंदारीवर काम केलेल्या मजुरांना गेल्या चार महिन्यांपासून पगाराची रक्कम माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत मिळालेली नसणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांसाठी असलेल्या टपालखणात वितरीत करण्यात आले.
२५.	**सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील वि.प.स.** बृहन्मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांना औद्योगिक न्याय मिळणे प्रलंबित असतांना संबंधित कामगारांना कामावरून काढण्यात येणे.	दिनांक ८ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.
२६.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पाटणूस, ता. माणगांव, जि. रायगड ग्रामपंचायतीमध्ये शासकीय अधिकारी, ग्रामसेवक व ग्रामपंचायतीमधील पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी चालविलेल्या मनमानी कारभाराची चौकशी करून ग्रामपंचायतीचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत लेखापरिक्षण करण्याची होत असलेली मागणी.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
२७.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** राज्यात ८००० हून अधिक आयसीटी शिक्षक कंत्राटी पद्धतीवर तुटपुंज्या मानधनावर काम करत असून या आयसीटी शिक्षकांना कायम सेवेत घेण्यात आश्वासन देऊनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे.	दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
२८.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** बीड जिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी, क्ष-किरण यासह अत्यावश्यक आरोग्य सुविधा व यंत्रणा यांची देखभाल दुरूस्ती करण्यासाठी सक्षम यंत्रणेची नियुक्ती करून गोरगरीब रुग्णांना माफकदरात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी.	निवेदन प्राप्त.
२९.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** माथाडी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी व ग्रॅच्युएटीचे पैसे परत मिळावे यासाठी कामगारांनी अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली आंदोलन केलेली असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांसाठी असलेल्या

(१)	(२)	(३)
		टपालखणात वितरीत करण्यात आले.
३०.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** बीड जिल्ह्यात मुत्रपिंड (किडणी) रुग्णांची संख्या वाढलेली असून जिल्हा रुग्णालयात डायलेसीस मशिनची संख्या वाढविणे तसेच उप जिल्हा रुग्णालयांत डायलेसीस सुविधा उपलब्ध करून तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्तीची मागणी केलेली असणे.	दिनांक २९ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.
३१.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेली २७ गावे महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका करण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
३२.	**श्री. संजय दत्त, वि.प.स.** मुंबईतील अंधेरी, कुर्ला, सांताक्रुझ आणि विलेपार्ले विमानतळ परिसरात राहणाऱ्या सुमारे ९० हजार झोपडपट्टीवासियांचा पुनर्विकास करण्याबाबत.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
३३.	**श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरांत कुंटणखाने व स्पा मध्ये मोठ्या प्रमाणात सेक्स रॅकेट चालविले जात असून अल्पवयीन मुली व महिलांचे लैंगिक शोषण होत असल्याचे दिनांक २० मार्च २०१७ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
३४.	**सर्वश्री संजय दत्त, नारायण राणे, वि.प.स.** मुंबईत धार्मिक भावना दुखावणारे आक्षेपार्ह छायाचित्र समाजमाध्यमातून पसरल्यानंतर दिनांक १८ मार्च २०१७ रोजी चेंबूर येथील ट्रॉंबे परिसरात निर्माण झालेले तणावाचे वातावरण.	दिनांक ८ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.
३५.	**श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.** यवतमाळ तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत बांधलेल्या सिमेंट बंधाऱ्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले असणे.	दिनांक २९ जून २०१७ रोजी निवदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.

(१)	(२)	(३)
३६.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** मुंबई क्रिकेट असोसिएशनशी संलग्न माझगाव क्रिकेट क्लब या संस्थेस अद्यापपर्यंत कोणताही भूखंड न दिल्याने युवा क्रिकेटपटूंचे नुकसान होत असणे.	दिनांक ८ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.
३७.	**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.** तलासरी (जि. पालघर) येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या ठक्कर बाप्पा विद्यालयात ९ वी मध्ये शिकणाऱ्या नितेश भोये वय वर्ष १५ या विद्यार्थ्याने शाळेच्या आवारातील झाडाला रात्री गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिनांक २२ मार्च २०१७ रोजी निदर्शनास येणे.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
३८.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** जायकवाडी धरणाचे महत्त्व लक्षात घेता धरणाच्या सुरक्षेबाबत कडक उपाययोजना करून धरणाची सुरक्षा सीआरपीएफ सारख्या सुरक्षा यंत्रणेकडे देण्याची होत असलेली मागणी.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
३९.	**श्री. विक्रम काळे, वि.प.स.** बीड जिल्हा परिषद समाज कल्याण विभागात चतुर्थ श्रेणी सफाईदार कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती अरुणा तुरू कमारे या अपंग कर्मचारी महिलेला गेली दोन महिने पगार मिळालेला नसणे.	
४०.	**श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** तूर विक्रीची मर्यादा घालून देत शेतकऱ्यांची केलेली नाकेबंदी बघता तूर खरेदी कोणत्याही क्षणी बंद करणार असल्याच्या चिंतेने शेतकरी मिळेल त्या भावाने तूर खाजगी व्यापाऱ्यांकडे विकत असणे.	
४१.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** मौजे मजगांव (ता. मुरुड, जि.रायगड) या अंतर्गत प्रस्तावित असलेली नळ पाणीपुरवठा योजना लघुसिंचन महामंडळाने त्वरित मान्यता देऊन मंजूर करण्याची आवश्यकता.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
४२.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** माझी कन्या भाग्यश्री या योजनेतील त्रुटी दूर करून मागील वर्षभरात जन्मलेल्या कन्येच्या पालकांना नियमाप्रमाणे लाभ देण्याची मागणी.	दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१)	(२)	(३)
४३.	**श्री. संजय दत्त, वि.प.स.** गडचिरोली जिल्ह्यात मालेवाडा पोलीस मदत केंद्रांतर्गत सायगांव येथे विषारी दारू प्यायल्याने दिनांक २० मार्च २०१७ रोजी एका पोलिसाचा झालेला मृत्यू.	दिनांक २९ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात आले.
४४.	**सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स.** राज्य शासनाने नवीन कायदे, नियम, त्यांचे प्रारुप यांसारखे महत्त्वाचे व धोरणात्मक आणि गोपनीय दस्तऐवज बनविण्याची कंत्राटे खाजगी कंपन्यांना देण्याचे ठरविल्यामुळे गोपनीयतेचा भंग होण्याची निर्माण झालेली शक्यता.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
४५.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** दहिसर गाव येथील श्रीमती यमुना लखात या आदिवासी महिलेच्या जमिनीवर विकासकाने इमारतीचे बांधकाम करून सदर आदिवासी कुटुंबावर केलेला अन्याय.	
४६.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** केंद्र शासनाच्या क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेखाली मंजुरी नसतानाही अनेक संस्थांना इमारत पूर्णत्वाचा दाखला दिलेल्या सर्व संस्थांकडून सवलतीची रक्कम वसूल करून त्यांचेवर दंडात्मक कारवाई करणे.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
४७.	**श्री. संजय दत्त, वि.प.स.** भिवंडी शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढल्याने महिलांसह सामान्य नागरिकांमध्ये पसरलेली असुरक्षिततेची भावना.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
४८.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** ससून रुग्णालय, पुणे येथील नवीन इमारतीमध्ये सुरक्षा व आग नियंत्रणाकरिता बसविण्यात येणाऱ्या फायर अलार्म स्मोक डिटेक्शन सिस्टमच्या कामात झालेली अनियमितता.	
४९.	**सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स.** रोहा (जि. रायगड) एमआयडीसीच्या कंपन्यांतून कोणतीही प्रक्रिया न करता रासायनिक मिश्रित प्रदुषित पाणी कुंडलीका खाडीत सोडल्यामुळे मच्छीच्या उत्पादनात घट होत असणे.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१)	(२)	(३)
५०.	**श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.** सिंदफना प्राथमिक आश्रम शाळा (जि.बीड) या आश्रम शाळेच्या वसतीगृहासाठी महिला अधीक्षक नसून महिला कर्मचारी सुद्धा नसणे तसेच सदर शाळेतील शिक्षक श्री. देवराव मस्के हे मुलींचा लैंगिक छळ करत असल्याची तक्रार महिला कल्याण विभागाकडे केलेली असणे.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
५१.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** राज्यात विशेषत: मराठवाड्यात ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे उपलब्ध गाळप क्षमतेपेक्षा हजारो हेक्टर वरील ऊस अतिरिक्त होण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
५२.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** मुंबई उपनगरातील घाटकोपर येथील युनिव्हर्सल स्कूलमध्ये इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीस श्री.पराग शहा या शिक्षकाने मोबाईलवर अश्लील संदेश पाठवून तिचा मानसिक, शारीरिक व लैंगिक छळ केल्याचा प्रकार उघडकीस येणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
५३.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** शासन निधीचा योग्य विनियोग न केल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात निधीचा अपव्यय होऊन अनेक प्रकल्प रखडलेले असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
५४.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** मुंबई व ठाणे महानगरपालिकेने आर.ॲण्ड बी.इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. या कंत्राटदार कंपनीस काळ्या यादीत टाकले असताना निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तींचा भंग करून सदर कंपनीस ठाणे शहरातील कामांचे कंत्राट दिले असल्याने यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता निर्माण झालेली असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी मा. सदस्यांसाठी असलेल्या टपालखणात वितरीत करण्यात आले.
५५.	**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** देशातील प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला व बालकांसाठी खास डेस्क सुरू करण्याची सूचना करण्यात आली असून महाराष्ट्रात मात्र एकही महिला पोलीस ठाणे सुरू झालेले नसणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१)	(२)	(३)
५६.	**श्री. रामराव वडकुते, वि.प.स.** शिरपूर तालुक्यातील तापी नदीवरील उपरकिंड गावाचा वाळूचा ठेका मिळालेला ठेकेदार ठरवून दिलेल्या जागेऐवजी सिंदखेडा तालुक्यातील अक्कडसे शिवारातील तापी नदी पात्रातून वाळूचा अवैधरित्या उपसा करीत असून नियमबाह्य होणाऱ्या वाळू उपसामुळे अक्कडसे नागरिकांसमोर दूषित पाण्यामुळे निर्माण झालेली आरोग्याची समस्या.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
५७.	**श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.** बीड जिल्ह्यातील सुमारे दहा हजार शेतकऱ्यांना मागील तीन वर्षांपासून ठिबक सिंचन योजनेचे सुमारे २७.५० कोटी रुपयांचे अनुदान मिळालेले नसणे.	दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
५८.	**सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स.** राज्यात डॉक्टरांना मारहाणीचे प्रकार सुरू असतानाच दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी ठाण्यातील शासकीय रुग्णालयात डॉक्टरांना झालेल्या मारहाण प्रकरणी काम बंद आंदोलनाचा इशारा दिलेला असून डॉक्टरांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण.	दिनांक २९ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालद्वारे वितरित करण्यात आले.
५९.	**श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.** राज्यातील शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता देणे गरजेचे असताना त्यांच्या नियुक्त्यावरती शंका निर्माण करून त्यांच्या मान्यता रद्द केलेल्या असणे.	दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
६०.	**श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** मे.लोटस एम्पायर या उद्योग समुहाने अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. एफ-५ क्षेत्र २३२२६ चौ.मी. या भूखंडावर विहीत चटई क्षेत्रफळाचा वापर करून उद्योगाने दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ पूर्वी उत्पादनात जाण्याची अट असताना सदर उद्योगाने तसे न करता भूखंडावर गाळे बांधण्याची परवानगी मागितली असता महामंडळाने यासंदर्भात चुकीचे अर्थ लावून जाणीवपूर्वक परवानगी दिलेली असणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१)	(२)	(३)
६१.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** डोंबिवली (जि. ठाणे) येथील एम.आय.डी.सी. परिसरातील निवासी गृहसंकुलांना अंतिम भाडेकरार मिळण्यासाठी थकित मुद्रांक शुल्कासोबत ४०० पट दंडाची रक्कम भरण्याच्या नोटीसा १० मार्च, २०१७ रोजी मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे यांनी बजावून सदरहू रक्कम १५ दिवसांत भरण्याचो ताकीद दिल्याने या परिसरात वास्तव्य करणाऱ्या रहिवाश्यांमध्ये घबराटीचे निर्माण झालेले वातावरण.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
६२.	**श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** निपाणी जवळका, ता.गेवराई, जि.बीड येथे व्याजाने घेतलेले पैसे परत केल्यानंतर गहाण ठेवलेली जमीन परत मागणाऱ्या शेतकऱ्याचे हात-पाय बांधून त्याला सावकारांनी जबरदस्तीने विष पाजले असल्याची घटना दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी निदर्शनास येणे.	दिनांक २९ जून २०१७ रोजी निवेदन मा. सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
६३.	**श्री. रामराव वडकुते, वि.प.स.** अहिल्यादेवी महिला व बालविकास मंडळ, पारवा, ता. जि. परभणी या संस्थेने मौजे साडेगांव येथे माध्यमिक आश्रम शाळेस जोडून प्राथमिक आश्रम शाळेस मान्यता देण्याबाबत शासनाकडे मागणी करून देखील त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.
६४.	**सर्वश्री बाळाराम पाटील, जयंत पाटील, वि.प.स.** मुंबईमधील डहाणूकरवाडी येथील बालक विहार विद्यालयातील ११ शिक्षकांना माहे नोव्हेंबर, २०१६ पासून आजतागायत असे ४ महिन्यांचे वेतन मिळालेले नसणे.	दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
६५.	**सर्वश्री धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, वि.प.स.** परळी-बीड-नगर रेल्वे मार्गासाठी तसेच बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ साठी बीड शहर व परिसरातील जमिनींचे भूसंपादन करण्यात येत असून सदर भूसंपादन प्रक्रियेत जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला असून प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला जात असणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी मा.सदस्यांसाठी असलेल्या टपालखणात वितरीत करण्यात आले.

(१)	(२)	(३)
६६.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** भिवंडी-कल्याण-शीळ मार्गावर दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे कोनगांव (ता.भिवंडी) पासून कल्याण शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने त्याचा शहराच्या वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी मा.सदस्यांसाठी असलेल्या टपालखणात वितरीत करण्यात आले.
६७.	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** मुंबई एअरपोर्टच्या शेजारील निष्काषित झालेल्या झोपड्यांच्या सर्वेक्षणात १७५ झोपडीधारक पात्र ठरले असून त्यांचे अद्यापि पुनवर्सन झालेले नसणे.	दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी निवेदन मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आले.
६८.	**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** महूद, ता.सांगोला, जि.सांगोला या गावाने जलनियोजनाच्या कामासोबतच फळांची लागवड करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी विविध योजनांचे एकत्रित पॅकेज करून त्याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे पाठविलेल्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याबाबत.	दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले.

सन २०१७ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विवरण क्रमांक - १५अ

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये स्थगन प्रस्तावाची स्विकारलेली सूचना

अ.क्र.	सदस्यांचे नांव व विषय	सूचना ज्या तारखेस सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
काही नाही.			

सन २०१७ प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विवरण क्रमांक १६

विशेष उल्लेख म्हणून उपस्थित करण्यात आलेल्या सूचना - ३६

अ.क्र.	सूचना देणाऱ्या सदस्यांचे नाव व थोडक्यात विषय	विषय सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)
१.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** कल्याण रेल्वे परिसरातील स्कायवॉकवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केलेले असून याबाबत पालिका व राज्य शासनाकडे वारंवार तक्रारी करूनसुद्धा कोणतीही ठोस कारवाई होत नसणे.	दिनांक २९ मार्च, २०१७
२.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** ज्ञानयोग शिक्षण संस्था, कळवा, जि.ठाणे संचालित कळवा नाईट हायस्कूल, कळवा येथे मागील २० वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या सर्वश्री लक्ष्मण चौधरी, आनंदा सोनवणे, प्रमोद पाटील यांना शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठेरविण्यात आले असून त्यांची सेवा खंडीत करण्यात आलेली असणे.	दिनांक २९ मार्च, २०१७
३.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** रायगड जिल्ह्यातील खारभूमी योजना रखडल्याबाबत.	दिनांक २९ मार्च, २०१७
४.	**आर्की. अनंत गाडगीळ, वि.प.स.** महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केल्याप्रमाणे नवीन बांधलेल्या इमारतींच्या १० वर्षांपर्यंतच्या सुरक्षिततेची जबाबदारी आर्किटेक्टवर टाकणे योग्य नसल्याबाबत.	दिनांक ३१ मार्च, २०१७
५.	**डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.** राज्यातील अनुदानित विद्यालयांमधील अर्धवेळ ग्रंथपालांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बी.एड. वेतनश्रेणी लागू करून वैद्यकीय बिलांची परिपूर्ती व अन्य लाभ द्यावेत अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
६.	**श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** भटक्या विमुक्त जातीला क्रिमिलेअर मधून वगळण्याबाबत.	दिनांक ३१ मार्च, २०१७

(१)	(२)	(३)
७.	**श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** ग्रामीण भागाच्या निगडित समितीच्या निर्णयामध्ये विधानपरिषदेच्या सदस्यांचा सहभाग असणे गरजेचे असल्याने जिल्हा स:नियंत्रण व दक्षता समित्यांमध्ये विधानपरिषद सदस्यांचा समावेश करण्यात यावा अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
८.	**ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.** माळशिरस, जि.सोलापूर येथील तालुका व जिल्हा कोर्टासाठी नवीन इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देऊन बांधकाम करण्यात यावे अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
९.	**प्रा. अनिल सोले, वि.प.स.** नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील रक्त पेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञानांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१०.	**श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.** यवतमाळ शहरात पुरविण्यात येणाऱ्या मिनरल वॉटरच्या बाटल्यांची अन्न व औषध प्रशासनातर्फे तपासणी करण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
११.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** महावितरण कंपनीने एक नवीन ॲप तयार करून त्याद्वारे ग्राहकांच्या मोबाईलवर वीज बिले पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असून या सुविधेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असणे.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१२.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** मुंबई मेट्रो स्थानकांतील महाराष्ट्र सुरक्षा दलात काम करणाऱ्या महिलांनी त्यांच्यावर वरिष्ठ अधिकारी श्री.विश्वास दुदुस्कर यांच्याकडून छळ होत असल्याबाबत दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजी अंधेरी पोलीस ठाण्यात तक्रार केली असून या प्रकरणी चौकशी करून संबंधित दोषीवर कारवाई करावी अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१३.	**श्री. रामनिवास सिंग, वि.प.स.** राज्यात " डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन " मंजूर झालेल्या जागेतच होण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत.	दिनांक ३१ मार्च, २०१७

(१)	(२)	(३)
१४.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** नाते, (ता.महाड, जि.रायगड) या गावात भारताचे माजी अर्थमंत्री कै.सी.डी.देशमुख यांची जन्मस्थळ वास्तू विकसित करून त्यांच्या महानतेला शोभेल असे स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१५.	**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.** आमदार निवास मुंबई / नागपूर येथे लोकप्रतिनिधींना सेवा पुरविण्यासाठी १०३८ पदे निर्माण करण्याची आवश्यकता असूनही ती करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येणे.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१६.	**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.** परंडा, जि.उस्मानाबाद येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विभागात रिक्त असलेली पदे भरण्याची आवश्यकता असून महिला बचतगटाची थकीत रक्कम अदा करण्याबाबत करावयाची कार्यवाही.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१७.	**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** पत्रकारांवर दिवसेंदिवस प्राणघातक हल्ले तसेच मारहाण होत असल्याने पत्रकार संरक्षण कायदा करण्यात यावा अशी मागणी.	दिनांक ३१ मार्च, २०१७
१८.	**श्री. हरिभाऊ राठोड, वि.प.स.** राज्यातील भटक्या-विमुक्त जमातींना क्रिमीलेअरमधून वगळण्याबाबत.	दिनांक १ एप्रिल, २०१७
१९.	**श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.** राज्यातील शिक्षकांना राष्ट्रीय लोकसंख्या वही अद्यावत करावयाची कामे लावण्यात आल्यामुळे शाळेत एकही शिक्षक अध्यापन करण्यास उपलब्ध नसणे यामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होत असणे.	दिनांक १ एप्रिल, २०१७
२०.	**ॲड. अनिल परब, वि.प.स.** मार्वे रोड, मालाड, मुंबई उपनगर येथील मुंबई मिशिया मल्याळम ल्युथेरन चर्च (मल्याळम) यांच्या मालकीच्या भूखंडावर स्थानिक गुंडांनी जबरदस्तीने अतिक्रमण केल्याचे उघडकीस येणे.	दिनांक १ एप्रिल, २०१७

(१)	(२)	(३)
२१.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेविरूद्ध तक्रारींची चौकशी करण्यासाठी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना केली असून यामध्ये पोलीस उपअधिक्षक व त्यावरील पोलीस अधिकाऱ्यांविरूद्ध तक्रारीची चौकशी सदर पोलीस तक्रार प्राधिकरणाकडून करण्यात येणार असणे.	दिनांक १ एप्रिल, २०१७
२२.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या इमारत व फ्लॅटच्या बांधकामाची विकसित फी ची रक्कम ग्रामपंचायतींकडे वर्ग करणेबाबत.	दिनांक १ एप्रिल, २०१७
२३.	**श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** स्टेट बँक ऑफ इंडिया तसेच HDFC, ICICI, व AXIS बँकेंनी किमान रक्कम खात्यात नसल्यास तसेच रोख रक्कम जमा करणे व काढणे याकरिता दंड व शुल्क लावण्याचा घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील लाखो पेन्शनर्स आणि विद्यार्थ्यांना होत असलेला नाहक त्रास.	दिनांक १ एप्रिल, २०१७
२४.	**ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** राजापूर तालुक्यातील नाटे-आंबोळगडच्या सीमेवर प्रस्तावित असलेल्या आयलॉग या खाजगी कंपनीच्या कॅण्टीन जेटीच्या प्रकल्पाला स्थानिक मच्छिमारांचा विरोध असून सदर प्रस्तावित असलेला प्रकल्प रद्द करावा अशी मागणी.	दिनांक १ एप्रिल, २०१७
२५.	**श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** भातसा प्रकल्पासाठी आपली जमीन देऊन विस्थापित झालेल्या शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील विस्थापितांचे गेल्या ४७ वर्षांत पुनर्वसन न करता सुमारे ९७ कुटुंबांना वाऱ्यावर सोडून २७ कुटुंबातील वारसांना अद्याप मुंबई महापालिकेच्या नोकरीत सामावून घेतलेले नसणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
२६.	**श्री. रामराव वडकुते, वि.प.स.** श्री.एस.एस.इंगळी हे एका वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, मुंबई येथे महाव्यवस्थापक या पदावर कार्यरत असून मात्र प्रतिनियुक्तीवर असलेल्या श्री.इंगळी यांची नियुक्ती शासन निर्णय क्रमांक आस्था.२०१६/प्र.क्र.१३७/ई६, दिनांक १८ मार्च, २०१७	दिनांक ७ एप्रिल, २०१७

(१)	(२)	(३)
	अन्वये संपुष्टात आलेली असतानाही श्री. इंगळी यांना भूमिलेख विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात आलेले नसणे.	
२७.	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** शासनाने घोषित केल्यानुसार ग्रोथ सेंटरसह विकासकामांसाठी साडेसहाशे कोटींचा निधी देण्यात यावा तसेच ग्रोथ सेंटर प्रकल्पाविषयी जनजागृती करण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल २०१७
२८.	**डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.** राज्य मराठी संस्थेतील कर्मचारी व अधिकारी यांना भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्ती योजना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इत्यादी सेवा नियम लागू करण्याबाबत.	दिनांक ७ एप्रिल २०१७
२९.	**ॲड. राहुल नार्वेकर, वि.प.स.** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत प्रेरणा आर्टस आणि कॉमर्स कॉलेज नागपूर या केंद्रामध्ये हिवाळी सत्रात घेण्यात आलेल्या महिलांच्या लेखी परीक्षेला गरोदर महिलांना उद्‌वाहन वापरण्यास बंदी घातल्यामुळे सदर महिलांना परीक्षा केंद्रावरून परीक्षेविना तिथून जावे लागले असणे.	दिनांक ७ एप्रिल २०१७
३०.	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) वैजाळी ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळणेबाबत.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
३१.	**श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.** शिक्षण हक्क कायदा २००९ अन्वये विद्यार्थ्यांना वाहतुकीची सोय पुरविणे प्रशासनाची जबाबदारी असून माथेरान येथे वाहन बंदी कायद्यामुळे ती डावलली जात असल्याने ई रिक्षाला मान्यता देण्यासाठी शिफारस करणेबाबत.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
३२.	**प्रा. अनिल सोले, वि.प.स.** गडचिरोली येथील गोडवाना विद्यापीठातील पुनर्मुल्यांकन पद्धतीत गैरव्यवहार होत असून पुनर्मुल्यांकन करताना नापास विद्यार्थ्यांना पास करून देणारे रॅकेट मोठ्या प्रमाणात सुरू असणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७

(१)	(२)	(३)
३३.	**ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.** महाराष्ट्र कृषी औद्योगिक क्रांतीचे प्रणेते, सहकार महर्षी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व राजस्थानचे माजी राज्यपाल, स्वातंत्र्यसेनानी स्व.वसंतदादा पाटील यांनी विधीमंडळात केलेल्या भाषणांचा ग्रंथ वि.से.पागे केंद्राकडे तयार करून त्यांच्या जनशताब्दी वर्षात प्रकाशित करावा तसेच या ग्रंथात महाराष्ट्र विधानसभेतील दिनांक ७ डिसेंबर २०१६ व महाराष्ट्र विधानपरिषदेतील दिनांक ८ डिसेंबर २०१६ रोजीच्या कृतज्ञता प्रस्तावावरील भाषणांचा समावेश करावा अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
३४.	**ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) नाणार-कुंभवडे परिसरात केंद्र व राज्य सरकारच्यावतीने ग्रीन रिफायनरी पेट्रोकेमिकल्स हा प्रकल्प उभारण्यात येणार असून या परिसरातील जनतेला प्रशासनाकडून कोणतीही माहिती न देता सदर प्रकल्पासाठी जागेचे सर्वेक्षण सुरू असणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
३५.	**श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** आदिवासी विकास विभागामध्ये झालेल्या करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराप्रकरणी गायकवाड समितीचा अहवाल शासनास मागील तीन महिन्यापूर्वी प्राप्त झाला असून या अहवालामध्ये आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारामधील अनेक जणांवर दोषारोप ठेवलेला असून शासनाने तीन महिने उलटूनही दोषींवर कोणतीच कार्यवाही केलेली नसणे.	दिनांक ७ एप्रिल, २०१७
३६.	**श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** यवतमाळ जिल्ह्यातील तांडा सुधार योजनेत होत असलेला भ्रष्टाचार व प्रस्ताव मंजुरी करिता होत असलेली पैशांची मागणी याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी.	दिनांक ७ एप्रिल, २०१७

विवरण क्रमांक १७

महाराष्ट्र विधानपरिषद नियम २५९ व २६० अन्वये विचारात घेण्यात आलेले प्रस्ताव

(१) म.वि.प. नियम २५९ अन्वये चर्चा झालेला प्रस्ताव - १

(२) म.वि.प. नियम २६० अन्वये प्राप्त झालेले प्रस्ताव - ५

(३) म.वि.प. नियम २६० अन्वये स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - ५

(४) म.वि.प. नियम २६० अन्वये चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - १

अ.क्र	सदस्यांचे नाव	विषय	चर्चेचा दिनांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		म.वि.प.नियम २५९ अन्वये प्रस्ताव		
१.	**सर्वश्री धनंजय मुंडे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव.	"कर्जबाजारीपणा, नापिकी, शेतमालाला मिळत नसलेले भाव, अस्मानी संकटे, शेतीविषयक बदलणारी नेहमीची धोरणे, व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक यामुळे राज्यातील शेतकरी त्रस्त असणे, नोटाबंदीच्या निर्णयामुळे कृषी मालाचे भाव कोसळून शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान, या सातत्याने येणाऱ्या संकटामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असणे, मागील ३ वर्षात ९ हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, आत्महत्यांचे हे सत्र अद्यापही सुरूच असणे, जिल्हा बँकांवर लादलेल्या निर्बंधामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला सुरुंग लागणे, डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याकडे दुर्लक्ष होणे, घसरलेल्या दरामुळे ऊस, कापूस, तूर धान, कांदा, टोमॅटो,	६ व ७ एप्रिल, २०१७	चर्चा झाली.

सोयाबिन, भाजीपाला तसेच संत्रा, केळी उत्पादक शेतकरी कोलमडणे, कडधान्याच्या उत्पादनात विक्रमी वाढ होऊनही गेल्या पाच वर्षातील निच्चांकी भाव शेतकऱ्यांना मिळणे, शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांकडून सुरू असलेली खरेदी, निर्यात बंदीसारखे हत्यार उपसून कांदा उत्पादकाची केलेली कोंडी, हवामान आधारित फळ पिक विम्याचा हप्ता शासनाने न भरल्याने हजारो शेतकरी पिक विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, कोरडवाहू शेती अभियानांच्या आर्थिक तरतुदीत ८० टक्क्यांवरुन अधिक करण्यात आलेली कपात, अपघात योजनेची ५० टक्के रक्कमही शेतकऱ्यांना न मिळणे, कृषि विभागात हजारो रिक्त पदांचा असलेला बॅकलॉग, परिणामी योजनांची अंमलबजावणी होण्यात येणाऱ्या अडचणी, खरेदी केंद्रावरील आवक वाढल्याने नाफेड करुन उडीद, तूर खरेदी बंद करण्यात आल्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांनी दर पाडणे, मार्च महिन्यांतील अवकाळी पावसामुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे व नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नसणे, चारही बाजूने कोंडी होत असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग अंवलंबविलेला असणे, शेतकऱ्यांना या कठीण प्रसंगात आधार देण्यासाठी कर्जमाफीचा उपाय असतांना सरकारकडून सातत्याने कर्जमाफीस नकार देण्यात येत असणे, महाराष्ट्र शेजारील आंध्रप्रदेश या राज्याने ७ हजार ९०० कोटी रुपयांचे, तेलंगणा राज्याने १७ हजार कोटींचे, तामिळनाडू राज्याने ५ हजार ७८० कोटी रुपयांचे तर

१.	२.	३.	४.	५.
		उत्तर प्रदेश राज्याने ३६ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांकडील कर्ज माफ करणे, याच पार्श्वभूमीवर राज्यातही कर्जमाफीची सातत्याने होणारी मागणी, याच मागणीकरिता सर्व विरोधी पक्षांच्या वतीने दिनांक २९ मार्च ते ४ एप्रिल, २०१७ या कालावधीत चांदा ते बांदा दरम्यान काढण्यात आलेली संघर्ष यात्रा, सदरच्या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी सहभागी होऊन संपूर्ण कर्जमाफीची केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, आर्थिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."		

म. वि. प. नियम २६० अन्वये प्रस्ताव

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	चर्चेचा दिनांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	**सर्वश्री सुजितसिंह ठाकूर** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -	"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे, व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षावर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने बीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पिकविमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग,	२९ मार्च, १ व ५ एप्रिल, २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."		
२.	**सर्वश्री धनंजय मुंडे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -	"केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे शेतीमालाच्या दरात मोठी घसरण होणे, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी उत्पादित मालाला बाजारपेठेत भाव नसणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात मागील तीन वर्षांत ९ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करणे, सन २०१६ या एकाच वर्षात सुमारे तीन हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करणे, चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात केवळ मराठवाड्यात ११७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व नापीकीला कंटाळून आत्महत्त्या करणे, सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होत नसणे, मागील वर्षी डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शासनाने डाळ वर्गीय पिकांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले, यावर्षी तुरीचे विक्रमी उत्पादन होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठेतील तुरीचे भाव मोठ्या प्रमाणावर कोसळणे, शासनाने आधारभूत किंमतीने तूर खरेदी	चर्चा झाली नाही.	

करण्याचा निर्णय घेणे, मात्र तूर खरेदीबाबत कोणतेही नियोजन नसल्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, राज्यात लाखो क्विंटल तूर खरेदी केंद्रावर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकरी आठ ते दहा दिवस रांगेत तूर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी वाट पाहण्याची वेळ येणे, कर्मचारी आणि व्यापारी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना कमी भावाने स्थानिक व्यापाऱ्यांना तूर विक्री करण्याची वेळ येणे, कांदा, हरभरा, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरीसुद्धा मोठ्या प्रमाणावर अडचणीत असणे, शासनाने शेती मालाचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेती मालाला बोनस देण्याचे धोरण स्विकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करू अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करून बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३.	**सर्वश्री शरद रणपिसे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -	"राज्यात झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण, शहरीकरण वाढत असताना त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका यांच्यावर पडत असलेला ताण, नवीन शहरीकरण होत असल्यामुळे त्याठिकाणी रस्ते, सांडपाणी, घनकचरा व पाणीपुरवठा करणेबाबत स्थानिक स्वराज्य संस्था असमर्थ असणे, शहरीकरण वाढत असले तरी महानगरपालिकांना राज्य शासन पुरेसा निधी देत नसणे, त्यातच एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिका व राज्य शासन आर्थिक अडचणीत असणे, यापूर्वी केंद्रातील युपीए शासनाने शहरी विकासासाठी अनेक आणलेल्या योजना राज्य शासनाने बंद करणे, जवाहरलाल नेहरु नागरी पुररोत्थान योजना बंद करून स्मार्ट सिटी योजना आणणे, परंतु त्यासाठी निधींची भरीव तरतूद नसणे, तसेच अद्यापही स्मार्ट सिटीबाबतचे प्रकल्प अहवाल तयार नसणे, नागरी क्षेत्रात पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस उग्ररुप धारण करीत असणे, मुंबईतील ४ लाख झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्विकास योजने अंतर्गत स्वत:च्या मालकीची घरे देण्याची घोषणा शासनाने करणे, परंतु अद्यापही याबाबत झोपडपट्टीधारकांना घरे उपलब्ध करून न देणे, मुंबईतील एसआरए योजनेखाली बांधलेल्या ३५ हजार सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र न मिळणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा केवळ वाढीव चटई क्षेत्र मिळविण्यासाठी विकासक या योजनेचा वापर करून घेत असणे, ठाणे जिल्ह्यातील ७ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, नागपूर शहरातील सिव्हील लाईनचा परिसर वगळता अन्य भागात असलेले खराब रस्ते व पायाभूत		चर्चा झाली नाही.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सुविधांचा अभाव, पुणे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी, पार्कींगची समस्या, मेट्रो सुरू करण्याची केलेली घोषणा, काही प्रमुख भागात जनतेच्या मागणीनुसार रस्ता रुंदी रद्द न करणे, जुन्या वाड्यांचा पुनर्विकासाचा प्रलंबित असलेला प्रश्न, राज्य शासनाने पुणे शहरातील मेट्रोलेगत जाहीर केलेल्या वाढीव चटई क्षेत्राचे होणारे दुरगामी दुष्परिणाम, डंम्पिग ग्राऊंड व कचऱ्याची समस्या, औरंगाबाद शहरासाठी करावयाची समान्तर जलवाहिनी योजना कार्यान्वित न होणे, नारेगाव कचरा डेपोचा प्रलंबित प्रश्न, औरंगाबाद शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था व महापालिकेत नव्याने समाविष्ठ केलेल्या गावांचा निधीअभावी विकास न होणे, राज्यातील पर्यटन क्षेत्रात साईन बोर्ड नसल्यामुळे पर्यटकांना होणारा त्रास, एकूणच राज्यातील नागरी क्षेत्रात सर्वच पायाभूत सुविधांचा अभाव असताना राज्य शासनाचे त्याकडे होत असलेली दुर्लक्ष, शहराच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करण्यास होत असलेली दिरंगाई, त्यामुळे नागरीभागात विकासाचा उडालेला बोजवारा, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी." २०१		
४.	**सर्वश्री. धनंजय मुंडे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -	" सर्वसामान्यांना मुंबईत म्हाडाच्या माध्यमातून घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाच्या बदल्यात विकासकाने म्हाडाला अधिमूल्याऐवजी गृह साठा द्यावा अशी दुरुस्ती करण्यात आलेली असणे, परंतु शासनाच्या नवीन गृहनिर्माण धोरणात विकासकाकडून गृहसाठ्याऐवजी पैसे घेण्याची तरतूद करण्यात येणे, शासकीय जमिनीवरील झोपड्यांना		चर्चा झाली नाही.

एस.आर.ए. अंतर्गत भाडेपट्टा उपलब्ध करून जागा मालकी तत्वावर देणे, संक्रमण शिबिरात अनधिकृत घुसखोरी केलेल्या घुसखोरांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना रेडी रेकनर दरानुसार किंवा पंतप्रधान आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात येणे, एफ.एस.आय.ची खैरात वाटून पायाभूत सुविधेवरील ताण वाढणे, विकासकाकडून विनामुल्य प्राप्त होणाऱ्या पाच हजार सदनिका अद्याप म्हाडाला प्राप्त झालेल्या नसणे, शासनाचे गृहनिर्माण धोरण बिल्डरांच्या सभेत विभागाला थांगपत्ता लागू न देता जाहीर करण्यात येणे, स्थावर मालमत्ता कायद्याच्या अंमलबजावणी करीता होत असलेला विलंब, तसेच राज्यातील निवासी डॉक्टरांवर सातत्याने हल्ले होणे, त्यात डॉक्टरांना गंभीर इजा पोहचणे, वाढत्या हल्यांमुळे डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, सुरक्षेच्या मागण्यांसाठी राज्यातील निवासी डॉक्टरांनी रजा आंदोलनाच्या माध्यमातून संप सुरू करणे, संपामुळे राज्यातील रुग्णसेवा ठप्प होणे, उपचाराअभावी रुग्णांचे अतोनात हाल होणे, गंभीर आजारी रुग्णांना प्राण गमवावे लागणे, मा. उच्च न्यायालयानेही संपाची गंभीर दखल घेऊन रुजू न होणाऱ्या डॉक्टरांना बडतर्फ करण्याचा इशारा देणे, मा.न्यायालयाच्या कारवाईच्या इशाऱ्यानंतर " मार्ड " ने संपापासून स्वत:ला वेगळे करणे, न्यायालयाच्या आदेशानंतर, तसेच प्रशासनाने नोटीस बजावूनही डॉक्टर रुजू न होणे, यामुळे राज्यातील रुग्णांच्या जिविताला धोका निर्माण होणे, निवासी डॉक्टरांच्या संपावर तातडीने तोडगा काढून कायमस्वरूपी, परिणामकारक तोडगा शोधणे आवश्यक असणे, तसेच म्हैसाळ (जि. सांगली)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		येथेही डॉ. खिद्रापुरे यांच्या क्लिनिकमध्ये अनेक गर्भपात केलेले असणे, गर्भलिंग निदान करून स्त्री-भ्रूणाची हत्या करणे, गर्भपातासाठी मिसोप्रासससारख्या गोळ्या वापरलेल्या असणे, ही औषधे मुंबईतून अवैधरित्या दलालाकडून खरेदी केलेली असणे, या गर्भपाताच्या रॅकेटमध्ये अनेकजणांचा सहभाग असल्याचे उघडकीस येणे, याप्रकरणी जलदगतीने तपास करणे आवश्यक असणे, या सर्व गोष्टींचा विचार करता राज्यातील डॉक्टरांना संरक्षणाबरोबरच रुग्णांनाही रुग्णसेवा देणे गरजेचे असणे, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक असणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील झोपडी धारकांना दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."	
५.	**डॉ. सुधीर तांबे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -	" राज्य शासनाने मोठा गाजावाजा करून मेक ईन इंडिया व मेक इन महाराष्ट्राची घोषणा केलेली असली तरीही सद्यःस्थितीत राज्यात उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आलेली मंदी, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, जळगांव, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर इत्यादी जिल्ह्यांसह सर्व औद्योगिक शहरातील बंद पडलेले उद्योग, उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पूर्वी आर्थिक फायदे घेतलेले असणे, परंतु आज त्या जागेवर वर्षानुवर्षे बंद असलेला उद्योग, या हजारो बंद उद्योगांकडे राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांचे कोट्यवधी रुपयांचे थकीत असलेले कर्ज, कर्ज देणाऱ्या बँकांना अशा बंद उद्योगांच्या प्लॉटवर शासनाच्या नियमामुळे कारवाई करणे शक्य नसल्यामुळे नवीन उद्योगासाठी प्लॉट उपलब्ध करता न येणे, त्यामुळे उद्योगधंद्यांची वाढ थांबणे, परिणामी अनेक उद्योग राज्याबाहेर	चर्चा झाली नाही.

स्थलांतरीत होणे, नवीन उद्योग निर्माण न झाल्यामुळे ओढवलेली बेरोजगारी, सेस खाली २ हजार एकर जमीन घेण्यात येणे, परंतु त्यावर उद्योग निर्मिती करण्यास शासनाची असलेली उदासिनता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने जमीन मंजूर केल्यानंतर उद्योग घटकास देकार पत्र देण्यास अवाजवी कालावधी लागणे, त्यामुळे शासकीय धोरणाबद्दल संभ्रम व निराशेचे वातावरण पसरणे, गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी संपर्क साधून सर्व मंजुऱ्या मिळवून देण्यासाठी मैत्री कक्ष स्थापन करणे, सदर कक्षांकडून कोणतेही सकारात्मक काम न होणे, फक्त आलेल्या तक्रारीचे निरसन करण्यात येत असणे, त्यामुळे मैत्री कक्ष स्थापनेमागील हेतू निष्फळ ठरणे, उद्योगांना विविध परवानग्यासाठी उद्योजकांना छळ होणे, अशा परवानग्या घेत असताना मोठ्या प्रमाणात लाचखोरी होत असल्याचे उघड होणे, उद्योगासाठी वीजेच्या दरात सवलतीमध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये दुजाभाव करण्यात येणे, तसेच सातत्याने वाढणारे विजेचे दर उद्योग क्षेत्रातील मंदीमुळे व नोटाबंदीमुळे अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांवर परिणाम झाल्यामुळे त्यात काम करणाऱ्या कामगारांची रोजंदारी कमी केली जात असणे, किंवा त्यांना कामांवरुन कमी केले जात असल्याने या कामगारांवर बेरोजगारीमुळे आलेली उपासमारीची पाळी, कामगार कायद्यातील त्रुटींमुळे कंत्राटी कामगारांचा प्रश्नही अनेक वर्षे प्रलंबित असणे, शासनाच्या उद्योग क्षेत्राच्या उदासिन धोरणामुळे राज्यात बिकट परिस्थिती निर्माण झाली असून अनेक उद्योग राज्याबाहेर जात असताना याकडे राज्य शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर सर्वसाधारण अर्धा तास चर्चेच्या १०१ सूचना व प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर ५३ अर्धा-तास चर्चेच्या सूचना अशा एकूण १५४ सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ६४ सूचना अस्वीकृत झाल्या आहेत. ८९ सूचना स्वीकृत झाल्या आहेत व ०१ सूचना शासनाकडे वस्तुस्थितीकरिता प्रस्तावित करण्यात आली. उक्त स्वीकृत सूचनापैकी कोणत्याही अर्धा तास चर्चेच्या सूचनांवर चर्चा झालेली नाही.

(विवरण क्रमांक १८ व १९)

विवरण क्रमांक १८

अर्धा तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये) (सर्वसाधारण)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (सर्वसाधारण) अर्धा तास चर्चेच्या सूचना.

(१)	प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या	१०१
(२)	मान्य झालेल्या सूचनांची संख्या	६६
(३)	सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या	- -
(४)	अमान्य झालेल्या सूचनांची संख्या	३४
(५)	चर्चा झालेल्या सूचनांची संख्या	- -
(६)	बॅलटमध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या	२०
(७)	सदस्य अनुपस्थितीमुळे चर्चा झाली नाही	- -
(८)	विभाग / सदस्य निर्देशित संख्या	०१
(९)	मा.सदस्यांनी दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना	- -
(१०)	व्यपगत झालेल्या सूचना	- -

सन २०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण १०१ अर्धा तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६६ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या २० सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. उक्त सूचनांपैकी कोणत्याही सूचनेवर चर्चा झालेली नाही.

विवरण क्रमांक १९

अर्धा तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये) (प्रश्नातून उद्‌भवलेल्या)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर (प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या) प्राप्त झालेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना.

(१)	प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या	५३
(२)	मान्य झालेल्या सूचनांची संख्या	२३
(३)	अमान्य झालेल्या सूचनांची संख्या	३०
(४)	सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या	- -
(५)	विभाग/सदस्य निर्देशित संख्या	- -
(६)	चर्चा झालेल्या सूचनांची संख्या	- -
(७)	बॅलटमध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या	०४
(८)	संम्मिलित सूचनांची संख्या	- -
(९)	व्यपगत झालेल्या सूचना	- -

सन २०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण ५३ सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी २३ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या ०४ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. उक्त सूचनांपैकी कोणत्याही सूचनेवर चर्चा झालेली नाही.

विवरण क्रमांक २०

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यासाठी आलेल्या सूचना

(१) आलेल्या सूचनांची संख्या	-	०८
(२) स्वीकृत सूचनांची संख्या	-	०७
(३) अस्वीकृत सूचनांची संख्या	-	- -
(४) सभागृहात चर्चा झालेल्या सूचना	-	०१
(४) सभागृहात चर्चा न झालेल्या सूचना	-	०६
(५) सम्मिलित करण्यात आलेल्या सूचना	-	०१

अ. क्र.	सदस्यांचे नाव व विषय	ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
१.	**सर्वश्री जयवंतराव जाधव, हेमंत टकले, अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.** "दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ रोजी नगरसूल (ता.येवला जि.नाशिक) येथे कांद्याला भाव मिळत नसल्यामुळे एका शेतकऱ्याने पाच एकर उभ्या कांदा पिकाला आग लावून शेत पेटवून देणे, कांद्याला सरासरी दोन ते तीन रुपये भाव मिळत असल्यामुळे उत्पादन खर्चही मिळणे दुरापास्त होणे, माहे जुलै व ऑगस्ट, २०१६ मध्ये विकलेल्या कांद्याला प्रति क्विंटल एक रुपयाचे जाहीर केलेले अनुदान अद्यापही शेतकऱ्यांच्या हाती न पडल्यामुळे शासनाने बाजार हस्तक्षेप योजनेद्वारे भाव स्थिरीकरण	दिनांक २९ मार्च, २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)
	निधीतून कांद्याचो खरेदी करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, दिनांक ५ जुलै २०१६ रोजीपासून कांदा या पिकाचा जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समावेश नसल्याने कांद्याच्या एकूण उत्पन्नापैकी देशांतर्गत गरज लक्षात घेवून निर्यातीबाबत शीघ्र गतीने उपाययोजना करण्याची तसेच निर्यातीला प्रोत्साहन आणि कांदा वाहतुकीसाठी पुरेशा रेल्वे वॅगन्स उपलब्ध करण्याची आवश्यकता, शासनाच्या अनास्थेमुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांकडून हमीभावाने कांदा व इतर शेतमाल खरेदी करण्याची गरज, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला कमालीचा संताप, यावर्षी पावसाने साथ दिल्यामुळे कांदा, तूर, टॉमेटो इत्यादी शेतमालाचे विक्रमी उत्पादन होणे, अनेक शासकीय खरेदी केंद्रांवर १५ दिवसांपासून रांगा लागल्याने शेतकऱ्यांचे होणारे प्रचंड हाल, शेतकऱ्यांना वेठीस धरल्यामुळे तसेच उत्पादन खर्च आणि शेतमालाला मिळणारा भाव यातील तफावतीमुळे शेतकरी हैराण होणे, राज्यातील शेतकरी कर्जबाजारी होऊनही केंद्र शासनाकडून पीक कर्जावरील २ महिन्याचेच व्याज माफ केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे निर्माण झालेले वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." २. **सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सतिश चव्हाण, वि.प.स.** "केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे राज्यात शेतीमालाच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर घसरण होणे, गतवर्षी डाळीचे भाव वाढल्यामुळे शासनाने डाळवर्गीय पिकांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारणे, यावर्षी राज्यात तूर, हरबरा यासारख्या पिकांचे विक्रमी उत्पादन होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे तुरीचे भाव मोठ्या प्रमाणावर कमी होणे, शासनाने आधारभुत किमतीने तूर खरेदी सुरू करणे, मात्र खरेदी केलेल्या तुरीसाठी पुरेशी साठवणुकीची यंत्रणा नसणे, अपुरा कर्मचारी वर्ग व खरेदीचे योग्य नियोजन नसल्यामुळे ही प्रक्रिया अतिशय धिम्या गतीने होणे, खरेदी केंद्रावर	स्वीकृत. चर्चा झाली नाही.

(१)	(२)	(३)	(४)
	हजारो क्विंटल तुर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, शेतकऱ्यांना तूर विक्रीसाठी पाच ते सहा दिवस खरेदी केंद्रावर रांगेत थांबण्याची वेळ येणे, खरेदी केलेल्या तुरीचे पैसे मिळण्यास पंधरा ते वीस दिवसांचा कालावधी लागणे, यामुळे नाईलाजास्तव अनेक शेतकऱ्यांनी कमी भावाने व्यापाऱ्यांना तुरीची विक्री करणे, व्यापारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने शेतकऱ्यांची मोठी आर्थिक लूट होत असणे, या प्रकारामुळे शेतकऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी होणे, शेतीमालाच्या किमतीमध्ये झालेली घट लक्षात घेवून कर्नाटक सरकारने प्रति क्विंटल १००० रु. बोनस देण्याची आवश्यकता असणे, मात्र शासनाने या बाबत कोणतीही कार्यवाही न करणे, आधारभुत किमतीवर तूर खरेदीचे योग्य नियोजन न केल्यामुळे राज्यभर तुर उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरणे, याच पद्धतीने कांदा, उडीद, हरबरा, सोयाबीन सारख्या शेतीमालाचे बाजार भाव कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, शासनाने अशा शेतीमालाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्रांची संख्या वाढवून शेतीमालाच्या हमीभावाने खरेदीचे योग्य नियोजन करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेवून करावयाची तातडीची उपाययोजना व कार्यवाही."		
३.	**सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, सतिश चव्हाण, वि.प.स.** "बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील अनेक विभाग व अत्याधुनिक उपचार यंत्रणा बंद असल्यामुळे गोरगरीब रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणे, रुग्णालयाच्या प्रस्तावित विस्तारिकरणाचे काम प्रलंबित असल्यामुळे सद्यःस्थितीत अनेक वेळा आंतर रुग्णांना बेड नसल्यामुळे जमीनीवर उपचार घ्यावे लागत असणे, रुग्णालयातील डायलेसीस सेंटरमध्ये केवळ चार मशिन उपलब्ध असल्यामुळे जिल्ह्यातील सुमारे २००० रुग्णांना वेळेवर योग्य प्रमाणात डायलेसीस सुविधा न मिळणे, नेफ्रॉलॉजिस्टसह अनेक तज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घेण्याची वेळ येणे, गरीब आणि आर्थकदृष्ट्या मागासलेल्या रुग्णांना मोफत किंवा अल्प दरातील उपचार मिळत	स्वीकृत चर्चा झाली नाही.	

(१)	(२)	(३)	(४)
	नसणे, केवळ डायलेसीस किंवा तत्सम महागडे उपचार घेण्यासाठी पैसे नसल्यामुळै अनेक रुग्णांचे मृत्यु होणे, जिल्ह्यातील उप जिल्हारुग्णालय व ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलेसीससह इतर सुविधा देण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह रुग्णांच्या नातेवाईकांनी करणे, बीड जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये व उप जिल्हा रुग्णालयांच्या विस्तारिकरण तसेच मंजूर असलेली कामे मोठ्या प्रमाणावर रखडलेली असणे, नेत्रशस्त्रक्रिया शिबीरासह अनेक मोफत चिकित्सा शिबीरांचे आयोजन होत नसल्यामुळे गोर गरीब रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागणे, जिल्हा रुग्णालयातील अत्यावश्यक सेवांकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष."		
४.	**सर्वश्री. जयंत पाटील, कपिल पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स.**		
	"राज्यात अनेक वर्षांपासून बैलगाडी शर्यतींची परंपरा आहे. प्राणी मित्रांच्या आरोपामुळे केंद्र सरकारने जुलै, २०११ मध्ये अध्यादेश काढून प्राण्यांच्या शर्यतीवर बंदी घातल्याने राज्यात बैलगाडी शर्यती बंद करण्यात आल्या आहेत. बैलगाडी शर्यती हा शेतकऱ्यांचा पारंपरिक खेळ असून सदर बैलगाडी शर्यत बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. राज्य शासन रेसकोर्सवर भांडवलदारांना पैसे उडविण्याची मुभा देत आहे. मात्र शेतकऱ्यांच्या परंपरेवर तसेच त्यांच्या मनोरंजित खेळावर आडकाठी निर्माण करत आहे. शेजारच्या तामिळनाडू राज्यात राज्य शासनाने अध्यादेश काढून "जलिकट्टू नामक बैलांशी झुंज" या खेळाला परवानगी दिली आहे. त्याच धर्तीवर राज्यात बैलगाडी शर्यतीवरील बंदीमुळे केवळ बैलगाडी मालक, शेतकरी होरपळलेले नसून शर्यती दरम्यान व्यवसाय करणारे दुकानदार या विक्रेत्यावर परिणाम झालेला आहे. सबब राज्यामध्ये बंद असलेल्या बैलगाडी शर्यती पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना."	स्वीकृत चर्चा झाली नाही.	

(१)	(२)	(३)	(४)
५.	**श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.**		
	"राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळेतील सन २००३-०४ ते २०१०-११ या वर्षातील शिक्षकांच्या ९२६ वाढीव पदांना दिनांक २१ मे २०१४ च्या शासन आदेशाने मान्यता देण्यात येणे, सदर पदांच्या मान्यतेस अधीन राहून विभागीय उप संचालकांनी (शिक्षण) बिंदूनामावली प्रमाणे संबंधित शिक्षण संस्थेतील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देणे, पदव्युत्तर शिक्षण घेऊन गेली १४ ते १५ वर्षे अध्यापनाचे कार्य विना वेतन करण्याची वेळ या संबंधित शिक्षकांवर येणे, वेतनासाठी संबंधितानी शासनाकडे निवेदने देण्यात येणे, काही वेळेस आंदोलनेही करण्यात येणे, परंतू शासनाकडून या प्राध्यापकांच्या वेतनासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद आजपावेतो न करणे, त्यामुळे उच्च विद्याविभूषित तरुणांची शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याची दृष्टी बदलने, पूर्ण वेळ काम आणि शून्य दाम यामुळे संबंधिताना आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागणे, तरी सदर पदांना चालू अधिवेशनात आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करून विना वेतन कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना न्याय देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	स्वीकृत चर्चा झाली नाही.	
६.	**श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री किरण पावसकर, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.**		
	"मा. सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील बेघर गरीबांसाठी रात्र निवारे उपलब्ध करून देण्याचे आदेश देऊनही प्रामुख्याने तामिळनाडू आंध्रप्रदेश राज्याने सर्व प्रथम हे रात्र निवारे उभारणे, मात्र महाराष्ट्रात आजही रात्रनिवारे प्रस्तावित असणे. अश्या स्थितीत मा. न्यायालयाचे आदेश आहेत असे सांगून जोगेश्वरी पूर्व, आणि नवी मुंबईतील दिघा व इतर अनेक ठिकाणी न्यायालयाचा अवमान होईल म्हणून तातडीने तोडक कारवाई केल्यामुळे शेकडो नागरिक बेघर होऊन त्यांचे संसार रस्त्यावर येणे. मोहे डिसेंबर, २०१५ विधीमंडळ अधिवेशनादरम्यान काहीही झाले तरी न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करू वेळ प्रसंगी कायदा करून ऑर्डीनन्स आणू पण गरिबांना बेघर होऊ देणार नाही असा दिलेला	स्वीकृत चर्चा झाली नाही.	

(१)	(२)	(३)	(४)
"मुंबई वाहतूक पोलीस विभागात कोट्यवधींचा भ्रष्टाचार होत असून प्रत्येक गुन्ह्यांसाठी वाहतूक पोलिसांचे दर ठरलेले आहे असा गौप्यस्फोट वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनील टोके यांनी करण्यात येणे, वाहतूक नियंत्रण शाखेत सुरू असलेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत चौकशी करून योग्य ती कारवाई करावी यासाठी गेल्या तीन वर्षांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पुराव्यानिशी पाठपुरावा करीत असणे, भ्रष्टाचारात सामील होण्यास नकार दिल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून छळ होतो असाही आरोप सुनील टोके यांनी करणे, मुंबई वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सुनील टोके यांनी केलेल्या आरोपांची शासनाने दखल घेऊन, या प्रकरणी सखोल चौकशी करून, त्यानुसार वाहतूक पोलिसांमधील दोषी असणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली तसेच वाहतूक पोलिसांमधील होत असलेला भ्रष्टाचार रोखण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		
१०५	१७३	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "भिवंडी-निजामपूर महानगरपालिका सभागृहाचे नेते मनोज म्हात्रे यांच्यावर गोळीबार करीत तलवार, कोयत्याने हात-पाय तोडून त्यांची निघृण हत्या केल्याची घटना दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी घडणे, मनोज म्हात्रे हे ओसवालवाडी येथील त्यांच्या घरी जात असताना इमारतीच्या आवारात दबा धरून बसलेल्या सात-आठ मारेकऱ्यांने बेछुट गोळीबार करीत तलावर, कोत्याने त्यांच्यावर असंख्य वार करून पसार झाले, रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या म्हात्रे यांना तातडीने ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात हलविण्यात आले मात्र उपचारापूर्वी मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले, या हत्येचा थरार सीसीटीव्हीत कैद होणे, सदरील घटनेमुळे भिवंडी परिसरातील जनतेमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदरील घटनेतील आरोपींना अटक करण्यात न आल्याने नागरिकांनी भिवंडीमध्ये रस्ता रोको करून शासनाच्या विरुद्ध निषेध व्यक्त करण्यात येणे, राज्यशासनाने सदरील घटनेची सखोल चौकशी करून तातडीने या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकतायाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता.	
१०६	१९४	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे मोबाईलच्या सिम कार्डची विक्री करणाऱ्या सात जणांच्या टोळीला ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या भिवंडी पथकाने दिनांक २४ जानेवारी २०१७ रोजी वा	कित्ता.	

त्यादरम्यान केलेली अटक, या कारवाई जप्त करण्यात आलेली सुमारे ११ हजार सिमकार्ड व २४०० बनावट आधारकार्ड भिवंडीसारख्या अतिसंवेदशनशील शहरातून दहशतवाद्यांना असे सिमकार्ड मिळाली आहेत का? असा प्रश्न निर्माण झाला असून, या प्रकरणाची शासनाने चौकशी करून या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१०७ २३१ **डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** कित्ता.

"अंबड (नाशिक) पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार भाऊसाहेब यशवंत सोनवणे यांनी ते ऑन ड्युटी असताना पोलीस स्टेशनमधील नवीन बॅरेकमध्ये दिनांक १ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास गळफास घेऊन आत्महत्या करणे, नाशिक महानगरात व पोलीस विभागात त्यामुळे प्रचंड खळबळ उडणे, श्री. सोनवणे यांनी अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांचे जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा संशय मृताचे मित्रपरिवार नातेवाईक व कुटुंबियांनी व्यक्त करणे, मृत सोनवणे यांनी विविध ऍथॅलेटिक्स स्पर्धांमध्ये नाशिक पोलिसांच्यावतीने प्रतिनिधीत्व केलेले असणे, उत्तम क्रिकेटपटू, खेळाडूवृत्ती, सुस्वभावी आणि आयुष्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारे श्री. सोनवणे हे आत्महत्या करणे शक्यच नाही, असा ठाम विश्वास नातेवाईक कुटुंबिय व मित्रपरिवाराने दर्शविणे व त्यांचे मृत्यूबाबत घातपाताचा संशय व्यक्त करणे, श्री. सोनवणे यांनी मृत्युपूर्व लिहलेल्या चिठ्ठीत साहेबांचे नांवाचा उल्लेख असणे, त्यामुळे श्री. सोनवणे यांच्या आत्महत्येप्रकरणी वरिष्ठ विभागामार्फत तपास करण्याची संबंधितांकडून मागणी केली जाणे, घटना होऊनसात महिन्याचा मोठा कालावधी होऊनही अद्याप चौकशी/तपास न होणे वा चौकशीचे निष्कर्ष संबंधितांचे नातेवाईक, जनतेसमोर आले नसल्याचे सांगण्यात येऊन याविषयी नाराजी व्यक्त केली जाणे, त्यामुळे ह्या संशयास्पद मृत्यु/आत्महत्याप्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०८	२६९	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "नवीन कायद्यांचे प्रारुप तयार करणे, अस्तित्वात असलेल्या कायद्यात, नियमात बदल करणे, गृह विभागासारख्या अत्यंत महत्त्वाच्या व संवेदनशील विभागाच्या कायद्यासंदर्भातही सदर कार्यवाही करणे इत्यादी कामे खाजगी विधी कंपन्यांकडून करून घेण्याचा दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजीच्या दरम्यान शासनाने घेतलेला निर्णय, त्यासाठी तीन कंपन्यांना मान्यता देऊन त्यांच्याबरोबर करण्यात आलेले करार, काही विषय अतिशय महत्त्वाचे, संवेदनशील व गोपनीय स्वरूपाचे असल्यामुळे सदरचा निर्णय गोपनियतेचा भंग करणारा, संवेदनशील विषयाबाबत विपरीत परिणाम करणारा ठरण्याची शक्यता, सदर तीन कंपन्यांवर शासन नियमांची बंधने नसल्यामुळे त्यांची शासनाशी बांधिलकी नसल्याची निर्माण झालेली भीती, शासनाचे विविध विभाग व विशेषकरून शासनाचा विधी व न्याय विभाग यासंदर्भात राज्याच्या निर्मितीपासूनच सक्षम असताना असा निर्णय घेणे उचित नसणे, शासन यंत्रणेवर यामुळे अविश्वास दाखविल्यासारखे होणे, त्यामुळे त्यांचे खच्चीकरण होत असल्यासारखी स्थिती दिसून येत असणे, या निर्णयामुळे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यात पसरलेले संभ्रमावस्थेचे वातावरण, त्यामुळे या अनावश्यक असलेल्या खाजगीकरणाच्या निर्णयाची स्पष्टता जाहीर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.**	कित्ता.	
१०९	२७७	"सायन-पनवेल महामार्गाजवळ कोपरा गावानजीक उड्डाणपुलाजवळ मोठ्या प्रमाणात आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, आमदारांचे शिफारसपत्र आदी महत्त्वाच्या कागदपत्रांचा खच पडल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेला असणे, ठाणे, मुंबई व नवी मुंबई येथील नागरिकांच्या कागदपत्रांचा त्यात समावेश असणे, एनपीएचटी	कित्ता.	

या शासकीय कागदपत्रे वाहून नेणाऱ्या एजन्सीच्या बेजवाबदारपणामुळे अतिमहत्त्वाची कागदपत्रे महामार्गावर पडणे, या कागदपत्रांचा दुरुपयोग होऊ शकत असल्याने या हलगर्जीपणा करणाऱ्या कंपनीविरुद्ध जनमानसात निर्माण झालेला असंतोष व संतापाचे वातावरण, हलगर्जीपणा करणाऱ्या या कंपनीला दिलेले शासकीय कंत्राट त्वरित रद्द करून दिलेल्या रक्कमांची तातडीने वसुली करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका. ”

११० ३२७ **डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** कित्ता.

“मालेगांव (जि. नाशिक) येथे अवैधरित्या गोवंश जनावरे आणली जात असल्याच्या तक्रारीवरून दिनांक १३ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास गोरक्षकांनी वाहन अडविणे, तद्नंतर दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी जमावाने येऊन काही जणांच्या टोळक्याने गोरक्षकांवर नागरी वस्तीत जीवघेणा हल्ला चढविणे, त्यात गंभीर जखमी होणे, आणि त्याची प्रतिक्रिया उमटून दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी मालेगांवी कडकडीत बंद पाळला जाणे, अनपेक्षितरित्या घडलेल्या या घटनांमुळे मालेगांव शहरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, जनतेत मोठ्या प्रमाणात घबराट पसरणे, स्थानिक पोलीस प्रशासनास, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळतांना अत्यल्पसंख्येने असलेले पोलीस कर्मचारी, अधिकारी व राज्य राखीव दलाच्या जवानांच्या पुरेशा बंदोबस्ताअभावी परिस्थिती हाताळतांना मोठी कसरत करावी लागणे, संवेदनशिल मालेगांव शहरात कोणत्याही शुल्लक घटनेनंतर पुणे, धुळे, नागपुर, दौंड, अमरावती, औरंगाबाद येथून राज्य राखीव दलाच्या जवानांना पाचारण करावे लागणे, तणावाचे परिस्थितीत अपुऱ्या पोलीस संख्या बळामुळे त्वरित कारवाई करणेस विलंब होणे, त्यामुळे परिस्थिती चिघळणे, हाताबाहेर जाणे, यापुर्वीही अशांततेच्या कालावधीत या बाबींचा पुनः पुनः प्रत्यय येणे, व जिवीत वित्त हाणी होणे, अपुऱ्या संख्येने असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांमुळे गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यांत स्थानिक पोलिसांना अपयश येत असल्याचे सांगितले जाणे, या पार्श्वभुमीवर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मालेगांवी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय व राज्य राखीव दलाची स्वतंत्र कंपनी आणि नवीन आठ पोलीस ठाणी मंजुर करण्याची तसेच पोलीस कर्मचारी, अधिकारी यांची संख्या वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत जनता व लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी केली जाणे, तसेच मालेगांव (जि. नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबत तारांकित प्रश्न क्रमांक १४६०० (दि. ३० मार्च २०१६) व फेर तारांकित प्रश्न क्रमांक १९७२१ (दि. २० जुलै २०१६) अन्वये लोकप्रतिनिधींनी शासनाचे लक्ष वेधणे, यावर लेखी उत्तरात मा. मुख्यमंत्री महोदयांनी "मालेगांव (जि. नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबतचा फेरप्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही", असे उत्तर देणे, मालेगांव येथील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर दिनांक १७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक ग्रामीणचे जिल्हा पोलीस प्रमुखांनी पोलीस आयुक्तालयासह नवीन आठ पोलीस ठाण्याचा प्रस्ताव शासनास पाठवंण्यांत आला असून शासन आदेशानुसार सुधारित प्रस्ताव तयार करण्यांत येत असल्याचे सुतोवाच करणे, मालेगांव पोलीस आयुक्तालय कार्यान्वयीत झाल्यास, पोलीस बळाच्या संख्येत वाढ होऊन, सातत्याने बाहेरून पोलीस बंदोबस्त मागविण्याची वेळ प्रशासनावर येणार नाही, याबाबी विचारात घेता याप्रश्नी तात्काळ निर्णय होणेची आवश्यकता, तरी शासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होणे, शासनाने उक्त मागणी तात्काळ मंजुर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१११	३८३	**डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** " नाशिक शहर हद्दीत जानेवारी, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या नऊ महिन्याच्या कालावधीतच अपघाताच्या एकुण ७८६ घटना घडल्याचे	कित्ता.	

दिनांक ४ नोव्हेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध माहितीवरून निदर्शनास येणे, या अपघातात जीवघेण्या व गंभीर अपघातांची संख्या ३३३ इतकी असणे, रस्ते अपघातात १४७ व्यक्तींना आपल्या प्राणांस मुकावे लागणे, अनेकांना गंभीर दुखापत होणे, जानेवारी ते एप्रिल, २०१६ या कालावधीतील एकूण ३९३ अपघातांपैकी तब्बल ९४ घटनांमध्ये अपघातास कारणीभुत असलेले वाहन चालक घटना स्थळावरून फरार झाल्याचे समोर येणे, अपघाताच्या घटनेनंतर पळून जाणे (हिट ॲण्ड रन) कायद्याने गुन्हा असणे, हिट ॲण्ड रनच्या बऱ्याच केसेस पादचारी व्यक्तीच्यासंबंधी किंवा रात्रीच्या वेळेस झालेल्या असणे, अशा घटनांमध्ये जखमी व्यक्तीस वेळीच उपचार न मिळाल्याने मृत्युमुखी पडण्याची शक्यता अधिक प्रमाणात असणे, हिट ॲण्ड रनच्या घटना नाशिक महानगरात सातत्याने घडणे, यासंख्येत वाढ होणे, हे प्रकार रोखण्यासाठी सी. सी. टी. व्ही. कॅमेरे उपयोगी ठरणे, मात्र, सिंहस्थ कुंभमेळादरम्यान नाशिक शहरात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले सी. सी. टी. व्ही. काढून घेण्यात येणे, हिट ॲण्ड रनचे प्रकार सर्वत्रच वाढत असल्याने शासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाय त्वरित अंमलात आणण्याची गरज, शासनाने दुचाकी चालविणाऱ्यांसाठी १८ वर्षे पूर्ण वयाची मर्यादा निश्चित केलेली असणे, पण गेल्या काही कालावधीपासून ठिकठिकाणी अल्पवयीन मुले सर्रास दुचाकी चालवत असल्याचे निदर्शनास येणे, या अल्पवयीन मुलांकडूनच त्यांच्या दुचाकी 'धुम स्टाईल' ने पळविल्या जात असल्याने गंभीर स्वरुपाचे अपघातात सातत्याने वाढ होणे, या अल्पवयीन मुला-मुलींकडे मोपेडबरोबरच गिअरच्या दुचाकी सर्रासपणे पालकांनी सुपूर्द केलेली असणे, त्यामुळे अपघातांची संख्या वाढणे, शहरात विविध कॉलेज रस्त्यांवर व अन्य मार्गावरही तरूणांकडून सुसाट वेगाने दुचाकी चालविण्याचे प्रकारात मोठी वाढ होणे, अनियंत्रित वेग आणि दुचाकीवर असतांना मोबाईल सुरू ठेवणे, चित्र-विचित्र हावभाव-कसरती करणे, यामुळेही अपघातात आणि हिट ॲण्ड रनच्या प्रकारात वाढ झाल्याचे दिसून येणे, ज्येष्ठ नागरिक व विशेषतः कॉलेज तरूणींना या रोड

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रोमीओ मवाली, टवाळखोर दुचाकी मोटार सायकलस्वारांचा सर्वत्रच मोठा व असह्य जाच असणे, स्थानिक पोलीस प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होणे, याप्रकारामुळे अनेक जेष्ठ नागरिक सर्वसाधारण महिला व पुरूष तसेच मुला-मुलींना कायमचे जायबंदी व्हावे लागत असल्याने या 'धुम स्टाईल' स्टंटबाजीस कठोर कारवाईद्वारे तात्काळ रोखण्याची आवश्यकता, तसेच अल्पवयीन मुलांकडे दुचाकी नको याबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज, स्थानिक विभागांचे याकडे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "		
११२	५०७	**श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** "गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील चिचोडा या गावातील मनोहर आटला व रमेश या दोघा गावकऱ्यांची नक्षलवाद्यांनी दि. १० जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेली निर्घुण हत्या, हे दोन्ही गावकरी पोलीस खबरी असल्याच्या संशयातून या गावकऱ्यांची हत्या झाल्याचा पोलसिांना असलेला संशय, यापूर्वी सुद्धा याच ठिकाणी सुमारे १२ लोकांची नक्षलवाद्यांनी केलेली हत्या, त्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेले भितीचे वातावरण, नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यात पोलिसांना पर्यायाने शासनाला आलेले अपयश, नक्षलवाद्यांचा त्वरित बंदोबस्त करणेबाबत व हत्या करणाऱ्या नक्षलवाद्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
११३	५०९	**श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** "ठाणे जिल्ह्यातील भाईंदर येथील आझादनगर भागातील एका ४ वर्षीय बालिकेचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या केल्याची घटना दि. १५ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासूमारास उघडकीस येणे, पिडीत बालिकेला दिनांक ९ जानेवारी २०१७ रोजी रात्री ८. ०० वाजता	कित्ता.	

चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून ४ आरोपींनी तिच्यावर बलात्कार करून हत्या केल्याने तेथील नागरीकांत विशेषतः लहान मुलींमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, आरोपींना तात्काळ अटक करून संबंधित आरोपींविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

११४ ५३२ **श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** कित्ता.

" नेवासे तालुक्यातील (जि. अहमदनगर) हिंगोणी येथील प्राथमिक शाळेत इयत्ता ३ री व ४ थी मध्ये शिकणाऱ्या ९ विद्यार्थीनींचे गेल्या ६ महिन्यांपासून तेथील एक शिक्षक लैंगिक शोषण करीत असल्याचा धक्कादायक प्रकार दि. २१ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, या शिक्षकाने शाळेतील विविध खोल्यांमध्ये मुलींचे लैंगिक शोषण केल्याची बाब निदर्शनास येणे, घरी सांगितल्यास नापास करण्याची तसेच शाळेतून काढून टाकण्याची व मारहाण करण्याची धमकी देऊन या शिक्षकाने विद्यार्थीनींवर लैंगिक शोषण करणे, एका विद्यार्थीनीने त्रास असह्य झाल्याने आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितल्याने तिच्या पालकांनी संबंधित पोलीस स्थानकात फिर्याद दाखल केल्यामुळे हा प्रकार उघडकीस येणे, त्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात सविस्तर चौकशी करून संबंधित शिक्षकाविरोधात कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

११५ ५३३ **श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** कित्ता.

"कोल्हापूर जिल्ह्यातील कोवाड येथील सहाव्या इयत्तेत शिकणाऱ्या बालिकेवर तीन व्यक्तींनी बलात्कार केल्याची घटना दि. ४ व ६ फेब्रुवारी २०१७ रोजी उघडकीस येणे, या तीन व्यक्तींमध्ये एका विद्यार्थ्याचा समावेश असून आश्रमशाळेतील अधिक्षक व स्वयंपाकी यांचा समावेश असणे, अल्पवयीन मुलीवर आश्रमशाळेत बलात्काराची घटना घडल्यामुळे कोवाड परिसरातील नागरीकांत पसरलेले संतापाचे वातावरण, पिडीत बालिका कोवाड येथील आश्रमशाळेत शिकत असून दि. ४ फेब्रुवारी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		२०१७ रोजी एका विद्यार्थ्याने लैंगीक अत्याचार केले, तसेच आश्रमशाळांतील अधिक्षक यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २०१७ रोजी सदरहू बालिका कायदेशीर अभिरक्षेत असताना तिचा गैरफायदा घेऊन तिच्यावर बलात्कार केला तर आश्रमशाळेतील स्वयंपाकी यांनी दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ रोजी बालिकेवर बलात्कार केला, या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित आरोपींविरुद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "		
११६	५३५	**श्री. जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** "व्यापार आणि विविध मार्केटचे शहर म्हणून ओळखले जाणारे उल्हासनगर (जि. ठाणे) शहर सध्या हुक्का पार्लरच्या वाढत्या प्रस्थामुळे कॉलेज तरुणाईचे विशेष आकर्षण बनलेले असणे, उल्हासनगरमध्ये कॉलेज आणि क्लासेसची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने या शहरात येणाऱ्या तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने हुक्का पार्लरच्या व्यवसायाला येथे मोठ्या प्रमाणात आश्रय मिळत असून, अंबरनाथ, बदलापूर आणि ग्रामीण भागातील कॉलेज तरुण-तरुणींचे अनेक ग्रुप्सचा ओघ या हुक्का पार्लरकडे वळत असून, हुक्क्याच्या धुरात येथील तरुणाई भरकटत असल्याने येथील पालकांच्या मनात हा चिंतेचा विषय बनलेला असणे, जस्ट चिल च्या नावावर उल्हासनगरातील फोरवर्ड लाईन, शांतीनगर, रेल्वे स्टेशन परिसर, काजळ पेट्रोल पंप, गोल मैदान आदी भागांत अनेक हुक्का पार्लर राजरोसपणे सुरू असून, या हुक्का पार्लर चालकांशी पोलिसांचे आर्थिक हितसंबंध असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याकडे पोलिसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने, तरुण पिढी बरबाद होत असताना देशाचे भविष्य खराब करण्यासाठी कोणत्याही परकीय शक्तीची गरज नसताना, किरकोळ चिरीमिरीसाठी पोलीस	कित्ता.	

खात्याकडून हुक्का पार्लर चालकांना राजाश्रय मिळत असल्याने येथील नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाने याबाबत ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. ”

११७ १०६२ **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.** कित्ता.

“मुंबईत एका आरोपीने कारागृह सुरक्षेच्या डोळ्यात धुळफेक करत कारागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या नावाखाली पोलिसांसह आयोजकांना टोपी घालून पसार झाल्याची धक्कादायक घटना माहे मार्च, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, मुंबईसह राज्यभरातील कारागृहात कैद्यांच्या मनोरंजनासाठी प्रशासनाकडून तसेच संस्थांच्या मदतीने विविध मनोरंजन कार्यक्रमाची आयोजन करण्यात येत असणे, या कार्यक्रमासाठी संबंधित आयोजक व प्रायोजनांची माहिती कारागृह प्रशासनाकडून घेतली जात असणे, मुंबई कारागृहात तसेच तळोजा कारागृहात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संदीप जाधव नामक व्यक्तीने कार्यक्रमाची आयोजन करणे, सुरूवातीला काही रक्कम अगाऊ दिल्यानंतर उर्वरित रक्कम देण्यास प्रायोजकांकडून होत असलेली टाळाटाळ, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने कारागृहातील मनोरंजन कार्यक्रमाचे नियोजन केले असल्याने कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेबाबत मोठे प्रश्नचिन्ह असणे, उक्त कारागृहात नामांकित गुन्हेगार शिक्षा भोगत असून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती बिनदिक्कत कारागृहात प्रवेश करीत असतील तर सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, परिणामी या घटनेमुळे राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, कारागृहात कोणतेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यापूर्वी आयोजक व प्रायोजक यांची चौकशी करण्याच्या कामात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
११८	१२३१	**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि. प. स.** "नातेपुते (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील उत्तम दाजी साळवे या ६१ वर्षाच्या वृद्धांने चौथा इयत्तेत शिक्षण घेत असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, सदर घटनेचा गुन्हा नातेपुते पोलीस ठाण्यास दाखल करण्यात येणे, सदरहू आरोपी पीडीत मुलीला गेल्या दोन महिन्यांपासून मोबाईलमध्ये तिच्या सोबतच्या अनैसर्गिक कृत्यांचे फोटो काढत असणे, उपरोक्त घटनेबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची तिला धमकी देत असणे, स्थानिक पोलिसांनी तातडीने या आरोपीविरुद्ध कारवाई न केल्याने पीडीत मुलीच्या कुटुंबियामध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण पसरणे, सदर प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून तातडीने चौकशी करून आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
११९	१२७९	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** " राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने मु. पो तुळजापुर (जि. उस्मानाबाद) येथील तुळजाभवानी मंदिराच्या दानपेटीतील ७ कोटी १९ लाख रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी केलेल्या चौकशीत दोषी आढळलेल्या ११ आयएएस अधिकाऱ्यांसह ९ उप विभागीय अधिकारी, ९ तहसीलदर, १० ठेकेदार, मंदिराचा कारभार पाहणाऱ्या १४ व्यक्ती व ९ राजकारणी व्यक्ती अशा एकुण ६२ व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्याची शिफारस करून तीन ते चार महिने होऊनही अद्याप एकाही व्यक्ती विरोधात कारवाई करण्यात आली नसल्याची बाब उघडकीस येणे, ११ सनदी अधिकारी दोषी आढळत असूनही अशा अधिकाऱ्यांची खात्यांतर्गत चौकशी करण्यात		

विवरण क्रमांक २१

सन २०१७ प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी आलेल्या लक्षवेधी सूचना

(१) प्राप्त झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना	१६४६
(२) स्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना	२९४
(३) सभागृहात चर्चा झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना	५५
(४) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या एकूण स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र	२३७
(५) अस्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना	—
(६) सम्मलित करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना	—

अ.क्र.	लक्षवेधी सूचना क्र.	सदस्यांचे नाव व विषय	ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	२३	**सर्वश्री शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "पुणे शहर व जिल्ह्याचा वेगाने होणारा विकास विचारात घेता पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची असलेली नितांत आवश्यकता, यासाठी गेल्या सुमारे दहा वर्षांपूर्वीपासून राज्य शासनाकडून सुरू असलेली कार्यवाही, पुणे जिल्ह्यात उद्योग व्यापार-व्यवसायाची मोठ्या प्रमाणात असलेली उलाढाल, नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या पुणे जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात करीत असलेली गुंतवणूक, मात्र विस्तार विकासात आंतरराष्ट्रीय गुंतवणूकीसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाअभावी निर्माण झालेली मोठी अडचण, विकासावर होत असलेला मोठ्या प्रमाणातील विपरीत परिणाम, पुणे जिल्ह्यात जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय गुंतवणूक व्हावी, जिल्ह्यातील व जवळपासच्या भागातील विकास साधता यावा, यासाठी आंतरराष्ट्रीय	दिनांक ९ मार्च, २०१७	चर्चा झाली.

विमानतळ तातडीने उभारण्याची गरज, यासाठी राज्य शासनाने पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करण्याचा घेतलेला निर्णय, मात्र पुढील कार्यवाहीस होत असलेला विलंब, याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

२ १६५ **ॲड. निरंजन डावखरे व इतर वि. प. स.** दिनांक ९ मार्च, २०१७ चर्चा झाली.

"ठाणे मनपा सेवेअंतर्गत महानगरपालिकेस जवळपास एक हजार बसेसची आवश्यकता असणे, तथापि सद्यस्थितीत ४७० बसेस असून केवळ १३० बसेसच सुस्थितीत असून उर्वरित बसेस दुरुस्तीअभावी बंद असल्याचे दिनांक २३ डिसेंबर २०१६ रोजी निदर्शनास येणे, बंद पडलेल्या बसेससाठी लागणाऱ्या साधन सामुग्री खरेदी प्रक्रियेत होणारे आर्थिक घोटाळे, अवाजवी खर्च व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजना (JNNURM) अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेस जुन्या मॉडेलचे असल्याचे निदर्शनास येणे, तसेच सदर बसेसमध्ये वापरलेले टायर्स व बॅटऱ्या या एक ते दोन वर्षे जुन्या असून त्यावर सन २०१५ हे वर्ष नमूद करण्यात आल्याचे परिवहन समिती सदस्यांनी केलेल्या तपासअंती दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी निदर्शनास येणे, नवी मुंबई महानगरपालिकेसाठी परिवहन सेवेचा ठेका घेणाऱ्या ठेकेदाराने मिडी बसेसकरिता रुपये ३७ प्रति किमी तर स्टँडर्ड बसेसचा दर रुपये ४७ प्रति किमी आहे परंतु ठाणे मनपातील परिवहन सेवेच्या ठेकेदाराने मिडी बसेसकरिता रुपये ५२ व स्टँडर्ड बसकरिता ६६ प्रति किमी असा दर दिल्याचे आढळून येणे, त्यामुळे ठाणे मनपा प्रति दिन रुपये ५. ४७ लाख सदर ठेकेदारास अधिक द्यावे लागून सदर कामाचा ठेका १० वर्षाचा असल्याने १० वर्षात रुपये २०० कोटी अधिक सदर ठेकेदारास द्यावे लागणार असल्याने तरी सकृतदर्शनी याप्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, याशिवाय परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकित देणी देखील प्रलंबित असणे, त्यामुळे यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत महाराष्ट्र लेबर एकता युनियनकडून

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तसेच ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रवासी संघटनांकडून गेल्या अनेक वर्षापासून ते आजतागायत वारंवार मागणी करण्यात येणे, तथापि त्याकडे शासनाकडून जाणिवपूर्वक करण्यात येणारे दुर्लक्ष, परिणामी ठाणेवासीय व सर्वसामान्य प्रवासी जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सबब, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
३	३०७	**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे व इतर वि. प. स.** "दिनांक ७ जानेवारी २०१७ रोजी जि. सांगली, ता. पलूस, माळवाडी येथील अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार करून खून केल्याची घडलेली घटना, तसेच दिनांक २९ जानेवारी २०१७ रोजी हिंजवडीच्या इन्फोसिस आयटी कंपनीत सॉफ्टवेअर अभियंता म्हणून काम करणाऱ्या रसिला राजू ओपी (वय २५, रा. हिंजवडी) या तरुणीचा कंपनीमध्येच गळा आवळून खून झाल्याची घटना, तर पुणे शहरात हडपसर येथील शिवपार्क येथे दिनांक १८ जानेवारी २०१७ रोजी रात्री घरगुती समस्या पत्नीने फेसबुकावर टाकल्यामुळे संतप्त पतीने पत्नीची हत्या केल्याची घटना, दिनांक २३ डिसेंबर २०१६ मध्ये अंतरा दास या संगणक अभियंता तरुणीचा हल्लेखोराने भोसकून खून झाल्याची घटना, राज्यभरात कोपर्डी (जि. अहमदनगर) प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले असतांनाच, उपरोक्त घटना घडत गेल्यामुळे सर्वत्र संतापाचे पसरलेले वातावरण, राज्यात उपरोक्त घटनेचे उमटलेले तीव्र पडसाद लक्षात घेऊन स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा, यांनी दिनांक २७ डिसेंबर २०१६, दिनांक ८ जानेवारी २०१७ व दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार करून उपरोक्त खून, बलात्कार	दिनांक ९ मार्च, २०१७	चर्चा झाली.

प्रकरणातील आरोपींवर पोस्को कायद्याअंतर्गत कडक कारवाई करण्याची तसेच सदर घटनेची चौकशी संवेदनशील पद्धतीने होण्यासाठी वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची केलेली मागणी, पुणे शहरात हिंजवडी, खराडी, हा परिसर तसेच तळवडे हा पुण्यातील ग्रामीण भागात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची संख्या मोठी असल्याने नोकरीनिमित्त परप्रांतीय महिला, मुली मोठ्या संख्येने पुण्यातील वेगवेगळ्या भागामध्ये स्थायिक होणे, सदरहू कंपन्यामध्ये रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्या महिलांवर होणारे अत्याचार, खून यांचे प्रमाणात झालेली वाढ, त्यामुळे आय. टी. क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर असणे, यासंदर्भात देखील स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा यांनी दिनांक ३० जानेवारी २०१७ रोजी पुणे पोलीस आयुक्त, पुणे, यांच्याकडे पत्रव्यवहार करूनही अद्यापी कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, उपरोक्त सर्वच घटनांची सखोल चौकशी करून आरोपीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

४	११८	**प्रा. अनिल सोले व इतर वि. प. स.** "नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्माण झालेली दयनीय अवस्था, सदर हॉस्पिटल करीता सुरक्षा चौकी असून ती बंद स्थितीत असून त्याचे खिडक्या व दरवाजे तुटलेले असणे, त्यातच हॉस्पिटल आवारात व समोर मोठ्या प्रमाणात कचऱ्यांचे ढिगारे दिसून येणे, रुग्णांकरीता वापरलेली कालबाहय सिरींज व औषधे ही त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावता निष्काळजीपणे हॉस्पिटल व त्या परिसरात टाकण्यात येणे, सुरक्षेच्या दृष्टीने वापरण्यात येणारी अग्निशामक उपकरणे कालबाह्य स्थितीत असणे, रुग्णालयाच्या आजूबाजूचा परिसर झुडपी कचऱ्याने व्याप्त असणे, त्यामुळे रुग्णालयात अस्वच्छता निर्माण झाल्याने त्याचा परिणाम रुग्णांवर होणे, त्यामुळे सदर परिसर कचरामुक्त व स्वच्छ ठेवण्याची असलेली आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले	दिनांक ९ मार्च २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याबाबत त्वरित करावयाची कारवाई व उपाययोजना."		
५	११४१	**सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "सन २०१४-१५ IMSR मेडीकल कॉलेज मायणी, जि. सातारा येथे ९५ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष एम. बी. बी. एस. या वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेणे, या मेडीकलमध्ये प्रवेश घेते वेळेस राज्यातील वैद्यकीय शिक्षण संचलनालय (डि. एम. ई. आर.) व आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक एम. सी. आय. , दिल्ली या मेडीकल कॉलेजला मान्यता असणे, मेडीकल कॉलेजने प्रवेश देते वेळी या विद्यार्थ्यांची एम. एच. सी. ई. टी. परिक्षा न घेता, ए. एस. एस. ओ. -सी. ई. टी. मधुन प्रवेश दिलेला असणे, त्यामुळे विद्यापीठ व एम. सी. आय यांनी या ९५ विद्यार्थ्यांचे प्रवेश अनियमित ठरवून तसे पत्र सदर महाविद्यालयास जानेवारी २०१५ मध्ये पाठविणे, पत्र मिळूनसुद्धा या महाविद्यालयाने या विद्यार्थ्यांना अंधारात ठेवून शैक्षणिक वर्ष सुरू ठेवणे, या निर्णयाविरुद्ध मा. उच्च न्यायालय व तद्नंतर मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या विद्यार्थ्यांनी सप्टेंबर, २०१५ मध्ये विद्यापीठाची पूरवणी परिक्षा देणे, परंतू दिनांक १० मार्च २०१६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यामुळे या विद्यार्थ्यांचे भवितव्य पुन्हा अधःकारमय होणे, या विद्यार्थ्यांनी प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांना भेटून त्यांचे भवितव्य वाचविण्याची विनंती केली असता प्राधिकरणाने त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश नियमित करण्याचा निर्णय घेऊन महाविद्यालयास प्रती विद्यार्थ्यांमागे २० लाख रु. दंड आकारुन सदरहू रक्कम ३ महिन्यात भरण्याचे प्रतिज्ञापत्र महाविद्यालयाने प्राधिकरणास सादर करणे, महाविद्यालयाने उर्वरीत दंड भरण्यास टाळाटाळ केल्यामुळे या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाविरुद्ध मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका	दिनांक ९ मार्च २०१७	चर्चा झाली.

दाखल केली असता शासनाने विद्यार्थ्यांना पाठींबा देण्यास व त्यांना इतर महाविद्यालयात सामावून घेण्यास संमती देणे, प्राधिकरणाने आकारलेला दंड शासनाने भरावा व नंतर तो महाविद्यालयाकडून वसूल करावा असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यामुळे शासनाने २० कोटी रुपये न्यायालयात भरणे, शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आश्वासनानूसार या विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयात अद्यापही सामावून न घेतल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी दिनांक १ मार्च २०१७ पासून आझाद मैदान, मुंबई येथे सुरू केलेले आमरण उपोषण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

६ १२१५ **श्रीमती स्मिता वाघ, वि. प. स.** दिनांक ९ मार्च २०१७ चर्चा झाली.

"देशभरात निर्माण होणाऱ्या सुमारे ५ लाख टन ई -कचरा निर्मितीत राज्याचा क्रमांक पहिला असणे. कॉम्प्यूटरचे मॉनिटर, की -बोर्ड, माऊस, मोबाईलचे सुटे भाग, बंद पडलेली इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, टेलिव्हिजन, इलेक्ट्रॉनिक्स खेळणी, बंद पडलेले सेल ई. वस्तू व ई-कचऱ्यात समाविष्ट असणे, यातील अनेक वस्तू सामान्य भंगाराचाच भाग समजून राज्यातील असंख्य भंगार जमा करणाऱ्या मुलांकडून जमा होत असणे, परंतु त्यांना या वस्तूंची विल्हेवाट लावण्याचे ज्ञान नसणे. परिणामी अनेक वस्तू डम्पिंग ग्राउंड पर्यंत पोहोचून जमिनी खाली दाबल्या जाणे, या वस्तूंमधील पारा, शिसे, कॅडमीअम, क्रोमिअम, बेरीअम आणि ब्लॉक कार्बन अशा धोकादायक पदार्थांपासून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास व मानवी आरोग्यावर अत्यंत घातक व गंभीर परिणामांची जागरुकता सामान्य जनतेला नसणे, या ई-कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी केवळ २४ अधिकृत केंद्र असून त्यांची वार्षिक क्षमता ३२ हजार ६०० टन इतकीच असणे, मोठ्या शहरातील आय टी कंपन्या बरोबरच राज्यातील अनेक शहरांमध्ये हा ई-कचरा असाच जमिनीखाली दाबला जाणे, या अत्यंत घातक व गंभीर विषयाबाबत शासनाने जनमानसांत जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
७	२९२	**डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** "नाशिक येथे मुंबई-आग्रा महामार्गावर दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास धुळ्याहून येणाऱ्या तीन मोटारीमधून तब्बल १ कोटी ३५ लाख रुपयांच्या जुन्या चलनातील बनावट नोटा तसेच लाखो रुपयांच्या जुन्या चलनातील खऱ्या नोटा पोलिसांनी जप्त करणे, या बनावट नोटांचे प्रकरणी संशयितांमध्ये एका मोठ्या राजकीय नेत्याचे समर्थक, श्री. छबु नागरे यांस अटक करण्यांत येणे, बनावट नोटा प्रकरणामुळे नाशिक जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडणे, या बनावट नोटाप्रकरणी श्री. नागरे यांचेसह ११ जणांना शहर पोलिसांनी अटक करणे, बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केल्यानंतर याप्रकरणाचे धागेदोरे पुणे, सिन्नर, मुंबई, ठाणे, नवी मुंबईपर्यंत व्यापक स्वरुपात पसरलेले असल्याचे पोलीस कारवाईत समजून येणे, या टोळीविरुद्ध आडगांव पोलीस ठाणे, नाशिक येथे देशद्रोहाचा गुन्हा दाखल होणे, पोलिसांनी तपासादरम्यान बनावट नोटा छापण्याचे साहित्य हस्तगत करणे, या गंभीर गुन्ह्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली असल्याने याप्रकरणी उच्चस्तरीय यंत्रणेमार्फत सखोल व कठोर चौकशी व्हावी, अशी जनतेकडून मागणी केली जाणे, बनावट नोटा छापल्याप्रकरणी अटकेत असलेल्या श्री. नागरे यांच्या पत्नीवर दिनांक १३ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक येथील भद्रकाली पोलीस स्टेशन येथे खंडणीचा गुन्हा दाखल केला जाणे, बनावट नोटा व छपाईची सामग्री पोलिसांच्या हाती लागल्याने बनावटगिरीच्या टोळीचा हा धंदा जुनाच असल्याचा संशय व्यक्त केला जाणे, या टोळीच्या पर्दाफाशनंतर याचे लोण कुठपर्यंत पोहोचले आहे, याचा पोलिसांनी सखोल छडा लावावा, अशी मागणी जनतेकडून केली जाणे, बनावट नोटांचा पुरवठा केव्हा व कोणकोणास करण्यात आला, याचा शोध घेण्यात यावा, अशीही जनतेकडून आग्रही मागणी केली	दिनांक २९ मार्च २०१७	चर्चा झाली.

जाणे शासनाने एकंदरीत प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती विचारात घेऊन सी. बी. आय. मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय तात्काळ घ्यावा, असाही सर्वसामान्य जनतेत आग्रह असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ''

८ ५९६ **अॅड. अनिल परब, वि. प. स.** दिनांक २९ मार्च २०१७ चर्चा झाली.

''शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मौजे चिकणघर येथील आरक्षण क्र. १९२, १९३, १९४, १९५, १९६, १९७ या भूखडांवर बेकायदेशीरपणे केलेले अतिक्रमण निष्कासित न करताच टिडीआर मंजूर करून दोषी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त, श्री रामनाथ सोनवणे व इतर यांनी शासनाची फसवणूक करून क. डों. म. पा. मध्ये टिडीआर घोटाळा केल्यामुळे या संपूर्ण प्रकरणामध्ये अनियमितता सिद्ध झालेली असल्याने आजमितीपर्यंत मंजूर केलेला ६ लाख ७० हजार फुटांचा टिडीआर विनाविलंब रद्द करून दोषींवर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, सदर प्रकरणी महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त, श्री. रामनाथ सोनवणे, तत्कालिन सहायक संचालक नगररचना श्री. चं. प्र. सिंह, तत्कालिन नगररचनाकार श्री. रघुवीर शेळके, कनिष्ठ अभियंता, श्री. शशीम केदार यांची सद्यःस्थितीत सुरू असलेली विभागीय चौकशी, सदर चौकशीतील मुख्य साक्षीदार श्री. नो. र. शेंडे तत्कालिन उपसंचालक नगररचना, कोकण विभाग व विद्यमान संचालक नगररचना, पुणे यांनी संपूर्ण कागदपत्रांची पुर्तता महानगरपालिकेकडून करण्यात न आल्याबाबत दिलेली साक्ष, यावरुन महानगरपालिकेकडूनच जाणीवपूर्वक चौकशीस विलंब करण्यात येत असणे, सदर विलंबामुळे दोषींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत सर्वसामान्यामध्ये निर्माण झालेली संभ्रमाची भावना, श्री. शेंडे तत्कालिन उपसंचालक, नगररचना कोकण विभाग या पदावर असताना त्यांनी शासनाला जो अहवाल दिला तो अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे दिलेला असणे, त्यामुळे श्री. जितेंद्र भोपळे, तत्कालिन सहा. संचालक, नगररचना, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे व श्री. नो.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		र. शेंडे तत्कालिन संचालक, नगररचना, कोकण विभाग यांनी महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या अहवालावरच निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, सदर प्रकरणी संपूर्ण चौकशी निवृत्त न्यायाधीश यांच्यामार्फत पुनःश्च करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
९	१०२५	**सर्वश्री रामहरी रुपनवर व इतर वि. प. स.** "ता. माळशिरस, जि. सोलापूर, येथील पुणे-पंढरपूर हा राज्यातील महत्त्वाचा मार्ग असून सध्या हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून केंद्र शासनाकडे वर्ग झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर महामार्गापर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना ये-जा करण्यासाठी रस्त्याची सुविधा आवश्यक असणे, परंतु तालुका माळशिरस, जि. सोलापूर येथील मुख्य हायवेला जोडणारे एम. डी. आर. अंतर्गत तयार करण्यात आलेले रस्ते सद्यःस्थितीत अतिशय खराब झाले असून हे रस्ते मागील अनेक वर्षापासून दुरुस्त करण्यात आले नसल्याने नागरीकांना प्रवास करणे अत्यंत गैरसोयीचे होत असणे, तसेच रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होऊन अनेकदा या रस्त्यांवर लहान मोठे अपघात होऊन त्यात जिवीत व वित्त हानी होत असल्याचे आढळून येणे, यामुळे ग्रामस्थ व प्रवासी यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची व चिडीची भावना लक्षात घेता त्वरित या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक २९ मार्च २०१७	चर्चा झाली.
१०	३९६	**श्री. मितेश भांगडिया व इतर वि. प. स.** "राज्यातील ११ अकृषक विद्यापीठांमध्ये सर्व स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमाकरिता सत्र पद्धत (semister pattern) सुरू करण्याचा	दिनांक २९ मार्च २०१७	चर्चा झाली.

निर्णय घेण्यात येते, सत्र परीक्षा पद्धती अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांवर त्याच सोबत महाविद्यालय व विद्यापीठांवर देखील परीक्षेचा बोजा वाढणे, सत्र परीक्षा पद्धतीमुळे महाविद्यालयांचा संपूर्ण अभ्यासक्रम एका विशिष्ट वेळेत पूर्ण होण्याचे बंधन असणे, मात्र अनेक महाविद्यालयांमध्ये मंजूर प्राध्यापकांची बहुतांश पदे रिक्त असणे तसेच या पदावर अंशकालीन शिक्षक/प्राध्यापक विद्यार्थ्यांना शिकवत असणे, अंशकालीन शिक्षक/ प्राध्यापक असल्यामुळे त्यांना अभ्यासक्रम निश्चित वेळेत पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन नसणे, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, त्यांना सेल्फ स्टडी करावी लागणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठातून पुरातन असलेली अमुल्य नाणी गहाळ झाल्या प्रकरणाची अजूनही चौकशी सुरूच असणे, अत्यंत पुरातन व मौल्यवान नाणी विद्यापीठातून गायब झाल्यामुळे विद्यार्थी विद्यापीठातील अंतर्गत सुरक्षेबाबत साशंक असणे, विद्यार्थ्यांच्या मनात स्वतःच्या शैक्षणिक कागदपत्रांबद्दल असुरक्षितता निर्माण होणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जपण्याची नितांत आवश्यकता, सत्र परीक्षा पद्धती त्वरित बंद करून एक परीक्षा घेण्याकरिता प्रभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

११	१३	**सर्वश्री संजय दत्त व इतर वि. प. स.**	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

“हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणाऱ्या स्टेंट, कॅथेटर, बलून्ससारख्या वैद्यकीय सामुग्रीसाठी रुग्णांकडून उत्पादन किंमतीपेक्षा दहापट अधिक किंमत आकारली जात असणे, वैधमापन शास्त्र विभागाने मुंबईतील लिलावती हॉस्पिटल, बांद्रे, एशियन हार्ट इन्स्टिट्यूट, मुलुंडमधील फोर्टिस हॉस्पिटल, अंधेरीतील कोकीळाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल, परळ येथील ग्लोबल हॉस्पिटल, पवई येथील हिरानंदानी हॉस्पिटल, व सर एच. एन. हॉस्पिटल (रिलायन्स फॉऊंडेशन) या ८ रुग्णालयांवर टाकलेल्या छाप्यातून धक्कादायक वास्तव माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, दुप्पट एमआरपी किंमती आकारलेले स्टेंट, कॅथेटर, बलून डिव्हाइस या हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणाऱ्या

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सामुग्रीचा रुग्णालयांकडून तसेच उत्पादक साखळीकडून ही लूट सुरू असणे, वैधमापन शास्त्र विभागाच्या २०११ च्या नियमानुसार या उत्पादनांची विक्री, वितरण करण्यापूर्वी तसेच त्यांना कस्टम विभागाकडून आयातीसाठी परवानगी मिळवतानाही मूळ बिलावर व उत्पादनावर सारख्या किमतीची नोंद असायला हवी, प्रत्यक्षात मात्र आयात करण्यात आलेल्या व रुग्णालयांना विकण्यात आलेल्या किंमतीमध्ये तफावत दिसून येणे, अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेंटची किंमत सुमारे १ ते १. ५ लाख रुपये असणे, राज्यात मुंबईसह हजारोंनी अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात येणे, गरीब रुग्णांना १ ते १. ५ लाख रुपये खर्च करणे शक्य नसल्यामुळे केंद्र शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासूमारास स्टेंट ची किंमत ३० हजार रुपये करून याच दराने स्टेंट विकण्याच्या सूचना वितरकांना देण्यात येणे, परंतू राज्यातील स्टेंट वितरकांनी यास दिलेला नकार, शासनाने आदेश देवून सूद्धा स्टेंट विक्रेत्यांनी ३० हजार रुपयांत स्टेंट देण्यास नकार दिल्यामुळे राज्यातील हृदयविकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांत पसरलेला तीव्र असंतोष व भितीचे वातावरण, सदरील प्रकार राज्यातील इतर रुग्णालयांकडून सुरू असणे, असहाय्य रुग्णांची बेसुमार लूट थांबविण्याबाबत शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, ह्दयशस्त्रक्रियेच्या सामुग्रीच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची लूट करणाऱ्या संबंधित रुग्णालयांवर तातडीने कारवाई करून ह्दयशस्त्रक्रियेची साधनसामुग्री रुग्णांना रास्त भावात उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "		
१२	३३०	**सर्वश्री जयंत पाटील व इतर वि. प. स.** "राज्यातील साखर कारखान्यांना मूलभूत सुविधा संमती (इन्फ्रास्ट्रक्चर क्लीअरन्स) प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी (एम. एस. सी. डी. सी. एल.) बरोबर वीज खरेदी करार (पॉवर परचेस्	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

ॲग्रिमेंट) करण्यास अडचण येणे, पॉवर परचेस् ॲग्रिमेंट किमान २ हजार मेगा वॅटसाठी संमती मिळणे आवश्यक असणे, ज्या कारखान्याकडे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत त्या कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ. आर. पी. देणे सोईस्कर होणे, परंतु ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत अशा कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ. आर. पी. देण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे ते साखर कारखाने आर्थिक संकटात सापडणे, ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत त्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पात समाविष्ट करून घेतल्यास त्यांच्यावर येणारे आर्थिक संकट दूर होऊन त्या साखर कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ. आर. पी. देणे सोईस्कर होणे, यासाठी अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही. "

१३	१४४	**श्री. नारायण राणे व इतर वि. प. स.**	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग, सावंतवाडी भागात माकडतापाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये या तापाने दोघांचा झालेला मृत्यू व आतापर्यंत जिल्ह्यात ५० पेक्षा जास्त रुग्ण माकडतापाने ग्रस्त असल्याचे आढळून येणे, या तापाच्या नियंत्रणासाठी प्रशासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये व पर्यटकांमध्ये पसरलेले तीव्र भीतीचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१४	१५०५	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.**	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

"बोरीवली पूर्वमधील काजूपाडा टेकडी या क्षेत्रात पाण्याची समस्या निर्माण झाल्याने उदंचन केंद्र व स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत येथील रहिवाशांची मागणी असणे, येथील वस्ती उंचावर असल्याने पाणीपुरवठा सुरळीत होत नसून परिसरात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणे, उदंचन केंद्र व स्वतंत्र पाणीपुरवठा योजना या परिसरात राबविणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत नागरिकांकडून

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार मागणी होणे, या परिसरातील पाण्याच्या समस्यांकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असणे, यामुळे सामान्य जनतेत शासनाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ".		
१५	१५३१	**श्री. कपिल पाटील, वि. प. स.** "केंद्र शासनाने कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर राज्यात नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये सातव्या वेतन आयोगासंदर्भात कोणतीही तरतूद नसल्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वर्षभर वेतन आयोग लागू न होण्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, राज्यातील जवळपास २० लाख शासकीय व निमशासकीय कर्मचारी व शिक्षक केंद्र शासनाच्या घोषणेनंतर गेल्या वर्षभरापासून वेतन आयोगाच्या प्रतिक्षेत असणे, त्याचप्रमाणे वेतन आयोग लागू करण्याकरिता नेमलेल्या राज्यवेतन आयोग सुधारणा समितीस अद्यापपर्यंत कार्यालयदेखील न मिळणे, त्यामुळे सदर समिती नेमून बराच काळ उलटूनही प्रत्यक्ष कामास सुरूवात न होणे, विविध शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना यांनी मा. मुख्यमंत्री व मा. वित्त मंत्री यांना निवेदन देऊन वाढती महागाई व तुटपुंजे वेतन या विरोधात वेतन आयोग तात्काळ लागू करण्यासंदर्भात व पाच दिवसांचा आठवडा तसेच निवृत्त होण्याची मर्यादा ५८ वरून ६० वर्षे आणि ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सद्यःस्थितीत ६० वर्षे निवृत्त होण्याची मर्यादा लागू आहे अशांना ६२ वर्षेपर्यंत वाढविण्याकरिता आंदोलन करून राज्यव्यापी संप पुकारण्याचा दिलेला इशारा, अद्यापपर्यंत सदर निवेदनाबाबत शासनाकडून कोणतीही ठोस पावले न उचलल्यामुळे राज्यातील शासकीय नोकरवर्गात पसरलेला असंतोष, वेतन आयोगाबाबत शासनाची दिसून आलेली उदासीनता, परिणामी शासकीय अधिकारी व कर्मचारी महासंघाने दिलेल्या संपाच्या	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

इशाऱ्यामुळे राज्यातील जनमानसांत पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यामुळे शासनाने या गंभीर विषयावर तात्काळ निर्णय घेऊन वेतन आयोग लागू करण्याबाबतची करावयाची घोषणा, तसेच सरकारी, निमसरकारी कार्यालय व शाळा आणि महाविद्यालये यांना पाच दिवसांचा आठवडा व निवृत्तीच्या मर्यादेबाबत घ्यावयाचा निर्णयावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया ".

१६	३१०	**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे व इतर वि. प. स.** "पुणे जिल्ह्यातील फुलवडे आणि मावळमधील वडेश्वर येथील मुलींच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थीनींशी असभ्य वर्तवणूक तर जुन्नरमधील कोळेवाडीतील आश्रमशाळेत मुली धोकादायक इमारतीत राहत असल्याचे जिल्हा प्रशासनाने नेमलेल्या तपासणी पथकाच्या माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास केलेल्या तपासणी अहवालात आढळून येणे, सदरचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर करण्यात येणे, राज्यभरातील अनेक आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शोषण होत असल्याच्या घटना वारंवार घडत असणे, तसेच आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठीचे ११ कोटींचे टुथपेस्ट कंत्राट खरेदी समितीने नियम धाब्यावर बसवत परस्पर अपात्र ठरवलेल्या कंपनीला दिल्या प्रकरणी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजीच्या सुमारास लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन देण्यात येणे, याबाबत शासनाने अद्यापही चौकशी न केल्यामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.
१७	१४१३	**श्री. नरेंद्र पाटील, वि. प. स.** "सातारा जिल्ह्यातील ढेबेवाडी (ता. पाटण) येथील दक्षिणवांग नदीवरील वांग मराठवाडी धरणाचे काम १९९७ साली सुरू झाले असून अद्यापपर्यंत ते काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मार्च, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस येणे, सदर धरणाची पाणी साठवण क्षमता २. ७३ टी. एम. सी. असून धरणाचे काम अर्धवट असल्याने व धरणात गाळ साचल्याने सध्या फक्त ०. ६० टी. एम. सी. पाणी साठा होत असणे, या धरणाच्या	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		लाभक्षेत्रामध्ये ढेबेवाडी विभागातील उत्तरवांग नदीकाठच्या जानुगडेवाडी, शितपवाडी, मंद्रुळकोळे या गावांचा समावेश केला असून अनुक्रमे २-१६ हेक्टर, २-६२ हेक्टर, ४-६३ हेक्टर जमिनी शासनाने संपादित केल्या असणे, मात्र भौगोलिकदृष्ट्या सदर गावांना या धरणाचे पाणी मिळत नसल्याने तेथील शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, तसेच मेंढ व केकतवाडी, ता. पाटण या गावातील प्रकल्पग्रस्तांचे सांगली जिल्ह्यात पुनर्वसन करण्याचे शासनाचे नियोजन असणे, मात्र सातारा जिल्ह्यातच पुनर्वसन करावे अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी असणे, तसेच तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व संपूर्ण पायाभूत सुविधा देण्यापूर्वीच शासनाने धरणाच्या घळभरणीचे काम हाती घेणे व घळभरणीच्या कामासाठी जिल्हाधिकारी व दंडाधिकारी यांची पूर्वपरवानगीदेखील घेतली नसणे, अशा प्रकारे जबाबदारी पूर्ण करण्यात शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे तेथील प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना आणि आत्मदहन करण्याची वृत्ती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१८	१४११	**ॲड. जयदेव गायकवाड, वि. प. स.** "डॉ. कस्तुरीरंगन समितीने दिलेल्या अहवालानुसार केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये पश्चिम घाटातील बहुतांश भाग संवेदनशील क्षेत्र (Eco Sensative Zone) म्हणून अधिसूचित झाल्यामुळे त्यामध्ये महाराष्ट्रातील विशेषतः रोहा, नागोठाणे तसेच इतर १३ औद्योगिक वसाहतीमधील शेकडो उद्योगधंदे धोक्यात आल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस येणे, या औद्योगिक वसाहतीची एकूण गुंतवणूक सुमारे २०००० कोटी रुपयांपेक्षा जास्त असून वार्षिक उत्पन्नदेखील हजारो कोटीमध्ये असणे, सदर भाग अधिसूचित झाल्यामुळे जवळपास सर्वच उद्योगधंदे बंद होण्याची शक्यता, त्यामुळे हजारो	दिनांक ३० मार्च २०१७	चर्चा झाली.

		कोटीपेक्षा जास्त रुपयांचे उत्पादन शुल्क बुडीत जाऊन शासनाच्या महसुलीत होणारी प्रचंड घट, लाखांपेक्षा जास्त कामगारांना रोजगार मिळत असलेल्या कंपन्यांचेच भविष्य धोक्यात आल्याने कामगारांच्या भविष्यातील रोजगारांवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, परिणामी हे सर्व उद्योगधंदे राज्याबाहेर जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती, सदर अहवाल अंतिम होत असताना केरळ राज्याने औद्योगिक वसाहतीचे संरक्षण करण्याकरिता हरकती घेऊन स्पष्टपणे सदर अधिसूचनेस विरोध करणे, या धर्तीवर राज्य शासनाने केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने विभागास याबाबत स्पष्टपणे विरोधदर्शक हरकती व सूचना देण्याची आवश्यकता, तसेच त्याचा पाठपुरावा करून योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित असणे, रोहा व नागोठाणे इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी राज्य शासनास निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही ठोस पाऊले न उचलल्याने तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, त्यामुळे या गंभीर प्रश्नांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "		
१९	१३२८	**सर्वश्री अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** "राज्यभरात अनेक ठिकाणी महापुरुष आणि गड किल्ल्यांच्या नावांचा वापर बिअरबार परमीट रुम, मांसाहारी खानावळ, लोकनाट्य कला केंद्र तसेच देशी दारु विक्री केंद्रांना करण्यात येणे, अनेक ठिकाणी देव-देवतांच्या नावाचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, अनेक महापुरुषांच्या नावाचाही वापर अशा ठिकाणी होत असणे, शासनाने यापुर्वी देव-देवतांच्या नावाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध करणे, तरीही अनेक ठिकाणी सर्रास महापुरुषांसह देव-देवतांच्या नावांचे फलक लावुन त्यांचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, दारु विक्री केंद्र व बिअरबार सारख्या हॉटेलांना महापुरुष व देव-देवतांची नावे दिल्यामुळे त्यांच्या नावाची विटंबना होत असणे, समाजासाठी जे महापुरुष आदर्श आहेत अशा महापुरुषांच्या कार्याचा वारसा पुढच्या पिढीला देताना गैरठिकाणी नावाचा वापर होत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या भावना मोठ्या प्रमाणावर दुखावणे, व्यसनाधिनतेकडे आणि गैरमार्गाकडे घेऊन जाणाऱ्या व्यवसायाला	दिनांक ३१ मार्च २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आदर्श व्यक्ती आणि देव-देवताची नावे देण्यास कायमस्वरुपी प्रतिबंध करून अशा नावांचे फलक तातडीने काढून टाकण्यासाठी शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२०	११९१	**श्री. हेमंत टकले, वि. प. स.** "चार्म्स हेरिटेज गृहसंकुल टावरी पाडा, कल्याण (पश्चिम) येथे स्थित असणे, ह्या गृहसंकुलाने आवश्यक क्षमतेची सेप्टीक टँक बांधली नसल्याने मागील सुमारे ५ ते ६ वर्षांपासून त्यांच्या इमारतीचे सांडपाणी शंखेश्वर प्रेसिडेन्सी गृहसंकुलाच्या मागील बाजुस मोकळ्या जागेत सोडण्यात येत असणे, त्यामुळे शंखेश्वर प्रेसिडेन्सी गृहसंकुलाच्या मागे मोठ्याप्रमाणात सांडपाण्याची दलदल निर्माण झालेली असणे, सदरहू सांडपाण्याच्या दलदलीमुळे तेथील परिसरातील लहान मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, परिसरातील इमारतीच्या पायाला (स्ट्रक्चरला) यामुळे धोका निर्माण होणे, परिसरात डासांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणे, त्यामुळे मलेरिया व डेंगुच्या साथीची लागण होण्याचा धोका निर्माण होणे, नागरिकांनी वारंवार महानगरपालिकेत तक्रारी व निवेदन दिलेली असणे, महानगरपालिकेने चार्म्स हेरिटेज गृहसंकुलास नोटीस बजावणे, आरोग्य केंद्राच्या पथकामार्फत सर्वेक्षण करणे, या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही न करणे, याबाबत तातडीने चार्म्स हेरिटेज गृहसंकुलावर त्यांच्या इमारतीतून मोकळ्या जागेत सोडण्यात येणारे सांडपाणी बंद करून योग्य ती कारवाई करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. "	दिनांक ३१ मार्च २०१७	चर्चा झाली.
२१	१३४२	**डॉ. सुधीर तांबे, वि. प. स.** "राज्यातील प्राथमिक शिक्षकांना MS-CIT परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शासनाने २००८ च्या कालमर्यादा घालून दिलेली असणे, या बद्दलच्या	दिनांक ३१ मार्च २०१७	चर्चा झाली.

शासन निर्णयातील संदिग्धतेमुळे अनेक शिक्षकांनी MS-CIT परिक्षा २००४ नंतर पूर्ण करणे, शासनाने कठोर निर्णय घेऊन शिक्षकांच्या वेतनवाढ रद्द करून त्यांच्याकडून वसुली सुरू केलेली असल्याने शिक्षकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागणे, या संदर्भात शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

२२ ९३२ **सर्वश्री सतिश चव्हाण व इतर वि. प. स.** दिनांक ३१ मार्च २०१७ चर्चा झाली.

“आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत उच्च शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती जाहीर केलेली असणे, पारंपारिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा रु. २. ५० लक्ष तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादा रु. ६. ०० लक्ष ठरवलेली असणे, परंतु या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्यांस १२ वी च्या परीक्षेत ६० टक्के गुण असण्याबाबतची अट असणे, व्यवस्थापन कोट्यातून व अभिमत विद्यापीठातून व स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठात वैद्यकीय अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू नसल्याने काही विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत शहरात शिक्षण घेणाऱ्या अल्पभूधारक अथवा मजुरांच्या मुलांस प्रतिमाह रु. ३, ००० तर पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वंय योजने अंतर्गत अनुसूचित जमातीच्या मुलास प्रतिमाह रु. ६, ००० निर्वाह भत्ता जाहीर केल्याने यामध्ये आर्थिक भेदभाव केलेला असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला असणे. ई. बी. सी. धारक विद्यार्थ्यांना १२ वी च्या परिक्षेत ६० टक्के गुणाची अट रद्द करणे व व्यवस्थापन कोटा/ अभिमत विद्यापीठात व स्वयंअर्थ सहाय्य विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या ई. बी. सी. धारक विद्यार्थ्यांना ही ई. बी. सी. ची सवलत मिळण्यासाठी व दोन्ही संवर्गातील विद्यार्थ्यांना समान निर्वाह भत्ता मिळण्यासाठी दिनांक १६ डिसेंबर २०१६ रोजी लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊन यावर त्वरित

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सकारात्मक निर्णय घेण्याबाबत मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले असणे, परंतु यावर अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष निर्माण झालेले असणे, तरी यावर सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३	१३४८	**श्रीमती हुस्नबानू खलिफे व इतर वि. प. स.** "राज्य शासनाच्या मनोधैर्य योजनेतून बलात्कार पिडीत महिला व मुलींना पुनर्वसनासाठी देण्यात येणारी ३ लाखाची आर्थिक मदत तुटपूंजी असून त्यातून समाधान होत नसल्याने शासनाने या योजनेचा पुनर्विचार करावा, असे मुंबई उच्च न्यायालयाने सूचविले असल्याचे दिनांक ९ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, एका १४ वर्षीय अल्पवयीन बलात्कारपिडीत मुलीला शासनाकडून या योजनेतून २ लाखाची मदत दिलेली असणे, परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने या मुलीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, या याचिकेवरील सुनावणीच्यावेळी नुकसानभरपाई असमाधान व्यक्त करीत मुंबईसारख्या शहरात पिडीतांना कसे जगता येईल, शिक्षणाचा खर्चही पूर्ण होणे शक्य नाही तसेच त्यांना देण्यात येणारी ३ लाखाची रक्कम तुटपूंजी आहे व शासनाकडे इतर योजनांसाठी पैसा आहे मात्र पीडित महिलांना मदत देण्यात मात्र पैसा नसणे, हे योग्य नसून ज्याप्रमाणे गोवा राज्यात बलात्कार पीडित महिलेला १० लाखाची नुकसानभरपाई देण्यात येते, त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही गोव्याचा आदर्श ठेवावा, अशी सूचना केलेली असतानाही शासनाने या सूचनेची दखल न घेणे, त्यामुळे राज्यातील महिलांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन बलात्कारपीडित महिला व मुलींना गोवा सरकारच्या धर्तीवर मनोधैर्य योजनेतून १० लाखाची मदत देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ३१ मार्च २०१७	चर्चा झाली.

२४	१०७२	**श्री. सुजितसिंह ठाकूर, वि. प. स.** "जि. ठाणे खालापूर येथील, झेनिथ (बिर्ला) कारखाना मालक व व्यवस्थापनाने बेकायदेशीर टाळे बंदी लागू केल्याचे निषेधार्थ कामगारांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दिनांक ६ फेब्रुवारी २०१७ रोजीपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणे, सदरहू कारखाना मालक व व्यवस्थापनाने, तीन वर्षांपासून सुरू केलेल्या टाळे बंदीमुळे, कायमस्वरुपी कामगारांसह कंत्राटी कामगारांवर कोसळलेले बेकारीचे व उपासमारीचे संकट, कामगारांनी विविध मागण्यासाठी आंदोलने करूनही, त्यांच्या मागण्या मान्य करण्याकडे कंपनी मालक व व्यवस्थापनाने दुर्लक्ष करून, कंपनीस बेकायदेशीरित्या टाळे बंदी लागू करणे, कंपनी मालकाकडून सदरहू सेवानिवृत्त कामगार व कायमस्वरुपी कामगारांसह कंत्राटी कामगारांची कायद्याने देय असलेली देणी मिळावी याकरिता, कामगारांनी कुटुंबासह बेमुदत उपोषण सुरू करणे, यासंदर्भात उद्योग मंत्री व कामगार मंत्री, यांना कामगारांतर्फे मागण्यांचे निवेदन देण्यात येऊनही, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगारांचा उदरर्निवाहाचा प्रश्न गंभीर होऊन, त्यांच्यात निर्माण झालेले नैराश्याचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	दिनांक ३१ मार्च २०१७	चर्चा झाली.
२५	१०७८	**श्री. प्रकाश गजभिये, वि. प. स.** "नागपूरात १५ वर्षापूर्वी मिहान प्रकल्प सुरू करण्यात आला याचे मार्केटिंग देश विदेशात करण्यात येणे, याप्रकल्पामुळे राज्यातील बेरोजगारीचा मोठा प्रश्न सुटणार असल्याने सर्वांचे लक्ष याकडे लागलेले असणे, मिहानमध्ये इन्फोसिस, टी. सी. एस. , सत्यम, बोईंग, हाल, शापुरजी-पालोनजी, विप्रो, डी. एल. एफ., अंबुजा, रियल्टी, ताजसेट इंडस्ट्रीज, मॅक्सस्पेस अशा कंपन्यांनी आपल्या गरजेनुसार जमिनी घेतल्या पण १० वर्षापर्यंत त्यांनी जमिनीचा कोणताही उपयोग न करणे, फक्त १५ कंपन्यांनी काम सुरू करणे, इंटरनॅशनल कालबरेटीव्ह एअरोस्पेस	दिनांक १ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		डेव्हलपमेंटच्या माध्यमातून नॅनोसॅटेलाईट निर्मिती मिहानमध्ये सुरू करण्यास उत्सुक असणे, त्यासाठी कंपनीने एम. आय. डी. सी. सोबत सामंजस्य करार करणे, ५० एकर जागेवर ३०० कोटी रूपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प बारगळला जाणे, करारानंतर कंपनी व अधिकाऱ्यांशी कुठलाही ताळमेळ न झाल्याने जवळपास ५०० चा रोजगार पूर्णपणे बारगळणे, सनटेक रिॲलिटी कंपनीने मिहानमध्ये १०८ एकरसाठी एम. आय. डी. सी. सोबत करार करणे, १५०० कोटी रूपयांच्या गुंतवणुकीची कंपनीची योजना असणे परंतु १०८ एकर जागा घेण्यासाठी हप्त्याची सोय, एम. आय. डी. सी. नियमामध्ये टप्याटप्याने जागा देण्याची कुठलीही तरतूद नसल्यानेही गुंतवणुक जवळपास बारगळली असणे, यामुळे देखील २००० लोकांना रोजगार न मिळणे, मिहानमध्ये अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, चीन, इंडोनेशिया, बेलारुस, डेन्मार्कच्या प्रतिनिधींनी व शिष्टमंडळांनी भेटी देणे, परंतु मिहानमध्ये गुंतवणुकीसंदर्भात कोणीही सकारात्मक भूमिका स्पष्ट केली नसल्यामुळे स्थानिक बेरोजगारांमध्ये शासनाच्या प्रती निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२६	१०८४	**सर्वश्री आनंदराव पाटील व इतर वि. प. स.** "तांबवे (ता. कराड, जि. सातारा) येथे दिनांक २० फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी २-३० च्या सुमारास गावाच्या बाहेर साधारण १ कि. मी. च्या अंतरावर पवारमळा स्मशानभूमीच्या जवळ कराडकडे परत येत असताना स्थानिक विधानपरिषद सदस्य यांना तांबवे जिल्हा परिषद गटातील उमेदवार श्री. प्रदिप जालिंदर पाटील व त्यांच्या सोबत असणाऱ्या २५ ते ३० लोकांच्या जमावाने पूर्वनियोजित कटाने दुचाकीवरुन पाठलाग करुन रस्त्यामध्ये गाडी अडवून सोबत असणाऱ्या अंगरक्षकाला धक्काबुक्की करणे, अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करणे, सदरचा प्रकार पूर्वनियोजित	दिनांक १ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

कटानूसार व्हॉटसपव्दारे व हाताशी धरलेल्या न्यूज चॅनेलद्वारे तात्काळ संपूर्ण महाराष्ट्रात प्रसारित करण्यात येणे, त्यामुळे स्थानिक विधानपरिषद सदस्यांची बदनामी करण्यात येणे, पूर्वनियोजित कट असल्याने विरोधी उमेदवारांने सहानभूतीचे वातावरण निर्माण करून निवडणुकीमध्ये यश मिळविणे, अशा प्रकारचा गंभीर गुन्हा त्या दिवशी कराड तालुका पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर ७८/२०१७ नुसार दाखल झालेला असणे, या गंभीर प्रकरणाची स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीच तात्काळ कार्यवाही न होणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित प्रकरणी दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

२७ १९१ **ॲड. अनिल परब, वि. प. स.** दिनांक १ एप्रिल २०१७ चर्चा झाली.

“वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीची झालेली दयनीय अवस्था, माहे २०१६ मध्ये दोन वेळा छताचे प्लास्टर कोसळण्याच्या घडलेल्या घटना, तसेच इमारत क्रमांक एक मधील धोकादायक घराची दुरुस्ती सुरू असतांना स्वयंपाक घरातील छत कोसळले, शासकीय वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून त्यांचे सरासरी आर्युमान ४५ ते ५० वर्षाचे असणे, या शासकीय वसाहतीमधील ३७० पैकी ३६ इमारतीचे पुनर्बांधणीचे काम सन २०१४-१५ या अर्थसंकल्पात समाविष्ट असून त्याची अंदाजित किंमत रु. १००. ८४ कोटी इतकी असून तसेच उर्वरित ३३४ इमारतींची अंतर्गत व बाहय संरचनात्मक व नुतनीकरणाच्या दृष्टिने कामे हाती घेण्यात येणार असून त्याकरिता सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रु. ३४. ०४ कोटीची कामे करण्यात आल्याचे माहे जून, २०१४ मध्ये विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना मा. सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोदयांनी दिलेल्या लेखी उत्तरावरुन स्पष्ट होणे, परंतु प्रत्यक्षात २५ इमारतींची कामे सुरू असून अत्यंत धिम्म्यागतीने होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येणे, तर काही इमारतीची कामे अर्धवट अवस्थेत असणे, मा. सार्वजनिक बांधकाम

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मंत्र्यांनी प्रत्यक्षात सदर वसाहतीची पाहणी करूनही अद्यापी कोणतीच ठोस कार्यवाही झालेली दिसत नसणे, ठेकेदारांना वेळेत देयके मिळत नसल्याने इमारतीच्या उर्वरित कामांकरिता साहित्य आणण्यास होत असलेला विलंब, वसाहतीची दयनीय अवस्था असतानाही इमारतीच्या दुरुस्तीकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होणे, वसाहतीतील इमारतीचे टप्प्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत असणे, दरवर्षी हीच प्रक्रिया शासनाकडून करण्यात येत असणे, त्यामुळे या इमारती अतिशय जीर्ण अवस्थेत झालेल्या असल्यामुळे त्या पाडून पुनर्बांधणीचे काम हाती घेण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "		
२८	११६८	**श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** "झपाट्याने विकसित होणाऱ्या आणि वीस लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये मेट्रो सुरू करण्याचे केंद्र शासनाच्या विचाराधीन असून नाशिकसाठी मेट्रो सुरू करण्याची मागणी प्रलंबित असणे, देशातील महत्त्वाच्या स्मार्ट सिटीमध्ये नाशिकचा समावेश झालेला असल्यामुळे नाशिकमध्ये मेट्रोचे सर्वेक्षण होणे आवश्यक असणे, नाशिक शहर आणि प्रस्तावित नाशिक महानगर प्राधिकरणाची २६ लाख ८३ हजार लोकसंख्या आणि २५९ चौ. कि. मी. विस्तार असणे, नाशिकमध्ये आता सर्वेक्षण सुरू केले तर ८ ते १० वर्षांनी मेट्रो साकारली जाऊ शकणार असणे, शहराचा झपाट्याने होणारा विकास तसेच आगामी काही वर्षातील वाढणारी लोकसंख्या याचा विचार केला तर दळणवळणाची साधने अपुरी पडणार असणे, त्यामुळे नाशिक मेट्रोसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल	दिनांक १ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

बनविण्यासाठी शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ”

२९	६५९	**सर्वश्री विक्रम काळे व इतर वि. प. स.** “राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या व दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर कायम वेतनश्रेणीत आलेल्या शिक्षक सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, परंतु दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु त्या शाळांना अनुदान नसणे, टप्पा अनुदान असणे व १ नोव्हेंबर, २००५ नंतर त्या शाळा १०० टक्के अनुदानावर येणे, म्हणून त्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना जुन्याऐवजी नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा अन्यायकारक निर्णय घेणे, या विरोधात शिक्षक कर्मचाऱ्यांनी न्यायालयात दाद मागणे, मा. उच्च न्यायालयाने अनेक शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत निर्णय देणे, परंतु तरीही शासनाने अद्यापपर्यंत जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अद्याप कोणताच निर्णय न घेणे, त्यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”	दिनांक १ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
३०	१५८०	**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि. प. स.** “केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकताच व्यावसायिक सरोगसी वर बंदी आणणारा कायद्याचा मसुदा मंजूर करण्यात येणे, सदरहू कायद्यामुळे सरोगसीचा बाजार काही अंशी कमी होईल, परंतु या सरोगसीमध्ये व्यवहारिक बाबींसोबत काही नैतिकतेचे बंधन असणेही आवश्यक असणे, राज्यातही सरोगसीसाठी गर्भाशय भाड्याने देणाऱ्या महिला या विशेषतः मुंबईतील मानखुर्द, मालवणी, धारावी, नवी मुंबई, पनवेल येथील कानाकोपऱ्यात असणे, नऊ महिन्यांसाठी हा भाडोत्री गर्भ वाढवला की त्यातून दोन ते तीन लाख रुपयांचा मोबदला मिळतो; परंतु या प्रक्रियेमध्ये बिजाचे फलनीकरण करताना जुळं किंवा तिळं झालं तरी पैसे एका बाळाचेच	दिनांक १ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मिळणे, मात्र गर्भ रुजवण्यापूर्वी तीन ते चार महिने वैद्यकीय उपचार सुरू होऊन त्या उपचारादरम्यान या महिलेला पौष्टिक आहाराची गरज असणे, परंतु आधीच आर्थिक चणचण असलेल्या स्वतःची तीन चार बाळंतपण झालेल्या या महिलांना पौष्टीक आहार मिळत नसणे, अशा महिलांचा दलालही टक्केवारी वाढवून तिला मिळालेल्या पैशातही हिस्सा घेणे, मग त्या तुटपुंज्या मोबदल्यातून या प्रक्रियेतून जाणाऱ्या महिलांना होणारे साईड इफेक्ट तसेच विविध शारिरीक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागणे, याकरिता शासनाने अशा सरोगसी महिलांची पुढील शारिरीक व मानसिक काळजी घेण्याकरिता टास्क फोर्स नेमण्याची आवश्यकता, शासनाने योग्य ते बदल करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
३१	१२७८	**सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "शासनाने कंपनी करीता कंपनी कायद्यांतर्गत संपादित केलेला मौजे कोलशेत जि. ठाणे येथील स. न ९९(२) हा भूखंड औद्यौगिक प्रयोजनार्थ मे. ओरीएंटल इंडस्ट्रीज ने विकत घेणे, सदर भूखंडाचा औद्यौगिक प्रयोजनार्थ वापर न करता तो विकासकास विक्रीचा प्रयत्न करणे, सदर प्रयत्नास यश न आल्याने त्याचे हक्क विकासकास देणे, सदर अधिकाराच्या आधारे मे मॅन इन्फ्रा यांनी मौजे कोलशेत येथील ११४(४) व ११५(२) या क्षेत्रा समवेत स. न ९९(२) सह एकत्रीत विकास परवानगी संदर्भात अर्ज करणे, स. न ११४(४) व ११५(२) मध्ये आदिवासी कुळ असतांना व स. न. ९९(२) ही जमिनीच्या ७/१२ वर भोगवटदार वर्ग २ चा उल्लेख असतांना महानगरपालिका, ठाणे यांनी तिन्ही सर्व्हे नं. च्या एकत्रित आराखड्यात विकास परवानगी देणे, यातील आरक्षित क्षेत्रात विकासहक्क देणे, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, १९६६ चे कलम ४२ अ व	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

भुसंपादन अधिनियम व भुसंपादन (कंपन्या बाबतचे) नियम, १९६३ मधील तरतुदीचे उल्लंघन करणे, सदर विकास परवानगीचे आधारे विकासकाने सदर प्रकल्पाचे काम सुरू करणे, सदर प्रकल्पाची जाहीरात सुरू करणे, प्रदर्शनास स्टॉल लावुन सदनिका विक्री करून या मालमत्तेत त्रयस्त हितसंबंध? निर्माण करणे, पर्यायाने सर्वसामान्य गुंतवणूकदाराची गुंतवणुक व शासनाच्या हितसंबंधांना बाधा आणणे, या सर्व बाबी प्रधान सचिव(महसुल) तसेच प्रधान सचिव (वने, भुसंपादन), मंत्री, महसुल यांना दिनांक २५ जानेवारी २०१७ चे पत्रान्वये निदर्शनास आणणे, त्याची दखल न घेतल्याने दिनांक १७ फेब्रुवारी २०१७, दिनांक २२ फेब्रुवारी २०१७ रोजी यासंदर्भात पुन्हा पत्र देऊन देखील त्याची दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ”

३२	३३५	**श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** “अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या साडेतीन वर्षापूर्वी तर कॉम्रेड गोंविद पानसरे यांची हत्या दोन वर्षापुर्वी करणारी सनातन संघटना आणि या दोघांच्या खुनाचे आरोपी असणारे एकच असणे, परंतु आजपर्यंत खुनाच्या कटासाठी वापरण्यात आलेली मोटर सायकल आणि पिस्तुल तपास यंत्रणेला न सापडणे, सी. बी. आय. ने आरोपींनी पिस्तुलातून झाडलेल्यां गोळ्या/पुंगळ्या स्कॉटलँड यार्डच्या न्यायवैधक शाळेत पाठवून दहा महिन्यानंतरही त्यांनी अहवाल न देणे, कर्नाटकातील विचारवंत डॉ. एम. एम. कुलबुर्गी यांच्यासह दाभोलकर, पानसरे यांच्या हत्येचा कट एकाच उद्देशाने करण्यात येणे, तरीसुद्धा तीनही हत्यांचा तपास तीन वेगवेगळ्या तपास यंत्रणांनी करणे, एक आरोपी समीर गायकवाड याच्यावर आरोप निश्चिती होणे तर डॉ. विरेंद्रसिंह तावडे या आरोपीवर अद्याप आरोप निश्चित न होणे, फरार आरोपी आकोलकर आणि पवार यांचा तपास यंत्रणांना सुगावा न लागणे, यामुळे जनतेमध्ये वाढत असलेला असंतोष आणि चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.”	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३३	१६०९	**सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर व इतर वि. प. स.** "महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या घरांबाबत धोरण ठरवून सुमारे २८ हजार कामगारांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत आदेश निर्गमित केले असणे, मात्र वरळी येथील सर्व्हे क्र. १७/४७ वरील १२, १३०. ०७ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील सफाई कामगारांच्या ५ बैठ्याचाळी नियमीत करण्याच्या दृष्टीने तेथील कामगारांची नियोजित गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याकरिता महानगरपालिकेच्या सुधार समितीने माहे नोव्हेंबर २००९ मध्ये मान्यता दिल्यानंतरही तेथून मेट्रो ट्रेन प्रकल्प होणार असल्याने तेथील ६१ भाडेकरुंच्या पुनर्वसनाची योजना तयार करण्यात आली असणे, परंतु त्याच ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या ११८ सफाई कामगारांना दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत घरे रिकामी करण्याकरिता महापालिकेकडून नोटीस देण्यात आली असणे, सदर सफाई कामगार महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडून बांधण्यात आलेल्या चाळींमध्ये राहत असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात न येणे, त्याचप्रमाणे त्यांना पुनर्वसनाच्या योजनेमध्येही समाविष्ट न करणे, परिणामी या चाळींमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या महापालिकेच्या सफाई कामगारांना रस्त्यावर येण्याची आलेली पाळी, यामुळे तेथील कामगारांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तेथील अन्य इमारती प्रमाणे १३ चाळीतील सफाई कामगार भाडेकरुंना न्याय देण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्याची व मेट्रो ट्रेनच्या प्रकल्पामुळे त्यांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करण्याची योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

३४	१६१०	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील १. मौजे विरार सर्व्हे क्र. ६२ हिस्सा क्र. १० मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, २. मौजे विरार सर्व्हे क्र. ६१, हिस्सा क्र. १०, ११, सर्व्हे क्र. ६२ हिस्सा क्र. ३, सर्व्हे क्र. ६३, हिस्सा क्र. १३, १४ मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, ३. मौजे निळेमोरे सर्व्हे क्र. ३४, हिस्सा क्र. ३ भाग व ४ भाग, भागीदार प्रदिप रामचंद्र गुप्ता या तिनही ठिकाणी नगरविकास विभागाने मान्य केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, तसेच उपरोक्त तिनही प्रकरणात विकासकांनी शासकीय बनावट कागदपत्र तयार करून सामान्य जनतेची फसवणुक केलेली असणे, याबाबत पोलीस खात्यामध्ये वारंवार तक्रार करून देखील विकासकावर भा. दं. वि. स कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, उपरोक्त प्रकरणी गृह विभागाने प्रकरणांची शहानिशा करून याबाबत नियमांची व कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
३५	१४७६	**ॲड. अनिल परब, वि. प. स.** "मौजे दहिसर, ता. बोरीवली येथील सर्व्हे नं. २०९ हा सुमारे १४ एकर भूखंड महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने खाजगी व्यक्तीमार्फत हडपण्याची धक्कादायक बाब माहे मार्च, २०१७ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर भूखंडावर हाजी अली महंमद यांचे नाव खोत म्हणून सातबारा पदरी असणे, तसेच त्यापैकी १२ एकर शेतजमीन श्री. जगदेव बचई अहिर यांच्या कब्जे वहिवाटीस असून त्यावर चाळ व इतर बांधकाम असतांना देखील हायकोर्ट सूट क्र. ३४१५/१९४७ अन्वये नेमलेल्या कोर्ट रिसिव्हर मार्फत सन २००७ मध्ये लिलावाद्वारे श्रीमती सुनिता खिमल यांनी परस्पर स्वतःच्या मालकी हक्काच्या कंपनीस विक्री करणे, शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय सदर विक्रीस मान्यता नसतानाही बेकायदेशीररित्या झालेल्या विक्रीमुळे कब्जेदारांच्या वारसांचा डावलण्यात आलेला हक्क,	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		विकत घेणारा पक्षकार शेतकरी नसतांनाही सदर विक्रीची नोंद गैरमार्गाने महसूल दफ्तरी करण्यात येणे, विक्री दस्तऐवज नोंदणीकृत करत असतांना कब्जेदारांच्या वारसांचे कोणतेही संमतीपत्र न घेता परस्पर झालेले बेकायदेशीर खरेदीखत, त्यातच विकत घेणाऱ्या पक्षकारांनी सदर भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्राधिकरणास सादर केलेला अर्ज, त्यावर कब्जेदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, झो. पु. पा व तहसीलदार, बोरीवली यांनी नोंदविलेले अस्पष्ट अभिप्राय, त्यानुषंगाने विधी सल्लागाराचे मत मागविण्यास झालेला विलंब, ८० वर्षांपासून कसणाऱ्या कब्जेदारास भूमिहीन करण्याचा होत असलेला प्रयत्न, परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टी धारकांची होत असलेली फसवणूक, या सर्व प्रक्रियेकडे महसूल विभागाने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”		
३६	१५५०	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.** “मुंबई उपनगरातील मागाठाणे गाव बोरीवली पूर्व येथे दिनांक २० जून, २००४ रोजी देवीपाड्यात सि. टी. सर्व्हे क्र. २०९ ते २१३ येथील जमिनीवर एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी देवीपाडा वेल्फेअर असोसिएशनच्या पहिल्या सभेत मे. निओ मॉर्डन आर्किटेक्ट व विकासक एमआर कन्स्ट्रक्शन यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर जमीन ही पश्चिम द्रुतगती महामार्ग याला लागून असल्याकारणाने व या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी नियमानूसार मार्च, २००१ नंतरच्या कायद्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता सन २००१ पूर्वीचा नियम सादर करून सदर एसआरए प्रकल्पाला कोणत्याही कागदपत्रांची पुर्ततेअभावी केवळ तीन दिवसात परवानगी देण्यात येणे, खोटे सर्वेक्षण करून स्वतःच्या (विकासकाच्या) फायद्यासाठी	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

परिशिष्ट - २ मध्ये बनावट आणि नकली झोपडपट्टी धारकांची नावे सामील करणे, सदर घोटाळा माहितीच्या अधिकारात उघड होणे, सदर एसआरए प्रकल्पाची स्थापना २००४ मध्ये झाली असताना आपल्या बाजूने असलेल्या कमिटीला सोबत घेऊन दिनांक ९ जानेवारी, २००१ रोजी खोटया कागदपत्राच्या आधारे पश्चिम द्रुतगती महामार्गाकडून पुनर्विकास प्रकल्पात प्रवेश करण्यासाठी परवानगी मिळविणे, सदर विकासकाने आपल्या कुटुंबातील व्यक्ती, नातलग व कामगार यांची नावे समाविष्ट करून बोगस झोपडपट्टीधारकांना एसआरए योजनेचा लाभ देण्यात येणे, म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरून त्यांच्या संगमनमताने बेकायदेशीररित्या जागेवर कब्जा करून त्यावर बांधकाम करण्यात येणे, सदर प्रकल्पात असलेली मंदिरे ५०० चौ. फुट ऐवजी २०० फुटांची मंदिरे बनवून देण्यात येणे, सदर विकासकाने एसआरए प्रकल्पाच्या नजीकची जवळजवळ २० हजार चौ. फुट जागा अनधिकृतपणे ताब्यात घेऊन त्यावर खाजगी बांधकाम करण्यात येणे, सन २००८ साली संपूर्ण सोयी-सुविधेअभावी इमारतीचा ताबा देण्यात येणे, याबाबत स्थानिक पात्र झोपडपट्टी धारकांनी तक्रारी करूनही शासनाकडून अद्याप विकासकावर कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यामुळे शासनाविरुद्ध असंतोषाचे वातावरण पसरणे, सदर एसआरए धारकांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

३७ १५९६ **सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि. प. स.**

"रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील विळे भागात एमआयडीसीत मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील लि. कंपनी कार्यान्वीत असणे, या एमआयडीसीसाठी माणगांव तालुक्यातील तासगांव, भागाड, येलावडे, विळे, सणसवाडी आदी भागातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यल्प मोबदल्यात संपादीत केलेल्या असणे, जमिनी संपादीत करतांना स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्यामध्ये तसेच रोजगारामध्ये प्राधान्य देण्याचे बंधन असणे, त्याचबरोबर या कंपन्यांमार्फत शाळा, कॉलेज, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अंतर्गत

दिनांक ६ एप्रिल २०१७ चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रस्ते व ग्रामपंचायतीच्या सक्षमीकरणाच्या सोई पुरविणे बंधनकारक असणे, मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील कंपनी कार्यान्वीत झाल्यानंतर सदर कंपनीने स्थानिक नागरिकांना रोजगारापासून हेतुपुरस्सर डावलेले असणे, वेगवेगळ्या प्रकारचे कंत्राट जाणीवपुर्वक जिल्हाबाहेरील कंत्राटदारांना देण्यात येणे, कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील कामगारांची मोठ्या प्रमाणात भरती केलेली असणे, माणगांव तालुक्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ असतांना या विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची रोजगाराची संधी उपलब्ध केलेली नसणे, कंपनी ॲक्ट नुसार सामाजिक दायित्वाची २ टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करणे बंधनकारक असतांना या फंडाचा गैरवापर करणे, आरोग्याच्या दृष्टीने सोईसुविधा देणे बंधनकारक असताना या कंपनीने काळ नदीमध्ये ॲसीड मिश्रीत पाणी सोडल्याने प्रदूषण होत असणे, त्यामुळे या भागातील सुमारे १५ हजार लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, या कंपनीच्या ॲसीड मिश्रीत बाहेर सोडलेल्या पाण्यामुळे या भागातील अनेक बोअरवेल व नद्यांचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिलेला असणे, या सर्व गोष्टीमुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे कंपनीने केलेले हेतुपुरस्सर दुर्लक्ष, जिल्ह्याबाहेरील कामगारांची केलेली नोकर भरती, या सर्व पार्श्वभूमीवर कंपनीविरुद्ध कडक कारवाई करण्याची स्थानिकांमधून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
३८	४२९	**सर्वश्री जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** "थॅलेसेमिया रोगाचा सामना करणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये बालरुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असणे, ठराविक	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

कालावधीत ब्लड ट्रान्समिशन, चाचण्या अशी उपचार पद्धती असणाऱ्या या रुग्णांच्या औषधांच्या कोर्समध्ये खंड पडल्यास या रुग्णांच्या यकृताला सूज येण्याची भीती असल्याने त्यांना डेफ्रिजेट आणि डेसिरॉक्स ही औषधे नियमित देणे गरजेचे असणे, मात्र ही औषधे सर्वसामान्य दुकानात न मिळता फक्त सरकारी रुग्णालयातच मिळत असणे, दोन महिन्यांपुर्वी ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील औषधांचा साठा संपल्याने रुग्णांच्या पालकांना अन्य सेंटर्सचा आधार घ्यावा लागत असताना आरोग्य भवनातून त्यावेळी हा साठा स्थानिक रुग्णालयांना अल्प प्रमाणात पोहोचविण्यात आलेला असल्याने तो लगेच संपून गेल्याने आता पुन्हा मागील एक महिन्यापासून या औषधांचा साठा संपुष्टात आलेला असणे, आरोग्य विभागाकडे वारंवार चौकशी केली असता टेंडर न निघाल्याने साठा पोहोचविण्यात आला नसल्याचे कारणे देण्यात आलेले असणे, यामुळे याप्रकरणातील आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कारभाराचा भोंगळपणा यातून स्पष्ट होत असून, साधारणपणे ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्याची पूर्व तजवीज करून ठेवणे गरजेचे असणे किंवा त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत अत्यावश्यक औषधे मिळण्यात खंड पडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असताना याबाबीकडे संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ६०० रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मागील दोन ते तीन महिन्यांपासून अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागणे, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना रोजचा औषधाचा डोस न मिळाल्यास त्यांना होणारा त्रास व त्याचा त्यांच्या शरीरावर होणारा परिणाम याची जाणीव असतानाही त्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात अपयशी ठरलेल्या ठाणे सिव्हील रुग्णालय व आरोग्य विभागातील संबंधित दोषींची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबरोबरच थॅलेसेमिया रुग्णांना लागणारा औषधसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देऊन रुग्णांना आवश्यक त्यावेळी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३९	१३६०	**श्री. किरण पावसकर, वि. प. स.** "जेट एअरवेज एम्प्लॉईज को.-ऑप. क्रेडीट सोसायटीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरकारभार सुरू असून संचालक मंडळाच्या संगनमताने संशयास्पद निर्णय घेतले जात असल्याची मार्च, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात गंभीर माहिती उघडकीस आलेली असणे, सदर को.-ऑप. सोसायटी राज्य शासनाच्या उप निबंधक कार्यालय, के. पूर्व विभाग यांच्या अधिपत्याखाली येत असणे, सोसायटीचे कार्यकारी मंडळ हे उपविधीतील तरतुदी व कायद्यातील तरतुदीनुसार कामकाज करीत असणे, सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ३२ मधील तरतुदीनुसार मागितलेली माहिती उपलब्ध करून दिली जात नसणे, मागील चार वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल देण्यास टाळाटाळ केली जात असणे, कार्यकारी मंडळातील सदस्यांनी कायद्यातील तरतुदीचे तसेच उपविधीचे उल्लंघन करून कर्जे घेतलेली असणे, संस्थेच्या कायद्यामध्ये नियम, करार याबाबत पारदर्शकता नसल्याने संस्थेच्या प्रशासकीय खर्चात वाढ झालेली असणे, लेखापरिक्षकाच्या संगनमताने आर्थिक फुगवटा दाखविला जात असणे, संस्थेने वाटप केलेल्या ग्राहक कर्ज वाटपामध्ये आर्थिक गैरव्यवहार केलेला असून प्रत्यक्ष वस्तुंच्या बाजारभाव तसेच घाऊक बाजारभाव यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असणे, खरेदी-विक्री व्यवहारामध्ये संगनमताने भ्रष्टाचार झालेला असणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले संरक्षण, सदर संशयास्पद प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सभासदांनी मा. मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री, मा. सहकार राज्यमंत्री तसेच जिल्हा उपनिबंधक, बांद्रा, मुंबई यांचेकडे दिनांक ९ मार्च २०१७ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सोसायटीच्या सभासदांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदर संशयास्पद प्रकरणी सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

४० १०८५ **सर्वश्री संजय दत्त व इतर वि. प. स.** दिनांक ७ एप्रिल २०१७ चर्चा झाली.

"नवी मुंबई मधील खारघर येथे दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी डीएनए वृत्तपत्राचे पत्रकार सुधीर सूर्यवंशी यांच्यावर अज्ञान व्यक्तींकडून हॉकी व लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडणे, गेल्या काही दिवसात पत्रकार आणि व्हिडीओ जर्नलिस्ट यांच्यावर हल्ले आणि धमक्या देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या असणे, झी चोवीस तासचे संपादक डॉ. उदय निरगुडकर, साप्ताहिक राजसत्ताचे संपादक वसंत माने, पत्रकार संजय गिरी, विनोद यादव, संदिप भारती, स्वाती नाईक, सुधीर सुर्यवंशी यांच्या बाबतीत या घटना घडल्या असणे, सुर्यवंशी, नाईक, भारती आणि गिरी यांच्यावर तर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, टी. व्ही. जर्नलिस्ट असोसिएशन या सर्व घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीही सरकारकडे करण्यात येणे, माध्यमांचा प्रभाव वाढत असताना पत्रकारांना त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार काम करू न देणे हे लोकशाहीला घातक ठरणार असणे, लोकशाही अधिक सक्षमपणे राबवली जावी याची जबाबदारी सरकारची असणे, म्हणूनच पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा लवकरात लवकर आणून लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करावी अशी अपेक्षा सरकारकडून करण्यात यावी अशी पत्रकारांची मागणी असणे, पत्रकारांवर वारंवार हल्ले होत आहेत ही गंभीर बाब असणे, पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांना विशेष संरक्षण मिळावे आणि त्याकरिता कायदा करण्याची खूप वर्षापासूनची मागणी असणे, सन २०१६ या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्रकारांना संरक्षण देणे, पेन्शन देणे, घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा. मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकांरावरील होणारे हल्ले

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रोखण्याबाबत कायद्यात तरतूद करण्यात येईल, पेन्शन आणि घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्यात येईल असे आश्वासन देणे, परंतू दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न येणे, पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, पेन्शन सुरू करावी अशा अनेक मागण्या प्रलंबित असणे, पत्रकारांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत असताना त्यांच्या सुरक्षितेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, राज्यातील पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासन अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्यामुळे सरकारने वेळोवेळी पत्रकारांसाठी कायदा आणू असे दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "		
४१	१५९७	**सर्वश्री अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** "शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होवू नये म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यावरण नियम व कायद्यानुसार प्रत्येक बीटी कॉटन बियाणांच्या ४५० ग्रॅम पिशवी सोबत १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणे विक्री करणे बंधनकारक असणे, कायदा आणि नियम धाब्यावर बसवून राज्यात बीटी बियाणांसोबत नॉन बीटी ऐवजी १२० ग्रॅम बीटी बियाणांची विक्री करण्यात येणे, यामुळे राज्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, बीटी बियाणांसोबत दिल्या जाणाऱ्या १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणांची तपासणी नुकतीच नंदूरबार येथे शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर करण्यात येणे, तपासणीमध्ये हे बियाणे बीटी बियाणे असल्याचे सिद्ध होणे, या संदर्भात दाखल तक्रारीवरून राज्यात कृषी अधिकाऱ्यांनी बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कोणतीही कारवाई न करणे, या बाबतच्या तक्रारी आणि त्यावरील अपीले मोठ्या प्रमाणावर प्रलंबित	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

ठेवून अधिकारी आणि कंपनी यांच्या आर्थिक संगनमताने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे, अनेक ठिकाणी बियाणांप्रमाणे बोगस रासायनिक खते विक्रीचेही प्रकार उघडकीस येणे, नुकतीच हिंगोली येथे शेतकऱ्यांच्या दबावापोटी खताचा नमुना प्रयोगशाळेत तपासला असता त्यामध्ये माती असल्याचे सिद्ध होणे, अधिकाऱ्यांकडून या बाबत कारवाई होत. नसल्यामुळे बोगस आणि बनावट खत विक्रीला चालना मिळणे, बायो पेस्टीसाईड्सच्या नावाखाली शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करून चायनामेड बोगस औषधांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असणे, जैविक औषधांच्या नावाखाली रासायनिक किटकनाशकांची विक्री मोठ्या प्रमाणावर राज्यभर होत असणे, बुटीवार, जि. नागपूर येथे याबाबत नुकताच गुन्हा दाखल होणे, प्रकरणातील दोषींविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी करणे, बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या विक्रीवर निर्बंध आणुन यासंदर्भात कडक कायदा करण्याची मागणी शेतकऱ्यांमधुन करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया. ”

४२	४२३	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.**	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

“मुंबईसह रायगड किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना उपचारासाठी अनेकदा मुंबईत यावे लागते हे लक्षात घेऊन त्यांचा वेळ वाचावा या हेतूने प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरू करण्याचा महाराष्ट्र सागरी मंडळाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक २३ जानेवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये तसेच तज्ञ डॉक्टरही असतील अशी तरतूद असणे, काही वर्षांपूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडी किनाऱ्यावरील नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरू केली असणे, डॉक्टर बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरू करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तयार केलेला असणे, परंतु या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने जनहित लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजुरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
४३	२७५	**आर्कि. अनंत गाडगीळ, वि. प. स.** "मुंबई शहरामध्ये नव्या इमारती उभ्या राहणे, त्याचप्रमाणे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी केली जाणे, इमारत पूर्ण होण्यापूर्वी भोगवटा पत्र विकासकाकडून प्राप्त करणे आवश्यक असणे, तथापि बहुसंख्य इमारतींमध्ये सदर नियमांचे पालन न होणे, यांवर गेल्या वर्षी मुंबई न्यायालयाने काही महापालिका अभियंत्यांवर एफ. आय. आर. दाखल करण्याचे निर्देश देणे, यामुळे इतर वार्डमधील संबंधित मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अशा रहिवाशांना जागा खाली करण्याचे आदेश बजावणे, संबंधित विकासकांनी रहिवाशांची भाडी मध्येच बंद करणे, अशा रहिवाशांना बेघर होण्याची पाळी येणे, यामध्ये ना विकासक ना पालिका अधिकारी यांच्यावर कारवाई होणे, उलट रहिवाशांना अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागणे, मुंबईतील असंख्य नव्या इमारतींमधून सदर प्रश्न उपस्थित झाल्याने त्यास गंभीर स्वरूप येणे, यामुळे शासनाबद्दल जनतेत पसरलेला रोष व नाराजी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
४४	१६२९	**श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि. प. स.** "रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ब्रिटीश कालीन सायबाच्या धरणाची सध्या मोठ्या प्रमाणात जीर्णावस्था झालेली असून या धरणातून वारंवार पाणी गळती सुरू होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, नगरपरिषदेकडून	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

वारंवार दुरूस्ती होत असून पाणी गळती थांबलेली नसणे, नगरपरिषदेने या धरणाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले असता दुरूस्ती शक्य नसल्याचा अहवाल येणे, धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असणे, त्यामुळे अतिवृष्टीने पाण्याच्या प्रवाहामुळे धरण फुटल्यास राजापुर शहराच्या बाजार पेठेत पुराचे पाणी जाऊन मोठे आर्थिक नुकसान व जिवित हानी होण्याची शक्यता निर्माण होणे, दुर्घटनेमुळे शहराला होणारा धोका टाळण्यासाठी तसेच राजापूर शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी या ब्रिटीशकालीन सायबाच्या धरणाला पर्यायी नवीन धरण बांधण्याची होत असलेली मागणी, या मागणीनुसार धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असूनही कार्यवाहीसाठी होत असलेला विलंब, शासनाने तातडीने नवीन धरण बांधण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

४५	१६२८	**श्री. गिरीशचंद्र व्यास व इतर वि. प. स.**	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

“राज्यातील “अ” वर्ग महानगरपालिका अस्तित्वात असून त्यांचे सेवाशर्तीकरिता विशिष्ट अधिनियम असणे, मुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिका एकाच अधिनियमाच्या कक्षेत येत असल्याने त्यात काम करणारे कर्मचारी / अधिकारी सेवेत दाखल झाल्यापासून त्या त्या महानगरपालीकेत निवृत्त होत असणे, दोषी कर्मचारी / अधिकाऱ्यांविरूद्ध प्रशासकीय कारवाई म्हणून बदली करता येत नसल्याकारणास्तव सेवेतून काढण्याखेरीज आयुक्तांना पर्याय देखील उपलब्ध नसणे व राजकीय दबावापोटी असे प्रस्ताव देखील महासभेतच नामंजूर होत असणे, वर्षानुवर्षे एकाच महानगरपालिकेत काम केल्यामुळे ठराविक अधिकारी / कर्मचारी यांचा प्रशासनावर पूर्णपणे ताबा होऊन गैरकामांना गती मिळत असणे, त्यातच मोठमोठ्या उद्योजकांशी हितसंबंध वाढल्याने गैरमार्गाने बेहिशोबी मालमत्ता वाढण्यास देखील मदत होत असून अधिकाऱ्यांची मुजोरीदेखील वाढत असल्याची निदर्शनास आलेली बाब, त्यामुळे या भ्रष्टाचारास प्रतिबंध करताना शासनास येत असलेले अपयश, त्यामुळे “अ” वर्ग महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		यांची अन्य महानगरपालिकांमध्ये समकक्ष पदावर बदली करण्याबाबतची तरतूद करून ती तात्काळ अंमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
४६	१५८६	**श्री. रामनिवास सिंह, वि. प. स.** "मुंबईतील पवई येथील हिरानंदानी, स्वामीनारायण मंदिर ते कैलाश कॉम्पलेक्स येथील सुरू असलेल्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरप्रकार, व निकृष्ट दर्जाचे काम सुरू असल्याचे नुकतेच माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू रस्त्याचे काँक्रिटीकरण महापालिकेच्या सेंट्रल एजन्सीद्वारे करण्यात येणार असून त्याकरिता सुमारे ९ कोटी ६२ लाख १३ हजार इतका खर्च होणार असून सदर कामाकरिता दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर मे. प्राईम सिव्हील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना सदर रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे कंत्राट देण्यात येणे, त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम देखील सुरू होते. परंतु, रस्त्याच्या पूर्व दिशेला रस्त्यामध्ये अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण होत असल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक नागरिकांना काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याचे भासवून कंत्राटदार महापालिका, शासन तसेच नागरिकांची करीत असलेली फसवणूक, अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण केल्यामुळे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन येत्या पावसाळ्यात रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याची निर्माण झालेली भिती, परिणामी या रस्त्यांवर अपघातामध्ये वाढ होण्याची शक्यता, सदर प्रकरणी वेळीच होत असलेल्या निकृष्ट कामाला आळा बसावा याकरिता सदर कामाची तातडीने सखोल चौकशी करावी व दोषी कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

४७	१३७७	**प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.** "सिंधु एज्युकेशन सोसायटी, नागपूर या संस्थेद्वारा संचलित महात्मा गांधी शाळा जरीपटका, नागपूरचे अध्यक्ष श्रीमती विणी बजाज आणि सचिव दिपक बजाज यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग नागपूरने दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी धाड टाकून प्रचंड प्रमाणात बेहिशोबी रक्कम जप्त करणे, श्री. दिपक बजाज यांना नोव्हेंबर, २०१५ मध्ये अटक करून कारागृहात ठेवले असणे, विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळखंडोबा केल्याचा गंभीर गुन्हा असल्याने मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात वारंवार जामीन प्राप्तीसाठी केलेले अर्ज फेटाळण्यात येणे, राज्य शासनाने या आरोपींची संपत्ती जप्त करण्याची परवानगी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, नागपूर यांस दिली असूनही भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने जप्तीची कारवाई न करणे, शिक्षण विभागाच्या संगनमताने केलेला भ्रष्टाचार, विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाबाबत श्री. दिपक बजाज यांची मुलगी श्रीमती दिप्ती बजाज यांचेवर ए. सी. बी. ने पुरवणी आरोपपत्र दाखल करून देखील त्यांचेवर कारवाई न करणे, एवढे भ्रष्टाचार करणाऱ्या सिंधु एज्युकेशन सोसायटी विरूद्ध धर्मादाय आयुक्त नागपूरने कोणतीही दखलपात्र कारवाई न करणे, सिंधु एज्युकेशन सोसायटीद्वारा केलेला व करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने प्रशासकांची नियुक्ती न करणे, या सर्व कारवाईस होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
४८	१६४३	**सर्वश्री सुनिल तटकरे व इतर वि. प. स.** "रोहा हे रायगड जिल्ह्यातील एक प्रमुख शहर असणे, गतवर्षीच रोहा-अष्टमी नगरपरिषदेने आपला शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा केलेला असणे, रोहा-अष्टमी शहराला सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा असणे, पर्यटन व औद्योगिकदृष्ट्या हे शहर विकसित होत असणे, वाढत्या लोकसंख्येला रोहा-अष्टमी नगरपरिषद योग्य सोईसुविधा देत असणे, याचबरोबर शहरात सांस्कृतिक व पर्यटन वाढण्यासाठी नगरपरिषदेमार्फत	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)

प्रयत्न करण्यात येत असणे, याच धर्तीवर रोहा शहरात प्राचीन असलेल्या अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचे सुशोभिकरण करून त्यावर पर्यटन व्यवसाय वाढीसाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न सुरू असणे, यासाठी शासनाकडून वैशिष्टयपूर्ण बाबीसाठी मंजूर असलेले अनुदान गेल्या दोन वर्षापासून उपलब्ध असणे, मात्र जिल्हा प्रशासन या प्रकल्पाच्या मंजुरीविषयी उदासिन असणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेमार्फत तलावाचे सुशोभिकरण, संरक्षक भिंत , बाग-बगीचा करणे, मिनी ट्रेन, बोटींग क्लब, विक्रेते स्टॉल आदी प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेले असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार या प्रस्तावास मंजुरी मिळणे विषयी विनंती केलेली असणे, जिल्हा प्रशासनाने मात्र वेळोवेळी त्यामध्ये त्रुटी काढून प्रस्ताव मंजुरीमध्ये उदासिनता दाखविणे, रोहा-अष्टमी नगरपरिषद शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना त्याचवर्षी या प्रकल्पाची सुरूवात व्हावी अशी स्थानिक नागरिकांची इच्छा असणे, तद्नंतर प्रशासनाने प्रस्तावात बदल करून नव्याने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याविषयी नगरपरिषदेस सुचित करणे, यामध्ये वेळेचा अपव्यय झालेला असणे, शासनामार्फत निधी उपलब्ध झालेला असताना सुद्धा केवळ तांत्रिक बाबींमुळे हा प्रकल्प मंजुरीसाठी रखडलेला असणे, म्हसळा नगरपंचायतीस नगरोत्थान कार्यक्रमाअंतर्गत या वर्षी एक कोटी पंच्याहत्तर लाख इतका निधी उपलब्ध झालेला असणे, सदर निधीचा जिल्हा प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे अद्याप विनियोग झालेला नसणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेने नव्याने अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचा रु. एक कोटी बत्तीस लाख रकमेचा सविस्तर प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेला असणे, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने या प्रकल्पास त्वरित मंजुरी देऊन प्रकल्प सुरू करण्याची स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधी कडून होत असलेली मागणी, गेल्या वर्षभरापासून प्रकल्प मंजूर न झाल्याने स्थानिक

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३३	१६०९	**सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर व इतर वि. प. स.** "महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या घरांबाबत धोरण ठरवून सुमारे २८ हजार कामगारांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत आदेश निर्गमित केले असणे, मात्र वरळी येथील सर्व्हे क्र. १७/४७ वरील १२, १३०. ०७ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील सफाई कामगारांच्या ५ बैठ्याचाळी नियमीत करण्याच्या दृष्टीने तेथील कामगारांची नियोजित गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याकरिता महानगरपालिकेच्या सुधार समितीने माहे नोव्हेंबर २००९ मध्ये मान्यता दिल्यानंतरही तेथून मेट्रो ट्रेन प्रकल्प होणार असल्याने तेथील ६१ भाडेकरुंच्या पुनर्वसनाची योजना तयार करण्यात आली असणे, परंतु त्याच ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या ११८ सफाई कामगारांना दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत घरे रिकामी करण्याकरिता महापालिकेकडून नोटीस देण्यात आली असणे, सदर सफाई कामगार महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडून बांधण्यात आलेल्या चाळींमध्ये राहत असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात न येणे, त्याचप्रमाणे त्यांना पुनर्वसनाच्या योजनेमध्येही समाविष्ट न करणे, परिणामी या चाळींमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या महापालिकेच्या सफाई कामगारांना रस्त्यावर येण्याची आलेली पाळी, यामुळे तेथील कामगारांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तेथील अन्य इमारती प्रमाणे १३ चाळीतील सफाई कामगार भाडेकरुंना न्याय देण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्याची व मेट्रो ट्रेनच्या प्रकल्पामुळे त्यांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करण्याची योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

३४	१६१०	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील १. मौजे विरार सर्व्हे क्र. ६२ हिस्सा क्र. १० मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, २. मौजे विरार सर्व्हे क्र. ६१, हिस्सा क्र. १०, ११, सर्व्हे क्र. ६२ हिस्सा क्र. ३, सर्व्हे क्र. ६३, हिस्सा क्र. १३, १४ मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, ३. मौजे निळेमोरे सर्व्हे क्र. ३४, हिस्सा क्र. ३ भाग व ४ भाग, भागीदार प्रदिप रामचंद्र गुप्ता या तिनही ठिकाणी नगरविकास विभागाने मान्य केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, तसेच उपरोक्त तिनही प्रकरणात विकासकांनी शासकीय बनावट कागदपत्र तयार करून सामान्य जनतेची फसवणुक केलेली असणे, याबाबत पोलीस खात्यामध्ये वारंवार तक्रार करून देखील विकासकावर भा. दं. वि. स कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, उपरोक्त प्रकरणी गृह विभागाने प्रकरणांची शहानिशा करून याबाबत नियमांची व कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
३५	१४७६	**ॲड. अनिल परब, वि. प. स.** "मौजे दहिसर, ता. बोरीवली येथील सर्व्हे नं. २०९ हा सुमारे १४ एकर भूखंड महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने खाजगी व्यक्तीमार्फत हडपण्याची धक्कादायक बाब माहे मार्च, २०१७ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर भूखंडावर हाजी अली महंमद यांचे नाव खोत म्हणून सातबारा पदरी असणे, तसेच त्यापैकी १२ एकर शेतजमीन श्री. जगदेव बचई अहिर यांच्या कब्जे वहिवाटीस असून त्यावर चाळ व इतर बांधकाम असतांना देखील हायकोर्ट सूट क्र. ३४१५/१९४७ अन्वये नेमलेल्या कोर्ट रिसिव्हर मार्फत सन २००७ मध्ये लिलावाद्वारे श्रीमती सुनिता खिमल यांनी परस्पर स्वतःच्या मालकी हक्काच्या कंपनीस विक्री करणे, शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय सदर विक्रीस मान्यता नसतानाही बेकायदेशीररित्या झालेल्या विक्रीमुळे कब्जेदारांच्या वारसांचा डावलण्यात आलेला हक्क,	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		विकत घेणारा पक्षकार शेतकरी नसतांनाही सदर विक्रीची नोंद गैरमार्गाने महसूल दफ्तरी करण्यात येणे, विक्री दस्तऐवज नोंदणीकृत करत असतांना कब्जेदारांच्या वारसांचे कोणतेही संमतीपत्र न घेता परस्पर झालेले बेकायदेशीर खरेदीखत, त्यातच विकत घेणाऱ्या पक्षकारांनी सदर भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्राधिकरणास सादर केलेला अर्ज, त्यावर कब्जेदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, झो. पु. पा व तहसीलदार, बोरीवली यांनी नोंदविलेले अस्पष्ट अभिप्राय, त्यानुषंगाने विधी सल्लागाराचे मत मागविण्यास झालेला विलंब, ८० वर्षांपासून कसणाऱ्या कब्जेदारास भूमिहीन करण्याचा होत असलेला प्रयत्न, परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टी धारकांची होत असलेली फसवणूक, या सर्व प्रक्रियेकडे महसूल विभागाने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”		
३६	१५५०	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.** “मुंबई उपनगरातील मागाठाणे गाव बोरीवली पूर्व येथे दिनांक २० जून, २००४ रोजी देवीपाड्यात सि. टी. सर्व्हे क्र. २०९ ते २१३ येथील जमिनीवर एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी देवीपाडा वेल्फेअर असोसिएशनच्या पहिल्या सभेत मे. निओ मॉर्डन आर्किटेक्ट व विकासक एमआर कन्स्ट्रक्शन यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर जमीन ही पश्चिम द्रुतगती महामार्ग याला लागून असल्याकारणाने व या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी नियमानूसार मार्च, २००१ नंतरच्या कायद्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता सन २००१ पूर्वीचा नियम सादर करून सदर एसआरए प्रकल्पाला कोणत्याही कागदपत्रांची पुर्ततेअभावी केवळ तीन दिवसात परवानगी देण्यात येणे, खोटे सर्वेक्षण करून स्वतःच्या (विकासकाच्या) फायद्यासाठी	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

परिशिष्ट - २ मध्ये बनावट आणि नकली झोपडपट्टी धारकांची नावे सामील करणे, सदर घोटाळा माहितीच्या अधिकारात उघड होणे, सदर एसआरए प्रकल्पाची स्थापना २००४ मध्ये झाली असताना आपल्या बाजूने असलेल्या कमिटीला सोबत घेऊन दिनांक ९ जानेवारी, २००१ रोजी खोटया कागदपत्राच्या आधारे पश्चिम द्रुतगती महामार्गाकडून पुनर्विकास प्रकल्पात प्रवेश करण्यासाठी परवानगी मिळविणे, सदर विकासकाने आपल्या कुटुंबातील व्यक्ती, नातलग व कामगार यांची नावे समाविष्ट करून बोगस झोपडपट्टीधारकांना एसआरए योजनेचा लाभ देण्यात येणे, म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरून त्यांच्या संगमनमताने बेकायदेशीररित्या जागेवर कब्जा करून त्यावर बांधकाम करण्यात येणे, सदर प्रकल्पात असलेली मंदिरे ५०० चौ. फुट ऐवजी २०० फुटांची मंदिरे बनवून देण्यात येणे, सदर विकासकाने एसआरए प्रकल्पाच्या नजीकची जवळजवळ २० हजार चौ. फुट जागा अनधिकृतपणे ताब्यात घेऊन त्यावर खाजगी बांधकाम करण्यात येणे, सन २००८ साली संपूर्ण सोयी-सुविधेअभावी इमारतीचा ताबा देण्यात येणे, याबाबत स्थानिक पात्र झोपडपट्टी धारकांनी तक्रारी करूनही शासनाकडून अद्याप विकासकावर कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यामुळे शासनाविरुद्ध असंतोषाचे वातावरण पसरणे, सदर एसआरए धारकांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

३७ १५९६ **सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि. प. स.**

"रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील विळे भागात एमआयडीसीत मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील लि. कंपनी कार्यान्वीत असणे, या एमआयडीसीसाठी माणगांव तालुक्यातील तासगांव, भागाड, येलावडे, विळे, सणसवाडी आदी भागातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यल्प मोबदल्यात संपादीत केलेल्या असणे, जमिनी संपादीत करतांना स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्यामध्ये तसेच रोजगारामध्ये प्राधान्य देण्याचे बंधन असणे, त्याचबरोबर या कंपन्यांमार्फत शाळा, कॉलेज, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अंतर्गत

दिनांक ६ एप्रिल २०१७ चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रस्ते व ग्रामपंचायतीच्या सक्षमीकरणाच्या सोई पुरविणे बंधनकारक असणे, मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील कंपनी कार्यान्वीत झाल्यानंतर सदर कंपनीने स्थानिक नागरिकांना रोजगारापासून हेतुपुरस्सर डावलेले असणे, वेगवेगळ्या प्रकारचे कंत्राट जाणीवपुर्वक जिल्हाबाहेरील कंत्राटदारांना देण्यात येणे, कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील कामगारांची मोठ्या प्रमाणात भरती केलेली असणे, माणगांव तालुक्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ असतांना या विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची रोजगाराची संधी उपलब्ध केलेली नसणे, कंपनी ॲक्ट नुसार सामाजिक दायित्वाची २ टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करणे बंधनकारक असतांना या फंडाचा गैरवापर करणे, आरोग्याच्या दृष्टीने सोईसुविधा देणे बंधनकारक असताना या कंपनीने काळ नदीमध्ये ॲसीड मिश्रीत पाणी सोडल्याने प्रदूषण होत असणे, त्यामुळे या भागातील सुमारे १५ हजार लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, या कंपनीच्या ॲसीड मिश्रीत बाहेर सोडलेल्या पाण्यामुळे या भागातील अनेक बोअरवेल व नद्यांचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिलेला असणे, या सर्व गोष्टीमुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे कंपनीने केलेले हेतुपुरस्सर दुर्लक्ष, जिल्ह्याबाहेरील कामगारांची केलेली नोकर भरती, या सर्व पार्श्वभूमीवर कंपनीविरुद्ध कडक कारवाई करण्याची स्थानिकांमधून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
३८	४२९	**सर्वश्री जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** "थॅलेसेमिया रोगाचा सामना करणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये बालरुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असणे, ठराविक	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

कालावधीत ब्लड ट्रान्समिशन, चाचण्या अशी उपचार पद्धती असणाऱ्या या रुग्णांच्या औषधांच्या कोर्समध्ये खंड पडल्यास या रुग्णांच्या यकृताला सूज येण्याची भीती असल्याने त्यांना डेफ्रिजेट आणि डेसिरॉक्स ही औषधे नियमित देणे गरजेचे असणे, मात्र ही औषधे सर्वसामान्य दुकानात न मिळता फक्त सरकारी रुग्णालयातच मिळत असणे, दोन महिन्यांपुर्वी ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील औषधांचा साठा संपल्याने रुग्णांच्या पालकांना अन्य सेंटर्सचा आधार घ्यावा लागत असताना आरोग्य भवनातून त्यावेळी हा साठा स्थानिक रुग्णालयांना अल्प प्रमाणात पोहोचविण्यात आलेला असल्याने तो लगेच संपून गेल्याने आता पुन्हा मागील एक महिन्यापासून या औषधांचा साठा संपुष्टात आलेला असणे, आरोग्य विभागाकडे वारंवार चौकशी केली असता टेंडर न निघाल्याने साठा पोहोचविण्यात आला नसल्याचे कारणे देण्यात आलेले असणे, यामुळे याप्रकरणातील आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कारभाराचा भोंगळपणा यातून स्पष्ट होत असून, साधारणपणे ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्याची पूर्व तजवीज करून ठेवणे गरजेचे असणे किंवा त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत अत्यावश्यक औषधे मिळण्यात खंड पडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असताना याबाबीकडे संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ६०० रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मागील दोन ते तीन महिन्यांपासून अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागणे, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना रोजचा औषधाचा डोस न मिळाल्यास त्यांना होणारा त्रास व त्याचा त्यांच्या शरीरावर होणारा परिणाम याची जाणीव असतानाही त्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात अपयशी ठरलेल्या ठाणे सिव्हील रुग्णालय व आरोग्य विभागातील संबंधित दोषींची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबरोबरच थॅलेसेमिया रुग्णांना लागणारा औषधसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देऊन रुग्णांना आवश्यक त्यावेळी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३९	१३६०	**श्री. किरण पावसकर, वि. प. स.** "जेट एअरवेज एम्प्लॉईज को.-ऑप. क्रेडीट सोसायटीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरकारभार सुरू असून संचालक मंडळाच्या संगनमताने संशयास्पद निर्णय घेतले जात असल्याची मार्च, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात गंभीर माहिती उघडकीस आलेली असणे, सदर को.-ऑप. सोसायटी राज्य शासनाच्या उप निबंधक कार्यालय, के. पूर्व विभाग यांच्या अधिपत्याखाली येत असणे, सोसायटीचे कार्यकारी मंडळ हे उपविधीतील तरतुदी व कायद्यातील तरतुदीनुसार कामकाज करीत असणे, सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ३२ मधील तरतुदीनुसार मागितलेली माहिती उपलब्ध करून दिली जात नसणे, मागील चार वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल देण्यास टाळाटाळ केली जात असणे, कार्यकारी मंडळातील सदस्यांनी कायद्यातील तरतुदीचे तसेच उपविधीचे उल्लंघन करून कर्जे घेतलेली असणे, संस्थेच्या कायद्यामध्ये नियम, करार याबाबत पारदर्शकता नसल्याने संस्थेच्या प्रशासकीय खर्चात वाढ झालेली असणे, लेखापरिक्षकाच्या संगनमताने आर्थिक फुगवटा दाखविला जात असणे, संस्थेने वाटप केलेल्या ग्राहक कर्ज वाटपामध्ये आर्थिक गैरव्यवहार केलेला असून प्रत्यक्ष वस्तुंच्या बाजारभाव तसेच घाऊक बाजारभाव यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असणे, खरेदी-विक्री व्यवहारामध्ये संगनमताने भ्रष्टाचार झालेला असणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले संरक्षण, सदर संशयास्पद प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सभासदांनी मा. मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री, मा. सहकार राज्यमंत्री तसेच जिल्हा उपनिबंधक, बांद्रा, मुंबई यांचेकडे दिनांक ९ मार्च २०१७ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे	दिनांक ६ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सोसायटीच्या सभासदांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदर संशयास्पद प्रकरणी सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

४० १०८५ **सर्वश्री संजय दत्त व इतर वि. प. स.** दिनांक ७ एप्रिल २०१७ चर्चा झाली.

"नवी मुंबई मधील खारघर येथे दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी डीएनए वृत्तपत्राचे पत्रकार सुधीर सूर्यवंशी यांच्यावर अज्ञान व्यक्तींकडून हॉकी व लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडणे, गेल्या काही दिवसात पत्रकार आणि व्हिडीओ जर्नलिस्ट यांच्यावर हल्ले आणि धमक्या देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या असणे, झी चोवीस तासचे संपादक डॉ. उदय निरगुडकर, साप्ताहिक राजसत्ताचे संपादक वसंत माने, पत्रकार संजय गिरी, विनोद यादव, संदिप भारती, स्वाती नाईक, सुधीर सुर्यवंशी यांच्या बाबतीत या घटना घडल्या असणे, सुर्यवंशी, नाईक, भारती आणि गिरी यांच्यावर तर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, टी. व्ही. जर्नलिस्ट असोसिएशन या सर्व घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीही सरकारकडे करण्यात येणे, माध्यमांचा प्रभाव वाढत असताना पत्रकारांना त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार काम करू न देणे हे लोकशाहीला घातक ठरणार असणे, लोकशाही अधिक सक्षमपणे राबवली जावी याची जबाबदारी सरकारची असणे, म्हणूनच पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा लवकरात लवकर आणून लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करावी अशी अपेक्षा सरकारकडून करण्यात यावी अशी पत्रकारांची मागणी असणे, पत्रकारांवर वारंवार हल्ले होत आहेत ही गंभीर बाब असणे, पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांना विशेष संरक्षण मिळावे आणि त्याकरिता कायदा करण्याची खूप वर्षापासूनची मागणी असणे, सन २०१६ या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्रकारांना संरक्षण देणे, पेन्शन देणे, घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा. मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकांरावरील होणारे हल्ले

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रोखण्याबाबत कायद्यात तरतूद करण्यात येईल, पेन्शन आणि घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्यात येईल असे आश्वासन देणे, परंतू दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न येणे, पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, पेन्शन सुरू करावी अशा अनेक मागण्या प्रलंबित असणे, पत्रकारांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत असताना त्यांच्या सुरक्षितेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, राज्यातील पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासन अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्यामुळे सरकारने वेळोवेळी पत्रकारांसाठी कायदा आणू असे दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "		
४१	१५९७	**सर्वश्री अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** "शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होवू नये म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यावरण नियम व कायद्यानुसार प्रत्येक बीटी कॉटन बियाणांच्या ४५० ग्रॅम पिशवी सोबत १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणे विक्री करणे बंधनकारक असणे, कायदा आणि नियम धाब्यावर बसवून राज्यात बीटी बियाणांसोबत नॉन बीटी ऐवजी १२० ग्रॅम बीटी बियाणांची विक्री करण्यात येणे, यामुळे राज्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, बीटी बियाणांसोबत दिल्या जाणाऱ्या १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणांची तपासणी नुकतीच नंदूरबार येथे शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर करण्यात येणे, तपासणीमध्ये हे बियाणे बीटी बियाणे असल्याचे सिद्ध होणे, या संदर्भात दाखल तक्रारीवरून राज्यात कृषी अधिकाऱ्यांनी बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कोणतीही कारवाई न करणे, या बाबतच्या तक्रारी आणि त्यावरील अपीले मोठ्या प्रमाणावर प्रलंबित	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

ठेवून अधिकारी आणि कंपनी यांच्या आर्थिक संगनमताने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे, अनेक ठिकाणी बियाणांप्रमाणे बोगस रासायनिक खते विक्रीचेही प्रकार उघडकीस येणे, नुकतीच हिंगोली येथे शेतकऱ्यांच्या दबावापोटी खताचा नमुना प्रयोगशाळेत तपासला असता त्यामध्ये माती असल्याचे सिद्ध होणे, अधिकाऱ्यांकडून या बाबत कारवाई होत. नसल्यामुळे बोगस आणि बनावट खत विक्रीला चालना मिळणे, बायो पेस्टीसाईड्सच्या नावाखाली शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करून चायनामेड बोगस औषधांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असणे, जैविक औषधांच्या नावाखाली रासायनिक किटकनाशकांची विक्री मोठ्या प्रमाणावर राज्यभर होत असणे, बुटीवार, जि. नागपूर येथे याबाबत नुकताच गुन्हा दाखल होणे, प्रकरणातील दोषींविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी करणे, बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या विक्रीवर निर्बंध आणुन यासंदर्भात कडक कायदा करण्याची मागणी शेतकऱ्यांमधुन करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया. ”

४२	४२३	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.**	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

“मुंबईसह रायगड किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना उपचारासाठी अनेकदा मुंबईत यावे लागते हे लक्षात घेऊन त्यांचा वेळ वाचावा या हेतूने प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरू करण्याचा महाराष्ट्र सागरी मंडळाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक २३ जानेवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये तसेच तज्ञ डॉक्टरही असतील अशी तरतूद असणे, काही वर्षांपूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडी किनाऱ्यावरील नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरू केली असणे, डॉक्टर बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरू करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तयार केलेला असणे, परंतु या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने जनहित लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजुरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
४३	२७५	**आर्कि. अनंत गाडगीळ, वि. प. स.** "मुंबई शहरामध्ये नव्या इमारती उभ्या राहणे, त्याचप्रमाणे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी केली जाणे, इमारत पूर्ण होण्यापूर्वी भोगवटा पत्र विकासकाकडून प्राप्त करणे आवश्यक असणे, तथापि बहुसंख्य इमारतींमध्ये सदर नियमांचे पालन न होणे, यांवर गेल्या वर्षी मुंबई न्यायालयाने काही महापालिका अभियंत्यांवर एफ. आय. आर. दाखल करण्याचे निर्देश देणे, यामुळे इतर वार्डमधील संबंधित मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अशा रहिवाशांना जागा खाली करण्याचे आदेश बजावणे, संबंधित विकासकांनी रहिवाशांची भाडी मध्येच बंद करणे, अशा रहिवाशांना बेघर होण्याची पाळी येणे, यामध्ये ना विकासक ना पालिका अधिकारी यांच्यावर कारवाई होणे, उलट रहिवाशांना अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागणे, मुंबईतील असंख्य नव्या इमारतींमधून सदर प्रश्न उपस्थित झाल्याने त्यास गंभीर स्वरूप येणे, यामुळे शासनाबद्दल जनतेत पसरलेला रोष व नाराजी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
४४	१६२९	**श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि. प. स.** "रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ब्रिटीश कालीन सायबाच्या धरणाची सध्या मोठ्या प्रमाणात जीर्णावस्था झालेली असून या धरणातून वारंवार पाणी गळती सुरू होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, नगरपरिषदेकडून	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

वारंवार दुरूस्ती होत असून पाणी गळती थांबलेली नसणे, नगरपरिषदेने या धरणाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले असता दुरूस्ती शक्य नसल्याचा अहवाल येणे, धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असणे, त्यामुळे अतिवृष्टीने पाण्याच्या प्रवाहामुळे धरण फुटल्यास राजापुर शहराच्या बाजार पेठेत पुराचे पाणी जाऊन मोठे आर्थिक नुकसान व जिवित हानी होण्याची शक्यता निर्माण होणे, दुर्घटनेमुळे शहराला होणारा धोका टाळण्यासाठी तसेच राजापूर शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी या ब्रिटीशकालीन सायबाच्या धरणाला पर्यायी नवीन धरण बांधण्याची होत असलेली मागणी, या मागणीनुसार धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असूनही कार्यवाहीसाठी होत असलेला विलंब, शासनाने तातडीने नवीन धरण बांधण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

४५	१६२८	**श्री. गिरीशचंद्र व्यास व इतर वि. प. स.**	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

“राज्यातील “अ” वर्ग महानगरपालिका अस्तित्वात असून त्यांचे सेवाशर्तीकरिता विशिष्ट अधिनियम असणे, मुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिका एकाच अधिनियमाच्या कक्षेत येत असल्याने त्यात काम करणारे कर्मचारी / अधिकारी सेवेत दाखल झाल्यापासून त्या त्या महानगरपालीकेत निवृत्त होत असणे, दोषी कर्मचारी / अधिकाऱ्यांविरूद्ध प्रशासकीय कारवाई म्हणून बदली करता येत नसल्याकारणास्तव सेवेतून काढण्याखेरीज आयुक्तांना पर्याय देखील उपलब्ध नसणे व राजकीय दबावापोटी असे प्रस्ताव देखील महासभेतच नामंजूर होत असणे, वर्षानुवर्षे एकाच महानगरपालिकेत काम केल्यामुळे ठराविक अधिकारी / कर्मचारी यांचा प्रशासनावर पूर्णपणे ताबा होऊन गैरकामांना गती मिळत असणे, त्यातच मोठमोठ्या उद्योजकांशी हितसंबंध वाढल्याने गैरमार्गाने बेहिशोबी मालमत्ता वाढण्यास देखील मदत होत असून अधिकाऱ्यांची मुजोरीदेखील वाढत असल्याची निदर्शनास आलेली बाब, त्यामुळे या भ्रष्टाचारास प्रतिबंध करताना शासनास येत असलेले अपयश, त्यामुळे “अ” वर्ग महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		यांची अन्य महानगरपालिकांमध्ये समकक्ष पदावर बदली करण्याबाबतची तरतूद करून ती तात्काळ अंमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
४६	१५८६	**श्री. रामनिवास सिंह, वि. प. स.** "मुंबईतील पवई येथील हिरानंदानी, स्वामीनारायण मंदिर ते कैलाश कॉम्पलेक्स येथील सुरू असलेल्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरप्रकार, व निकृष्ट दर्जाचे काम सुरू असल्याचे नुकतेच माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू रस्त्याचे काँक्रिटीकरण महापालिकेच्या सेंट्रल एजन्सीद्वारे करण्यात येणार असून त्याकरिता सुमारे ९ कोटी ६२ लाख १३ हजार इतका खर्च होणार असून सदर कामाकरिता दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर मे. प्राईम सिव्हील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना सदर रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे कंत्राट देण्यात येणे, त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम देखील सुरू होते. परंतु, रस्त्याच्या पूर्व दिशेला रस्त्यामध्ये अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण होत असल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक नागरिकांना काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याचे भासवून कंत्राटदार महापालिका, शासन तसेच नागरिकांची करीत असलेली फसवणूक, अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण केल्यामुळे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन येत्या पावसाळ्यात रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याची निर्माण झालेली भिती, परिणामी या रस्त्यांवर अपघातामध्ये वाढ होण्याची शक्यता, सदर प्रकरणी वेळीच होत असलेल्या निकृष्ट कामाला आळा बसावा याकरिता सदर कामाची तातडीने सखोल चौकशी करावी व दोषी कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

४७	१३७७	**प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.** "सिंधु एज्युकेशन सोसायटी, नागपूर या संस्थेद्वारा संचलित महात्मा गांधी शाळा जरीपटका, नागपूरचे अध्यक्ष श्रीमती विणी बजाज आणि सचिव दिपक बजाज यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग नागपूरने दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी धाड टाकून प्रचंड प्रमाणात बेहिशोबी रक्कम जप्त करणे, श्री. दिपक बजाज यांना नोव्हेंबर, २०१५ मध्ये अटक करून कारागृहात ठेवले असणे, विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळखंडोबा केल्याचा गंभीर गुन्हा असल्याने मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात वारंवार जामीन प्राप्तीसाठी केलेले अर्ज फेटाळण्यात येणे, राज्य शासनाने या आरोपींची संपत्ती जप्त करण्याची परवानगी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, नागपूर यांस दिली असूनही भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने जप्तीची कारवाई न करणे, शिक्षण विभागाच्या संगनमताने केलेला भ्रष्टाचार, विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाबाबत श्री. दिपक बजाज यांची मुलगी श्रीमती दिप्ती बजाज यांचेवर ए. सी. बी. ने पुरवणी आरोपपत्र दाखल करून देखील त्यांचेवर कारवाई न करणे, एवढे भ्रष्टाचार करणाऱ्या सिंधु एज्युकेशन सोसायटी विरूद्ध धर्मादाय आयुक्त नागपूरने कोणतीही दखलपात्र कारवाई न करणे, सिंधु एज्युकेशन सोसायटीद्वारा केलेला व करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने प्रशासकांची नियुक्ती न करणे, या सर्व कारवाईस होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
४८	१६४३	**सर्वश्री सुनिल तटकरे व इतर वि. प. स.** "रोहा हे रायगड जिल्ह्यातील एक प्रमुख शहर असणे, गतवर्षीच रोहा-अष्टमी नगरपरिषदेने आपला शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा केलेला असणे, रोहा-अष्टमी शहराला सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा असणे, पर्यटन व औद्योगिकदृष्ट्या हे शहर विकसित होत असणे, वाढत्या लोकसंख्येला रोहा-अष्टमी नगरपरिषद योग्य सोईसुविधा देत असणे, याचबरोबर शहरात सांस्कृतिक व पर्यटन वाढण्यासाठी नगरपरिषदेमार्फत	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)

प्रयत्न करण्यात येत असणे, याच धर्तीवर रोहा शहरात प्राचीन असलेल्या अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचे सुशोभिकरण करून त्यावर पर्यटन व्यवसाय वाढीसाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न सुरू असणे, यासाठी शासनाकडून वैशिष्टयपूर्ण बाबीसाठी मंजूर असलेले अनुदान गेल्या दोन वर्षापासून उपलब्ध असणे, मात्र जिल्हा प्रशासन या प्रकल्पाच्या मंजुरीविषयी उदासिन असणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेमार्फत तलावाचे सुशोभिकरण, संरक्षक भिंत , बाग-बगीचा करणे, मिनी ट्रेन, बोटींग क्लब, विक्रेते स्टॉल आदी प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेले असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार या प्रस्तावास मंजुरी मिळणे विषयी विनंती केलेली असणे, जिल्हा प्रशासनाने मात्र वेळोवेळी त्यामध्ये त्रुटी काढून प्रस्ताव मंजुरीमध्ये उदासिनता दाखविणे, रोहा-अष्टमी नगरपरिषद शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना त्याचवर्षी या प्रकल्पाची सुरूवात व्हावी अशी स्थानिक नागरिकांची इच्छा असणे, तद्नंतर प्रशासनाने प्रस्तावात बदल करून नव्याने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याविषयी नगरपरिषदेस सुचित करणे, यामध्ये वेळेचा अपव्यय झालेला असणे, शासनामार्फत निधी उपलब्ध झालेला असताना सुद्धा केवळ तांत्रिक बाबींमुळे हा प्रकल्प मंजुरीसाठी रखडलेला असणे, म्हसळा नगरपंचायतीस नगरोत्थान कार्यक्रमाअंतर्गत या वर्षी एक कोटी पंच्याहत्तर लाख इतका निधी उपलब्ध झालेला असणे, सदर निधीचा जिल्हा प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे अद्याप विनियोग झालेला नसणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेने नव्याने अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचा रु. एक कोटी बत्तीस लाख रकमेचा सविस्तर प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेला असणे, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने या प्रकल्पास त्वरित मंजुरी देऊन प्रकल्प सुरू करण्याची स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधी कडून होत असलेली मागणी, गेल्या वर्षभरापासून प्रकल्प मंजूर न झाल्याने स्थानिक

नागरीकांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, प्रकल्पास त्वरित मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

४९	७८	**सर्वश्री दत्तात्रय सावंत व इतर वि. प. स.** “राज्यात गेल्या १५ वर्षापासून विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांवर सुमारे ३०,००० शिक्षक कार्यरत असणे, या शाळा व वर्ग तुकड्या दिनांक १ जुलै २०१६ व दिनांक २ जुलै २०१६ रोजी अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात येणे, राज्यात दिनांक १९ सप्टेंबर २०१६ च्या शासन आदेशाने सुमारे १९,२४७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लागणे, त्यामुळे या शिक्षकांच्या मनात शासनाविषयी आनंदाचे वातावरण निर्माण होणे, असे असताना सदर शिक्षकांना वेतन देत असताना दिनांक १ जुलै २०१६ व दिनांक २ जुलै २०१६ रोजी अनुदानास पात्र झालेल्या शाळांचा समावेश न करणे, त्यामुळे सदर शिक्षकांना आजही विनावेतन काम करावे लागत असणे, तसेच मंत्रालय स्तरावर विविध क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून आलेल्या शाळा व वर्ग तुकड्या अनुदानास पात्र होण्याच्या प्रतिक्षेत असणे, सदर शाळा व वर्ग तुकड्या घोषित करण्यासाठी अर्थ विभागाच्या परवानगीची प्रतीक्षा करावी लागणे, सदर फाईल अर्थ विभाग, नियोजन विभाग, शिक्षण विभाग अशी मंत्रालयात वारंवार फिरत असणे, त्यामुळे या शिक्षकांच्या मनामध्ये शासनाविषयी असंतोषाचे वातावरण पसरणे, दिनांक १ जुलै २०१६ व दिनांक २ जुलै २०१६ रोजी पात्र झालेल्या शाळासहित निधी मंजूर करण्याबाबत शिक्षक संघटनाकडून वारंवार मागणी करण्यात येणे, गेली १५ वर्षे विनावेतन कार्य करीत असणाऱ्या शिक्षकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका. ”	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
५०	३०१	**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि. प. स.** “मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २४ नोव्हेंबर २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार नव्या बाल न्याय अधिनियमानुसार राज्य शासनाने काराची	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नियमावली ग्राह्य मानून राज्याने दत्तक विधानासंदर्भात राज्याला सुकर होतील अशी प्रक्रिया करणे अपेक्षित असणे, तथापि दत्तक घेतली जाणारी मुले ही वस्तू नसून व्यक्ती आहेत, त्यांचे ऑनलाईन प्रक्रियेद्वारा वस्तुकरण होता कामा नये, ही दत्तक विधान क्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांची मागणी "कारा" ने जाहीर केलेल्या नव्या नियमावलीमध्ये धुडकावून लावली असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, मुलाला देशात वा देशाबाहेर दत्तक जाण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रीतसर दत्तक नोंदणी करणे अपेक्षित असणे, तथापि नव्या नियमावलीमध्ये उपरोक्त अवधित सुकर सुविधा देण्यात न येणे, सदर महिन्यांच्या निरिक्षणानंतर बालकांच्या दत्तक विधानाचा स्थायी आदेश होणे, तसेच परदेशात मूल पाठविल्यानंतर जर ते त्या वातावरणात रमले नाही किंवा पालकांकडून योग्य वागणूक मिळत नसेल तर त्याला भारतात पुन्हा येण्याची सुकर सुविधा नव्या नियमावलीमध्ये नसणे, त्यामुळे स्वतःच्या भावना व्यक्त करण्यास असमर्थ असलेल्या लहान मुलांचे काय? हा प्रश्न अनुत्तरीत राहणे, मुल दत्तक दिल्यानंतर यासंदर्भात सामाजिक संस्थांचा सहभाग नव्या नियमावलीतून काढून टाकण्यात येणे, तसेच नव्या घरात मूल रमले नाही, आजारी पडले तर मुलाला कशाप्रकारे समजून घ्यावे याबाबतची माहिती नव्या नियमावलीत नसणे, त्यामुळे दिनांक १७ जानेवारी २०१७ पासून लागू झालेल्या या नियमावलीमध्ये राज्यातील मुलांच्या गरजांचा विचार करून महत्त्वाचे बदल करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाच्या उपाययोजना, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. "		
५१	११३४	**सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "महाराष्ट्राच्या २२ सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण व संगणकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतलेला असणे, यात सीमा तपासणी	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

नाक्यांवर विहित कायदे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे विहित मर्यादेपेक्षा अधिक वजनाच्या माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करणे, अतिरिक्त भाराप्रमाणे ठरवून दिलेले दंड व शुल्क आकारणे, अतिरिक्त वजनाच्या मालाचे अनलोडींग / लोडींग करणे यासारख्या बाबी अंतर्गत असणे, या संदर्भात लोडींग, अनलोडींग, साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणेसाठी एम. बी. सी. पी. एन. एल सोबत सवलत करारनामा करण्यात आलेला असणे, त्याकरिता आकारावयाचे विहित शुल्क निर्धारित केलेले असणे, तथापि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त भाराच्या वाहनांवर कारवाई न केल्यामुळे या प्रकरणी कंपनीचे शुल्कापोटी गत दोन ते तीन वर्षांत ६४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत तसेच असे शुल्क शासनास प्राप्त व्हावयाच्या दंड आकरणीच्या मानाने अत्यल्प असल्याने शासनाच्या महसूलाची सुमारे २,००० ते ३,००० कोटी रुपयांची हानी झालेली असल्याबाबतचा अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी परिवहन विभागात सादर केलेला असणे, या प्रकरणी हजारो कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत येण्याऐवजी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या खिशात जाऊन हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असल्याची शक्यता, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

५२ १४५६ **श्री. चंदूभाई पटेल, वि. प. स.** दिनांक ७ एप्रिल २०१७ चर्चा झाली.

"मे. पटेल नारायणदास फर्टीलायझर प्रा. लि., जळगाव या कंपनीने रासायनिक खतांची (सिंगल सुपर फॉस्पेट) खोटे दस्तऐवज व बिल तयार करून अनेक वर्षांपासून शासनाकडून करोडो रुपयांचे अनुदानाची रक्कम घेऊन शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात महाराष्ट्रातील लातूर-उस्मानाबाद-माजलगाव, बीड, केज, पाटोदा, मंगळूरपीर, धामणगांवरेल्वे, अमरावती, संगमनेर, जळगाव, मालेगांव या निरनिराळ्या गावात व शहरात कृषी निरीक्षक व संबंधित अधिकारी यांनी गुन्हे दाखल केलेले असणे, सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरणे, शासनाने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		याप्रकरणी चौकशी करून या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व संबंधित कंपनीकडून शासनाच्या झालेल्या फसवणुकी प्रकरणी घेण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. "		
५३	३०२	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "मुंबई-पुणे एक्सप्रेस-वेच्या लगत असलेल्या महाराष्ट्र विकास रस्ते महामंडळाच्या मालकीच्या सुमारे आठ सुविधा भूखंडांच्या वाटपामध्ये व निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे शासनाचे २,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे झालेले नुकसान, सहा विविध कंपन्यांनी सुविधा भूखंडांसाठी दिलेल्या २,००० कोटी रुपयांच्या मंडळासाठी फायदेशीर निविदा २०१५ सालामध्ये साधारण कारणाविना रद्द करण्याचा झालेला प्रकार, दुसरीकडे केवळ १० कोटी ४१ लाख रुपयांमध्ये ९. ५० हेक्टरचे दोन भूखंड ट्रक टर्मिनसकरिता ३० वर्षांच्या मुदतीने निविदेच्या अटी पायदळी तुडवून ठेकेदाराच्या नावे वर्ग करण्याचा झालेला गैरप्रकार, ट्रक टर्मिनससाठी वाटप केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राचा वाटप ठेकेदाराकडून होत असल्याचा व अनामत रकमा मुदत संपल्यानंतरही जमा केल्या नसल्याने महामंडळाकडून झालेला कानाडोळा, शासनाच्या विविध स्तरांवर तक्रारी केल्यानंतरही आणि महालेखापालांनी आक्षेप घेऊनही याप्रकरणी ठोस कठोर कारवाई करण्याकडे शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, याबाबत राज्यशासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.
५४	११९	**सर्वश्री प्रकाश गजभिये व इतर वि. प. स.** "मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन दोन वर्ष उलटून गेली तरी अजून मिलची जमीन राज्य सरकारच्या ताब्यात आली नसणे, इंदू मिल जमिनीच्या हस्तांतरणाचा प्रश्न प्रलंबित असणे, सदरील जमीन राज्य	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

शासनाच्या ताब्यात नसल्याने या जमिनीवर कोणतेच बांधकाम व इतर कामे होणार नसणे, राज्यशासनाने सदरील जागा ताब्यात न घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिल येथे भूमिपूजन केल्याच्या घटनेमुळे आंबेडकर प्रेमी जनता व सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करणारी असल्याने राज्यशासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी ताब्यात घेऊन प्रस्तावित आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

५५	१३१८	**श्री. ख्वाजा बेग, वि. प. स.**	दिनांक ७ एप्रिल २०१७	चर्चा झाली.

“यवतमाळ जिल्ह्यातील काळ्या जमिनीत लांब पल्ल्याचा कापूस तयार करण्याची क्षमता असणे, त्यामुळे अनेक देशात जिल्ह्याचा कापूस जात असणे, परिणामी कापसाचे माहेरघर पांढऱ्या हिऱ्याचा जिल्हा, कॉटनसिटी बिरुदाबली जिल्ह्याला प्राप्त होणे, तसेच जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर २४ जिनिंग आणि प्रेसिंग सहकारी संस्था आहेत मात्र यातील काही व ठिकाणी जिनिंग तर काही ठिकाणी प्रेसिंगची व्यवस्था असणे त्याच सोबत जिल्ह्यात कापसाचे उत्पादन सर्वाधिक होत असल्याने शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळावा जिनिंग व प्रेसिंगची कामे एकत्र व्हावीत म्हणून जिल्ह्यात टेक्स्टाईल झोन उभारण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

५६	१६०३	**ॲड. निरंजन डावखरे, वि. प. स.**	दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवणेकरिता.	

“राज्यातील राज्य परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांकरिता दिनांक १ एप्रिल २०१६ पासून नवीन कामगार करार लागू करण्यात येणे, एस. टी. कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करावा, राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना शासनामध्ये विलिनीकरण करण्यात यावे, सद्यःस्थितीत सरळ सेवेअंतर्गत भरती झालेल्या वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांना सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत रुपये १५० इतके मानधन दिले जाते तर अधिकाऱ्यांना मूळ वेतनाइतके

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मानधन देण्यात येत असणे, त्यामुळे सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत अधिकाऱ्यांप्रमाणेच वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाइतके मानधन देण्यात यावे, इ. अन्य मागण्या मान्य करण्याबाबत विविध कामगार संघटनांनी शासनाकडे लेखी निवेदन माहे जानेवारी, २०१७ व त्यासुमारास सादर करणे, परंतु त्यानुषंगाने अद्यापि कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी राज्य परिवहन सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरणे, त्यामुळे संघटनांनी सादर केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
५७	४६१	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाचे कार्यकारी अभियंता श्री. दिपक भोसले व शहर अभियंता पी. के. उगले यांनी कंत्राटदाराकडून लाच घेतल्या प्रकरणाची व्हीडीओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर आयुक्तांनी नेमलेल्या चौकशी समितीने केलेल्या चौकशीत सदर अधिकारी दोषी आढळल्याने या अधिकाऱ्यांचे निलंबन केल्याची बाब उघडकीस येणे, शहर अभियंता पी. के. उगले यांना यापूर्वी अशाच एका प्रकरणी निलंबित करण्यात येऊन सुद्धा पुन्हा कामावर घेण्यात येणे, तरीही त्यांनी लाच घेणे बंद न करणे, कल्याण येथील बाजारपेठ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. घाडगे हे लाच स्वीकारत असल्याचे सी. डी. च्या माध्यमातून उघड झाल्यानंतर एसीबीने त्यांच्याविरोधात तात्काळ कारवाई करणे, परंतु दिपक भोसले व पी. के. उगले यांच्याविरोधात अद्यापि न झालेली कारवाई, अनेक कंत्राटदार व नागरिक तसेच विकासक यांनी प्रशासना पुढे या दोघांविरूद्ध अनेक पुरावे व माहिती सादर करावयाची असल्याने महानगरपालिका आयुक्तांनी चौकशी समितीला नागरिकांना भेटण्याकरिता एक दिवस उपलब्ध करून	कित्ता.	

द्यावा व या दोघांच्या गैरव्यवहार व भ्रष्टाचार प्रकरणी सखोल चौकशी करण्यास वेळ लागला तरीही या अधिकाऱ्यांना सहकार्य करणाऱ्या अन्य व्यक्तींची नावे उघडकीस येणे आवश्यक आहे, तसेच या दोघांच्या घर, व्यवसाय इ. मालमत्तांची तपासणी अद्यापी झाली नसल्याने ज्ञात स्वतःपेक्षा जास्त किती अवैद्य संपत्ती जमा केली याचा शोध पूर्णपणे घेणे आवश्यक असणे, शहर अभियंता पी. के. उगले यांची नाशिक शहर व जिल्ह्यात असलेली लाखो रूपयांची बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी अनेक पुरावे यापूर्वीच सादर करण्यात येऊनही त्याकडे करण्यात आलेले अक्षम्य, दुर्लक्ष, या दोघांचा कसून तपास करून यांना सहकार्य करणाऱ्या रॅकेटमध्ये अन्य सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे उघड होत नसल्याने व तपास आवश्यक त्या गतीने होण्याकरिता हा सर्व तपास पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत करण्यात यावा ही नागरिकांची मागणी मान्य होत नसल्याने कल्याण-डोंबीवली महानगरपालिकेतील लाखो करदात्यांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

५८ ४६ **श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** कित्ता.

"बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्यांच्या कामांमध्ये सुमारे ३५० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास पहिल्या फेरीचा सादर केलेला अहवाल, त्यात रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता होऊन सुमारे ३५२ कोटी रुपयांचा घोटाळा झालेला असल्याचे नमूद केलेले असणे, आणखी २०० रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आलेले असणे, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेत सन २०१२ ते २०१६ या कालावधीच्या सुमारास कचरा वाहून नेण्याच्या कामात सुमारे ९०० कोटी रुपयांचा घोटाळा झालेला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास उघडकीस आलेले असणे, याबाबतच्या चौकशीकडे होत असलेला

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		विलंब, त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नालेसफाईच्या कामात झालेल्या सुमारे २८० कोटी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहाराबाबत राजीव कुकनूर समितीचा अहवाल माहे डिसेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास महापालिका आयुक्तांना सादर करण्यात आलेला असणे, या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी कारवाई करण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाची प्रतिक्रिया व शासनाची करावयाची कारवाई. "		
५९	४७	**श्री. संजय दत्त, वि. प. स.**	कित्ता.	
		"नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जागतिक सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ होणार असणे, नवी मुंबईतील प्रलंबित आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचे काम जीव्हीके ही कंपनी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (मिआल) यांच्या भागीदारीतून २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असणे, या विमानतळ प्रकल्पाला पर्यावरणविषयक मान्यता घेण्याबाबत, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, जमिनीचा भराव ही कामे पूर्ण होण्यास विलंब या कारणास्तव सदरील कंपनीने माघार घेतल्याचे पुढे आले होते, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जागतिक सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ होणार असणे, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हवाई वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी याची निर्मितीची आवश्यकता असणे, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिवर्ष प्रवासी क्षमता ४० दशलक्षपर्यंत वाढण्याची शक्यता असणे, सन २०१३ वर्षात या क्षेत्रातील वाहतूक क्षमता १०० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष एवढी होणार असणे, त्यामुळे ६० दशलक्ष क्षमतेच्या नवी मुंबई विमानतळाची गरज निर्माण झाली असणे, नवी मुंबई येथे विमानतळ झाल्यास रोजगार आणि व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होणार असणे, राज्य शासनाने सदरील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत येणाऱ्या अडचणी दूर करून प्रकल्पाचे कामे		

लवकरात लवकर सुरू करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

६० ५८ **श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी शहरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी अनेक मेट्रो प्रकल्पांना देण्यात आलेली मान्यता, त्यापैकी काही मेट्रो प्रकल्पांचे मा. पंतप्रधानांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर २०१६ रोजी संपन्न झालेले भूमिपूजन, मात्र या प्रकल्पांच्या कामांसाठी लागणारा निधी, प्रकल्पांची कामे सुरू करण्याचा व त्यांच्या पूर्णत्वाचा कालावधी, आराखडे याबाबत संदिग्धता दिसून येणे, पुणे मेट्रो प्रकल्पाला मान्यता देण्यात आल्यानंतर व मा. पंतप्रधानांच्या हस्ते त्याचे भूमिपूजन झाल्यानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने कामांना दिलेली स्थगिती, इतर काही प्रकल्पांबाबतही शासकीय यंत्रणांकडून घेण्यात येत असलेले आक्षेप, यातून प्रशासकीय यंत्रणांकडून झालेला निष्काळजीपणा, असे आक्षेप निर्माण झाल्यास प्रकल्पांच्या कामांमध्ये अडथळा निर्माण होण्याची असलेली शक्यता, त्यामुळे याबाबत त्वरित आढावा घेऊन सर्व प्रकल्पांमध्ये काही त्रुटी असल्यास त्या दूर करण्याची आवश्यकता, प्रकल्पनिहाय लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार, प्रकल्पांचे आराखडे, कामाचा कालावधी इत्यादी बाबींची स्पष्टता करण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया. "

६१ ७६ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यशासनाने महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटी शहरांच्या तिसऱ्या यादीत ठाणे आणि कल्याण-डोंबिवली शहरांचा समावेश करण्यात येणे, राज्यशासनाने केलेल्या स्मार्ट सिटी शहरांच्या प्रकल्पांच्या विकासाच्या केलेल्या घोषणांनुसार सदरील प्रकल्पांवर प्रत्यक्ष कामांना सुरूवात झालेली नसणे, स्मार्ट सिटी उभारणाऱ्या कामांना गती न मिळण्याबाबत शासनाकडून कुठलेही स्पष्ट व्यक्त होत नसणे, स्मार्ट सिटीत निवड झालेल्या कल्याण-डोंबिवलीत पाच वर्षांत दोन हजार ३२ कोटींची विकासकामे केली जाणार असून राज्यातील स्मार्ट सिटीसाठी अमेरिकेतील जगप्रसिद्ध ओरॅकेल कंपनीशी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सामंजस्य करार केला जाणार असणे, कल्याण-डोंबिवली शहरात स्मार्ट सिटीच्या माध्यमातून कल्याण-डोंबिवली मधील मोठी संख्या असलेल्या जुन्या धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज असणे, आधारवाडी डंम्पिग ग्राऊंड प्रश्न तीव्र असून कल्याण-डोंबिवली रेल्वे स्थानकांची वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, रस्ते सुधारणा, जल-मल:निस्सारण, कचरा प्रकल्प, मोठ्या रस्त्यांची झालेली दुर्दशा वाढती वाहतूक कोंडी, कंपनीच्या प्रदुषणांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, झोपडपट्टी सुधारणा, आपत्ती व्यवस्थापनेचा प्रश्न, प्रदूषण निर्मूलन आदी अनेक प्रशन स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या माध्यमातून तातडीने सोडविण्याची आवश्यकता, राज्यशासनातर्फे कल्याण-डोंबिवली येथे स्मार्ट सिटी उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाची तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. "		
६२	८६	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून २७ गावे वगळण्याबाबत राज्य शासनाने कोकण विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करण्यास सांगितले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, कोकण विभाग आयुक्तांनी २७ गावे महापालिकेतून वगळण्यात यावी अशी शिफारस शासनाला केलेली असणे, डोंबिवलीलगत असलेल्या २७ गावांची स्वतंत्र नगर परिषद करण्यात येईल असे आश्वासन निवडणुकीच्या काळात मा. मुख्यमंत्री महोदयांनी २७ गावांतील रहिवाशांना देण्यात येणे, या आश्वासनाला एक वर्ष पूर्ण होत असून अद्याप याविषयी कोणतीही ठोस पावले उचलली गेली नसल्याने २७ गावांतील नागरिक शासनावर नाराज असणे, यासंदर्भात डिसेंबर, २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रश्न विचारला असता या प्रश्नाला उत्तर देताना नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी कायदेशीर	किस्ता.	

प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नोटीफिकेशन काढून त्यावर हरकती व सूचना मागविण्यात येऊन त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन देण्यात येणे, कल्याण-डोंबिवली महापालिकेतून २७ गावे वगळण्याबाबत राज्य सरकारने कोकण विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करण्यास सांगणे, त्यानुसार कोकण विभाग आयुक्तांनी महापालिकेतून वगळण्यात यावी अशी शिफारस केली असून राज्य शासनाकडे सदरील प्रश्न प्रलंबित असणे, शासन या संदर्भात निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असणे, या गावांमधील दैनंदिन कामकाजाची घडी महापालिकेस नीट बसवता आलेली नसणे, मालमत्ता कराच्या बिलावरुन रहिवाशांमध्ये संभ्रम असणे, मालमत्ता कराचा बिलांचा भरणा ग्रामीण भागातील रहिवाशी तयार नसणे, डोंबिवली-कल्याण महापालिकेत समावेश केलेल्या २७ गावांना आवश्यक ते महापालिकेकडून सोयीसुविधा मिळत नसल्याने स्वतंत्र नगर परिषद करण्याची मागणीला जोर पकड असणे, शासनाकडून आश्वासन मिळून त्यांची अंमलबजावणी करण्यास विलंब लावीत असल्याने राज्य शासनाच्या विरोधात २७ गावातील रहिवांशाने आक्रमकतेचा पवित्रा घेऊन रस्ता रोको, उपोषणाचा घेण्यात आलेला निर्णय, राज्य शासनाने डोंबिवली लगत असलेल्या २७ गावांना स्वतंत्र नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

६३ ८८ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील आरे कॉलनीत मुंबई मेट्रो-थ्री च्या कार डेपोचा एकमेव प्रकल्प उभा राहणार असणे, सदरील कार डोपो उभारणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने डेपोबरोबरच त्याच जागेवर टोलेजंग निवासी टॉवर्स आणि व्यावसायिक संकुले उभी करण्यासाठी राज्य सरकारकडे ३ एफएसआयची मागणी करण्यात येणे, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने तीन एफएसआयची मागणी केल्यानंतर राज्य सरकारने त्यावर हरकती आणि सूचना मागविण्यात येणे, आरेचा भूखंड बिल्डरांच्या घशात घालून मुंबईकरांचा एकमेव ऑक्सिजन म्हणून ओळखलेल्या जागेवरच डाका टाकण्याचा मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा डाव असल्याचे उघड होणे, राज्य

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सरकारने मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन ची तीन एफएसआयची मागणी मंजूर झाल्यास बिल्डरांचा त्याचा फायदा होणार असल्याने शासनाच्या या निर्णयाबाबत जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्य शासनाने आरेचा भूखंड बिल्डरांच्या घशात घालू नये याबाबत तातडीने करावयाची शासनाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "		
६४	१०७	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मुंबई महापालिकेने नरिमन पॉईंट ते मालाड-मार्वेपर्यंत पश्चिम बाजूस समुद्र किनारपट्टीलगत काही भागात भराव टाकून रस्ता बांधणे, काही भागात पूल व उन्नत मार्ग, काही भागात बोगदे यांचा समावेश असलेल्याक ३५.६० कि. मी. लांबीचा समुद्रकिनारी मुक्त मार्ग (कोस्टल रोड) बांधण्याचा घेण्यात आलेला निर्णय, नरिमन पॉईंट ते मालाड मार्वे.पर्यंत समुद्र किनारी रस्ता प्रकल्पासाठी तांत्रिक सल्ल्यासाठी नियुक्त केलेल्या स्टूप कन्सल्टंट या सल्लागार कंपनीने केलेली भूगर्भ तपासणी आंतरराष्ट्रीय मान्यतेनुसार केलेली नसल्याने त्यामुळे पुन्हा एकदा भूगर्भ तपासणीसाठी सल्लागारांची निवड करण्याची वेळ महापालिकेवर आलेली वेळ, सदरील सल्लागार समितीवर महापालिकेने केलेला कोटयावधी रुपयांचा खर्च वाया जाणे, कोस्टल रोड प्रकल्पामुळे मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावरील ऐतिहासिक स्थळांच्या सौंदर्याला बाधा येत असल्याचा आक्षेप घेत हेरिटेज समितीने महापालिकेचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प फेटाळण्यात येणे, मुंबई सागरी किनारी रस्त्यासाठी विविध परवानगींची आवश्यकता असून नौदलाच्यावतीने या किनारी मार्गाला परवानगी प्राप्त झालेली असली तरी पर्यावरण आणि सीआरझेडची परवानगी अद्यापही मिळालेली नसणे, सदरील कोस्टल रोड तयार होण्यापूर्वी करोडो रुपये सल्लागार कंपनीवर खर्च करूनही कोस्टल रोड प्रकल्प उभारण्याबाबत कार्यवाही होण्यास	कित्ता.	

विलंब होत असल्याने जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण होणे, राज्य शासनाने सदरील महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. "

६५ ११४ **श्री. संजय दत्त, वि. प. स.** कित्ता.

"मुंबई शहरात २६ लाख ९५ हजार ४३५ वाहने रस्त्यावर धावत असल्याची नोंद असणे, मुंबईतील वाहन नोंदणीत दिवसेंदिवस वाढ होत असणे, वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण नसल्याने मुंबई शहराला वाहतूक कोंडी आणि पार्किंगसारख्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत असणे, पार्किंगसाठी सरकारी, खासगी कार्यालयाबरोबरच सोसायटयांमध्येही जागा शिल्लक न राहिल्याने रस्त्यावरील पार्किंगमध्ये प्रचंड वाढ होत असणे, सन २०१५ मध्ये नो पार्किंग झोनमध्ये कारवाई केलेल्या वाहनांची संख्या जवळपास ७ लाख ११ हजार ११३ अशी असणे, कारवाई पाहता पार्किंगचा मुद्दा किती महत्त्वाचा आहे ते दिसून येणे, पोलिसांकडून अनधिकृत पार्किंगवर सातत्याने कारवाई करून पार्किंगची समस्या जैसे थे परिस्थितीत असणे, दिवसेंदिवस मुंबई, उपनगर, ठाणे शहरातील पार्किंगच्या समस्या जठील होत असल्याने वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असणे, राज्यशासनाने मुंबईतील पार्किंग समस्या सोडविण्यासाठी धोरण आखून पार्किंग समस्या सोडविण्याकरिता करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. "

६६ १२७ **श्री. नारायण राणे व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील मेट्रो -३ प्रकल्पासाठी वृक्षतोडीबाबत, तोडण्यात येत असलेल्या झाडांची यादी बनविताना त्या झाडाचे वय, झाडाचा प्रकार, बुंध्याचा घेर इत्यादींची माहिती चुकीची असून जाणीवपूर्वक फेरफार केल्याचे दिसून येणे, मेट्रोचा आराखड्याप्रमाणे ५ हजार झाडे तोडण्यात येणार असून काही दिवसांत १०० हून अधिक झाडे तोडण्यात येणे, या वृक्षतोडीला उच्च न्यायालयाने कडाडून विरोध केला असून मुंबईला महत्त्वाकांक्षी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मेट्रो प्रकल्प रखडणार असल्याने सर्वसाधारण जनतेमध्ये पसरलेली नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून यावर उपाययोजना करण्याची निव्वांत आवश्यकता व याबाबत शास्नाची प्रतिक्रिया. "		
६७	१३९	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "मुंबईतील कांदिवली पूर्व येथे ठाकूर कॉम्प्लेक्स मधून वाहणाऱ्या पोयसर नदीच्या पात्रामध्येच बांधकाम सुरू असल्याचा माहे फेब्रुवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास उघडकीस आलेला प्रकार, ठाकूर कॉम्प्लेक्स येथील तिरुपती टॉवरच्या मागच्या बाजूने पोयसर नदीचा प्रवाह जात असून त्याठिकाणी भिंती तोडण्याचे आणि तिथे कॉंक्रीटीकरण करण्याचे सुरू असलेले काम, नदी पात्रात बांधकामाची परवानगी नसताना नदीच्या भिंतीचे कॉंक्रीटीकरण करण्यासोबतच नदीच्या तळाचेही कॉंक्रीटीकरण केले जात असल्याने नदीपात्रात झालेल्या या बांधकामामुळे पाणी झिरपायला जागाच उरणार नसल्यामुळे परिणामी थोड्या पावसातही पाणी पात्राबाहेर येऊन स्थानिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागणार असून पर्यावरणाचीही हानी होणार असल्याने या प्रकरणी सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
६८	१४२	**श्री. संजय दत्त, वि. प. स.** "मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सच्या भूखंडाचे नूतनीकरण रखडले असल्याची बाब निदर्शनास येणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भुभाग क्र. १ जे, महालक्ष्मी प्लॅट्स मालमत्ता हा सुमारे ८, ५५, १९८. ७८ चौ. मीटर (१०, २२, ८०६ चौ. वार) आकारमानाचा भूभाग दिनांक ०१.०६.१९१४ ते ३१. ०५. २०१३ या ९९ वर्षाच्या कालावधीकरीता अश्वशर्यती आणि त्यानुषंगाने येणाऱ्या बाबीच्या वापराकरिता मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ	कित्ता.	

क्लब लि. यांना मक्त्याने देण्यात येणे, सदर मक्ता करार दिनांक ३१.५.२०१३ रोजी संपुष्टात येणे, सदरील क्लबला मक्तात असलेली जागा ही ७० टक्के राज्य शासनाच्या मालकी असून उर्वरित ३० टक्के भुभाग महानगरपालिकेच्या मालकी असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गटनेत्यांच्या दिनांक १५ मे २०१३ च्या विषय क्र. ५ अन्वयेच्या ठरावान्वये रेसकोर्स असलेली जागा ही मुंबई शहराच्या महत्त्वाच्या ठिकाणी आहे म्हणून त्याठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचेथीम पार्क विकसित करण्याची आवश्यकता असल्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात येणे, मुंबईचे महापौर यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविलेल्या दिनांक १५. ४. २०१३ च्या पत्रान्वये या भूभागाच्या मक्त्याचे पुनश्च नुतनीकरण न करता सदर भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क विकसित करावे जेणे करून मुंबापुरीच्या सौंदर्यात भर पडेल आणि मुंबई शहर आरोग्याच्या दृष्टिने सुदृढ राहील याकरिता सदर भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्यान विकसित करण्याची विनंती करण्यात येणे, राज्य शासनाने त्वरित रेसकार्स जमिनीबाबत निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

६९ १६२ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

“मुंबई मधील मध्य रेल्वेमार्गावर डीसी-एसी विद्युत प्रवाहाचे परिवर्तन करण्यात अडथळा असलेला सॅण्डहर्स्ट रोड स्थानकातील हँकॉक पूल गेल्या वर्षी १० जानेवारी रोजी विशेष ब्लॉक घेऊन पाडण्यात येणे, पण त्या जागी नवीन पूल बांधण्याचे काम मुंबई महानगरपालिकेला एका वर्षात सुरू करता आलेले नसणे, गेल्या वर्षभरात सॅण्डहर्स्ट रोड रेल्वेमार्गावर स्थानक परिसरात रेल्वे रुळ ओलांडताना १८ जणांचा मृत्यू होऊनही पालिकेला जाग आलेली नसणे, सॅण्डहर्स्ट रोड स्थानक परिसरात रेल्वे लोहमार्ग पोलिसांच्या माहितीनुसार १८ जणांचा मृत्यू बहुतांश हे हँकॉक पुलाच्या ठिकाणीच झालेले असल्यानेही पूल बांधण्यासाठीची अत्यंत निकड लक्षात येत असणे, महापालिकेने सदरील पूल बांधण्याची जबाबदारी उचलेली असून परंतू एक वर्ष होऊन सदरील पूल बांधण्याबाबत पालिका

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		प्रशासनाकडून कोणती कार्यवाही होता दिसत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांचा अजून किती नाहक बळी दिला जाणार असल्याचा सवाल केला जात असणे, १८ बळींनंतरही सॅण्डहर्स्ट रोड स्थानकातील हँकॉक पूल अधांतरीत असल्याने जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने याप्रकरणी दखल घेऊन सॅण्डहर्स्ट रोड रेल्वेमार्गावर स्थानकात नव्या पुलाची उभारणी करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
७०	१७१	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "मुंबईचे आद्य शिल्पकार जगन्नाथ ऊर्फ नाना शंकर शेठ यांच्या स्मारकाचे भूमिपूजन दिनांक ३ ऑगस्ट २०१५ रोजी वडाळा येथे करण्यात येऊनही दीड वर्षात या स्मारकाबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या दरम्यान निदर्शनास येणे, या स्मारकासाठी अंदाजे २५ कोटी आवश्यकता असताना राज्य शासनाने व मुंबई महापालिकेने एका रुपयाची तरतूद न केल्याने निधीअभावी या स्मारकाचे काम रखडलेले असणे, राज्य शासनाने निवडणुकीत आश्वासन देऊनही दीड वर्षात काळात आश्वासनाची पूर्तता करण्यात न आल्याने मुंबईच्या जनतेमध्ये परसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने निधीची तरतूद करून नाना शंकरशेठ यांचे स्मारकाचे काम त्वरित पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
७१	१८४	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "मिरा-भाईंदर येथील बांधकाम व्यवसायिक श्यामसुंदर अग्रवाल व मुरलीधर अग्रवाल यांचेविरोधात ठाणे नगर पोलीस ठाण्यात मिनल गांधी यांनी केलेल्या तक्रारीनुसार शासनाच्या कमाल जमीन कायदा अंतर्गत जमिनीचे	कित्ता.	

बनावट कागदपत्रे तयार करून त्याद्वारे शासनाची १० ते १२ कोटी रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने श्यामसुंदर अग्रवाल व मुरलीधर अग्रवाल यांना अटक केल्याची बाब उघडकीस येणे, या प्रकरणी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील काही अधिकाऱ्यांच्या मदतीने यूएलसीचे बनावट प्रमाणपत्र तयार करून मिरा-भाईंदर म. न. पा. कडून बेकायदेशीररित्या बांधकाम परवानगी मिळविणे, जिल्हाधिकारी कार्यालय व म. न. पा. तील अधिकाऱ्यांनी या प्रमाणपत्राची सत्यता वेळीच न तपासल्याने तसेच वास्तुविशारद व शासकीय अधिकाऱ्यांनी या विकासकाला बेकायदेशीर कागदपत्रे तयार करण्यास केलेले सहकार्य, तरीही त्यांचे विरोधात पोलिसांनी कोणतीच कारवाई न करता फक्त विकासकावर कारवाई केल्यामुळे पोलिसांच्या भूमिकेबद्दल निर्माण झालेली शंका, जप्त केलेल्या कागदपत्रांबद्दल श्यामसुंदर अग्रवाल व मुरलीधर अग्रवाल हे पोलीस तपासात सहकार्य करीत नसतानाही त्यांचेविरूद्ध तसेच संबंधित दोषी शासकीय व वास्तूविशारद यांचेविरूद्ध कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न आल्यामुळे एकूणच या कार्यवाहीबद्दल जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, बोगस कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीर मिळविलेला जागेचा ताबा ठाणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने घेण्याबाबत कारवाईस विलंब होत असल्याने नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

७२ २०४ **ॲड. अनिल परब व इतर वि. प. स.** कित्ता.

“कल्याण-डोंबिवली शहराच्या सेक्टर-१ च्या मंजूर विकास योजनेमध्ये स. नं. १ हि. नं १ पै. क्षेत्र १०५२४.२२ चौ. मी. क्षेत्र आ. क्र. २० कम्युनिटी सेंटर करिता आरक्षित असणे, उक्त चौरस मिटर क्षेत्रापैकी ५२६२.११ चौ. मी क्षेत्र संबंधित जमीन मालक महानगरपालिकेस विनामुल्य हस्तांतरित करणार असल्याने उर्वरित क्षेत्र ५२६२.११ चौ. मी. क्षेत्र कलम ५० अन्वये आरक्षणातून वगळण्याचा ठराव पारित होणे, ५२६२.११ चौ. मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या नावे असल्याबाबत ७/१२ मध्ये नमूद

विवरण क्रमांक २१–चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असणे, उक्त आरक्षण वगळण्यात आलेल्या ५२६२.११ चौ. मी. क्षेत्रावर सन १९८० च्या मंजूर विकास योजनेमधील आ. क्र. २० कम्युनिटी सेंटर, व सन २००५ च्या मंजूर विकास योजनेनुसार आ. क. २७ आर्ट गॅलरी व म्युझियम आरक्षित असून सदर आरक्षण बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर विकसित करण्यास महानगरपालिकेच्या सभेने मंजूरी देऊन भूखंड विकसित करण्याकरिता मे. धनश्री डेव्हलपर्स यांच्याबरोबर करारनामा करणे, उक्त डेव्हलपर्सला दि. २६/०५/२००९ रोजी महापालिकेने आयओडी प्रदान करणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सदर भूखंडाचा बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर विकास करावयाचा असल्याने सदर आरक्षित जागेवर आर्ट गॅलरी अधिक दुकान केंद्र असा वापर प्रस्तावित असल्याने सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरिता पाठविण्यात येणे, विकासकाने दि २८/५/२०१५ रोजी शासनास पत्रव्यवहार करून आ. क्र. २० कॅम्युनिटी सेंटर याकरिता आर्ट गॅलरी व दुकान केंद्र असा वापर प्रस्तावित करून महानगरपालिकेने असलेल्या अधिकारात १५ टक्के चटई क्षेत्र निर्देशांक दिला असणे व उर्वरित ८५ टक्के चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे दि. २/६/२०१२ रोजी सादर केलेला असल्याने उपरोक्त राहिलेला चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात यावा ची केलेली मागणी, दि. ३/९/२००५ रोजी मंजूर झालेल्या सेक्टर-१ च्या मंजूर विकास योजनेमध्ये आ. क्र. २० आर्ट गॅलरी व म्युझियम हे आरक्षण स नं १/१ पै मौ. कल्याण या जमिनीवर प्रस्तावित असतांना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ६९ मधील तरतुदीनुसार आर्ट गॅलरी अधिक दुकान केंद्र हा वापर करण्याकरिता महानगरपालिकेने शासनाची मागितलेली परवानगी, तसेच विकासकाने ८५ टक्के चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास शासनाकडे मागितलेली परवानगी, महानगरपालिकेने आर्ट गॅलरी व		

म्युझियम आरक्षण असतांना दुकान केंद्र आरक्षण प्रस्तावित करतेवेळी एमआरटीपी ॲक्ट, १९६६ च्या कलम ३७ (१) ची अंमलबजावणी न करणे, आ. क्र. २० आर्ट गॅलरी व म्युझियमया आरक्षणात आर्ट गॅलरीसह प्रस्तावित केलेला दुकान केंद्र हा वापर मूळ आरक्षित वापराशी सुसगंत स्वरुपाचा नसल्याने याबाबत सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, उक्त आरक्षणाची चौकशी करून शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित दोषी व्यक्तीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका . ”

७३ २५० **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

“भिवंडी शहर महापालिकेच्या स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसुली विभागामध्ये गेल्या तीन वर्षात सुमारे दीड हजार कोटींचा घोटाळा झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, राज्य शासनाने जकात बंद केल्यानंतर दिनांक २० मे २०१३ पासून भिवंडी महापालिकेत एलबीटी वसुली प्रणाली सुरू करण्यात येणे, भिवडी शहरातील ११ हजार ७२० व्यापाऱ्यांचे सर्व्हेक्षण करून त्यांना एलबीटी कर भरण्याचे आवाहन करण्यात आले होते, मात्र शहरातील बहुसंख्य कर बुडव्या व्यापाऱ्यांनी पालिका प्रशासनाच्या प्रमुख अधिकाऱ्यांना हाताशी धरून दिशाभूल करणारी माहिती देऊन एलबीटी उत्पन्नाची आकडेवारी कमी देणे, त्यामुळे जानेवारी, २०१७ मध्ये ७५ लाख अशी अत्यंत कमी एलबीटीची वसुली होणे, वसुलीची आकडेवारी संशयास्पद असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले असता चौकशी अंती तीन वर्षात सुमारे दीड हजार कोटींचा एलबीटीमध्ये घोटाळा झाला असल्याचा संशय व्यक्त करण्यात येणे, पालिकेच्या अधिकाऱ्यांनी कमी प्रमाणात करवसुली केल्याचे उघड होणे, राज्यशासनाने भिवंडी महापालिकेच्या एलबीटी विभागात झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी सखोल चौकशी करून करचुकव्या व्यापारांविरोध करवसूल करून या प्रकरणांतील दोषींवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
७४	२७९	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "मुंबईत स्वतंत्र आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) उभारण्याचा निर्णय सुमारे वर्षभरापूर्वी घेण्यात आलेला असणे, त्याबातची घोषणाही मा. मुख्यमंत्री यांनी वर्षभरापूर्वी करून त्याबाबतच्या मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केलेला असणे, यासाठी मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात जागाही निश्चित केलेली असणे, मात्र केंद्र शासनाकडून मान्यता देण्यास लागलेला विलंब, याप्रकरणी पाठपुरावा करण्यात राज्य शासनास आलेले अपयश, या प्रकल्पासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात राखीव ठेवलेल्या जागेपैकी काही जागा केंद्र शासनाच्या अन्य प्रकल्पास देणे राज्य शासनास भाग पडलेले असणे, केंद्रीय राज्यमंत्री व मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक १८ जानेवारी २०१७ च्या सुमारास आयोजित बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) स्थापन करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, मात्र हे वित्तीय सेवा केंद्र मुंबईत स्वतंत्रपणे कार्यरत न ठेवता ते गुजरातमधील गिफ्टमध्ये सुरू होत असलेल्या आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राचे पूरक केंद्र म्हणून कार्यरत ठेवण्यात येणार असणे, त्यामुळे देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईचे पुढील काही वर्षात महत्त्व कमी होण्याची निर्माण झालेली भीती, राज्याचे यामुळे होणारे मोठ्या प्रमाणातील नुकसान, याबाबत फेरविचार करून मुंबईत स्वतंत्रपणे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारण्याची कार्यवाही करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		कित्ता.
७५	३६१	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "पुणे शहराच्या पूर्व भागासाठी ३८० कोटी १६ लाख रुपये खर्चाची भामा आसखेड पाणीपुरवठा योजना राबविण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय, सदर योजनेचे काम जानेवारी, २०१४ मध्ये सुरू केलेले असणे,		कित्ता.

योजनेचे काम जून, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित केलेला असणे, मात्र अद्यापही काम अपूर्णावस्थेत असणे, सुमारे तीन वर्षापूर्वी केंद्र शासनाने जेएनएनयूआरएम योजनेंतर्गत २५८ कोटी रुपयांचा मंजूर केलेला निधी, त्यापैकी १०६ कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेला केंद्र शासनाने दिलेला असणे, उर्वरित निधी मिळणे कामाच्या पूर्ततेवर अवलंबून असणे, विशिष्ट कालावधीत योजनेचे काम पूर्ण न झाल्यास निधी मिळण्यात उद्‌भवणाऱ्या अडचणी, परिणामी योजनेवर होणारा परिणाम, ऑक्टोबर, २०१५ पासून वर्षभर योजनेचे काम बंद असणे, आता मार्च, २०१७ अखेरपर्यंत कामे पूर्ण करण्यासाठी दिलेली वाढीव मुदत या मुदतीतही काम पूर्ण होणे अशक्य असणे, योजनेच काम रखडल्यामुळे आता १०० कोटी रुपयांचा भूर्दंड सोसावा लागण्याचा निर्माण झालेला प्रश्न, पुणे शहराच्या पूर्व भागातील पाणीपुरवठ्याचा असलेला गंभीर प्रश्न व योजनेची कामे पूर्ण करण्यात निर्माण झालेल्या अडचणी विचारात घेता शासनाने यात त्वरित लक्ष घालण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, यात दाखविण्यात येत असलेली अनास्था, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

७६ ३७६ **डॉ. अपूर्व हिरे व इतर वि. प. स.** कित्ता.

"नाशिक महानगरातील बांधकामे, तसेच विकासाबाबत होऊ घातलेली शहर, विकास नियंत्रण नियमावलीची चित्रफित अनधिकृतरित्या व्हायरल झाल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या नियमावलीतील ठळक तरतुदी प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्ध होणे, बहु प्रतिक्षेत शहर विकास नियंत्रण नियमावलीची प्रत काही बांधकाम व्यावसायिकांच्या हाती लागल्याची सार्वत्रिक चर्चा होणे, शासनाकडून रितसर मार्गाने उक्त शहर विकास नियंत्रण नियमावली प्रसिद्ध होण्याऐवजी ती अनधिकृतरित्या व्हायरल झाल्याने जनतेत तीव्र नाराजी व्यक्त केली जाणे, सदरील शहर विकास नियंत्रण नियमावली खरी नसून पूर्णतः खोटी असल्याचे स्पष्ट होणे, नियमावलीतील तरतुदीबाबत उलट सुलट

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		चर्चा होणे, जाणुन बुजून हेतुतः जनतेत संभ्रम पसरविला जाणे, या पार्श्वभुमीवर मा. मुख्यमंत्री तसेच मा. पालकमंत्री महोदयांनी याप्रकरणी पोलीस आयुक्त व मनपा आयुक्तांना चौकशीचे आदेश देणे, या गंभीर प्रश्नी शासनाने तात्काळ चौकशी होण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
७७	४०३	**श्री. जयंत पाटील, वि. प. स.** "उच्च शिक्षणाचे प्रमुख केंद्र म्हणून नवी मुंबईचा देशभर नाव लौकिक असणे, देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येणे, परंतु, ज्यांच्या जमिनीवर या संस्था उभ्या राहिल्या त्या प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मात्र उच्च शिक्षणाच्या फारसा लाभ न होणे, वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर शाखामध्ये पाच टक्के जागाही आरक्षित ठेवल्या जात नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणे, सिडकोने नवी मुंबईची उभारणी करताना शैक्षणिक सुविधांवर विशेष लक्ष दिलेले असणे, प्रत्येक नोड मध्ये प्राथमिक ते उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे, देशातील नामांकित शिक्षण संस्थांच्या शाखा या परिसरामध्ये सुरू असणे, एज्युकेशन हब म्हणून शहराला नावलौकिक प्राप्त झाला असणे, नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल व उरण परिसरातील सिडको क्षेत्रामध्ये तब्बल ५३९ शैक्षणिक संकुल असणे, यामधून जवळपास ३ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असणे, उच्च शिक्षण देणाऱ्या १२४ शैक्षणिक संस्था असून त्यामध्ये जवळपास १ लाख ४१ हजार ४८८ विद्यार्थी शिक्षण घेत असणे, वैद्यकीय, अभियांत्रिकी, फॅशन डिझायनिंग, व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र या शाखांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी प्रत्येक राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा सुरू असणे, या महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी दलालांचाही सुळसुळाट झालेला पाहावयास मिळणे, प्रवेशासाठी लाखो रूपये घेऊन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याच्याही अनेक घटना घडल्या	कित्ता.	

असणे, देशातील व राज्यातील अनेक राजकीय नेत्यांची मुलेही शिक्षणासाठी नवी मुंबईला प्राधान्य देत असणे, परंतु ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर या शैक्षणिक संस्था उभ्या आहेत त्या भूमिपूत्रांच्या मुलांना मात्र या संस्थांमध्ये सहज प्रवेश मिळत नसल्याने उच्च शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवले जात असणे, सबब याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना. "

७८ ४०७ **श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप, वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील पालिकेच्या नायर रुग्णालयात डोळ्या संबंधित शस्त्रक्रिया विभागात छतातून पाणीगळती सुरू असलयाचे दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या विभागात प्लॉस्टर तुटलेल्या स्थितीत असून बऱ्याच दिवसांपासून ही समस्या असणे, या रुग्णालयात डोळ्यांवर उपचार करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्याही मोठी असणे, परंतु यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात अडचणी येत असणे, तसेच शेड्युलमध्ये असलेल्या शस्त्रक्रियांचा तारखाही पुढे ढकलण्यात येत असणे, याचा रुग्णांना नाहक त्रास होत असणे, डोळ्यांची शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना कुठल्याही प्रकारचा संसर्ग होऊ नये याकरिता रुग्णालयात विशेष काळजी घेणे गरजेचे असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील रुग्णांत व त्यांच्या नातेवाईकांत निर्माण झालेली तीव्र असंतोष व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने या शस्त्रक्रियागृहाची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

७९ ५३८ **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"बोरीवली, कांदीवली भागातील तीन राखीव भूखंडावर अनधिकृत कब्जा केल्याबाबत एका लोकप्रतिनिधीला बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून जानेवारी, २०१७ वा त्या सुमारास नोटीस बजावण्यात येणे, याच लोकप्रतिनिधीकडून अशा बऱ्याच मोकळ्या शासकीय भूखंडावर ताबा मिळवून त्याचा व्यावसायीक वापर केल्याबद्दल मा. लोक आयुक्त यांचेकडे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तक्रार करण्यात येणे, ज्या संस्थांनी शासकीय भूखंडावर कब्जा केला आहे, त्या आदी गणेश चॅरीटेबल ट्रस्ट, युवक मंडळ, किर्ती महिला उत्क्रांती मंडळ या संस्थांवरील ट्रस्टीमध्ये सदर लोकप्रतिनिधीच्या नातेवाईकाचा समावेश असणे, हे भूखंड ज्या शासकीय प्राधिकरणाचे आहेत ते म्हाडा आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून उपरोक्त जागेवर बांधकाम करताना कोणतीही परवानगी घेण्यात न येणे, एवढे अतिक्रमण शासकीय भूखंडावर होत असतांना संबंधित अधिकाऱ्याकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येणे, महानगरपालिका किंवा म्हाडासोबत याबाबत करार नसतांनासुद्धा अनधिकृतपणे भूखंडाचा ताबा घेतलेला असणे, मुंबईतील अनेक ठिकाणी तथाकथीत लोकप्रतिनिधींनी नावापुरत्या स्वयंसेवी संस्था स्थापन अनेक भूखंडाचा ताबा घेतलेला असणे, शासकीय भूखंड परत घेण्याची आवश्यकता, संबंधितांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या तसेच त्यांना साथ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
८०	१०२७	**श्री. रामहरी रुपनवर व इतर वि. प. स.** "मुंबईसह राज्यात सध्या अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असतानाच मुंबई महानगरपालिकेकडून रिक्त नसलेल्या पदांची जाहिरात देऊन शिक्षक भरती करण्यात आल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास उघडीस येणे, पालिकेच्या शिक्षण विभागाने सन २०१३ मध्ये शिक्षकांची पदे अस्तित्वात नसतानाही उर्दू माध्यमांच्या प्राथमिक शाळांच्या ४२८ शिक्षकांच्या भरतीसाठी जाहिरात दिली असणे, या ४२८ पदांची नियुक्ती त्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणे व त्यानंतर दर चार ते सहा महिन्यानंतर १५-२० शिक्षकांच्या नियुक्त्या करून आतापर्यंत २२२ पदे भरण्यात येणे, यावर्षीही ८८	कित्ता.	

शिक्षकांच्या भरतीचा प्रस्ताव शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणे, मात्र त्यांनी सदरील प्रस्ताव अमान्य केल्याचे सदरील प्रकरण उघडकीस येणे, ही संपूर्ण प्रक्रिया मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असतानाही शिक्षक भरती करताना आरक्षण कायदा डावलून खुल्या प्रवर्गातील अनेकांची नियुक्ती केली असणे, तसेच या भरती प्रक्रियेत सुशिक्षित बेरोजगारांना १० टक्के सामाजिक आरक्षण ठेवण्यात आल्याने, याबाबतही आश्चर्य व्यक्त होणे, दिनांक ३० जून २०१६ किंवा त्यापूर्वी शिक्षक भरती करताना उमेदवारांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टेट) उत्तीर्ण असणे बंधनकारक असताना या भरती प्रक्रियेत नियमाला बगल देण्यात येणे, यामुळे राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण होणे, महापालिका कायद्याप्रमाणे एका वर्षात वेटिंग लिस्ट बाद होत असताना त्यानंतरही गेल्या तीन वर्षापासून भरती प्रक्रिया सुरू केल्यामुळे शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन शिक्षकांमध्ये व सामान्य जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे व चिडीचे वातावरण, याबाबत मुंबई महापालिकेकडे पदे नसतानाही शिक्षक भरती करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने करावयाची कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

८१ १०३८ **श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** कित्ता.

"कांदिवली (मुंबई) येथील दामुनगरमध्ये माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा दरम्यान लागलेल्या आगीत ८ झोपड्या जळून खाक झाल्याची बाब उघडकीस येणे, सदरच्या भिषण आगीनंतर सुमारे ५ वेळा आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने काही समाजकंटक व स्थानिक गुंड या अशा घटना हेतुपुरस्सर घडवत असल्याबाबतचा तपास शासन करीत नसल्याने रहिवाशांमध्ये निर्माण झालेली भिती व चिंता, दिनांक ७ डिसेंबर २०१५, दिनांक २५ ऑगस्ट २०१६, दिनांक २१ नोव्हेंबर २०१६, दिनांक २६ नोव्हेंबर २०१६ व दिनांक ५ डिसेंबर २०१६ रोजीच्या लागलेल्या आगीमध्ये शेकडो झोपडपट्टीवासीयांचे झालेले लाखो रुपयांचे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नुकसान, माहे २०१५, ला लागलेल्या आगीत १२०० झोपड्या जळाल्यानंतर त्यामध्ये ५ ते ६ झोपडीधारकांना जीव गमवावा लागणे, राज्य सरकार वा महानगरपालिकाने त्या वेळेला नुकसान झालेल्या झोपडीधारकांचे शासनाने अद्यापही पुनर्वसन न करणे, मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री यांनी मागील विधानसभा अधिवेशनात व झोपडपट्टीला दुर्घटनेच्या वेळी दिलेल्या प्रत्यक्ष भेटीत पुनर्वसनाच्या दिलेल्या आश्वासनांचे पुर्तता अद्याप केलेली नसल्याने लाखो झोपडपट्टीवासीयांचा शासनावरील उडालेला विश्वास, भविष्यात आग लागण्याच्या घटना घडू नये म्हणून कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना व कारवाई शासनाकडून केली जात नसल्याने संपूर्ण दामुनगर झोपडपट्टीत राहणाऱ्या हजारो झोपडपट्टीवासीय व त्यांच्या कुटुंबियांच्या मनात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."		
८२	१०४१	**श्री. गोपिकिशन बाजोरीया, वि. प. स.** "सन २००१ मध्ये अकोला नगरपालिकेचे रुपांतर अकोला महानगरपालिकेत होणे, नगरपालिकेचे रुपांतर अकोला महानगरपालिकेत करतांना कोणतीही हददवाढ न करताच अकोला महानगरपालिकेत रुपांतर करण्यात आल्यानंतर त्याचा परिणाम शहराच्या नागरी सुविधांवर झाल्यामुळे महानगरपालिकेने दि. ०४ मार्च २००२ चे प्रशासकीय ठरावाद्वारे अकोला महानगरपालिकेच्या हददवाढीबाबत ठराव पारित करणे, सदर ठरावानुसार व स्थानिक लोकप्रतिनिधीनी सातत्याने पाठपुरावा व विधानपरिषदे सभागृहात विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधून सदरहू हद्दवाढीस शासनाने दिलेली मंजुरी, सदर हद्दवाढ केल्यानंतर महानगरपालिकेमध्ये वाढलेली गावे, सदर गावांना अद्यापी मुलभूत सुविधा (वीज, पाणी , रस्ते, आदि) पुरविण्याबाबत महानगरपालिकेस निधी पुरविण्यात आलेला नसणे, त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील गावांचा विकास खुंटणे, हद्दवाढीमुळे		किल्ला.

महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या गावांना मूलभूत सुविधापासून वंचित राहण्याची आलेली वेळ, त्याचप्रमाणे अकोला महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पालिकेचा सर्वच खर्च भागविण्याकरिता शासनाने भरघोस निधीची /खर्चाची तरतूद करणे गरजेचे होते परंतु शासनाकडून यासंदर्भात ठोस कार्यवाही न झाल्याने सध्यस्थिती अकोला महानगरपालिकेचा कारभार आर्थिक संकटात असणे, शासनाने नवीन महानगरपालिका अस्तित्वात आल्या तेव्हा त्यांना भरीव निधी दिला परंतु अकोला महानगरपालिकेवर निधी न दिल्यामुळे झालेला अन्याय, अकोला महानगरपालिकेला केंद्र शासनाकडून भूमिगत गटार योजना, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपटटी सुधारणा योजना , रमाई योजना, आदि विविध योजनाकरिता येणारे अनुदान विहित मुदतीत प्राप्त होत असणे, परंतु शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान वेळेत उपलब्ध होत नसल्याने महानगरपालिकेचा कारभार अडचणीत येणे, पालिकेची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना अस्तित्वात नसल्याने दर एक दिवस आड पाणी पुरवठा केला जाणे, पालिकेतील कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन न मिळाल्यामुळे तीन-चार कर्मचाऱ्यांनी आर्थिक विंवचेनेमुळे केलेल्या आत्महत्या, कार्यालयीन कामकाजाकरिता निधीची तरतुद नसल्याने अनेक कामे प्रलंबित राहणे, तसेच "ड" वर्ग महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियमावली तयार न झाल्यामुळे गेल्या चार वर्षांपासून महानगरपालिकेतील क्षेत्रातील अनेक बांधकामे रखडलेली असणे, तसेच अनेक पदे रिक्त असणे, महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची नितांत आवश्यकता, याकरिता शासनाने तात्काळ अकोला महानगरपालिकेला भरीव निधी देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

८३ ११२९ **श्री. तानाजी सावंत, वि. प. स.** कित्ता.

" पुणे महानगरपालिकेच्या सीमा भागातील ३४ गांवे पुणे महानगरपालिकेत समाविष्ठ करून घेण्यांबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन अनेक वर्षांचा कालावधी लोटून गेला तरीही सदरहू ३४ गांवे पुणे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करून घेण्याच्या निर्णयाची अमंलबजावणी न होणे , परिणामी ३४ गांवातील ग्रामस्थांनी याबाबत मुख्यमंत्री यांच्याकडे वारंवार निवेदने देऊनही अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्यांच्यात वाढता असंतोष व त्यांनी आंदोलनात्मक घेतलेली भूमिका, शासनाने तातडीने ३४ गांवाच्या विकासाच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात ही गांवे समाविष्ट करण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
८४	११३६	**श्री. संजय दत्त, वि. प. स.** " नवी मुंबई परिसरातील बेकायदा बांधकामाविरोधात मोहिम राबविण्यात येणे, दिघ्यातील अनधिकृत इमारतींचा मुद्दा गाजत असणे, दिघ्यात एकूण ९९ अनधिकृत इमारती असून त्यापैकी १७ इमारती कोर्ट रिसिवरच्या ताब्यात असणे, त्यातील ३ इमारती एमआयडीसीच्या ताब्यात देण्यात आल्या असणे, त्यावर कारवाई करण्यात आली असून ४ इमारती सील केलेल्या असणे, उर्वरित १० इमारतींना मार्चच्या पहिल्या आठवाड्यात नोटीस बजावण्यात येणार असणे, सिडकोच्या भूखंडावर असलेल्यान अमृतधाम, दत्तकृपा, अवदूत, छाया यांच्यासह चार इमारतील रहिवाशांना रिकामी करा, कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात द्या, असा आदेश मा. उच्च न्यायालयाने दि. २८ फेब्रुवारी २०१७ रोजी आदेश देण्यात आल्याने सदरील इमारतीतील रहिवाशी हवालदिल होणे, सध्या मुलांच्या शाळेच्या परीक्षा सुरू असणे, अचानक घरे खाली करण्यात आल्याने बेघर होणाऱ्या रहिवाशांना राहण्याचा तीव्र प्रश्न निर्माण होणे, मुलांच्या शाळा सुरू असल्योने सदरील कारवाई रदद करावी अशी मागणी येथील रहिवाशांकडून करण्यात येणे, सदरील जागेवर अनधिकृत बांधकाम करणारे बांधकाम व्यवसायिकांनी बांधकामाची संपूर्ण रक्कम घेऊन मोकाट असून गोरगरिब	कित्ता.	

कुटुंबियांना फसविणारे संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, त्यामुळे शासनाबाबत दिघावासियांमध्ये तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्य शासनाने नवी मुंबईतील दिघावासियांच्या अनधिकृत इमारतींवर होणारी कारवाई रद्द करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

८५ ११५५ **श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** कित्ता.

" काश्यपी प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा प्रस्ताव सादर करण्याचे राज्य शासनाने महापालिकेला निर्देश दिलेले असणे, मात्र काश्यपी धरणाची मालकी महापालिकेची नसल्याने या प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीबाबत शासनानेच निर्णय घ्यावा अशी भूमिका महापालिका प्रशासनाने घेतलेली असणे, या संदर्भातील अहवाल महापालिका प्रशासनाकडून माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये राज्य शासनाला सादर करण्यात आलेला असणे, काश्यपी प्रकल्पग्रस्तांनी स्वातंत्र्यदिनी धरणात जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर जलसंपदा तथा जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये बैठक बोलाविण्यात आलेली असणे, नाशिक महापालिकेने ६० पैकी २३ प्रकल्पग्रस्तांना यापूर्वी नोकरी दिलेली असणे, उर्वरित प्रकल्पग्रस्तांनाही महापालिकेने नोकरीत सामावून घ्यावे यासंदर्भातील प्रस्ताव शासनाला सादर करावा असे निर्देश जलसंपदा मंत्र्यांनी या बैठकीत महापालिकेला दिलेले असणे, मात्र सन २००१ मध्ये झालेल्या महासभेत काश्यपी प्रकल्पग्रस्तांची जबाबदारी महापालिकेची नसल्याचा ठराव करण्यात आलेला असणे, महापालिकेच्या मालकीचे धरण व्हावे यासाठी महापालिकेने काश्यपी धरणाच्या उभारणीत आर्थिक सहभाग घेतलेला असणे, त्यासाठी ५.५५ कोटी रुपये देखील जलसंपदा विभागाला देण्यात आलेले असणे, नंतरच्या काळात या धरणाची उभारणी जलसंपदा विभागामार्फतच केली गेलेली असणे, त्यामुळे सदर धरणावर महापालिकेची मालकी राहिली नसल्याने सन २००१ मध्ये झालेल्या महासभेत काश्यपी प्रकल्पग्रस्तांची जबाबदारी महापालिकेची नसल्याचा ठराव संमत करण्यात आलेला असणे, त्यानंतर सन २००९ मध्ये प्रकल्पग्रस्तांना थेट महापालिका

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सेवेत सामावून घेतल्याबद्दल राज्य शासनाने कानउघाडणी केलेली असणे, सन २००१ महासभेचा ठराव तसेच २००९ मधील शासनाचे निर्देश आणि आता जलसंपदा तथा पालकमंत्र्यांनी माहे ऑगस्ट, २०१६ च्याबैठकीत दिलेले आदेश विसंगती निर्माण करणारे असल्याने काश्यपी प्रकल्पग्रस्तांबाबत शासनानेच निर्णय घेऊन महापालिकेला मार्गदर्शन करावे अशा आशयाची भूमिका महापालिकेने अहवालाद्वारे शासनाला कळविली असणे, प्रकल्पग्रस्तांच्या न्याय मागण्या मार्गी लावण्यासाठी महापालिका व शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्यामुळे सदर प्रकल्पग्रस्त कुटुंबांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण यावर शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."		
८६	११८६	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "बोरीवली (पूर्व) मुंबई येथील देवीपाडा परिसरातील मौजे मागाठाणे, न. भू. क्र. २१७, २१७/१ ते ५८, २१८ व २१८/१ ते ३२ या भूखंडावरील इमारत क्रमांक ७ आणि इमारत क्रमांक ८ दरम्यान बागबगीचासाठी (RG) असलेल्या भूखंडावर प्रकल्पग्रस्तांसाठी इमारत क्रमांक ५० बांधण्यात परवानगी देण्यात येणे, सदर भूखंडावर विकासकाच्या वतीने वृक्षतोड करून बुलडोजर आणून सपाटीकरण करण्यात येणे, याबाबत जाब विचारणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना दमदाटी करण्यात येणे, सदर भूखंड बागबगीचासाठी (RG) असल्याचे इमारतीतील सदनिकाधारकांच्या करारपत्रात नमूद केलेले असणे, सदर भूखंडावर असलेल्या इमारत क्रमांक ८ च्या मलकुंडाच्या (Septic Tank) आजूबाजूला विकासकाकडून अनधिकृतरित्या खोदकाम करण्यास सुरूवात झाल्यामुळे या मल कुंडाला (Septic Tank) तडे गेल्यास तेथून घाणीचे उत्सर्जन होऊन परिसरातील सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याची भीती, या इमारतीमधील रहिवाशांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रारींबाबत वारंवार पाठपुरावा करून	कित्ता.	२१४

देखील तेथील अधिकाऱ्यांनी त्याकडे सोयिस्करित्या दुर्लक्ष करून विकासकाला अप्रत्यक्षपणे मदत करणे, विकासकाने महानगरपालिका, लोकायुक्त, अग्निशमन आणि विकास नियमावलीतील निर्देशांचे / आदेशांचे उल्लंघन करणे, याबाबत सखोल चौकशी करण्याची व बागबगीचासाठी (RG) असलेल्या भूखंडावरील इमारत क्रमांक १० चे बांधकाम स्थगित करण्याची नितांत आवश्यकता, परिणामी या परिसरातील नागरीकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

८७ १२१२ **श्री. प्रकाश गजभिये, वि. प. स.** कित्ता.

“नागपूर शहरातील ४२७ झोपडपट्ट्यांतील नागरिकांचा संपूर्ण झोपडपट्टयांना मालकी हक्काचे पट्टे देणार व त्यांचे सर्वेक्षण करणार असे आश्वासन देणे संपूर्ण झोपडपट्टयांना मोफत घरे बांधून देणे, शहरात १२ ते १५ लाख अंदाजे लोक झोपडपट्टयांमध्ये वास्तव्य असणे त्यांना पुरेशा सोई सुविधा शासनाद्वारे न पुरविणे, त्याच भागात रु. ३०, रु. ५० व रु. ८० मासिक दराने पिण्याच्या पाण्यासाठी अगोदर मनपा कडून आकरण्यात येत होते, परंतु २०१४ पासून नवीन सरकारने झोपडपट्टीधारकांना झोपडीत पाण्याचे मिटर बसविणे व त्यांच्यावर अन्याय करणे घर टॅक्स ५ पटीने वाढविणे झोपडपट्टीधारकांना फक्त ५०० चौरस फुट जागा भाडेतत्वावर देणे व त्याकरिता लीज वर देणे, लीज संपली कि जागा शासनाने गीळंकृत करणे व त्यावर दंड लावणे ५०० चौरस फुटाची जागा सोडून उर्वरित जागा शासनाने आपल्या ताब्यात घेणे व त्यावर रेडीरेकनरनुसार आजच्या बाजार मुल्यानुसार त्याकरिता झोपडपट्टीधारकांकडून लाखो रुपये उकळणे हा झोपडपट्टीधारकांवरमालकी हक्काचे पट्टे न देता त्यांचेवर अन्याय करणे त्यामुळे नागरीकांमध्ये चिडीची व संतापाची भावना निर्माण होणे हा सर्व प्रकार थांबवून झोपडपट्टीधारकांच्या जागेवर झोपडी वसलेली असेल त्या संपूर्ण जागेचे सर्वेक्षण करून विनामुल्य मालकी हक्काचा पट्टा देणे व त्यावर विनामूल्य घर बांधून देणे, घरकुल बांधून देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
८८	१२२२	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.** "मुंबईतील चेंबुर येथील शिवाजीनगर परिसरात काम करणाऱ्या अपनालय या सामाजिक संस्थेने येथील झोपडपट्टीत केलेल्या सर्वेक्षणात शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी ५५ टक्के लोक अत्यंत गंभीर परिस्थितीत जगत असल्याचे वास्तव दि. २२ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, सुमारे ७ ते ८ लाख लोकसंख्या असलेल्या शिवाजीनगर भागातील १२ विभागातील या सर्वेक्षणानुसार आजही ३८ टक्के मुलींचे विवाह वयाची १८ वर्षे पूर्ण करण्याआधीच केले जात असणे, या भागात राहणाऱ्या २ लाख १० हजार रहिवाश्यांकडे रेशनकार्ड नसल्याने त्यांना सुक्तीच्या दरात अन्नधान्य मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, तर बहुतांश नागरिकांचे वार्षिक उत्पनसुमारे केवळ ७८ हजार असणे, येथील शिक्षणाचाही प्रश्न बिकट असून या भागात एकही महापालिका शाळा नसल्याने येथील ६ ते १४ वर्षे वयोगटातील २९ टक्के मुले शाळाबाह्य असल्याचे आढळून आलेले असणे, याशिवाय येथे कुटुंबात एकच बँक खाते असलेल्या नागरिकांचे प्रमाण ५९ टक्के आहे तर ३१ टक्के घरांमध्ये बँक खातेच नसणे, या सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार येथील प्रत्येक दुसरे मुल कमी वजनाचे असणे, मुंबई शहराच्या शहरीकरणाचा वेग लक्षात घेता हे सर्वेक्षणातील निष्कर्ष म्हणजे धोक्याची घंटा असणे, शिवाय शासनाने अपयशही असणे, शहरे स्मार्ट होत असताना येथील गरीब वस्त्यांतील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, रोजगार इ. बाबीकडे शासन करीत असल्याने जनमानसात शासनाप्रतीनिर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने शहरी गरीबांच्या समस्या व गरजांची पूर्तता करणारे धोरण आखण्याची निर्माण झालेली नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता.	

८९ १३४९ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि. प. स.** कित्ता.

"ठाणे महानगरपालिकेने सफाई कामगारांना त्यांच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणतेही काम देऊ नये असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही या कामगारांना कचराकराच्या कामास जुंपले असल्याचे दि. ९ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, पालिकेने कचऱ्यावर कर लावला असून त्याची वसुली करण्यास सुरूवात झाली असणे, काही आजारी व गरोदर महिलांनाही याकामी लावण्यात आल्याने यातील सुमारे १५ महिलांना चक्कर आली असणे, वास्तविक करवसुलीचे काम करविभागाचे असून, त्यांच्या मार्फत या कराची वसुली केली जावी असे अभिप्रेत असतानाही सदर काम सफाई कामगारांकडून करून घेत असणे, शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या सफाई कामगारांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने सदर करवसुलीचे काम सफाई कामगारांकडून करून घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासोबतच हे काम या कर्मचाऱ्यांकडून करून न घेता कर विभागाकडे सोपविण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया. "

९० १३५८ **श्री. रविंद्र फाटक, वि. प. स.** कित्ता.

"ठाणे महानगरपालिका हद्दीतील वागळे इस्टेटमधील रायलादेवी तलावाची झालेली अत्यंत दयनिय अवस्था, सदर तलावात असलेल्या कपबशीच्या प्रतिकृतीला तडे गेल्यामुळे कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता, उक्त तलाव पाहण्याकरिता दूरवरून हजारो पर्यटक येत असणे, असे असतानाही तलावाच्या परिसरात मोडकळीस आलेल्या, गंजलेल्या गाड्या तसेच भंगाराचा खर्च पडलेला असल्याचे निदर्शनास येणे, तलावाच्या सौदर्यीकरणाचा विचार करून सुमारे २ ते ३ हजार लावण्यात आलेली झाडे वाळून नष्ट होत असणे, सदरहू झाडे वाळली असल्याने कोसळल्यास त्या भागातून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या जिवीतास निर्माण झालेला धोका, सदर परिसराकडे प्रशासनाचे होत असलेल्या दुर्लक्षामुळे तलावाला आलेले विद्रुप रुप, सदर परिसराची तात्काळ पाहणी करून तलावाच्या

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सुशोभिकरणाची व दुरुस्ती करण्याची नितांत आवश्यता, याकडे शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने पाहणी करून तलावाच्या दुरुस्ती व सुशोभिकरणाकरिता निधीची तरतूद करून तलाव सुशोभित करण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
९१	१३७६	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.** "उल्हासनगर ता. जि. ठाणे येथील व्हीटीसी या खेळाच्या मैदानाचा वापर कोणार्क कंपनीने त्यांच्या कचरावेचक अवजड वाहनांसाठी सुरू केला असून या गाड्यांची येथे दिवसभर वर्दळ असल्याने या मैदानात खेळणाऱ्या खेळाडूंचा जीव धोक्यात आला असल्याचे दि. ९ मार्च २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, शहरात केवळ २ ते ३ खेळाची मैदाने शिल्लक असणे, त्यातही अशाप्रकारे वाहनांची धोकादायक वाहतूक खेळांच्या मैदानात होत असेल तर खेळाडूंनी जायचे कुठे अशी संतप्त प्रतिक्रिया येथील खेळाडू व्यक्त करीत असणे, याशिवाय सदर कंपनीने या मैदानाचा वापर करण्याची कोणतीही परवानगी पालिकेकडून घेतलेली नसणे, त्यामुळे पालिकेने पालिकेच्या हद्दीत वाहने पार्क करण्याच्या आकारणेपोटी ५ कोटी रुपयांची थकबाकी भरण्याची नोटीस बजावूनही सदर कंपनी दुर्लक्ष करीत असतानाही शासन त्याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील खेळाडू व नागरिक यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने या मैदानावरील सदर कंपनीचे अतिक्रमण हटवून ते खेळाडूंना उपलब्ध करून देण्यासोबतच या कंपनीकडून भाडे थकबाकी वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

९२ १३८७ **श्री. रामहरी रुपनवर, वि. प. स.** कित्ता.

"रेल्वे प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाच्या संगनमताने २००० साली रेल्वे रुंदीकरण प्रकल्प राबविण्यात आला असणे, त्या पुनर्वसनासाठी एज. जी. ओ. संस्था स्पार्कला हाताशी धरुन पुनर्वसन एम. एम. आर. डी. ए. ने करण्यास सुरूवात केली असणे, स्पार्क संस्थेकडे ज्यांचे सर्व्हे नंबर, मॅप नंबर व ओळखपत्र आहे अशा लोकांना त्यांच्या विश्वासातील लोकांना स्पार्कने आय. डी. बनवून त्यांचे पुनर्वसन केले व ज्या लोकांचे ओळखपत्र न बनविता व सर्व्हे न करता पुनर्वसनापासून वंचित ठेवले असणे, अशा झोपडीधारकांना सहारा देणारी रेल्वे झोपडपट्टी पुनर्वसन समिती अशा लोकांना घेऊन गेली अनेक वर्षे आमरण उपोषण, रस्ता रोको, धरणे मोर्चा काढून शासनाकडे लोकांची व्यथा मांडली असणे, तत्कालीन एम. एम. आर. डी. ए. चे आयुक्त यांनी स्पार्कच्या संचालकांना यांचेही पुनर्वसनाचा विचार करून पुनर्वसन करण्याबाबत सांगितले असणे, त्यावेळेस निकृष्ठ लोक दर्जाच्या झोपड्या बांधून १०० लोकांची व्यवस्था करणे, त्याचवेळी पुनर्वसनासाठी हजारो लोक घरापासून वंचित असल्याकारणाने रेल्वे समितीने पत्र्याचे शेड उभारुन ६०० ते ७०० लोकांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले असणे, ३८०० पात्र प्रकल्पग्रस्तांपैकी २८०० पात्र प्रकल्पग्रस्तांना एम. एम. आर. डी. ए. ने घरे देण्याचे आश्वासन देऊनही घरापासून वंचित ठेवले असणे, संक्रमण शिबिरात अत्यंत वाईट अवस्थेत हजारो लोक वास्तव्य करीत असतानाही मागील अनेक वर्षापासून त्यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाची उदासिनता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. "

९३ १४९३ **श्री. संजय दत्त, वि. प. स.** कित्ता.

"मुंबई शहराला उपनगर, ठाणे शहराला जोडणाऱ्या महत्त्वाच्या पूर्व द्रुतगती मार्गावर शौचालया अभावी वाहनचालकांची कुचंबणा होत असणे, कुर्ला ते मुलूंड या टप्प्यात प्रशासनाने एकही शौचालय सुरू केलेले नसणे, मध्यांतरीही शौचालय सुरू करण्याची संकल्पनाही फसणे, स्वच्छ भारत अभियान देशभर राबवला जात असताना ग्रामीण भागासोबत

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आर्थिक राजधानीत देखील शौचालयाचा मोठा प्रश्न उभा राहिला असणे, प्रशासनाने या मार्गावर शौचालयाची उभारणी करणे गरजेचे होते परंतु प्रशासनाने क्लीनअप मार्शल नेमले असून त्यांच्याकडून या मार्गावरील प्रवाशांची लूट सुरू असणे, पालिकेने गेल्यावर्षी या मार्गावर पाच शौचालय बांधण्याच्या निर्णय घेतला होता परंतु एकही शौचालय बांधण्यात आलेला नाही प्रवासा दरम्यान उघड्यावर नैसर्गिक विधी उरकावे लागत असल्याने क्लीनअप मार्शलच्या कारवाईस त्यांना सामोरे जावे लागत असणे, गेली अनेक वर्षे प्रवाशांना भेडसावणारी ही राईट टु पी ची समस्या प्रशासन पूर्ण करून न शकल्याने प्रवासी नाराजी व्यक्त करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
९४	१५००	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.** "मुंबई उपनगरातील ठाकूर व्हिलेज, कांदिवली पूर्व या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेतर्फे स्मशानभूमी आणि फायरब्रिगेडकरिता आरक्षित भूखंड असणे, सदरील विभागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असणे, स्मशानभूमी अभावी या परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय निर्माण होणे, तसेच फायरब्रिगेडच्या सोयीसुविधे अभावी या विभागात मोठ्या प्रमाणात वस्ती असल्याने सदरील ठिकाणी आग लागल्यास तातडीची मदत करणे गैरसोय होणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी व लोकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असणे, येथील विभागात नागरिकांसाठी स्मशानभूमीसाठी व फायर ब्रिगेडसाठी भूखंड आरक्षित असतानाही महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे, जनतेची होणारी गैरसोय लक्षात घेता या ठिकाणी स्मशानभूमी तसेच फायर ब्रिगेड आरक्षित भूखंडावर विकसित करणे फार गरजेचे असणे, कांदिवली पूर्व येथील रहिवाशांची याबाबत अनेक वर्षापासून मागणी असूनही याकडे प्रशासनाने वारंवार दुर्लक्ष केले जाणे, त्यामुळे	कित्ता.	

विभागातील जनतेमध्ये शासनाविरुद्ध असंतोषाचे वातावरण पसरणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

९५ १५११ **श्री. रामराव वडकुते, वि. प. स.** कित्ता.

"नाशिक महानगरपालिकेतील करारनाम्यावर घंटागाडी ठेकेदारांना कार्यादेश दिल्यानंतर दिनांक २० डिसेंबर २०१६ पासून नाशिक शहरात २०६ घंटागाड्या रस्त्यावर आणण्याचे निर्देश महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने दिल्यानंतर मंगळवार, दि. २० डिसेंबर २०१६ रोजी केवळ ७६ घंटागाड्या रस्त्यावर धावल्याचे उघडकीस येणे, त्यानंतर दि. २१ डिसेंबर २०१६ रोजी ६ विभाग मिळून ८९ घंटागाड्या रस्त्यावर कार्यरत असल्याचे आढळून येणे, त्यात पंचपटी विभागात १२, पश्चिम मध्ये २०, पूर्व भागात २५, नाशिक रोड विभागात २८, सिडकोत ४, तर सातपूर मध्ये एकही घंटागाडी धावली नसल्याचे जीपीएस यंत्रणेमार्फत निर्दशनास येणे, ६ विभागातील ठेकेदारांकडून सद्यःस्थितीत १५५ घंटागाड्या रस्त्यावर आणण्याचे आश्वासन प्रशासनाला देण्यात येणे, परंतु त्याचेही पालन करण्यात न येणे, सिडको विभागातील घंटागाडीचा ठेकेदार जी. टी. पेस्टकंट्रोल, पुणे यास देण्यात येणे, परंतु सदर ठेकेदाराला वारंवार पत्र तसेच समज देऊनही त्याच्याकडून पूर्ण क्षमतेने घंटागाड्या सुरू करण्यात न येणे, कंत्राटदाराकडून घंटागाडीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे कमी वेतन, महानगरपालिकेशी कंत्राटदारांनी करार करताना मान्य केलेल्या ७३ अटी व शर्तींचे पालन गेली अनेक वर्षे कंत्राटदार करीत नसुनसुद्धा त्यांच्याशी असलेल्या आर्थिक हितसंबंधामुळे सदर कंत्राटदाराने विरोधात महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी नियम, शर्ती व अटींचा भंग करूनही हेतूतः कारवाई करण्यास करीत असलेला अक्षम्य विलंब, तसेच सातपूर भागातही सय्यद आसीफ अली या ठेकेदाराने अटी व शर्तींचे पालन न केल्याचे दिसून येणे, त्यामुळे नाशिक महानगरपालिकेने जीपीएस यंत्रणेमार्फत घंटागाडी कंत्राटदारांवर ठेवलेल्या नियंत्रणामुळे ठेकेदारांकडून सुरू असलेला कोट्यवधी रुपयांचा घोटाळा उघड होण्याची शक्यता, याआधी केवळ कागदोपत्री घंटागाड्या दाखवून

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सर्व विभागातील कंत्राटदार महानगरपालिका शासनाची फसवणूक करीत असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असल्याची दाट शक्यता त्यांच्याकडून ठेकेदारांना पाठीशी घालण्याचा होत असलेला प्रयत्न, सदर ठेकेदाराचे राजकीय संबंध, अधिकाऱ्यांची कारवाई करण्यास होत असलेली टाळाटाळ, त्यामुळे शहरात पसरलेले घाणीचे साम्राज्य, त्यामुळे सदर ठेका तात्काळ रद्द करून अन्य ठेकेदारास देण्याची गरज, या प्रकरणी त्वरित दखल घेऊन एका संयुक्त समितीतर्फे आत्तापर्यंत घंटागाडी प्रकरणातील झालेल्या ठेकेदारीची व घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "		
९६	१५५६	**श्री. विजय** ऊर्फ **भाई गिरकर, वि. प. स.** "मुंबई उप नगरातील भांडूप येथील एल. बी. एस. रोड ते भांडूप रेल्वे स्टेशन हा परिसर नेहमी लोकांच्या गर्दीने गजबजलेला असणे, या परिसरात असलेल्या पदपथांवर अनधिकृत फेरीवाल्यांचे अतिक्रमण असणे, एल. बी. एस. महामार्गावर रस्ते व पदपथ दुरुस्तीचे काम माहे फेब्रुवारी, २०१७ पासून सुरू असणे, काही रस्त्याच्या भागावर पदपथ बनवून पूर्ण होणे, लाखो रुपये खर्च करून नव्याने तयार करण्यात आलेल्या पदपथांवर तसेच रस्त्यावर अनधिकृत फेरीवाल्यांनी अतिक्रमण करणे, या परिसरात लाखो नागरीक तसेच तेथील शाळकरी व कॉलेजचे विद्यार्थी हे नेहमी ये-जा करत असणे, परंतु या अनधिकृत फेरीवाल्यांमुळे व त्यांच्या दादागिरीमुळे त्यांना पदपथाचा वापर न करता रस्त्याने चालत जावे लागणे, बऱ्याचदा रिक्षा चालक किंवा बस चालकांमध्ये त्यामुळे वाद निर्माण होणे, भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती स्थानिक जनतेमध्ये निर्माण होणे, या अतिक्रमणाला स्थानिक लोकप्रतिनिधींचा तसेच तेथील स्थानिक गुंडांचा या अनधिकृत फेरीवाल्यांना पाठिंबा असल्यामुळे स्थानिक	कित्ता.	

नागरिक तक्रार करण्यास पुढे न येणे, महानगरपालिकेचे अधिकारी सुद्धा या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणे, मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २२ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंबईत पदपथांवर फेरीवाल्यांचे होत असलेल्या अतिक्रमणाबद्दल मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावर ताशेर ओढणे, परंतु या गोष्टीची कोणतीही दखल मुंबई महानगरपालिका प्रशासनाने न घेणे, भांडूप रेल्वे स्टेशन परिसर तसेच एल. बी. एस. रोड वरील पदपथावरील अनधिकृत फेरीवाल्यांचे अतिक्रमण तात्काळ हटवून सदर पदपथ स्थानिक जनतेसाठी मोकळा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

९७ १५९५ **श्री. आनंद ठाकूर, वि. प. स.** कित्ता.

"राज्यात नगरविकास विभागामार्फत अधिसूचना क्र. टिपीएस १८१५/प्र. क्र. ४९/१५/प्रा. यो. /कलम २०(४)/नवि-१३ दिनांक ७ जानेवारी २०१६ अन्वये मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्रात "शेती तथा ना-विकारा विभाग"या वापर विभागामध्ये विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या निवासी वापराकरिता अधिमूल्य आकारण्याचा निर्णय घेतलेला असणे, परंतूसहायक संचालक नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नागपूर यांनी सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या कालावधीतील एकूण २२५ पेक्षा जास्त निवासी अकृषिक प्रकरणांमध्ये शासकीय नियमांप्रमाणे अधिशुल्क न आकारता नागरिकांकडून अवैधपणे शुल्क आकारून त्यानंतर त्यांना नोटीसा बजावल्याचे निदर्शनास येणे, सहायक संचालक यांनी अशा प्रकारे शुल्क आकारुन परस्पर अकृषिक अभिन्यासाला मंजुरी देऊन शासनाच्या करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान करून गैरव्यवहार केल्याबाबतची चौकशी करून कारवाई करण्याबाबतची मागणी अनेक लोकप्रतिनिधी, नागरिक व सेवाभावी संस्था-संघटना यांनी प्रधान सचिव-नगरविकास विभाग यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये केलेल्या असणे, सहायक संचालक नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नागपूर यांनी सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या कालावधीत केलेल्या अनियमित व गैरकारभाराची चौकशी होण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१)	(२)	(३)	(४)	(५)
९८	१६१२	**प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.** "वडाळा, मुंबई येथील अर्देसर दादी स्ट्रीट, व्ही. पी. रोड, सी. पी. टँक येथील मोहनलाल प्रभुदास बिल्डींग नं. ११८, बिल्डिंग नं. ११६ व बिल्डिंग नं. ११४ या इमारती पुर्नविकासासाठी ॲटलास कन्स्ट्रक्शन कंपनीच्या विकासकाने घेतलेल्या असणे, या इमारतींच्या पुर्नविकासासाठी लागणाऱ्या ना हरकत प्रमाणपत्रासाठीची नस्ती (क्र. ७०३८) वडाळा येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील एका अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीकरिता प्रलंबित असणे, सदरहू इमारती या अत्यंत जीर्ण व धोकादायक तसेच जीर्ण अवस्थेत असल्याने कोणत्याही वेळी अपघात होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, या इमारतीतील राहणारे नागरिक जीव मुठीत घेऊन रहात असणे, महानगरपालिकेचे अधिकारी आर्थिक देवाण-घेवाण केल्याशिवाय ना हरकत प्रमाणपत्र देत नसणे, इमारतीची अवस्था अत्यंत बिकट बनल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे व संभ्रमाचे वातावरण, सदरहू इमारतींच्या पुर्नविकासासाठी आवश्यक असणारे ना हरकत प्रमाणपत्र लवकरात लवकर विकासकाला देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."		कित्ता.
९९	३२	**श्री. नरेंद्र पाटील व इतर वि. प. स.** "नवी मुंबई शहर हे माहिती व तंत्रज्ञानाचे आधुनिक शहर अशी ओळख निर्माण होत असताना या शहरात लॉजिंग व बोर्डींगचे स्तोम माजले असून प्रत्येक विभागात टप्प्या टप्प्यावर असलेल्या लॉजिंग मध्ये दिवसाढवळ्या देहविक्रीचा व्यवसाय चालत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस येणे, परिमंडळ एकच्या उपआयुक्त कार्यालयाभोवतीच मोठ्या संख्येने लॉजिंग चालविले जात असणे, मात्र त्यावर कारवाई संबंधित प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच काही गावे लॉजिंगची केंद्र बिंदू म्हणून बदनाम होत असणे, त्यामध्ये जुहूगाव, नेरुळ, सी. बी.		कित्ता.

डी., शिरवणे, तुर्भे, दिघा व एम. आय. डी. सी. इत्यादी ठिकाणाचा समावेश असणे, यामुळे नवी मुंबई शहरात अनैतिक घटना व गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ झालेली असणे, यावर प्रतिबंध घालणेबाबत स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधीकडून वारंवार होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

१०० ९० **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्य शासनाने रोकडरहित अर्थव्यवस्था (Cashless Economy) केशलेस व्यवहारांमध्ये रोख रक्कम वापर न करता चेक्स, क्रेडिट व डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, पेमेंट बँक, मोबाईल वॉलेटस आदि डिजिटल माध्यमांद्वारे व्यवहार करणाऱ्या धोरणाला प्रोत्साहन देण्याचा घेण्यात आलेला निर्णय, राज्यात दिवसेंदिवस सायबर गुन्हयांमध्ये वाढ होत असून या गुन्ह्यांचा तपास कमी प्रमाणात होत असल्याने राज्य शासनाने कॅशलेस धोरणामुळे सायबर सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात सायबर गुन्हेगारांकडून सरकारी, संशोधनपर संस्था यांची संकेतस्थळे हॅक करून माहिती चोरण्याचे प्रमाण वाढू लागले असणे, ग्रामीण व शहरी भागात इंटरनेटचा वापर जास्त होत असल्याने त्याचाच परिणाम मुंबई शहराचा सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत पहिला नंबर लागत असणे, मुंबई मध्ये १२०० पेक्षा जास्त सायबर गुन्हे नोंदवण्यात येणे, प्रसिद्ध, महत्त्वाच्या व्यक्तींच्या बँक खात्यातून इंटरनेटच्या सहाय्याने लाखो रुपये पळविण्याचे प्रकार सुरू असणे, सायबर गुन्ह्यांतील गुन्ह्यांची उखल लागण्याचे प्रमाण अत्यंत अल्प असणे, सायबर गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांकडे आवश्यकती अत्याधुनिक साधनसामुग्री व मनुष्यबळाची कमतरता असणे, राज्यातील वाढत्या सायबर गुन्ह्याला आळा बसण्यासाठी आवश्यकता अत्याधुनिक यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत तसेच सायबर गुन्हे घडलेल्याबाबत शोध व शिक्षा देण्यासंबंधी शासनस्तरावरुन आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०१	१२०	**श्री. नरेंद्र पाटील व इतर वि. प. स.** "मुंबईतील मालवणी चर्च परिसरात माणकूबाई हाऊस राममंदिर येथील एकाचाळीच्या ड्रेनेजच्या सफाईसाठी गेलेल्या ३ कामगारांचा दि. १६ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेला दुर्दैवी मृत्यू, काम सुरू असताना तीनही कामगारांची प्रकृती बिघडल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा मृत्यू होणे, पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार लेबर कंत्राटदाराने कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेले मास व हॅन्डग्लोज पुरविलेले नसणे, लेबर कंत्राटदारांच्या निष्काळजीपणामुळे तीन कामगारांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न होणे, यामुळे तेथील परिसराहील नागरीकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याची तसेच लेबर कॉन्ट्रॅक्टर विरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
१०२	१२४	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "रिलायन्स कंपनीच्या दहेज (गुजरात) ते नागोठणे (रायगड, महाराष्ट्र) या इथेन वायूवहन प्रकल्पाच्या पाईपलाईनचे काम वेगाने सुरू असणे मात्र महाराष्ट्र राज्यातील स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता पोलिसांच्या बळाचा वापर करून शेतकऱ्यांच्या जमिनीतून पाईपलाईन टाकली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असणे, दहेज ते नागोठणे अशा साडेचारशे किमी लांबीची इथेन गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम रिलायन्स कंपनीकडून सुरू असणे, यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप पुरेसा मोबदला मिळाला नसल्याची तक्रार शेतकऱ्यांची असणे, या पाईपलाईन कामाच्या चौकशीसाठी भिवंडी, कल्याण, वाडा येथील शेतकरी रिलायन्स कपंनीच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे गेले असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येणे, ओझर्ली, रेवती येथील शेतकरी	कित्ता.	

जमिनीचा मोबदला मागण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे गेला असता टिटवाळा पोलीस ठाण्याचे अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर कारवाई करण्याची धमकी दिल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, राज्य शासनाने या प्रकरणी तातडीने चौकशी करून रिलायन्स कंपनीच्या मनमानी कारभाराबाबत या कंपनीवर तातडीने कारवाई करून शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य तो मोबदला देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१०३ १३२ **श्री. नारायण राणे व इतर वि. प. स.** कित्ता.

"रेल्वे मार्गावर अडथळा आणून घातपात करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास आले असून फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्याच्या दरम्यान पनवेल-दिवा रेल्वे मार्गावर लोखंडी तुकडा ठेवण्यात आल्याची उघडकीस आलेली घटना, दुसऱ्या दिवशी पनवेल-जेएनपीटी च्या मार्गावर कोपरजवळ विजेचा खांब टाकण्यात येणे, तर त्यानंतरचा दिवा-पनवेल मार्गावर नावडे आणि कळंबोली रेल्वे स्थानकांदरम्यान रेल्वे रुळांवर जिलेटीनच्या कांड्या आढळून येणे, परंतु असे प्रकार करणाऱ्या आरोपींना अद्यापही अटक करण्यात न येणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करून करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

१०४ १५४ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई वाहतूक पोलीस विभागात कोट्यवधींचा भ्रष्टाचार होत असून प्रत्येक गुन्ह्यांसाठी वाहतूक पोलिसांचे दर ठरलेले आहे असा गौप्यस्फोट वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनील टोके यांनी करण्यात येणे, वाहतूक नियंत्रण शाखेत सुरू असलेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत चौकशी करून योग्य ती कारवाई करावी यासाठी गेल्या तीन वर्षांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पुराव्यानिशी पाठपुरावा करीत असणे, भ्रष्टाचारात सामील होण्यास नकार दिल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून छळ होतो असाही आरोप सुनील टोके यांनी करणे, मुंबई वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सुनील टोके यांनी केलेल्या आरोपांची शासनाने दखल घेऊन, या प्रकरणी सखोल चौकशी करून, त्यानुसार वाहतूक पोलिसांमधील दोषी असणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली तसेच वाहतूक पोलिसांमधील होत असलेला भ्रष्टाचार रोखण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		
१०५	१७३	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "भिवंडी-निजामपूर महानगरपालिका सभागृहाचे नेते मनोज म्हात्रे यांच्यावर गोळीबार करीत तलवार, कोयत्याने हात-पाय तोडून त्यांची निघृण हत्या केल्याची घटना दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी घडणे, मनोज म्हात्रे हे ओसवालवाडी येथील त्यांच्या घरी जात असताना इमारतीच्या आवारात दबा धरून बसलेल्या सात-आठ मारेकऱ्यांने बेछुट गोळीबार करीत तलावर, कोत्याने त्यांच्यावर असंख्य वार करून पसार झाले, रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या म्हात्रे यांना तातडीने ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात हलविण्यात आले मात्र उपचारापूर्वी मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले, या हत्येचा थरार सीसीटीव्हीत कैद होणे, सदरील घटनेमुळे भिवंडी परिसरातील जनतेमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदरील घटनेतील आरोपींना अटक करण्यात न आल्याने नागरिकांनी भिवंडीमध्ये रस्ता रोको करून शासनाच्या विरुद्ध निषेध व्यक्त करण्यात येणे, राज्यशासनाने सदरील घटनेची सखोल चौकशी करून तातडीने या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकतायाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता.	
१०६	१९४	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे मोबाईलच्या सिम कार्डची विक्री करणाऱ्या सात जणांच्या टोळीला ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या भिवंडी पथकाने दिनांक २४ जानेवारी २०१७ रोजी वा	कित्ता.	

त्यादरम्यान केलेली अटक, या कारवाई जप्त करण्यात आलेली सुमारे ११ हजार सिमकार्ड व २४०० बनावट आधारकार्ड भिवंडीसारख्या अतिसंवेदशनशील शहरातून दहशतवाद्यांना असे सिमकार्ड मिळाली आहेत का? असा प्रश्न निर्माण झाला असून, या प्रकरणाची शासनाने चौकशी करून या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१०७ २३१ **डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** कित्ता.

"अंबड (नाशिक) पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार भाऊसाहेब यशवंत सोनवणे यांनी ते ऑन ड्युटी असताना पोलीस स्टेशनमधील नवीन बॅरेकमध्ये दिनांक १ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास गळफास घेऊन आत्महत्या करणे, नाशिक महानगरात व पोलीस विभागात त्यामुळे प्रचंड खळबळ उडणे, श्री. सोनवणे यांनी अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांचे जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा संशय मृताचे मित्रपरिवार नातेवाईक व कुटुंबियांनी व्यक्त करणे, मृत सोनवणे यांनी विविध ऍथॅलेटिक्स स्पर्धांमध्ये नाशिक पोलिसांच्यावतीने प्रतिनिधीत्व केलेले असणे, उत्तम क्रिकेटपटू, खेळाडूवृत्ती, सुस्वभावी आणि आयुष्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारे श्री. सोनवणे हे आत्महत्या करणे शक्यच नाही, असा ठाम विश्वास नातेवाईक कुटुंबिय व मित्रपरिवाराने दर्शविणे व त्यांचे मृत्यूबाबत घातपाताचा संशय व्यक्त करणे, श्री. सोनवणे यांनी मृत्युपूर्व लिहलेल्या चिठ्ठीत साहेबांचे नांवाचा उल्लेख असणे, त्यामुळे श्री. सोनवणे यांच्या आत्महत्येप्रकरणी वरिष्ठ विभागामार्फत तपास करण्याची संबंधितांकडून मागणी केली जाणे, घटना होऊनसात महिन्याचा मोठा कालावधी होऊनही अद्याप चौकशी/तपास न होणे वा चौकशीचे निष्कर्ष संबंधितांचे नातेवाईक, जनतेसमोर आले नसल्याचे सांगण्यात येऊन याविषयी नाराजी व्यक्त केली जाणे, त्यामुळे ह्या संशयास्पद मृत्यु/आत्महत्याप्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०८	२६९	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "नवीन कायद्यांचे प्रारुप तयार करणे, अस्तित्वात असलेल्या कायद्यात, नियमात बदल करणे, गृह विभागासारख्या अत्यंत महत्त्वाच्या व संवेदनशील विभागाच्या कायद्यासंदर्भातही सदर कार्यवाही करणे इत्यादी कामे खाजगी विधी कंपन्यांकडून करून घेण्याचा दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजीच्या दरम्यान शासनाने घेतलेला निर्णय, त्यासाठी तीन कंपन्यांना मान्यता देऊन त्यांच्याबरोबर करण्यात आलेले करार, काही विषय अतिशय महत्त्वाचे, संवेदनशील व गोपनीय स्वरूपाचे असल्यामुळे सदरचा निर्णय गोपनियतेचा भंग करणारा, संवेदनशील विषयाबाबत विपरीत परिणाम करणारा ठरण्याची शक्यता, सदर तीन कंपन्यांवर शासन नियमांची बंधने नसल्यामुळे त्यांची शासनाशी बांधिलकी नसल्याची निर्माण झालेली भीती, शासनाचे विविध विभाग व विशेषकरून शासनाचा विधी व न्याय विभाग यासंदर्भात राज्याच्या निर्मितीपासूनच सक्षम असताना असा निर्णय घेणे उचित नसणे, शासन यंत्रणेवर यामुळे अविश्वास दाखविल्यासारखे होणे, त्यामुळे त्यांचे खच्चीकरण होत असल्यासारखी स्थिती दिसून येत असणे, या निर्णयामुळे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यात पसरलेले संभ्रमावस्थेचे वातावरण, त्यामुळे या अनावश्यक असलेल्या खाजगीकरणाच्या निर्णयाची स्पष्टता जाहीर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.**	कित्ता.	
१०९	२७७	"सायन-पनवेल महामार्गाजवळ कोपरा गावानजीक उड्डाणपुलाजवळ मोठ्या प्रमाणात आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, आमदारांचे शिफारसपत्र आदी महत्त्वाच्या कागदपत्रांचा खच पडल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेला असणे, ठाणे, मुंबई व नवी मुंबई येथील नागरिकांच्या कागदपत्रांचा त्यात समावेश असणे, एनपीएचटी	कित्ता.	

या शासकीय कागदपत्रे वाहून नेणाऱ्या एजन्सीच्या बेजवाबदारपणामुळे अतिमहत्त्वाची कागदपत्रे महामार्गावर पडणे, या कागदपत्रांचा दुरुपयोग होऊ शकत असल्याने या हलगर्जीपणा करणाऱ्या कंपनीविरुद्ध जनमानसात निर्माण झालेला असंतोष व संतापाचे वातावरण, हलगर्जीपणा करणाऱ्या या कंपनीला दिलेले शासकीय कंत्राट त्वरित रद्द करून दिलेल्या रक्कमांची तातडीने वसुली करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका. ”

११० ३२७ **डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** कित्ता.

“मालेगांव (जि. नाशिक) येथे अवैधरित्या गोवंश जनावरे आणली जात असल्याच्या तक्रारीवरून दिनांक १३ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास गोरक्षकांनी वाहन अडविणे, तद्नंतर दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी जमावाने येऊन काही जणांच्या टोळक्याने गोरक्षकांवर नागरी वस्तीत जीवघेणा हल्ला चढविणे, त्यात गंभीर जखमी होणे, आणि त्याची प्रतिक्रिया उमटून दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी मालेगांवी कडकडीत बंद पाळला जाणे, अनपेक्षितरित्या घडलेल्या या घटनांमुळे मालेगांव शहरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, जनतेत मोठ्या प्रमाणात घबराट पसरणे, स्थानिक पोलीस प्रशासनास, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळतांना अत्यल्पसंख्येने असलेले पोलीस कर्मचारी, अधिकारी व राज्य राखीव दलाच्या जवानांच्या पुरेशा बंदोबस्ताअभावी परिस्थिती हाताळतांना मोठी कसरत करावी लागणे, संवेदनशिल मालेगांव शहरात कोणत्याही शुल्लक घटनेनंतर पुणे, धुळे, नागपुर, दौंड, अमरावती, औरंगाबाद येथून राज्य राखीव दलाच्या जवानांना पाचारण करावे लागणे, तणावाचे परिस्थितीत अपुऱ्या पोलीस संख्या बळामुळे त्वरित कारवाई करणेस विलंब होणे, त्यामुळे परिस्थिती चिघळणे, हाताबाहेर जाणे, यापुर्वीही अशांततेच्या कालावधीत या बाबींचा पुनः पुनः प्रत्यय येणे, व जिवीत वित्त हाणी होणे, अपुऱ्या संख्येने असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांमुळे गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यांत स्थानिक पोलिसांना अपयश येत असल्याचे सांगितले जाणे, या पार्श्वभुमीवर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मालेगांवी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय व राज्य राखीव दलाची स्वतंत्र कंपनी आणि नवीन आठ पोलीस ठाणी मंजुर करण्याची तसेच पोलीस कर्मचारी, अधिकारी यांची संख्या वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत जनता व लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी केली जाणे, तसेच मालेगांव (जि. नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबत तारांकित प्रश्न क्रमांक १४६०० (दि. ३० मार्च २०१६) व फेर तारांकित प्रश्न क्रमांक १९७२१ (दि. २० जुलै २०१६) अन्वये लोकप्रतिनिधींनी शासनाचे लक्ष वेधणे, यावर लेखी उत्तरात मा. मुख्यमंत्री महोदयांनी "मालेगांव (जि. नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबतचा फेरप्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही", असे उत्तर देणे, मालेगांव येथील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर दिनांक १७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक ग्रामीणचे जिल्हा पोलीस प्रमुखांनी पोलीस आयुक्तालयासह नवीन आठ पोलीस ठाण्याचा प्रस्ताव शासनास पाठवंण्यांत आला असून शासन आदेशानुसार सुधारित प्रस्ताव तयार करण्यांत येत असल्याचे सुतोवाच करणे, मालेगांव पोलीस आयुक्तालय कार्यान्वयीत झाल्यास, पोलीस बळाच्या संख्येत वाढ होऊन, सातत्याने बाहेरून पोलीस बंदोबस्त मागविण्याची वेळ प्रशासनावर येणार नाही, याबाबी विचारात घेता याप्रश्नी तात्काळ निर्णय होणेची आवश्यकता, तरी शासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होणे, शासनाने उक्त मागणी तात्काळ मंजुर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१११	३८३	**डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** " नाशिक शहर हद्दीत जानेवारी, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या नऊ महिन्याच्या कालावधीतच अपघाताच्या एकुण ७८६ घटना घडल्याचे	कित्ता.	

दिनांक ४ नोव्हेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध माहितीवरून निदर्शनास येणे, या अपघातात जीवघेण्या व गंभीर अपघातांची संख्या ३३३ इतकी असणे, रस्ते अपघातात १४७ व्यक्तींना आपल्या प्राणांस मुकावे लागणे, अनेकांना गंभीर दुखापत होणे, जानेवारी ते एप्रिल, २०१६ या कालावधीतील एकूण ३९३ अपघातांपैकी तब्बल ९४ घटनांमध्ये अपघातास कारणीभुत असलेले वाहन चालक घटना स्थळावरून फरार झाल्याचे समोर येणे, अपघाताच्या घटनेनंतर पळून जाणे (हिट ॲण्ड रन) कायद्याने गुन्हा असणे, हिट ॲण्ड रनच्या बऱ्याच केसेस पादचारी व्यक्तीच्यासंबंधी किंवा रात्रीच्या वेळेस झालेल्या असणे, अशा घटनांमध्ये जखमी व्यक्तीस वेळीच उपचार न मिळाल्याने मृत्युमुखी पडण्याची शक्यता अधिक प्रमाणात असणे, हिट ॲण्ड रनच्या घटना नाशिक महानगरात सातत्याने घडणे, यासंख्येत वाढ होणे, हे प्रकार रोखण्यासाठी सी. सी. टी. व्ही. कॅमेरे उपयोगी ठरणे, मात्र, सिंहस्थ कुंभमेळादरम्यान नाशिक शहरात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले सी. सी. टी. व्ही. काढून घेण्यात येणे, हिट ॲण्ड रनचे प्रकार सर्वत्रच वाढत असल्याने शासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाय त्वरित अंमलात आणण्याची गरज, शासनाने दुचाकी चालविणाऱ्यांसाठी १८ वर्षे पूर्ण वयाची मर्यादा निश्चित केलेली असणे, पण गेल्या काही कालावधीपासून ठिकठिकाणी अल्पवयीन मुले सर्रास दुचाकी चालवत असल्याचे निदर्शनास येणे, या अल्पवयीन मुलांकडूनच त्यांच्या दुचाकी 'धुम स्टाईल' ने पळविल्या जात असल्याने गंभीर स्वरुपाचे अपघातात सातत्याने वाढ होणे, या अल्पवयीन मुला-मुलींकडे मोपेडबरोबरच गिअरच्या दुचाकी सर्रासपणे पालकांनी सुपूर्द केलेली असणे, त्यामुळे अपघातांची संख्या वाढणे, शहरात विविध कॉलेज रस्त्यांवर व अन्य मार्गावरही तरूणांकडून सुसाट वेगाने दुचाकी चालविण्याचे प्रकारात मोठी वाढ होणे, अनियंत्रित वेग आणि दुचाकीवर असतांना मोबाईल सुरू ठेवणे, चित्र-विचित्र हावभाव-कसरती करणे, यामुळेही अपघातात आणि हिट ॲण्ड रनच्या प्रकारात वाढ झाल्याचे दिसून येणे, ज्येष्ठ नागरिक व विशेषतः कॉलेज तरूणींना या रोड

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रोमीओ मवाली, टवाळखोर दुचाकी मोटार सायकलस्वारांचा सर्वत्रच मोठा व असह्य जाच असणे, स्थानिक पोलीस प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होणे, याप्रकारामुळे अनेक जेष्ठ नागरिक सर्वसाधारण महिला व पुरूष तसेच मुला-मुलींना कायमचे जायबंदी व्हावे लागत असल्याने या 'धुम स्टाईल' स्टंटबाजीस कठोर कारवाईद्वारे तात्काळ रोखण्याची आवश्यकता, तसेच अल्पवयीन मुलांकडे दुचाकी नको याबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज, स्थानिक विभागांचे याकडे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "		
११२	५०७	**श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** "गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील चिचोडा या गावातील मनोहर आटला व रमेश या दोघा गावकऱ्यांची नक्षलवाद्यांनी दि. १० जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेली निर्घुण हत्या, हे दोन्ही गावकरी पोलीस खबरी असल्याच्या संशयातून या गावकऱ्यांची हत्या झाल्याचा पोलसिांना असलेला संशय, यापूर्वी सुद्धा याच ठिकाणी सुमारे १२ लोकांची नक्षलवाद्यांनी केलेली हत्या, त्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेले भितीचे वातावरण, नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यात पोलिसांना पर्यायाने शासनाला आलेले अपयश, नक्षलवाद्यांचा त्वरित बंदोबस्त करणेबाबत व हत्या करणाऱ्या नक्षलवाद्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
११३	५०९	**श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** "ठाणे जिल्ह्यातील भाईंदर येथील आझादनगर भागातील एका ४ वर्षीय बालिकेचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या केल्याची घटना दि. १५ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासूमारास उघडकीस येणे, पिडीत बालिकेला दिनांक ९ जानेवारी २०१७ रोजी रात्री ८. ०० वाजता	कित्ता.	

चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून ४ आरोपींनी तिच्यावर बलात्कार करून हत्या केल्याने तेथील नागरीकांत विशेषतः लहान मुलींमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, आरोपींना तात्काळ अटक करून संबंधित आरोपींविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

११४ ५३२ **श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** कित्ता.

" नेवासे तालुक्यातील (जि. अहमदनगर) हिंगोणी येथील प्राथमिक शाळेत इयत्ता ३ री व ४ थी मध्ये शिकणाऱ्या ९ विद्यार्थीनींचे गेल्या ६ महिन्यांपासून तेथील एक शिक्षक लैंगिक शोषण करीत असल्याचा धक्कादायक प्रकार दि. २१ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, या शिक्षकाने शाळेतील विविध खोल्यांमध्ये मुलींचे लैंगिक शोषण केल्याची बाब निदर्शनास येणे, घरी सांगितल्यास नापास करण्याची तसेच शाळेतून काढून टाकण्याची व मारहाण करण्याची धमकी देऊन या शिक्षकाने विद्यार्थीनींवर लैंगिक शोषण करणे, एका विद्यार्थीनीने त्रास असह्य झाल्याने आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितल्याने तिच्या पालकांनी संबंधित पोलीस स्थानकात फिर्याद दाखल केल्यामुळे हा प्रकार उघडकीस येणे, त्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात सविस्तर चौकशी करून संबंधित शिक्षकाविरोधात कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

११५ ५३३ **श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** कित्ता.

"कोल्हापूर जिल्ह्यातील कोवाड येथील सहाव्या इयत्तेत शिकणाऱ्या बालिकेवर तीन व्यक्तींनी बलात्कार केल्याची घटना दि. ४ व ६ फेब्रुवारी २०१७ रोजी उघडकीस येणे, या तीन व्यक्तींमध्ये एका विद्यार्थ्याचा समावेश असून आश्रमशाळेतील अधिक्षक व स्वयंपाकी यांचा समावेश असणे, अल्पवयीन मुलीवर आश्रमशाळेत बलात्काराची घटना घडल्यामुळे कोवाड परिसरातील नागरीकांत पसरलेले संतापाचे वातावरण, पिडीत बालिका कोवाड येथील आश्रमशाळेत शिकत असून दि. ४ फेब्रुवारी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		२०१७ रोजी एका विद्यार्थ्याने लैंगीक अत्याचार केले, तसेच आश्रमशाळांतील अधिक्षक यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २०१७ रोजी सदरहू बालिका कायदेशीर अभिरक्षेत असताना तिचा गैरफायदा घेऊन तिच्यावर बलात्कार केला तर आश्रमशाळेतील स्वयंपाकी यांनी दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ रोजी बालिकेवर बलात्कार केला, या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित आरोपींविरुद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "		
११६	५३५	**श्री. जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** "व्यापार आणि विविध मार्केटचे शहर म्हणून ओळखले जाणारे उल्हासनगर (जि. ठाणे) शहर सध्या हुक्का पार्लरच्या वाढत्या प्रस्थामुळे कॉलेज तरुणाईचे विशेष आकर्षण बनलेले असणे, उल्हासनगरमध्ये कॉलेज आणि क्लासेसची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने या शहरात येणाऱ्या तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने हुक्का पार्लरच्या व्यवसायाला येथे मोठ्या प्रमाणात आश्रय मिळत असून, अंबरनाथ, बदलापूर आणि ग्रामीण भागातील कॉलेज तरुण-तरुणींचे अनेक ग्रुप्सचा ओघ या हुक्का पार्लरकडे वळत असून, हुक्क्याच्या धुरात येथील तरुणाई भरकटत असल्याने येथील पालकांच्या मनात हा चिंतेचा विषय बनलेला असणे, जस्ट चिल च्या नावावर उल्हासनगरातील फोरवर्ड लाईन, शांतीनगर, रेल्वे स्टेशन परिसर, काजळ पेट्रोल पंप, गोल मैदान आदी भागांत अनेक हुक्का पार्लर राजरोसपणे सुरू असून, या हुक्का पार्लर चालकांशी पोलिसांचे आर्थिक हितसंबंध असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याकडे पोलिसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने, तरुण पिढी बरबाद होत असताना देशाचे भविष्य खराब करण्यासाठी कोणत्याही परकीय शक्तीची गरज नसताना, किरकोळ चिरीमिरीसाठी पोलीस	कित्ता.	

खात्याकडून हुक्का पार्लर चालकांना राजाश्रय मिळत असल्याने येथील नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाने याबाबत ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. ”

११७ १०६२ **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि. प. स.** कित्ता.

“मुंबईत एका आरोपीने कारागृह सुरक्षेच्या डोळ्यात धुळफेक करत कारागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या नावाखाली पोलिसांसह आयोजकांना टोपी घालून पसार झाल्याची धक्कादायक घटना माहे मार्च, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, मुंबईसह राज्यभरातील कारागृहात कैद्यांच्या मनोरंजनासाठी प्रशासनाकडून तसेच संस्थांच्या मदतीने विविध मनोरंजन कार्यक्रमाची आयोजन करण्यात येत असणे, या कार्यक्रमासाठी संबंधित आयोजक व प्रायोजनांची माहिती कारागृह प्रशासनाकडून घेतली जात असणे, मुंबई कारागृहात तसेच तळोजा कारागृहात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संदीप जाधव नामक व्यक्तीने कार्यक्रमाची आयोजन करणे, सुरूवातीला काही रक्कम अगाऊ दिल्यानंतर उर्वरित रक्कम देण्यास प्रायोजकांकडून होत असलेली टाळाटाळ, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने कारागृहातील मनोरंजन कार्यक्रमाचे नियोजन केले असल्याने कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेबाबत मोठे प्रश्नचिन्ह असणे, उक्त कारागृहात नामांकित गुन्हेगार शिक्षा भोगत असून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती बिनदिक्कत कारागृहात प्रवेश करीत असतील तर सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, परिणामी या घटनेमुळे राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, कारागृहात कोणतेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यापूर्वी आयोजक व प्रायोजक यांची चौकशी करण्याच्या कामात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
११८	१२३१	**डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि. प. स.** "नातेपुते (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील उत्तम दाजी साळवे या ६१ वर्षाच्या वृद्धांने चौथा इयत्तेत शिक्षण घेत असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, सदर घटनेचा गुन्हा नातेपुते पोलीस ठाण्यास दाखल करण्यात येणे, सदरहू आरोपी पीडीत मुलीला गेल्या दोन महिन्यांपासून मोबाईलमध्ये तिच्या सोबतच्या अनैसर्गिक कृत्यांचे फोटो काढत असणे, उपरोक्त घटनेबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची तिला धमकी देत असणे, स्थानिक पोलिसांनी तातडीने या आरोपीविरुद्ध कारवाई न केल्याने पीडीत मुलीच्या कुटुंबियामध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण पसरणे, सदर प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून तातडीने चौकशी करून आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
११९	१२७९	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** " राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने मु. पो तुळजापुर (जि. उस्मानाबाद) येथील तुळजाभवानी मंदिराच्या दानपेटीतील ७ कोटी १९ लाख रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी केलेल्या चौकशीत दोषी आढळलेल्या ११ आयएएस अधिकाऱ्यांसह ९ उप विभागीय अधिकारी, ९ तहसीलदर, १० ठेकेदार, मंदिराचा कारभार पाहणाऱ्या १४ व्यक्ती व ९ राजकारणी व्यक्ती अशा एकुण ६२ व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्याची शिफारस करून तीन ते चार महिने होऊनही अद्याप एकाही व्यक्ती विरोधात कारवाई करण्यात आली नसल्याची बाब उघडकीस येणे, ११ सनदी अधिकारी दोषी आढळत असूनही अशा अधिकाऱ्यांची खात्यांतर्गत चौकशी करण्यात		

शिफारस राज्य गुन्हे अन्वेषणविभागाने राज्य शासनाला करून या अधिकाऱ्यांना चौकशीत सुद्धा वेगळा दर्जा देवून त्यांची वेगळ्या मार्गाने चौकशी करण्याचा निर्णय घेतल्याने या प्रकरणातील अन्य दोषी व्यक्तींमध्ये निर्माण संभ्रम, चिड व संताप, गेली अनेक वर्ष तुळजाभवानी मंदिराच्या दानपेटीतील सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती व जमा होत असलेल्या लाखो रुपयांच्या रकमेचा स्वतःच्या अधिकारात अपहार करणाऱ्या संबंधित दोषी व्यक्तींविरुद्ध शासन कोणतीच पावले उचलत नसणे, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या चौकशीत संबंधित ६२ व्यक्ती दोषी आढळूनही या व्यक्तींविरुद्ध कारवाईस सुरूवात करण्यास होत असलेला विलंब, या प्रकरणी दोषी आढळलेले ११ आयएएस अधिकारी सध्या विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असून, त्यांच्या पुढील होणाऱ्या चौकशीमध्ये ते हस्तक्षेप करण्याची व्यक्त होत असलेली भिती, व अन्य दोषी व्यक्ती तसेच राज्यातील कोट्यवधी जनतेत सदर हस्तक्षेप निश्चितच होणार असल्याबद्दल निर्माण झालेली खात्री, व विश्वास राज्यातील साडेतीन शक्ती पिठांपैकी असलेल्या तुळजाभवानी मंदिराच्या दानपेटीतील गैरव्यवहार प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व व्यक्ती विरोधात तातडीने कारवाई करून कोट्यावधी भक्तांना न्याय मिळवून देण्यास शासनाला येत असलेले दारुण अपयश, व या प्रकरणी शासन दोषी व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्यास गंभीर नसल्याचे उघडकीस असल्यामुळे राज्यातील कोट्यवधी देवी भक्तांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१२० १३७३ **श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** कित्ता.

“मौजे बोळेगाव ता. देवणी, जि. लातूर येथील मागासवर्गीय जातीच्या कल्लापा आम्रता (कोनाळे) या ४० वर्ष युवकाचा पैशाच्या वादातून ४ जातीयवादी गुंडांनी त्याचा खून करून गावातील शेतातील विहिरीत नग्नावस्थेत मृतदेह टाकण्यात आल्याचे दिनांक २ सप्टेंबर २०१६ रोजी निदर्शनास येणे, सदर मृताच्या पत्नीने पोलीस अधिक्षक लातूर यांच्याकडे, दिनांक ८ सप्टेंबर २०१६ रोजी ४ जातीयवादी गावगुंडांच्या विरोधात एफ. आय.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आर. दाखल करून भा. दं. वि. ३०२, ३४ नुसार खुनाचा गुन्हा तसेच अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ नुसार ३ (२) (५) गुन्हा दाखल करण्यात येऊनही गुन्हेगारांवर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदर देवणी ठाण्याचे पोलीस अधिकारी कर्तव्यास कसूर करून आरोपीला अभय देत सदरचे प्रकरण दडपून ठेवणे, यामुळे सदर घटनेतील आरोपीना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, सदर प्रकरणी "समर्थन" या सामजिक संस्थेने मुख्यमंत्री व गृह राज्यमंत्री तसेच सचिव गृह यांना देण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने मोकाट आरोपींबाबत सामान्य जनतेत निर्माण झालेले भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१२१	१४४८	**श्री. रामहरी रुपनवर व इतर वि. प. स.** "सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या शिखर शिंगणापूरच्या घाटात फिरायला आलेल्या युवक-युवतीला मारहाण करत त्यांच्यावर अत्याचार आणि त्याचे चित्रीकरण केल्याची घृणास्पद घटना दि. ८ मार्च २०१७ रोजी घडली असणे, सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील हे महाविद्यालयीन युवक-युवती शिखर शिंगणापूर देवस्थानाच्या घाटात फिरायला गेले असता शिंगणापूर ते नातेपुते मार्गावर ते घरी परतत असताना नातेपुते येथील सुनील मारुती माने व त्याच्या मित्राने या दोघांना धाक दाखूवन निर्जन स्थळी नेले असणे, त्या दोघांनी त्यांना मारहाण करून अश्लील कृत्य करावयास सांगून त्याचे चित्रीकरण केले असणे, त्यानंतर या आरोपींनीही संबंधित मुलीवर अत्याचार केला असणे	कित्ता.	

व त्यांच्याकडील दागिने, रोख रक्कम, मोबाईल काढून घेतला असणे, त्यानंतर दुसऱ्याच दिवशी आरोपींनी चित्रीकरण रद्द करण्यासाठी १० हजार रुपयांची मागणी केली असणे, यासंदर्भात नातेपुते पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असतानाही तपासाबाबत संबंधित स्थानिक पोलीस अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असणे, परिणामी येथील जनमानसात शासनाप्रती असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, त्याकरिता शासनाने या गुन्हयातील दोषींवर करावयाची कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१२२ १४७० **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरातील ६ पोलीस चौक्यांपैकी ३ पोलीस चौक्या दोन वर्षापासून बंद तर ३ पोलीस चौक्यांची दुरावस्था झाली असल्याचे दि. १६ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, येथील काही पोलीस चौक्यांचा वापर दारु किंवा नशा करण्यासाठी तर काही पोलीस चौक्यांचा वापर खाजगी कंपन्यांकडून बांधकामाचे साहित्य ठेवण्यासाठी केला जाणे, विभागामध्ये पोलीस चौक्या नसल्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढणे, परिसरात एखादी अनुसूचित घटना घडल्यास स्थानिकांना दूर अंतरावरील शिवाजी नगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा लागणे, त्यामुळे येथील समाजकंटाकांकडून सर्वसामान्यांना त्रास होत असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्याकरिता शासनाने सदर चौक्यांची दुरुस्ती करून त्या कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१२३ १४८० **प्रा. जोगेन्द्र कवाडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिरवट मांडवा गावाजवळ दि. १४ जानेवारी २०१६ रोजी श्रीकृष्ण व्यंकटी उबाळे यांना प्रवास करीत असताना दारु पिऊन भरधाव वेगाने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		येणाऱ्या मोटारसायकल स्वाराने धडक देऊन गंभीर जखमी केले असतानाही व सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन एक वर्ष उलटूनही आरोपीस अद्याप अटक करण्यात आली नसल्याचे दि. १६ मार्च २०१७ रोजी निदर्शनास येणे, या घटनेतील आरोपी चाकूर तालुक्यातील (जि. बीड) हाडोळी येथील असून त्याचे नाव मोतीराम संभाजी चाटे असणे, परंतु सदर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी त्यास अटक करण्याबाबत दाखवित असलेली अनास्था व या घटनेतील जखमी यांच्या पत्नी मिरा श्रीकृष्ण उबाळे यांना त्यांनी मागितलेली माहिती देण्यास करीत असलेली टाळाटाळ, यामुळे मिरा उबाळे यांनी या घटनेतील आरोपीस गुन्हा दाखल करून विनाविलंब अटक करावी, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करून द्यावी तसेच आरोपीस अटक करण्यास निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित पोलिसांवर शिस्तभंगाची कारवाई दि. २८ मार्च २०१७ पर्यंत करावी अन्यथा जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयासमोर दि. ३० मार्च २०१७ पासून आमरण उपोषण करण्याचा मा. मुख्यमंत्री व संबंधित विभागाचे अधिकारी यांना दि. १६ मार्च २०१७ रोजी लेखी पत्र देऊन दिलेला इशारा, परंतु शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या उबाळे कुटूंबात व येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”		
१२४	१४९४	**श्री. संजय दत्त, वि. प. स.** “मुंबईत धार्मिक भावना दुखावणारे आक्षेपार्ह छायाचित्र समाज माध्यमातून पसरल्यांनतर शनिवार दि. १८ मार्च २०१७ रोजी चेंबूर येथील ट्रॉंबे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, हे छायाचित्र पसरविणाऱ्या तरुणाला आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी करत ट्रॉंब पोलीस ठाण्यावर		कित्ता.

चाल करून गेलेल्या हिंसक जमावाने जोरदार दगडफेक करून पोलिसांची व्हॅनही जाळण्यात येणे, या हिंसक जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार, गोळीबार करावा लागणे, या प्रकरणी संबंधित छायाचित्र पसरविणारा तरुण, एमआयएम नगरसेवक शहानवाज हुसेन तसेच १७ दंगलखोरांना अटक करणे, जातीय दंगली घडविणाऱ्या सदरील प्रकरणी राज्य शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

१२५ १५५७ **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.** कित्ता.

"मुंबई मध्ये रस्ते रुंदीकरणासाठी अनेक दुकाने व घरे तोडून रस्ते रुंदीकरणाची कामे करण्यात येणे, भांडूप परिसरात शिवाजी तलाव व केदार चौक पर्यंत अशी काही दुकाने तोडून रस्ता रुंदीचे काम करण्यात येणे, परंतु वाढवलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दुचाकी गाड्यांची पार्किंग केलेली असणे, सदर परिसरात पाच शाळा असून या शाळेतील विद्यार्थी याच मार्गावरुन ये-जा करत असणे, या भागात अनेक खाजगी ट्रव्हल्स टुर्सच्या गाड्यादेखील सुटत असल्यामुळे या परिसरात बऱ्याच वेळा वाहतूक व्यवस्था कोलमंडने, अनधिकृत पार्किंगमुळे वाहतुकीची कोंडी होणे, त्यामुळे तेथे मोठा अपघात होण्याची भिती निर्माण होणे, या परिसरात कायमस्वरुपी वाहतूक पोलीस चौकी उभारुन अनधिकृत पार्किंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक जनतेकडून करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१२६ १६२५ **श्री. जयवंतराव जाधव व इतर वि. प. स.** कित्ता.

"दि. २६ मार्च २०१७ रोजी रात्री इगतपुरी (जि. नाशिक) जवळील मिस्टीक व्हॅली हॉटेल परिसरात बॅचलर पार्टीवर पोलिसांनी धाड टाकुन १३ जणांना अटक करणे, त्यात चार तरुणींचा समावेश असणे, मिस्टील व्हॅली परिसरात बंगला क्र. ११ मध्ये रेव्ह पार्टी सुरू असल्याची पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे छापा टाकणे, सदर ठिकाणी मोठ्या आवाजातील गाण्यांवर तरुणींवर मद्यधुंद तरुण पैसे उधळत

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असल्याचे निदर्शनास येणे, मात्र पोलिसांनी या पार्टीमध्ये सहभागी तरुणांमधील केवळ ९ जणांवर गुन्हे दाखल केलेले असणे, दबावापोटी उच्चपदस्त अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांची नावे वगळण्यात आल्याची चर्चा असणे, सदर पार्टीबद्दल पोलिसांकडून दोन दिवस गुप्तता पाळण्यात येणे, घटनास्थळी अंमलीपदार्थ, रोकड रकमा मोठ्या प्रमाणात आढळूनही पंचनाम्यामध्ये कमीतकमी मुद्देमाल दाखवण्यात आल्याची चर्चा असणे, पोलिसांनी या गंभीर घटनेबद्दल पाळलेली गुप्तता आणि केवळ काही जणांनाच ताब्यात घेतल्यामुळे त्यांच्या भुमिकेवर संशय निर्माण झालेला असणे, सदर घटनेमध्ये मोठा गैरव्यवहार झालेला असणे, त्यामुळे नागरीकांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिडीचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." १२७ १९३ **श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "राज्यातील छोट्या ४८ बंदरांच्या सुरक्षा व्यवस्थेकडे होत असलेले दुर्लक्ष, दहशतवाद्यांकडून या मार्गाचा भविष्यात वापर केला जाण्याची असलेली शक्यता, सदर ४८ छोट्या बंदरांची सुरक्षा व्यवस्था महाराष्ट्र मेरीटाईम मंडळाकडे असणे, या छोट्या बंदरांचा अतिरेक्यांकडून वापर होण्याची शक्यता असल्याचा अहवाल गुप्तचर यंत्रणेने दिलेला असतानाही या बंदरांच्या सुरक्षा व्यवस्थेकडे आवश्यक ते लक्ष पुरविण्यात आलेले नसणे, याशिवाय ४४१ लॅण्डिंग पॉईंटची पोलीस, नौदल आणि तटरक्षक दलाने संयुक्त पहाणी केली असता या ठिकाणी तात्काळ सीसीटीव्ही, थर्मल कॅमेरा बसविणे आवश्यक असल्याचे दिसून आलेले असणे, तसेच १२८ लॅंडिंग पॉईंटही सुरक्षेविना असल्याचे त्यांना दिसून आलेले असणे, याबाबत संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून परिणामकारक उपाययोजना करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे		कित्ता.

निर्माण होणारी गंभीर परिस्थिती, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. "

१२८ १२३५ **श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** कित्ता.

"राज्याला ७२० कि. मी. लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारपट्टी लाभलेली असूनही जलवाहतुकीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येणे, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत चालू असलेली जलवाहतूक सेवा तोट्यात चालत असल्याचे कारण देवून सन १९९० मध्ये बंद होणे, महाराष्ट्राच्या तुलनेत गोवा, केरळ, गुजरात, प. बंगाल, कर्नाटक इतर राज्यांमध्ये समुद्र किनाऱ्याचा वापर करून स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांसाठी जलवाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असणे, मात्र राज्याला विस्तीर्ण लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला असतानाही शासनाचे जलवाहतुकीकडे दुर्लक्ष झालेले असणे , परिणामी कोकण किनाऱ्या वर असलेली वेंगुर्ला, मालवण, देवगड, विजयदुर्ग , जयगड इ. बंदरे ओस पडलेली असून सदर बंदरांच्या परिसरात राहणाऱ्या जनतेच्या विकासावरसुद्धा याचा विपरीत परिणाम झालेला असणे, त्यामुळे शासनाने स्थानिक नागरिकांसाठी तसेच पर्यटकांसाठी जलवाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१२९ १११ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील वांद्रे येथील लीलावती, मुलूंड येथील फोर्टीस, अंधेरीचे कोकिलाबेन अंबानी, परळचे ग्लोबल, पवईमधील हिरानंदानी आणि गिरगावातील सर एच. एन. रुग्णालय वैद्यकीय उपकारणांवरील छापील किंमतीपेक्षा अधिक किंमत रुग्णांकडून उकळून रुग्णांची पिळवणूक करीत असल्याची बाब उजेडात येणे, राज्यशासनाने जसलोक, ब्रीच कॅन्डी, बॉम्बे हॉस्पिटल, लिलावती, हरकिसनदास, नानावटी, हिंदुजा अशा अनेक खाजगी धर्मादाय हॉस्पिटलला ना माफक दरात जागा दिलेली असणे, त्याबदल्यात त्यांच्यावर घालण्यात आलेल्या अटीनुसार गरिब रुग्णांना सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा पुरविण्याची त्यांच्यावर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जबाबदारी असणे, सदरील धर्मादाय हॉस्पिटल बदलवारंवार तक्रारी येऊनही कोणतीच कारवाई करण्यात न येणे, नियमानुसार सदर हॉस्पिटलांना एकूण खाटांच्या (बेडच्या)२० टक्के बेड गरिब रुग्णांसाठी आरक्षित ठेवणे, स्वस्तप दरात औषधे उपलब्ध करणे बंधनकारक असणे, परंतू सदर रुग्णालये नियम तोडून कागदोपत्री पुरावे न ठेवून आरक्षित बेडची सुविधा इतर रुग्णांना पुरवित असणे, यामध्ये कागदोपत्री खोटा रिपोर्ट करत असल्याने आढळून येणे. मा. मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचा गैरव्यवहार रोखण्याच्या दृष्टिने रुग्णांच्या रेशन कार्ड तसेच दारिद्ररेषेखाली असल्याचा पुरावा ऑनलाईन तपासण्याचे सॉफ्टवेअर तयार करण्याचे संबंधित सुचना दिल्या असणे, त्याच्याकडेही सदर रुग्णालयाने कानाडोळा करीत असणे, यामुळे शासन निर्णय जारी करून देखील सदर रुग्णालयाचे शासनास दाद देत नसल्याचे आढळून आल्याने राज्यातील रुग्णांमध्ये व जनमानसात पसरलेली चिडीची व असंतोषाची भावना, याकरिता राज्यशासनाने धर्मादाय रुग्णालयाकडून गरीब रुग्णांची होत असलेली फसवणूक रोखण्याबाबत व सदरील रुग्णालयाचा गैरव्यवहाराबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. "		
१३०	३१	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "नागपूर येथील मिहान सेझ प्रकल्पाबाहेरील सुमारे २३० एकर क्षेत्रातील जमीन रामदेव बाबा यांच्या पतंजली समूहाला २५ लाख रुपये प्रति एकर या नाममात्र दराने देण्याचा घेण्यात आलेला निर्णय, मिहानमधील जमिनी उद्योजकांना देण्याच्या सध्याच्या निकषातील काही निकष बदलून सदर जमीन देण्यात आलेली असणे, मिहानमधील रामेदव बाबांच्या पतंजली फूड व हर्बल पार्कचे सदर जागेवर मा. केंद्रीय भूपृष्ठ मंत्री यांच्या उपस्थितीत व मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक १० सप्टेंबर	कित्ता.	

२०१६ रोजी अथवा त्यासुमारास संपन्न झालेले भूमीपूजन, सिहान प्रकल्पाच्या बाहेरील जमिनीचा दर १ कोटी १६ लाख ३२ हजार प्रती एकर असा असणे, त्यामुळे २३० एकर जमिनीची किंमत सुमारे २६७ कोटी ५३ लाख ६० हजार एवढी असणे, असे असताना रामदेव बाबा यांच्या पतंजली समूहाला सवलतीच्या दराने म्हणजेच २५ लाख रुपये प्रती एकर या सवलतीच्या दराने जमीन देण्यात आल्यामुळे शासनाचे सुमारे २०९ कोटी रुपयांचे झालेले नुकसान, सदर नुकसान कसे भरुन काढण्यात येणार याचा विचार झालेला नसणे, यात राज्याचे हित कशाप्रकारे अपेक्षित आहे ते किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, हे स्पष्ट झालेले नसणे, दि. १० सप्टेंबर २०१६ रोजी सदर जमीन देण्यात आलेली असणे, शासनाच्या अटीनुसार सहा महिन्यात कामाला सुरूवात करून १८ महिन्यात उत्पादन सुरू होणे आवश्यक असणे, मात्र त्यादृष्टीनेही कार्यवाही होत नसल्याचे दिसून येणे, यात राज्याचे अहित असल्याचे दिसून येत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व बाबी स्पष्ट करण्याची व सदरच्या नियमबाह्य कृतीमुळे याबाबत फेरविचार करण्याची नितांत गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. संजय दत्त व इतर वि. प. स. कित्ता.

" राज्यात दिनांक २१ फेब्रुवारी २०१७ रोजी १० महानगरपालिका, ११ जिल्हा परिषद आणि ११८ पंचायत समित्यांच्या झालेल्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मशीन (EVM मशीन) मध्ये झालेला घोळ, मतदार यादीतून नावे गायब झाल्याचे प्रकार उजेडात येणे, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर मध्ये इलेकट्रॉनिक मतदान यंत्रांत (EVM मशीन) निर्माण झालेल्या गोंधळामुळे अनेकांना मतदानापासून वंचित रहावे लागल्याची बाब उजेडात येणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांत (EVM मशीन) मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचे सर्व राजकीय पक्षाने आक्षेप घेऊन सोलापूर, कोल्हापूर मध्ये नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन शासनाच्या विरोधात घोषणा देण्यात येणे, मुंबईच्या विविध भागातून मतदार यादीतून ११ लाख मतदारांची नावे गायब झाल्याने सुमारे ११ टक्के मतदारांना

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आपल्या मतदानाच्या हक्कापासून वंचित रहावे लागणे, याद्यांमध्ये नाव न सापडणे, नाव शोधण्यातील अडचणी आणि नाव गायब असणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांत (EVM मशीन) मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याने शासनाबाबत सर्वसामान्य जनमानसांत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "		
१३२	२८६	**श्री. हरिसिंग राठोड, वि. प. स.** "महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे जनक स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्धी वर्षाचे औचित्य साधून राज्य शासनाने विविध कामासाठी १०० कोटी रुपयाची तरतूद करणे, त्याचाच एक भाग म्हणून स्वर्गीय वसंतराव नाईक त्याच्या नावाने नागपूर येथे जागतिक दर्जाचे क्रीडा संकुल व सभागृह निर्माण करण्याकरिता वेळ काढूपणा, विलंब लावणे , आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अशा सर्व सोयी असलेल्या क्रीडा संकुल व सभागृहाचे काम वेळेत पूर्ण न करणे, तसेच याचाच एक भाग म्हणून विदर्भ एक्सप्रेसचे नाव वसंतराव नाईक विदर्भ एक्सप्रेस नामकरनासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा न करण्यात येणे, या करिता वसंतराव नाईक जन्मशताब्धीचा फेर आढावा घेऊन, राहिलेल्या बाबी पूर्ण करण्याकारीता अद्याप पर्यंत काहीच उपयोजना न करणे, जिल्हा परिषदे मधील प्रत्येक सभागृहाला नाईक साहेबाचे नाव देण्यात न आल्यामुळे, स्वर्गीय वसंतराव नाईक यांना मानणाऱ्या विमुक्त आणि भटक्या समाजामध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

१३३ ६७० **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

" महाराष्ट्राची अस्मिता असलेले नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात सध्या मराठी अधिकारी/कर्मचारी यांचेवर तेथे कार्यरत असलेल्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या सुमारास उघडकीस येणे, निवासी आयुक्त व गुंतवणूक आयुक्त या पदावर कार्यरत असलेल्या या दांपत्यांनी गेल्या दोन वर्षात त्रास देण्याचा सपाटा लावल्याने अनेक कर्तव्यदक्ष कर्मचारी येथे काम करण्यास अनुत्सुक असणे, या दांपत्याच्या कालावधीत जवळपास २५ मराठी अधिकारी/कर्मचारी यांना परत महाराष्ट्रात मूळ विभागात पाठविण्यात येणे, सदनाचा हाऊसकिपींगचा स्टाफ घरी कामावर ठेवणे, अनेक वस्तु घरी पाठविण्यास सांगण्यात येणे, सदनाच्या खर्चातून स्वतःच्या निवासस्थानाची रंगरंगोटी करणे, सदनास वाहन पुरवठा करणाऱ्या कंपन्यासोबत हातमिळवणी करणे, विनाकारण काही कर्मचाऱ्यांना निलंबित करून सहकारी कर्मचाऱ्यांकडून जबरदस्ती दबाव टाकून त्याच्या विरोधात जबाब घेणे, दमबाजी करून कर्मचाऱ्यांना धमकावणे, या सर्व सुडबुद्धीने निवासी आयुक्तांनी केलेल्या कृती तात्काळ थांबऊन मराठी कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय थांबविण्याची आवश्यकता, महाराष्ट्र सदनातून या दांपत्याची बदली करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

१३४ ८३ **श्री. प्रकाश गजभिये व इतर वि. प. स.** कित्ता.

"केंद्र शासनाने चलनबंदीचा निर्णय घेतल्यामुळे राज्यातील मुद्रांक शुल्कातून मिळणाऱ्या महसुली उत्पन्नात सुमारे १ हजार कोटी रुपयांचा फटका शासनाला बसलेला असणे, त्यामुळे राज्याच्या विकासकामावर होत असलेला विपरीत परिणाम, जानेवारी, २०१६ पर्यंत राज्याच्या मुद्रांक शुल्काचा महसूल १७ हजार १४४ कोटी रुपये असणे, आता या वर्षी जानेवारी, २०१७ अखेर राज्याचा महसूल १६ हजार २५४ कोटी रुपये खाली घसरणे, याचा मोठा फटका बांधकाम व अन्य उद्योगांना बसला

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असून बांधकाम व्यवसाय अडचणीत आलेला असणे, या चलनबंदीमुळे जागांच्या व घरांच्या किंमतीतही घट होऊन घरखरेदीचे व्यवहार मंदावले असणे, मुद्रांक शूल्क हा राज्य शासनाच्या महसूलाचा आणि उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून चलनबंदीमुळे हा स्त्रोत ५० दिवस बंद राहील्यामुळे व अद्यापही हे व्यवहार गतीमान न झाल्यामुळे राज्याच्या मुद्रांक शूल्क महसूलात प्रचंड प्रमाणात घट होणे, यावर तातडीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१३५	१७६	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** " राज्यात सातबाराच्या नोंदीसाठी तांत्रिक पाठबळाचा अभाव आणि कर्मचाऱ्यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान नसल्याने सातबाराच्या ऑनलाईन नोंदी रखडल्या असणे, व बहुतांशी तलाठ्यांना ही यंत्रणा हाताळतानाही अनेक अडचणी येत असणे, संपूर्णराज्यातून एकाच वेळी तलाठी लॉग इन करीत असल्याने सर्व्हरवर ताण येऊ लागल्याने ही यंत्रणा कोलमडणे, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या प्रत्येक कामासाठी सातबाराच्या अद्ययावत उताऱ्याची गरज भासते, तो तात्काळ मिळत नसल्याने त्यांची अडचण येत असणे, ६ महिन्यांपासून अनेक प्रस्ताव प्रलंबित असणे, जमिनी खरेदी विक्रीला ऑनलाईन सातबारा मिळत नसल्याने खरेदीची विक्री नोंद होत नसल्याने शासनाला त्यांचे रुपयांचा महसूल जमऊन देण्याच्या खरेदीत-विक्री होत नसणे व सर्व सामान्य जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना व याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून सातबारासाठी असलेली ऑनलाईन प्रक्रिया त्वरित सुधारण्यासाठी करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

"शासनाकडून १९१३ साली ९९ वर्षांच्या कराराने ऋषिकेश मफतलाल यांच्या मफतलाल इंडस्ट्रीजने अटी व शर्तीवर घेतलेला भायखळा, मुंबई येथील भूखंड, या कंपनीने बिल्डर्स बिल्डकॉन एलएलपी ला २०११ साली ६०५ कोटी रूपयांना हस्तांतरित केल्यानंतर शासनाच्या संमती शिवाय भूखंडाच्या विकासाचे हक्क परस्पर अन्य व्यक्ती वा संस्थेला विकल्याबद्दल दि. १५/१०/२०१२ साली जिल्हाधिकारी यांनी मफतलाल इंडस्ट्रीला ४५४ कोटी रुपये शासनाला देणेबाबत पाठविलेली नोटीस, अद्यापी शासनाच्या नोटीशीची कोणतीही दखल सदर कंपनीने न घेणे, मफतलाल कंपनीने महाराष्ट्र जमीन महसूल संहीतेच्या २९५ व्या कलमाचा केलेला भंग, त्यामुळे बाजारभावाप्रमाणे भाडे आणि मुद्रांक शुल्क घेण्याचा सरकारला असलेला अधिकार, त्याला अनुसरून जिल्हाधिकारी यांनी बिल्डर्स बिल्डकॉनला मफतलाल इंडस्ट्री ४५४ कोटी रुपये शासनाला अदा करेपर्यंत त्यांचा या भूखंडावर हक्क राहणार नाही अशी नोटीस पाठविल्याचे नोव्हेंबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, स्प्रींग ऍण्ड व्हिव्हिंग कंपनी सध्याची मफतलाल या कंपनीने या भूखंडापैकी काही भाग राणीच्या बागेच्या विस्तारासाठी दिल्यानंतर शासनाने लीजचे नूतनीकरण करणे, त्या नूतणीकरणाच्या वेळेस सदर कंपनीला घालण्यात आलेल्या व त्यांनी मान्य केलेल्या अटींची पुर्तता न करता भागधारकांची दिशाभूल करून मफतलाल कंपनीने बिल्डर्स बिल्डकॉनला अनधिकृतरित्या जमिनीचे केलेले हस्तांतरण, मफतलाल इंडस्ट्रीने शासनाच्या भूखंडाच्या व्यवहारातून नफा मिळविला असून शासनाच्या तिजोरीत न भरता त्याचा केलेला दुरूप्रयोग व गैरव्यवहार, सदर भूखंडाचे हस्तांतरण करताना वा त्याच्या दस्तऐवजाची नोंदणी करून योग्य तो कर भरताना शासनाच्या दस्तऐवज नोंदणी अधिकाऱ्यांनी त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे या हस्तांतरणास कोणत्याही प्रकारची संमती न देता संबंधित कंपनीकडून त्यांना नोटीशीद्वारे ठोठविलेला दंड वा अदा करण्यास सांगितलेली रक्कम वसूल करण्यात

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		यावी व गेली तीन-चार वर्षे सदर कंपनी शासनाच्या आदेशाकडे हेतूतः दूर्लक्ष करीत असून सुद्धा शासन संबंधित कंपनी विरूद्ध कारवाई करीत नसल्यामुळे निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१३७	१८१	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "कोकण विभागीय आयुक्त यांनी मनोर-वाडा-भिवंडी रस्त्याचे ठेकेदार सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर यांनी ७ लाख ५० हजार ब्रास गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची २९ कोटी इतकी रक्कम शासनाला न देता त्याचा अपहार केल्याबाबतच्या तक्रारीची पूर्ण चौकशी करून सदर कंपनी दोषी आढळल्याने कंपनी व ठेकेदारांकडून पाचपटीच्या दंडासह रक्कम वसूल करावी असे पत्र पालघर व ठाणे जिल्हाधिकारी यांना ऑगस्ट, २०१६ मध्ये पाठवूनही अद्यापी या कंपनीने वा ठेकेदाराने मूळ रकमेसह दंडाचा भरणा शासनाकडे केला नसल्याची बाब उघडकीस येणे, सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने ७ लाख ५० हजार ब्रास गौण खनिजाचे उत्खनन करेपर्यंत त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध कोणतीही कारवाई करण्यात न येणे, तसेच सदर सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने दरमहा गौण खनिजाच्या स्वामीत्व धनाची रक्कम शासनाला जमा करणे अपेक्षित असतानाही, सदर कंपनीने ती न केल्याने शासनाच्या महसूल बुडविण्याची या कंपनीची तयारी असल्याचे उघडकीस येणे, कोकण विभागीय आयुक्तांनी केलेल्या चौकशीमध्ये सदर कंपनी दोषी आढळुन येऊनही त्यांचे विरोधात पाचपटीच्या दंडासह रक्कम वसूल करण्याचे आदेश देऊनही अद्यापी त्याची कार्यवाही न झाल्यामुळे महसूल व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांचे व या कंपनीचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळे हे दोघेही संगनमताने शासनाचा महसूल हेतूतः बुडवित असल्याचे उघडकीस	कित्ता.	

येऊनही त्यांचेविरोधात कारवाई करण्यात न आल्याने ठाणे जिल्ह्यातील कोट्यवधी जनतेच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१३८ २०० **ॲड. अनिल परब, वि. प. स.** कित्ता.

"नगर भूमापन मुलुंड(५) तालुका कुर्ला जिल्हा मुंबई उपनगर येथील न. भू. क ६६४, ६६४/१ते९ एकूण क्षेत्र ७५६. ४ चौ. मी या मिळकतीचे मूळ मालक श्रीमती सुंदराबाई श्रीपाद वाघ यांनी सदरहू मिळकत श्री जेम्स सॅम्युएल यांना नोंदणीकृत कन्फमेंशन दस्त क्र. ६४३८/२०११ दिनांक १३ जून २०११ अन्वये विक्री करणे, श्रीमती सुंदराबाई श्रीपाद वाघ यांनी दिनांक ३ डिसेंबर १९८१ रोजी सिताराम महाबळेश्वर वाघ यांना मुख्यत्यार धारक म्हणून नेमण्यात आले होते परंतु मुख्यत्यारधारक श्री सिताराम वाघ यांनी सदरहू मिळकत आनंदकुमार दरगर यांना विक्री करणे, उपरोक्त मिळकत मूळ मालक यांनी २०१९ मध्ये श्री. जेम्स सॅम्युएल यांना विक्री केलेला असताना मुख्यत्यारधारक श्री सिताराम वाघ यांनी उक्त मिळकत आनंदकुमार दरगर यांना विक्री करून जमीन विक्री खरेदी प्रकरणात झालेला गैरप्रकार, जमिनीचे मूळ मालक श्रीमती. सुंदराबाई वाघ यांची दि २३ जून १९८७ मध्ये निधन झाले असून त्यावेळी त्यांचे वय ८१ वर्षाचे असणे, असे असतांना बनावट कागदपत्रे तयार करून सदर कागदपत्रामध्ये सुंदराबाई वाघ यांचे वय ५७ नोंद करण्यात येणे, उक्त कुलमुख्यत्यार सन १९८१ पर्यत सिताराम महाबळेश्वर वाघ यांचेकडे चालू होते परंतु त्यानंतर दिनांक ३ डिसेंबर १९८४ रोजी सिताराम महाबळेश्वर वाघ यांचे नाव मुखत्यार पत्रातून रदद करण्यात आल्याचे कुठेही दस्तेएवज नाही. सिताराम वाघ यांचे कुलमुख्यत्यार पत्र कायदेशीररित्या रदद झालेले नाही किंवा तशा प्रकारे इंग्लिश व मराठी दैनिकांत त्यांची जाहीर नोटिस देखील काढण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नसणे, उक्त सर्व कायदेशीर बाबीचा बगल /उल्लंघन करून उपरोक्त मिळकत १९८४ मध्ये अनिल एम भोईर यांनी नोंदणी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		केलेले नाही किंवा श्री जेम्स सॅम्युअल यांनी देखील सन २००८ मध्ये दिनांक १६ सप्टेंबर. २००८ रोजी नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांचेकडे दिनांक ०३ डिसेंबर १९८४ रोजी विक्री करारानुसार मिळकत पत्रिकेत नाव दाखल झालेले नसणे, मूळ मिळकतदार सुंदराबाई वाघ या २३ जून १९८७ रोजी निधन पावल्या असून बदंर-३/६४३८/२०११ बोगस सहीच्या आधारे दस्तऐवज नोंदणी करण्यात येणे, सदर दस्तऐवज करून अनिल एम भोईर यांचे कुलमुखत्यारपत्र बनावट असणे, तसेच जेम्स सॅम्युअल यांनी करून दिलेली नोंदणी ३/७०४०/२०११ आनंद कुमार हिरालाल दरगर यांना मिळालेली मिळकत बोगस बनावट सहीच्या आधारे असल्याचे उघडकीस येणे, तसेच जेम्स सॅम्युअल यांनी २६ वर्षाने सदरहू व्यवहार नोंदणी केले असणे, श्री. अनिल भोईर, आनंदकुमार दरगर, जेम्स सॅम्युअल यांचे मुखत्यारपत्र हे नोंदणीकृत नसल्याचे तसेच दिनांक ३ डिसेंबर १९८४ चे मुख्यत्यारपत्रात पूर्वीचे दिनांक ०३ डिसेंबर १९८१ चे मुखत्यारपत्र रद्द केलेल्याबाबत कुठेच नमूद नाही यावरुन सदर प्रकरणात गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, शासनाची दिशाभूल करून खरेदीखत केल्याप्रकरणी सखोल चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "		
१३९	३२५	**श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** "सुनामी लाटा किनाऱ्यावर रोखणे, माश्यांच्या पुर्नउत्पादनासाठी आवश्यक असणे, तसेच हवेचे प्रदूषण कमी करण्याचे काम करण्यासाठी कांदळवनांची आवश्यकता असणे, मात्र मुंब्रा, दिवा, घोडबंदर, मीरा भाईंदर, नवी मुंबई येथील कांदळवने बिल्डर आणि वाळु माफियानी नष्ट करणे, भिवंडी	किंता.	

आणि ठाणे तालुक्यातील १६०० हेक्टर ५० मिटर अंतरावर कुठलेही बांधकाम करण्याला मा. उच्च न्यायालयाने मनाई केलेली असणे, तरी ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात कनकिया नगर, तिवारी कॉलेज रोड, शिवनेरी नगर या परिसरात बांधकाम सुरू असणे. कांदळवन नष्ट करणाऱ्या सुमारे ६२ जणावर गुन्हे दाखल होणे, मात्र कांदळवन नष्ट करण्याचा गुन्हा करणाऱ्यांना भिती नसणे, याबद्दल शासनाची अक्षम्य उदासिनता, नागरिकांच्या मध्ये तीव्र चिड असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१४० ४४३ **श्री. जयंत पाटील, वि. प. स.** कित्ता.

"मे. गोदरेज अँड बॉईज मॅनुफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड यांनी मौजे वडखळ, ता. खालापूर, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ७२ / अ ६९ वगैरे ८८ या जमिनीची बिनशेती व बांधकाम परवानगी मिळावी म्हणून जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयात व तहसीलदार, खालापूर यांच्याकडे अर्ज सादर करणे, मे. गोदरेज अँड बॉईज मॅनुफॅक्चरिंग कंपनीने २०० एकर जागेचे बिनशेती व बांधकाम परवानगी मिळण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्राची सखोल चौकशी न करता जिल्हाधिकारी, रायगड - अलिबाग यांनी सदर कंपनीस बिनशेती व बांधकाम परवानगी देण्यात येणे, मे. विनोद ट्रेडींग कॉर्पोरेशन, खोपोली, जि. रायगड यांनी मे. गोदरेज अँड बॉईज मॅनुफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड विरोधात पनवेल न्यायालयात दावा सन २००३ पासून सुरू असून सदर न्यायालयाकडून मे. विनोद ट्रेडींग कॉर्पोरेशनच्या बाजूने डिक्री मिळणे, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असतानाही जिल्हाधिकारी, रायगड - अलिबाग तसेच तहसीलदर खालापूर, तलाठी, मंडळ अधिकारी यांनी सदर बाबत योग्यती चौकशी न करता मे. गोदरेज अँड बॉईज मॅनुफॅक्चरिंग कंपनीस सर्व्हे नं. ७२/अ ६९ वगैरे ८८ या जमिनीची बिनशेती व बांधकाम परवानगी देण्यात येणे, सदर जागेबद्दल पनवेल न्यायालयात दावा सुरू असतानाही मे. रिलायन्स सिलिकॉन (इं)लि. कंपनीने कर्मा इन्फ्रास्ट्रक्चर अँड डेव्हलपमेंट कंपनीला सदर जागा विकणे, त्यानंतर कर्मा इन्फ्रास्ट्रक्चर अँड डेव्हलपमेंट कंपनीने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मे. गोदरेज अँड बॉईज मॅनुफॅक्चरिंग कंपनीला सदर जागा विकत देऊन शासनाची फसवणूक करण्यात येणे, सदर बाब न्यायप्रविष्ठ असतानाही मे. गोदरेज अँड बॉईज मॅनुफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, वडखळ, ता. खालापूर, जि. रायगड - अलिबाग, तहसीलदर, खालापूर, तलाठी, मंडळ अधिकारी व संबंधित कंपनी यांच्यात झालेला सर्व व्यवहार संशयास्पद असणे, सदर व्यवहारात गैरव्यवहार झाल्याची दाट शक्यता असणे, तरी सदर प्रकरणाची उच्च पातळीवर या प्रकल्पाची तातडीने चौकशी करून स्थगिती देण्याची कार्यवाही करण्यासाठी शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना. "		
१४१	४९२	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर, ता. कोरेगांव येथील एका सेवानिवृत्त सुभेदारास मंजूर करण्यात आलेल्या भूखंडाची कागदपत्रे संबंधित विभागात उपलब्ध नसल्याचे बेजबाबदार उत्तर माहे फेब्रुवारी, २०१७ वा त्या सुमारास माहिती अधिकारात प्राप्त होणे, जिल्हाधिकारी, सातारा यांचे दिनांक १२ ऑगस्ट, १९६८ तसेच नगर भूमापन कार्यालय यांचे दिनांक २० सप्टेंबर १९६८ च्या पत्रान्वये रविवार पेठ सी टी सर्व्हे क्रमांक १६६ अ/१, सातारा येथील भूखंड मंजूर करण्यात येणे, सदर पत्रान्वये त्यांना त्या भूखंडाची किंमत म्हणून रुपये ३६४७ कोषागारामध्ये भरण्याचे आदेश देण्यात येणे, त्यानुषंगाने त्यांनी दिनांक ११ ऑक्टोबर १९६८ रोजी भूखंडाचा मोबदला म्हणून रुपये ३६४७ कोषागारात चलनाने भरणा करणे, सदर चलनाची प्रत जोडून भूखंडाचा ताबा मिळणेकरिता नगर भूमापन अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करण्यात येणे, संबंधित सुभेदार यांनी भारतीय सेवा दलात एकूण ३४ वर्षे सेवा बजावलेली असणे, भूखंड मंजूर होऊनही व त्याबाबतची किंमत चलनाने कोषागारात		कित्ता.

भरुनही अद्यापही भूखंडाचा ताबा न मिळणे, अर्जदाराचे वय १०० वर्ष असणे, याबाबत त्यांना झालेला व होणारा मनस्ताप, सेवानिवृत्त सुभेदारास त्यांच्या वयोमानाचा विचार करून मंजूर झालेला भूखंड वितरित करण्याची नितांत आवश्यकता, याबाबतचा संपूर्ण दस्तऐवज संबंधिताकडे उपलब्ध असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१४२ ५१९ **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"भूकर क्रमांक ६३९ क्षेत्र ७१०७१ चौ. मी. बि. बि. आर ब्लॉक क ५ या शासकीय जागेचा एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रीयल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर या संस्थेने शासकीय जागेचा गैरवापर केल्याचे सिद्ध झाल्याने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक २४ नोव्हेंबर २०१६ च्या आदेशान्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत मिळकत शासनाच्या ताब्यात घेण्याचे आदेशित करण्यात येणे, याविरुद्ध संबंधित संस्थेने मा. उच्च न्यायालयात धाव घेऊन जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश मिळवणे, या प्रकरणी शासनाकडून योग्य प्रकारे बाजू मांडण्यात न येणे, संस्थेकडून त्यांच्या उत्पन्नाच्या ५०S हिश्श्याची रक्कम देण्याची तरतूद असतांना कित्येक वर्षापासून शासनाला ती रक्कम देण्यात न येणे, कोट्यवधी रुपयाचे संस्थेकडून येणे असतांना शासनाकडून वसुलीबाबत काही हालचाल करण्यात न येणे, संस्थेस अधिकार नसतांना उक्त जमिनीपैकी १३३२६ चौ. मी. जागा मेकर्स चेंबर यांना पोटभाड्याने देणे, या जागेबाबत मेकर्स-चेंबर्स यांचेकडून मा. उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात येणे, याबाबत शासनास कोणतीही माहिती देण्यात न येणे, या दाव्यात शासनाने इंटरव्हीनर होण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासकीय मिळकतीवर विना परवाना बांधकाम करण्यात येणे, गाळे विनापरवाना भाडेतत्वावर देण्यात येणे, कन्व्हेशन सेंटर व लक्झरी हॉटेल बांधण्यासाठी दुसऱ्या संस्थेस विनापरवानगी जागा भाड्याने देणे, या सर्व गैरव्यवहाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कारवाई करण्याची आवश्यकता, यामुळे शासनाचे झालेले कोटयवधी रुपयांचे नुकसान, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."		
१४३	७१९	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "राज्याच्या विशेषतः औरंगाबाद (मराठवाडा) या शासकीय विभागीय महसुली विभागांतर्गत नियंत्रित सता प्रकारच्या भोगवट खालील जमिनींचे हस्तांतरण वा विक्री व्यवहार नसतानाही तेथील महसुली माफीयानी आणि महसूल अधिकाऱ्यांच्या वरदहस्त असलेल्या इनाम वर्ग-१ च्या सिलींग जमीन कायदा अंतर्गत हस्तांतर व विक्रीची परवानगी (जसे गोपाळपूर, ता. जि. औरंगाबाद, गट नं. २०, गिरनेरा तांडा, गट नं. ८८, ८/९ मलकापूर गट नं. २४, तीसगाव गट नं. २२५/५, हर्सुल सांगवी गट नं. १३/३, १३/४, १३/३, ४ व ५ तसेच तुळजापूर गट नं. ११/५ आणि परदरी, ता. जि. औरंगाबाद गट नं. १३ सर्व जमिनी औरंगाबाद महसुली लेखाप्रमाणेची खरेदी-विक्री वा हस्तांतरण बेकायदेशीररित्या करण्याचा केलेला प्रकार, सदर बाबतीत विधि मंडळाच्या या पूर्वीच्या विधानसभा तारांकित प्रश्नाव्दारे कोणतीही ठोस कृती वा कारवाई गढीत न होणे, सदर बाबतीत मूळ शेतजमीन धारकांच्या भूवाटा वर्ग-२ मधील तरतुदीनुसार जमीन हस्तांतराचे घडलेले वेगवेगळे प्रकार व त्याबाबत संबंधित उप जिल्हाधिकारी (सा. प्रा. औरंगाबाद) यांना नियमबाह्यपणे वा प्रतिपक्षाच्या लाभात केलेली कृती, सदर प्रकारामुळे औरंगाबाद परिमंडल अंतर्गतच्या वर्ग-२ जमिनीच्या बेकायदेशीर अदान-प्रदानामुळे व्यथीत झालेले अल्पसंख्यांक समाज व त्यांच्यात शासनाविषयी पसरलेली तीव्र चीड व संतापाची भावना, याबाबतीत क्षतीग्रस्त झालेल्या भोगवटादारांनी हिवाळी अधिवेशन, २०१६ मध्ये तीव्र जनआंदोलन पुकारण्याचा व्यक्त केलेला निश्चय, याबाबतीत शासनाने करावयाची कार्यवाही, व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता.	

१४४ १२७४ **श्री. अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** कित्ता.

"बीड व अहमदनगर जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ च्या रुंदीकरण कामासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा हजारो शेतकऱ्यांना न मिळणे, अनेक शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपये किंमतीच्या जमिनीपोटी केवळ हजाराच्या पटीत रक्कम मंजुरी बाबतचे पत्र प्रशासनाने दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरणे, संपादित जमिनीचा मावेजा मिळालेला नसतानाही अधिकारीव कंत्राटदार यांनी बळजबरीने शेतकऱ्यांच्या जमिनीवर रस्त्याचे काम करणे, माहे फेब्रुवारी, २००४ मध्ये या रस्त्याला महामार्गाचा दर्जा मिळणे, यापुर्वी हा रस्ता राज्यमार्ग १४४ म्हणून ओळखला जाणे, रस्त्याचे काम करताना पूर्व परवानगी न घेता. त्यांच्या शेतातून रस्त्याचे काम करणे, संबंधित शेतकऱ्यांना अद्याप मावेजाचे वाटप न होणे, मौजे तांदळा, काजळा, (ता. गेवराई, जि. बीड) सह परिसरातील १०१ शेतकऱ्यांनी कुटुंबियांसह दिनांक १८ फेब्रुवारी २०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयासमोरसामुहिक आत्मदहनाचा प्रयत्न करणे, शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनीवर जबरदस्तीने अतिक्रमण केल्याची तक्रार हजारो शेतकऱ्यांनी करणे, संबंधित शेतकऱ्यांनी वेळोवेळी शासनाकडे अर्ज, विनंत्या करूनही त्यांना अद्याप न्याय न मिळणे, अनेक शेतकऱ्यांवर यामुळे भूमिहिन होण्याची वेळ येणे, रस्त्याच्या कामासाठी संपादित जमिनीचे अभिलेखे संबंधित विभागाने गहाळ केल्याने शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय होणे, अन्यायाच्या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा देणे, या गंभीर बाबींकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१४५ १६१३ **श्री. रामहरी रुपनवर व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यात वाळू साठ्याचे लिलाव करण्यात येऊन ठेकेदारांकडून रॉयल्टीच्या स्वरुपात शासनाकडे रक्कम जमा करण्यात येणे, परंतु काही वाळू साठ्याचे ठेके काही कारणास्तव विहित कार्यपद्धतीने रद्द करण्यात येणे, अशा पद्धतीने रद्द करण्यात आलेल्या ठेक्यांच्या संदर्भात शासनाकडे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जमा करण्यात आलेली लिलावाची ठेव रक्कम ठेकेदारास परत करणे आवश्यक असतानाही काही जिल्ह्यातील अशा प्रकरणाची रक्कम शासनाकडे सन २०१५ सालापासून पडून असून अद्यापपर्यंत ती देण्यात टाळाटाळ करण्यात येणे, विशेषतः सातारा जिल्ह्यातील मंगळापूर येथील वाळू प्रकरण सन २०१५ पासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक ४ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास समोर येणे, वाळू उत्खणनासाठी लिलाव धारकांना द्यावयाची रक्कम परत करण्याबाबत जिल्हास्तरावरुन प्रस्ताव पाठविण्यात येऊनही त्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होता, शासनाकडून टोलवाटोलवी होणे, परिणामी ठेकेदारांचे होणारे आर्थिक नुकसान व त्यामुळे त्यांच्या मनात शासनाच्या धोरणाबाबत निर्माण झालेला असंतोष, तसेच राज्यभरातील वाळू ठेकेदारांकडून शासनाच्या वाळुच्या लिलावावर बहिष्कार टाकण्याची मानसिकता व त्यातून होणारे शासनाचे आर्थिक नुकसान लक्षात घेता रद्द झालेल्या वाळुच्या ठेक्यांचे ठेव रक्कम ठेकेदारांना परत करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "		
१४६	१६२१	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "परळी-बीड-नगर रेल्वे मार्गासाठी तसेच बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ साठी बीड शहर व परिसरातील जमिनीचे भूसंपादन करण्यात येत असणे, सदर भूसंपादन प्रक्रियेत जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करून प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला जात असणे, मोहम्मद जियाउद्दीन जहिरोद्दीन (इनामदार) यांच्या ताब्यातील जमिनीचे भूसंपादन करण्यात येऊनही त्यांना मावेजा देण्यास टाळाटाळ करण्यात येणे, नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या जमीन भूसंपादनातील संचिका क्रमांक ५/२०१२ व ५/२०१३	कित्ता.	

मध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली असणे, यात बोगस कागदपत्रा आधारे ४५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार भूसंपादन अधिकाऱ्यांच्या संगनमताने झालेला असणे, भूसंपादन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितंता, घोळ आणि गैरव्यवहाराच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त होणे, संपूर्ण भूसंपादन प्रस्तावाचीच चौकशी करण्याची आवश्यकता असणे, भूसंपादनाच्या निवाड्याबाबतही संशय होत असणे, विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या प्रकल्पाची उभारणी करीत असतांना प्रकल्पग्रस्तांवर होणारा अन्याय, अधिकाऱ्यांकडून होणारा भ्रष्टाचार, जमीन देऊनही होणाऱ्या अन्यायामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, या संपूर्ण भूसंपादन प्रक्रियेची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

१४७ २९४ **श्री. नारायण राणे व इतर वि. प. स.** कित्ता.

“सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांद्रा तालुक्यामधील डिंगणे धनगरवाडी गावात दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी लागलेल्या पाचशे एकरातील आंबा, काजू बाग व अन्य झाडे वणव्यात बेचिराख होणे, या आगीत काही घरे, गोठे व ९५ च्या आसपास जनावरे भस्मसात झाले असणे, यात ग्रामस्थांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले असणे, या परिसरात दरवर्षी बागायतींना आग लागण्याचे प्रकार घडत असतानाही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करून, या आगींमध्ये नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना त्वरित आर्थिक वा अन्य स्वरुपाची मदत करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१४८ १३८३ **श्री. रामहरी रुपनवर, वि. प. स.** कित्ता.

“मंगळवेढा तालुक्यातील (जि. सोलापूर) दक्षिण भागात पाऊस कमी झाल्याने जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे दि. ६ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या चारा टंचाईचा परिणाम या भागातील दूध व्यवसायावर झाला असून या

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		भागातील दूध संकलन निम्म्यावर आलेले असणे, दूध व्यवसायावर उपजिविका असलेल्या येथील शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, पुढील पावसाळा सुरू होण्यास अजून मोठा वेळ असल्याने येणारा काळ पशूपालक शेतकऱ्यांना संकटाचा असणे, त्यामुळे येथे चारा छावण्या सुरू कराव्यात अशी येथील शेतकऱ्यांची आग्रही मागणी असतानाही शासन त्याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने येथे जनावरांसाठी तातडीने चारा छावण्या सुरू करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१४९	१४१६	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "राज्यात दि. १५ मार्च २०१७ रोजी मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यात अवकाळी पाऊस व गारपिटीने थैमान घालणे, या अवकाळी पाऊस व गारपिटाने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला रब्बी पिकाचा घास हिरावून घेणे, गहू, हरभऱ्यासह आंबा आणि द्राक्षाचे प्रचंड नुकसान होणे, वीज पडून बीड जिल्ह्यात पाच जणांचा तर सोलापूर जिल्ह्यात एका जणाचा बळी जाणे, कृषी विभागाच्या माहितीनुसार प्राथमिक अंदाजानुसार २. ७० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान होणे, राज्यात मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटामुळे रब्बी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल होणे, राज्य शासनाने तातडीने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

१५० ४५ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील अरबी समुद्रात जागतिक दर्जाच्या भव्य शिवस्मारकाचे मा. पंतप्रधान यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात येणे, अरबी समुद्रातील शिवस्मारकाला मच्छिमार बांधवांनी विरोध दर्शविला असणे, सदरील मच्छिमार बांधवांचा विरोध दडपविण्याचा होत असलेला प्रयत्न, शिवस्मारकाला मच्छिमार बांधवांनी विरोध का दर्शविला चौकशी करण्यात न येणे, मासेमारीवर परिणाम होण्याच्या भितीने अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या शिव स्मारकाला मच्छिमार संघटना तसेच सागरी जैववैविध्य बाधित होणार असल्याने पर्यावरणवादीने विरोध दर्शविल्याने शिवस्मारक उभारण्यात येणारे प्रकल्पाचा मुद्दा हरित लवादाकडे पाठविण्यात येणे, हरित लवादाची परवानगी प्रलंबित असणे, स्मारकाचा आराखड्याचे काम मार्गी लावल्याचा राज्य सरकारने गाजावांजा केला असला तरी प्रत्यक्षात सदरील प्रकल्प रखडल्याने किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे याबाबत जनमानसात प्रश्न असणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमीपूजन इंदू मिलमध्ये दोन वर्षापूर्वी झाले पण प्रत्यक्षात तिथे कसलेही काम सुरू झाले नसल्याने शिवाजी महाराजांचे स्मारक होईल का नाही अशी महाराष्ट्र जनतेची निर्माण झालेली भावना शिवस्मारकाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ३६०० कोटी खर्चाची तरतुदी शासनाकडून कोणती स्पष्टता व्यक्त करण्यात न येणे, जनमानसात शिवस्मारक उभारण्याबाबत शाक्षंकता व्यक्त होत असल्याने शिवस्मारक उभारण्याबाबत शासनस्तरावरुन तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

१५१ २०८ **श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** कित्ता.

"पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झालेली असणे, अनेक ठिकाणी खराब झालेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीवर होत असलेला विपरित परिणाम, अनेकवेळा झालेले अपघात, अलिकडे दि. २१ जानेवारी २०१७ च्या सुमारास या महामार्गावर इंदापूर जवळ सरडेवाडी टोलनाक्याच्या अलिकडे हॉटेल राऊतजवळ लक्झरी बस

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		उलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा झालेला मृत्यू, अनेकजण गंभीररित्या जखमी झालेले असणे, या मार्गावरील अनेक कामे अपूर्ण असतानाही तेथे टोल आकारला जात असणे, या सर्व बाबींची त्वरित चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना व जखमी व्यक्तींना मदत देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१५२	२६४	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली जवळच्या आडोशी गावाजवळ दि. २७ डिसेंबर २०१६ रोजी चार वाहनांची धडक लागून झालेल्या भीषण अपघातात चारजणांचा झालेला मृत्यू, सहाजण गंभीररित्या जखमी झालेले असणे, या मार्गावर अनेक ठिकाणी सुरू करण्यात आलेली कामे अपूर्णावस्थेत असणे, या मार्गावर यापूर्वी अनेक अपघात होऊन झालेली जीवित हानी, अपूरी व अकार्यक्षम असलेली नियंत्रण व्यवस्था, अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना वेळीच मदत पुरविण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, अनेक ठिकाणे अपघात होण्यासारखी असताना त्यांची पाहाणी करून देखभाल दुरुस्ती करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडेही होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे भविष्यात आणखी अपघात होऊन जीवित हानी होण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, याबाबत त्वरित आढावा घेण्याची व अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांना तसेच जखमी व्यक्तींनी मदत देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
१५३	३५७	**डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** "मालेगाव (जि. नाशिक) येथे सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी लाऊन देण्याचे आमिष दाखवून बनावट पी. डब्ल्यु. डी. वेब मॅनेजमेंट	कित्ता.	

कंपनी स्थापन केली जाणे, खोटी नियुक्ती पत्रे देऊन १२० बेरोजगार तरूणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात येणे, या प्रकरणातील मुख्य संशयितांकडून २ कोटी ८६ लाख रुपयांची मालमत्ता, दिनांक २८ ऑगस्ट २०१६ रोजी जप्त केली जाणे, बेरोजगार तरूणांना दिलेल्या नियुक्ती पत्रावरील सार्वजनिक बांधकाम खात्याचे शिक्के व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे सिद्ध होणे, दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालिन सचिवांच्या स्वाक्षरीचे नमुने तपासण्यासाठी पाठविण्यात येणे, मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर करणे, महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी उपस्थित तारांकित प्रश्न क्रमांक१४६६८ च्या लेखी उत्तरात मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी "चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून यामध्ये श्री. भुषण शेवाळे यांनी महाराष्ट्र शासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे नावाचा दुरूपयोग करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पी. डब्ल्यु. डी. वेब कंपनी स्थापन केली व उमेदवारांना सरकारी नोकरीचे आमिष दाखवून त्यांची फसवणुक केली असल्याचे नमूद करणे, या अत्यंत गंभीर अशा प्रकरणी सी. आय. डी./सी. बी. आय. मार्फत सखोल चौकशीची व पाळेमुळे काढण्याची मागणी केली जाणे, या प्रकरणात कोण-कोण दोषी आहेत, ते उघड व्हावे, अशीही सार्वत्रिक मागणी केली जाणे, शासनाने याप्रकरणी वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्याची आवश्यकता, तरी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१५४ ४५४ **श्री. जयंत पाटील, वि. प. स.** कित्ता.

"रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या गावांना समुद्राच्या उधाणाच्या भरतीमुळे धोका निर्माण होणे, तसेच समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या शेती, बागायतीमध्ये समुद्राचे खारे पाणी शिरून जमिनीची धूप व शेत व बागायत जमिनी नापिक होऊ नये म्हणून शासनाने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रायगड जिल्ह्यातील मौजे मांडवा व रेवदंडा (ता. अलिबाग), मुरूड तालुक्यातील काशिद तसेच श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथील समुद्र किनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी रू. ९ कोटींची आवश्यकता असताना पतन विभागाने फक्त १ कोटी ८४ लाख रूपये निधीची तरतूद करणे, त्यामुळे धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामांची सुरूवात न होणे, तसेच धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम न झाल्यास नापिक जमिनीमध्ये अधिक भर पडणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, सबब रू. ९ कोटी रकमेची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१५५	४९१	**श्री. हेमंत टकले व इतर वि. प. स.** "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण-देवगड या सागरी महामार्गावरील सार्वजिक बांधकाम विभागाच्या मालवण येथील कोळंब पुलाच्या पिलर्सना मोठ्या प्रमाणात तडे गेल्याने अवजड वाहतुकीस धोकादायक बनलेला असणे ७ महिन्यांपूर्वी महाड येथे सावित्री नदीवरील पूल वाहून जिवितहानी झाल्याची घडलेली गंभीर घटना, या पुलावरुन एस. टी. ची वाहतूक व इतर वाहनाची सतत चालू असलेली रहदारी, त्यामुळे प्रवाशांच्या जिविताला निर्माण झालेला धोका, सदर पुल दुरुस्त करण्याबाबत शासनाकडून कोणतीच अद्यापि कार्यवाही न होणे, त्यामुळे जनमानसात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
१५६	१०४४	**श्री. गोपिकिशन बाजोरीया, वि. प. स.** "राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरील अमरावती ते जळगांव व जळगांव ते गुजरात हद्दीपर्यंतचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन. एच. ए. आय.) मार्फत सुरू करण्याबाबत मार्ग काढण्यासाठी	कित्ता.	

सदरचा रस्ता हा एन. एच. ए. आय. कडे सोपविण्यात येणे, सदर प्रकरणी विधानपरिषदेत नागपूर अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता चर्चेदरम्यान मंत्री महोदयांनी एक महिन्यांत निर्णय घेऊन केंद्रिय मंत्री महोदंयासमवेत बैठक लावून निर्णय घेण्यात येण्याचे आश्वासन देण्यात येणे, आजपावेतो सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची / आश्वासनाची पूर्तता न होणे, सदर राष्ट्रीय महामार्गावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची ये-जा चालू असणे, परिणाम या महामार्गावर अपघातांचे प्रमाणही त्याचपटीने होत असल्याने या महामार्गाकडे गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, दिड वर्षापूर्वी केंद्रीय मंत्री यांच्याहस्ते सदर महामार्गाचे उद्घाटन करण्यात येणे, वाढते अपघात रोखण्याकरिता तात्काळ सदर प्रकरणी शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१५७ १०४६ **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

" मु. पो. वाडा (जि. पालघर) तालुक्यातील कोने-अघई या राज्य मार्गाच्या साडेआठ कि. मी. टप्प्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रथम ९ कोटी ७९ लाखांचे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर सदर अंदाजपत्रक वाढवून ते १९ कोटी ११ लाखांचे करण्यात येऊन जिजाऊ कन्स्ट्रक्शन या कंपनीला हा ठेका २५ टक्के अधिक दराने दिल्याने शासनाचे ४ कोटी ७८ लाखांचे नुकसान झाल्याची बाब उघडकीस येणे, निविदेत नमूद करण्यात आलेली कामे प्रत्यक्षात न करता ८ ते १० कोटी रुपयांपेक्षा जास्त गैरव्यवहार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून संबंधित कंपनीने केल्यामुळे या कंपनीला काळ्या यादीत टाकून या सर्व कामांची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची लेखी मागणी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडीत यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली असणे, याच क्षेत्रातील इतर कामे अंदाजपत्रकापेक्षा कमी दराने अन्य ठेकेदारांनी केल्यामुळे त्या कामांप्रमाणे या रस्त्याचे कामही कमी रकमेमध्ये अपेक्षित व शक्य होते असेही विविध दाखले व पुरावे या मागणीमध्ये देण्यात येणे,

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		याचप्रमाणे कुडुस-कंचाड (२३ कोटी) सापरोंडे-उचाट(३ कोटी) कुडुस-कोंडले (१४ कोटी ५ लाख) या रस्त्यांचे अंदाजपत्रक जास्त रकमेचे करून निकृष्ठ दर्जाची कामे करण्यात आल्यामुळे ठेकेदार व अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याने या चारही प्रकरणी उच्च स्तरीय एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी अशीही मागणी करूनही या प्रकरणाचा तपास मा. मुख्यमंत्री यांनी खात्यामार्फत वा एसआयटीमार्फत सुरू न केल्याने शासन ठेकेदारामार्फत गैरव्यवहार करीत असल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संशय व संभ्रम, पालघर जिल्ह्यातील अन्य कामे कमी रकमेत व चांगल्या दर्जाची होत नसल्याबद्दल आवश्यक पुरावे देऊनही शासन त्या पुराव्यांच्या आधारे कार्यवाही करीत नसल्यामुळे शासनाविषयी निर्माण झालेली चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "		
१५८	११९७	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** " मुंबई-अहमदाबाद मार्गावरील वसई खाडीपुल दुरुस्तीच्या दिरंगाईची कारणे स्पष्ट करून पुढील कामांचे निश्चित वेळापत्रक तात्काळ सादर करा असे आदेश ठाण्याचे जिल्हाधिकारी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व आयआरबीच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्वाणीचा इशारा देताना दिल्याचे उघडकीस येणे, वसई खाडीवरच्या वर्सोवा पुलाच्या दुरुस्ती कामासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात सप्टेंबर महिन्यात झालेल्या बैठकीत हे काम तात्काळ पूर्ण करण्याचे दिलेले आश्वासन, या बैठकीला साडेचार महिन्यांपेक्षा अधिक काळ उलटला तरीही हे काम सुरू झाले नसल्याचे उघडकीस आल्याने, जिल्हाधिकारी यांनी तातडीने बैठक घेऊन संबंधित प्राधिकरणांना दिलेला निर्वाणीचा इशारा, राम्बोल इंडिया लि. या सल्लागार कंपनीने पुल दुरुस्ती संदर्भातील अहवाल जानेवारी २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात	किल्ला.	

व त्या सुमारास आयआयटीला देणे, आयआयटीने त्यावरील अहवाल आयआरबीला अद्यापी दिला नसल्याची बाब उघडकीस येणे, सदर खाडी पुलाची दुरुस्ती होत नसल्यामुळे दररोज हजारो नागरिक व वाहन चालकांना तीन ते चार तासांच्या वाहतूक कोंडी सहन करून नाईलाजास्तव पर्यायी रस्ता नसल्याने त्याच मार्गाने वाहतूक करावी लागणे, रोजची होणारी वाहतूक कोंडी, त्यामुळे डिझेल व पेट्रोलची होणारी लाखो रुपयांची नासाडी, हजारो वाहन चालकांचा वाया जाणारा वेळ याकडे आयआरबी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण हेतूतः दुर्लक्ष करीत असतानाही संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई केली जात नसल्यामुळे लाखो वाहन चालक व प्रवाशांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

१५९ १४४६ **श्री. रामहरी रुपनवर व इतर वि. प. स.** कित्ता.

“ सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग अंतर्गत उप विभाग, अलिबाग यांनी राजकीय दबावापोटी कोणतीही सामाजिक कार्यकर्तेयांनी वरिष्ठाकडे चौकशी करून संबधितावर कार्यवाही करणेबाबत लेखी तक्रार दाखल करण्यात येणे, तक्रारीत नमूद केलेल्या देयकाची नोंद करण्यात आलेली मोजमाप नोंदवही हेतुपुरस्कर शाखा अभियंता, रायगड सार्वजनिक बांधकाम मंडळ कोकण भवन यांचेकडे लेखी तक्रार दाखल असतानाही चौकशी न करता अफरातफरीचा प्रकरणाला खतपाणी घालून भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न करणे, अशाप्रकारे शासकीय निधीचा गैरवापर करून जनतेच्या जिवाशी खेळणे, प्रत्यक्षात झालेल्या कामांची देयके न आदा करता शासकीय निधीचा अफरातफर करणे, खोटी, न झालेल्या कामांचीदेयके नोंद केलेली मोजमाप नोंदवही इत्यादी दस्तऐवज गहाळ करणाऱ्या अभियंत्यावर कोणतीही कार्यवाही न करणे, याप्रकरणामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराची चौकशी करण्याबाबत होत असलेली मागणी, परंतु शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी जनमानसांत शासनाप्रति निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने संबधित विभागाची सखोल चौकशी करून

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		संबधितावर कार्यवाही होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. "		
१६०	५२३	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "वित्तीय वर्ष संपण्याकरिता केवळ २ महिन्याचा कालावधी उरलेला असतांना शासनाच्या अनेक विभागाचा ५०% पेक्षा अधिक निधी खर्च न झाल्याची बाब वित्त विभागाने त्यांच्या विभागाच्या वेबसाईट वरुन जाहीर केलेल्या माहितीवरुन निदर्शनास येणे, आतापर्यंत पाणी पुरवठा विभागाचा फक्त २२% पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा २६% महसूल व वन विभागाचा ५०% पर्यावरण विभागाचा ३७% तर आदिवासी विकास विभागाचा फक्त ३९% निधी खर्च झालेला असणे, वित्त विभागाच्या धोरणानुसार ज्या विभागांनी आपल्या ७० ते ७५% निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र दिलेले आहे असेच विभाग उर्वरित निधी खर्च करण्यास पात्र असणे, शासनाच्या दहा विभागांनी अद्यापपर्यंत ५०% पेक्षाही कमी निधी खर्च केलेला असल्याने ते उर्वरित निधी खर्च करु शकत नसल्याची बाब निदर्शनास येणे, अनेक विभागाचा ७०% सुद्धा निधी खर्च झालेला नसणे, यामध्ये आदिवासी विकास तसेच सामाजिक न्याय विभागासारख्या संवेदनशिल विभागाचा समावेश असणे, वितरित तरतुदीच्या उपयुक्ततेची जबाबदारी विभाग प्रमुख तसेच संबंधित मंत्री महोदयांची असणे, परंतु या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे शासनाने जाहीर केलेल्या अनेक योजनांवर परिणाम होण्याची शक्यता असणे, एकीकडे निधीची कमतरता आहे अशी ओरड करायची तर दुसरीकडे आहे तोच निधी अखर्चीत राहत असल्याची बाब समोर येणे, अशा प्रकारे राज्यातील जनतेची करण्यात येत असलेली फसवणूक, संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

"एकच मिशन जुनी पेन्शन" या मागणीसाठी राज्य सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांनी २ मार्च २०१७ रोजी आझाद मैदानात प्रचंड मोर्चा काढून राज्य सरकारला दिलेला इशारा, जुन्या पेन्शनच्या अधिकारापासून वंचित असलेले २००५ नंतर नियुक्त झालेले राज्य सरकारी व निमसरकारी कर्मचारी तसेच अनुदानित शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यापैकी ज्यांचा अकाली मृत्यू झाला आहे किंवा जे सेवानिवृत्त झाले आहेत त्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत केंद्र सरकारचे सुस्पष्ट आदेश असूनही तसेच मा. वित्त राज्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन देऊनही मृतांच्या कुटुंबियांना आणि सेवानिवृत्तांना पेन्शन सुरू झालेलं नाही. पेन्शनचा अधिकार नाकारलेल्या अशा प्रकारच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी प्रगतीशील महाराष्ट्र सरकारने तातडीने जुन्या पेन्शनच्या धर्तीवर योजना तयार करण्याची आवश्यता, मुंबई हायकोर्टाने २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना नवीन पेन्शन योजना लागू करण्यास स्थगिती दिली आहे. नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना आणि पी. एफ. लागू करणे हे मा. हायकोर्टाने ग्राह्य धरले आहे. केंद्र व राज्य सरकारचा पेन्शन कायदा सुस्पष्ट असताना आणि मा. हायकोर्टांनी जुनी पेन्शन योजना ग्राह्य धरली असताना अजूनही नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना आणि पी. एफ. लागू करणे हे मा. हायकोर्टने ग्राह्य धरले आहे. केंद्र व राज्य सरकारचा पेन्शन कायदा सुस्पष्ट असताना आणि मा. हायकोर्टांनी जुनी पेन्शन योजनाच ग्राह्य धरली असताना अजूनही नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या मुंबई, ठाणे, कोकण यासह राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू झालेली नाही किंवा पी. एफ. अकाऊंट उघडण्यात आलेले नाही. त्यामुळे सरकारी, निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षक/शिक्षकेतर यांच्यात पसरलेला असंतोष आणि संताप याबाबत

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१६२	२२०	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "रत्नागिरी, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांतील १८० गावांचा समावेश असलेल्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती होऊन आठ वर्षे उलटली असली तरी गेल्या काही वर्षात विविध कारणांनी २८ बिबट्यांचा मृत्यू झाल्याची माहिती उघड होणे, यामुळे वन्य जीवांचा संरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून वन विभागाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
१६३	२२३	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** "कणकवली (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील पिसे कामते येथे हत्तींनी धुमाकुळ घातला असून कदमवाडी परिसरातील अनेक माड, केळी बागायती हत्तींनी उदध्वस्त केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली घटना, सिंधुदुर्ग जिल्ह्यात वारंवार होणाऱ्या हत्तींच्या नुकसानीबाबत वन विभागाकडून कोणतीही उपाययोजना केली जात नसल्याने या ठिकाणच्या शेतकऱ्यांना वारंवार होणाऱ्या आर्थिक नुकसान व भितीचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
१६४	१४५७	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.** "मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापासून ठाणे जिल्ह्यापर्यंत तसेच काही किलोमीटर भूभागात शेकडो वर्ष आदिवासी व गोरगरीब नागरिक वास्त व करीत असणे, सदर वास्तव्य असलेली जमीन वन खात्याची	कित्ता.	

असल्याने पुननिर्माण व बांधकामे परवाने मिळण्यासाठी त्यांना असंख्य अडचणी निर्माण होणे, आदिवासीच्या विकासाकरिता केंद्र व राज्य शासनाकडून दरवर्षी देण्यात येणारा कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असणे, परंतु गेली अनेक वर्षे सदर आदिवासी पाड्यांना वीज न मिळणे, शेकडो आदिवासी पाडे अजूनही मुलभूत सुविधांपासून वंचित असणे, संपूर्ण शहरामध्ये प्रत्येकाला वीजपुरवठा नियमित होत असताना आदिवासी पाड्यांना वीजपुरवठा अद्यापपर्यंत न होणे, वन विभागाचे आरक्षण रद्द करून आदिवासी व गोरगरीब जनता वास्तव्य करीत असलेले आदिवासी पाडे यांना जीवनावश्यक सोयी-सुविधा पुरविण्याकरिता वन कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता, आदिवासी पाड्यांना शासनाने तात्काळ वीज उपलब्ध करून देण्याची नितांत गरज, आदिवासी व गोरगरीब नागरिकांनी वीज उपलब्ध होण्यासाठी आंदोलने केली असता त्यांच्यावर गून्हे दाखल करण्यात येणे, सदर गुन्हे सुद्धा माफ करून त्यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१६५ १४७७ **श्री. श्रीकांत देशपांडे व इतर वि. प. स.** कित्ता.

“गेल्या एका वर्षात महाराष्ट्रात विविध ठिकाणी वाघ-बिबटे यांसारख्या वन्यप्राण्यांच्या संशयास्पद मृत्यूच्या घटना वाढल्याचे निदर्शनास येणे, नागपूर जिल्ह्यातील उमरेड-कराडला व्याघ्र प्रकल्पातून जय वाघाचे अचानक गायब होणे, चौकशी समिती नेमूनही शासनाला जय वाघाचा शोध लावण्याबाबत जनतेमध्ये संभ्रम असणे, व्याघ्र प्रकल्पात जय नसल्याने पर्यटकांची संख्या निम्म्याने कमी झाल्याने स्थानिक बेरोजगारांना रोजगार न मिळाल्याने त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष तसेच महाराष्ट्रातील ताडोबा सारख्या व्याघ्र प्रकल्पात आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या १६ टक्क्यावरून २ टक्क्यावर येणे, हीच संख्या रणथंबोर मध्ये ४०%, नागपूरला लागून मध्यप्रदेश पेंच व्याघ्र प्रकल्पात २० टक्क्यापर्यंत जाणे व महाराष्ट्रात फक्त २ टक्के पर्यटक येणे, महाराष्ट्र शासनाने वारंवार वर्ल्डक्लास टुरिझम डेस्टिनेशन व गोरेवाडा प्रकल्प निर्माण करण्याची

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		गेल्या दोन वर्षापासून घोषणा करूनही पूर्तता करण्यास विलंब होणे व केंद्र व राज्यशासनाच्या मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्र या कार्यक्रमांतर्गत वन्य पर्यटन क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस वन विभागाकडून चालढकल करणे, यावरून महाराष्ट्र वन विभागाचे राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्पाकडे दुर्लक्ष असणे, व्याघ्र प्रकल्पाचे व्यवस्थापन नीट नसल्याने खाद्य शोधण्यासाठी प्रकल्पातील वन्यप्राणी मानवी वस्त्यांमध्ये येऊन हल्ले करणे, त्यानंतर वन्यप्राण्यांना बंदिस्त केल्यानंतर वन विभागाकडे अद्ययावत रेस्क्यू सेंटर नसणे, तसेच नागपूर येथील गोरेवाडा वन्य प्राण्यांसाठी असलेल्या रेस्क्यू सेंटरमधील बिबट्याची पिल्ले डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत संशयास्पदरित्या गायब होणे, गत एका वर्षात (२०१६-१७) जवळपास ५० बिबटे व कित्येक वाघ मृतावस्थेत आढळून येणे, राष्ट्रीय व्याघ्र सरंक्षण धोरणाची पायमल्ली करून वाघ/ बिबटे व अन्य वन्यजीवांच्या मृत्यूकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर एसआयटी नेमून चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत जनतेमध्ये व वन्यप्राणी मित्रांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याने यांवर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. "		
१६६	७५२	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "राज्याच्या क्रीडा खात्यात बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असल्याची बाब डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास येणे, पुण्याच्या म्हाळुंगे-बालेवाडी क्रीडा संकुलाचे उपसंचालक श्री. माणिकराव ठोसर यांचा क्रीडा खात्यातील बदल्यांमधील भ्रष्टाचारावर प्रकाश टाकणारा एक व्हिडीओ सोशल मिडियाद्वारे व्हायरल होणे, सदर व्हिडीओमध्ये क्रीडा अधिकारी म्हणून बदली हवी असल्यास पैसे लागतात, क्रीडा अधिकाऱ्याला मिळणाऱ्या विकास निधीपैकी २० टक्के निधीचाच वापर	किंवा.	

होऊन उर्वरित निधीचा भ्रष्टाचार होत असल्याच्या बाबी असणे, बदल्यांसाठी पैसे द्यावे लागत असल्याची गंभीर बाबही या व्हिडीओद्वारे समोर येणे, वर्धा, गोंदिया, भंडारा, अकोला या जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या जागा जाणीवपूर्वक रद्द ठेवल्याची बाब समोर येणे, सदर व्हिडीओ खरा असल्याची बाब श्री. ठोसर यांनीच मान्य करणे, त्यामुळे क्रीडा खात्यात मोठ्या प्रमाणावर बदल्यामध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे स्पष्ट होणे, राज्यातील युवक आणि खेळाडूंच्या दृष्टीने महत्त्वाच्या क्रीडा खात्यातील भ्रष्टाचारामुळे क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहनाला खिळ बसणे, क्रीडाप्रेमी, नागरीकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे, क्रीडा खात्यातील या बदल्यांची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

१६७ २७ **श्री. दत्तात्रय सावंत व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यातील मुलांना सदृढ व समृद्ध बनविण्याच्या दृष्टीकोनातून शाळेतील मुलांना मध्यान्ह शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येत असणे, यामुळे समाजात आनंदाचे वातावरण असणे, शालेय पोषण आहार योजना हि त्या संबंधित शाळेकडून कार्यान्वित करण्यात येत असणे, सदर यंत्रणा कार्यान्वित करीत असताना त्या शाळेतील सर्व शिक्षकांना यावरती लक्ष केंद्रित करावे लागत असणे, शालेय पोषण आहार योजना कार्यान्वित करण्याचे काम शाळेतील एका शिक्षकाकडे देण्यात येत असणे, त्या संबंधित शिक्षकाला आपला अध्यापनाचा वेळ सोडून त्या योजनेकडे संपूर्ण लक्ष द्यावे लागत असणे, शालेय पोषण आहार संबधित आठवड्यातून दोन वेळा मिटिंगचे आयोजन करण्यात येत असणे, त्यामुळे त्या शिक्षकाचे त्यांच्या विषयाकडे दुर्लक्ष होत असणे, या सर्वांचा परिणाम अध्यापन प्रक्रियेवर होत असणे, शालेय पोषण आहारासाठी मिळत असलेले मानधन गेल्या दोन तीन महिन्यांपासून दिले गेलेले नसणे, तसेच शालेय पोषण आहार योजना शिजवणारे मदतनीस यांचेही मानधन वेळेवर मिळत नाही. त्यामुळे त्यांनाही आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागत असणे, शालेय पोषण आहाराच्या विविध तक्रारी समोर येणे,

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		यातून शाळेवरील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यावर कोणतेही कारण नसताना गंभीर गुन्हे नोंद होणे, यातून शिक्षकांना प्रचंड अशा मानसिक तणावाला सामोरे जावे लागत असणे, शालेय पोषण आहार योजना हवाबंद डब्यातून ग्रामीण भागातील मुलांना पुरविणे बाबत शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येत असणे, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेमार्फत राबविणेबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका. "		
१६८	६९	**श्री. दत्तात्रय सावंत व इतर वि. प. स.** "जगात रोज नवीन तंत्रज्ञान विकास होत असणे, या तंत्रज्ञानाला महाराष्ट्र राज्य सामोरे येणे, शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञान क्षेत्रात model राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण होणे, हि बाब संपूर्ण महाराष्ट्राला भूषणावह असणे, याचाच एक भाग म्हणून आधुनिक तंत्रज्ञानात शिक्षण क्षेत्रात वापर करून प्राथमिक व माध्यमिक शाळांचे सन २०१३-१४ पासून oniline पद्धतीने संच निश्चिती करणे, या संच निश्चितीमध्ये मान्य झालेल्या सेवक संचात पदाची निश्चिती करताना योग्य नियमावलीचा वापरन होणे, परिणामी राज्यात मोठ्या संख्येने शिक्षक अतिरिक्त होणे, सेवक संच दुरुस्ती करणे बाबत शाळांकडून क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे सेवक संच दुरुस्ती प्रस्ताव सादर करणे, सन २०१३-१४ च्या सेवक संचात आज पावेतो दुरुस्ती न झाल्याने पुढील सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील सेवक संचामध्ये आहे त्या त्रुटी पुढे चालू राहणे, यासाठी अनेक शैक्षणिक संघटना व लोकप्रतीनिधिनी शासनाकडे पाठपुरावा करणे, परंतु त्यावर कोणताही निर्णय आजपावेतो न होणे, सन २०१६-१७ चे सेवक संच संपूर्ण महाराष्ट्रात वितरित करण्यात येणे, सदर सेवक संच निश्चित करताना कोणत्या निकषाने	कित्ता.	

करण्यात आले आहेत याबाबत मोठा संभ्रम निर्माण होणे, परिणामी सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व पुणे या जिल्ह्यातील सन २०१६-१७ या सेवक संचात झालेल्या त्रुटी प्रातिनिधिक स्वरूपात एकत्रित करण्यात येणे, आयुक्त शिक्षण पुणे यांच्या दालनात लोकप्रतिनिधी व शिक्षक संघटना यांच्यासमवेत बैठक पार पडणे व पाच जिल्ह्यातील सेवक संचात झालेल्या त्रुटीचा अहवाल आयुक्त व शिक्षण सहसंचालक यांच्याकडे सादर करण्यात येणे, यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे विद्यार्थी संख्या असूनही सेवक संचात पद नसल्याने शिक्षक अतिरिक्त होणे, यामुळे या शिक्षकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण असणे, तरी सन २०१३-१४ पासूनचे सेवक संच तात्काळ दुरूस्त करून नियमानुसार संच मान्यता करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१६९ १३८ **प्रा. अनिल सोले व इतर वि. प. स.** कित्ता.

“नागपूर येथे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत बी. आर. एम मुंडले या शाळेत कार्यशाळा आयोजीत केली असता सदर कार्यशाळेत नागपूर, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील शिक्षण विभागाचे केन्द्र प्रमुखापासून ते शिक्षणाधिकारी पर्यंत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना कार्यशाळेत आमंत्रित केले असता सदर कार्यशाळेला मार्गदर्शनासाठी राज्याचे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी मार्गदर्शन करताना प्राथमिक वर्गामध्ये शिकणाऱ्या मुलांना भागाकार कसा करावा हे कळत नाही, हीच मुले पुढे शालांत परिक्षेला बसतात आणि दहावीत त्यांचा ८० टक्के निकाल लागतो हे कसे काय शक्य आहे? बोर्डाचा निकाल हा खोटा असल्याची टीका कार्यशाळेत केली जाणे, राज्याच्या शिक्षण विभागाच्या एका उच्चपद अधिकाऱ्यांनेच बोर्डाच्या निकालावर एकप्रकारे शंका निर्माण केल्याने प्रश्नचिन्ह निर्माण होणे, त्यातच शिक्षकांच्या शिक्षण पद्धतीवर टिका करणे, त्यामुळे शिक्षकांचे मनोबल खचविले जाणे, त्यामुळे शिक्षकामध्ये व विद्यार्थ्यांमध्ये याबाबत पसरलेला असंतोष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

विवरण क्रमांक २१–चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१७०	२४६	**श्री. नागोराव गाणार व इतर वि. प. स.** "राज्य शासनातर्फे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असणे, त्या अंतर्गत नागपूर विभागातील शाळा डिजिटल करण्यासाठी शिक्षकांनी विविध अडचणींवर मात करून रोख वर्गणीतून निधी जमा करणे, आधुनिक साधनांच्या वापरातून १०० टक्के विद्यार्थी प्रगत करण्याच्यादृष्टीने शिक्षकवर्ग प्रयत्न करीत असणे, सर्वशिक्षा अभियानांतर्गत शाळा सुधार करण्याच्यादृष्टीने अत्यंत तोकडे अनुदान शाळेला मिळत असणे व हे अनुदान सद्यःस्थितीत बंद झालेले असणे, अशा परिस्थितीत ऊर्जा विभागाच्या वीज वितरण कंपनीने शाळांकडून पब्लिक युटिलिटी मीटर रिडिंगप्रमाणे वीजभाडे आकारणे त्यामुळे शाळांना अव्वाच्या सव्वा वीजबील देण्यात येत असणे, वीज बिलाचा भरणा न केल्यास त्या शाळांचा वीज पुरवठा तात्काळ बंद करण्यात येईल अशा प्रकाराच्या नोटीसा वीज वितरण कंपनीतर्फे देण्यात आलेल्या असणे, परिणामी या आर्थिक कोंडीत शाळा सापडून वीज बीलाचा भरणा न झाल्यास जिल्ह्यातील बहुसंख्य शाळांचा वीज पुरवठा बंद होण्याची व त्यामुळे परीक्षा काळात विद्यार्थ्यांची गैरसोय होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, परिणामी शिक्षकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		कित्ता.
१७१	८४३	**श्री. श्रीकांत देशपांडे व इतर वि. प. स.** "शासनाने बालकांना मोफत शिक्षणाचा अधिकार दिलेला असतांनाही हजारो मुले आजस्थितीतही शिक्षणापासून वंचित असणे, शासनाने शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी करण्यात आलेल्या सर्वेक्षणात नाशिक जिल्ह्यात एकूण ८०६ शाळा बाह्य मुले आढळून आल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यात		कित्ता.

मालेगाव महानगरपालिका हद्दीत सर्वाधिक २९६ शाळाबाह्य मुले आढळून येणे, शाळाबाह्य मुलांच्या संख्येबाबत भिन्न भिन्न मतप्रवाह असणे, सर्वेक्षणाच्या दोन फेऱ्या, होऊनही राज्यातील शाळाबाह्य बालकांच्या वस्तुनिष्ठ आकडेवारीबाबत संभ्रमाची स्थिती असणे, पहिल्या फेरीपश्चात (दि. ४ जुलै, २०१५) सर्वेक्षणाच्या यशस्वीतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे, पुनश्चन दि. १५ ते ३१ जानेवारी २०१६ या कालावधीत सर्वेक्षणाचे नियोजन केले जाणे, या नियोजनाबाबतही आरोप होऊन सेवाभावी संस्थांनी सर्वेक्षणाच्या कामकाजातून अंग काढून घेणे, त्यामुळे हे सर्वेक्षण फसणे, पहिल्या सर्वेक्षणात ५५ हजार शाळाबाह्य मुले आढळून येणे, तर दुसऱ्या सर्वेक्षणात फक्त १० हजार शाळाबाह्य विद्यार्थी असल्याचे जाहीर होणे, वस्तुतः जनगणनेत महाराष्ट्रात ४ लाख ९६ हजार बाल कामगार असल्याचे दर्शविलेले असणे, तर सन २०१४ मध्ये सर्वशिक्षा अभियानाने १ लाख ८५ हजार शाळाबाह्य मुले दाखविणे, तर टाटा सामाजिक संस्थेने केलेल्या पाहणीत फक्त मुंबई महानगरात रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची संख्या ३८ हजार असल्याचे निदर्शनास येणे, असे असतांना शासकीय सर्वेक्षणात फक्त १० हजार शाळाबाह्य मुले असल्याचे जाहीर झाल्याने या सर्वेक्षणाचे वस्तुनिष्ठतेविषयी उलटसुलट चर्चा होणे, प्रयत्न अपयशी ठरल्याची जनतेत प्रतिक्रिया उमटणे, राज्यातील सर्वच शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याची आवश्यकता, त्यादृष्टीने ठोस व व्यापक प्रयत्नांची गरज, सामाजिक सेवाभावी संस्था व व्यक्तीकडून यासाठी केली जाणारी मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१७२ ८६४ **श्री. श्रीकांत देशपांडे व इतर वि. प. स.** कित्ता.

“दप्तराच्या ओझ्यामुळे सर्वच वयोगटातील विद्यार्थ्यांना विविध आजार जडत असल्याचा अहवाल राज्य शासनाच्या समितीने दिल्याचे दिनांक ४ जुलै २०१५ च्या सुमारास उजेडात येणे, विद्यार्थी त्यांच्या वयापेक्षाही जास्त वजनाचे दप्तराचे ओझे दररोज वाहून नेत असून ५८ टक्के विद्यार्थी दहा वर्षाखालील असल्याचे बाबही या अहवालातून उघड होणे,

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		त्यामुळे विद्यार्थ्यांना पाठीच्या आजारासोबत डोकेदुखी, मानसिक ताण येत असल्याचे या अहवालात म्हटले असणे, दप्तराचे ओझे कमी कसे करता येईल, यावर तोडगा काढण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या समितीने तीन महिन्यांसाठी एकच पुस्तक व वह्या कराव्यात, भाषा विषयांचे एक, गणित-भूमिती, विज्ञानाचे एक आणि समाजशास्त्र व अन्य विषयांचे एक अशी तीन पुस्तके एकत्र, पुस्तकांसाठी हलक्या कागदाचा वापर करावा, पुस्तकाऐवजी ऑडीओ व व्हीडीओ सीडी उपलब्ध कराव्यात, शाळेत ई-लर्निंगचा वापर वाढवावा ८० पानांपेक्षा अधिक व जाड वह्यांचा वापर टाळावा, वह्याऐवजी पाटी वा वर्कशिटचा वापर वाढवावा, रोजच्या वेळापत्रकात जोड तासिका ठेवाव्या, विषयाचे प्रमाण कमी ठेवावे अशा शिफारशी शासनाला केलेल्या असणे, पालक व विद्यार्थी दप्तरांचे ओझे कमी करण्याच्या शासनाच्या अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत असणे, राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशीबाबत तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१७३	९४९	**श्री. गिरीशचंद्र व्यास व इतर वि. प. स.** "महाराष्ट्र शासनाने मोठ्या अभियानाने संपूर्ण महाराष्ट्रात क्रीडा प्रबोधिनीची सुरूवात केली साधारणतः नागपूर-चंद्रपूर-कोल्हापूर-नाशिक व अन्य ठिकाणी ह्या प्रबोधिनी अस्तित्वात असताना ज्यामध्ये विशेषतः ग्रामीण व तालुका स्तरावरचे खेळाडू प्रवेश घेतात व क्रीडा प्रशिक्षण घेऊन जिल्हा राज्याचे नाव राष्ट्रीय स्पर्धामध्ये उंचावतात त्या सर्व खेळाडूची निगा राखणारे कर्मचारी व प्रशिक्षक व अधिक कर्मचारी काम करत असताना त्यांना केवळ मानधन मिळते अद्याप ते नियमित झाले नाही, परंतु सर्व कर्मचाऱ्यांना	कित्ता.	

त्यांचे मानधन न मिळाल्याचे विरोधात काही कर्मचारी उच्च न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाचे निर्णयानंतर त्या कोर्टात गेलेल्या कर्मचाऱ्यांना थकित वेतन मिळाले एवढेच नव्हे तर त्यांना नियमित केले गेले विशेषबाब म्हणून परंतु जे कर्मचारी न्यायालयात गेले नाही त्यांना शासन प्रशासनाने शिक्षा केली त्यानुसार त्यांना आजतागायत मानधन तर दिलेच नाही व नियमितीचा विचारही केला नाही ४-५ वर्ष विना मानधन ते कार्यरत आहेत. या बद्दल शासनास वारंवार पत्र व्यवहार करून लक्ष वेधले असता पी. सी. कमिटी बसविली पण अद्याप त्यावर कुठलाही निर्णय घेतलेला नसणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१७४ १३१६ **श्री. अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** कित्ता.

"बीड जिल्हा परिषदेअंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या इमारती निजामकालीन असल्याने त्या मोडकळीस येणे, जिल्हा परिषदेच्या २५७६ प्राथमिक शाळांपैकी ३३८ शाळांच्या इमारती धोकादायक असणे, १३० शालेय इमारतीतील १६६ वर्ग खोल्या नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त होणे, ६८ माध्यमिक शाळांच्या इमारतींपैकी २५ शालेय इमारती धोकादायक असणे, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने शालेय इमारती धोकादायक झाल्याचे प्रमाणित करणे, धोकादायक इमारतीत शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या जीवीताला धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, अनेक शाळेतील वर्ग खोल्या उघड्यावर भरविण्याची वेळ येणे, जिल्ह्यातील हजारो शाळांकडे विद्युत जोडणी, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी मुलभूत सुविधा उपलब्ध नसणे, आर. टी. ई. कायद्यानुसार अनेक ठिकाणी नवीन वर्ग खोल्यांचे व इमारतींचे बांधकाम करण्याची आवश्यकता असणे, जिल्हा परिषदेने नवनि वर्ग खोल्या व इमारतींच्या दुरुस्तीसाठी वारंवार शासनाकडे निधीची मागणी करणे, शासनाकडून आवश्यक निधीची तरतूद न होणे, केंद्र शासन व इतर योजना मधुन शालेय इमारतीसाठी निधीची तरतूद न होणे, यामुळे बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शालेय इमारतीचा प्रश्न गंभीर होणे, यामुळे शिक्षणप्रेमी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नागरीकांमध्ये शासन विरोधी तीव्र असंतोष पसरणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "		
१७५	१३२०	**श्री. विक्रम काळे, वि. प. स.** "संपूर्ण राज्यात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दि. २८ फेब्रुवारी २०१७ पासून सुरू करण्यात आलेल्या बारावीच्या परिक्षेचा पेपर सुरु होण्यापूर्वीच तो प्रत्येक दिवशी व्हॉटसपवर व्हायरल होण्याचे सत्र अद्यापी सुरूच असणे, दि. ६ मार्च २०१६ रोजी ११.०० वाजता परिक्षा सुरू होण्याअगोदर तब्बल २५ मिनिटांपूर्वी म्हणजेच १०.४० मिनीटांनी हा पेपर व्हॉटसपवर व्हायरल झालेला असणे, विद्यार्थ्यांना पेपर वाचण्यासाठी देण्यात आला असतानाच ही घटना घडल्याचे पुन्हा एकदा समोर आलेले असणे, इंग्रजी, गाणित, एसपी आणि मराठी या विषयाचे पेपर मुंबई परिसरात व्हॉटसपवर व्हायरल झाल्याचे समोर येणे, याबाबत मंडळाच्या मुंबई विभागीय कार्यालयाकडून तथापि शासनाकडून कोणतीच दखल घेतली न जाणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेले कमालीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
१७६	१३३२	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "निजामपुर (ता. माणगांव, जि. रायगड) हे रायगडाच्या पायथ्याशी असलेले प्रमुख गाव असणे, विळे भागात औद्योगिकीकरण जवळच असल्याने निजामपुर भागात शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत असणे, वाढत्या लोकसंख्येमुळे माध्यमिक शाळांची गरज असल्याने ज. रा. मेहता माध्यमिक विद्यालय निजामपुरमध्ये स्थापित झालेले असणे, रायगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या दुर्गम भागातील विद्यार्थी या विद्यालयात शिक्षण घेत असणे, शिक्षण संस्था मात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण व शैक्षणिक सोईसुविधा या	कित्ता.	

विषयी गंभीर नसणे, याच विद्यालयात मोठ्या प्रमाणात डोनेशन घेऊन बोगस शिक्षक भरती केलेली असणे, अनेक शिक्षकांकडून अवैद्यरित्या आर्थिक रक्कम स्वीकारुन संस्थेने अद्याप त्यांना कायम केलेले नसणे व काही जनांना काढून टाकलेले असणे, पैसे घेतल्याचे लेखी पुरावे शिक्षकांकडे उपलब्ध असणे, याच विद्यालया मार्फत मागासवर्गीयांचे वस्तीगृह चालवण्यात येत असणे, वस्तिगृहात बोगस विद्यार्थ्यांची नोंद करून शासनाचे अनुदान लाटण्यात येत असणे, अनेक लेखी तक्रारी करूनही अद्यापी या बाबतीत कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, वस्तिगृहात राहत असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या प्राथमिक सोई-सुविधा देण्यात येत नसणे, फक्त अनुदान लाटण्याविषयी संस्थेचा कल असणे, शासनामार्फत देण्यात येत असलेला पोषण आहारसुद्धा संस्थेचे चेअरमन, अध्यक्ष व पदाधिकारी हे थेट बाजारामध्ये विक्री करत असणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोई-सुविधा, वस्तिगृहातील सोई-सुविधा देणे आवश्यक असतांना सध्यस्थितीत संस्था, चेअरमन व त्यांच्या कमिटीमार्फत फक्त आर्थिक गैरव्यवहार करण्यात येत असणे, कार्यरत असणारा शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी हे अद्यापि कायम नसल्याने त्यांचेवर संस्था चालकांचा राजकीय दबाव असणे, या सर्व गोष्टीमुळे विद्यार्थी व पालकवर्गामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, संस्थेने केलेला आर्थिक गैरव्यवहार याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१७७ १५३ **श्री. संजय दत्त, वि. प. स.** कित्ता.

"ठाणे व कल्याण तालुक्यातील मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्र उभारून दोन वर्ष उलटल्यानंतरही अद्याप प्रशासकीय विभाग सुरू झालेला नसणे, ज्या उद्देशाने मुंबई विद्यापीठाने सदरील दोन उपकेंद्र सुरू करण्यात आली त्याचा या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना फायदा होत नसल्याचे समोर येणे, महापालिकेने सदरील उपकेंद्रासाठी एक रुपया नाममात्र आकारून जागा देणे, दिनांक १७ ऑगस्ट २०१० रोजी या उपकेंद्राचे बांधकामाला सुरूवात करण्यात येऊन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सुविधांसह विद्यापीठाची इमारत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी सज्ज होईल अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा होती मात्र तसे घडले नसून मुंबई विद्यापीठ आणि उपकेंद्रामध्ये कोणताही समन्वय नसणे, या उपकेंद्राचा फायदा ठाणे व कल्याण आजूबाजूला असलेल्या विद्यार्थ्यांना होत नसणे, ठाणे जिल्ह्यात मुंबई विद्यापीठाचे दोन उपकेंद्र उभारूनही विद्यापीठाच्या कारभारचे विकेंद्रीकरण होऊ शकलेले नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्यांसाठी अजूनही मुंबईला फेऱ्या माराव्या लागत असणे, ठाणे व कल्याण तालुक्यातील मुंबई विद्यापीठाच्या दोन्ही उपकेंद्र पूर्णपणे सुरू करण्याबाबत शासनस्तरावरून कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच सदरील उपकेंद्र सुरू करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१७८	२३७	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात अभाविप आणि स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडीया 'एसएफआय' या संघटनांच्या कार्यकर्त्यात जोरदार हाणामारी झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या सुमारास उजेडात येणे, औपचारिक यांच्या सैनिकांविषयक वक्तव्याच्या निषेधावरून सदरील वाद निर्माण होणे, औरंगाबादमध्ये पंधरा दिवसांपूर्वी असाच प्रकार घडला होता तेथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पं. दीनद्याळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित कार्यक्रमावरून बहुजन व भाजपायुमो यांच्यात निर्माण झालेल्या वादाचे रूपांतर तोडफोड आणि मारामारी झाल्याचा प्रकार घडणे, राज्यातील विद्यापीठ व कॉलेज मध्ये विद्यार्थी दोन संघटनेत हाणामारीचे प्रकारात वाढ होणे, राज्यशासनाला विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या जोरदार हाणामारी रोखण्यास व उपाययोजना	कित्ता.	

करण्यास येत असलेले अपयश, राज्यशासनाने सदरील गंभीर प्रश्न सोडवण्याबाबत तातडीने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१७९ २९१ **प्रा. जोगेन्द्र कवाडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"सोलापूर येथील शास्त्रीय तंत्रनिकेतन बंद करण्याचा निर्णय शासनाने दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास घेणे, सदर निर्णयामुळे या तंत्रनिकेतन मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत पसरलेले भितीचे वातावरण, सोलापूर येथील तंत्रनिकेतन बंद करु नये अशा आशयाची मागणी सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी शासनाकडे करणे, त्याबाबतचे मॅसेजेस सुद्धा शासनाकडे पाठविणे त्यामुळे विद्यार्थी वर्गात व त्यांच्या पालकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबतची शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया. "

१८० ३२० **श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यातील जालना, लातूर सह रत्नागिरी, सोलापुर, यवतमाळ व धुळे येथील शासकीय तंत्रनिकेतनामधील पदविका अभ्यासक्रमात श्रेणीवर्धन करून नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतला असणे, या निर्णयामुळे राज्यातील त्या त्या विद्यापीठा अंतर्गत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार असणे, परंतु या ६ तंत्रनिकेतनमध्ये पदविका शिक्षण घेणारे ग्रामीण भागातील विद्यार्थी असून ३ वर्षांची पदविका पूर्ण करतात त्यांना औद्योगिक वसाहतीत नोकऱ्यांच्या संध्या उपलब्ध होतात. याबाबत रत्नागिरी मधील ६० वर्षे पासून असलेल्या तंत्रनिकेतन मधील आजी-माजी विद्यार्थीच्या संघटनेने २० ऑक्टोबर २०१६ रोजी रत्नागिरी येथील तंत्रनिकेतन सुरू असावे या मागणीकरिता जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणे, नागपुर येथील हिवाळी तिसऱ्या अधिवेशनाच्या काळात लोकप्रतीनिधिने शिक्षण मंत्र्याना पत्र देणे, जे विद्यार्थी सीईटी सारख्या परीक्षा उत्तम गुणांनी उर्त्तीण होण्यास कमी सक्षम असणे, अशा मुलांना

(१)	(२)	(३)	(४)	(५)

दहावी नंतर पदविका करून अभियंता होणे अधिक सोपे असणे, शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी येथे ७,७५० रुपये फक्त फी असणे, तर जिल्ह्यांतील इतर खाजगी संस्थेमध्ये फी रुपये ३०, ००० ते ५३, ००० रुपये असणे, तंत्रनिकेतन रत्नागिरी विद्यार्थीना पुण्याच्या औद्योगिक क्षेत्रात विशेषतः ऑटोमोबाईल मध्ये चांगली मागणी असणे, शासनातर्फे नोंदणीकृत कंत्राटदार म्हणून मान्यता मिळविण्यासाठी पदविका शिक्षण ग्राह्य असणे, तंत्रशिक्षण मंडळाच्या नियमानुसार उपलब्ध जागांपैकी ७०% जागा रत्नागिरी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असणे, जालना व लातूर येथे पदविका व पदवी अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या इमारती उपलब्ध असणे, त्यामुळे पदवी अभ्यासक्रमांत स्थानिक विद्यार्थी आणि जनतेमध्ये तिव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१८१ ८१० **ॲड. राहुल नार्वेकर व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे निकाल पुनर्मूल्यांकनानंतर मोठ्या प्रमाणात बदलल्यामुळे विद्यापीठ संलग्नित रचना कॉलेज, विरार येथील व्हिवा कॉलेज, सावंतवाडी येथील बांदेकर कॉलेज तसेच मुंबईतील जे. जे. कॉलेज मधील फाईन आर्टच्या विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान, मार्च २०१६ मध्ये व्दितीय वर्षाच्या झालेल्या परीक्षेचा निकाल जूनमध्ये जाहीर करण्यात येऊन विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकलमध्ये ५ ते २० दरम्यान गुण देण्यात येणे, याबाबत विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे तक्रार केल्यानंतर त्यांना पुनर्मूल्यांकन करण्यात येईल असे आश्वासन देण्यात येणे, परंतु अद्यापी याबाबत कोणताही निर्णय न झाल्यामुळे व विद्यापीठाच्या जाचक नियमांमुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर झालेले शैक्षणिक नुकसान, परिणामी विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष,

शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड, संतापाची भावना, विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या हिताकडे तातडीने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना. "

१८२ १२६२ **श्री. नागोराव गाणार व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यातील शासकीय अशासकीय महाविद्यालयात मागील ३० वर्षांपासून संगीत हा विषय शिकविला जाणे, या विषयाकरिता तबलावादक व पेटीवादक या शिक्षकांना अस्थायी स्वरुपात नेमणुका दिलेल्या असणे, त्यामुळे तबलावादक व पेटीवादक शिक्षकांना स्कूल कोड प्रमाणे कायमस्वरूपी मान्यता देऊन उच्च वेतनश्रेणी देण्याबाबतच्या प्रकरणी शासनाकडे वारंवार पत्र व्यवहार करण्यात येणे, परंतु याकडे शासनाने दुर्लक्ष करून हा प्रश्न निकाली न काढणे, त्यामुळे तबलावादक व पेटीवादक शिक्षकांवर झालेला अन्याय, परिणामी या शिक्षकांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र असंतोष, करीता या महत्त्वाच्या विषयाबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही व शिक्षकांना न्याय देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१८३ १४६४ **ॲड. राहुल नार्वेकर व इतर वि. प. स.** कित्ता.

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या अंतर्गत महिला अध्ययन व विकास केंद्रातील महिलांची सन २०१६ च्या हिवाळी सत्रात प्रेरणा आर्टस आणि कॉमर्स कॉलेज नागपूर या केंद्रावर लेखीपरिक्षा घेण्यात येणे, सदर महिलांमध्ये काही गरोदर महिला परिक्षेस बसलेल्या असणे, परिक्षार्थी गरोदर महिलांना परिक्षेच्या ठिकाणी असलेल्या उद्‌वाहनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन संबंधित महिला महाविद्यालयाने केंद्र प्रमुखांना दिलेले असतानाही केंद्र असलेल्या प्रेरणा आर्टस आणि कॉमर्स महाविद्यालय नागपूर यांनी त्यांचे उद्‌वाहन वापरण्यास गरोदर महिलांना बंदी घालून गरोदर महिलांना केंद्र असलेल्या संबंधित कॉलेज प्रशासनाने उद्‌वाहन वापरण्यास मनाई केल्यामुळे काही

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		गरोदर महिलांना पायी चढणे शक्य नसल्यामुळे परिक्षा केंद्रावरून परिक्षेविना तेथून निघून जावे लागणे, परिणामी सदर परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, याबाबत सखोल चौकशी करून जबाबदार असणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१८४	१५४८	**अॅड. जयदेव गायकवाड, वि. प. स.** "महाराष्ट्र शासनाने दि. ४ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत राज्यातील पाच तंत्रनिकेतनासह लातूर जिल्ह्यातील बार्शी येथील मुलींसाठी असलेले एकमेव पुरणमल लाहोटी शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन बंद करण्याचा निर्णय घेण्यात येणे, या जागी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांला परवानगी शासनाने दिलेली असणे, लातूर येथील या शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतनमध्ये दरवर्षी मराठवाडामधील लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी विभागातील गोरगरीब कुटुंबातील गरीब, मागासगर्वीय, अल्पसंख्याक समाजाचे तब्बल ९०० विद्यार्थीनी शक्षिण घेत असणे, पहिल्या वर्गात २८० तर दुसऱ्या व तिसऱ्या वर्गात सरासरी ६०० विद्यार्थीनी शिक्षण घेत असणे, या शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतनमध्ये या गरीब कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी अवघे १७०० रुपये शिक्षण शुल्क असून निवासाचे शुल्क ५०० रुपये असंणे, कमी शुल्क असल्याने गरीब, होतकरु मुली येथे मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत असणे, मात्र येथे मुलांमुलीचे अभियांत्रिकी महाविद्यालय झाल्यास या गरीब कुटुंबातील मुलींना शिक्षणाची संधी नाकारली जाण्याची शक्यता निर्माण होत असणे, या मुलींचे शैक्षणिक नुकसान होऊन भविष्यात त्यांनी कुठे जायचे असा प्रश्न उत्पन्न झालेला	कित्ता.	

असणे, येथील ड्रेस डिझायनिंगचा अभ्यासक्रम फक्त लातूर, पुणे आणि मुंबई येथे तर मेडिकल इलेक्ट्रॉनिक्सचा अभ्यासक्रम पुणे आणि लातूर येथेच असणे हे तंत्रनिकेतन बंद करण्याच्या निर्णयामुळे ग्रामीण विद्यार्थीनीसमोर या शिक्षणासाठी कुठे जायचे असा प्रश्न निर्माण झालेला असणे, परिणामी येथील महिला विद्यार्थीनी तसेच नागरिकांमध्ये शासनाच्या या निर्णयामुळे शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण होणे, येथील निवासी महिला तंत्रनिकेतन हलवून तेथे मुलांमुलीचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याऐवजी महिला निवासी तंत्रनिकेतनसाठी स्वतंत्र जागा संपादित करून स्वतंत्र महिला निवासी तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू ठेवले पाहिजे अशी विद्यार्थीनींची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१८५ ५३७ **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

“चित्रपट नगरी, गोरेगांव येथील भ्रष्ट व अनागोंदी कारभारामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निवेदनाद्वारे शासनास निदर्शनास आणून देण्यात येणे, या प्रकरणी हेतुपुरस्कर दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे गैरव्यवहार करणाऱ्यांना अभय मिळाल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण होणे, या ठिकाणी सहायक व्यवस्थापक कलागारे या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीस १० वी नापास असतांनासुद्धा महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील सर्व नियम धाब्यावर बसवून सहा पदोन्नत्या देण्यात येणे, सदर व्यक्ती वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आर्थिक व्यवहार पाहत असल्याची बाब निदर्शनास येणे, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘रईस’ या चित्रपटास सहा एकर जमीन सहा महिने वापरण्यास देवूनसुद्धा फक्त एका एकराचे भाडे घेण्यात येणे, यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान करण्यात येणे, सध्या ८५ मेकअप रुम धुळखात पडलेल्या असतांना तसेच त्यातून कोणतेही उत्पन्न नसतांना करोडो रुपये खर्च करून नवीन मेकअप रुम बांधण्यात येणे, जिमचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याने एकाच वर्षात स्लॅब कोसळणे याचा खर्च मात्र ४० लाख दाखविण्यात येणे, टेंडर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		पासून पळवाट काढण्याकरिता टप्प्या टप्प्याने खरेदी करून शासनाची फसवणूक करण्यात येणे, सुरक्षा रक्षक मंडळाचे कर्मचारी यांचा मासिक खर्च १३ लाख असतांना दरमहा ३० लाख खर्च करून महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी नेमण्यात येणे, निकृष्ठ दर्जाचे तलावाचे तसेच पुलाचे काम करून शासनाची फसवणूक करणे, यामध्ये शासनाने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१८६	९९	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मुंबईत वरळी, नायगाव, डिलाईल रोड आणि शिवडी या परिसरात बीडीडी चाळी असणे, ब्रिटीशांनी १९२० मध्ये या चाळींचे बांधकाम केले असणे, मुंबईतील सर्वात जुन्या असलेल्या बीडीडी (बॉम्बे डेव्हलमेंट डिपार्टमेंट) चाळी सध्या पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणे, बीडीडी चाळी अनेक कुटुंब वर्षानुवर्षे राहत असणे, बीडीडी चाळीमध्ये सांडपाणी समस्या, अनेक चाळींच्या आतील भागात भिंतीचे, छप्परांची दुरवस्था झालेली असणे, पिण्याच्या पाण्याची समस्या अशा अनेक अडचणीला रहिवाशांनी तोंड द्यावे लागत असणे, बीडीडी चाळीवासीयांना पुनर्वसनामध्ये ४०० चौरस फुटावरून थेट ५०० चौरस फुटाची घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे माहे सप्टेंबर-२०१६ च्यासुमारास उजेडात येणे, या निर्णयाबाबत रहिवासी नाखूश असून रहिवाशांना ५७५ चौरस फुटाची घरे हवी असणे, तसेच नवी सुधारित नियमावली लागू करून चाळीवासीयांच्या संमतीची अट काढून टाकण्यात आल्याबद्दल बीडीडी चाळीतील रहिवाशांकडून नाराजी व्यक्त करणे, बीडीडी चाळीच्या पुनर्वसनाबाबत जे गिरणी कामगारांच्या घरांचे झाले तेच बीडीडी चाळीवासीयांबाबत होण्याची भिती व्यक्त करण्यात येणे, शासनाने वरळी,		किल्ला.

नायगाव, डिलाइल रोड आणि शिवडी या परिसरातील बीडीडी चाळींच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. "

१८७ १०६ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील ५८ गिरण्यापैकी केवळ ३१ गिरण्यांच्या जमिनीवर २४ हजार ७०० घरे म्हाडाने बांधली असून त्यातील केवळ १६ हजार ९०० घरे गिरणी कामगारांसाठी असल्याचा दावा म्हाडा करीत असले तरी याबाबत गिरणी कामगार संघटना समाधानी नसणे, गिरण्यांची एकूण किती जागा आहे, त्यातील किती विकसित करण्यात आल्या आहेत, किती करण्यात येणार आहेत आणि किती गिरणी कामगारांना घरे देण्यात येणार आहे याची नेमकी माहिती शासनाकडे उपलब्ध नसणे, गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाच्या कित्येक वर्षापासून रखडलेल्या मुद्द्याकडे शासन गंभीरपणे लक्ष देत नसणे, गिरणी कामगारांची संख्या १ लाख २८ हजार असून त्यापैकी प्रत्येकाला घरे देणे शक्य नाही आणि सदनिकांसाठी निकष लावण्याची जबाबदारी म्हाडाची असल्याचे भूमिका राज्य सरकारने स्पष्ट केली होती, सरकार आणि म्हाडा एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी झटकण्याचा आणि आकडेवारी सांगण्यात टाळाटाळ करीत असणे, त्यामुळे गिरणी कामगारांच्या कुटुंबियांमध्ये तसेच जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

१८८ २६३ **प्रा. जोगेन्द्र कवाडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यातील अनेक खासगी विकासकांकडून मोठ्या प्रमाणावर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घर दिले जात असल्याच्या फसव्या जाहिरातील देण्यात येत असणे, या योजनेनुसार जर एखाद्याचे कोठेही घर नसेल आणि प्रथमच ते घर विकत घेत असेल तर त्याला घरामध्ये अडीच लाखांची सूट मिळेल या योजनेचा दाखला देत अनेक विकासकाशी फसवी जाहिरात मोठ्या प्रमाणात करीत असणे, सन २०२२ रोजीपर्यंत

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सर्वांसाठी घरे या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे उक्त योजना नगरपालिका आणि राज्य शासन यांच्यामार्फतच ही योजना राबविण्याचे ठरलेले असून कंत्राटदाराची नेमणूक करून ही घरे तयार करण्यात येणार असून या योजनेची नोडल एजन्सी म्हणून म्हाडाची नेमणूक करण्यात येणे, या योजनेअंतर्गत खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर काही खासगी विकासकाकडून गृहनिर्माण विभागाकडे प्रस्ताव आलेले असून त्यास मान्यता देण्यात आलेली नसणे, मान्यता नसताना फसव्या जाहिरातीस बळी पडून काही नागरिकांनी विकासकांकडे घरांसाठी आगाऊ रक्कम दिलेली असणे, या योजनेसाठी खाजगी विकासकांना मान्यता मिळालेली नसल्याने नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विकासकांविरुद्ध शासनाने तातडीने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबतची शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "		
१८९	४८३	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "नभुक्र ६२९ (भाग) वांद्रे व्हिलेज, खेरवाडी वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत कनाकिया पॅरिस या विकासकाकडून विकसित करण्यात येत असलेल्या महाराष्ट्र नगर को ऑ. हौ. सोसायटी अंतर्गत सागरी हद्द नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करून विकासकाने बांधकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या सुमारास उघडकीस येणे, या योजनेत मिठी नदीची रुंदी कमी करून विकासकाने बांधकाम केलेले असल्याने अतिवृष्टी झाल्यास वाकोला नाला व मीठी नदी परिसरातील झोपड्यांना धोका निर्माण झालेला असणे, विक्री इमारतीचे बांधकाम करताना सी. आर. झेड. नियमाचे झालेले उल्लंघन, अनधिकृतपणे करण्यात आलेली झाडांची कत्तल मा. लोक आयुक्तांकडे करण्यात आलेली तक्रार, त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत एस. आर. ए. ला	कित्ता.	

दिलेले निर्देश नाल्याची रुंदी कमी केल्याचे, इमारतीचे बांधकाम सी. आर. झेड क्षेत्रात झाल्याचे एस. आर. ए. च्या तपासात निष्पन्न होणे, यामध्ये पर्यावरण कायद्याचे उल्लंघन, संबंधित विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता करण्यात आलेले बांधकाम, अशाप्रकारचे अतिक्रमण दिनांक २६ जुलै, २००५ रोजी सारखी पुरपरिस्थिती निर्माण करणारे तसेच परिसरातील नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, नदीच्या दोन्ही बाजूंनी १२० मीटर चे अंतर ठेवणे, नियमानुसार बंधनकारक असणे, या परिसरातील कांदळवणाची विकासकाने कत्तल केलेली असणे, या सर्व बाबी विचारात घेऊन एस. आर. ए. कडून काम थांबविण्याबाबत नोटीस पाठविण्यात येणे, याविरुद्ध न्यायालयात जाऊन विकासकाने २ आठवड्याची स्थगिती मिळवणे, यानंतर तीन महिन्याचा कालावधी उलटूनही विकासकाविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, यामध्ये शासनाने हस्तक्षेप करून प्रकल्प थांबविण्याची आवश्यकता, नागरीकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१९० ५४३ **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

“म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरांना नियमित करण्यांबाबत मंत्रीमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात येणे, मुंबईतील संक्रमण शिबिरातील अनेक घुसखोरांना स्वतः म्हाडामधील काही अधिकाऱ्यांनी पैशाचा व्यवहार करून सदनिकांचा ताबा दिलेला असणे, हजारोंच्या संख्येत अशा घुसखोरांची संख्या असणे, अशीच मंत्रीमंडळ उपसमिती झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत झोपडीधारकांचे पुनर्वसन झाल्यानंतर त्याने नियमबाह्य पद्धतीने विकलेल्या सदनिकांची खरेदी विक्री नियमित करण्यासाठी सुद्धा नेमण्यात येणे, अशाप्रकारे करण्यात आलेल्या खरेदी-विक्रीचे व्यवहार नियमित करणे म्हणजे झोपडीधारकाला झोपडीच्या बदल्यात मिळालेली सदनिका विकून दुसरी झोपडी उभारण्यास परवानगी दिल्यासारखी असणे, संक्रमण शिबीरातील मूळ रहिवाशी ३० ते ४० वर्षापासून खितपत पडलेले असतांना घुसखोरांना नियमित करणे म्हणजे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अनधिकृतपणे ताबा घेणाऱ्यांना तसेच त्यांच्याकडून पैशाचा व्यवहार करून ताबा देणाऱ्या अधिकाऱ्यांना अभय देण्यासारखे असणे, याबाबतीत कठोर नियम करण्याची आवश्यकता, घुसखोरांवर तसेच घुसखोरी करून देणाऱ्यांवर कारवाईची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका. "		
१९१	१०३३	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "पंतप्रधान योजनेमध्ये परवडणाऱ्या घरांची महात्वाकांक्षी योजना म्हाडाने जाहीर करून वृत्तपत्र जाहिरातींकरीता लाखो रुपये खर्च करणे, परंतू जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी पंतप्रधान योजने अंतर्गत परवडणारी घरे बांधण्याकरीता म्हाडाच्या ताब्यात एक इंचही जागा उपलब्ध नसल्याचे आढळून आल्यानंतर, गृहनिर्माण मंत्री यांनी या योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामास तातडीने दिलेली स्थगिती, यामुळे राज्यातील जनतेची म्हाडा व शासन घोर फसवणूक करीत असल्याची बाब उघडकीस येणे, ठाणे, कल्याण, अकोला, अमरावती, सोलापूर, शिरुर, पुणे, जालना, औरंगाबाद बुलढाणा इत्यादी ठिकाणी परवडणारी घरे या योजने अंतर्गत ११ लाख घरे बांधण्याची योजना शासनाने करून दोन वर्ष झाली तरी अद्यापही एक घरही या योजनेखाली बांधले नसल्याचे उघडकीस येणे, केंद्र शासनाने स्वतःचा हिस्सा म्हणून राज्य शासनाला दिलेले ३८० कोटी रुपये केवळ जाहिराती व स्टेट लेवल मॉनिटरींग कमिटीच्या खर्चाकरीता या पैशांचा वापर होत असल्याचे उघडकीस येणे, १ लाख ७ हजार ८७४ घरांचे प्रस्ताव म्हाडाने सादर केले. त्यापैकी ६३, २८२ प्रस्ताव मुख्य सचिवांच्या समितीने मान्य केले, ३७, १७७ घरांचे प्रस्ताव पुढे ढकलले गेले, म्हाडाने बारवे, भांडारली, खोनी, निरजेपाडा, शिरढोण-कल्याण, गोठेघर-ठाणे, बोळींज-वसई, व्हावे-कर्जत, केळावली-खालापूर	कित्ता.	

येथील ११ जागांवर घरे बांधण्याची जाहिरात म्हाडाने देणे, परंतू यापैकी एकही जागा म्हाडाच्या ताब्यात नसणे, व्हावे, केळावली, बोळींज आणि खोनी या चार जागांचे प्रस्ताव राज्य समितीने नामंजूर केले असतानाही त्याचा समावेश जाहिरातीत कोणी केला याची चौकशी होत नसल्याने व म्हाडाचे उपाध्यक्ष एस. एस. झेंडे यांचे काही विकासकांबरोबर आर्थिक सामंजस्य असल्याने विकासकांचा फायदा होण्याकरिता आवश्यक नसलेल्या जागा जाहिरातींमध्ये देऊन विकासकांना कोटयवधी रुपयांचा फायदा होण्याकरिता या जाहिरातींचा वापर करण्यात आल्याबद्दल म्हाडाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेला विश्वास व खात्री, गेली दोन वर्षे घरे परवडणारी घरे बांधण्याच्या नावाखाली निधी व जागा उपलब्ध नसतांनाही तसेच केंद्र शासनाचा निधी मिळूनही त्याचा उपयोग केवळ खोट्या जाहिराती देऊन जनतेची फसवणूक केल्याचे उघडकीस आल्यामुळे राज्यातील कोटयवधी जनतेचा म्हाडावरील उडालेला विश्वास व पंतप्रधानांच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे नाव घेऊन जनतेची घोर फसवणूक करणाऱ्या खोट्या जाहीराती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईच होत नसल्यामुळे जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

१९२ १४०९ **श्री. नारायण राणे, वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील अंधेरी भागातील सी. एस. नं. १९५ (५) नवीन डी. एन. को. ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड या गृहनिर्माण संस्थेकडून म्हाडाच्या जागेवर वसाहतीच्या विकास करणाऱ्या रुस्तमजी रिॲलटी प्रा. लि. या विकासकाने या कामात करोडो रुपयांचा केलेला गैरव्यवहार, पूर्वीच्या विकासकाला येथून हटवून ट्राय पार्टी कराराच्या माध्यमातून व्यापारी स्वरूपाचे गाळे विकण्याचे व प्रत्यक्षात त्यांना ताबा न मिळण्याचे उघडकीस आलेले प्रकार, या प्रोजेक्ट विकासासाठी ४८० भाडेकरू पहिल्यांदा देवून नंतरच्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये ४२० भाडेकरू दाखवण्यात आल्यामुळे उर्वरित ६० जण रस्त्यावर येणार असल्याची निर्माण झालेली परिस्थिती, ३८०० रहिवासी वापर करीत असलेल्या मैदानाच्या F. S. I. चा बेकायदेशीर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		वापर करून मैदानावर पोडियम तयार करण्यात येणे, मैदानांवर पोडीयम करण्यात मान्यता देऊ नये असा म्हाडाचा अहवाल असताना त्याला बगल देऊन मैदानाचा बेसमेंटला पार्किंग देण्याची घडलेली घटना, प्लॅनमध्ये ३७ दुकाने दाखवण्यात आली असताना नवीन प्लॅनमध्ये दुकाने न दाखवली जाणे, याबाबत जुलै २०१६ मध्ये विधानसभेमध्ये लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांनी उक्त प्रकल्पाच्या विक्रीच्या बांधकामाला स्थगिती देण्यात येईल व या प्रकरणाची सखोल चौकशी करून या विकासकावर आर्थिक गुन्हे विभागामार्फत गुन्हा दाखल करून त्वरित अटक करून कारवाई करण्यात येईल असे आश्वासन देऊनही मागील ७ महिन्यांमध्ये कोणतीच न झालेली कारवाई, या विकासकावर तीन एफ. आय. आर. दाखल असतानाही अद्याप शासनाने कोणतीही न केलेली कारवाई, ४८० भाडेकरू रस्त्यावर असताना व प्रकल्पात मोठ्या प्रमाणात अपहार केला असताना मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांनी चौकशीचे आदेश देऊन संबंधित म्हाडा अधिकारी, पोलीस विभाग या विकासकाविरुद्ध कोणतीच कारवाई करीत नसल्यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने एस. आय. टी. मार्फत चौकशी करून संबंधित विकासकावर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "		
१९३	२१७	**श्री. नारायण राणे व इतर वि. प. स.** " पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील जिल्हापरिषदेच्या शिलोंडा प्राथमिक शाळेतील ३१ विद्यार्थ्यांना दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळच्या नास्त्यातून झालेली विषबाधा, त्यांची प्रकृती चिंताजनक असणे, या प्रकाराची माहिती मुख्याद्यापकांनी स्थानिक शिक्षण विभागाला	कित्ता.	

दिलेली असतानाही याबाबत लक्ष घालण्यास झालेली दिरंगाई, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपाययोजना व विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या पालकांना मदत करण्याची आवश्यकता असतानाही, डहाणू पंचायत समिती, पालघर जिल्हापरिषद जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

१९४ ३२८ **डॉ. अपूर्व हिरे व इतर वि. प. स.** कित्ता.

" राज्यात अनेक शहरे, महानगरात, अनधिकृत अनोंदणीकृत पाळणा घरे कार्यान्वयीत असणे, या अनधिकृत पाळणा घरात कुठल्याही सोयी नसणे, लहान मुलांची निकोप वाढ, संगोपन आणि देखभाल यानुषंगाने अशा बेकायदा पाळणा घरात परदेशी व्यवस्था नसणे, तरी गरजवंत नोकरीपेक्षा पालकांकडून अशा बोगस/स्वयंसेवी संस्थाकडून पाळणाघर वापरासाठी अव्वाचे सव्वा शुल्क फी सुरू केली जाणे, नाशिक शहरात व जिल्ह्यात पाळणा घरे व बालवाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, या पाळणाघर संचालकांची वाढत चाललेली मुजोरी, पालकांची पिळवणूक, विद्यार्थ्यांची असुरक्षितता, फी संदर्भातील लुट याबाबी गंभीर असणे, याप्रकाराविरुद्ध कुठलीही चौकशी वा नियंत्रणाची व्यवस्था नसल्याने खाजगी, बेकायदा-अनधिकृत व गैरसोयीची पाळणाघरे चालविणाऱ्यांची हिंमत दुणावणे, त्यांना कायदा, समाज इत्यादी कशाचीही भिती नसणे, पर्यायाने नोकरी पेशा, गरजवंत पालक, माता-पितांची होत असलेली कुचंबणा, दरम्यान खारघर (मुंबई) येथील पाळणाघरात एका छोट्या मुलीवर आयाने केलेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर, मुंबईच्या पूर्व उपनगरातील मानखुर्द येथील "द चिल्ड्रन्स एण्ड सोसायटी" या संस्थेच्या अख्त्यारितील मुंबईतील अन्य आठ बालगृहांबाबत सखोल चौकशीसाठी आयुक्त, अपंग समिती, पुणे यांनी आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमणे, सदरहु चौकशीच्या अनुषंगाने तात्काळ कारवाईची गरज, तसेच पाळणाघरातील अत्याचाराच्या घटनांची दखल घेत शासनाने पाळणाघरांसाठी तातडीने नियमावली तयार करण्याची मागणी केली जाणे, राज्यात

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सर्वच पाळणाघरे व बालगृहांना नोंदणी बंधनकारक करण्याची आवश्यकता, यासर्व पार्श्वभूमीवर शासनाने बेकायदा-विनापरवानगी, अनधिकृत पाळणाघरे तात्काळ बंद करण्याची व त्यांचेवर कारवाई करण्याची गरज, विविध पाळणा घरात सतत घडत असलेल्या अमानवीय घटनांमुळे जनतेत व्यक्त होत असलेला रोष, तसेच संताप, यानुषंगाने शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "		
१९५	३६९	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** " वसई येथील औद्योगिक वसाहतीमधील एका कारखान्यात अंगणवाडी पोषण आहाराच्या पाकीटावरील तारखा बदलल्या जात असल्याचा माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास उघडकीस आलेला प्रकार, त्यावेळी मुदतबाह्य आणि विना तारखेची हजारो पाकिटेही आढळून आलेली असणे, पोलिसांनी हा माल जप्त करून अन्न व औषध प्रशासनाकडे तपासासाठी पाठविलेला असणे, महिला व बालविकास विभागामार्फत कुपोषणावर मात करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनेंतर्गतचा सदर पोषण आहार असल्याचेही उघडकीस आलेले असणे, डिसेंबर २०१६ ची मुदत संपलेली पाकिटे टेम्पोने गोदामाबाहेर नेण्यात येत असल्याचे तसेच पाकीटांवरील तारखा पुसण्याच्या थिनरच्या बाटल्या व तारखेचा स्टॅम्प इत्यादी साहित्य आढळलेले असणे, असेच प्रकार अन्य ठिकाणीही घडण्याची शक्यता, या प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याचे काम शासनाचे म्हणजेच महिला व बालविकास विभागाचे असतानाही त्यांचेकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी लाभार्थी बालकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम, त्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

१९६ १२०८ **श्री. आनंदराव पाटील व इतर वि. प. स.** कित्ता.

"केंद्र शासनाच्यामाध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनेत महाराष्ट्र राज्यात गरोदर व स्तनदा मातांसाठी घोषित केलेल्या मातृत्व लाभ योजनासांठी निधीच उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब दिनांक १९ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेली असणे, या योजनांर्गत गरोदर व स्तनदा मातांना ६००० रुपये देण्याची केंद्र सरकारने घोषणा केलेली असणे, आतापर्यंत या योजनेअंतर्गत केंद्र सरकार ६० टक्के वाटा देत असून उर्वरित वाटा राज्य शासन उपलब्ध करून देत असणे, परंतु आता केंद्राने केवळ ५० टक्के भागीदारी उचलण्याची तयारी दर्शविल्याने गोरगरीब मातांसाठी लाभदायक ठरलेल्या योजनेला प्रतिसाद कमी होण्याची चिन्हे दिसू लागणे, याशिवाय दोन अपत्यांसाठी असलेली ही योजना आता फक्त पहिल्या अपत्य पूर्तीच मर्यादित ठेवण्याचा केंद्र सरकारचा मानस असल्याचे समोर आलेले असणे, राज्यात लहान बालकांत मोठ्या प्रमाणात कुपोषण वाढून त्यात बालमृत्यू व मातामृत्यू होत असतांनाही त्याला प्रतिबंध करणाऱ्या या योजनांना शासन पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याबाबत करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व टाळाटाळ, परीणामी राज्यातील जनमानसात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने या योजनेसाठी भरीव निधीची तरतूद करून तिची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

१९७ १३५२ **श्री. रामहरी रुपनवर व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्य शासनाने भरपूर प्रसिद्धी करून जाहीर केलेल्या "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेला एक वर्ष पूर्ण होऊनही गेल्या वर्षभरात जन्म झालेल्या एकाही कन्येच्या पालकांच्या बँकेच्या खात्यावर या योजनेचे ५ हजार रुपये जमा करण्यात आले नसल्याचे दि. ५ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, शासनाने स्त्रीभ्रूणहत्या रोखावी, मुलींचा जन्मदर वाढून मुलींच्या जन्माबाबत सकारात्मक विचार व्हावा, यासाठी ही योजना अमलात आणलेली असणे, या योजनेसाठी २५ कोटीची

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तरतुदही केलेली असणे, परंतु या योजनेत अनेक त्रुटी असल्याने या योजनेंतर्गत लाभ मिळावा, यासाठी राज्यातून आलेल्या २०० अर्जांना फेटाळण्यात आलेले असणे, व उपलब्ध निधीही वाया गेला असणे, त्यामुळे या योजनेंतर्गत लाभ घेऊन इच्छिणाऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने या योजनेतील त्रुटी दूर करून तिची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
१९८	१४५३	**श्री. गिरीशचंद्र व्यास व इतर वि. प. स.** "राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कृती समितीने १० मार्चला विधानसभा अधिवेशनावर मोर्चा काढणे, या संदर्भातील निवेदन कृती समितीने महिला व बालविकास विभागाचे मंत्री, प्रधान सचिव आणि आयुक्तांना दिलेले असणे, अंगणवाडी सेविकांच्या मागण्यामध्ये प्रामुख्याने मानधन, प्रवास व बैठक भत्ता अनियमित मिळतो तो दर महिन्याला मिळावा, विलंबाने मिळणारे आहाराचे अनूदान किंवा इंधन भत्ता हा दर महिन्याला मिळावा कोणत्याही शासकीय कामासाठी लागणारे साहित्य व नेण्या आणण्यासाठी लागणारा खर्च शासनाने द्यावा, २००८ सालापासून सेवामुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवा समाप्ती लाभ देणे, भाऊबीज भेट म्हणून देण्यात येणारा १ हजार रुपये बोनस एका मानधना इतके देणे, आजारपणासाठी वर्षाला १५ तर उन्हाळ्यात किमान १ महिन्याची भरपगारी रजा मंजूर करणे, लोकसंख्या कमी असलेल्या ठिकाणी अंगणवाडी ऐवजी मंजूर झालेल्या मिनी अंगणवाड्यांमध्ये एकच मिनी अंगणवाडी सेविका असणे, त्यामुळे सेविका आणि मदतनीस अशी दोघांची कामे मिनी अंगणवाडी सेविकेला करावी लागत असणे, मिनी अंगणवाडीला पूर्ण अंगणवाडीचा दर्जा देऊन तेथील	कित्ता.	

सेविकेला नियमित सेविकेचा दर्जा देऊन सोबतीला मदतनीसाची नेमणूक करावे आदी मागण्या करणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

१९९ १०४ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यामध्ये सत्तेत येण्यापूर्वी राज्यातील धनगर समाज्याला आरक्षण देण्याचे आश्वासन सरकाने प्रत्येक वेळी येणे, परंतु अद्यापपर्यंत त्यावर काहीही कार्यवाही न होणे, याबाबत राज्य सरकार गंभीर नसणे, याविषयात सरकार वेळकाढूपणाचे धोरण अवलंबत असणे, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी तातडीने निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले असणे, त्यानुसार धनगर व धनगड हे एक आहेत किंवा कसे या संदर्भात स्वायत्ता संस्था टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई (TISS) या संस्थेकडून संशोधन व सर्वेक्षण तयार करण्याचे आश्वासन देणे, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ च्या पत्रान्वये संशोधनाचे स्वरुप तीन टप्प्यात करण्यात येणार असल्याचे कळविणे, वस्तुनिष्ट संशोधनाचा अभ्यासाचा प्रारूप आराखडा तयार करून धनगर व धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत अद्यापि संशोधन चालू असणे, तिसऱ्या टप्प्यात ३६ जिल्ह्यातील धनगर समाजाच्या घरामध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन नमुना सर्वेक्षण करण्यात येत असणे, या सर्वेक्षणाअंतीचा अहवाल अद्यापि शासनाने जाहीर न करणे. परंतु अद्याप पर्यंत त्यावर काहीही कार्यवाही झाली नसल्यामुळे धनगर समाजाच्या जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत लोकसभेमध्ये दि. २७ मार्च २०१७ रोजी धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत प्रश्न विचारला असता, केंद्रीय आदिवासी विकास मंत्री यांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षण देण्याची मागणी करणारा महाराष्ट्र सरकारचा अधिकृत प्रस्ताव अजून केंद्राला मिळालेला नाही असे उत्तर देण्यात येणे, आरक्षण देण्यासाठी ज्या समाजाला आरक्षण देण्याचे आहे. त्या समाजाला केंद्र सरकारने आरक्षण द्यावे, अशी शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारकडे करणे आवश्यक

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असणे, परंतु महाराष्ट्र सरकारने गेल्या अडीच वर्षांमध्ये साधी शिफारसही केंद्र सरकारकडे केलेली नाही, तसेच याबाबत काल मा. पंतप्रधान यांनी खासदारांच्या बैठकीमध्ये धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यास नकार दिला असणे, तसेच वेगळ्या ओबीसी मंत्रालयाची गरज नाही असेही सांगितले असणे, सत्ते आल्यानंतर पहिल्या दिवशी धनगर समाजाला आरक्षण देऊ निवडणुकी पुर्वी आश्वासन देऊन सत्तेत आल्यानंतर सतत प्रत्येकी वेळी आरक्षण देणारच असे आश्वासन देऊनही धनगर समाजाला आरक्षण दिलेले नाही ही धनगर समाजाची घोर फसवणूक करण्यात येणे, याबाबत धनगर समाजामध्ये अति तीव्र भावना निर्माण झाली असणे, शासनाबाबत तीव्र भावना निर्माण झाल्यामुळे धनगर समाज रस्त्यावर उतरल्यास मोर्चे, आंदोलने, धरणे व उपोषणे सुरू केल्यास राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, यासाठी धनगर समाजाला तातडीने आरक्षण देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला शिफारस करून धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”		
२००	२८८	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** “आदिवासी विकास महामंडळातील नोकर भरती प्रक्रियेत सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केलेल्या तक्रारी, त्याअनुषंगाने सुरू करण्यात आलेल्या चौकशीस होत असलेली अक्षम्य दिरंगाई, यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी दिनांक २० जानेवारी २०१७ रोजीच्या दरम्यान मा. आदिवासी विकास मंत्री, आदिवासी विकास विभागाचे सचिव, सहकार आयुक्त इत्यादींना बजावलेली नोटीस, याचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर गैरव्यवहार प्रकरणी तातडीने चौकशी करून		किल्ला.

दोषींविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही चौकशी धीम्या गतीनेच सुरू असणे, यावरुन गैरव्यवहार करणाऱ्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचेच दिसून येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२०१ ३२३ **श्री. जयंत पाटील व इतर वि. प. स.** कित्ता.

"सन २०१२ मध्ये आदिवासी विभागाकडून अनेक वस्तुंच्या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने मा. उच्च न्यायालयाने सेवानिवृत्त न्यायाधीश एम. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे राज्य सरकारला आदेश देणे, मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार राज्य शासनाने दि. १५ एप्रिल, २०१४ मध्ये समिती गठित करण्यात येणे, या समितीने चौकशी अहवाल ६ महिन्याचे आत राज्य सरकारला देण्याची शिफारस करणे, मात्र समिती गठित होऊन दीड वर्षांचा कालावधी होऊन देखील समितीने अद्यापपर्यंत चौकशी अहवाल न देणे, समिती गठीत झाल्यापासून समितीवर सुमारे १ कोटी १२ लाखापेक्षा अधिक खर्च होणे, माहे जानेवारी, २०१६ पर्यंत अहवाल समितीमार्फत सादर न होणे, सदर अहवाल लवकरात लवकर सादर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२०२ १३३३ **श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** कित्ता.

"अन्नधान्य वाहतूक करण्याकरिता जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयाकडून निविदा प्रसिद्ध करण्यात येणे, या निविदेस तीन निविदाकारांकडून प्रतिसाद मिळणे, या निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालदेवार प्रशांत ग्रोटेक प्रा. लि., नांदेड यांचेकडून पूर्तता करण्यात आलेली असणे, या प्रक्रियेत ते निम्नतम निविदाकार (L-१) ठरलेले असतानासुद्धा त्यांची निविदा मंजूर करण्यात न येणे, कावळे रोडलाईन्स यांची निविदा (L-२) ठरलेली असतानासुद्धा (L-१) निविदाकारास डावलून (L-२) निविदा मंजूर करण्यात येणे, तत्पुर्वी जिल्हाधिकारी, लातूर यांनीच कावळे रोडलाईन्स, लातूर यांनी यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या कामामध्ये

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		गैरव्यवहार केलेला असल्याने त्यांना काळ्या यादीत टाकणेबाबत शासनास शिफारस केलेली असणे, असे असतांनाही तसेच त्यांच्याकडून कावळे रोडलाईन्स यांची निविदा (L-२) ठरलेली असतांनाही त्यांची निविदा मंजूर करण्यात येणे, याविरुद्ध पालदेवार प्रशांत ॲग्रोटेक यांचेकडून शासनास निवेदन सादर करण्यात येणे, सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांचेकडून जिल्हाधिकाऱ्यास प्रकरण तपासून सादर करण्याच्या सूचना देण्यात येणे, जिल्हाधिकारी यांनी त्यांचे दिनांक १४ डिसेंबर २०१६ च्या पत्रान्वये मे. कावळे रोडलाईन्स, लातूर यांनी निविदेतील अटी व शर्तीचा भंग केलेला असल्याने ही निविदा प्रकियाच रद्द ठरविणेबाबत शासनास शिफारस करणे, याबाबत अद्यापपर्यंत कोणताही निर्णय घेण्यात न येणे, मे. पालदेवार प्रशांत ॲग्रोटेक प्रा. लि. यांची निविदा (L-१) यापूर्वीच ठरलेली असल्याने त्यांची निविदा मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२०३	२४०	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मराठी भाषा आणि भाषेशी संबंधित सर्व विभाग एकाच छताखाली आणण्यासाठी मराठी भाषा भवन उभारण्याबाबत चर्चा आणि घोषणा होणे परंतु अद्याप मराठी भाषा भवनाची एकही वीट रचली गेलेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या सुमारास उजेडात येणे, मराठी भाषा भवनात राज्य शासनाचे भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आदी सर्व विभाग घोषणेनुसार एकत्र काम करणार होते. मात्र अद्यापही हे सर्व विभाग एका छताखाली आले नसून वेगवेगळ्या ठिकाणीच काम करत असल्याचे उजेडात येणे, मराठी भाषा भवन उभारण्याच्या घोषणेला मुहूर्त कधी मिळणार हा प्रश्न जनमानसात	कित्ता.	

निर्माण होणे, राज्य शासनाकडून मराठी भाषा भवन उभारण्याबाबत अंमलबजावणी करण्यास होत आलेले अक्ष्यम दुर्लक्ष त्यामुळे मराठी भाषिकांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्य शासनाने मराठी भाषा उभारणीबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

२०४ ११२ **श्री. संजय दत्त, वि. प. स.** कित्ता.

"राज्यात दुध उत्पादक कंपन्या जवळपास खेड्यांमधील शेतकऱ्यांकडून दररोज दूध गोळा करतात मात्र ते ताजे दुध ग्राहकांकडे पोहचेपर्यंत त्याचं विषात रुपांतर झालेले असते, दुधात डिटर्जंट पावडर, युरिया, स्कीम्ड दूध पावडर, कॉस्टीक सोडा, ग्लुकोज, पांढरा रंग, रिफाइंड तेल, मीठ, स्टार्च असे विविध घटक समाविष्ट करून अनेक समाजकंटक थेट लोकांच्या जीवाशी खेळ खेळीत असणे, डिटर्जंट पावडर, मीठ व ग्लुकोजसारख्या घटकांमुळे दुधात दाटपणा येतो तर टार्चमुळे दूध नासण्यास प्रतिबंध होतो त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना भेसळयुक्त दूध केवळ बघून ओळखता येत नसणे, पोलीस व अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने वेळोवेळी छापे घातल्याने आतापर्यंत दूध भेसळीचे असे अनेक प्रकार उघडकीस आणले परंतु तरीही या प्रश्नी सरकारकडून ठोस कारवाई होत नसणे, दूध भेसळीचे प्रकार मुंबई व छोट्या शहरामध्ये सर्रास सुरू असणे, भेसळयुक्त दूध पुरवणे म्हणजे ग्राहकांवर हळूहळू विषप्रयोग केल्यासारखे प्रकार असणे, दुधात भेसळ करून काही टोळ्यांचे समाजकंटक नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याने दुधात भेसळ करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

२०५ १२८ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"भारतात आयात केली जाणारी औषधे, प्रसाधने किंवा त्यांच्या कच्च्या मालाच्या नमुन्यांची चाचणी करण्यासाठी अधिकृत मानल्या गेलेल्या प्रयोगशाळेत पात्र शास्त्रज्ञाद्वारे अनुपस्थितीत तोतया शास्त्रज्ञाद्वारे चाचण्या केल्या जात असून चाचणीशिवाय प्रमाणपत्रेही तयार केली जात असल्याचे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए)यांनी मुंबईतील गोरेगावमधील पॅरा लॅब प्रा. लि. या प्रयोगशाळेत छाप्यात सदरील प्रकार उघडल्याचे माहे फेब्रुवारी-२०१७ च्या सुमारास उजेडात येणे, विमानतळ तसेच गोदीमध्ये समुद्रमार्गे येणारा आयात माल किंवा हवाई वा समुद्रमार्गे निर्यात होणारा माल यांच्या नमुन्यांची तपासणी करण्याचे काम काही खाजगी प्रयोगशाळांकडे दिले जात असणे, त्याचप्रमाणे बाहेरच्या काही उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांची चाचणी करून घेण्याची सोयही उपलब्ध केली जात असणे, त्यासाठी त्यांना केंद्र सरकार व राज्य सरकार यांची मान्यता असेल, मुंबईत दररोज लक्षावधी औषधे-प्रसाधने यांची विक्री, वितरण होत असते काही उत्पादक खाजगी प्रयोगशाळांमधून आपल्या उत्पादनांची तसेच कच्च्या मालाची तपासणी करून घेत असल्याने सदरील प्रकारामुळे अशा प्रयोगशाळांमध्येच चाचणी, विश्लेषणात शंकास्पद प्रकार आढळल्याने सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, खाजगी प्रयोगशाळेतून एफडीएच्या महत्त्वाच्या अटी धाब्यावर बसविल्या जात असल्याने राज्य शासनाने या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "		
२०६	१३५	**श्री. नारायण राणे व इतर वि. प. स.** "मुंबईतील जी. टी. रुग्णालयात बेकायदा अस्थिव्यंग इम्प्लांट (रोपण) सामग्रीच्या धंद्याची व्याप्ती संपूर्ण राज्यात पसरलेली असून नांदेड, नाशिक, पुणे, अहमदनगर, यवतमाळ, बीड इत्यादी जिल्ह्यातही हा घोटाळा उघडकीस येणे, ग्रँट रोड येथील एका वितरकाकडे तब्बल ४० लाखांची विनापरवाना वैद्यक सामग्री जप्त करण्यात येणे, त्यामुळे अस्थिव्यंगोपचार, शस्त्रक्रियामध्ये हात, पाय, गुडघे व हात जोडणीसाठी वापरल्या जाणाऱ्या सामुग्रीच्या दर्जाबाबत व या रुग्णांना मिळणाऱ्या	कित्ता.	

सेवेबाबत शंका निर्माण झालेली असून जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने सखोल चौकशी करून याप्रकरणी दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

२०७ ६८० **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबईतील गोकुळदास तेजपाल रुग्णालयात अन्न व औषध प्रशासन विभागाने धाड टाकून विनापरवाना साठा केलेली वैद्यकीय सामग्री जप्त केल्याची बाब फेब्रुवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, रुग्णालयात विनीत पिंपळे हे मेडिकल सर्जिकल ॲण्ड हॉस्पिटल इक्विपमेंट या नावाने ऑर्थोपेडिक इंप्लान्टसची विना परवाना खरेदी व विक्री करीत असल्याचे उघडकीस येणे, त्याच्याकडून इंट्रामेड्युलरी नेल्स ॲण्ड इंटरलॉकिंग बोल्टस अशा स्वरूपाचे ४ लाख रुपयांचे ऑर्थोपेडिक इम्प्लान्टस् जप्त करण्यात येणे, या ऑर्थोपेडिक इंप्लान्टसची खरेदी मे. ॲसलेपायस एन्टरप्रायजेस, नांदेड यांच्याकडून केल्याचे समजणे, नांदेड येथे धाड टाकून १ कोटी ७ लाख इतक्या किमतीचे ऑर्थोपेडिक इंप्लान्टस या प्रवर्गातील वैद्यकीय सामग्रीचा साठा जप्त करण्यात येणे, या संस्थेकडे वैद्यकीय सामग्रीचा साठा व विक्री करण्यासाठी कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट होणे, या संपूर्ण प्रकरणात राज्यभरात विविध ठिकाणी २२ संस्थांना वैद्यकीय विक्री झाल्याचे निदर्शनास येणे, सदरहू प्रकरण अत्यंत गंभीर असून याबाबत तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया. "

२०८ ७९ **प्रा. अनिल सोले व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यात मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे आरोग्य विज्ञान विद्यापीठा अंतर्गत राज्यात नर्सिंग अभ्यासक्रमाच्या पदवीचे प्रशिक्षण देण्यांसाठी ४ महाविद्यालये चालविले जाणे, प्रत्येक महाविद्यालयात ५० विद्यार्थ्यांची क्षमता असून भारतीय परिचर्या परिषद दिली दरवर्षी मेडीकल कॉलेजच्या धर्तीवर पायाभूत सुविधांची पाहणी करून मंजुरी देण्यात येत असून

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		सदर अभ्यासक्रमाचे" राज्यात मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे आरोग्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत राज्यात नर्सिंग अभ्यासक्रमाच्या पदवीचे प्रशिक्षण देण्यासाठी ४ महाविद्यालये चालविले जाणे, प्रत्येक महाविद्यालयात ५० विद्यार्थ्यांची क्षमता असून भारतीय परिचर्या परिषद दिली दरवर्षी मेडीकल कॉलेजच्या धर्तीवर पायाभूत सुविधाची पाहणी करून मंजुरी देण्यात येत असून सदर अभ्यासक्रमाचे प्रशिक्षणासाठी एकही पद न भरले जाणे, सदर महाविद्यालयातील पद भरती करीता मागील हिवाळी अधिवेशन, २०१४ मध्ये संयुक्त बैठक होऊन त्यात शासनाकडे उपलब्ध असलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव व पात्रताधारक परिचर्या शिक्षकांमधूनच पद भरती करण्याचा निर्णय घेतला जाणे, व त्यास मंजूर करण्यात येणे, परंतु अद्यापही निकषानुसार अध्यापनासाठी प्राध्यापक, नि. प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता ही पदे भरली न गेल्याने रिक्त असणे, त्यामुळे परिचर्या महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया धोक्यात येणे, त्यातच पदभरती न झाल्याने सन २०११ पासून मंजूर असलेले नागपूर येथील एम. एस. सी नर्सिंग अभ्यासक्रम अद्यापही सुरू न होणे, त्यामुळे आरोग्य सेवा कोलमंडली जाणे, सदर मंजूर असलेले पदे त्वरित भरण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "		
२०९	९२	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मुंबईसह राज्यात किमान सात हजार बेकायदा पॅथलॅब असून त्यामुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे हे सरकारच्या वारंवार निदर्शनास आणूनही बोगस पॅथलॅबवर कोणती कारवाई करण्यात न येणे, प्रत्येक लॅबमध्ये पॅथॉलॉजिस्टची नियुक्ती करणे कायद्याने बंधनकारक असणे, परंतु राज्यात अनेक ठिकाणी केवळ डिप्लॉमाधारक टेक्निशियनची	कित्ता.	

नियुक्ती करून पॅथॉलॉजीस्ट ॲण्ड सुरू असणे, अनेक लॅबमध्ये टेक्निशियनच वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल तयार करून त्यावर पॅथॉलॉजिस्टच्या सहया करीत असणे, राज्यात अशा किमान सात हजार पॅथॉलॉजी लॅब असल्याची तक्रार महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट ॲंड मायक्रोबायलॉजिस्ट संघटनेकडे असणे, मान्यताप्राप्त पॅथॉलॉजीस्टची नियुक्ती न करता केवळ टेक्निशियनच्या जोरावर पॅथलॅब चालवण्यास बंद घालणारे पत्रक राज्य सरकारने दिनांक २४ मे २०१६ रोजी जारी केले परंतु दोन दिवसांनी सरकारनेच या पत्रकाला स्थगिती देण्यात येणे, राज्य शासनाने बेकायदा लॅबपॅथला दिलेल्या अभयामुळे सर्वसामान्य जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्य शासनाने राज्यात सुरू असलेल्या बेकायदा लॅबपॅथवर बंदी घालण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. ”

२१० २१२ **श्री. किरण पावसकर व इतर वि. प. स.** कित्ता.

“गडचिरोली येथील (जि. गडचिरोली) साळवे नर्सिंग महाविद्यालयाच्या संस्थापक हे तेथील विद्यार्थीनींशी नेहमीच गैरवर्तणूक करतात असा त्यांच्यावर गंभीर आरोप करत त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी बी. एस्सी नर्सींग प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनींनी दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास करणे, यासंदर्भातील निवेदन तेथील विद्यार्थीनींनी जिल्हाधिकारी, गडचिरोली व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना देणे, बी. एस्सी नर्सिंग द्वितीय वर्षाचा निकाल लागून १२ विद्यार्थीनींपैकी ६ विद्यार्थीनींना शून्य गूण देऊन अनुत्तीर्ण करण्यात येणे तर ६ विद्यार्थीनींचा निकाल हेतुपूस्कर रोखून ठेवण्यात येणे, वसतिगृहात देण्यात येणारे अन्न निकृष्ठ दर्जाचे असून इतर सोयी सुविधा सुद्धा विद्यार्थीनींना पुरविण्यात न येणे, त्यामुळे अन्य कॉलेजमध्ये प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी करून विद्यार्थीनींनी संस्था चालकाविरुद्ध कारवाई करण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२११	२२९	**प्रा. जोगेन्द्र कवाडे व इतर वि. प. स.** "नागपूर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील रक्तपेढी २४ तास सुरू ठेवण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीला महिना उलटत नाही तोच डागडुजीच्या नावाखाली ही रक्तपेढी बंद करण्यात आली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेली असणे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हृदय, पोटाचे विकास, मेंदू आणि मूत्रपिंड प्रत्यारोपणासारख्या जोखमीच्या शस्त्रक्रियांमध्ये वाढ झालेली असणे, रुग्णांच्या आवश्यकतेला लक्षात घेता या रुग्णालयातील रक्तपेढी २४ तास सुरू ठेवण्यात निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री महोदयांनी दिलेले असूनही रुग्णालय प्रशासनाने डागडुजीच्या नावाखाली रक्तपेढी बंद केलेली असणे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाला रोज किमान आठ ते दहा रक्त पिशव्यांची गरज असणे, रक्तपेढी बंद ठेवल्याने रक्ताअभावी अनेक रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, परिणामी त्यांच्यात पसरलेला असंतोष व संतापाचे वातावरण, सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रक्तपेढी तात्काळ सुरू करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		किंत्ता.
२१२	४९६	**श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.** "मुंबईतील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जमातीच्या नावाने खोटी जात प्रमाणपत्रे बनवून राखीव जागांवर डल्ला मारण्याचे रॅकेट गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले असणे; केवळ वैद्यकीयच नव्हे तर एम बी ए, अभियांत्रिकी अशा अनेक व्यवसायिक अभ्यासक्रमांमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्रत्येकी २० ते २५ लाखापर्यंत पैसे देऊन प्रवेश घेतले असणे; महाराष्ट्रात उस्मानाबाद, नंदुरबार आदी जिल्ह्यातील जात		किंत्ता.

पडताळणी समित्यांच्या बनावट सही शिक्क्यांच्या द्वारे हि खोटी प्रमाणपत्रे आजवर बनवून देणे; त्यामुळे गरीब व गरजू विद्यार्थ्यांचे नुकसान होणे; सदर विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागांवर बनावट जात प्रमाणपत्रांच्या आधारावर इतर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणाऱ्या समाजकंटकावर शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

२१३ ९३३ **श्री. सतिश चव्हाण व इतर वि. प. स.** कित्ता.

“शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथील रुग्णांवरील वैद्यकीय उपचाराचा भार कमी व्हावा, या हेतूने सातत्याने पाठपुरावा केल्याने सुपरस्पेशालिटी भव्य इमारत ३ वर्षांपूर्वी उभारण्यात आली असणे, परंतु मनुष्यबळ व यंत्रसामुग्री अभावी सदरील इमारतीमध्ये वैद्यकीय सेवा सुरू झाली नसणे, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने वैद्यकिय शिक्षण संचालक तसेच वैद्यकिय शिक्षण सचिव यांच्याकडे सुपरस्पेशालिटीसाठी आवश्यक त्या डॉक्टरांसह अद्यावत यंत्रसामुग्रीची, मुत्रविकार तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ, न्युरोसर्जन, निओ मेटॉलॉजी यांसारखे तज्ञ डॉक्टर, प्राध्यापक वर्ग तसेच तंत्रज्ञ, नर्सिग स्टाफ व चतुर्थ श्रेणीतील एकूण ४२६ अधिकारी, कर्मचारी भरती करण्याविषयी योग्य तो प्रस्ताव सादर केलेला असणे, तसेच घाटी औरंगाबाद येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०१७ रोजी एका शेतकऱ्यांचे हृदय, ब्रेनडेड, यकृत, किडण्या व डोळ्याची अवयवदानासाठी यशस्वीरित्या प्रक्रिया करण्यात आली असणे. त्या अवयवाचे मुंबई व औरंगाबाद येथील गरजू रुग्णांवर प्रत्यारोपन करण्यात आलेले असणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व विदर्भातून रुग्ण उपचारासाठी येत असणे, उपचार घेणाऱ्या रुग्णांमध्ये काही रुग्णांना मानवी अवयवाची आवश्यकता भासते, अशा परिस्थितीत घाटी रुग्णालयांमध्ये जे रुग्ण अवयवदान करण्यास तयार आहेत. परंतु त्याची प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ व यंत्रसामुग्री घाटी रुग्णालयाला उपलब्ध नसल्यामुळे अवयव दानासाठी

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आवश्यक ती प्रक्रिया होत नसणे, त्यासाठी रुग्णालयाने अवयवदानासाठी आवश्यक ती प्रक्रिया व प्रत्यारोपन करण्यासाठी प्रस्तावित केलेले मनुष्यबळ पदाची भरती करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने कराक्याची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२१४	१३१२	**श्री. अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** "बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे आशिया खंडातील एकमेव ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सुरू असणे, माहे जानेवारी, २०१७ मध्ये भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने केलेल्या तपासणीमध्ये १८ प्रमुख त्रुटी निदर्शनास येणे, त्रुटींची पुर्तता एक महिन्याच्या आत करण्याची आदेश भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने करणे, तज्ज्ञ प्राध्यापक व निवासी डॉक्टरांच्या रिक्त जागा, अनेक महत्त्वाचे विभाग आणि यंत्रणा बंद असल्यामुळे त्याचा रुग्णांना मोठा फटका बसणे, रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात मोठ्या प्रमाणावर गैरसोय असणे, शासन नियुक्त अभ्यागत मंडळाची दोन वर्षात एकदाही बैठक न झाल्यामुळे प्रशासकीय पातळीवर प्रचंड उदासिनता असणे, मराठवाड्यातील अत्यंत महत्त्वाचे आणि नामांकित वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय केवळ शासकीय उदासिनतेमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असणे, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने काढलेल्या त्रुटींची पुर्तता प्राधान्याने न केल्यास महाविद्यालयातील ५० जागा कमी होण्याची शक्यता निर्माण होणे, रुग्णालयातील वर्षानुवर्ष बंद पडलेले विभाग तातडीने सुरू करून रिक्त पदे भरण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी करणे, रुग्णालयाला आवश्यक अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने काढलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

कित्ता.

२१५ १३९० **श्री. संजय दत्त, वि. प. स.**

"धुळे जिल्ह्यात अपघातातील जखमी रुग्णास तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यास सांगण्यात आल्याने संतप्त झालेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी केलेल्या मारहाणीत धुळे जिल्हा सर्वोपचार रुग्णालयातील डॉ. रोहन मामुनकर यांना अमानुषपणे मारहाण केल्याची धक्कादायक घटना दि. १२ मार्च २०१७ रोजी घडणे, या नातेवाईकांनी रुग्णालयातील पलंग, खुर्च्यांसह इतर साहित्याची मोडतोड करण्यात येणे, धुळ्यातील जिल्हा रुग्णालयात निवासी डॉक्टराला झालेल्या मारहाणीच्या घटनेनंतर निवासी डॉक्टरांचा सुरक्षतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणे, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय असलेल्या रुग्णालयात कार्यरत निवासी डॉक्टरांवर होणाऱ्या हल्यांचे सत्र अद्यापही सुरूच असणे, जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१६ या वर्षात महाराष्ट्रात निवासी डॉक्टरांना मारहाणीच्या ४७ घटना घडल्या असणे, तर मुंबईत ६ डॉक्टरांवर मारहाण करण्यात येणे, या मारहाणीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून राज्य सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा संताप डॉक्टरांकडून करण्यात येत असणे, धुळे घटनेचे राज्यभर डॉक्टरांमध्ये पडसाद उमटून डॉक्टरांनी काळ्या फिती लावून निषेध करणे, राज्यात निवासी डॉक्टरांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याने डॉक्टरांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, राज्य शासनाने डॉक्टरांवर होत असलेले मारहाणीमुळे त्यांच्या सुरक्षेतेचा प्रश्न तातडीने सोडविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

कित्ता.

२१६ २८३ **श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.**

"कृष्णा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या अतिरिक्त ८१ टीएमसी पाण्यावर महाराष्ट्राचाच हक्क असल्याचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ जानेवारी २०१७ च्या सुमारास दिलेला असणे, या निर्णयामुळे राज्याच्या ६६६ दशलक्ष घनफूट इतक्या पाणी हिश्श्यात आता कोणीही वाटेकरी असणार नाही, हे ही स्पष्ट झालेले असणे, कृष्णा खोऱ्यातील सदरचे पाणी अडविण्याची कार्यवाही तातडीने करण्याची

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नितांत गरज, यासाठी लागणारा सुमारे १५ ते २० हजार कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२१७	३२४	**डॉ. अपूर्व हिरे व इतर वि. प. स.** "नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील २०० मीटर उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात वळविणेसंबंधीची बाब शासनाच्या विचाराधिन असल्याचे मा. जलसंपदा मंत्री महोदयांनी महाराष्ट्र विधान परिषदेच्या सन २०१६ मधील तिसऱ्या अधिवेशनात उपस्थित तारांकित प्रश्न क्रमांक : १९४९७ ला दिनांक १८ जुलै २०१६ रोजी दिलेल्या लेखी उत्तरात विशद करणे, दमणगंगा, नार, पार, अंबिका व औरंगा या पश्चिमवाहिनी नद्यांचा पाणी वापर नियोजनाचा अभ्यास करण्यासाठी शासनस्तरावर समिती नेमण्यात येणे, सदर समितीचा अहवाल प्राप्त झालेनंतर शासनस्तरावर या योजनेबाबतचा निर्णय होणे अपेक्षित असणे, महाराष्ट्र विधान परिषदेत दिनांक १३ डिसेंबर २०१६ रोजी उपस्थित तारांकित प्रश्न क्रमांक : २३७४३ चे लेखी उत्तरात मा. जल संपदा मंत्री महोदयांनी दमणगंगा व नारपार, औरंगा इ. खोऱ्यातील जलनियोजनाबाबत दिनांक ४ एप्रिल २०१६ रोजी गठीत केलेल्या संनियंत्रण समितीने दिनांक २५ जुलै २०१६ रोजी शासनास अहवाल सादर केला असून सदर अहवाल स्वीकृतीबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही व सदर अहवालातील राज्याच्या हिताच्या दृष्टीने कोणत्या शिफारशी महत्वपूर्ण आहेत, याबाबत शासनस्तरावर अभ्यास करण्यांत येत आहे, तद्नंतर सदर अहवालाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल, असे विशद करणे, दरम्यान नर्मदा, तापी वळण योजनेद्वारे नर्मदा खोऱ्यातील ५. ५९ अ. घ. फुट पाणी तापी खोऱ्यात वळविण्याचे नियोजित असणे, दमणगंगा,	कित्ता.	

पिंजाळ प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्याबाबत राज्य शासनाने मा. केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दिनांक १४/५/२०१५, दिनांक १३/७/२०१५ तसेच दिनांक : १५/९/२०१५ रोजीच्या नदीजोड प्रकल्पाच्या विशेष समितीच्या बैठकीत मागणी करणे, महाराष्ट्रातील सततची दुष्काळी परिस्थिती व पाण्याचे भासणारे तीव्र दुर्भिक्ष या बाबी विचारात घेता नार, पार, अंबिका, औरंगा तसेच दमणगंगा इत्यादी नद्यातील उपलब्ध पाणी दुष्काळी व अवर्षण प्रवण भागाकरिता तात्काळ वापरात आणण्याच्या दृष्टीने जलद कार्यवाही करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२१८ ४०८ **श्री. जयंत पाटील, वि. प. स.**

"महाराष्ट्र राज्यात जलसंपदा विभागाची लहान - मोठी मिळुन ३ हजार ९०० धरणे असणे, मात्र गेल्या दोन वर्षात या कामासाठी फक्त २४२ कोटी रूपये निधीची तरतूद करण्यात येणे, जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांमुळे किती क्षेत्र सिंचनाखाली आले हे मोजण्याची यंत्रणा असणे, मात्र जलयुक्त शिवारमधून कृषी विभाग, जलसंधारण आणि जिल्हा परिषदांनी किती कामे केली, त्यातून किती क्षेत्र सिंचनाखाली आले हे मोजण्यासाठी यंत्रणा व्यवस्था नसणे, त्यासाठी देखभाल दुरूस्तीची कोणतीच आस्थापना नसणे, त्यामुळे दोन चार वेळा मोठा पाऊस पडला तर या विभागांनी केलेल्या कामांमुळे किती क्षेत्र सिंचनाखाली आले, याची मोजणी कशी करावयाची हा प्रश्न निर्माण होणे, शिवाय केलेले काम वाहून गेली की, शिल्लक आहे याची तपासणी करण्याची यंत्रणाही या विभागाकडे अस्तित्वातच नसणे, देखभाल दुरूस्तीसाठी ठरवले गेलेले मापदंड किमान १० वर्षे जुने असणे, मधल्या काळात अनेक कामे होणे, अनेक बदल होणे, १३ व्या वित्त आयोगाने आपल्या मापदंडापेक्षा पाच पट जास्त दर देण्याच्या सूचना देणे, पण त्याबाबतीत अजूनही १० वर्षे मागे असणे, त्यामुळे रानोमाळ उघड्यावर पडलेले प्रकल्प, कालवे,

कित्ता.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		यंत्रसामग्रीही विनावापर बंद पडलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२१९	९३६	**श्री. सतिश चव्हाण व इतर वि. प. स.** "पैठण तालुक्यातील जायकवाडी धरणाखालील दुष्काळी गावांना पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने ब्रम्हगव्हान जलउपसा सिंचन योजना हाती घेण्यात आलेली असणे, सदर योजनेस दिनांक २१ ऑक्टोबर १९८० अन्वये (दरसूची १९७८-७९) नुसार १२५.०० लक्ष रुपयाची मूळ प्रशासकीय मान्यता असून दिनांक १८ जुलै २००९ अन्वये २२२.२४ कोटी रुपयाची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली असणे, माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत सदर योजनेवर ११०.३८ कोटी खर्च झालेला असणे, सदर योजनेचे पंपगृह/यांत्रिकीकामे मुख्य कालवा व वितरीकेची कामे पूर्ण झालेली असणे, भाग १ टप्पा २ चे काम पूर्ण झाल्यावर १८,७८७ हेक्टर सिंचन निर्मिती होऊन ५५ गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असणे. सदर प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद नसल्याने काही प्रमाणात भूसंपादन व स्थापत्य कामे बंद झालेले असणे. सदर प्रकल्प पूर्ण करून कार्यान्वीत करण्यासाठी १५०. ०० कोटी रुपयाची तातडीची गरज लक्षात घेऊन विभागाने शासनाकडे प्रस्ताव दिलेला असणे. परंतु त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसणे, तरी सदर प्रकल्पासाठी रुपये १५०. ०० कोटी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "	कित्ता.	
२२०	१०४५	**श्री. गोपिकिशन बाजोरीया, वि. प. स.** "अकोला जिल्ह्यात १. पोपटखेड लघुपाटबंधारे योजना , २. कवठा शेलु (संग्राहक) ल. पा . योजना , ३. उमा बॅरेज, वाई संग्राहक प्रकल्प, ४. पुर्णा बॅरेज-२ (नेरधामणा) प्रकल्प, ५. शहापूर बृहत ल. पा. प्रकल्प, ६.	कित्ता.	

कवठा बॅरेज प्रकल्प, ७. नया अंदुरा बृहत लघुपाटंधारे प्रकल्प, आदि प्रकल्पांना सन २००८ मध्ये प्रशासकीय मान्यता देऊन प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात येणे, परंतु कालांतराने निधीअभावी सदर प्रकल्पाचे काम रखडणे, याकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याकरिता प्रस्ताव सादर करूनही अदयाप शासन स्तरावर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास होत असलेला विलंब, आधीच विलंब झाल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत झालेली वाढ, उपरोक्त प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचा कालावधी संपुष्टात येत असतांनाही अद्यापि प्रकल्पाची कामे अर्धवट अवस्थेत असणे, काही प्रकल्पाचे ठेकेदार काम अर्धवट सोडून जाणे, सदरहू भाग हा खारपाण पट्टया क्षेत्रात येत असल्यामुळे सदर प्रकल्प तातडीने पुर्णत्वास गेल्यास हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत होईल याकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन निधीची उपलब्धता करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून जिल्ह्यातील सर्वच प्रकल्पांना तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका. ”

२२१ १३५४ **श्री. आनंदराव पाटील, वि. प. स.** कित्ता.

“सातारा जिल्ह्यातील माण तालुक्याच्या पूर्व भागातील व वरकुटे मालवडी परिसरातील १६ गावांना कोणत्याही पाणी योजनेच पाणी मिळत नसल्याने या ग्रामस्थांनी गाव बंद ठेवत सातारा येथील पाटबंधारे प्रकल्प कार्यालयावर हजारोंच्या संख्येने मोर्चा काढला असल्याचे दि. ६ जानेवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, माण तालुक्यातील काही भागाला उरमोडी पाणी योजनेचे पाणी मिळत असणे, मात्र वरकुटे मालवडी परिसरातील १६ गावे कोणत्याही योजनेत येत नसल्याने येथे सिंचनासह टंचाईच्या काळात तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत असणे, म्हणून श्रमिक मुक्ती दल या संघटनेच्या नेतृत्वाखाली सातारा येथे पाटबंधारे कार्यालयावर मोर्चा काढून टेंभू योजनेच पाणी मिळावे अशी निवेदन देऊन मागणी केलेली असणे, परंतु या मागणीप्रती शासनाने

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या वंचित गावांमधील ग्रामस्थांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने उमरोडी-तारळीचे त्यांना आवश्यक असलेले पाणी टेंभू योजनेच्या वितरण व्यवस्थेशी जोडून या गावांना पाणी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२२२	८०	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी सुमारे ९८ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार असून राज्याला २४ हजार कोटी रुपयांचा भार उचलावा लागणार असणे, मुंबई-अहमदाबाद महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेनसाठी मुख्य स्थानक म्हणून वांद्रे-कुर्ला संकुलातील ४० हजार चौरस मीटर जागा देण्याचे राज्य शासनाने निश्चित केले असणे, सदरील महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पात राज्यात बुलेट ट्रेनचे क्षेत्र ३३ टक्के असून ७७ टक्के गुजरातमध्ये असल्याने गुजरात राज्याला सर्वाधिक लाभ होणार असल्याने समान खर्च उभारण्याबाबत राज्यातून होत असलेला विरोध, याकरिता मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनसाठी केंद्र सरकार मान्यता द्यावी अशी राज्य शासनाने करण्यात आलेली मागणी, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचा आराखडा निश्चित होत नसणे, या महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू होण्याआधी अनेक अडचणी येत असल्याने सदरील प्रकल्प पूर्ण होण्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, जनमानसात सदरील प्रकल्प सुरू होणार की नाही याबाबत प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे राज्यशासनाने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट करून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	

"नागपूर शहरात परवानाधारक ऑटो चालकांची संख्या शासनाच्या १९९७ च्या धोरणानुसार १, ३७, ००० असणे. सदर संख्येतील २२२४ परवानाधारक ऑटो चालकांनी आपल्या परवान्याचे नूतनीकरण न केल्यामुळे ही संख्या ११, ४७६ वर येणे, मात्र नागपूर शहरातील ऑटोंच्या संख्या परवानाधारकांच्या संख्येपेक्षा जास्तच असणे, नवीन परवान्याकरिता २११२ नवीन परवानाधारकांची निवड करण्यात येणे, तरी देखील अनेक गरजु तरुण अजूनही परवाना प्राप्त करण्याच्या प्रयत्नात असणे, परवानाधारक ऑटोचालकांची संख्या व नागपूर शहरात अपेक्षित ऑटोंची संख्या यात फार मोठी तफावत असल्यामुळे परवानाधारक ऑटोचालक प्रवाशांवर सतत अरेरावीच्या भाषेतच व्यवहार करणे विशेषतः रेल्वे स्टेशन, बस स्टँड येथील परवानाधारक ऑटोचालक सतत अरेरावीचा भाषेतच बोलणे, मीटर ने न जाण्याचेच म्हणणे प्रवाशी त्यावर काही बोलला तर संघटीत शक्ती ने त्याच्याशी हुज्जत घालणे स्थानिक पोलीस देखील बघ्याची भूमिका घेणे, ऑटोचालक स्थानिक सीताबर्डी पोलीस स्टेशन समोरच मोठ मोठ्याने आवाज देऊन ग्राहकांना विना मीटर, वाहन क्षमतेच्यापेक्षा जास्त प्रवाशी वाहतूक करणे मात्र त्यांचेवर पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न होणे. विना परवाना धावत असलेल्या ऑटोंबाबत प्रादेशिक परिवहन विभागातील उप प्रादेशिक अधिकाऱ्यांना विचारणा केली असता हे काम आमचे नाही वाहतूक पोलिसांचे आहे म्हणून आपले हात झटकणे, पोलीस प्रशासनाकडून कुठलीही प्रतिरोधात्मक कारवाई न केल्यामुळे या ऑटो चालकांची दादागिरी सुरूच असणे ऑटो चालकांच्या या दादागीरीला रोखण्याची नितांत गरज, वाहन परवाना प्राप्त न झालेले व नवीन रोजगाराची संधी शोधणाऱ्या होतकरूंना ई-रिक्षा, टॅक्सी कब वाहतुकीचे परवाने देऊन सामन्यांची होणारी वाहतुकीची गैरसोय सोडविण्याची नितांत आवश्यकता याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना यावर शासनाची प्रतिक्रिया. "

३९०

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२२४	३९४	**श्री. मितेश भांगडिया व इतर वि. प. स.** "राज्यात राज्य प्रादेशिक परिवहन विभागामार्फत संपूर्ण वाहन परवान्याचे व्यवहार संगणीकृत ऑनलाईन करण्यात येणे, मात्र ज्यावेळी नागरिक आपल्या वाहन परवान्याचा अर्ज ऑन लाईनद्वारा सर्व कागदपत्रांसह सादर करतेवेळी ती सर्व कागदपत्रे बरोबर असूनदेखील व्यवहार पूर्ण न झाल्यामुळे वापस येणे व याचे transaction रिजेक्ट झाल्याचा संदेश प्राप्त होणे. ऑनलाईन अर्जामध्ये एल.पी.जी. वर चालणाऱ्या वाहनांबाबत काहीही माहिती उपलब्धच नाही. प्रादेशिक परिवहन विभागामार्फत घरपोच पाठविण्यात येणाऱ्या प्रत्येक कागदांकरिता ५० रुपये प्रति कागद शुल्क घेण्यात येणे. परिवहन विभागांमार्फत घरपोच परवाना व्यवस्थेमध्ये त्रुटी असल्या कारणाने अनेक परवानाधारकांना सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटूनही परवाना घरपोच प्राप्त न होणे. वाहन तारण व्यवहारामधील वाहन हस्तांतरण प्रकारात दोन्ही मालकांच्या नावातील फेरफारामध्ये दोन्ही धारकांना रु. १५०० प्रती धारक असे शुल्क आकारण्यात येणे. जेव्हा की वाहन एकच असणे, बाहेरून येणाऱ्या व राज्यातील आंतरजिल्हा वाहनांच्या ना हरकत प्रमाणपत्राकरिता विनाकारण शुल्क आकारण्यात येणे प्रादेशिक परिवहन विभागातील होणाऱ्या सर्व व्यवहारांच्या प्रक्रियेत पारदर्शिता आणण्याची नितांत गरज. शासनाने या संपूर्ण प्रकाराकडे लक्ष देण्याची यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना यावर शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
२२५	४७५	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "एसटी महामंडळामार्फत प्रवाशांसाठी दरवर्षी नवीन बसेस कार्यशाळेत तयार करून त्या ताफ्यात आणल्या जाणे, मात्र या वेळी नवीन बसेस एसटी कार्यशाळेत न तयार करता बाहेरून तयार करून घेण्याचा	कित्ता.	

निर्णय घेण्यात आलेला असणे आणि त्याकरीता काही महिन्यांपूर्वी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे, किचकट निविदा प्रक्रियेमुळे १,५०० नवीन बसेस अद्यापही एसटीत दाखल झालेल्या नसणे, त्यामुळे जुन्या बसमधूनच एसटीचा प्रवास सुरू असणे, सध्या एसटी महामंडळाकडे १८, ५०० बसेस कार्यरत असणे, यामध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात बसेस भंगारात काढून नवीन बसेस ताफ्यात दाखल केल्या जात असणे, काही बसेसची पुनर्बांधणीही केली जाणे, नियमानुसार १० लाख कि. मी. धावलेल्या किंवा ९ वर्षे धावलेल्या बसेस भंगारात काढून पूर्णतः नवीन बसेस तयार केल्या जाणे, तर ७ किंवा ८ लाख कि. मी. धावलेल्या बसेसची पुनर्बांधणी केली जाणे, प्रत्येक वर्षी जवळपास ३ हजार बसेस ताफ्यातून बाहेर पडणे, यातील १५०० बसेस नवीन तर १५०० बसेसची पुनर्बांधणी करून त्या ताफ्यात दाखल करण्यात येणे, या बसेसचे काम पुण्यातील एसटीच्या दापोडी, औरंगाबादमधील चिखलठाणा आणि नागपूरमधील हिंगणे येथील एसटीच्या मध्यवर्ती कार्यशाळेत होणे, परंतु यावेळी खर्च कमी करण्यासाठी बाहेरून एसटी तयार करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मात्र निविदा प्रक्रियेतील किचकटपणामुळे एसटी बसेस अद्यापपर्यंत तयार न होणे, यामुळे एप्रिल, मे या गर्दीच्या हंगामात नागरिकांना व प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागणार असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याकरीता शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

२२६ १५५८ **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.** कित्ता.

“रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन हा तालुका पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठिकाण असणे, या तालुक्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त असणे, येथे असलेल्या निसर्गरम्य ठिकाणांमुळे मुंबई, पुणे व सांगली-सातारा या भागातून येणाऱ्या पर्यटकांची मोठी वर्दळ असणे, परंतु श्रीवर्धन तालुक्यामध्ये एस. टी. आगारामध्ये झालेल्या दुरावस्थामुळे तेथील पर्यटकांची मोठी गैरसोय होणे, याठिकाणाहून सुटणारी ठाणे ते बागमांडला या गाडीचे ऑनलाईन पद्धतीने रिझर्वेशन करावयास गेले असता त्याची नोंद न

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		होणे, ग्राहक निवारण तक्रारीसाठी दिलेल्या क्रमांकावर याबाबत संपर्क करून तक्रार करून सुद्धा त्याचे निवारण न होणे, सदर एस. टी. आगरामध्ये प्रवाशांना बसण्यासाठी योग्य आसन व्यवस्था नसणे, तेथील पंखे नादुरुस्त असणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणे, उपहारगृह कित्येक वर्ष बंद असणे, प्रवाशांसाठी असलेले प्रसाधन गृहामध्ये तर शौचालयाचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत असून अस्वच्छता असणे, कोकणातील पर्यटनाच्या दृष्टिने महत्त्वाच्या या आगारामध्ये जुन्या एस. टी. बसेसची संख्या जास्त असणे, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे एस. टी. च्या अनेक फेऱ्या काही वेळा रद्द कराव्या लागणे, श्रीवर्धन एस. टी आगाराला नवीन एस. टी. बसेस देण्याची मागणी स्थानिक जनतेकडून वारंवार करण्यात येणे, प्रवाशांच्या होणाऱ्या गैरसोयीकडे शासनाचे वारंवार लक्ष वेधून सुद्धा शासनाचे होत असलेल्या दुर्लक्षामुळे स्थानिक जनतेमध्ये तसेच प्रवाशांमध्ये नाराजीची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने कारावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२२७	१८५	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "प्रिव्हिलेज इंडस्ट्रीज लि. मु. पो. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा या कंपनीने पॅकेज स्कीम ऑफ इंसेन्टीव २००७ च्या अंतर्गत चुकीची माहिती देऊन केंद्र व राज्य शासनाची कोट्यवधी रूपयांची फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, राज्य शासनाने सदर स्कीम राज्यातील उद्योग वाढीकरता आणणे, पी. एस. आय. १७०७/(सी. आर-५०)/इंडिया-८ नुसार अनुक्रमांक ३, २ मधील दिलेल्या माहिती व संदर्भानुसार व अटीशर्ती अंतर्गत मोठे उद्योग हे विक्रीकर रकमेच्या १०० टक्के सुटीसाठी पात्र असणे, या योजनेद्वारे सदर कंपनीने शासन नियम व अटीची पुर्तता न करता दिशाभूल करणारी खोटी माहिती देऊन या योजनेचे अनेक	कित्ता.	

लाभ घेतल्याचे उघडकीस येणे, प्रिव्हिलेज इंडस्ट्रीज लि. यांची एक ब्रेव्हरी व एक धान्य आधारीत आसवणी असे दोन वेगवेगळे प्रकल्प वेगवेगळ्या प्लॉट वर असून त्यांचे कम्पाऊंडसुद्धा वेगळे असणे, सन-२०१३-१४ च्या केंद्र शासनाच्या कंपनी लॉ बोर्ड एमसीए २१ वर या प्रकल्पाची गुंतवणूक २०४.२३ कोटी इतकी असणे, सदर कंपनीमध्ये नियमानुसार ५०० कामगार कामावर नसणे, ईत्यादी अनेक प्रकारे राज्य व केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून शासनास चुकीची व खोटी माहिती देऊन मिळणाऱ्या १०० टक्के विक्रीवर परतावाचा फायदा सदर कंपनी घेत असणे, मिळणारा फायदा विदेशी दारू उत्पादक कंपन्या असलेल्या घटकांना पास करून कामगार व शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे मोबदला देण्यात न येणे, सरकारच्या आधारित किमतीनुसार शेतकऱ्यांना भाव न देता त्यांची ही कंपनी करीत असलेली आर्थिक फसवणूक, या कंपनीने पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टीव २००७ अंतर्गत शासनाची फसवणूक करून आतापर्यंत बेकायदेशीरपणे कोट्यवधी रूपयांचा नफा कमविल्याचे उघडकीस येऊनही, शासनाने त्यांचेविरोधात कोणतीच कारवाई न केल्याने औद्योगिक क्षेत्रात शासनाच्या या नाकर्तेपणाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संपात, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

२२८ १२२० **श्री. विनायकराव मेटे, वि. प. स.** कित्ता.

“आकृती निर्माण लिमिटेड, (हबटाऊन) एम. आय. डी. सी. अंधेरी (पूर्व) यांना सन १९९५ मध्ये आंबेडकर नगर, अष्टविनायक अशा एकूण नऊ विभागांमधील ३००० झोपड्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मंजुरी देणे, या योजनेला २० वर्ष पूर्ण झालेली असून, सन १९९५ च्या मंजुरी आराखड्यामध्ये ३००० झोपडीधारकांचे आता ५००० झोपडीधारक होऊनही ही योजना अद्यापपर्यंत पूर्ण न होणे, ही सर्व जागा एम. आय. डी. सी. च्या मालकीची असणे, यामध्ये पात्र लोकांना ताबा न देता ३८० अपात्र, व्यापारी व ज्यांना नवीन इमारतीमध्ये ताबा दिलेला असतानाही त्यांच लोकांची जुन्या जागेवरील दुकाने चालू ठेवणे, तसेच योजने अंतर्गत

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		ॲनेक्स् (विस्तारीत) इमारतीमध्ये शासनाने मंजुरी दिलेल्या बालवाडी, सोसायटी कार्यालय, समाजकल्याण केंद्र इत्यादींना मंजुरी असतानाही त्या जागेवर हॉटेल, जिमखाना चालू करणे, आकृती स्टार बिल्डींगच्या बाजूला असणाऱ्या व्ही मॉल मध्ये वाटप केलेल्या गाळाधारकांच्या झोपड्या इथे नसतानाही त्यांना गाळ्यांचे वाटप केलेले असणे, पुनर्वसीत इमारती, सेल इमारतींना परवानगी देण्यात आलेल्या व त्यांच्या क्षेत्रफळामध्ये तसेच पूर्ण व अपूर्ण बांधकामामध्ये प्रचंड तफावत असणे, आंबेडकरनगर व अष्टविनायक या नवीन इमारतीमधीलरहिवाशांना सदनिकेची लॉटरी न काढता १२५ सदनिकांचे वाटप करण्यात येणे, या योजनेअंतर्गत विकासकाने प्रचंड भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे, यामुळे विकासक, प्रशासन व शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२२९	९३५	**श्री. सतिश चव्हाण व इतर वि. प. स.** " शेती व शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषी हवामान संशोधन केंद्राची नितांत गरज असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने मराठवाड्यात पाहिले कृषी हवामान संशोधन केंद्र बदनापुर कृषी संशोधन केंद्राच्या २० हेक्टर क्षेत्रावर उभारण्यात यावे यासाठी एक वर्षापुर्वी रु. ६७ कोटीच्या मागणीसह प्रस्ताव शासनास सादर केलेला असणे, यावर कृषी विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव यांचे सोबत बैठक ही झालेली असणे, परंतु हवामान शास्त्रज्ञ व संशोधकाची संख्या कमी असण्याची कारणे दाखवून हा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आलेला असणे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने मागील ३० वर्षात जिल्हानिहाय पडलेल्या दुष्काळाचा व बदलत्या हवामानाचा अभ्यास करूनच कृषी हवामान संशोधन केंद्र बदनापुर येथे स्थापन करणेसाठी प्रस्थावित	कित्ता.	

केलेला असणे, मुंबई व नागपुर येथील रडार यंत्रणेच्या कक्षेत मराठवाडा येत नसल्याने बदनापुर येथे नवीन स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र स्थापन करणे गरजेचे असणे, गारपीट, वादळ, पाऊस, तापमान या बाबत अचुक अंदाज वर्तवता येईल व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना यांचा फायदा होऊन दुष्काळी परिस्थितीवर काही प्रमाणात मात करता येऊ शकेल त्यासाठी शासनाने यावर त्वरित निर्णय घेऊन बदनापुर येथे कृषी हवामान संशोधन केंद्राची उभारणी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२३० १२४७ **श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** कित्ता.

" महूद ता. सांगोला, जि. सोलापूर या गावाने लोकसहभागातून कासाळ ओढ्यांचे यशस्वीरित्या पुनर्जीवन करून सदर ओढ्याच्या दुर्तफा रोपे लावून ती जगवलेली असणे, या गावाने जलनियोजनाच्या कामासोबतच फळांची लागवड करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व समृद्धी महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी विविध योजनांचे एकत्रित पॅकेज करून त्याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे पाठविलेल्या प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही न होणे, येथील लोकसहभागातून झालेल्या कामाबाबत केलेल्या मूल्यांकनाच्या तुलनेत प्रत्यक्षात अधिक काम असल्याचे निष्पन्न होणे, फळबाग लागवडीसाठी विहित वेळेत प्रस्ताव करण्यासाठी जाणीवपूर्वक ई मस्टरची की अडवून ठेवल्यामुळे महुदचे शेतकरी फळबाग लागवडीच्या कार्यक्रमापासून वंचित राहणे, त्यामुळे या भागातील गावांना प्रोत्साहन मिळून अधिकाधिक कामे पूर्ण व्हावीत याकरीता शासनाचे करावयाची उपाययोजना, जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कंपार्टमेंट बंडिंग कामात तालुका कृषी अधिकारी व इतर कर्मचारी यांनी संगनमताने केलेल्या भ्रष्ट्राचाराबाबत सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करणेसाठी उप विभागीय कृषी अधिकारी पंढरपूर, जि. सोलापूर यांनी दिनांक २७. फेब्रुवारी २०१७ रोजी पाठविलेला प्राथमिक तपासणी अहवाल, त्याचबरोबर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी संबधितांवर प्रशासकीय कारवाई करणेसाठी माहे फेब्रुवारी, २०१६ व दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ अन्वये विभागीय कृषी सहसंचालक पुणे यांना सविस्तर प्रस्ताव सादर करून व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २१ जानेवारी २०१७ अन्वये कृषी आयुक्त, पुणे यांना गोपनीय पत्र पाठवून देखील अद्याप पर्यंत प्रशासकीय कारवाई न झाल्यामुळे जिल्ह्यात असंतोषाचे व चिडीचे निर्माण झालेले वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३१	१६९	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** " राज्य शासनाने नोव्हेंबर, २०१४ पासून तीन लाख रुपयांवरील सर्व कामांसाठी ई टेंडरिंग सक्तीचे केले असूनही राज्य शासनाचे ई-टेंडरिंग धोरण धाब्यावर बसवून ग्रामविकास विभागाने मोठ्या रस्त्यांच्या कामांची ३ लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीचे तुकडेपाडून त्याचे कंत्राट देण्यात येणे, त्यामुळे ग्रामविकास विभागाच्या २५५ कोटींच्या रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, याप्रकरणी शासकीय अधिकारी यांना दोषी ठरवून त्यांची चौकशी करण्यात येत असल्याने शासकीय अधिकारी व कर्मचारी त्यांचेमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून या प्रकरणात शासनाचा नियम धाब्यावर बसवणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	किस्ता.	
२३२	१८८	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "राज्यातील वर्धा, अमरावती व अकोला जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या गरीब लोकांना रोजच्या आयुष्यातील गरजा भागविण्यासाठी	किस्ता.	

अनधिकृत मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या सावकारी जाळ्यात महिला बचतगट अडकत असल्याचे विदारक चित्र समोर येणे, मायक्रोफायनान्स कंपन्या राष्ट्रीय बँका व इतर कायदेशीर वित्तव्यवसाय करणाऱ्या संस्थेकडून कर्ज स्वरुपात रक्कम उचलत व महिला बचत गटांना अतिरिक्त व्याजदर लावत कर्जाऊ रक्कम देतात सदरील रक्कम वसूल करण्यासाठी पठाणी सावकारी पद्धतीने कर्ज वसूल बचत गटातील महिलांकडून केली जात असल्याने अनेकांनी आत्महत्या केल्याचे उजेडात येणे, राज्य शासनाकडून या कंपन्यांवर कोणतीच कायदेशीर कारवाई करण्यास येत नसल्यामुळे शासनाला यामध्ये आलेले अपयश, राज्य शासनाने मायक्रोफायन्सास कंपन्याकडून ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांची सावकारी पद्धतीने होत असलेल्यार वसुलीला आळा बसण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

२३३ १२६५ **श्री. नागोराव गाणार व इतर वि. प. स.** कित्ता.

"जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत जिल्ह्यात येणाऱ्या ११७ शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रकरणात नियमबाह्यारित्या दिनांक २३ नोव्हेबर २०१६ ला आदेश काढण्यात आलेले असणे, आदेश पत्रावर दिनांक २३ नोव्हेंबर २०१६ ही तारीख असली तरी प्रत्यक्षात सदरहू आदेश दिनांक १०, ११ व १२ डिसेंबर २०१६ या सुट्टीच्या कालावधीत तसेच जिल्ह्यात नगरपरिषदांची आचार संहिता लागू असतांना परस्पर देण्यात आलेले असणे, जिल्ह्यात पदवीधर शिक्षकांच्या जागा उपलब्ध असताना त्यांना आंतरजिल्हा बदलीने समायोजनाचे आदेश न देता १२ वी डी. एड. धारक शिक्षकांना वर्ग ६ ते ८ चे आदेश देण्यात आलेले असणे हे आदेश देताना शासन निर्णय जेष्ठता यादीए, नियुक्तीचा प्रवर्ग बदलणे, रोष्टर अद्यावत नसणे अशा अनेक प्रकारे शासन निर्णयाचे उल्लंघन करून व आचार संहितेचे उल्लंघन करून नियमबाह्य बदल्या झाल्याची तक्रार प्राप्त झालेली असून या संपूर्ण प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा संशय निर्माण होणे, त्यामुळे नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. भंडारा यांना पत्र देऊन सखोल

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		चौकशी करण्याची विनंती केलेली असणे, या नियमबाह्य बदल्यांमुळे पात्रताधारक आंतरजिल्हा बदलीने येणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होणे, या करिता या गंभीर विषयाबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून सखोल चौकशीचे आदेश देण्याची आवश्यकता व चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३४	१३२४	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "नागोठणे (जि. रायगड) ही रोहा तालुक्यातील एक प्रमुख ग्रामपंचायत असणे, नागोठणे परिसरात औद्योगिकीकरण झाल्याने नागोठणे ग्रामपंचायत ही एक प्रमुख बाजारपेठ सुद्धा असणे, या प्रमुख ग्रामपंचायतीकडून योग्य रितीने प्रशासन चालविणे आवश्यक असणे, कर वसुली व्यवस्थित होत असल्याने ग्रामपंचायतीमध्ये विविध विकास कामे होणे अपेक्षित असणे, सरपंच व उप सरपंच, ग्रामपंचायत सभासद यांचेमार्फत योग्य प्रशासन चालविणे अपेक्षित असतांना केवळ आर्थिक हितसंबंध जोपासण्याकडे पदाधिकाऱ्यांचा कल असणे, अनेक प्रकरणांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या बाबी समोर येणे, प्रमुख बाजारपेठ असल्याकारणाने शहरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण होणे आवश्यक असणे, परंतु केवळ ठेकेदारांच्या हितसंबंधासाठी ग्रामपंचातयीने पेव्हर ब्लॉक बसविलेले असणे, मोठ्या रस्त्यावरसुद्धा डांबरीकरणाऐवजी पेव्हर ब्लॉक बसविलेले असणे, पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ठेका दिलेल्या कंपनीने निकृष्ट दर्जाच्या पेव्हर ब्लॉक खरेदी करून वापरणे, नागरीकांच्या सोई सुविधांचा यामध्ये कुठल्याही प्रकारचा विचार केलेला नसणे, ठेकेदाराला मंजूर किंमतीपेक्षा जास्त रक्कम अदा करणे, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची वैयुक्तिक खर्चाची बीले ग्रामपंचायतीमध्ये खर्ची पाडणे, वैयुक्तिक लाभांच्या योजनामध्ये	किता.	

लाभार्थ्याकडून आर्थिक लाभ घेणे, ग्रामपंचायतीमार्फत खर्च होणारी बिले वेगळ्या कामासाठी व रक्कम वेगळ्या कामासाठी अदा करणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासनाने त्यावर कोणतीच कारवाई केलेली नसणे, यामुळे स्थानिक नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, विकास कामामध्ये केलेला गैरव्यवहार यामुळे निर्माण झालेली चीडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

२३५ १४४२ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि. प. स.** कित्ता.

"संगमेश्वर तालुक्यातील (जि. रत्नागिरी) आरवली परिसरातील कळंबुशी येथे ग्रामदेवतेच्या होळीसाठी पौर्णिमेला ग्रामस्थ माड नेत असताना लोखंडी साकव तुटल्याने ५९ जण पडून जखमी तर त्यापैकी ५ जण गंभीर जखमी होऊन त्यांना उपचारासाठी डेरवण येथील रुग्णालयात दाखल केले असल्याचे दि. १३ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कळंबुशी येथील खाचरवाडी ते बौद्धवाडी, म्हापर्लेवाडी या वाड्यांना जोडणारा १२ फूट लांबीचा व ६ फूट रुंदीचा १९८० मध्ये जिल्हा परिषदेकडून बांधण्यात आला असणे, ग्रामस्थ होळीसाठी माड घेऊन या साकवावर आले असता त्याचा लोखंडी अँगल तुटून साकव मधोमध तुटलेला असणे व त्यामुळे सर्वजण साकवावरुन सुमारे २० फूट खाली पन्यात कोसळून जखमी झाले असणे, परंतु प्रशासनाने तेथे भेट देण्याबाबत दाखविलेली अनास्था, त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्याकरिता शासनाने सदर ठिकाणी नवीन साकव बसविण्यासोबतच जिल्ह्यातील सर्व जुन्या धोकादायक साकवांचा आढावा घेऊन संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी त्यांची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२३६ २३२ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"सांडपाणी सोडताना कोणत्याही प्रकारची प्रक्रीया न केल्याने उल्हास नदी प्रदूषित झाल्याचा ठपका ठेवत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका,

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		उल्हासनगर महानगरपालिका, कुळगाव-बदलापूर नगरपालिका यांसह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना दोषी ठरवित सामुदायिकरित्या १०० कोटी रुपयांचा दंड हरित लवादाने ठोठावलेला असणे, संबंधितांनी दंडात्मक कारवाईला सामोरे जाण्यापूर्वीच व आवश्यक त्या उपाययोजना करण्यापूर्वीच मुख्य सचिवांनी शासनामार्फत माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्याच्या सुमारास सादर केलेले प्रतिज्ञापत्र, त्यामुळे दोषी ठरविलेल्या यंत्रणांना हरित लवादाकडून मिळालेला दिलासा, मुख्य सचिवांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामुळे याप्रकरणातील दोषींना मिळत असलेले संरक्षण, परिणामी उल्हास नदीसहअन्य नद्यांतील प्रदूषण करणाऱ्यांवर वचक न राहण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे मुख्य सचिवांनी प्रतिज्ञापत्र सादर करण्याची कारणे स्पष्ट होण्याची गरज, उल्हास नदी प्रदूषित झाल्यामुळे त्याबाबत उपाययोजना करण्याची गरज, तसेच राज्यात इतर ठिकाणी नद्या प्रदूषित होऊ नयेत यासाठी दक्षता घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३७	३५८	**डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** "देशभरातील ६६ हजार ६६३ लोकवस्त्यांमधून पुरविल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्यामध्ये आर्सेनिक आणि फ्ल्युराईडस् हे घातक विषारी घटक असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध होणे, सर्वाधिक दुषित पाणी असलेल्या राज्यात महाराष्ट्राचा समावेश नसणे, तरी राज्यातील अनेक प्रमुख व लहान मोठ्या नद्यांचे पाणी प्रदुषित असणे, सांडपाणी, जनावरांचे रक्त व मांस मिश्रीत पाणी, रासायनिक प्रक्रिया केलेले पाणी, विषारी रंग द्रव्ये असलेले पाणी नदीपात्रात मिसळत असल्याच्या पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या तक्रारी असणे, मालेगांव		कित्ता.

(जि. नाशिक) येथील मोसम नदीपात्र सर्वाधिक प्रदुषित असणे, रक्त मांस मिश्रित पाणी, रंग व रासायनिक केमीकल मिश्रित पाणी पात्रात येत असल्याने व हे पाणी पुढे गिरणा धरणात जात असल्याने मोसम नदी पात्राचे प्रदूषण थांबविण्याची मालेगांवकरांकडून वारंवार मागणी केली जाणे, मोसम नदीचे प्रदूषण रोखण्याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, गतकालावधीत गिरणा धरणातील पाण्यात मानवी शरीरास अपायकारक ठरणारी घटक द्रव्ये आढळून आल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जाणे, दरम्यान ग्रामीण भागातील जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पाणी तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळांच्या बळकटीकरणाचा निर्णय राज्य सरकारकडून घेतला जाणे, यानुषंगाने राज्यातील २३ जिल्ह्यांत पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामास शासनाने मंजुरी देणे, त्यामध्ये नाशिक विभागातील जळगांव, नंदुरबार व अहमदनगर या तीन जिल्ह्यांचा समावेश असणे, त्यासाठी प्राथमिक टप्प्यात ७ कोटी २२ लाखांचा निधीही उपलब्ध करून देणे, या उपक्रमात सहभागाची संधी न मिळाल्याने नाशिक जिल्ह्यातील प्रस्तावित पाणी तपासणी प्रयोगशाळा इमारतीचे बांधकाम पुन्हा रेंगाळले असल्याचे दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, राज्यात ठिकठिकाणी अशुद्ध पाणी पिण्यात आल्याने होणाऱ्या आजारांत मोठी वाढ झालेली असणे, याला आळा घालण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत व्यापक उपाययोजनांचे नियोजन केले जाणे, तरी, ग्रामीण भागात पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्त्रोतांचे रासायनिक व जैविक गुणवत्ता तपासणी करण्याच्या आवश्यकतेत वाढ झालेली असणे, यापार्श्वभूमीवर तसेच मालेगाव (जि. नाशिक) सारख्या ठिकाणी मोसम नदीतील भीषण प्रदूषण विचारात घेता नाशिक जिल्ह्याचाही शासनाच्या प्रयोगशाळा बळकटीकरणाच्या धोरणांतर्गत समावेश होण्याची निकड, शासनाने याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२३८	१५७५	**श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** "मुंबई शहर व उपनगरात जवळपास ५ हजार ८०० हेक्टर इतके कांदळवनांचे क्षेत्र असून मात्र सध्या या कांदळवनांवर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत असून या तक्रारी वाढत असणे, मुंबईतील चारकोप बस डेपोसमोरील गोराई खाडीजवळील कांदळवनांवर बांधकाम साहित्य विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करत कांदळवनांची कत्तल केल्याची बाब नुकतीच उघड झालेली असणे, जवळपास ७० ते ८० हून अधिक विक्रेतांनी कांदळवनांवर अतिक्रमण केल्याने या परिसरातील एक किलोमीटर परिसरातील अनेक कांदळवने नष्ट झालेली असणे, त्यावर विटा व दगडांचा मोठ्या प्रमाणात भराव टाकून या जागेवर ग्रॅनाईट फरशी व अन्य बांधकाम साहित्य विक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण, एक नव्हे तर तब्बल ७० ते ८०हून अधिक विक्रेत्यांनी ५० फूटांहून अधिक कांदळवनांवर अतिक्रमण केलेले असणे, त्यामुळे पर्यावरण संरक्षण कायद्याचा भंग झालेला असणे, याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच स्थानिक जनतेनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही अद्यापी कोणतीच कारवाई न करणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. "	कित्ता.	
२३९	८१	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मुंबई-नागपूर या समृद्धी हायवेत २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केली जाणार असणे, समृद्धी हायवेला शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला असून या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समितीवर वनखात्याची जमीन मोजणीच्या कामात मज्जाव केल्याप्रकरणी पोलिसांनी या संघर्ष समितीवर गुन्हा	कित्ता.	

दाखल करण्यात येणे, समृद्धी हायवेत शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता संघर्ष समितीबरोबर मा. मुख्यमंत्री सोबत झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच या हायवेची निर्मिती केली जाणार असल्याचे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना करूनही या सुचनेला संबंधित अधिकारी बगल देत असणे, मुंबई-नागपूर या समृद्धी हायवे प्रकरणातील पोलीस बळाचा वापर करून शेतकऱ्यांवर केलेल्या खोटया गुन्हे दाखल करीत असणे, समृद्धी महामार्गावरील शेतकऱ्यांच्या बळजबरीने घेत असलेल्या जमिनीबाबत शेतकऱ्यांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, मुंबई-नागपूर या समृद्धी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

२४० १०२ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई-पुणे एक्सप्रेस वरील टोल बंद करण्याची मागणी होत असताना येत्या एप्रिल, २०१७ महिन्यापासून एक्सप्रेस वेवर १८ टक्के वाढ करण्यात येऊन कारचालकांना ३५ रुपये जास्त द्यावे लागणार असल्याचे दिनांक २४ मार्च २०१७ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना टोलमध्ये ३५ रुपये, तर महामार्गावर १६ रुपयांची वाढ होणार असणे. राज्य परिवहन मंडळाच्या सर्व बसेस तसेच शिवनेरींना टोलमध्ये सवलत असल्याचे उघडकीस आल्यानंतरही सदर बाब दिनांक २६ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास परिवहन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊनही अद्यापी याबाबत परिवहन मंत्री यांनी संबंधित आयआरबी कंपनीकडे त्यांनी बेकायदेशीरपणे वसूल केलेल्या २० कोटी रुपयांच्या रकमेची व्याजासह परत करण्याची मागणी न करणे, सरकारची टोलबाबतची भूमिका बदललेली असून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर लूट सुरू असणे, सदर रस्ता राज्य सरकारच्या मालकीचा असून ९१८ कोटी रुपये अपफ्रंट स्वीकारुन रस्ते विकास महामंडळाने १५ वर्षे (ऑगस्ट-२०१९ पर्यंत) टोल स्वीकारण्याचे कंत्राट आयड्यिल रोड बिल्डर्सला (आयआरबी) दिले जाणे, टोलपोटी ठेकेदारास २,८६९ कोटी मिळण्याची अपेक्षा धरण्यात

(१)	(२)	(३)	(४)	(५)

येणे, प्रत्यक्षात या ठेकेदाराने दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ रोजीपर्यंत २८७६ कोटी रुपये वसूल केलेले असणे, त्यामुळे सदर द्रुतगती महामार्ग टोलमुक्त करावा अशी मागणी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी मा. मुख्यमंत्री , मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी पत्राने केली असल्याचे दिनांक ९ मार्च २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, ही रक्कम नोव्हेंबरमध्येच ठेकेदारास मिळाली असून आताही महिन्याला सुमारे ४० कोटी रुपये टोलच्या माध्यमातून सन २०१९ पर्यंत मिळणार असणे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कंत्राटदाराने ऑगस्ट, २०१९ पर्यंत जमा करायच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम डिसेंबर २०१६ मध्येच वसूल केली असल्याचे उजेडात येणे, राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव यांच्या समितीने दिलेल्या अहवालातही टोलवसुली झाली असल्याचे तसेच ती रद्द करण्याबाबत शासनाला सुचविण्यात येणे, टोलवसुली मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर बेकायदेशीरपणे सुरू असणे, द्रुतगतीमहामार्गावरील टोलवसूलीचे लक्ष्य पूर्ण झाले असतानाही शासनाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल २३० रुपये पर्यंत दर वाढविण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण होणे, टोलमधून अपेक्षेपेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याने करारात दिलेले लक्ष मुदतीआधीच पूर्ण झाले असतानाही टोल दरात वाढ करण्याचा निर्णय हा लोकांची फसवणूक करण्याचा असणे, टोलच्या माध्यमातून नागरिकांची होत असलेली फसवणूक रोखण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बेकायदा होत असलेली टोल रद्द करण्यासाठी तसेच वाढविण्यात असलेले टोल दर रद्द करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

२४१ ३९९ **श्री. जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई-पुणे एक्सप्रेस वे सातत्याने होत असलेले अपघात यामुळे मोठ्या प्रमाणात झालेले व होत असलेली मनुष्यहानी, मालमत्तेचे कोट्यवधीचे नुकसान, सातत्याने होत असलेले अपघात रोखण्यासाठी पनवेल येथे झालेल्या भिषण अपघातात ७ जणांना प्राण गमवावे लागल्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जून २०१६मध्ये सर्व संबधितांची बैठक संपन्न होऊन सदरहू बैठकीत एक्सप्रेस वे वर इंटेलिजंट ट्राफिक मॉनेटरिंग सिस्टीम कार्यान्वित करण्याचा घेण्यात आलेला निर्णय तसेच एक्सप्रेस वे वर ओझर्डे येथे बांधून तयार असलेल्या ट्रामा केअर सेंटर मध्ये तातडीने सेवा सुरू करण्यात करण्याबाबत दिलेले आदेश, एक्सप्रेस वे वर करावयाच्या उपाययोजना निश्चित डेडलाईनमध्ये पूर्ण न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना दिलेला गंभीर इशारा, तथापी आजमितीस सदरहू बैठकीत घेण्यात आलेल्या एकाही निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबाजावणी झालेली नसल्याने हे निर्णय कागदावरच राहिलेची परिस्थिती, याबाबत अलिकडेच सिंधूताई सकपाळ यांनीही एक्सप्रसवे वरील ट्राफिक संदर्भात व्यक्त केलेल्या तीव्र भावना, आजही एक्सप्रेस वे वर दररोज अपघात होत असूनही जून २०१६मध्ये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ , परिणामतः सदरहू एक्सप्रेस वे वरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेले संशयाचे वातावरण व संतापाची लाट, सबब जून २०१६मधील बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची विनाविलंब अंमलबजावणी करण्याची आवश्यकता , याप्रकरणी शासनाने केलेली कारवाई, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

२४२ १०६४ **श्री. सुजितसिंह ठाकूर, वि. प. स.** कित्ता.

"जि. ठाणे, तालुका शहापूर, पाली गावातील, जिंदाल उद्योग समुहाच्या विद्युत भारीत टॉवर्समुळे शेत जमीन बाधित झालेल्या, बाळू गायकर सह अनेक शेतकऱ्यांना, गेले २५ वर्षापासून अद्यापपर्यंत, नुकसानभरपाई रक्कम दिली नसल्याचा प्रकार, माहे फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या सुमारास

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		निदर्शनास येणे, जिंदाल कंपनीच्या विद्युत भारीत तारा व टॉवर्स खालील सुमारे ४० एकर क्षेत्रातील जमिनीवर जीव धोक्यात घालून शेतीची कामे करावे लागणे, सदरहू उच्च दाबाच्या वीज वाहिन्या १० ते १५ फुटावरून गेल्या असल्याने, शेतकऱ्यांच्या जिवीताला धोका निर्माण होणे, तसेच सर्व्हे१ न. २३४ क्षेत्र २ एकर मधील, शेतकरी बाळू गायकर यांचे सह अनेक शेतकऱ्यांना जिंदाल कंपनीने, शेत जमिनीची नुकसानभरपाईची रक्कम अद्यापही न देता, शेतकऱ्यांची केलेली आर्थिक फसवणूक या संदर्भात बाधित शेतकऱ्यांनी, तहसीलदर शहापूर यांचे कडे अनेक वेळी लेखी तक्रार करूनही, त्याची अद्याप दखल घेण्यात न येणे, तसेच वीज वाहिनी गेलेल्या जमिनीवर कोणतीही पीके येत नसल्याने शेतकऱ्याचे झालेले व होत असलेले प्रचंड आर्थिक नुकसान, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		३६४
२४३	१४९९	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.** "दामूनगर संघर्ष समिती, भीमनगर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) येथील रहिवाश्यांची घरेपूर्णतः वन विभागात येत असणे, तेथील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना मुलभूत सुविधांपैकी वीजपुरवठा नियमित होत नसणे, सदर विभागातील रहिवाश्यांची गेली ३० वर्षांपासून वीज जोडणीची मागणी असणे, रिलायन्स एनर्जी कंपनीच्या संगनमताने काही ठिकाणी संबंधित विभागात वीजपुरवठा होताना दिसणे, रिलायन्स एनर्जी यांचे या विभागातील इतर ठिकाणी रहिवाश्यांच्या मागणीकडे वारंवार दुर्लक्ष होत असणे, रिलायन्स एनर्जीच्या अधिकाऱ्यांकडून या विभागातील पुरवठा होणाऱ्या विजेचे कनेक्शन वारंवार तोडले जाणे,	किल्ला.	

रिलायन्स एनर्जीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तेथील रहिवाश्यांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना त्रास देणे, विजेचा पुरवठा होत नसल्याने विभागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, यामुळे विभागातील जनतेमध्ये शासनाविरुद्ध असंतोष निर्माण होणे, दामूनगर संघर्ष समिती, भीमनगर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) या विभागातील रहिवाश्यांच्या विजेच्या समस्येची शासनाने दखल घेणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२४४ १५५४ **श्री. जगन्नाथ शिंदे, वि. प. स.** किल्ला.

"कल्याण (जि. ठाणे) शहरातील शिवाजी चौक या वर्दळीच्या परिसरात १९५०-५५ सालापासून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे पॉवर हाउस व सेक्शन कार्यालय तसेच वीज बिल भरणा केंद्र कार्यरत असणे, या ठिकाणी ५०० के. व्ही उच्च क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसवलेले असून, सदर पावर हाउस मध्ये यापूर्वी अनेकदा आग लागण्याच्या घटना घडलेल्या असणे, या परिसरातील रात्रीच्या वेळेस गर्दुल्ल्यांचा मोठ्या प्रमाणात वावर होत असणे, हा परिसर सततच्या वर्दळीचा व नागरी वस्तीत असल्याने अशा ठिकाणी पॉवर हाउस असणे नागरिकांच्या जीविताच्या दृष्टीने धोकादायक झालेले असणे, सदरची जागा ही अग्निशमन वाहन न पोहोचण्याइतपत विचोळी अरालयाने भविष्यात आग लागली अथवा स्फोट झाल्यास मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली असणे, सदरहू ट्रान्सफार्मर च्या बाजूची अस्मा मंझील इमारत धोकादायक झाल्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी २७ जुलै, २०१६ रोजी प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांमार्फत कळविण्यात आलेले असणे , त्यामुळे ही इमारत कोसळल्यास या ठिकाणी वीज बिल भरणा करण्यास येणारे नागरिक व तेथील कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झालेला असणे, याबाबत सदरहू ट्रान्सफार्मर स्थलांतरित करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून २०१० पासून कार्यकारी अभियंता यांना पत्रव्यवहार करण्यात येत असणे, याच आशयाचे निवेदन दि. १० मार्च २०१७ रोजी मा. ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांनाही देण्यात आलेले असणे, मात्र

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		याबाबत नागरिकांच्या व कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका लक्षात घेता, तातडीने कार्यवाही करून सदरहू ट्रान्सफार्मर स्थलांतरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२४५	९८	**श्री. प्रकाश गजभिये व इतर वि. प. स.** "बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगांवराजा, मेहकर, लोणार, सिंधखेडराजा, शेगाव व जळगांव जामोद या तालुक्यातील ६५० गावे प्रशासनाने नुकतेच टंचाईग्रस्त घोषित करणे, ज्या गावांत तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून पिण्याच्या पाण्यासाठी तेथील नागरीकांना विशेषतः महिलांना पाण्यासाठी लांबपर्यंत जावे लागत असणे, गत् वर्षी जिल्ह्यात चांगला पाऊस होऊनसुद्धा आत्तापासूनच पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता.	
२४६	५३४	**श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** "येवला तालुक्यातील राजापूर व २५ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना माणिकपुंज (ता. नांदगाव) धरण उद्‌भवावरून तयार करण्याची मागणी प्रलंबित असणे, ही योजना तयार करण्यासाठी जर माणिकपुंज धरणामधील पाणी पुरेसे नसेल किंवा व्यवहार्य नसेल तर नांदुरमधमेश्वर एक्स्प्रेस कॅनॉल (गोदावरी डाव्या कालव्या) मधून पिण्यासाठी पाणी आरक्षित करून ३८ गाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या धर्तीवर साठवण तलावाद्वारे नवीन योजना तयार करण्याची आवश्यकता असणे, ही गावे अवर्षणप्रवण क्षेत्रातील असून या गावांना शाश्वत पाणीपुरवठा	कित्ता.	

योजना नसल्यामुळे टंचाई काळात दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असणे, सदर गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग काढण्याकरिता ३८ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या धर्तीवर नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तयार करण्याची नितांत आवश्यकता असणे, सदर २६ गावे आणि या व्यतिरिक्त सर्वेक्षण करून इतर ज्या गावांना ३८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे पाणी नाही तेथे कायमस्वरूपी योजनेची आवश्यकता असलेल्या अशा सर्व गावांचा या योजनेत सामावेश करण्याची मागणी प्रलंबित असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिंनी दि २७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिलेले असणे, मात्र याबाबत शासनाकडून दिरंगाई केली जात असल्यामुळे येथील स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, यावर शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२४७ १ **श्री. प्रकाश गजभिये व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्य शासनाच्या नागपूर व ठाणे या प्रादेशिक मनोरुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभागात दररोज २५० च्या वर मनोरुग्ण तपासणीकरिता येत असणे, यातील बहुसंख्य रुग्णांवर महिनोमहिने उपचार करावे लागत असणे, गरीब मनोरुग्णालयांसाठी हे रुग्णालय आशेचा किरण असणे, त्यातच डॉक्टरांची असलेली कमतरता, पर्यायी उपचारांची असलेली वानवा अशा त्रुटींमुळे रुग्ण सेवा प्रभावित झालेली असणे, मनोरुग्णांना शांत करणारे "ओलॅन्झापीन" व "हॅलो पेरिडॉल" ही औषधे गेल्या माहे डिसेंबर, २०१६ पासून कोणत्याही प्रादेशिक रुग्णालयात उपलब्ध नसल्याने मनोरुग्णांचे हाल होऊन मनोरुग्ण आक्रमक होणे, तसेच मिरगीच्या रुग्णांना दिले जाणारे "इपिटॉइन"औषधांचाही असलेला तुटवडा, त्यामुळे रुग्णालयांमध्ये निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२४८	३०	**ग्रा. अनिल सोले व इतर वि. प. स.** "महाराष्ट्र राज्यात मनोरुग्णालयाच्या रुग्णांसाठी ठाणे, नागपूर आणि रत्नागिरी येथे शासकीय रुग्णालय आहेत. या रुग्णालयात वेडसर प्रवृत्तीने व मनोरुग्ण असलेल्या व्यक्तींवर उपचाराची सोय आहे. परंतू मनोरुग्ण बरे झाल्यावर कोणीही त्यांना घरे नेण्यास तयार नसणे, यामुळे रुग्णांच्या पुनर्वसनासाठी नागपूर येथे सुदामा मित्र योजनेला मंजुरी देउनही व निधी मंजूर होऊनही काम थंड बसत्यात असणे, या ४ ही रुग्णालयाची एकंदर परिस्थीती सारखीच आहे. प्रशासनाचा या रुग्णालयातील कर्मचारी तथा अधिकारी यांच्यावर कुठलाही वचक नसल्याने मनमानी कारभार सुरू असणे, अशातच नागपूर येथील मनोरुग्णालयात दैनंदिन कामाच्या वेळात शासकीय तथा रुग्णालयातील कर्मचारी/अधिकारी हे काम सोडुन शासकीय जागेवर रुग्णालयात जुगार खेळतांना सापडणे, यात दररोज लाखोचा जुगार होणे, रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना प्रवेश न देणे, या विपरीत असामाजिक तत्वांना प्रवेश देणे, रुग्णांच्या देखभालीकडे दुर्लक्ष करणे, त्यांचा छळ करणे, जुगार खेळताना कर्मचारी पकडले असतांनाही त्यांच्यावर कार्यवाही न होणे, दैनिक वृत्तपत्रात जुगार खेळतांनाचे छायाचित्र प्रसिद्ध होणे, यामुळे नागरिकांमध्ये या रुग्णालयाविषयी संभ्रम निर्माण होणे या अति महत्त्वाच्या प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यावर शासनाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		कित्ता.
२४९	६६	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "पालघर जिल्ह्यासह राज्यातील १६ आदिवासीबहुल जिल्ह्यात बालमृत्यूच्या प्रमाणात दुप्पट वाढ झाल्याची माहिती उजेडात येणे, मोखाडा येथील घटनेनंतर मा. आदिवासी मंत्री महोदयांच्या वादग्रस्त विधानानंतर कुपोषित		कित्ता.

लाभ घेतल्याचे उघडकीस येणे, प्रिव्हिलेज इंडस्ट्रीज लि. यांची एक ब्रेव्हरी व एक धान्य आधारीत आसवणी असे दोन वेगवेगळे प्रकल्प वेगवेगळ्या प्लॉट वर असून त्यांचे कम्पाऊंडसुद्धा वेगळे असणे, सन-२०१३-१४ च्या केंद्र शासनाच्या कंपनी लॉ बोर्ड एमसीए २१ वर या प्रकल्पाची गुंतवणूक २०४.२३ कोटी इतकी असणे, सदर कंपनीमध्ये नियमानुसार ५०० कामगार कामावर नसणे, ईत्यादी अनेक प्रकारे राज्य व केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून शासनास चुकीची व खोटी माहिती देऊन मिळणाऱ्या १०० टक्के विक्रीवर परतावाचा फायदा सदर कंपनी घेत असणे, मिळणारा फायदा विदेशी दारू उत्पादक कंपन्या असलेल्या घटकांना पास करून कामगार व शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे मोबदला देण्यात न येणे, सरकारच्या आधारित किमतीनुसार शेतकऱ्यांना भाव न देता त्यांची ही कंपनी करीत असलेली आर्थिक फसवणूक, या कंपनीने पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टीव २००७ अंतर्गत शासनाची फसवणूक करून आतापर्यंत बेकायदेशीरपणे कोट्यवधी रूपयांचा नफा कमविल्याचे उघडकीस येऊनही, शासनाने त्यांचेविरोधात कोणतीच कारवाई न केल्याने औद्योगिक क्षेत्रात शासनाच्या या नाकर्तेपणाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संपात, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

२२८ १२२० **श्री. विनायकराव मेटे, वि. प. स.** कित्ता.

“आकृती निर्माण लिमिटेड, (हबटाऊन) एम. आय. डी. सी. अंधेरी (पूर्व) यांना सन १९९५ मध्ये आंबेडकर नगर, अष्टविनायक अशा एकूण नऊ विभागांमधील ३००० झोपड्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मंजुरी देणे, या योजनेला २० वर्ष पूर्ण झालेली असून, सन १९९५ च्या मंजुरी आराखड्यामध्ये ३००० झोपडीधारकांचे आता ५००० झोपडीधारक होऊनही ही योजना अद्यापपर्यंत पूर्ण न होणे, ही सर्व जागा एम. आय. डी. सी. च्या मालकीची असणे, यामध्ये पात्र लोकांना ताबा न देता ३८० अपात्र, व्यापारी व ज्यांना नवीन इमारतीमध्ये ताबा दिलेला असतानाही त्यांच लोकांची जुन्या जागेवरील दुकाने चालू ठेवणे, तसेच योजने अंतर्गत

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		ॲनेक्स् (विस्तारीत) इमारतीमध्ये शासनाने मंजुरी दिलेल्या बालवाडी, सोसायटी कार्यालय, समाजकल्याण केंद्र इत्यादींना मंजुरी असतानाही त्या जागेवर हॉटेल, जिमखाना चालू करणे, आकृती स्टार बिल्डींगच्या बाजूला असणाऱ्या व्ही मॉल मध्ये वाटप केलेल्या गाळाधारकांच्या झोपड्या इथे नसतानाही त्यांना गाळ्यांचे वाटप केलेले असणे, पुनर्वसीत इमारती, सेल इमारतींना परवानगी देण्यात आलेल्या व त्यांच्या क्षेत्रफळामध्ये तसेच पूर्ण व अपूर्ण बांधकामामध्ये प्रचंड तफावत असणे, आंबेडकरनगर व अष्टविनायक या नवीन इमारतीमधीलरहिवाशांना सदनिकेची लॉटरी न काढता १२५ सदनिकांचे वाटप करण्यात येणे, या योजनेअंतर्गत विकासकाने प्रचंड भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे, यामुळे विकासक, प्रशासन व शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२२९	९३५	**श्री. सतिश चव्हाण व इतर वि. प. स.** " शेती व शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषी हवामान संशोधन केंद्राची नितांत गरज असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने मराठवाड्यात पाहिले कृषी हवामान संशोधन केंद्र बदनापुर कृषी संशोधन केंद्राच्या २० हेक्टर क्षेत्रावर उभारण्यात यावे यासाठी एक वर्षापुर्वी रु. ६७ कोटीच्या मागणीसह प्रस्ताव शासनास सादर केलेला असणे, यावर कृषी विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव यांचे सोबत बैठक ही झालेली असणे, परंतु हवामान शास्त्रज्ञ व संशोधकाची संख्या कमी असण्याची कारणे दाखवून हा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आलेला असणे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने मागील ३० वर्षात जिल्हानिहाय पडलेल्या दुष्काळाचा व बदलत्या हवामानाचा अभ्यास करूनच कृषी हवामान संशोधन केंद्र बदनापुर येथे स्थापन करणेसाठी प्रस्थावित	कित्ता.	

केलेला असणे, मुंबई व नागपुर येथील रडार यंत्रणेच्या कक्षेत मराठवाडा येत नसल्याने बदनापुर येथे नवीन स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र स्थापन करणे गरजेचे असणे, गारपीट, वादळ, पाऊस, तापमान या बाबत अचुक अंदाज वर्तवता येईल व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना यांचा फायदा होऊन दुष्काळी परिस्थितीवर काही प्रमाणात मात करता येऊ शकेल त्यासाठी शासनाने यावर त्वरित निर्णय घेऊन बदनापुर येथे कृषी हवामान संशोधन केंद्राची उभारणी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२३० १२४७ **श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** कित्ता.

" महूद ता. सांगोला, जि. सोलापूर या गावाने लोकसहभागातून कासाळ ओढ्यांचे यशस्वीरित्या पुनर्जीवन करून सदर ओढ्याच्या दुर्तफा रोपे लावून ती जगवलेली असणे, या गावाने जलनियोजनाच्या कामासोबतच फळांची लागवड करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व समृद्धी महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी विविध योजनांचे एकत्रित पॅकेज करून त्याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे पाठविलेल्या प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही न होणे, येथील लोकसहभागातून झालेल्या कामाबाबत केलेल्या मूल्यांकनाच्या तुलनेत प्रत्यक्षात अधिक काम असल्याचे निष्पन्न होणे, फळबाग लागवडीसाठी विहित वेळेत प्रस्ताव करण्यासाठी जाणीवपूर्वक ई मस्टरची की अडवून ठेवल्यामुळे महुदचे शेतकरी फळबाग लागवडीच्या कार्यक्रमापासून वंचित राहणे, त्यामुळे या भागातील गावांना प्रोत्साहन मिळून अधिकाधिक कामे पूर्ण व्हावीत याकरीता शासनाचे करावयाची उपाययोजना, जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कंपार्टमेंट बंडिंग कामात तालुका कृषी अधिकारी व इतर कर्मचारी यांनी संगनमताने केलेल्या भ्रष्ट्राचाराबाबत सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करणेसाठी उप विभागीय कृषी अधिकारी पंढरपूर, जि. सोलापूर यांनी दिनांक २७. फेब्रुवारी २०१७ रोजी पाठविलेला प्राथमिक तपासणी अहवाल, त्याचबरोबर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी संबधितांवर प्रशासकीय कारवाई करणेसाठी माहे फेब्रुवारी, २०१६ व दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ अन्वये विभागीय कृषी सहसंचालक पुणे यांना सविस्तर प्रस्ताव सादर करून व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २१ जानेवारी २०१७ अन्वये कृषी आयुक्त, पुणे यांना गोपनीय पत्र पाठवून देखील अद्याप पर्यंत प्रशासकीय कारवाई न झाल्यामुळे जिल्ह्यात असंतोषाचे व चिडीचे निर्माण झालेले वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३१	१६९	**श्री. नारायण राणे, वि. प. स.** " राज्य शासनाने नोव्हेंबर, २०१४ पासून तीन लाख रुपयांवरील सर्व कामांसाठी ई टेंडरिंग सक्तीचे केले असूनही राज्य शासनाचे ई-टेंडरिंग धोरण धाब्यावर बसवून ग्रामविकास विभागाने मोठ्या रस्त्यांच्या कामांची ३ लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीचे तुकडेपाडून त्याचे कंत्राट देण्यात येणे, त्यामुळे ग्रामविकास विभागाच्या २५५ कोटींच्या रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, याप्रकरणी शासकीय अधिकारी यांना दोषी ठरवून त्यांची चौकशी करण्यात येत असल्याने शासकीय अधिकारी व कर्मचारी त्यांचेमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून या प्रकरणात शासनाचा नियम धाब्यावर बसवणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	किस्ता.	
२३२	१८८	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "राज्यातील वर्धा, अमरावती व अकोला जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या गरीब लोकांना रोजच्या आयुष्यातील गरजा भागविण्यासाठी	किस्ता.	

अनधिकृत मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या सावकारी जाळ्यात महिला बचतगट अडकत असल्याचे विदारक चित्र समोर येणे, मायक्रोफायनान्स कंपन्या राष्ट्रीय बँका व इतर कायदेशीर वित्तव्यवसाय करणाऱ्या संस्थेकडून कर्ज स्वरुपात रक्कम उचलत व महिला बचत गटांना अतिरिक्त व्याजदर लावत कर्जाऊ रक्कम देतात सदरील रक्कम वसूल करण्यासाठी पठाणी सावकारी पद्धतीने कर्ज वसूल बचत गटातील महिलांकडून केली जात असल्याने अनेकांनी आत्महत्या केल्याचे उजेडात येणे, राज्य शासनाकडून या कंपन्यांवर कोणतीच कायदेशीर कारवाई करण्यास येत नसल्यामुळे शासनाला यामध्ये आलेले अपयश, राज्य शासनाने मायक्रोफायन्सास कंपन्याकडून ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांची सावकारी पद्धतीने होत असलेल्यार वसुलीला आळा बसण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

२३३ १२६५ **श्री. नागोराव गाणार व इतर वि. प. स.** कित्ता.

"जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत जिल्ह्यात येणाऱ्या ११७ शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रकरणात नियमबाह्यारित्या दिनांक २३ नोव्हेबर २०१६ ला आदेश काढण्यात आलेले असणे, आदेश पत्रावर दिनांक २३ नोव्हेंबर २०१६ ही तारीख असली तरी प्रत्यक्षात सदरहू आदेश दिनांक १०, ११ व १२ डिसेंबर २०१६ या सुट्टीच्या कालावधीत तसेच जिल्ह्यात नगरपरिषदांची आचार संहिता लागू असतांना परस्पर देण्यात आलेले असणे, जिल्ह्यात पदवीधर शिक्षकांच्या जागा उपलब्ध असताना त्यांना आंतरजिल्हा बदलीने समायोजनाचे आदेश न देता १२ वी डी. एड. धारक शिक्षकांना वर्ग ६ ते ८ चे आदेश देण्यात आलेले असणे हे आदेश देताना शासन निर्णय जेष्ठता यादीए, नियुक्तीचा प्रवर्ग बदलणे, रोष्टर अद्यावत नसणे अशा अनेक प्रकारे शासन निर्णयाचे उल्लंघन करून व आचार संहितेचे उल्लंघन करून नियमबाह्य बदल्या झाल्याची तक्रार प्राप्त झालेली असून या संपूर्ण प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा संशय निर्माण होणे, त्यामुळे नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. भंडारा यांना पत्र देऊन सखोल

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		चौकशी करण्याची विनंती केलेली असणे, या नियमबाह्य बदल्यांमुळे पात्रताधारक आंतरजिल्हा बदलीने येणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होणे, या करिता या गंभीर विषयाबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून सखोल चौकशीचे आदेश देण्याची आवश्यकता व चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३४	१३२४	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "नागोठणे (जि. रायगड) ही रोहा तालुक्यातील एक प्रमुख ग्रामपंचायत असणे, नागोठणे परिसरात औद्योगिकीकरण झाल्याने नागोठणे ग्रामपंचायत ही एक प्रमुख बाजारपेठ सुद्धा असणे, या प्रमुख ग्रामपंचायतीकडून योग्य रितीने प्रशासन चालविणे आवश्यक असणे, कर वसुली व्यवस्थित होत असल्याने ग्रामपंचायतीमध्ये विविध विकास कामे होणे अपेक्षित असणे, सरपंच व उप सरपंच, ग्रामपंचायत सभासद यांचेमार्फत योग्य प्रशासन चालविणे अपेक्षित असतांना केवळ आर्थिक हितसंबंध जोपासण्याकडे पदाधिकाऱ्यांचा कल असणे, अनेक प्रकरणांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या बाबी समोर येणे, प्रमुख बाजारपेठ असल्याकारणाने शहरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण होणे आवश्यक असणे, परंतु केवळ ठेकेदारांच्या हितसंबंधासाठी ग्रामपंचातयीने पेव्हर ब्लॉक बसविलेले असणे, मोठ्या रस्त्यावरसुद्धा डांबरीकरणाऐवजी पेव्हर ब्लॉक बसविलेले असणे, पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ठेका दिलेल्या कंपनीने निकृष्ट दर्जाच्या पेव्हर ब्लॉक खरेदी करून वापरणे, नागरीकांच्या सोई सुविधांचा यामध्ये कुठल्याही प्रकारचा विचार केलेला नसणे, ठेकेदाराला मंजूर किंमतीपेक्षा जास्त रक्कम अदा करणे, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची वैयुक्तिक खर्चाची बीले ग्रामपंचायतीमध्ये खर्ची पाडणे, वैयुक्तिक लाभांच्या योजनामध्ये	किता.	

लाभार्थ्याकडून आर्थिक लाभ घेणे, ग्रामपंचायतीमार्फत खर्च होणारी बिले वेगळ्या कामासाठी व रक्कम वेगळ्या कामासाठी अदा करणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासनाने त्यावर कोणतीच कारवाई केलेली नसणे, यामुळे स्थानिक नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, विकास कामामध्ये केलेला गैरव्यवहार यामुळे निर्माण झालेली चीडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

२३५ १४४२ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि. प. स.** कित्ता.

"संगमेश्वर तालुक्यातील (जि. रत्नागिरी) आरवली परिसरातील कळंबुशी येथे ग्रामदेवतेच्या होळीसाठी पौर्णिमेला ग्रामस्थ माड नेत असताना लोखंडी साकव तुटल्याने ५९ जण पडून जखमी तर त्यापैकी ५ जण गंभीर जखमी होऊन त्यांना उपचारासाठी डेरवण येथील रुग्णालयात दाखल केले असल्याचे दि. १३ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कळंबुशी येथील खाचरवाडी ते बौद्धवाडी, म्हापर्लेवाडी या वाड्यांना जोडणारा १२ फूट लांबीचा व ६ फूट रुंदीचा १९८० मध्ये जिल्हा परिषदेकडून बांधण्यात आला असणे, ग्रामस्थ होळीसाठी माड घेऊन या साकवावर आले असता त्याचा लोखंडी अँगल तुटून साकव मधोमध तुटलेला असणे व त्यामुळे सर्वजण साकवावरुन सुमारे २० फूट खाली पन्यात कोसळून जखमी झाले असणे, परंतु प्रशासनाने तेथे भेट देण्याबाबत दाखविलेली अनास्था, त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्याकरिता शासनाने सदर ठिकाणी नवीन साकव बसविण्यासोबतच जिल्ह्यातील सर्व जुन्या धोकादायक साकवांचा आढावा घेऊन संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी त्यांची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२३६ २३२ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"सांडपाणी सोडताना कोणत्याही प्रकारची प्रक्रीया न केल्याने उल्हास नदी प्रदूषित झाल्याचा ठपका ठेवत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका,

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		उल्हासनगर महानगरपालिका, कुळगाव-बदलापूर नगरपालिका यांसह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना दोषी ठरवित सामुदायिकरित्या १०० कोटी रुपयांचा दंड हरित लवादाने ठोठावलेला असणे, संबंधितांनी दंडात्मक कारवाईला सामोरे जाण्यापूर्वीच व आवश्यक त्या उपाययोजना करण्यापूर्वीच मुख्य सचिवांनी शासनामार्फत माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्याच्या सुमारास सादर केलेले प्रतिज्ञापत्र, त्यामुळे दोषी ठरविलेल्या यंत्रणांना हरित लवादाकडून मिळालेला दिलासा, मुख्य सचिवांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामुळे याप्रकरणातील दोषींना मिळत असलेले संरक्षण, परिणामी उल्हास नदीसहअन्य नद्यांतील प्रदूषण करणाऱ्यांवर वचक न राहण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे मुख्य सचिवांनी प्रतिज्ञापत्र सादर करण्याची कारणे स्पष्ट होण्याची गरज, उल्हास नदी प्रदूषित झाल्यामुळे त्याबाबत उपाययोजना करण्याची गरज, तसेच राज्यात इतर ठिकाणी नद्या प्रदूषित होऊ नयेत यासाठी दक्षता घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२३७	३५८	**डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स.** "देशभरातील ६६ हजार ६६३ लोकवस्त्यांमधून पुरविल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्यामध्ये आर्सेनिक आणि फ्ल्युराईडस् हे घातक विषारी घटक असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध होणे, सर्वाधिक दुषित पाणी असलेल्या राज्यात महाराष्ट्राचा समावेश नसणे, तरी राज्यातील अनेक प्रमुख व लहान मोठ्या नद्यांचे पाणी प्रदुषित असणे, सांडपाणी, जनावरांचे रक्त व मांस मिश्रीत पाणी, रासायनिक प्रक्रिया केलेले पाणी, विषारी रंग द्रव्ये असलेले पाणी नदीपात्रात मिसळत असल्याच्या पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या तक्रारी असणे, मालेगांव		कित्ता.

(जि. नाशिक) येथील मोसम नदीपात्र सर्वाधिक प्रदुषित असणे, रक्त मांस मिश्रित पाणी, रंग व रासायनिक केमीकल मिश्रित पाणी पात्रात येत असल्याने व हे पाणी पुढे गिरणा धरणात जात असल्याने मोसम नदी पात्राचे प्रदूषण थांबविण्याची मालेगांवकरांकडून वारंवार मागणी केली जाणे, मोसम नदीचे प्रदूषण रोखण्याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, गतकालावधीत गिरणा धरणातील पाण्यात मानवी शरीरास अपायकारक ठरणारी घटक द्रव्ये आढळून आल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जाणे, दरम्यान ग्रामीण भागातील जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पाणी तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळांच्या बळकटीकरणाचा निर्णय राज्य सरकारकडून घेतला जाणे, यानुषंगाने राज्यातील २३ जिल्ह्यांत पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामास शासनाने मंजुरी देणे, त्यामध्ये नाशिक विभागातील जळगांव, नंदुरबार व अहमदनगर या तीन जिल्ह्यांचा समावेश असणे, त्यासाठी प्राथमिक टप्प्यात ७ कोटी २२ लाखांचा निधीही उपलब्ध करून देणे, या उपक्रमात सहभागाची संधी न मिळाल्याने नाशिक जिल्ह्यातील प्रस्तावित पाणी तपासणी प्रयोगशाळा इमारतीचे बांधकाम पुन्हा रेंगाळले असल्याचे दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, राज्यात ठिकठिकाणी अशुद्ध पाणी पिण्यात आल्याने होणाऱ्या आजारांत मोठी वाढ झालेली असणे, याला आळा घालण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत व्यापक उपाययोजनांचे नियोजन केले जाणे, तरी, ग्रामीण भागात पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्त्रोतांचे रासायनिक व जैविक गुणवत्ता तपासणी करण्याच्या आवश्यकतेत वाढ झालेली असणे, यापार्श्वभूमीवर तसेच मालेगाव (जि. नाशिक) सारख्या ठिकाणी मोसम नदीतील भीषण प्रदूषण विचारात घेता नाशिक जिल्ह्याचाही शासनाच्या प्रयोगशाळा बळकटीकरणाच्या धोरणांतर्गत समावेश होण्याची निकड, शासनाने याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२३८	१५७५	**श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** "मुंबई शहर व उपनगरात जवळपास ५ हजार ८०० हेक्टर इतके कांदळवनांचे क्षेत्र असून मात्र सध्या या कांदळवनांवर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत असून या तक्रारी वाढत असणे, मुंबईतील चारकोप बस डेपोसमोरील गोराई खाडीजवळील कांदळवनांवर बांधकाम साहित्य विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करत कांदळवनांची कत्तल केल्याची बाब नुकतीच उघड झालेली असणे, जवळपास ७० ते ८० हून अधिक विक्रेतांनी कांदळवनांवर अतिक्रमण केल्याने या परिसरातील एक किलोमीटर परिसरातील अनेक कांदळवने नष्ट झालेली असणे, त्यावर विटा व दगडांचा मोठ्या प्रमाणात भराव टाकून या जागेवर ग्रॅनाईट फरशी व अन्य बांधकाम साहित्य विक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण, एक नव्हे तर तब्बल ७० ते ८०हून अधिक विक्रेत्यांनी ५० फूटांहून अधिक कांदळवनांवर अतिक्रमण केलेले असणे, त्यामुळे पर्यावरण संरक्षण कायद्याचा भंग झालेला असणे, याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच स्थानिक जनतेनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही अद्यापी कोणतीच कारवाई न करणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. "	कित्ता.	
२३९	८१	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "मुंबई-नागपूर या समृद्धी हायवेत २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केली जाणार असणे, समृद्धी हायवेला शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला असून या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समितीवर वनखात्याची जमीन मोजणीच्या कामात मज्जाव केल्याप्रकरणी पोलिसांनी या संघर्ष समितीवर गुन्हा	कित्ता.	

दाखल करण्यात येणे, समृद्धी हायवेत शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता संघर्ष समितीबरोबर मा. मुख्यमंत्री सोबत झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच या हायवेची निर्मिती केली जाणार असल्याचे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना करूनही या सुचनेला संबंधित अधिकारी बगल देत असणे, मुंबई-नागपूर या समृद्धी हायवे प्रकरणातील पोलीस बळाचा वापर करून शेतकऱ्यांवर केलेल्या खोटया गुन्हे दाखल करीत असणे, समृद्धी महामार्गावरील शेतकऱ्यांच्या बळजबरीने घेत असलेल्या जमिनीबाबत शेतकऱ्यांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, मुंबई-नागपूर या समृद्धी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

२४० १०२ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई-पुणे एक्सप्रेस वरील टोल बंद करण्याची मागणी होत असताना येत्या एप्रिल, २०१७ महिन्यापासून एक्सप्रेस वेवर १८ टक्के वाढ करण्यात येऊन कारचालकांना ३५ रुपये जास्त द्यावे लागणार असल्याचे दिनांक २४ मार्च २०१७ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना टोलमध्ये ३५ रुपये, तर महामार्गावर १६ रुपयांची वाढ होणार असणे. राज्य परिवहन मंडळाच्या सर्व बसेस तसेच शिवनेरींना टोलमध्ये सवलत असल्याचे उघडकीस आल्यानंतरही सदर बाब दिनांक २६ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास परिवहन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊनही अद्यापी याबाबत परिवहन मंत्री यांनी संबंधित आयआरबी कंपनीकडे त्यांनी बेकायदेशीरपणे वसूल केलेल्या २० कोटी रुपयांच्या रकमेची व्याजासह परत करण्याची मागणी न करणे, सरकारची टोलबाबतची भूमिका बदललेली असून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर लूट सुरू असणे, सदर रस्ता राज्य सरकारच्या मालकीचा असून ९१८ कोटी रुपये अपफ्रंट स्वीकारुन रस्ते विकास महामंडळाने १५ वर्षे (ऑगस्ट-२०१९ पर्यंत) टोल स्वीकारण्याचे कंत्राट आयड्यिल रोड बिल्डर्सला (आयआरबी) दिले जाणे, टोलपोटी ठेकेदारास २,८६९ कोटी मिळण्याची अपेक्षा धरण्यात

(१)	(२)	(३)	(४)	(५)

येणे, प्रत्यक्षात या ठेकेदाराने दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ रोजीपर्यंत २८७६ कोटी रुपये वसूल केलेले असणे, त्यामुळे सदर द्रुतगती महामार्ग टोलमुक्त करावा अशी मागणी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी मा. मुख्यमंत्री , मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी पत्राने केली असल्याचे दिनांक ९ मार्च २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, ही रक्कम नोव्हेंबरमध्येच ठेकेदारास मिळाली असून आताही महिन्याला सुमारे ४० कोटी रुपये टोलच्या माध्यमातून सन २०१९ पर्यंत मिळणार असणे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कंत्राटदाराने ऑगस्ट, २०१९ पर्यंत जमा करायच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम डिसेंबर २०१६ मध्येच वसूल केली असल्याचे उजेडात येणे, राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव यांच्या समितीने दिलेल्या अहवालातही टोलवसुली झाली असल्याचे तसेच ती रद्द करण्याबाबत शासनाला सुचविण्यात येणे, टोलवसुली मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर बेकायदेशीरपणे सुरू असणे, द्रुतगतीमहामार्गावरील टोलवसूलीचे लक्ष्य पूर्ण झाले असतानाही शासनाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल २३० रुपये पर्यंत दर वाढविण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण होणे, टोलमधून अपेक्षेपेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याने करारात दिलेले लक्ष मुदतीआधीच पूर्ण झाले असतानाही टोल दरात वाढ करण्याचा निर्णय हा लोकांची फसवणूक करण्याचा असणे, टोलच्या माध्यमातून नागरिकांची होत असलेली फसवणूक रोखण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बेकायदा होत असलेली टोल रद्द करण्यासाठी तसेच वाढविण्यात असलेले टोल दर रद्द करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

२४१ ३९९ **श्री. जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** कित्ता.

"मुंबई-पुणे एक्सप्रेस वे सातत्याने होत असलेले अपघात यामुळे मोठ्या प्रमाणात झालेले व होत असलेली मनुष्यहानी, मालमत्तेचे कोट्यवधीचे नुकसान, सातत्याने होत असलेले अपघात रोखण्यासाठी पनवेल येथे झालेल्या भिषण अपघातात ७ जणांना प्राण गमवावे लागल्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जून २०१६मध्ये सर्व संबधितांची बैठक संपन्न होऊन सदरहू बैठकीत एक्सप्रेस वे वर इंटेलिजंट ट्राफिक मॉनेटरिंग सिस्टीम कार्यान्वित करण्याचा घेण्यात आलेला निर्णय तसेच एक्सप्रेस वे वर ओझर्डे येथे बांधून तयार असलेल्या ट्रामा केअर सेंटर मध्ये तातडीने सेवा सुरू करण्यात करण्याबाबत दिलेले आदेश, एक्सप्रेस वे वर करावयाच्या उपाययोजना निश्चित डेडलाईनमध्ये पूर्ण न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना दिलेला गंभीर इशारा, तथापी आजमितीस सदरहू बैठकीत घेण्यात आलेल्या एकाही निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबाजावणी झालेली नसल्याने हे निर्णय कागदावरच राहिलेची परिस्थिती, याबाबत अलिकडेच सिंधूताई सकपाळ यांनीही एक्सप्रसवे वरील ट्राफिक संदर्भात व्यक्त केलेल्या तीव्र भावना, आजही एक्सप्रेस वे वर दररोज अपघात होत असूनही जून २०१६मध्ये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ , परिणामतः सदरहू एक्सप्रेस वे वरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेले संशयाचे वातावरण व संतापाची लाट, सबब जून २०१६मधील बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची विनाविलंब अंमलबजावणी करण्याची आवश्यकता , याप्रकरणी शासनाने केलेली कारवाई, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

२४२ १०६४ **श्री. सुजितसिंह ठाकूर, वि. प. स.** कित्ता.

"जि. ठाणे, तालुका शहापूर, पाली गावातील, जिंदाल उद्योग समुहाच्या विद्युत भारीत टॉवर्समुळे शेत जमीन बाधित झालेल्या, बाळू गायकर सह अनेक शेतकऱ्यांना, गेले २५ वर्षापासून अद्यापपर्यंत, नुकसानभरपाई रक्कम दिली नसल्याचा प्रकार, माहे फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या सुमारास

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		निदर्शनास येणे, जिंदाल कंपनीच्या विद्युत भारीत तारा व टॉवर्स खालील सुमारे ४० एकर क्षेत्रातील जमिनीवर जीव धोक्यात घालून शेतीची कामे करावे लागणे, सदरहू उच्च दाबाच्या वीज वाहिन्या १० ते १५ फुटावरून गेल्या असल्याने, शेतकऱ्यांच्या जिवीताला धोका निर्माण होणे, तसेच सर्व्हे१ न. २३४ क्षेत्र २ एकर मधील, शेतकरी बाळू गायकर यांचे सह अनेक शेतकऱ्यांना जिंदाल कंपनीने, शेत जमिनीची नुकसानभरपाईची रक्कम अद्यापही न देता, शेतकऱ्यांची केलेली आर्थिक फसवणूक या संदर्भात बाधित शेतकऱ्यांनी, तहसीलदर शहापूर यांचे कडे अनेक वेळी लेखी तक्रार करूनही, त्याची अद्याप दखल घेण्यात न येणे, तसेच वीज वाहिनी गेलेल्या जमिनीवर कोणतीही पीके येत नसल्याने शेतकऱ्याचे झालेले व होत असलेले प्रचंड आर्थिक नुकसान, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		३६४
२४३	१४९९	**श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.** "दामूनगर संघर्ष समिती, भीमनगर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) येथील रहिवाश्यांची घरेपूर्णतः वन विभागात येत असणे, तेथील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना मुलभूत सुविधांपैकी वीजपुरवठा नियमित होत नसणे, सदर विभागातील रहिवाश्यांची गेली ३० वर्षांपासून वीज जोडणीची मागणी असणे, रिलायन्स एनर्जी कंपनीच्या संगनमताने काही ठिकाणी संबंधित विभागात वीजपुरवठा होताना दिसणे, रिलायन्स एनर्जी यांचे या विभागातील इतर ठिकाणी रहिवाश्यांच्या मागणीकडे वारंवार दुर्लक्ष होत असणे, रिलायन्स एनर्जीच्या अधिकाऱ्यांकडून या विभागातील पुरवठा होणाऱ्या विजेचे कनेक्शन वारंवार तोडले जाणे,	किल्ला.	

रिलायन्स एनर्जीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तेथील रहिवाश्यांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना त्रास देणे, विजेचा पुरवठा होत नसल्याने विभागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, यामुळे विभागातील जनतेमध्ये शासनाविरुद्ध असंतोष निर्माण होणे, दामूनगर संघर्ष समिती, भीमनगर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) या विभागातील रहिवाश्यांच्या विजेच्या समस्येची शासनाने दखल घेणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२४४ १५५४ **श्री. जगन्नाथ शिंदे, वि. प. स.** किल्ला.

"कल्याण (जि. ठाणे) शहरातील शिवाजी चौक या वर्दळीच्या परिसरात १९५०-५५ सालापासून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे पॉवर हाउस व सेक्शन कार्यालय तसेच वीज बिल भरणा केंद्र कार्यरत असणे, या ठिकाणी ५०० के. व्ही उच्च क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसवलेले असून, सदर पावर हाउस मध्ये यापूर्वी अनेकदा आग लागण्याच्या घटना घडलेल्या असणे, या परिसरातील रात्रीच्या वेळेस गर्दुल्ल्यांचा मोठ्या प्रमाणात वावर होत असणे, हा परिसर सततच्या वर्दळीचा व नागरी वस्तीत असल्याने अशा ठिकाणी पॉवर हाउस असणे नागरिकांच्या जीविताच्या दृष्टीने धोकादायक झालेले असणे, सदरची जागा ही अग्निशमन वाहन न पोहोचण्याइतपत विचोळी अरालयाने भविष्यात आग लागली अथवा स्फोट झाल्यास मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली असणे, सदरहू ट्रान्सफार्मर च्या बाजूची अस्मा मंझील इमारत धोकादायक झाल्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी २७ जुलै, २०१६ रोजी प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांमार्फत कळविण्यात आलेले असणे , त्यामुळे ही इमारत कोसळल्यास या ठिकाणी वीज बिल भरणा करण्यास येणारे नागरिक व तेथील कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झालेला असणे, याबाबत सदरहू ट्रान्सफार्मर स्थलांतरित करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून २०१० पासून कार्यकारी अभियंता यांना पत्रव्यवहार करण्यात येत असणे, याच आशयाचे निवेदन दि. १० मार्च २०१७ रोजी मा. ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांनाही देण्यात आलेले असणे, मात्र

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		याबाबत नागरिकांच्या व कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका लक्षात घेता, तातडीने कार्यवाही करून सदरहू ट्रान्सफार्मर स्थलांतरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२४५	९८	**श्री. प्रकाश गजभिये व इतर वि. प. स.** "बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगांवराजा, मेहकर, लोणार, सिंधखेडराजा, शेगाव व जळगांव जामोद या तालुक्यातील ६५० गावे प्रशासनाने नुकतेच टंचाईग्रस्त घोषित करणे, ज्या गावांत तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून पिण्याच्या पाण्यासाठी तेथील नागरीकांना विशेषतः महिलांना पाण्यासाठी लांबपर्यंत जावे लागत असणे, गत् वर्षी जिल्ह्यात चांगला पाऊस होऊनसुद्धा आत्तापासूनच पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता.	
२४६	५३४	**श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** "येवला तालुक्यातील राजापूर व २५ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना माणिकपुंज (ता. नांदगाव) धरण उद्‌भवावरून तयार करण्याची मागणी प्रलंबित असणे, ही योजना तयार करण्यासाठी जर माणिकपुंज धरणामधील पाणी पुरेसे नसेल किंवा व्यवहार्य नसेल तर नांदुरमधमेश्वर एक्स्प्रेस कॅनॉल (गोदावरी डाव्या कालव्या) मधून पिण्यासाठी पाणी आरक्षित करून ३८ गाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या धर्तीवर साठवण तलावाद्वारे नवीन योजना तयार करण्याची आवश्यकता असणे, ही गावे अवर्षणप्रवण क्षेत्रातील असून या गावांना शाश्वत पाणीपुरवठा	कित्ता.	

योजना नसल्यामुळे टंचाई काळात दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असणे, सदर गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग काढण्याकरिता ३८ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या धर्तीवर नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तयार करण्याची नितांत आवश्यकता असणे, सदर २६ गावे आणि या व्यतिरिक्त सर्वेक्षण करून इतर ज्या गावांना ३८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे पाणी नाही तेथे कायमस्वरूपी योजनेची आवश्यकता असलेल्या अशा सर्व गावांचा या योजनेत सामावेश करण्याची मागणी प्रलंबित असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिंनी दि २७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिलेले असणे, मात्र याबाबत शासनाकडून दिरंगाई केली जात असल्यामुळे येथील स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, यावर शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२४७ १ **श्री. प्रकाश गजभिये व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्य शासनाच्या नागपूर व ठाणे या प्रादेशिक मनोरुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभागात दररोज २५० च्या वर मनोरुग्ण तपासणीकरिता येत असणे, यातील बहुसंख्य रुग्णांवर महिनोमहिने उपचार करावे लागत असणे, गरीब मनोरुग्णालयांसाठी हे रुग्णालय आशेचा किरण असणे, त्यातच डॉक्टरांची असलेली कमतरता, पर्यायी उपचारांची असलेली वानवा अशा त्रुटींमुळे रुग्ण सेवा प्रभावित झालेली असणे, मनोरुग्णांना शांत करणारे "ओलॅन्झापीन" व "हॅलो पेरिडॉल" ही औषधे गेल्या माहे डिसेंबर, २०१६ पासून कोणत्याही प्रादेशिक रुग्णालयात उपलब्ध नसल्याने मनोरुग्णांचे हाल होऊन मनोरुग्ण आक्रमक होणे, तसेच मिरगीच्या रुग्णांना दिले जाणारे "इपिटॉइन"औषधांचाही असलेला तुटवडा, त्यामुळे रुग्णालयांमध्ये निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२४८	३०	**ग्रा. अनिल सोले व इतर वि. प. स.** "महाराष्ट्र राज्यात मनोरुग्णालयाच्या रुग्णांसाठी ठाणे, नागपूर आणि रत्नागिरी येथे शासकीय रुग्णालय आहेत. या रुग्णालयात वेडसर प्रवृत्तीने व मनोरुग्ण असलेल्या व्यक्तींवर उपचाराची सोय आहे. परंतू मनोरुग्ण बरे झाल्यावर कोणीही त्यांना घरे नेण्यास तयार नसणे, यामुळे रुग्णांच्या पुनर्वसनासाठी नागपूर येथे सुदामा मित्र योजनेला मंजुरी देउनही व निधी मंजूर होऊनही काम थंड बसत्यात असणे, या ४ ही रुग्णालयाची एकंदर परिस्थीती सारखीच आहे. प्रशासनाचा या रुग्णालयातील कर्मचारी तथा अधिकारी यांच्यावर कुठलाही वचक नसल्याने मनमानी कारभार सुरू असणे, अशातच नागपूर येथील मनोरुग्णालयात दैनंदिन कामाच्या वेळात शासकीय तथा रुग्णालयातील कर्मचारी/अधिकारी हे काम सोडुन शासकीय जागेवर रुग्णालयात जुगार खेळतांना सापडणे, यात दररोज लाखोचा जुगार होणे, रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना प्रवेश न देणे, या विपरीत असामाजिक तत्वांना प्रवेश देणे, रुग्णांच्या देखभालीकडे दुर्लक्ष करणे, त्यांचा छळ करणे, जुगार खेळताना कर्मचारी पकडले असतांनाही त्यांच्यावर कार्यवाही न होणे, दैनिक वृत्तपत्रात जुगार खेळतांनाचे छायाचित्र प्रसिद्ध होणे, यामुळे नागरिकांमध्ये या रुग्णालयाविषयी संभ्रम निर्माण होणे या अति महत्त्वाच्या प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यावर शासनाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		कित्ता.
२४९	६६	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "पालघर जिल्ह्यासह राज्यातील १६ आदिवासीबहुल जिल्ह्यात बालमृत्यूच्या प्रमाणात दुप्पट वाढ झाल्याची माहिती उजेडात येणे, मोखाडा येथील घटनेनंतर मा. आदिवासी मंत्री महोदयांच्या वादग्रस्त विधानानंतर कुपोषित		कित्ता.

बालके तसेच मातांच्या योजनांचा अंमलबजावणीमधील गंभीर तफावती उघडकीस येणे, आदिवासी लोकसंख्येनिहाय अर्थसंकल्पात नऊ हजार कोटी रुपयांची तरतूद असणे आवश्यक असताना आदिवासींच्या अनेक योजना आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचत नसणे, आदिवासी तसेच आश्रमशाळांमधील लाखो मुलांसाठीच्या योजनेचे खरे लाभार्थींना लाभ मिळत नसून भ्रष्टाचारामुळे कंत्राटदार इतर अधिकाऱ्यांना लाभार्थींना लाभ मिळत असणे, आदिवासी जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रावर डॉक्टर आहेत तर औषधे नाहीत आणि औषधे आहेत तर डॉक्टर बेपत्ता असल्याचे चित्र समोर येणे, आदिवासी भागात काम करणारे आयुर्वेदिक डॉक्टर हे खऱ्या अर्थाने सेवेचा कणा असताना कमी वेतनात हंगामी म्हणून काम करीत असणे, त्यांना सेवेत समावून घेण्याबाबत शासन विलंब करीत असणे, एमबीबीएस डॉक्टर आदिवासी भागात काम करण्यास तयार नसणे, आदिवासी, महिला व बालविकास, आरोग्य विभागांच्या कोणताही समन्वय नसल्याने तिन्ही विभागाचे सचिव एकत्रितपणे काम करत नसल्यामुळे आदिवासींच्या विकासापासून ते गर्भवती मातांना पोषण आहार मिळण्यापर्यंत योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसणे, राज्यशासनाकडून आदिवासी जिल्ह्यात कुपोषणामुळे वाढते बालमृत्यू रोखण्यास येत असलेले अपयश त्यामुळे जनमानसात शासनाबाबत पसरलेला तीव्र असंतोष निर्माण होणे, राज्य शासनाने आदिवासी जिल्ह्यात कुपोषणामुळे बालमृत्यू रोखण्यासाठी कुपोषण टास्क फोर्स उभारण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. ”

२५० २०५ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

“राज्यातील कुपोषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यास शासन अपयशी ठरत असणे, शासनाकडून कुपोषणाच्या मूळ प्रश्नाला हात न घालता आतापर्यंत केवळ वरवरच्या उपाययोजना करण्यात येणे, यातून कुपोषणाच्या प्रश्नाबाबत राज्य सरकार असंवेदनशील असल्याचे दिसून येणे, आदिवासी कुटुंबातील मुलांच्या कुपोषणाला सरकारची अनास्था

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जबाबदार असल्याबाबत उच्च न्यायालयाने शासनावर ताशेरे ओढले असणे, मुंबईत कुपोषणामुळे बालमृत्यू होत असल्याने मुंबईत अशी परिस्थिती असेल तर राज्यातील दुर्गम भागात काय परिस्थिती असेल असा प्रश्न निर्माण होणे, कुपोषण रोखण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध देऊनही कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यास राज्य शासनाला येत असलेले अपयश, सदरील निधी कुठे जातो हाही प्रश्न उपस्थित केला जात असणे, कुपोषण रोखण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासन उदासिन असल्याचे दिसून येणे, कुपोषणाचा गंभीर प्रश्न सोडविण्यास शासन कोणताचा बदल करीत नसणे, शासनाबाबत जनमानसात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्य शासनाने कुपोषणांचा गंभीर प्रश्न सोडविण्याबात तातडीने करावयाची ठोस कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "		
२५१	२८५	**श्री. शरद रणपिसे व इतर वि. प. स.** "सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या २९७ कोटी रुपयांच्या औषध खरेदीत गैरव्यवहार झालेला असणे, या गैरव्यवहार प्रकरणी निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध दोषारोप निश्चित न करताच चौकशी पूर्ण केल्याचे व यासंदर्भातील टेंडर पद्धतीचे उल्लंघन झाल्याचे यासंदर्भात चौकशी करण्यासाठी नेमलेल्या अतिरिक्त मुख्य सचिव, डॉ. भगवान सहाय यांच्या चौकशी समितीने आपल्या चौकशी अहवालात नमूद केलेले असणे, याकडे शासनाने दुर्लक्ष करून दोषी अधिकाऱ्यांना दिलेले संरक्षण, तद्नंतर माहे डिसेंबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास सदरच्या २९७ कोटी रुपये किंमतीच्या औषध खरेदीत गैरव्यवहार झाला असल्याचे शासनाने मान्य केलेले असणे, त्यानुसार त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही शासनाकडून उचित कारवाई होत नसल्याचे दिसून येणे, परिणामी शासन दोषींना पाठीशी घालीत असल्याचे	कित्ता.	

दिसून येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

२५२ ४२२ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यात गेल्या १० महिन्यात १२ हजार नवीन कुष्ठरुग्णांची नोदं करण्यात आली असून यात मुंबईतील ५०० रुग्णांचा समावेश असल्याचे दि. ५ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, सन २०१५-१६ या वर्षात् राज्यात १३ टक्के रुग्णाची नोंदझालेली असणे, याच कालावधीत मुंबई ५८६ कुष्ठरुग्ण आढळून आले असून यात ६८ लहान मुलांचा समावेश असणे, कुष्ठरोगाचा हा विषाणू राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये पसरला असणे, आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार आता १० हजार लोकांमध्ये ९७ लोकांना कुष्ठरोगाची लागण होत असल्याचे समोर आलेले असणे, राज्यासह मुंबईत कुष्ठरोगांच्या वाढत्या संख्येबाबत तज्ज्ञांद्वारे चिंता व्यक्त होत असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात शासनाप्रती निर्माण झालेली तीव्र अंसतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने निधीची तरतूद करून कुष्ठरोगाबाबत जागृतीसाठी शिबीरे आयोजीत करण्यासोबतच या रोगाच्या वाढत्या प्रसाराला आळा घालण्याबाबत करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

२५३ ४६० **श्री. जयंत पाटील, वि. प. स.** कित्ता.

"राष्ट्रीय आरोग्य अभियान सन २०१७ मध्ये कायमस्वरूपी बंद होत असल्याने राज्यातील सुमारे ६० हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना नोकरीस मुकावे लागणार असणे, राज्य शासनाने सुरू केलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे राज्यात आरोग्याचे काम चांगले झालेले असणे, अभियान कायमस्वरूपी बंद होत असल्याने हजारो कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांच्या कुटुंबांना आर्थिक संकटाला सामोरे जाणेसाठी भाग पडणे, याबाबत दि. १३ ऑक्टोबर २०१६ मध्ये कंत्राटी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी एक दिवसाचे कामबंद आंदोलन करणे, सबब याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना. "

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२५४	७५१	**ॲड. जयदेव गौंयकवाड, वि. प. स.** "राज्यात शासन निर्देशानुसार जुलै ते डिसेंबर, २०१६ च्या दरम्यान कुपोषण केंद्रातील बालकांच्या क्षयरोग तपासणीत ६४ कुपोषित बालकांना क्षयरोगाची लागण झाल्याची बाब उघडकीस येणे, यात पुणे जिल्ह्यात ३ बालकांना क्षयरोग झाल्याचेही निदर्शनास येणे, क्षयरोग विभागाने केलेल्या या चाचणीत कुपोषित बालकांमधील क्षयरोगाचे वाढते प्रमाण ही बाब चिंताजनक व गंभीर असणे, राज्यातील कुपोषणग्रस्त भागातील बालकांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करून त्यांच्यावर योग्य उपचार करण्याची तसेच त्यांना सकस आहार देण्याबाबत योग्य ते निर्देश संबंधित विभाग अधिकाऱ्यांना देण्याची नितांत आवश्यकता, राज्यातून कुपोषण व त्यामुळे बालकांना होत असलेला क्षयरोग समूळ नष्ट करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		कित्ता.
२५५	७७४	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "रुग्णांसाठी जीवनदान उरणाऱ्या रक्ताच्या पिशवीत भरमसाठ वाढ करण्यात येणे, शासकीय रक्तपेढीत ४५० रुपयांना मिळणारी रक्तपिशवी आता ८५० रुपयांना मिळत असल्याचे जानेवारी, २०१७ मध्ये उघडकीस येणे, खाजगी रुग्णालयात ८५० रुपयांना मिळणाऱ्या रक्तपिशवीच्या दरावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने तिचा दर २ हजारांवर जाणे, खाजगी रक्तपेढ्यांना रक्तासाठी तसेच लाल पेशींसाठी १४५० रुपये तर प्लाझ्मा व प्लेटलेट्ससाठी ४०० आणि क्रायोप्रेसिपिटेटसाठी २५० रुपये दर आकारण्यात येतील, असे आदेश राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने दिले असतानाही प्रत्यक्षात खाजगी रक्तपेढ्या दुप्पट दर आकारून रुग्ण नातेवाईकांची लुट करीत असणे, सरकारी रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा भासत असल्याने रुग्णांना या खाजगी रक्तपेढ्यांकडे जाऊन		कित्ता.

जास्त दराने रक्त खरेदी करावे लागणे, रुग्णालयांत दर महिन्याला रक्त गटानुसार रक्त संकलन केले जाते, मात्र रुग्णांच्या गरजेच्या तुलनेत हा रक्ताचा साठा अपुरा पडणे, याबाबत शासनाने दखल घेऊन रक्तपेढ्यांची दर निश्चित करण्याबाबत घ्यावयाचा निर्णय, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वशासनाची प्रतिक्रिया. ”

२५६ १०९३ **डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि. प. स.** कित्ता.

“शारदा (ता. सटाणा, जि. नाशिक) येथील गरोदर महिला कळवण येथील ग्रामीण रुग्णालयात दि. १४ मार्च २०१७ रोजी बाळंत होण्यासाठी दाखल झाली असता तीला हृदय विकाराचा व रक्त दाबाचा त्रास असल्याचे सांगत तीला दाखल करून घेण्यात न येणे, तसेच तिला १०८ नंबरच्या रुग्णवाहीनीने नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्याकरिता पाठविण्यात येणे, तथापि नाशिक जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारादरम्यान मायलेकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो असे सांगत तिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल होण्याचा तिला सल्ला देण्यात येणे, तथापि सदर महिलेकडे अवघे ५०० रूपये असल्याने ती खासगी रुग्णालयात दाखल न होता सटाणा तालुक्यातील सौदाणे या गावी बसने जात असतांनाच ती पिंपळगाव बसवंत जवळ एसटी बसमध्ये बाळंत होणे, हा सर्व प्रकार कळवण येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर व नाशिक जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरमुळे झाल्याचे सदर महिलेच्या आईने निदर्शनास आणून देणे, सदर घटनेने नाशिक जिल्हा रुग्णालयाचा कारभार चव्हाटयावर येणे, त्यामुळे यासर्व प्रकरणी तातडीने चौकशी करून संबंधित डॉक्टरवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२५७	१२३२	**श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** "सांगली जिल्ह्यातील मिरजपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या म्हैसाळ येथे एका होमिओपथी डॉक्टरकडून होणारे अवैध गर्भपाताचे अमानुष प्रकार दि. ६ मार्च २०१७ रोजी उघडकीस येणे, अपूर्ण वाढ झालेल्या, मातीत पुरलेल्या १९ अर्भकांचे मृतदेह पोलिसांच्या हाती लागणे, याप्रकरणी संबंधित रुग्णालयातील एका कर्मचाऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून मुख्य संशयित डॉ. बाबासाहेब खिद्रापुरे फरार असणे, माणुसकीला काळिमा फासणारा हा प्रकार मणेराजुरी येथील स्वाती जमदाडे या विवाहितेच्या मृत्यूनंतर उघड होणे, चार दिवसापूर्वी स्वाती जमदाडे यांना म्हैसाळ येथील भारती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते तेथे त्यांचा गर्भपात करीत असताना मृत्यू झाला. सदरील महिलेच्या मृत्यू झाल्या प्रकरणी पोलीस तपासणी सदरील १९ अर्भकांचे मृत्यूदेह सापडल्याच्या अमानुष प्रकार उघडकीस आल्याने राज्यात खळबळ उडणे, या प्रकरणात आरोपी डॉक्टरांला कायद्याच्या कक्षेत आणून शिक्षा देण्याबरोबर सदरील प्रकार रोखण्यासाठी मुलींना जन्मापूर्वीच गर्भाची हत्या करणाऱ्या जोडप्यांना कायद्याच्या कक्षेत आणून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२५८	१२७३	**श्री. अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** "बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील अनेक विभाग व अत्याधुनिक उपचार यंत्रणा बंद असल्यामुळे गोरगरीब रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणे, रुग्णालयाच्या प्रस्तावित विस्तारिकरणाचे काम प्रलंबित असल्यामुळे सद्यस्थितीत अनेक वेळा रुग्णांना बेड नसल्यामुळे जमिनीवर उपचार घ्यावे लागत असणे, रुग्णालयातील डायलेसीस सेंटरमध्ये केवळ		

चार मशिन उपलब्ध असल्यामुळे जिल्ह्यातील सुमारे २००० रुग्णांना वेळेवर योग्य प्रमाणात डायलेसीस सुविधा न मिळणे, नेफ्रॉलॉजिस्टसह अनेक तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रीक्त असल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घेण्याची वेळ येणे, गरीब आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार मोफत किंवा अल्प दरातील उपचार मिळत नसणे, केवळ डायलेसीस किंवा तत्सम महागडे उपचार घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे अनेक रुग्णांचे मृत्यू होणे, जिल्ह्यातील उप जिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलेसीससह इतर सुविधा देण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह रुग्णांच्या नातेवाईकांनी करणे, बीड जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये व उप जिल्हा रुग्णालयांच्या विस्तारिकरण तसेच मंजुर असलेली कामे मोठ्या प्रमाणावर रखडलेली असणे, नेत्रशस्त्रक्रिया शिबीरासह अनेक मोफत चिकित्सा शिबीरांचे आयोजन होत नसल्यामुळे गोरगरिब रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागणे, जिल्हा रुग्णालयातील अत्यावश्यक सेवांकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासन प्रतिक्रिया."

२५९ १४०२ **श्री. संजय दत्त, वि. प. स.** कित्ता.

"राज्यात स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी राज्य सरकार कोणतीही ठोस उपाय योजना करीत नसल्याने मा. उच्च न्यायालयाने दिनांक ९ मार्च २०१७ रोजी त्याची दखल घेऊन राज्य शासनाला धारेवर धरणे, सांगली म्हैसाळ येथील गर्भपात प्रकरण उघडकीस आल्यावर संबंधित विभागाने काय कारवाई केली त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने सार्वजनिक आरोग्य विभागाला देणे, केंद्र सरकारने सन २०१० मध्ये खाजगी रुग्णालये व नर्सिंग होमवर नियंत्रण ठेवणारा कायदा अंमलात आणून काही वैद्यकीय व बिगर वैद्यकीय संघटनांनी या कायद्याच्या अंमलबजावणीस विरोध केलेला असून गेल्या सात वर्षांपासून या कायद्याची अंमलबजावणी करता आलीनसल्याची हतबलता सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे व्यक्त करणे, पुणे शहरात चार हजाराहून अधिक बेकायदा

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नर्सिंग होम चालवली जात असल्याबाबत मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येऊन त्याद्वारे बेकायदा नर्सिंग होमवर कारवाई करण्याची मागणी करूनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे जनमानसात पसरलेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२६०	१४२१	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि. प. स.** "शासनाने ईएसआय कायद्याची मर्यादा रु. १५ हजारावरुन २१ हजार केल्याने कामगारांच्या हक्काच्या आजारपणाच्या रजा रद्द होण्याचा धोका निर्माण झाला असणे, या कायद्यातील तरतुदीनुसार ईएसआय कायदा लागू झाल्यापासून आजारपणाच्या रजा रद्द केल्या जातील असे नमूद केलेले असणे, सध्यातरी या कायद्यांतर्गत वैद्यकीय सेवा उपलब्ध नसणे, तसेच नजिकच्या काळातही वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल याबाबत साशंकता व्यक्त होणे, अशा परिस्थितीत या कायद्याची अंमलबजावणी केल्यास सर्व कामगारांवर अन्याय व गोंधळाची परिस्थिती निर्माण होणे, त्यामुळे कामगारांनी त्यांच्या अनेक संघटनानी या कायद्यात सुधारणा करून कामगाराच्या हक्काच्या रजा अबाधित ठेवाव्यात, अशी शासनाकडे वारंवार आग्रही मागणी केली असणे, परंतु त्यामागणीकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कामगारांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्याकरिता शासनाने या कायद्यातील कामगारांच्या आजारपणाच्या रजा नियमाच्या तरतुदी मध्ये बदल करण्यात यावा, यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	किस्ता.	

२६१ १४२८ **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि. प. स.** कित्ता.

"कोल्हापूर येथील ताराबाई पार्क परिसरातील सुमारे १५ एकर जागेत वसलेले केंद्रीय कामगार राज्य विमा महामंडळाने १२ कोटी रुपये खर्च करून सन १९९७ मध्ये कामगारांसाठी बांधलेले इएसआय रुग्णालय १९ वर्षे झाली तरी अद्याप सुरूच झाले नसल्याचे दि. २४ डिसेंबर २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, १०० खाटांचे हे रुग्णालय असणे, त्याचबरोबर डॉक्टर, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी क्वार्टस बांधलेल्या असणे, सध्या हे रुग्णालय राज्य शासनाच्या अखत्यारित असून राज्य शासनाच्या अनास्था व दुर्लक्ष यामुळे येथे आवश्यक डॉक्टर व कर्मचारी उपलबध करून न दिल्यामुळे सध्या बंद असणे, या रुग्णालयाचे जिल्ह्यातील ५० हजार कामगार सभासद असून कामगारांवर अवलंबित असलेले कुटूंबातील सदस्य ३ लाखावर असणे, हे रुग्णालय बंद असतानाही या रुग्णालयाच्या लाभांसाठी लाभार्थी कर्मचाऱ्यांकडून दरवर्षी ३ कोटी रुपयांचा निधी नियमबाह्यपणे कपात केला जात असणे, याशिवाय सदर रुग्णालयासाठीकेंद्र सरकारकडून भरीव निधी उपलबध करून दिला जात असणे, परंतु तरीही सदर रुग्णालय बंद असल्याने जिल्ह्यातील कामगारांना त्यांचा कोणताही उपयोग होत नसल्याने हे रुग्णालय पुन्हा केंद्र सरकारच्या कामगार राज्य विमा महामंडळाकडे वर्ग करावे अशी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी व कामगारांची मागणी असणे, परंतु शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील कामगारांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने सदर रुग्णालय पुन्हा केंद्रीय कामगार राज्य विमा महामंडळाकडे वर्ग करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२६२ १६०८ **श्री. सुनिल तटकरे व इतर वि. प. स.** कित्ता.

"रायगड जिल्ह्यातील म्हसळा हे एक पर्यटनदृष्ट्या प्रमुख शहर असणे, म्हसळा येथे नव्याने नगरपंचायत अस्तित्वात येणे, या दुर्गम भागातील आरोग्य सेवेसाठी तेथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर होणे, या

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रुग्णालयाची इमारत सन २०१२ मध्ये पूर्ण झालेली असणे, या ग्रामीण रुग्णालयातील महत्त्वाची पदे भरली नसल्यामुळे सद्यःस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत रुग्णसेवा सुरू असणे, प्राथमिक आरोग्य केंद्र सध्या रुग्णालयाचे इमारतीतच सुरू असणे, रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृह, कंपाऊंड वॉल, मुख्य प्रवेशव्दार, पेव्हर ब्लॉकचे काम तसेच पंप रुम व डिस्पेज टँकचे बांधकाम एक ते दीड महिन्यात पूर्ण होणार असल्याचे शासकीय यंत्रणामार्फत लोकप्रतिनिधींना सांगणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचा रितसर ताबा ग्रामीण रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांकडे देणे आवश्यक असणे, ३० खाटांच्या या दुर्गम भागातील ग्रामीण रुग्णालयास त्याचे प्रमाणकानुसार साहित्य, यंत्रसामग्री व साधनसामग्री उपलब्ध होणे गरजेचे असणे, परंतू अद्यापही रुग्णालय पूर्णपणे सुरू होण्यासंदर्भात शासनामार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, डॉक्टर, कर्मचारी वर्ग व साधनसामग्री पुरवठा करण्यामध्ये शासन उदासीन असणे, या गोष्टींमुळे स्थानिक जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, ग्रामीण रुग्णालय असतांना कर्मचारी वर्गाअभावी व साधन सामग्री नसल्याने रुग्णांना मिळत असलेली अपुरी रुग्ण सेवा, त्यामुळे रुग्णांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, शासनाप्रती निर्माण झालेली चीड, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२६३	८५५	**ॲड. राहुल नार्वेकर व इतर वि. प. स.** "राज्य शासनाद्वारे संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना या योजना राबविण्यात येणे, सदर योजनेच्या लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानात मागील आठ वर्षापासून वाढ न होणे, शासनाद्वारे निराधारांना केवळ ६०० रुपये अनुदान देण्यात	कित्ता.	

येणे, सातत्याने वाढणारी महागाई त्यातच मिळणारे अनुदान हे अत्यंत तुटपुंजे असल्याने लाभार्थ्यांकडून त्यात किमान दरमहा रु. १५०० इतके अनुदान वाढवून मिळण्याकरिता होत असलेली मागणी, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी लाभार्थ्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड, संतापाची भावना, निराधार योजनेत वाढ करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२६४ ४ **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि. प. स.** कित्ता.

"राज्यशासनाने ग्रामीण भागातील पाच एकर आतील अल्पभूधारक शेतकरी वर्गासाठी अपघात विमा म्हणून (आम आदमी विमा) योजना सन २००७ पासून सुरू केली असणे, सदरहू योजना गोरगरीब शेतकरी वर्गापर्यंत पोहचत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, आम आदमी विमा योजनेची माहिती सर्वच अल्पभूधारक शेतकऱ्यांना माहिती व्हावी यासाठी कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांच्याकडे जबाबदारी दिली असणे, परंतु यापैकी बहुतांशी कर्मचाऱ्यांनी या योजनेची माहिती शेतकऱ्यांना न दिल्याने या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याने शेतकऱ्यांची होणारी गैरसोय होत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरित याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया. "

२६५ ३४ **श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** कित्ता.

"राज्यात बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजाचे आरक्षणाच्या मागणीसह विविध मागण्यांसाठी राज्यभर मूक मोर्चे निघालेले असणे, डिसेंबर, २०१६ मध्येही नागपूर येथेही विधान मंडळावर मराठा, कुणबी क्रांती मूक मोर्चाचे आयोजन केलेले असणे, या मोर्चासाठी राज्यभरातून लाखो मराठा समाज बांधवांनी सहभाग घेतलेला असणे, संपूर्ण राज्यात संवेदनशील बनलेल्या आरक्षणाच्या मुद्यावर सभागृहात चर्चा होऊनही समाज बांधवांचे समाधान झालेले नसणे, सरकारच्या वतीने दिलेल्या उत्तरात आरक्षण व इतर मागण्यांबाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसणे, त्यामुळे

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		समाजात निर्माण झालेला असंतोष, राज्याच्या प्रमुखांना हदगांव आणि धर्माबाद येथील प्रचार सभेत या असंतोषाचा सामना करावा लागणे, मा. उच्च न्यायालयात या प्रकरणी सुरू असलेल्या याचिकेत शासनाकडून दर सुनावणीत वेगवेगळ्या भूमिका घेण्यात आल्याने सुनावणी प्रलंबित पडणे, शांततेच्या मार्गाने आंदोलन करूनही सरकार आपल्या मागण्यांकडे करीत असलेल्या दुर्लक्षामुळे समाजात निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीचे वातावरण, याबाबत तातडीने निर्णय जाहीर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		
२६६	६८१	**श्री. जगन्नाथ शिंदे व इतर वि. प. स.** "राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या पूर्व मुंबईतील चेंबूर नाका येथील संत एकनाथ मुलांचे शासकीय वसतीगृहात रविवार, दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारच्या जेवणात पाल आढळल्याने एकच उडालेली खळबळ, विद्यार्थ्यांनी जेवणाची सुरूवात करण्याआधीच हा प्रकार उघडकीस आल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होण्याचा प्रसंग त्यावेळी टळला असला तरीही यापूर्वी देखील जेवणात अनेकवेळा काचा, खडे, माती आदी आरोग्यास हानीकारक वस्तू आढळण्याचे घडलेले प्रकार, सदरहू वसतीगृहातील स्वयंपाकगृहाची झालेली दुरावस्था, अस्वच्छ स्वयंपाकगृह याप्रकरणी विद्यार्थ्यांनी वारंवार तक्रारी करूनही त्याकडे वसतीगृह प्रशासनाचे जाणीवपूर्वक झालेले व होत असलेल्या दुर्लक्षामुळे, या वसतीगृहात सध्या राहत असलेल्या १२० विद्यार्थ्याच्या आरोग्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारच्या जेवणात पाल सापडल्याची घटना घडल्यानंतर या प्रकरणाची पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदवूनही अद्यापी संबंधितांविरोधात कोणतीही कारवाई न होणे तसेच त्यांना पाठिशी घालण्याचा होत	कित्ता.	

असलेला गैरप्रकार, याप्रकरणी विनाविलंब सखोल चौकशी होऊन संबंधित दोषींविरोधात कारवाई तसेच वसतीगृहातील विद्यार्थ्यांना चांगले जेवण स्वच्छ पाणी मिळण्याची तसेच वसतीगृहातील दुरावस्था त्वरित दूर होण्याच्या दृष्टीने ठोस कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२६७ ६९७ **श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि. प. स.** कित्ता.

"शासनाच्या तिजोरीतून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या पैशाचा गैरवापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्यासाठी डॉ. व्यंकटेशन यांच्या अध्यक्षतेखाली "टास्क फोर्सस नेमण्यात आलेला असणे, केवळ शिष्यवृत्ती योजनांचे आर्थिक लाभ घेण्यासाठी सुरू असलेली महाविद्यालये बंद करावीत, अन्यथा त्यावरती अंकुश आणण्यासाठी गुणवत्तेचे निकष निश्चित करण्यात यावेत, सर्व शिष्यवृत्ती रकमेचा विनियोगाच्या तपासणीसाठी यंत्रणाची गरज लागणे, सर्व विद्यार्थ्यांचा केंद्रीकृतरित्या डेटा तयार करण्यात यावा, आधार कार्ड असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती देण्यासाठी विशेष खास बाब उपाययोजना करून शिष्यवृत्तीचे वाटप एकाच यंत्रणेकडून करण्यात यावे, शिष्यवृती नियमनासाठी आयोग नेमणेबाबत व "टास्क फोर्ससच्या काही शिफारसीबाबत एका सामाजिक संस्थेने दिनांक २१ ऑक्टोबर २०१६ रोजी एक निवेदन देऊन मुख्यमंत्री व सामाजिक न्याय मंत्री व सचिव यांच्या निदर्शनास आणून देणे, सदर "टास्क फोर्ससची मुदत दिनांक १६ डिसेंबर २०१६ पर्यंत असताना तरी याबाबत गेल्या चार महिन्यांपासून शिफारशीच्या फाईलीकडे शासनाच्या सामाजिक न्याय व आदिवासी विभागाने शिष्यवृत्ती नियमनासाठी आयोग नेमणेबाबत दुर्लक्ष करत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. "

२६८ ११३२ **श्री. संजय दत्त व इतर वि. प. स.** कित्ता.

"मराठा, धनगर, मुस्लीम समाजांना आरक्षण देण्याचा निर्णय शासन दरबारी प्रलंबित असणे, महाराष्ट्र राज्यात मराठा, धनगर, मुस्लीम

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आरक्षणावरुन या समाजामध्ये तीव्र प्रतिक्रिया असणे, या समाजांना आरक्षण देण्याबाबत सरकार गंभीर नसणे, शासनाने आरक्षण देण्याबाबत वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले असणे, मराठा, धनगर, मुस्लिम समाजाकडून वारंवार होत असलेले धरणे, आंदोलने त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, या समाजांमध्ये राज्य शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने मराठा, धनगर, मुस्लीम या समाजांना आरक्षण देण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "		
२६९	११६०	**श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स.** "नाशिक शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये राख चाळण्याचे काम करणाऱ्या मातंग समाजाच्या महिलांना सामाजिक न्याय विभागातील वसतिगृहे वा कार्यालयातील साफसफाई, माळीकाम इ. कामे टेंडर न मागविता प्रायोगिक तत्वावर देण्याबाबत दि. ३१ जानेवारी, २०१४ रोजी शासनस्तरावर झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊनही उपजिविकेचे साधन म्हणून स्मशानभूमीमधील प्रेते जळल्यानंतर प्रेतांची राख चाळून त्यात सापडलेल्या वस्तूंवर २५० मागासवर्गीय गरीब महिला कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असल्याचे हृदयद्रावक सत्य निदर्शनास येणे, अंत्यविधीनंतर राखेच्या कार्यक्रमाच्या वेळी मृतांच्या नातेवाइकांनी ठेवलेल्या नैवेद्यांवर पोटप्रपंच चालविण्याची महिलांवर वेळ येणे ही निश्चितच लाजिरवाणी बाब असणे, सदर महिलांना प्रायोगिक तत्वावर नाशिक शहरातील सामाजिक न्याय विभागाच्या व शासनाच्या कार्यालयांमधील तसेच वसतिगृहातील साफसफाई माळीकाम व सुरक्षा हे काम देण्याचा शासनस्तरावरील बैठकीत निर्णय घेतलेला असणे, मात्र शासन निर्णय	कित्ता.	

निर्गमित करण्यासाठी विभागाने टाळाटाळ केल्यामुळे बैठकीतील निर्णयांची अद्यापही अंमलबजावणी झालेली नसणे, सदर गंभीर प्रकरणी कार्यवाही करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, सदर प्रकरणी शासनाने तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता , मात्र या प्रकरणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या कुटुंबामध्ये पसरलेली निराशेची भावना, दुर्गंधी व घाणीमुळे या महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंताजनक परिस्थिती, त्यामुळे या गरीब कुटुंबामध्ये पसरलेले असुरक्षिततेचे वातावरण, यावर शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

२७० ११७२ **ॲड. जयदेव गायकवाड, वि. प. स.** कित्ता.

“राज्य शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवास करत असलेली लंडन येथील वास्तु ३२ कोटी रुपयांमध्ये खरेदी केलेली असणे, सदर खरेदी डॉ. बाबासाहेब मागासवर्गीय समाजाचे नेते होते म्हणून शासनाने सामाजिक न्याय विभागाकडून केलेली असणे, वास्तविक ही खरेदी शासनाने वित्त विभागाकडून निधी उपलब्ध करून खरेदी करण्याची आवश्यकता असताना राज्यातील मागासवर्गीय, उपेक्षित घटकांच्या विकासासाठी राखीव असलेल्या निधीतून ही खरेदी केलेली असल्याने समाजातील मागासवर्गीय असलेल्या घटकांवर शासनाने अन्याय केलेला असणे, तसेच सामाजिक न्याय विभाग समाजातील दुर्बल घटकांसाठी आरक्षित ठेवलेला १६०० कोटी रुपयांचा निधी या विभागातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्ष व अनास्थेमुळे वापरला गेलेला नसणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंती निमित्त कार्यक्रमासाठी सामाजिक न्याय विभागाच्या एकात्मिक घटक योजनेतून निधी खर्च करणे, या दोन्ही घटकांमध्ये सामाजिक न्याय विभागाकडून त्यांच्या मूळ कर्तव्याशी कसूर केलेली दिसत असणे, परिणामी समाजातील दुर्बल घटकांमध्ये शासनाप्रती चीडीची भावना निर्माण होणे, मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी आरक्षित निधी त्यांच्या कल्याणासाठी उपयोगात आणण्याची आणि निधीचा वापर इतरत्र करणे व निधी वाया घालवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "		
२७१	११७८	**डॉ. सुधीर तांबे व इतर वि. प. स.** "राज्यातील केंद्र पुरस्कृत अनुसूचित जातींच्या मुलामुलींच्या राज्य शासनाने मान्यता दिलेल्या ३२२ आश्रमशाळांना वेळोवेळी पाठपुरावा करूनही गेल्या १६ वर्षापासून अनुदान मिळाले नसल्याचे दि. १३ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या सर्व आश्रमशाळा सन २००२ पासून सुरू असून या आश्रमशाळांची जिल्हाधिकारी यांचे मार्फत सन २०१२ मध्ये व नंतर विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी १६ मार्च, २०१५ रोजी गोपनीय तपासणी करून सुद्धा या आश्रमशाळांना शासनाने अद्याप अनुदान दिलेले नसणे, त्यामुळे या आश्रमशाळांतील हजारो गोरगरीब विद्यार्थ्यांना शासनाच्या सोयीसुविधांपासून वंचित रहावे लागत असणे, या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तके, भोजन, गणवेश इ. सुविधा संस्थाचालक शेती, दागदागिने विकून पुरवित असणे त्यामुळे त्यांच्यावर कर्जबाजारी होऊन आत्महत्येची वेळ आलेले असतांनाही शासन त्यांच्या प्रतीकरीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी या संस्थाचालकांत व येथील विद्यार्थ्यात शासनाप्रती निर्माण झालेली तीव्र असंतोष व चीडीची भावना त्यामुळे शासनाने या आश्रमशाळांच्या अनुदानासाठी प्रलंबित असलेल्या प्रस्तावाला मंजुरी देऊन त्यांना तातडीने अनुदान देण्याबाबत करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
२७२	११८९	**श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** "अनुसुचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील १४ लाख १० हजार विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ या वर्षात शिष्यवृत्ती, शिक्षण	कित्ता.	

शुल्क, परीक्षा शुल्क मिळाले नसल्याची गंभीर बाब मार्च, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे अनुसुचित जाती / जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्यात येत असणे, सदर शुल्क, शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होत असणे, फेब्रुवारी, २०१७ अखेर केवळ २ लाख २८ हजार विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती मिळालेली असणे, उर्वरीत १४ लाखाहून अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असणे, केंद्र सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती मिळणाऱ्या अनुदानासाठी राज्य शासनाने दावा न केल्याने २१०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त न होणे, सरकारने या रकमेवर दावा न केल्याने केंद्र शासनाने ही रक्कम इतर राज्यांकडे वर्ग करणे, केंद्र शासनाकडून शिष्यवृत्तीसाठी मिळणाऱ्या रकमेत प्रत्येक वर्षी कपात होत असणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क / परीक्षा शुल्कापासून वंचित रहावे लागणे, लाखो गरीब मुलांच्या शिक्षणावर त्याचा गंभीर परिणाम होणे, त्यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागणे, मागासवर्गीय, अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत सरकारच्या अनास्थेमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेला तीव्र संताप व असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व भूमिका. ”

२७३ १२१३ **श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** कित्ता.

“मुलुंड सहकार विश्व को. ऑप. हौ. सो. लि. नाहूर रोड, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८० या संस्थेस महाराष्ट्र शासनाकडून मागासवर्गीयांकरीता पी. डब्ल्यु. आर-२१९ युद्धोत्तर पुनर्वसन योजने अंतर्गत बीन व्याजी कर्ज व अनुदान प्राप्त झाले असताना देखील बांधकामासंदर्भात गैरव्यवहार होणे, संस्थेच्या मूळ सभासदांची नावे व त्यांचा प्रवर्ग यांची माहिती संस्थेच्या रजिस्टरमध्ये नसणे, संचालक, समाजकल्याण यांची मान्यता प्राप्त करून न घेताच बांधकाम करणे, नियम धाब्यावर बसवून परस्पर सभासद बदल व सदनिका विक्री व्यवहार करणे, संस्थेचा पुनर्विकास व

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रिक्त जागेवर बांधकाम करण्यासाठी संचालक, समाजकल्याण या कार्यालयाची परवानगी न घेणे, मागासवर्गीय सभासदांच्या सदनिका अमागासवर्गीय सभासदांना विक्री करून मागासवर्गीयांवर अन्याय करणे, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सभासदांची दिशाभूल करणे, इत्यादी बाबींवर झालेल्या गैरव्यवहाराविरुद्ध शासनाच्या संबंधित प्राधिकरणाला कळवूनसुद्धा दखल न घेतल्यामुळे या संस्थेच्या सभासदामध्ये पसरलेला असंतोष तसेच शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून या समस्या/अडचणी लवकरात लवकर मार्गी लावण्याकरीता कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "		
२७४	१२२८	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "भाषावार प्रांत रचनेपूर्वी वऱ्हाडातील भंडारा व बुलढाणा या दोन जिल्ह्यांतील धोबी समाजाचा समावेश अनुसूचित जाती मध्ये असणे, दिनांक २५ नोव्हेंबर, १९७६ च्या शासन निर्णयान्वये मध्यप्रदेशातील सिहोर, भोपाळ व रायसेन या जिल्ह्यातील धोबी समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करण्यात येणे, परंतु अनुसूचित जातीत यापूर्वीच समाविष्ट असलेल्या महाराष्ट्रातील धोबी समाजास वगळण्यात येणे, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या अनुसूचीतून एखाद्या जातीत वगळण्यासाठी सामाजिक शास्त्रीय कारण असण्याची आवश्यकता, हा अधिकार केवळ संसदेत असणे व याकरीता राष्ट्रपतीच्या मान्यतेची गरज परंतु या प्रकरणी ही प्रक्रिया अवलंबिलेली नसणे, वास्तविकतः या बाबतीत १९७६व्या घटना दुरुस्तीनंतर हा प्रश्न शासनाने स्वतःहून निकाली काढण्याची आवश्यकता परंतु शासनाकडून तसे प्रयत्न करण्यात न येणे, याबाबतीत नेमण्यात आलेल्या डॉ. भांडे समितीच्या अहवालामध्ये	कित्ता.	

धोबी समाज शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे नमूद करण्यात येणे, भारतातील १३ राज्यांमध्ये तसेच ५ केंद्रशासीत प्रदेशामध्ये धोबी समाजाचा समावेश अनुसूचित जातीमध्ये असणे, महाराष्ट्रातील धोबी समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

२७५ १४३६ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.** कित्ता.

"राज्यात शाहू-फुले आंबेडकर यांचे विचार व कार्यकारी जनतेपर्यत पोहचविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे ही यंत्रणा सक्षमी असतानाही येथील महासंचालकांनी सरकारी पदाचा गैरवापर करीत ब्रिक्स इंडिया प्रा. लि. या खाजगी कंपनीला ६५० समता दुतांना काम देऊन या प्रकल्पातील शेकडो समतादूत व अधिकारी यांना बेरोजगार केले असल्याचे दिनांक २१ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, यावेळी नियमाप्रमाणे जाहीरात, निविदा इ. प्रक्रिया न राबविणे, तसेच दि. २६ डिसेंबर २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ या कालावधीत बार्टीअंतर्गत अनेक नियमबाहय बढत्या, पदोन्नती देणे, त्यांच्या वैयक्तिक गायनाच्या कार्यक्रमात समतादूतांचा वापर करणे, बार्टीअंतर्गत येणारी महापुरुषांची विनामूल्य पुस्तके १५ टक्के दराने विकणे, समतादूत तसेच कर्मचारी यांच्या पगारातून नियमबाहयपणे मोबाईलसाठी ८६०० रु. घेणे, समतादूतांना महिला कर्मचाऱ्यांना धमकाविणे, येथील अनेक यशस्वी उपक्रम बंद करणे, यासारख्या अनेक नियमबाहय बाबी करून ही संस्था बंद पाडण्याचा प्रयत्न करणे, त्याविरोधात येथील समतादूत प्रकल्पातील कर्मचाऱ्यांनी शासनाशी सतत संवाद संघर्ष करूनही शासन करत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील कर्मचाऱ्यांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्याकरिता शासनाने सदर अधिकाऱ्याला तात्काळ निलंबीत करून त्यांची चौकशी करणे, व ब्रिक्स कंपनीचा करार रद्द करून तेथे वर्ग केलेले समतादूत व मुलाखती झालेले सर्व कर्मचारी यांना कामावर घेणे, समतादूतांचा सन २०१५-१७

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		चा प्रवासखर्च देणे, सन २०१५-१६ पासून कार्यरत समतादूतांना त्यांची प्रलंबित १५ टक्के वाढरक्कम देण्यात येत नसल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली चिडींची भावना लक्षात घेता शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. "		
२७६	६९३	**श्री. धनंजय मुंडे व इतर वि. प. स.** "राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियान ही योजना राबविताना शास्त्रोक्त पद्धतीने पर्यावरणाचा अभ्यास नसल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, तसेच एन्व्हायरोन्मेंट इम्पॅक्ट असेसमेंट स्टडीही केलेला नसणे, या योजनेमुळे पर्यावरणाचे नुकसान होणार असल्याने याचा सखोल अभ्यास करूनच ती राबविण्याचा आदेश शासनाला द्यावा अशी जनहित याचिका न्यायालयात दाखल करण्यात येणे, न्यायालयाने राज्य शासनाला जलयुक्त शिवार अभियानाचा अभ्यास करण्यासाठी तज्ञांची समिती नियुक्त करण्याचे निर्देश देणे, या समितीमध्ये सरकारी अधिकारी घेऊ नका असे बजावणे, या संदर्भातील अहवाल सादर करण्याचे आदेश देणे, परंतु समिती स्थापन झाल्यानंतर त्यात सरकारी अधिकारी असल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करणे, हे अधिकारी सरकारच्याच योजनेबाबत प्रतिकूल अहवाल देतील याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणे, शासनाने याबाबत तातडीने अहवाल सादर करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "	कित्ता.	
२७७	१३२९	**श्री. अमरसिंह पंडित व इतर वि. प. स.** "एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (आय. डब्ल्यू. एम. पी.) अंतर्गत सन २००९ ते २०१५ या कालावधीत बीड जिल्ह्याला ११, ६८३. ४५ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त होणे, प्राप्त रकमेचा खर्च करतांना बाब व घटकनिहाय टक्केवारी निश्चित करण्यात येणे, मत्ताहिन उपजीविका व	कित्ता.	

सुक्ष्म उद्योजकता कार्यक्रमासाठी १९ टक्के निधी राखीव असणे, यामधून भुमिहिन व अल्पभुधारक शेतकऱ्यांना थेट अनुदान देण्याचे प्रयोजन असणे, यासाठी सुमारे २२१९ लक्ष रुपयांच्या निधीची तरतुद असतांनाही सदरचा निधी अखर्चित राहणे, यामुळे भुमीहिन व अल्पभुधारक लाभार्थी शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होणे, प्रशासकीय व तत्सम निधी खर्च करण्यावर अधिकाऱ्यांचा भर असणे, योजनेतील ७६७३. ८४ लक्ष रुपये खर्चून झालेली पाणलोट विकासाची कामे संशयास्पद रितीने बोगस झाल्याचे उघडकीस येणे, आय. डब्ल्यू. एम. पी. योजना दिनांक ३० मार्च २०१७ पासून बंद होत असल्यामुळे योजनेतील कामे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करतांना सदरचा प्रकार उघडकीस येणे, योजनेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अचानक सेवेतून कमी केल्यामुळे त्यांच्यावर बेकारीची वेळ येणे, योजनेवर झालेला खर्च व यामधून झालेली कामे यांची योजना हस्तांतरणापुर्वी विशेष तपासणी पथकाकडून तपासणी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी करणे, भुमीहिन व अल्पभुधारक लाभार्थ्यांना शासन अनुदानापासुन वंचित ठेवणे, निकष डावलून बोगस कामे करूनआर्थिक गैरव्यवहार करणे अशा प्रकरणाची चौकशी करून दोषी विरुद्ध ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासन प्रतिक्रिया. ”

२७८ १३३४ **श्री. धनंजय मुंडे, वि. प. स.** कित्ता.

“बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथे जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर असून अशा प्रकारचे नैसर्गिक घटनेने निर्माण झालेले हे जगातील तिसरे सरोवर असणे, सदर सरोवराची निर्मिती काही हजार वर्षांपुर्वी अशनीच्या (Asteroid) रुपात प्रचंड वेगात पृथ्वीवर आदळल्यामुळे झालेली असणे, निसर्गाचा हा अद्भुत चमत्कार पाहण्यासाठी देश-विदेशातून हजारो पर्यटक या ठिकाणी येत असणे, मात्र सदर ठिकाणी आवश्यक मुलभूत सोयीसुविधा राज्य शासन व केंद्र शासनाच्या पुरातन वास्तु विभागाने उपलब्ध केलेली नसणे, औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा, वेरूळ, दौलताबाद येथे ज्याप्रमाणे सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या त्या प्रमाणात

(१)	(२)	(३)	(४)	(५)
